म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ...... काव्य
सं. क्र. २५८८

# गीत गाथा



REFBK-0025778
REFBK-0025778

दि. मा. प्रभुदेसाई

संदर्भ
काव्य
२५८४
२५७७८
२७।१२।८८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५८४
आ. क्र. २५७७८
२७।१२।८८




The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line.

Based upon Survey of India map with the permission of the Surveyor General of India. © Government of India copyright, 1987.

The administrative headquarters of Haryana, Punjab and Chandigarh are at Chandigarh.

The Boundary of Meghalaya shown on this map is as interpreted from the North-Eastern Areas (Reorganisation) Act 1971, but has yet to be verified.

‘महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले
मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले’

—सेनापती बापट

# महाराष्ट्र गीत गाथा

संकलन

**दि. मा. प्रभुदेसाई**

पुरस्कार

**शिवसेनाप्रमुख
बाळासाहेब ठाकरे**

मराठी ग्रंथ संग्रहालय
REFBK-0025778
REFBK-0025778

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई.

पहिली आवृत्ती
ऑक्टोबर १९८८

किंमत १२५ रुपये

संकलन : दि. मा. प्रभुदेसाई
२८६ ई अब्दुल अझीझ चाळ,
स. गो. बर्वे मार्ग कुर्ला, (प.) मुंबई ४०००७०

□

रंगीत छपाई
सर्वोदय प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स,
गिरगाव, मुंबई ४००००४

□

मुद्रक :
प्र. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, गिरगाव, मुंबई ४००००४

□

प्रकाशक :
धनंजय बाळकृष्ण ढवळे
केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी,
गिरगाव, मुंबई ४००००४

# पुरस्कार

मी एक निसर्गवेडा माणूस आहे. खंडाळ्याच्या घाटातून जाताना पावसात कड्यांवरून कोसळणारे धबधबे पहाण्यासाठी मी बऱ्याचवेळा तेथे उतरतो. हिरवेचार डोंगर आणि त्यावरती तरळणारे ढग पाहाताना भान हरपून जातं. हिवाळ्यापर्यंत हवेतला सुखद गारवा अंगाला स्पर्श करत असतो. पण ऋतू बदलून उन्हाळ्याला सुरवात होताच तोच परिसर कसा ओकाबोका, उघडानागडा दिसू लागतो. धबधबे आटलेले असतात. हिरवळ नष्ट झालेली असते. ढग पळालेले असतात. वृक्षही वृद्धासारखे दिसू लागतात. मनाची सारी उभारीच निघून जाते. पावसाळ्यातील तो सुखद गारवा नष्ट होऊन उन्हाळ्यातील जिवाची तगमग करणारी ती परिस्थिती असह्य होते.

समाजाच्या जीवनात असेच काही ऋतू असतात. मला आठवतं लहानपणी आमच्या शाळेत पाठांतर असे. मग ते कवितेचं असो वा मनाच्या श्लोकांचं, जें असेल तें पाठ म्हणून दाखवावं लागे. सध्यां पाठांतराला सर्वांनीच पाठ दाखविली आहे.

त्या बालवयातही माझ्या मनावर बालकवी ठोमरे यांची 'फुलराणी' ही कविता एक कायमचा परिणाम करून गेली.

'हिरवे हिरवे गार गालिचे–हरित तृणाच्या मखमालीचे
त्या सुंदर मखमालीवरती–फुलराणी ही खेळत होती.'

निसर्गाचं इतकं मनाची पकड घेणारं वर्णन मी तरी अन्यत्र पाहिलं नाही. उन्हाळ्यातही ही कविता म्हणताना मनाला एक गारवा मिळतो. तसंच बालवयात विमानाबद्दल मनात अपार कुतूहल असताना वाचलेल्या—

'किती मौज दिसे ही पहा तरी
हें विमान फिरतें अधांतरी'

या काव्यपंक्ति आजही माझ्या लक्षात राहिल्या आहेत त्या, शब्दांची पकड, चित्र उभे करण्याइतकी मजबूत असल्यामुळे. आज आमच्या नातवंडांना या कविता सांगताना वाढतं वयही विसरायला होतं.

आज काळ बदलला, पिढ्या बदलल्या. आतां 'Generation Gap' हा इंग्लिश शब्द तोंडावर फेकला जातो आणि जुन्यांनी त्यावर गप्प बसायचं असतं. आज संस्कार आटत चालले आहेत. अभिमानाची हिरवळ लुप्त होत चालली आहे. 'जुनें तें सोने' हा वाक्प्रचार आतां आहे म्हणून उद्‌गारायचा, परंतु नव्या जमान्यात जुन्यांचं महत्त्व साफ आटलं आहे. मुळात आपण कोण हेच विसरत चाललो आहोंत. इतिहास घडविण्याची कुवत नाही आणि पूर्वेतिहासाची पर्वा नाही अशा गुर्मीत, मस्तीत नवीन पिढीचं संचलन सुरू झालं आहे. त्यांना ना नेता ना दिशा! आपले पूर्वज कोण होते, त्यांचं कर्तृत्व काय होतं, त्यांचं झुंजणं, त्यांचं टक्कर देण्याचं सामर्थ्य, त्यांनी भोगलेल्या शिक्षा! अनंत हाल-अपेष्टांतही सह्याद्रीच्या खडकाप्रमाणे अविचल राहून त्यांनी एक दिव्य नि अलौकिक इतिहास उभा केला. त्यांचं नामस्मरणही आज होईनासं झालं आहे. आज जेथे अशा वीरांचे पुतळे उभे आहेत त्यांच्या छातीवर बेगुमानपणे आपली नावं कोरण्यांत या नवीन पिढीला जरासुद्धा दिक्कत वाटेनाशी झाली आहे.

आज पुन्हा या साऱ्याचं चिंतन आणि मनन करण्याची वेळ आली आहे. अथांग सागरातील तुफानात सापडलेल्या नौकेला दीपस्तंभाचा उजेड जरी दिसला नाही तरी ध्रुवताऱ्याच्या अस्तित्वामुळे त्यांना योग्य मार्गाच्या दिशेचा बोध होतो.

आजच्या या ढगाळलेल्या परिस्थितीत माझे एक शिवसैनिक श्री. दि. मा. प्रभुदेसाई यांनी एक प्रकार, जुना असला तरी तो नव्यानं सादर करून दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. 'महाराष्ट्र-गीत गाथा' हा मोठ्या श्रमाने त्यांनी संकलित केलेला कवितांचा संग्रह किंबहुना 'एन्सायक्लोपिडिआ' आजच्या तरुण पिढीनं अवश्यमेव नजरेखालून घातला पाहिजे.

म्हणजे मग हल्लींच्या वाद्यवृंदांमधून वाद्यांचा जो ठणठणाट चालू असतो आणि काही गायक आपल्या पिचलेल्या आवाजात थोरामोठ्यांच्या आवाजांची नक्कल करत असतात त्यांना कळून चुकेल की कसकसल्या 'साहित्यसोनियाच्या खाणी' आपल्याकडे आहेत आणि आपण कसले उकिरडे चिवडत आहोत.

स्वातंत्र्य मिळून चाळीस वर्षं झाली तरीपण कुसुमाग्रजांच्या कवितेची 'गर्जा जयजयकार क्रांतीचा, गर्जा जयजयकार' ही ओळ आजही कानावर पडली तर अंगावर रोमांच उभे रहातात. रक्त सळसळतं. 'जयोस्तुते' काय, 'सागरा प्राण तळमळला' काय, स्वातंत्र्यवीरांच्या या कविता ऐकताच या महाराष्ट्राची दिव्यता नि भव्यता नजरेसमोर उभी रहाते.

कवी कवींमध्ये फरक असतोच. काही कवी शब्दांचे जादूगार होते. काही हळवे तर काही स्फुल्लिंग निर्माण करणारे होते. या महाराष्ट्रात काही शाहीर होऊन गेले. त्यांनीही प्रसंगोपात् मर्दांना जाग आणली. पण त्यावेळी मर्द होते तरी! आजच्या जमान्यात 'गर्द'ला कवटाळणारा सर्द तरुण फिरून मर्दपणे उभा करणं ही केवळ महाराष्ट्राचीच नव्हे तर राष्ट्राची गरज आहे, हांक आहे.

अशावेळी श्री. दि. मां. ची 'महाराष्ट्र-गीत गाथा' प्रभावी ठरावी.

ज्या दिवशी या गाथेतील गीतांनी वाद्यवृंद नटतील त्यावेळी त्यांचे या देशावर फारच मोठे उपकार होतील. उत्तान गाण्यांनी आज तरुण पिढी नासविली जात आहे. गाण्यांना सूर असतील पण त्या पलिकडे भस्मासूर उभे आहेत याची जाण हवी. तरुणांना प्रेमाच्या गाण्यांत अडकवून ठेवण्यापेक्षां त्यांना त्यांच्या देश-कर्तव्याची जाणीव करून द्यायला हवी.

ती जाणीव त्यांना ही 'गाथा' करून दिल्याशिवाय रहाणार नाही.

जर उद्या हे सारे तरुण सांघिक गीतें म्हणत सैन्याच्या ऐटीत रस्त्यावरून शिस्तीने कवायती करत चालू लागतील तर त्यावेळी समाजाला जडलेली सर्व जळमटं जळून जातील, गळून पडतील. हे दृश्य जर प्रत्यक्षांत उभं राहिलं तर या देशाकडे बांकड्या नजरेनं पाहाण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही.

सध्यां तरी माता-पिता, गुरुवर्य यांच्यापुढे माथा टेकवण्याची प्रथा दुर्मिळ होत चालली आहे. तरी या 'महाराष्ट्र-गीत गाथे' पुढे तरुणांनी जर माथे टेकविलेच तर अज्ञान दूर होऊन एक निराळाच प्रकाश किरण त्यांना दिसेल आणि त्यामध्येच त्यांना महाराष्ट्राच्या इतिहासाची, भूगोलाची आणि स्वतःचीही ओळख पटेल.

असे झाल्यावर मग आपले संस्कार टिकतील, संस्कृती उज्ज्वल होईल आणि धर्मही वृद्धिंगत होईल.

या गाथेच्या वाचनाने तरुण पिढीकडून हे कार्य होवो हीच शिवचरणीं प्रार्थना.

जय महाराष्ट्र!

आपला,
बाळ ठाकरे

# गाथेची कथा

मी ज्यावेळी 'ज्यूदो' व 'शरीरसौष्ठव व्यायाम' शिकलो त्यावेळी त्या दोन्ही क्रीडाप्रकारांबद्दल माहिती देणारं मराठी भाषेत एकही पुस्तक नव्हतं. तेव्हा 'जें जें आपणांसी ठावें तें तें इतरांसी सांगावें' या हेतूने मी 'ज्यूदो-एक खेळ' व 'शरीर सौष्ठव' ही दोन पुस्तकं लिहिली. त्या विषयांवरील मराठी भाषेतील ती पहिली आणि एकमेव पुस्तकं होती. त्या प्रकारां-बद्दल मला वाचून व ऐकून मिळालेली माहिती व स्वतः केलेली प्रात्यक्षिकं मी माझ्या लेखनशैलीत त्या पुस्तकांत मांडली होती. त्यांत माझं स्वतःचं असं काहीच नव्हतं. तेव्हा पुस्तकं लिहिली म्हटलं तरी खरं म्हणजे ती संकलनंच होती.

'महाराष्ट्र-गीत गाथा' हे सुद्धा अशा प्रकारचं, एवढं मोठं असं पहिलंच आणि एकमेव संकलन आहे असं मला वाटतं.

कै. कृ. पां. कुळकर्णी व कै. आचार्य अत्रे संपादित 'महाराष्ट्र गाथा'; श्री. वसंत बापट यांचं 'शिंग फुंकिलें रणीं'; श्री. जयंत साळगांवकर यांनी प्रकाशित केलेलं 'शब्दरंजन स्पर्धेचं' 'महाराष्ट्र गौरव गीतें' व १९८६ त प्रसिद्ध झालेलं श्री. रत्नपारखी यांनी संकलित केलेलं 'महाराष्ट्र गौरवगीत संग्रह' ही महाराष्ट्रावरील गीतांची यापूर्वी प्रसिद्ध झालेली पुस्तकं.

'महाराष्ट्र गाथा'चं स्वरूप गद्य-पद्य वेंचे' असं आहे. 'शिंग फुंकिलें रणीं' हा श्री. वसंत बापट यांचा स्वतःचा काव्यसंग्रह आहे. 'महाराष्ट्र गौरव गीतें' व 'महाराष्ट्र गौरवगीत संग्रह' ही दोन फक्त 'महाराष्ट्र गीतां'ची संकलनं आहेत. राजकवी यशवंत

यांचं 'शिवराय' व महाकवी मोरे यांचं 'गीतशिवायन' ही दोन्ही महाकाव्यं म्हणजे संपूर्ण काव्यमय इतिहासच आहे.

माझ्या या 'महाराष्ट्र-गीत गाथा' संकलनात, 'महाराष्ट्र' म्हटल्यावर जे जे अभिमानाचे विषय आपल्या नजरेसमोर उभे राहातात त्या सर्व विषयांवरील गीतांचा समावेश केलेला आहे. त्यामुळे या संकलनाला 'महाराष्ट्र गीत कोश' असं स्वरूप आलं आहे असं म्हणायला हरकत नाही. त्या दृष्टीनं पाहातां अशा प्रकारचं एवढं मोठं असं हें पहिलंच आणि एकमेव संकलन आहे हे माझं म्हणणं चुकीचं ठरू नये. अर्थात् वरील सर्व पुस्तकांतून मी गीतं घेतली असल्यामुळे त्यांचं ऋण मी मान्य करतोच.

लहानपणापासूनच मला वाचनाचं व्यसन आहे. त्यावेळी 'किर्लोस्कर', 'स्त्री', 'मनोहर', 'सत्यकथा' अशी दर्जेदार मासिकं दर महिन्याला मला वाचायला मिळत. दादरच्या डॉ. डिसिल्व्हा मार्ग–सार्वजनिक वाचनालयातील बहुतेक सर्व पुस्तकं मी वाचून संपविली होती. काव्यसंग्रह मात्र मुळीच वाचले नव्हते. त्यावेळी नव्या-जुन्या कवितांचं संकलन 'वेंचे' किंवा 'नवनीत' या नावानं केलेलं असे. तशी काही पुस्तकं मात्र वाचली होती.

त्यानंतर मासिकं, कथा, कादंबऱ्या, काव्यसंग्रह यांचं अमाप उत्पादन सुरू झालं आणि त्यांची गुणवत्ता त्याच प्रमाणात घसरली. त्यामुळे गेल्या कित्येक वर्षांत–काही अपवाद वगळता–अशा पुस्तकांना मी हातही लावलेला नाही. काव्यसंग्रहांशी माझा यापूर्वी संबंध आला नव्हता तो या संकलनाच्यावेळी आला आणि त्यांचीही स्थिती कथा-कादंबऱ्यांहून फारशी निराळी नाही असं माझं मत झालं.

असं वाचन करत असताना काही मासिकांतून, वृत्तपत्रांतून तर कचित् एखाद्या काव्यसंग्रहातून एखादी चांगली कविता आढळली तर ती लिहून ठेवण्याची संवय मला लागली. अशा ज्या काही थोड्या कविता जमविल्या त्यांत चार-पांच 'महाराष्ट्र गीतं' होती.

सन १९७४ मध्ये श्रीशिवाजीमहाराज राज्याभिषेक त्रिशत-संवत्सरी साजरी झाली त्यावेळी आम्ही मित्रमंडळींनी कुर्ल्याला तीन दिवसांचा एक कार्यक्रम केला. त्यापूर्वीपासूनच आम्ही गड-किल्ल्यांच्या यात्रा करत होतो. त्यांच्या छायाचित्रांचं एक प्रदर्शन भरवलं होतं. गडकिल्ल्यांची थोडक्यात माहिती आणि ४-५ महाराष्ट्र गीतं असलेली एक छोटी पुस्तिका त्यावेळी आम्ही प्रसिद्ध केली.

सन १९८५ मध्ये संयुक्त-महाराष्ट्राचा रौप्य महोत्सव साजरा झाला. त्यावेळी वृत्तपत्रांनी, साप्ताहिकांनी अशी 'महाराष्ट्र गीतं' रोज एक किंवा आठवड्यातून एक अशी प्रसिद्ध करावीत अशी विनंतीपत्रं मी त्यांच्या संपादकांना माझ्याकडील गीतांसह पाठवली. महाराष्ट्र शासनाच्या 'लोकराज्य' या पाक्षिकालाही असं पत्र पाठवलं, पण कोणाचाही प्रतिसाद मिळाला नाही. तेव्हा मी विचार केला की हे काम मीच का करू नये? आणि या संकल-नाला सुरवात झाली.

नेहमी ऐकू येणाऱ्या ध्वनिमुद्रिकांमुळे आपल्याला दोन-चार 'महाराष्ट्र गीतं'च माहीत असतात. फारतर पन्नास एक असतील असा माझा समज होता.

असं संकलन यापूर्वी झालं आहे किंवा काय याची चौकशी काही जणांकडे केली, पण फारशी माहिती मिळाली नाही. मग वाचनालयात जाऊन काव्यसंग्रह पाहायचे असं ठरवून त्या कामाला लागलो. "'महाराष्ट्र गीतां'चं एखादं पुस्तक असलं तर

द्या" असं सांगितल्यावर मला 'गोड गोड भावगीते' 'कोळीगीते' अशी पुस्तकं मिळाली. कवी गोविंदांची कविता' मागितल्यावर गोविंदाग्रजांची 'वाग्वैजयंती' मिळाली!

त्यानंतर 'महाराष्ट्र गाथा' हे पुस्तक मिळालं. त्यांत मला हवं असलेलं बरंच साहित्य मिळालं. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या नायगाव येथील 'संदर्भ विभागा'त गेल्यावर अशा साहित्याचा खजिनाच माझ्या हाती आला. तेथील दहाबारा कपाटांत असलेले सर्व काव्यसंग्रह मी वाचून काढले.

संदर्भ विभागात असलेल्या यादीवरून आपल्याला हव्या असलेल्या पुस्तकांची नावं, क्रमांक व लेखकांच्या नावांसह लिहून द्यावी लागतात. मग एकावेळी दोन पुस्तकं दिली जातात. मी ५० / ६० मोटे ताव भरून यादी तयार केली. दरवेळी दिलेल्या दोन पुस्तकांत मला हवी असलेली गीतं नसली की मी लगेच ती पुस्तकं परत करून दुसरी मागत असे. पुस्तकं देणारांना याचा त्रास होऊ लागला. तेव्हा हे प्रकरण मुख्य ग्रंथपाल श्रीमती लतिकाबाई जोशी यांच्याकडे गेलं. त्यांनी सांगितलं, "ती यादी ठेवा बाजूला. ही एवढी सगळी कपाटं काव्यसंग्रहांची. तुम्हाला पाहिजेत ती पुस्तकं घ्या नि परत नीट जागेवर ठेवा." मग माझं काम सुरळीत चालू झालं. अनेक पुस्तकांवरची धूळही झटकली गेली!

अशा गीतांचे कवी म्हणजे प्रामुख्यानं शाहीर असणार अशी माझी समजूत. श्री. वसंत बापट हे कलापथकातील. तेव्हा त्यांचीही गीतं असणार हा अंदाज होता. म्हणून काव्यसंग्रह चाळताना शाहीर अमरशेख, श्री. वसंत बापट, कुसुमाग्रज, तिवारी यांच्या कविताच पाहायच्या असं ठरवलं पण माझी ही समजूत चुकीची

असल्याचं माझ्या लगेच लक्षांत आलं. कितीतरी इतर कवींची नावं मला या प्रांतात आढळली. काव्याबद्दलचं माझं अज्ञान होतंच पण सर्वसामान्य वाचकाला कल्पनाही येणार नाही अशा अनेक कवींनी या विषयांवर गीतं लिहिलेली मला दिसली. श्री. सुरेश भट म्हणजे 'मराठी गझलकार' म्हणून प्रसिद्ध. कै. वि. स. खांडेकर म्हणजे प्रसिद्ध कादंबरीकार अशी ओळख. कै. माडखोलकर यांनी कविता लिहिल्या असतील याची माझ्याप्रमाणेच अनेकांना कल्पनाही नसेल, पण या सर्वांच्या महाराष्ट्रावरील कविता मला काव्यसंग्रहांतून मिळू लागल्या तेव्हा ठराविक कवीच पाहायचे ही कल्पना सोडून द्यावी लागली.

मग कवितेच्या शीर्षकात 'महाराष्ट्र' वा तत्सम शब्द दिसला तर तेवढीच कविता पहायची असं ठरवलं. तसं केलं असतं तर कितीतरी कविता या संकलनातून वगळल्या गेल्या असत्या, पण एक काव्यसंग्रह चाळतांना 'मंत्राक्षता' हे शीर्षक वाचून कविता न वाचताच पान उलटण्याच्या तयारीत होतो तेवढ्यात काही शब्दांनी लक्ष वेधून घेतलं. खरं म्हणजे 'मंत्राक्षतां'चा संबंध लग्न-मुंजीशी हे समीकरण आपल्या मनात लग्नगाठीइतकच पक्कं झालेलं! पण ही कविता माझ्या संकलन कक्षेतीलच होती. त्यानंतर मात्र प्रत्येक काव्यसंग्रहाचं प्रत्येक पान वाचायला सुरवात केली.

त्यावेळी ज्या कविता मला वाचायला मिळाल्या त्यावरून माझ्या लक्षात आलं की, महाराष्ट्राशी संबंधीत असलेल्या सर्व विषयांचा अंतर्भाव 'महाराष्ट्र गीतां'त असला तरी त्या प्रत्येक विषयावर स्वतंत्र अशा अनेक कविता असून त्या महाराष्ट्र गीतांइतक्याच चांगल्या आहेत. तेव्हा मग मी संकलनाची कक्षा

वाढवून त्यात महाराष्ट्र गीतांबरोबर या अशा गीतांचा समावेश करण्यास सुरवात केली. हे विषय आहेत 'सह्याद्रि पर्वत' 'छत्रपती शिवाजी महाराज', 'जरिपटका नि भगवा झेंडा' व 'मराठी भाषा' त्यातून निर्माण झाली 'महाराष्ट्र-गीत गाथा'.

या विषयांवर मी लक्ष्य केंद्रित केलं होतं तरी इतर कविताही नजरेखालून जात होत्या. 'मोत्या शीक रे अ आ इ' 'चिव चिव चिमणी छतात छतात' अशा किती तरी जुन्या कविता 'भेटल्या'! मग ते लहानपणचे दिवस आठवले आणि त्याबरोबरच एवढ्य वर्षांत किती प्रचंड विस्मरण झालं ते लक्षात आलं. जुनं विसरून गेलो नि नवीन काहीच पाठ केलं नाही याची रुखरुख लागली. वाटलं, एवढे दिवस काव्यसंग्रह वाचले नाहीत ही फारच मोठी चूक झाली, पण मग असेही काही काव्यसंग्रह वाचले की, ज्यामुळे आपण काव्यसंग्रह वाचण्यात वेळ घालवला नाही ते योग्यच केलं असंही वाटावं!

काही काही काव्यसंग्रहांत सुरवातीपासून शेवटपर्यंत एकच कविता. ती सुद्धां 'मुक्तछंद' किंवा 'नवकविता' अशा प्रकारात! 'मुक्त-छंद' या प्रकाराबद्दल कै. सोपानदेव चौधरी यांनी लिहिलेली एक कविता मला आढळली ती पुढे देत आहे. त्यावरून अशा कविता आणि त्यांचे काव्यसंग्रह यांचं स्वरूप आपल्या चट्कन् लक्षात येईल.

प्रासां चढवू या फासावर
यमके धाडूं यमसदनाला
यती पाठवूं रतीकडे अन्
चरणां चरणां ठोकुनि नाला

श्लेषांची तर ठेचू तोंडे
लघु-गुरु मात्रा गेल्या वाया
इथें न मात्रा चाले आतां
गणांस देखिल दणकावूंया

वृत्त अतां निवृत्त जाहले
नष्ट करूं त्या जाती आतां
उभे विषुववृत्तावरि राहुनि
लिहूं मुक्त-छंदी नवकविता !

**लक्षण :** मुक्त छंद मुक्तछंद
नसे त्याला धरबंद
गती शीघ्र गती मंद
सारे कांही अंदाधुंद
इथें लय जाते लया
बेतालाचीच किमया
सांगा ऐशा बेबंदाचा
कैसा व्हावा बरें छंद ? जळ्ळे लक्षण !

('छंद लीलावती'—सोपानदेव चौधरी)

काही संग्रहांत एका पानावर दोनचार ओळींची एकच कविता. बाकी सर्व कागद कोरा ! वर परत कागदाच्या व त्यामुळे पुस्तकांच्या किंमती वाढल्या म्हणून ओरड ! 'आभाळ, आभाळच आभाळ' असा एकच शब्द तीनवेळा लिहिलेला म्हणजे कविता अशी कल्पना स्वप्नात तरी कोणाला येईल काय ? 'महारोगायन' नावाची कविता किंवा काव्यसंग्रह मी वाचला आहे ! अशा कितीतरी कविता मी वाचल्या की ज्यांचा अर्थ कोणालाही कळणार नाही किंवा कोणालाही काहीही अर्थ काढता यावा !

आजचे मराठी चित्रपट म्हणजे धांगडधिंगा आणि आकाशवाणीवरील मराठी गाणी म्हणजे तमाशातील लावण्या व पुरुष गायकांनी जास्तीत जास्त रडव्या आवाजांत म्हटलेली गाणी असं समीकरण माझ्या मनात तयार झालं आहे. त्याचप्रमाणे मी वाचलेल्या काव्यसंग्रहातील बहुतांश कविता म्हणजे स्त्रैण वृत्तीचं प्रदर्शन अशी माझी समजूत झाली.

मी स्वतः कवी नाही, मला कवितेचं व्याकरण कळत नाही, कवितांचं रसग्रहण करण्याइतका मी विद्वानही नाही पण एक संस्कृत सुभाषित माझ्या मनांत पक्क ठसलं आहे. सुभाषितकार म्हणतो, "शिरच्छेद न करणारा बाण आणि हृदयाला स्पर्श न करणारं काव्य या दोन्ही गोष्टी निरुपयोगी आहेत." या निकषावर किती कविता व काव्यसंग्रह उतरतील याबद्दल मला शंकाच आहे.

कथा, कादंबऱ्या, काव्य इत्यादी साहित्याचा, नाटक, चित्रपट या कलांचा समाजावर परिणाम होत असतो. आज तरुण पिढीकडून चित्रपटातील नायक-नायिकांच्या केवळ पोषाखाचंच नव्हे तर कृत्यांचंही अनुकरण केलं जात आहे.

दिल्लीत 'एशियाड' चालू असताना एकदा एक प्रसिद्ध चित्रपट अभिनेता क्रीडांगणावर आला. त्याबरोबर सर्व प्रेक्षक स्पर्धा पाहायचं सोडून त्याला पाहाण्यासाठी धडपडू लागले. ओरडू लागले. एका परदेशी वृत्तपत्र वार्ताहाराला या गोंधळाचं कारण कळताच तो उद्गारला, "तुम्ही भारतीय लोक खेळांत एवढे मागे का हे आज मला समजलं."

रडवी प्रेमगीतं, शृंगारिक गाणी, अश्लिल, उत्तान, भडक साहित्य व त्यातून तयार होणारी तसलीच नाटकं व चित्रपट, यांच्या अनुकरणामुळे निर्माण होणारी व फोफावणारी अनेक

व्यसनं यामुळे आपला समाज आज हरेक क्षेत्रात मागे पडत चालला आहे.

ज्या परिस्थितीमुळे दुसऱ्या बाजीरावानं मराठी राज्य गमावलं असं म्हटलं जातं त्यापेक्षाही जास्त अधोगतीची परिस्थिती आज सबंध देशात निर्माण झाली असून त्यामुळे आम्ही आमच्या देशाचं स्वातंत्र्यही गमावून बसतो की काय अशी शंका आज विचारवंतही व्यक्त करू लागले आहेत.

'राजा कालस्य कारणम्' या न्यायानं निरोगी समाज व समाजस्थिती निर्माण करणं हे शासनकर्त्यांचं कर्तव्य असतं. ते कर्तव्यच्युत होतात तेव्हा त्यांना वठणीवर आणण्याची आणि समाजाला योग्य मार्गावर नेण्याची जबाबदारी साहित्यिक, शाहीर, कवी यांच्यावर येऊन पडते.

परकीयांनी आपल्यावर युद्ध लादल्यावर तेवढ्यापुरती स्फूर्तीगीतं म्हणून काही उपयोग नसतो तर आपल्या राष्ट्राचा उज्ज्वल इतिहास, आपल्या पूर्वजांचे पराक्रम यांचं स्मरण व संस्कार समाजावर सतत होत राहावे लागतात तरच समाज विजिगीषु वृत्तीचा होतो व तो सर्व क्षेत्रांत प्रगती करू शकतो.

पारतंत्र्यकाळात 'मराठ्यांची संग्रामगीते' हे कवी दुर्गाप्रसाद तिवारींचं पुस्तक फार गाजलं. त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत श्री. म. ना. अदवंत म्हणतात,

'पूर्वजांच्या अभिमानातून इतिहासकार आपल्या राष्ट्राचा इतिहास लिहिण्यास प्रवृत्त होतो. कवी आपल्या वीरपुरुषांचे पोवाडे गाण्यास तयार होतो. कवी भूतकाळांत प्रवेश करतो तो पूर्वजांचे पराक्रम गाऊन त्यापासून स्फूर्ती मिळविण्यासाठी व लोकांनाही स्फूर्ती देण्यासाठी. पूर्वजांच्या पराक्रमाबद्दल वाटणाऱ्या

अभिमानाबरोबरच स्वकालीन कर्तृत्वशून्यतेबद्दल विषादही त्याच्या काव्यातून व्यक्त होतो. अशावेळी पूर्वजांचे पराक्रम ऐकून तरी लोकांनी घोर निद्रेतून जागे व्हावे व स्वतःची दुःस्थिती दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न करावा या उत्कट इच्छेने लोकांच्या डोळ्यांसमोर भूतकाळ व वर्तमानकाळ ही दोन्ही चित्रे रंगवून 'हे चित्र पहा व ते चित्र पहा' असे त्यांना जणूं बजावीत असतो आणि त्याबरोबरच 'पूर्वं दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावीकाळ' असे आशाप्रेरक सूर काढून जनतेच्या मनांत नवचैतन्य निर्माण करण्याचाही तो प्रयत्न करतो.'

कै. शाहीर अमरशेख यांच्या 'कलश' या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहितांना आचार्य अत्रे हाच भावार्थ त्यांच्या जरा वेगळ्या व खास शैलीत व्यक्त करतात. कविता करणारांचे कवी, लावणीकार व शाहीर असे तीन प्रकार असून कवी व लावणीकार हे जनतेचं मनोरंजन करतात तर शाहीर जनतेला प्रेरणा देतो हे सांगताना ते लिहीतात,

'कवी, लावणीकार गुंगवतात, मालवतात नि विझवतात. शाहीर चेतवतो, पालवतो व पेटवतो. कवी नवे विचार देतो, नवे आकार दाखवतो, नाही असे नाही, पण ऐकणाराला त्यामुळे फार झाले तर रवंथ करण्याची इच्छा होते आणि लावणीकार जास्तीत जास्त विकारांच्या विरोळ्यांना शरीरातून वळवळ करायला लावतो; पण शाहिराचे शब्द कानावर पडले कीं, वारुळातून फुत्कार करीत बाहेर पडणाऱ्या नागाप्रमाणे किंवा करवंदीच्या जाळीतून डरकाळी फोडीत बाहेर पडणाऱ्या वाघाप्रमाणे माणसाची अवस्था होते. शाहिराचे शब्द त्याची आंतडी खेचतात. त्याचे जिव्हार ठेचतात. कवी आणि लावणीकार हे रिकामपणचे सोबती

आहेत. शाहीर हा दैनंदिन जीवनाच्या संग्रामामधला सांगाती आहे. कवी हा आपल्या खोलीचे दार बंद करून, अंथरुणावर उताणा पडून अन् आढ्याकडे डोळे लावून स्फूर्तीचा गोळा डोक्यावर बद्‌कन् केव्हा पडेल ह्याची तासन्‌तास वाट पाहात बसतो. कोकिळेप्रमाणे वर्षातून दोन महिनेच त्याला कंठ फुटतो. शाहीर हा एखाद्या कोंबड्यासारखा आहे. घराच्या पडक्या भिंताडावर शेताच्या कुंपणावर, नाहीतर, कामगारांच्या चाळीच्या जिन्यावर बसून त्याला सकाळ, दुपार वक्तशीरपणे आरवावेच लागते.

पांढरपेशा कवींना ह्या गोष्टीची जाणीवही नाही. समाजाकडे पाठ फिरवून ते खुशाल विलासाच्या, प्रेमाच्या आणि सृष्टि-सौंदर्याच्या शिळया कढीला पुन्हा पुन्हा ऊत आणण्याचा अजून उद्योग करीत बसले आहेत. अशा कवींना उद्देशून मायकोव्हस्की म्हणतो,

| | |
|---|---|
| 'Gentlemen Poets, | सभ्य कवींनो, |
| have you not tired | अजून कंटाळा नाही आला |
| of pages, | त्या राजदूतांचा, |
| palaces, | राजवाड्यांचा, |
| Love | प्रेमाचा |
| and lilac blooms ? | नि वासंतिक बहराचा ? |
| If such as you | हीच जर तुमची |
| are the Creators | निर्मिती असेल |
| then I spit upon all art.' | तर थूः साऱ्या कलेवर !' |

वर उद्‌धृत केलेल्या विचारांची अनुभूती हे संकलन वाचताना आपल्याला येईल हे नक्की.

आजच्या महाराष्ट्रीय समाजाला विशेषतः तरुण पिढीला सध्या अगदी ज्वलंत असलेल्या महाराष्ट्राच्या सीमाप्रश्नाबद्दल फारशी माहिती नाही. संयुक्त महाराष्ट्राचा लढा त्यांना माहीत नाही. मग महाराष्ट्राच्या जुन्या इतिहासाची गोष्टच सोडा! शिवाय खरा इतिहास दडपून ठेवून विपर्यस्त इतिहासही शिकवला जातो. अशा परिस्थितीत महाराष्ट्राची भौगोलिक जडणघडण, महाराष्ट्राचे विविध क्षेत्रातील पराक्रमी पुरुष व त्यांचे पराक्रम, कोणत्याही क्षेत्रात कमी न पडणारी मराठी भाषा आणि एकूण महाराष्ट्राचा तेजस्वी इतिहास महाराष्ट्राच्या तरुण पिढीपुढे सतत राहावा म्हणून हे संकलन केलेलं आहे. यासाठी या गीतांचे संस्कार मुलांवर लहानपणापासून होणं आवश्यक आहे.

मी राहात असलेल्या चाळीतील लहान मुलं माझ्या खोलीत जमतात तेव्हा त्यातील मुली हिंदी चित्रपटांतील गाणी-पार्श्वसंगीता-सह-म्हणून त्याप्रमाणे नाच करतात आणि मुलगे आकडी आल्यासारखे हातापायांना झटके देतात. या प्रकाराला ते 'ब्रेक डॅन्स' म्हणतात!

गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीत युवकयुवती वेड्यावाकड्या नाचतात, सहलीला गेलेली मुलं अचकट विकचट गाणी म्हणत असतात हे आपण नेहमी पाहातो. घरोघरी गेलेल्या व रात्रंदिवस चालू असलेल्या 'दूरदर्शन'चे हे प्रताप आहेत.

या गाथेतील गीतांचे संस्कार मुलांवर लहाणपणापासून घरी-दारीं, शाळा-कॉलेजांत होऊ लागले तर मिरवणुकीतील सर्वजण एका तालासुरांत एखादं गीत गातांना आपल्याला दिसतील, सहलीला गेलेली मुलं एखाद्या गड-किल्ल्यावर गेली आणि तिथं त्यांनी या गाथेतील एखादं गीत म्हटलं तर त्या

गीताला व त्या सहलीला एक वेगळंच स्वरूप प्राप्त झाल्याचं त्यांना आढळेल !

'दूरदर्शन' व 'आकाशवाणी' या प्रचार माध्यमांच्या मराठी कार्यक्रमात दररोज एक नवीन गीत सादर करायचं म्हटलं तरी वर्षभर पुरून उरतील एवढी गीतं या गाथेत आहेत.

आजकाल हजारो शालेय विद्यार्थ्यांचा मेळावा भरवून त्यांच्याकडून एखादं गीत म्हणून घेण्याचा उपक्रम केला जातो. त्यावेळी या गीतांपैकी एक गीत म्हणण्याचा कटाक्ष ठेवला किंबहुना यापैकीच काही गीतं म्हणण्यासाठी असे मेळावे आयोजित केले गेले तर ही गीतं हजारो मुलांच्या ओठांवर सहज खेळू लागतील.

काही वाद्यवृंद विशिष्ट गीतांचा कार्यक्रम सादर करतात. त्यांना या गीतांचा कार्यक्रम तयार करता येइल.

हे सत्कार्य घडवून आणण्याची जबाबदारी व क्षमतासुद्धा संगीत दिग्दर्शक आणि गायक-गायिकांची आहे असं मला वाटतं.

लहानपणी मी माझ्या काकांकडे राहात असे. त्यांच्याकडे एक आचारी होता. नाटकाची त्याला फार आवड. बालगंधर्वांची सर्व नाटकं त्यानं अनेकवेळां पाहिलेली. रंगात आला की तो, 'वद जाऊ कुणाला, जाऊ कुणाला,' 'संशय कां मनीं आला,' 'किती किती सांगू तुला, किती किती सांगू तुला,' 'प्रभु मजवरी कोपला, मजवरी कोपला,' या आणि एवढ्याच ओळी, अशाच प्रकारे एकमेकांना जोडून एकाच सूरात व तालात रडगाण्यासारख्या म्हणत असे. शाळेत पाठांतराला असलेल्या कविता आम्ही त्याच्यासारख्याच म्हणत असूं. कोणतीही कविता ठराविक चारपाच चालींत बसत असे. मग दळण घातल्यासारखी ती कविता म्हणायची. आम्ही अगदी कंटाळून जायचो. या संकलनात

असलेली 'साधुदास' यांची 'बाल शिवाजी' ही कविता म्हणताना तिची सुरवात आम्ही 'ना केला अन्‌गुलजार' अशी करायचो. मग आम्हाला प्रश्न पडे की, 'अनगुलजार केला नाही' म्हणजे नक्की काय केलं? तो प्रश्न मास्तरांना विचारण्याचा धीर आम्हाला कधीच झाला नाही. तो 'नाकेला' असा एकच शब्द असून त्याचा अर्थ 'चांगलं नाक असलेला-सरळ व टोंकदार नाक असलेला' असा आहे हें मला शाळा सोडल्यानंतर कितीतरी वर्षांनी कळलं! स्वातंत्र्यवीर सावरकरांची 'सागरास'ही कविता म्हणताना आम्हाला व ऐकतांना इतरांना कवीच्या तळमळीचा मागमूसही लागत नसे!

रसपरिपोष करणारी चाल कवितेला असते किंवा असावी ही कल्पनाच त्यावेळी नसल्यामुळे करुण, वीर, वात्सल्य, शृंगार या सर्व रसांना एकाच चालीत बांधून स्थितप्रज्ञाप्रमाणे 'समभाव' आम्ही आचरीत होतो!

आज श्रीमती लता मंगेशकरांच्या आवाजात, चपखल चालीवर, वाद्यांच्या साथीसह ध्वनिफितीवर वाजणाऱ्या त्याच कविता ऐकतो त्यावेळी मला प्रश्न पडतो, त्याच का या कविता? ज्या पाठ करण्याचा आम्ही एवढा कंटाळा करत होतो!

अशा आकर्षक चाली संगीत दिग्दर्शकांनी या गीतांना लावल्या, गायक-गायिकांनी ती गायिली, आकाशवाणी-दूरदर्शन-वरून, सार्वजनिक उत्सव, कार्यक्रम अशावेळी ध्वनीवर्धकावरून ती सतत लोकांच्या कानी पडत राहिली तर ती लहानथोरांच्या ओठांवर सहज बसतील. याशिवाय गीतांच्या वैयक्तिक, सांघिक अशा स्पर्धासुद्धा घेता येतील.

‘एक काळ ऐसा होता’, ‘अहाहा कुठें तो महाराष्ट्र गेला’ ‘तेच काय आम्ही?’ अशा या संकलनातील अनेक कविता ज्या अनेक वर्षांपूर्वी, पारतंत्र्य काळांत लिहिल्या गेल्या त्या आजच्या आपल्या परिस्थितीला चपखल लागू पडतील अशा आहेत. ती परिस्थिती बदलून ध्यानी-मनी-जागृती-स्वप्नी महाराष्ट्राचा अभिमान बाळगणारी नवीन पिढी तयार करायची असेल तर अशा गीतांचे संस्कार मुलांवर लहानपणापासूनच व्हायला हवेत. कारण असा स्वाभिमानी महाराष्ट्रच ‘भारताचा आधार’– ‘भारताचा खड्गहस्त’ होऊ शकतो.

* * *

संयुक्त महाराष्ट्राच्या रौप्यमहोत्सवी वर्षात म्हणजे सन १९८५ पासून मी हें संकलनाचं काम चालू केलं, ते या पुस्तकाची छपाई संपेपर्यंत चालूच होतं असं म्हणायला हरकत नाही.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयात जाऊन काव्यसंग्रहातील गीतं मी भराभर लिहून घेत असे व घरी आल्यावर ती परत सावकाशपणे चांगल्या अक्षरात लिहित असे. त्यामुळे माझं मराठी हस्ताक्षर बरंच सुधारलं!

या संकलनात (१) महाराष्ट्र गीते (२) सह्याद्रि (३) छत्रपती शिवाजी महाराज (४) भगवा झेंडा-जरिटपका व (५) मराठी भाषा या विषयांच्या कविता आहेत.

काही कवितांमधील विषयानुकूल तेव्हढाच भाग घेतला आहे, अशा कवितांच्या शीर्षकावर ‘तारका चिन्ह’ * केलेलं आहे.

एकच कविता दोन ठिकाणी वा दोन वेळा प्रसिद्ध झालेली असून त्या दोन्हीमध्ये काही फरक आहे असं आढळलं तर त्या दोन्ही कविता या संकलनात दिल्या आहेत.

मुख्यत: कवींच्या आडनावांच्या अद्याक्षरानुक्रमानं कविता दिल्या आहेत, एखाद्या कवीनं एक कविता खऱ्या नावानं व दुसरी टोपणनावाने लिहिली असेल तर अद्याक्षराप्रमाणे फरक पडला तरी त्याच्या कविता सलग दिल्या आहेत. मात्र श्री. रत्नपारखी यांचं 'महाराष्ट्र गौरवगीत संग्रह' हे पुस्तक मुंबईत कुठं मिळालं नाही म्हणून ते त्यांच्याकडून मागवून घेईपर्यंत बराच वेळ गेला व माझ्या पुस्तकाची छपाई सुरू होऊन गेली होती त्यामुळे त्या पुस्तकातून घेतलेली काही 'महाराष्ट्र गीतं' अद्याक्षरानुक्रमाने येऊ शकली नाहीत. ती 'महाराष्ट्र गीतां'च्या विभागात शेवटी दिली आहेत. त्याचप्रमाणे सर्व पुस्तकाची छपाई संपल्यावर कै. अण्णाभाऊ साठे यांचं एक 'महाराष्ट्र गीत' हातीं आलं ते पुस्तकाच्या अगदी शेवटीं छापलं आहे. 'महाराष्ट्र गीते' या विभागात गीत क्र. २३८ शूर अम्ही सरदार—या गीताच्या गीतकार शांता शेळके या आहेत, तसेच 'शिवरायाची गौरव गाथा' या विभागात गीत क्र. ५२ शिवाजी उत्सव—या गीताचे गीतकार रवीन्द्रनाथ टागोर हे आहेत.

आपल्या लक्षात येईल की, यातील अनेक काव्यसंग्रह, कवी, प्रकाशक हे फार जुने आहेत. त्यामुळे संमतीसाठी पाठविलेली अनेक पत्रं परत आली. काहींचे बदललेले पत्ते मिळवून त्यांना परत पत्रं पाठवावी लागली. काहींना तीन तीन-चार चार पत्रं पाठवूनही त्यांनी उत्तरं पाठविली नाहीत. काही पत्ते मिळविण्यास 'अभिनव प्रकाशन'चे श्री. वा. वि. भट, शाहीर साबळे व प्रा. श्री. रत्नपारखी यांचं मला चांगलं साह्य झालं. ज्यांच्याशी आम्ही संपर्क साधू शकलो नाही पण ज्यांच्याकडे या संकलनातील गीतांचे अधिकार आहेत, त्यांनी आपले पत्ते आम्हाला कळवले तर त्यांना मानधन पाठविण्यास आम्हाला आनंद होईल.

कै. रवींद्रनाथ टागोर यांच्या दोन कविता वगळल्यास विशिष्ट प्रसंगावर आधारलेली गीतं या संकलनात घेतलेली नाहीत.

या गाथेचं संकलन करताना मला मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे संस्थाधिपाल श्री. अच्युत तारी, संदर्भ विभागाच्या प्रमुख श्रीमती लतिकाबाई जोशी, ग्रंथपाल श्री. मनोहर पारायणे या पदाधिकाऱ्यांचं त्याचप्रमाणे तेथील सर्व कर्मचाऱ्यांचं चांगलं साह्य झालं. तिथं काम करणारी कुमारी माधुरी दामले ही कुल्र्याचीच. व्यायामशाळेतील माझी विद्यार्थिनी. आयत्यावेळी मला काही संदर्भ लागले तर ते तिच्यामुळे मला घरबसल्या मिळू शकले. या सर्वांचा मी अतिशय आभारी आहे.

माझ्या पहिल्या दोन पुस्तकांप्रमाणेच या पुस्तकालाही शिवसेनाप्रमुखांनी पुरस्कार लिहिला आहे. एवढंच नव्हे तर मी त्यांच्याकडे गेलो तेव्हा त्यांनी मला सांगितलं, "या पुस्तकाचं मुखपृष्ठ तुम्ही श्री. रवी परांजपे यांच्याकडून करून घ्या. तुम्हांला पत्ता मिळणार नाही. मी मानेंना (ड्रायव्हर) तुम्हाला तिथे सोडून यायला सांगतो." लगेच त्यानी श्री. पराजपे यांना दूरध्वनीही केला. माझ्यावरील त्यांचा लोभ सतत वृद्धिंगत होत राहावा हेच माझं मागणं आहे. नवीन पिढीत राष्ट्र आणि महाराष्ट्र यांच्याबद्दल प्रेम, भक्ती नि अभिमान चेतविण्याच्या त्यांच्या कार्याला या गाथेचा थोडासा जरी हातभार लागला तरी मला फार आनंद होईल.

श्री. रवी परांजपे यांनी त्यांच्या इतर व्यापांतून वेळ काढून हे मुखपृष्ठ करून दिलं आणि वर भेट म्हणून त्यांच्या वडिलांनी लिहिलेलं 'गोविंदाग्रजांची गूढ गीते' हे पुस्तक मला दिलं.

कै. सोपानदेव चौधरी' यांची दोन पुस्तकं, 'छंद लीलावती' व 'संगीता आणि अमृत गीते', त्यांच्या स्नुषा सौ. सुचित्रा चौधरी यांनी, 'आकाशगाणी' हा स्वतःचा काव्यसंग्रह, श्री. योगेश्वर अभ्यंकर यांनी व कवि 'निशिकांत' (श्री. डी. व्ही. कुळकर्णी) यांनी त्यांचा काव्यसंग्रह 'जय महाराष्ट्र' हा मला भेट म्हणून दिला. या सर्वांचे आभार मानणं निव्वळ औपचारिकपणा ठरेल.

माझ्या शेजारची मुलं चि. उमेश मतकर, चि. पुरुषोत्तम वार्डे व चि. सीमा वार्डे यांचा या गाथा संकलन श्रमांत खारीचा वांटा आहे.

शेवटी या गाथेतील गीतं ज्या ज्यां कवींची, शाहीरांची, आहेत त्या सर्वांचे मी आभार मानतो. खरं म्हणजे ही गाथा त्यांचीच आहे. माझं स्वतःचं असं त्यांत काहीच नाही. हां, सर्व काम एकहाती असल्यामुळे चुका असतील तर त्या मात्र माझ्याच आहेत. 'फोडिलें भांडार। धन्याचा हा माल। मी तो हमाल। भार वाही ॥' ही माझी भूमिका आहे.

मला एकसारखी पुस्तकं द्यावी लागतात म्हणून ग्रंथालयातील एक स्त्री ग्रंथपाल माझ्यावर जेव्हा रागावल्या त्यावेळी मी त्यांना म्हटलं होतं, "आज तुम्हाला हा त्रास होत आहे, पण माझं हे पुस्तक प्रसिद्ध झालं की पुढे पाचपंचवीस वर्षं तरी तुम्हाला हा त्रास होणार नाही. कोणालाही महाराष्ट्रावरील कोणतंही गीत हवं असो, त्याला तुम्ही हे एकच पुस्तक दिलंत की तुमचं काम झालं."

या गाथेमुळे एवढं तरी साध्य झालं आहे की नाही हे तुम्ही वाचकानीच ठरवायचं आहे. तुमचा 'होकार' मिळाला तर मला आणि प्रकाशकांनाही समाधान वाटेल. वाचकांना या कवितांचा अनेक प्रकारे अभ्यास करता येईल, तुलना करता येईल. कोणतंही पान उघडलं तरी ते वाचावसं वाटेल असंच आहे.

या कविता वाचत असताना अनेकदां माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. काही वेळा अभिमान वाटला. तर काही वेळा दुःख! 'अमृतांतेहि पैजा जिंके' अशी श्रीज्ञानदेवांनी होड घेतली खरी पण ती प्रत्यक्षात का उतरली याचं उत्तर मला कै. सोपानदेवांच्या 'पैजा कां जिंके' या कवितेत मिळालं. दास गणू यांची 'महाराष्ट्र मुलुख' किंवा वा. ना. निगम यांची 'उलटी अमुची मायबोली तरी' या कविता वाचल्यावर ओठांवर आपोआप हंसू आलं. याच भावभावनांचा अनुभव तुम्हा वाचकांनाही येईल, कांहींना पुनःप्रत्यय येईल याची मला खात्री आहे. कारण तुमच्या व माझ्या मनात असलेलं महाराष्ट्र-प्रेम, महाराष्ट्र अभिमान एकच आहे आणि त्यामुळेच तर ही गाथा निर्माण झाली.

**कोणत्या कारणें झालें हें निर्माण।**
**देशाचें कारण, देश जाणे॥**

**दि. मा. प्रभुदेसाई**
२८६ ई, अब्दुल अझीझ चाळ
स. गो. बर्वे मार्ग, कुर्ला (प.) मुंबई ४०००७०

२५७५८
२०।१२।८६

# अनुक्रमणिका

## विभाग १ ला 'महाराष्ट्र गीते'


| गीत क्र. | गीताचें शीर्षक | गीतकार | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | जय महाराष्ट्र | अमरशेख | १७ |
| २ | आदेश | ,, | १८ |
| ३ | महाराष्ट्र गीत | अधिकारी गो. गो. (कमलाकर) | १९ |
| ४ | तेच का आम्ही? | ,, | २३ |
| ५ | आम्हीच ते मराठे | ,, | २५ |
| ६ | मर्द मराठे रक्त सांडती | अभ्यंकर योगेश्वर | २७ |
| ७ | श्री महाराष्ट्रास | अज्ञातवासी (दि. गं. केळकर) | २८ |
| ८ | पुणें दरबारी | ,, | ३० |
| ९ | नवा महाराष्ट्र | अडांगळे प्रीतम (य. मु. अडांगळे) | ३१ |
| १० | महाराष्ट्र गौरवगीत | अवसरे वसंत | ३२ |
| ११ | महाराष्ट्र आपुला | अत्रे प्रभाकर | ३३ |
| १२ | महाराष्ट्र गीत | आजगांवकर चकोर | ३४ |
| १३ | महाराष्ट्र गीत | इलेकर सुहासिनी | ३५ |
| १४ | अजून | ,, | ३७ |
| १५ | श्री महाराष्ट्र गीत | इंदुकांत (जनार्दन श्रीधर नाईक) | ३८ |
| १६ | माझा महाराष्ट्र | इंगळे पुरुषोत्तम | ३९ |
| १७ | महाराष्ट्राची माती गाते | डॉ. इनामदार कल्याण | ४१ |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | समतेचें हें तुफान उठलें | करंदीकर विंदा | ४२ |
| १९ | माझ्या मराठी मातीत | करंदीकर सदाशिव | ४३ |
| २० | मराठा देश | कदम माधव | ४४ |
| २१ | माझ्या या देशाच्या मातीत | ,, | ४५ |
| २२ | शिवकालीन मराठ्यास | करी एस्. सी. (जयवंत) | ४६ |
| २३ | दक्षिण महाराष्ट्रभूमि | कारेकर वा. वा. (वासुदेवसुत कारेकर) | ४८ |
| २४ | महाराष्ट्र वर्णन | ,, | ४९ |
| २५ | श्रीमहाराष्ट्र गौरव गीत | ,, | ५० |
| २६ | या मातीला चढे रक्तिमा | कान्होलो रॉक | ५२ |
| २७ | नवप्रभात महाराष्ट्राची | ,, | ५३ |
| २८ | गुलाल आहे इथली माती | ,, | ५४ |
| २९ | पराक्रमी महाराष्ट्र | काव्यविहारी(धों. वा. गद्रे) | ५५ |
| ३० | महाराष्ट्र गौरव | ,, | ५६ |
| ३१ | मी मराठा | काळेले रा. अ. | ५८ |
| ३२ | हा महाराष्ट्र माझा | कासेगांवर बाळ | ५९ |
| ३३ | गर्जा जयजयकार | ,, | ६० |
| ३४ | माझा मराठ्यांचा देश | ,, | ६१ |
| ३५ | मराठी मनांत | काटकर माधव गोविंद | ६३ |
| ३६ | माझा महाराष्ट्र | कुळकर्णी वि. म. | ६४ |
| ३७ | महाराष्ट्र गीत | कुळकर्णी पुरुषोत्तम | ६५ |
| ३८ | कांचनी स्वप्न—महाराष्ट्र | सौ. कुळकर्णी इंदिरा | ६६ |
| ३९ | गोंधळ | कुंजविहारी (हरिहर गुरूनाथ सलगरकर-कुळकर्णी) | ६७ |
| ४० | सुदिन | ,, | ६९ |

| | | |
|---|---|---|
| ४१ महाराष्ट्र यशोगीत | कुमार यशोद (भी. गु. कुळकर्णी) | ७१ |
| ४२ मराठी माती | कुसुमाग्रज | ७२ |
| ४३ निर्धार | ” | ७४ |
| ४४ आम्ही मराठे गडी | कुमुदबांधव (स. अ. शुक्ल) | ७५ |
| ४५ सिंहासनिं बैसली मराठी | ” | ७७ |
| ४६ नमस्ते श्री महाराष्ट्रा | केशवकुमार | ७९ |
| ४७ श्री महाराष्ट्र गीत | कोल्हटकर श्री. कृ. | ७९ |
| ४८ महाराष्ट्रा | कृष्णाग्रज (यशवंत महादेव गद्रे) | ८१ |
| ४९ महाराष्ट्र–संतान | ” | ८३ |
| ५० धन्य रांगडा देश | खडके यशवंत | ८४ |
| ५१ तुझाच जयजयकार | ” | ८५ |
| ५२ एक काळचा व हल्लींचा महाराष्ट्र | खासनीस रा. वि. | ८६ |
| ५३ माती अशी मराठी | खांडेकर भालचंद्र | ८७ |
| ५४ निर्धार | खांडेकर सूर्यकांत | ८८ |
| ५५ श्री महाराष्ट्र गीत | गडकरी राम गणेश | ८९ |
| ५६ शौर्याची तव परंपरा | गव्हाणकर द. ना. | ९५ |
| ५७ संयुक्त महाराष्ट्र येतसे पहा | ” | ९६ |
| ५८ जय महाराष्ट्र | गिरीश | ९७ |
| ५९ महाराष्ट्र गीत | ” | ९८ |
| ६० ये मंगल महाराष्ट्रा | ” | ९९ |
| ६१ प्रणाम घेई महाराष्ट्रा | गुप्ते चारुशीला | १०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६२ | महाराष्ट्र गीत | स्वातंत्र्यकवी 'गोविंद' (गोविंद त्र्यंबक दरेकर) | १०२ |
| ६३ | महाराष्ट्र देशास | गोविंदतनय–(चिं. गो. कुळकर्णी-कोगनोळीकर) | १०४ |
| ६४ | त्रिभंगलेला अभंग झाला | गोखले विद्याधर | १०५ |
| ६५ | श्रीमहाराष्ट्र गौरव गीत | गोडबोले मधुमालती | १०६ |
| ६६ | महाराष्ट्र दिन | घाटुर्ले म. न. | १०८ |
| ६७ | महाराष्ट्रा ! | घाणेकर नाथ | ११० |
| ६८ | असेकायही ती महाराष्ट्रभूमि | चिटणीस मल्हार खंडेराव | ११४ |
| ६९ | माझा महाराष्ट्र देश | चिंचाळकर अ. र. | ११७ |
| ७० | यावे नव महाराष्ट्रा | चौधरी सोपानदेव | ११८ |
| ७१ | उद्याचा नवा महाराष्ट्र | " | १२० |
| ७२ | महाराष्ट्र गीत | " | १२४ |
| ७३ | क्रान्ति | " | १२६ |
| ७४ | माझा महाराष्ट्र देश | चौधरी मोतीराम | १२८ |
| ७५ | मराठी मना | जयवंत द. ग. | १३० |
| ७६ | धन्य धन्य महाराष्ट्र भूमी | जावरकर प्रभाकर वा. | १३१ |
| ७७ | नमस्ते महाराष्ट्रवीरा | जोशी रंगनाथ ना. | १३२ |
| ७८ | अम्ही मावळे एक | " | १३३ |
| ७९ | माझा महाराष्ट्र | जोशी मधुकर | १३४ |
| ८० | माझा महाराष्ट्र | रावसाहेब जोशी र. छु. | १३५ |
| ८१ | हिंदभूमीचा सुपुत्र | जोगळेकर योगिनी | १३७ |
| ८२ | महाराष्ट्र धर्म | टिपणीस गणेश नारायण (भालचंद्र) | १३७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८३ | धन्य महाराष्ट्र | टेकाडे आनंदराव कृष्णाजी | १३९ |
| ८४ | माझा महाराष्ट्र | ,, | १४० |
| ८५ | मराठा | ठोकळ ग. ल. | १४३ |
| ८६ | साहित्यिक महाराष्ट्र | सौ. तडवी शांतादेवी (परदेशी) | १४४ |
| ८७ | धन्य महाराष्ट्र | तानवडे वि. बा. | १४६ |
| ८८ | माझा मराठीचा देश | तायडे लक्ष्मणराव | १४७ |
| ८९ | अहाहा! कुठें तो महाराष्ट्र गेला | तिवारी दु. आ. | १४८ |
| ९० | एक काळ ऐसा होता | ,, | १५१ |
| ९१ | रायगडाची माती | त्रिलोकेकर खं. स. | १५४ |
| ९२ | महाराष्ट्र-भूपाळी | तुळजापूरकर दत्तो अप्पा | १५५ |
| ९३ | महाराष्ट्र गीत | ,, | १५७ |
| ९४ | मावळ्यांस आमंत्रण | कवि दत्त (दत्तात्रेय कोंडो घाटे) | १५९ |
| ९५ | असे लाडका सह्याद्रीचा | दाते रा. वा. (रामशाहीर) | १६० |
| ९६ | स्वातंत्र्यसंगरीं लढला | ,, | १६१ |
| ९७ | मर्द मराठे चिरंजीव झाले | ,, | १६२ |
| ९८ | वाजवा दुडूंम दुडूंम नौबद | ,, | १६४ |
| ९९ | तुमकु नहिं डरनेवाला | ,, | १६५ |
| १०० | महाराष्ट्र मुलुख | दासगणू (गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे) | १६६ |
| १०१ | महाराष्ट्र गौरव | दामले आशा | १६७ |
| १०२ | देश हा मर्द मराठ्यांचा | प्रा. दिक्षित स. ना. | १६९ |

| | | | |
|---|---|---|---|
| १०३ | महाराष्ट्र राज्य संस्थापना दिन | दिक्षित पांडुरंग | १७० |
| १०४ | मराठी बाणा | देवलकर शिवराम | १७१ |
| १०५ | मराठी बाणा | देशपांडे मा. का. | १७२ |
| १०६ | मराठी भाकर | ” | १७४ |
| १०७ | यशोगान | देशपांडे गो. वि. | १७५ |
| १०८ | महाराष्ट्र गाथा | सौ. देशपांडे अपर्णा | १७७ |
| १०९ | जय महाराष्ट्र भूमाते | देशपांडे सुरेश | १७८ |
| ११० | महाराष्ट्र माझा | देशमुख बाळासाहेब पिसाळ | १७८ |
| १११ | मंगलमय महाराष्ट्र | देशमुख गुरुनाथ | १८० |
| ११२ | महाराष्ट्र गीत | प्रा. धारराव बी. पी. | १८१ |
| ११३ | भूषण नवमहाराष्ट्र जगीं भारताला | नलावडे वसंत | १८२ |
| ११४ | महाराष्ट्र हें आपुलें राज | ” | १८३ |
| ११५ | इथें जन्मला शूर शिवाजी | ” | १८४ |
| ११६ | नव महाराष्ट्र गीत | नांदगांवकर शांताराम | १८५ |
| ११७ | महाराष्ट्रप्रीति | निफाडकर एकनाथ यादव | १८७ |
| ११८ | माझा महाराष्ट्र | निफाडकर स. वा. | १८९ |
| ११९ | नव महाराष्ट्र गीत | नेवासकर शिवकुमार (शं. त्र्यं.) | १९० |
| १२० | उठ मराठ्या ! | ‘निशिकांत’ (डी. व्ही. कुळकर्णी) | १९१ |
| १२१ | स्वराज्याचा पोवाडा | पचिंद्रे श्रीराम | १९२ |
| १२२ | आम्ही महाराष्ट्रकन्या | पद्मा | १९३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १०३ | महाराष्ट्र राज्य संस्थापना दिन | दिक्षित पांडुरंग | १७० |
| १०४ | मराठी बाणा | देवलकर शिवराम | १७१ |
| १०५ | मराठी बाणा | देशपांडे मा. का. | १७२ |
| १०६ | मराठी भाकर | ,, | १७४ |
| १०७ | यशोगान | देशपांडे गो. वि. | १७५ |
| १०८ | महाराष्ट्र गाथा | सौ. देशपांडे अपर्णा | १७७ |
| १०९ | जय महाराष्ट्र भूमाते | देशपांडे सुरेश | १७८ |
| ११० | महाराष्ट्र माझा | देशमुख बाळासाहेब पिसाळ | १७८ |
| १११ | मंगलमय महाराष्ट्र | देशमुख गुरुनाथ | १८० |
| ११२ | महाराष्ट्र गीत | प्रा. धारराव बी. पी. | १८१ |
| ११३ | भूषण नवमहाराष्ट्र जगीं भारताला | नलावडे वसंत | १८२ |
| ११४ | महाराष्ट्र हें आपुलें राज | ,, | १८३ |
| ११५ | इथें जन्मला शूर शिवाजी | ,, | १८४ |
| ११६ | नव महाराष्ट्र गीत | नांदगांवकर शांताराम | १८५ |
| ११७ | महाराष्ट्रप्रीति | निफाडकर एकनाथ यादव | १८७ |
| ११८ | माझा महाराष्ट्र | निफाडकर स. वा. | १८९ |
| ११९ | नव महाराष्ट्र गीत | नेवासकर शिवकुमार (शं. त्र्यं.) | १९० |
| १२० | उठ मराठ्या ! | 'निशिकांत' (डी. व्ही. कुळकर्णी) | १९१ |
| १२१ | स्वराज्याचा पोवाडा | पचिंद्रे श्रीराम | १९२ |
| १२२ | आम्ही महाराष्ट्रकन्या | पद्मा | १९३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२३ | महाराष्ट्राप्रत | पटवर्धन ल. म. | १९४ |
| १२४ | जय महाराष्ट्र | पाठारे सोना | १९५ |
| १२५ | रायगडा | प्रफुल्लदत्त (द. वि. तेंडुलकर) | १९६ |
| १२६ | माझी माती | ,, | १९६ |
| १२७ | महाराष्ट्र उन्मेषशाली | ,, | १९८ |
| १२८ | पुनः पुन्हा | प्रभुदेसाई दि. मा. | १९८ |
| १२९ | शाहिरी मुजरा | शाहीर पाटील हरीभाऊ | १९९ |
| १३० | महाराष्ट्र राज्य | पारखी यशवंत | २०१ |
| १३१ | माझा महाराष्ट्र | पालेकर वसंत | २०२ |
| १३२ | अवतान | पाटील आत्माराम | २०४ |
| १३३ | जय महाराष्ट्र देशा | पाध्ये प्रभाकर | २०६ |
| १३४ | जय महाराष्ट्र | पाडगांवकर मंगेश | २०७ |
| १३५ | माझा महाराष्ट्र-महाराष्ट्र महोदय | पांगारकर ल. रा. | २०९ |
| १३६ | माझा महाराष्ट्र | ,, | २११ |
| १३७ | मुशाफिरा चल माझ्यासाठी | पी. सावळाराम | २१३ |
| १३८ | महाराष्ट्र पुरुषोत्तम | ,, | २१४ |
| १३९ | महाराष्ट्र गीत गाऊ! | पांडे राजीव | २१५ |
| १४० | महाराष्ट्र भूमींत | पोतदार मा. रा. | २१६ |
| १४१ | नमोस्तुते महाराष्ट्रा | पोवळे श्रीकृष्ण | २१७ |
| १४२ | गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती | डॉ. फडके सुधीर | २१८ |
| १४३ | जय महाराष्ट्र | बढे राजा | २१९ |
| १४४ | श्रीमहाराष्ट्र अमुचा नव्या नवलाचा | कवि बलवंत (नरहर दिनकर दुगल) | २२० |

| | | | |
|---|---|---|---|
| १४५ | अरं ही माती मराठ मुलखाची | बल्लाळ आबासाहेब (दत्तात्रय भोजराज) | २२१ |
| १४६ | हा एक मराठा देश | बापट वसंत | २२४ |
| १४७ | केवळ माझा सह्यकडा | ,, | २२५ |
| १४८ | महाराष्ट्र जयगान | ,, | २२७ |
| १४९ | हे रायगडाचे कडे | ,, | २२८ |
| १५० | महाराष्ट्राचे जयगान | ,, | २२९ |
| १५१ | क्षत्रधन महाराष्ट्र | सेनापती बापट (पां. म.) | २३० |
| १५२ | अध्यात्माचा डंका | ,, | २३२ |
| १५३ | महाराष्ट्र आधार या भारताचा | ,, | २३२ |
| १५४ | महाराष्ट्राचा अभिमान | बापट सुशीला | २३३ |
| १५५ | माझा महाराष्ट्र | बालकवी ठोमरे | २३६ |
| १५६ | माती माझी अभिमानी | बिडकर सुभाष दामोदर | २३६ |
| १५७ | मराठी पुण्यभूमी | ,, | २३७ |
| १५८ | मायभूमीस | प्रा. बेहरे ना. के. | २३९ |
| १५९ | उभ्या भारताचा पहारेकरी | बोरकर बा. भ. | २४० |
| १६० | महाराष्ट्र गीत | ,, | २४२ |
| १६१ | मुजरा | बोरगांवकर रघु | २४३ |
| १६२ | माझा महाराष्ट्र | सौ. बोडस मंदा | २४४ |
| १६३ | महाराष्ट्र | ,, | २४५ |
| १६४ | पंढरी | बोबडे श्रीनिवास रामचंद्र | २४६ |
| १६५ | गडि मर्द मराठावीर | ,, | २४८ |
| १६६ | हरहर महादेव | ,, | २५० |

| | | | |
|---|---|---|---|
| १६७ | नव महाराष्ट्र गीत | भट सुरेश | २५२ |
| १६८ | मराठ्या | " | २५४ |
| १६९ | लववा इथे माथे सदा | भालेराव भाऊ | २५४ |
| १७० | बृहन्महाराष्ट्र गीत | भिडे वि. ग. | २५६ |
| १७१ | माझ्या मराठी मनांत | भोसले सुरेंद्र | २५७ |
| १७२ | स्वतंत्र महाराष्ट्राचें स्वागत | राजकवी भोसले शं. बं. | २५८ |
| १७३ | महाराष्ट्र वंदन | " | २५९ |
| १७४ | महाराष्ट्र गीत | महाम्बरे गंगाधर | २६० |
| १७५ | महाराष्ट्र देश | " | २६१ |
| १७६ | स्फूर्तीगीत | " | २६२ |
| १७७ | माझा महाराष्ट्र | " | २६३ |
| १७८ | जय महाराष्ट्र | मधुगंध (ना. रा. पगारे) | २६३ |
| १७९ | महराष्ट्र प्रभा | महाजन पंडित | २६५ |
| १८० | महाराष्ट्र देश | मनोहर | २६६ |
| १८१ | चालवितो शाहीरगिरी | कवि 'माधव' (माधव केशव काटदरे) | २७८ |
| १८२ | शिवकालीन रायगड | " | २८१ |
| १८३ | महाराष्ट्र गीत | मायदेव वा. गो. | २८६ |
| १८४ | मंगलदिन आला | " | २८७ |
| १८५ | मराठबाणा | माधव ज्युलियन (माधव त्र्यंबक पटवर्धन) | २८८ |
| १८६ | महाराष्ट्र गीत | " | २८९ |
| १८७ | महाराष्ट्रास | माडखोलकर ग. त्र्यं. | २९० |
| १८८ | मानधन महाराष्ट्र | | |
| | महाराष्ट्र मंगलगीत | " | २९३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १८९ | मराठ्यांचें संचलन गीत | माडगुळकर ग. दि. | २९४ |
| १९० | आज आनंदाचें वनीं | ,, | २९५ |
| १९१ | महाराष्ट्र की जय | ,, | २९६ |
| १९२ | जय जय महाराष्ट्र देशा | मांदाडे नी. ज. | २९७ |
| १९३ | जय महाराष्ट्र देशा | मांगूळकर पूर्णानंद | २९७ |
| १९४ | संयुक्त-महाराष्ट्राचे गान | शाहीर मुठे शरद | २९९ |
| १९५ | वारकरी हा, धारकरी हा | मोरे नारायण रामचंद्र | ३०१ |
| १९६ | माझा महाराष्ट्र | यशवंत | ३०३ |
| १९७ | नवा महाराष्ट्र | ,, | ३०४ |
| १९८ | तो महाराष्ट्र हा प्यारा (महाराष्ट्र गीत) | ,, | ३०६ |
| १९९ | मंत्राक्षता | ,, | ३०७ |
| २०० | महाराष्ट्र गीत | ,, | ३१० |
| २०१ | रणशिंगाचा ललकार | ,, | ३१२ |
| २०२ | महाराष्ट्राचे गौरवगान | प्रा. रत्नपारखी वसंत | ३१३ |
| २०३ | आनंदवनभुवन | समर्थ रामदास | ३१४ |
| २०४ | तुम्हि तेच मराठे गडि का? | रानडे शरच्चंद्र वामन | ३१९ |
| २०५ | सह्याद्री हा खडा | रानडे भा. ल. | ३२० |
| २०६ | महाराष्ट्र गीत | ,, | ३२१ |
| २०७ | महाराष्ट्र गीत | रेगे पुरुषोत्तम शिवराम | ३२२ |
| २०८ | किती महान | लळिंगकर जयभीम | ३२३ |
| २०९ | मुंबई भूषण महाराष्ट्राला | वरळीकर प्रभाकर | ३२४ |
| २१० | कोजागर | वसंतविहार | ३२५ |
| २११ | महाराष्ट्र गीत | वऱ्हाडपांडे वि. दा. | ३२६ |

| | | | |
|---|---|---|---|
| २१२ | कुठे ते मराठे स्वराज्याभिमानी ! | वझे लक्ष्मण गणेश | ३२८ |
| २१३ | नमोस्तुते | वाघोडकर मधु | ३३० |
| २१४ | माती मराठी मोलाची | वालावलकर सीताकांत | ३३१ |
| २१५ | वीर कथा महाराष्ट्राची | ,, | ३३२ |
| २१६ | महाराष्ट्र | वाशीकर शं. श्री. | ३३३ |
| २१७ | उठा हो! उठा हो! मराठे, उठा हो! | वासुदेवाग्रज म. बा. शिंदे | ३३४ |
| २१८ | महाराष्ट्र-लक्ष्मी | विनायक (विनायक ज.करंदीकर) | ३३५ |
| २१९. | यापुढें | ,, | ३३७ |
| २२० | महाराष्ट्र माऊली | विटणकर वंदना | ३३९ |
| २२१ | जय जय गान | ,, | ३४० |
| २२२ | मराठ्यांचे ब्रीद | विपिन-विहारी | ३४१ |
| २२३ | स्वातंत्र्य-संगीत | ,, | ३४१ |
| २२४ | महाराष्ट्रास | विरकुड | ३४३ |
| २२५ | मराठ्या वाजिव रे दुंदुमी | 'विलास' (विलास गो. कोकळेकर) | ३४४ |
| २२६ | महाराष्ट्राची थोरवी | वैद्य रा. य. | ३४५ |
| २२७ | मराठी मातीचा सत्कार | ,, | ३४६ |
| २२८ | महाराष्ट्राची माती | वैष्णव सुभाषचंद्र | ३४९ |
| २२९ | जय जय महाराष्ट्र देशा | शरद | ३५० |
| २३० | महाराष्ट्र माझा | शाईवाले व्यं. र. | ३५१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २३१ | मी महाराष्ट्र म्हणतो तेंव्हा | शिरीष | ३५२ |
| २३२ | असा मराठा मेळवावा | ,, | ३५३ |
| २३३ | अश्रू | ,, | ३५६ |
| २३४ | जय महाराष्ट्र | ,, | ३५८ |
| २३५ | महाराष्ट्रास अभिवादन | शिंदे भास्कर नानाजी (अरविंद) | ३५९ |
| २३६ | महाराष्ट्राची देणगी | शुक्ल नंदकिशोर | ३६० |
| २३७ | माय मराठी, नांव मराठी | शेळके शांता | ३६१ |
| २३८ | शूर अम्ही सरदार | ,, | ३६३ |
| २३९ | ग्वाही | सौ. शेवडे विजया | ३६४ |
| २४० | महाराष्ट्र जयगान | समडोळीकर श्रीरंग | ३६५ |
| २४१ | महाराष्ट्र हें माझें मंदिर | ,, | ३६७ |
| २४२ | मराठा | सरोज सुहृद | ३६८ |
| २४३ | महाराष्ट्राची परंपरा | साठे अण्णाभाऊ | ३६९ |
| २४४ | उठला मराठी देश | ,, | ३७१ |
| २४५ | महाराष्ट्रभूमि बहुगुणी | सौ. सावळे भानुमती | ३७२ |
| २४६ | महाराष्ट्रभूमि बहुगुणी | ,, | ३७३ |
| २४७ | महाराष्ट्रास | साने गुरुजी | ३७४ |
| २४८ | माझा महाराष्ट्र भाग्यें सजो ! | ,, | ३७४ |
| २४९ | महाराष्ट्र माझा | साखरदांडे माधव | ३७५ |
| २५० | धरती महाराष्ट्राची | सुर्वे नारायण | ३७६ |
| २५१ | अग्नी प्यावा | 'संजीव' (कृ.गं.दिक्षित) | ३७७ |
| २५२ | महाराष्ट्र | ,, | ३७९ |
| २५३ | पंचारती | संत इंदिरा | ३८० |
| २५४ | शूर अम्ही पाइक | 'सुधांशु' (ह.न.जोशी) | ३८१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २५५ | अहा! तें लोपलें सारें | हृदयनिवासी (केशव हरी सरडे) | ३८२ |
| २५६ | महाराष्ट्रास | हूड नारायण नागोराव | ३८३ |
| २५७ | ही महाराष्ट्राची रूढी | अंबेकर गंगाधर | ३८४ |
| २५८ | जय जय देश महान— | कान्त वा. रा. | ३८५ |
| २५९ | महाराष्ट्राच्या पराक्रमाचे दुमदुमती चौघडे | काबाडी आल्हाद | ३८६ |
| २६० | महाराष्ट्राला मुजरा | ” | ३८७ |
| २६१ | मराठी भाषेचा मानकरी | कान्हालो रॉक | ३८९ |
| २६२ | अभिवादन | कुसुमाग्रज | ३९० |
| २६३ | कुठें थांबणार दौड | केचे मधुकर | ३९१ |
| २६४ | महाराष्ट्र वंदन | केळकर लक्ष्मण विष्णु | ३९२ |
| २६५ | माझा महाराष्ट्र देश | गिरी उ. रा. | ३९३ |
| २६६ | महाराष्ट्राचें गान | जोगी धों. वे. | ३९६ |

# विभाग २ रा—सह्याद्री


| गीत क्र. | गीताचे शीर्षक | गीतकार | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- | --- |
| १ | जय सह्यगिरी | काटकर महादेव गोविंद | ३९९ |
| २ | सह्याद्रि | कुळकर्णी वासुदेव नरहर | ४०० |
| ३ | सह्याद्रीचे कडे | गोडबोले विमल बी. | ४०१ |
| ४ | सह्याद्रीचें सिंहावलोकन | चंद्रशेखर | ४०२ |
| ५ | सह्याद्रीचे उंच कडे | चिंधडे सदाशिव गोविंद | ४०३ |
| ६ | सह्याद्रि स्तोत्र | जोगळेकर स. आ. | ४०५ |
| ७ | सह्याद्री | पी. सावळाराम | ४०६ |
| ८ | सह्याद्रि वर्णन | पेठे केशव वामन | ४०७ |
| ९ | सह्याद्रि उठ | पोतदार माधव रामचंद्र | ४०९ |
| १० | सह्यकडा | ,, | ४१० |
| ११ | सह्याद्रि | भिडे सदाशिव मोरेश्वर | ४११ |
| १२ | सह्याद्रि | मोगरे गंगाधर रामचंद्र | ४१३ |
| १३ | मज खुशाल हिणवा फत्तर सह्याद्रीचा | सौ. लिमये उषा | ४१५ |
| १४ | महाराष्ट्राच्या सह्यगिरी | शिरीष | ४१७ |
| १५ | सह्याद्रि | श्रीनिवास | ४१९ |

# विभाग ३ रा – शिवरायाची गौरवगाथा


| गीतक्र. | गीताचे शीर्षक | गीतकार | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १ | शिवरायाची गौरवगाथा | अभ्यंकर योगेश्वर | ४२१ |
| २ | जय शिवराया | ” | ४२२ |
| ३ | शिवरायाचें रूप आठवा | ” | ४२२ |
| ४ | धन्य शिवाजी रणी धुरंधर | ” | ४२३ |
| ५ | धांव शिवाजी बाळ ! | ‘किशोर’ (शं.व.चव्हाण) | ४२४ |
| ६ | शिव-गीत | कुळकर्णी रामचंद्र वासुदेव | ४२५ |
| ७ | मावळ्यांचें गाणें | गिरीश | ४२६ |
| ८ | शिवाजी | स्वातंत्र्यकवि ‘गोविंद’ | ४२७ |
| ९ | श्री शिववंदन | घाणेकर नाथ | ४२९ |
| १० | शिवराय गीत | घाटे वि. द. | ४३० |
| ११ | श्रीशिवराज स्तोत्र | ” | ४३० |
| १२ | बाळ शिवाजीस | ” | ४३२ |
| १३ | शिव-प्रताप | ज्युलियन माधव | ४३३ |
| १४ | भवानी आमुची आई, शिवाजी आमुचा राणा ! | ” | ४३४ |
| १५ | शिवाचें अमर स्फूर्तिमय गान | जोशी रंगनाथ ना. | ४३५ |
| १६ | शिवजयंती | जोशी शंकर लक्ष्मण (गिरीशचंद्र) | ४३६ |
| १७ | छत्रपती शिवराय | सौ. जोशी मनोरमा माधव | ४३७ |
| १८ | धन्य धन्य शिवाजी राजा | जोशी माधव बाळकृष्ण | ४३७ |
| १९ | अंजलि शिवराया | सौ. जोशी शालिनी | ४३८ |
| २० | शिवाजीस | ठेकेदार गं. वि. | ४३९ |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | श्री शिवछत्रपती | कवि दत्त | ४३९ |
| २२ | जयजयकार करा | दर्प तु. म. | ४४० |
| २३ | रायगडाचें सिंहासन | दाढे श्री. ग. | ४४१ |
| २४ | कृपा ही श्री शिवरायाची | प्रा. दीक्षित स. ना. | ४४२ |
| २५ | शिवबा झाले छत्रपती | दिक्षित पांडुरंग | ४४४ |
| २६ | असा तो होता शिवराणा | सौ. नावलेकर आशा | ४४५ |
| २७ | श्रीशिवराय गीत | निजसुरे मधुसूदन आ. (पुष्पविहारी) | ४४६ |
| २८ | जय जय जय शिवराया | बढे राजा | ४४८ |
| २९ | शिवराय छत्रपती झाले | ,, | ४४९ |
| ३० | छत्रपती शिवराज | बापट वसंत | ४५१ |
| ३१ | शिवाचा झाला जयजयकार | ,, | ४५२ |
| ३२ | मायभवानीची आरती | ,, | ४५४ |
| ३३ | मुद्रा भद्राय राजते | बोरकर बा. भ. | ४५५ |
| ३४ | जय जय भारतवर्ष | बोबडे श्री. रा. | ४५६ |
| ३५ | शिवाबावनी | तिवारी दु. आ. | ४५७ |
| ३६ | शिवराजस्तव | माधव (माधव के.काटदरे) | ४६३ |
| ३७ | शिवप्रभूस | माडखोलकर ग. त्र्यं. | ४६४ |
| ३८ | शिवकल्याण राजा | समर्थ रामदास | ४६६ |
| ३९ | शिवराजासी आठवावें | ,, | ४६७ |
| ४० | आठवा त्या श्री शिवरायास | रानडे शरच्चंद्र वामन | ४६८ |
| ४१ | शिवराय गुणवर्णन | लेले गणेशशास्त्री | ४६९ |
| ४२ | शिवस्मरण | लोंढे मु. मो. | ४७० |
| ४३ | छत्रपती शिवाजी महाराज | वसंत विहार | ४७२ |
| ४४ | छत्रपतीस मुजरा | वाशीकर शं. श्री. | ४७४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४५ | शिवराजदर्शन | विनायक | ४७५ |
| ४६ | आज हवे होतां तुम्हि शिवबा ! | शिंदे शांताराम रा. | ४७६ |
| ४७ | शिवराज जन्म झाला | शिरगांवकर मोरया | ४७७ |
| ४८ | बालशिवाजी | साधुदास | ४७९ |
| ४९ | श्रीशिवाजी महाराजांची आरती | स्वातंत्र्यवीर सावरकर | ४८० |
| ५० | शिववीर | ” | ४८१ |
| ५१ | हिंदु नृसिंह | ” | ४८३ |
| ५२ | शिवाजि-उत्सव | टागोर रवींद्रनाथ | ४८४ |

# विभाग ४ था—भगवा झेंडा—जरिपटका


| गीत क्र. | गीताचे शीर्षक | गीतकार | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १ | भगवा झेंडा एकच ह्या | 'कुमार' (वि. स. खांडेकर) | ४९५ |
| २ | प्रतिनिधी | टागोर रवींद्रनाथ | ४९७ |
| ३ | भगवा झेंडा | 'कवि दत्त' (दत्तात्रय कोंडो घाटे) | ५०४ |
| ४ | भगव्या झेंड्यास | ठेकेदार गं. वि. | ५०६ |
| ५ | भगवा झेंडा | राजकवी भोसले शं. बं. | ५०७ |
| ६ | भगवा झेंडा वंदन | " | ५०८ |
| ७ | भगवा झेंडा | माडखोलकर ग. त्र्यं. | ५०९ |
| ८ | भगवा झेंडा | रहाळकर पुरुषोत्तम विश्वनाथ (वनवसंत) | ५१० |
| ९ | जरिपटका | साधुदास | ५११ |

# विभाग ५ वा—मराठी भाषा



| गीत क्र. | गीताचे शीर्षक | गीतकार | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | मराठी भाषेची थोरवी | श्रीधर | ५१५ |
| २ | माझी मायबोली | अभ्यंकर योगेश्वर | ५१६ |
| ३ | माझी माय आहे मरहट्टी | अमरशेख | ५१८ |
| ४ | माझा मराठाचि बोल | सौ. इर्लेकर सुहासिनी | ५१९ |
| ५ | मराठीची ओवी | डॉ. इनामदार कल्याण | ५२० |
| ६ | सरस्वतीच्या वीणेची | " | ५२० |
| ७ | संस्कृत आणि मराठी | संत एकनाथ | ५२१ |
| ८ | एकनाथांचा मराठीचा अभिमान | " | ५२२ |
| ९ | नमो हे महाराष्ट्रवागेश्वरी | काळेले रा. अ. | ५२३ |
| १० | मराठी | काटकर तु. ना. | ५२४ |
| ११ | माऊली मराठी | काटकर माधव गोविंद | ५२५ |
| १२ | मातृभाषा | कुमार यशोद | ५२६ |
| १३ | आज मराठी रंगली | सौ. कुळकर्णी इंदिरा | ५२७ |
| १४ | माझी मराठी | कुळकर्णी त्रि. म. | ५२८ |
| १५ | आमुची माय मराठी हो ! | खांडेकर सूर्यकांत | ५२९ |
| १६ | माझी माय मराठी | चेंदवणकर प्रल्हाद | ५३० |
| १७ | मायबोलीचे माहेर | चौधरी सोपानदेव | ५३१ |
| १८ | आमुची लिपी | " | ५३२ |
| १९ | पैजा कां जिंके | " | ५३३ |
| २० | आमुची मायबोली | ज्युलियन माधव | ५३४ |
| २१ | माय मराठी | जोगळेकर योगिनी | ५३५ |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | इये मराठीचिये नगरी | जोशी मधुकर | ५३६ |
| २३ | मुजरा | रावसाहेब जोशी र. लु. | ५३७ |
| २४ | मायबोलीची भूपाळी | ,, | ५३८ |
| २५ | मऱ्हाटी ब्रह्मविद्येची कसवटी | त्र्यंबकराव | ५३९ |
| २६ | मराठीचे मानकरी | दान-शेखर | ५४० |
| २७ | मराठीची शब्दसंपत्ती | दासोपंत | ५४१ |
| २८ | मराठी | दिवाण प्रभाकर | ५४२ |
| २९ | माझी माय मराठी | देवकान्त मा. दा. | ५४३ |
| ३० | माझी मराठी | डॉ. नांदापूरकर ना. गो. | ५४४ |
| ३१ | ही कोण आली? | ,, | ५४४ |
| ३२ | माझी मराठी कुठे? | ,, | ५४६ |
| ३३ | उलटी आमची मायबोली तरी | निगम वा. ना. | ५४७ |
| ३४ | आज लाभे सिंहासन | निशिकांत (डी. व्ही. कुळकर्णी) | ५४८ |
| ३५ | महाराष्ट्र शारदा वंदन | पटवर्धन गोविंद विष्णू | ५४९ |
| ३६ | उठा रे लुटा रे | पवार किसन | ५५१ |
| ३७ | सारस्वत मंदिरात | पी. सावळाराम | ५५१ |
| ३८ | मराठी | पोतदार मा. रा. | ५५२ |
| ३९ | महाराष्ट्र वाङ्मय महती | फडणीस वासुदेव नारायण | ५५३ |
| ४० | माझी मायबोली | बाबर सरोजिनी | ५५४ |
| ४१ | मराठी भाषा | बेहेरे ना. के. | ५५५ |
| ४२ | मराठीची प्रार्थना | ,, | ५५५ |
| ४३ | मराठीच्या ओव्या | बोरकर बा. भ. | ५५७ |
| ४४ | तुझेच आहे तुझ्याचपाशी | बोरगांवकर रघु | ५५८ |
| ४५ | मायबोली | भट सुरेश श्रीधर | ५५८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४६ | गीत तुझें मी आई गाइन | भट सुरेश श्रीधर | ५६० |
| ४७ | अस्मिता | भोईटे कृष्णचंद्र | ५६० |
| ४८ | संस्कृत व मराठी | मुक्तेश्वर | ५६१ |
| ४९ | मराठीचा महिमा | मोरे मारुती रामचंद्र | ५६२ |
| ५० | मराठीच्या देहलीवरून | यशवंत | ५६४ |
| ५१ | माझ्या मराठी बोलांत | यावलीकर राजा (ग. के. जोशी) | ५६६ |
| ५२ | श्रीज्ञानेश्वर | लाड पुरुषोत्तम मंगेश | ५६७ |
| ५३ | महाराष्ट्र शारदेस | वनराज | ५६८ |
| ५४ | मायबोली मराठीच | वाशीकर शं. श्री. | ५६९ |
| ५५ | स्वागत | विहंग | ५७० |
| ५६ | महाराष्ट्र साहित्यास | विरकुड | ५७२ |
| ५७ | शाहिरांनो | साठे अण्णाभाऊ | ५७२ |
| ५८ | मराठी भाषा | साबळे भानुमती | ५७३ |
| ५९ | ज्ञानोबानें उघडिलें द्वार | ” | ५७४ |
| ६० | मराठी भाषेची प्रशस्ति | स्टिफन्स तोमास ‘क्रिस्तदास’ | ५७५ |
| ६१ | मऱ्हाटी भाषासुंदरी | ज्ञानेश्वर | ५७५ |
| ६२ | माझा मराठाचि बोलु | ” | ५७६ |
| ६३ | महाराष्ट्र देशा अमुच्या | साठे अण्णाभाऊ | ५७८ |

# विभाग पहिला : महाराष्ट्र गीतें

## 'आनंदवनभुवन'



# १. जय महाराष्ट्र

आ०४ ता. २५.५.५८ २५।१२।५८ अमरशेख

'कलश' १९५८

जय महाराष्ट्र संयुक्त महाराष्ट्राच्या गाऊं गाना ।
गाऊं उंचावुनी माना । घेऊं तानावर ताना ॥
भाषेचा थाट मराठी । अहिराणी, कोंकणी, घाटी ।
शब्दोच्चाराची खोटी । शत्रुला वाटते धास्ती ॥
ज्ञानेशापासुनि भिल्ल, वारली । घेई नित नवरसना ॥ १ ॥

सौंदर्य महाराष्ट्राचें । क्षणक्षणां प्रत्यया येतें ।
माती सुगंध उधळिते । दरिकपार रिझवी मनातें ।
गोमांतक, वेरुळ दावि अजंठा । अमर मानवी स्वप्ना ॥ २ ॥

कोयना नि गोदा, कृष्णा । भागवुनी आमुची तृष्णा ।
उदरांत मोती पिकवोनी । महाराष्ट्र उभा सुखवोनी ।
कधी उग्ररुप खंदक रुपानें । पाणी पाजी शत्रूंना ॥ ३ ॥

जणूं संताजी अन् बाजी । सह्याद्रि सातपुडादि ।
आजही छाती उघडोनी । गर्जतसे पर्वतराजी ।
घाला घण अमुच्या छातीवर । अन् पहा मराठी बाणा ॥ ४ ॥

या पर्वतराजी कसल्या । कर्वतीच तापविलेल्या ।
महाराष्ट्रभोंवती पसरल्या । अरिसेना ज्यांनी चिरल्या ।
ही परंपरा घेऊन मिरवितो । आमुचा मावळ तान्हा ॥ ५ ॥

अन् इतिहासाची पानें । भरली सारी अभिमानें ।
शतकानुशतक पहा वळुनि । लिहीलीं अपुल्या रक्तानें ।
घेऊनी स्फूर्ति त्यांतून । जागवूं जगत् शक्तिना ॥ ६ ॥

कानडी, हिंदी, गुजराथी । आंध्र, ओरिसाही साथी ।
राखुनी त्यांच्या हक्काला । बांधुनि लोकराज्याला ।
मुंबईपासुनी नागपूर । सुखसनद वाटूं सकलांना ॥ ७ ॥

स्वातंत्र्य, शांतता स्थापूं । अवघे जग त्यानें व्यापूं ।
फडकवूं ध्वज समानतेचा । पर्वा न जिवाची करतां ।
संयुक्त महाराष्ट्र दाखवूं । विभवाप्रत चढतांना ॥ ८ ॥

## २. आदेश

'कलश' १९५८ — अमरशेख

आदेश, आदेश, हे शिवराया देई मला आदेश

तूंच सह्यगिरी कठोर, निर्घृण फत्तर काळा वरुनी
खडकाखालुन झुळुझुळु निर्झर तूंच आळविशि गाणीं
तूं ज्ञानेश्वर, एका, तुकाची अभंग समर्थवाणी
तुझ्या भागवतिं ठायीं ठायीं मानवतेच्या खाणी
भिमातटाकी दिसे तुझा मज अजत्र आगळा वेश.

गोदा, कृष्णामाईचें तूं पवित्र, निर्मळ पाणी
वहाती प्रवरा, निरा, कोयना तुझें रुप घेवोनी
नदीकाठिं फुलतो डुलतो तूं उधळित सुगंध गगनीं
जाई, जुई, शेवंती, केवडा तूंच आमुच्या रानीं
तूंच केवड्यामागिल महाराष्ट्राचा रक्षक शेष.

दिसशि मावळा कधीं घोंगडी आणि लंगोटीवाला
कधीं शोभशी मर्द मराठा हातीं घेऊनी भाला
जया पाहुनी धसका बसतो कृतांत कळिकाळाला
झोपेंतच तो बडबडतो मग आला मराठा आला
तुझाच वंशज आज मराठा बने मूढ वा मेष.

दे आदेश असा कीं हा तव महाराष्ट्र शोभावा
गजगंडस्थळ छेदित राहो तुझा मराठी छावा
करवंदीच्या पानांना आकार पुन: तो यावा
तलवारीचें पातें समजुन अरि थरथर कापावा
काक, गिधाडांचा नच वाटो आम्हास मत्सर, द्वेष.

जगा पटूं दे शिववंशाला ठाउक ना माघार
निर्मुनि नव-महाराष्ट्र स्वप्न तव करूं दे रे साकार
कूपमंडुक न ठरो मराठा ठरो पुन: दिलदार
हिंद रक्षिण्या तुझी झळकुं दे जय भवानि तलवार
दिल्लिश्वराची लाज राखण्या मराठ्यांस दे त्वेष.

## ३. महाराष्ट्र गीत*

'काव्यतुषार' १९२३ गो. गो. अधिकारी (कमलाकर)

सुंदर देशा ! पवित्र देशा ! भाग्यवान देशा !
मंगलदेशा ! शिवरायाच्या महाराष्ट्र देशा !
कितिक नांदती जगांत राष्ट्रें परंतु त्यांच्यात
त्वन्नामाची स्फूर्तीदायक तडफ न एकांत !

कानडी, हिंदी, गुजराथी । आंध्र, ओरिसाही साथी ।
राखुनी त्यांच्या हक्काला । बांधुनि लोकराज्याला ।
मुंबईपासुनी नागपूर । सुखसनद वाटूं सकलांना ॥ ७ ॥

स्वातंत्र्य, शांतता स्थापूं । अवघे जग त्यानें व्यापूं ।
फडकवूं ध्वज समानतेचा । पर्वा न जिवाची करतां ।
संयुक्त महाराष्ट्र दाखवूं । विभवाप्रत चढतांना ॥ ८ ॥

## २. आदेश

'कलश' १९५८ **अमरशेख**

आदेश, आदेश, हे शिवराया देई मला आदेश

तूंच सह्यगिरी कठोर, निर्घृण फत्तर काळा वरुनी
खडकाखालुन झुळुझुळु निर्झर तूंच आळविशि गाणीं
तूं ज्ञानेश्वर, एका, तुकाची अभंग समर्थवाणी
तुझ्या भागवतिं ठायीं ठायीं मानवतेच्या खाणी
भिमातटाकी दिसे तुझा मज अजब आगळा वेश.

गोदा, कृष्णामाईचें तूं पवित्र, निर्मळ पाणी
वहाती प्रवरा, निरा, कोयना तुझें रुप घेवोनी
नदीकाठिं फुलतो डुलतो तूं उधळित सुगंध गगनीं
जाई, जुई, शेवंती, केवडा तूंच आमुच्या रानीं
तूंच केवड्यामागिल महाराष्ट्राचा रक्षक शेष.

दिसशि मावळा कधीं घोंगडी आणि लंगोटीवाला
कधीं शोभशी मर्द मराठा हातीं घेऊनी भाला
जया पाहुनी धसका बसतो कृतांत कळिकाळाला
झोपेंतच तो बडबडतो मग आला मराठा आला
तुझाच वंशज आज मराठा बने मूढ वा मेष.

दे आदेश असा कीं हा तव महाराष्ट्र शोभावा
गजगंडस्थळ छेदित राहो तुझा मराठी छावा
करवंदीच्या पानांना आकार पुनः तो यावा
तलवारीचें पातें समजुन अरि थरथर कापावा
काक, गिधाडांचा नच वाटो आम्हास मत्सर, द्वेष.

जगा पटूं दे शिवंवंशाला ठाउक ना माघार
निर्मुनि नव-महाराष्ट्र स्वप्न तव करूं दे रे साकार
कूपमंडुक न ठरो मराठा ठरो पुनः दिलदार
हिंद रक्षिण्या तुझी झळकुं दे जय भवानि तलवार
दिल्लिश्वराची लाज राखण्या मराठ्यांस दे त्वेष.

## ३. महाराष्ट्र गीत*

'काव्यतुषार' १९२३ गो. गो. अधिकारी (कमलावर)

सुंदर देशा ! पवित्र देशा ! भाग्यवान देशा !
मंगलदेशा ! शिवरायाच्या महाराष्ट्र देशा !
कितिक नांदती जगांत राष्ट्रें परंतु त्यांच्यात
त्वन्नामाची स्फूर्तीदायक तडफ न एकांत !

दगडहि उडती हवेत सारे नाम तुझें घेतां
प्रेतें उठती भूमीमधुनी तव घोषा करतां
दाहि दिशांचे वारे सारे नाम तुझें गाती
पशुपक्षी त्वन्नाम जपोनी मोक्षाप्रति जाती
नामर्दाचे मर्द बनावे तव जय-घोषानें
तुला भिवोनी दूर सरावें तुजपासुनि अरिनें
(चाल) थोर तूं असा जगतांत । तुला भजतात । तुला स्मरतात
साधु-संत लोकाग्रणी ।
ते सारे वीराग्रणी ।
तव दास स्वतां म्हणवुनी
मीहि म्हणवितो दास तुझा रे माझ्या राष्ट्रवरा ।
स्वीकारी या शाहीराचा हा प्रेमें मुजरा ॥ १ ॥

वीरवृत्तिचें रक्त खरोखर तुझ्यांत सळसळतें,
खऱ्या नीतिचें तेज तुझें हें जगास दिपवीतें,
हा जरिपटका श्रीमंती तव दावी हृदयाची,
भगवा झेंडा ओळख पटवी तुझ्या स्वभावाची,
तुझी प्यार तलवार सांगते आजहि जगताला—
"महाराष्ट्र हा कलिकालासहि ना डरनेवाला";
(चाल) तें निशाण स्वातंत्र्याचें । तुझ्या डौलाचें । तुझ्या कीर्तीचें
फडकतां नभोमंडळीं ।
तें पाहुनि तव रिपु-दलीं ।
भीतिनें जीव वर-खालीं ।
होइ असे इतिहास सांगतो माझ्या राष्ट्रवरा ।
स्वीकारी या शाहीराचा हा प्रेमें मुजरा ॥ २ ॥

स्वातंत्र्यासम दुजें प्रिय तुला कांहिं नसे जगतीं
स्वातंत्र्यास्तव हरवशील तूं प्राण हातोहातीं;
सत्यपथें चालणें सदोदित ब्रीद तुझें गाजे
कृतिसम तुजला महाराष्ट्र हें नांव गड्या साजे;
तुझ्या प्रपंचा परमार्थाची सदा असे जोड;
संसारातुनि उलगडशी तूं मुदें जगत्कोड.
जिवाशिवाची भेट घडविणें हेंच तुझें ध्येय
आत्मा हा ब्रह्मांश जाणणें हेंच तुझें साध्य.
अन्यायाचें बंड मोडुनी सत्य स्थापावें
प्राणहि त्यासाठीं अर्पावा हेंच तुला ठावें;

(चाल) पोवाडे तव धर्माचे । तुझ्या वेदाचे । उपनिषदांचे
ध्येयाचे तव कीर्तीचे ।
विद्वान सर्व देशीचे ।
आनंदें गाती साचे ।
हिंदूधर्माचा तूं कलिजा माझ्या राष्ट्रवरा ।
स्वीकारी या शाहीराचा हा प्रेमें मुजरा ॥ ३ ॥

जसा बोल तो तशीच करशी कृती सदा जगतीं
स्वर्गधरा करशील एक तूं दिल्या दिलासाठीं;
शरणागत शत्रूसहि म्हणशी अपुला प्यार सखा
तुला न ठावें कधीं काढणें उगाच बोल फुका;
शत्रूपाशी खेळ खेळता भाला-फेकीचा
मरण पावणें मार्ग दिसे हा तुला धन्यतेचा
प्रिय जीवांचें करुनि खेळणें नश्वर जगतांत
संसाराचा थाट थाटसी सदा अनंदांत

जगांत नाही असा कुणीही घालिल तुज बंद
मायभुमीस्तव तुला सदाचा मरण्याचा छंद.
(चाल) ही तुझी मराठी बोली । कुणाच्या भाळीं । नाही लाभली ।
तूं आनंदाची मूर्ती ।
तूं स्वातंत्र्याची मूर्ती ।
तूं शिवरायाची कीर्ति ।
दुःखें पळती सैरावैरा नाम तुझें घेतां ।
स्वीकारी या शाहीराचा हा मुजरा आतां ॥ ४ ॥

ज्याच्या पुण्यप्रतापयोगें मराठमोळ्याला
वीर-वृत्तिचा मान मिळाला त्या शिवबाळाला,
तो संताजी, वीर धनाजी, मुरारबाजी तो,
तान्हाजी तो बाजि, चिमाजी, राघुभरारी तो
दत्ताजी तो, महादजी तो, गोखलखांही तो
ज्याचा विक्रम आजहि अमुचे बाहू स्फुरवीतो,
खूप शर्थिने राज्य रक्षिलें मराठिशाहीचें
कलम धरोनी तेज दाविलें भगव्या झेंड्याचें
तो मुत्सद्दी नाना तैसा तिलकप्रभु अमुचा
कीर्तिध्वज या अखंड भुवनीं फडफडतो ज्याचा,
(चाल) या साऱ्या नररत्नांस । वीर योद्ध्यांस । देशभक्तांस ।
जन्म रे तूंच दिधलास ।
आपलें तयां म्हटलेंस ।
तज्जन्म धन्य केलास ।
मीहि जन्मलो तुझ्याच उदरीं माझ्या राष्ट्रवरा ।
स्वीकारी या शाहीराचा हा प्रेमें मुजरा ॥ ५ ॥

* (मूळ कवितेतील विषयानुकूल भाग घेतलेला आहे.)

# ४. तेच का आम्ही ?

' बीजेची कोर ' १९२६ **गो. गो. अधिकारी**

चालतां बोलतांही । मनीं येई—
शिवरायांचे शूर मराठे तेच काय आम्ही ? ॥ धृ० ॥
परदास्यि मायभू बघणें
धिक् धिक् हें लाजिरवाणें
नरकांत जणूं तें जगणें
मृत्यु त्याहुनी बरा वाटला तेच काय आम्ही ? ॥१॥
जे कुणास नाही हरले
जे मरण-भीतिचे प्याले
शिशुपणापासुनी प्याले
तो समर-मृत्यु हा मोक्ष जयांना तेच काय आम्ही ? ॥२॥
घेउनी करी तलवार
वाजीवर होउन स्वार
दिनरात्र सदा चौफेर
गस्त घालुनी राष्ट्र रक्षिले तेच काय आम्ही ? ॥३॥
जे स्वदेश उद्धारार्थ
सुख टाकुनि हातोहात
मारुनि घरावर लाथ
वेळि अवेळी धावुनि गेले तेच काय आम्ही ? ॥४॥
चंद्रिका जशी चंद्रास
जानकी जशी रामास
द्रौपदी जशी धर्मास
तशी प्यार समशेर जयांना तेच काय आम्ही ? ॥५॥

पूजणें तरी समशेर
खेळणें तरी समशेर
सोबती तरी समशेर
समशेरीविण जयां न सुचलें तेच काय आम्ही ? ॥६॥

घेतील दुःख ओढून
देतील जिवाचें दान
त्यागतीलही प्रियकरीण
परि समशेर न त्यागायाचे तेच काय आम्ही ? ॥७॥

दिल्दार गडी हृदयाचे
जागते दिल्या बोलाचे
सोबती सकल विश्वाचे
म्हणुनि एकदां जगीं गाजले तेच काय आम्ही ? ॥८॥

समशेर जशी समरांत
जशि लक्ष्मी व्यापारांत
तशि ज्यांनी संसारांत
घरधनिण जिवाची पूज्य मानिली तेच काय आम्ही ? ॥९॥

फोडुनि शत्रुचे कोट
उध्वस्त करुनिया गोट
अटकेंत जयें वेछूट
जरिपटका जाउनी रोविला तेच काय आम्ही ? ॥१०॥

अभिमानी जे भगव्याचे
सेवक जे जरिपटक्याचे
सत्पुत्र महाराष्ट्राचे
म्हणुनि एकदां जगीं गाजले तेच काय आम्ही ? ॥११॥

शिवबांच्या शब्दासाठीं
अपुल्या प्रिय धर्मासाठी
जन्मसिद्ध हक्कासाठी
गिरीकंदरीं वणवण फिरले तेच काय आम्ही ? ॥१२॥

जल जसें शुद्ध गंगेचें
तें तेज जसें बिजलीचें
कीं फूल जसें जाईचें
तशी जयांची नीति गाजली तेच काय आम्ही ? ॥१३॥

कां खालिं घालिता मान
कां हो कां धरिता मौन
देइल कां उत्तर कोण
शिवरायांचे शूर मराठे तेच तेच आम्ही ? ॥१४॥

## ५. आम्हीच ते मराठे

काव्यतुषार' गो. गो. अधिकारी (कमलावर)

जगतास जिंकणारे—
आम्हीच ते मराठे !

सात्वीक शांततेनें—
सात्वीक प्रेमदानें
हें विश्व पोसणारे—
आम्हीच ते मराठे !

भीती न ज्यां जगाची,
भीती जगास ज्यांची,
काळाशि खेळणारे—
आम्हीच ते मराठे !

दुर्दैव आड येवो,
लक्ष्मी त्यजो नि जावो
सद्धर्म रक्षणारे—
आम्हीच ते मराठे!

कर्तव्य पालनांत
स्वातंत्र्य रक्षणांत,
दुःखाशि हांसणारे—
आम्हीच ते मराठे!

या आर्य-भूमीसाठीं
या हिंदभूमीसाठीं
सर्वस्व सोडणारे—
आम्हीच ते मराठे!

खड्गाशिं खेळण्यांत,
मृत्यूशिं झुंजण्यांत,
आनंद मानणारे—
आम्हीच ते मराठे!

जेथें मिळेल तेथें
अत्यंत शुद्ध चित्तें
प्रेमास पूजणारे—
आम्हीच ते मराठे!

वागेल जो अम्हांशीं
जैसा, तसें तयाशीं
निःशंक वागणारे—
आम्हीच ते मराठे!

आकाश कोसळूं द्या,
हा गोल गडगडूं द्या
शब्दास जागणारे—
आम्हीच ते मराठे !

ध्यानीं मनीं जनांत,
दुःखांत वा सुखांत,
हा एक मंत्र गा रे,—
"आम्हीच ते मराठे."

## ६. मर्द मराठे रक्त सांडती

**'दुःख माझें रंगलें' १९६९** **योगेश्वर अभ्यंकर**

मर्द मराठ्या शिवरायाचा,
जन्म इथें झाला रे
शिवनेरीचे दर्शन घ्यारे ॥ ध्रु० ॥

धन्य जिजाई माता जगतीं
कष्ट सोसले वीरासाठीं
अवतरला मग तो जगजेठी
दीप उजळला, अंधारीं रे ॥ १ ॥

श्रीरामाची कथा ऐकली
वानरसेना कशी झुंजली
महाभारतीं वृत्ती रंगली
स्वप्न रंगलें शिवबाचें रे ॥ २ ॥

अन्यायाचा बदला घ्यावा
हाच आपुला धर्म असावा
परंपरेचा अमोल ठेवा
जतन करावा, ध्यास जीवा रे ॥ ३ ॥

एका झेंड्याखालीं जमले
कणखर सगळे वीर मावळे
बहुमोलाचें राज्य स्थापलें
तुलना नाही, त्यागाला रे ॥ ४ ॥

शिवनेरीची पावन माती
आजहि देते आम्हां स्फूर्ति
मर्द मराठे मातेसाठीं
रक्त सांडती, सीमेवर रे ॥ ५ ॥

## ७. श्री महाराष्ट्रास

**'कवनगुच्छ'** भाग १ व २-१९२१, **अज्ञातवासी (दि. गं. केळकर)**

छत्रपतीच्या महन्मंगला महाराष्ट्र देशा !
श्रीदासाच्या धीरोदारा महाराष्ट्र देशा !
अभंगवाणी श्रीतुकयाच्या महाराष्ट्र देशा !
उदय पावती पहा तुझ्या त्या मावळ्या आशा ! !

सह्याद्रिची कडेकपारीं निजलेली राई
आहे आतां राया ! उठली गाया अंगाई
होते इतुके दिवस उन्हानें निर्झर जे अटले
वीरांचीं ते स्तोत्रें गाया उठले रे उठले !

देशभक्तिच्या रक्तानें जी माखुनियां होती
माळावरती गारठलेली ती तांबुस माती
दृष्टी होता नवतेजाची पालवती झाली
आर्य-देवते ! तव पुण्याई आज फळा आली.

सिंहगडाचे बुरुज यशाचे निजले जे होते
वातावरणीं थरथरणारीं गुणगुणती गीतें
तानाजीची जुनी समाधी दगडांची हाले
" जय " शब्दांचा ध्वनी त्यांतुनी रात्रंदिन चाले.

रायगडीचा राया ज्याची दगडाची छाती
करवंदीच्या जाळीमधुनी डोकावी वरती
जंगलशाही मधला राणा उठला संभाजी
जरिपटक्याला तोलित चाले दख्खनचा बाजी.

शिवरायाच्या भगव्या झेंड्या ! फडकत गगनांत
रहा राजसा ! मृतराष्ट्रांना आशीर्वच देत
हा कृष्णांचा, हा व्यासांचा, आर्यांचा देश
जगदोद्धारासाठीं येतो आहे उदयास !

# ८. पुणें दरबारी

'कवनगुच्छ' भाग १ व २–१९२१ अज्ञातवासी

शत्रूच्या खड्या समशेरी
वांकती पुणें दरबारीं
पेशवे मऱ्हाठी स्वारी
तळपती तिखट तल्वारी

तो वाघ-वाघ म्हैसुरी
कांपतो उरीं
टिपू चौधारी
तळपती तिखट तल्वारी ॥ १ ॥

चौघडा यशाचा झडे
उचलती विडे
थाट सरदारी
तळपती तिखट तल्वारी ॥ २ ॥

रणरंग पुण्यांतिल दंग
बांधुनी चंग
घेत ललकारी
तळपती तिखट तल्वारी ॥ ३ ॥

वांकती थोर सरदार
दिल्लिचे वीर,
पुणें दरबारीं
तळपती तिखट तल्वारी ॥ ४ ॥

फुरफुरे लाख भिमथडी
सलामी खडी
झडतसे फैरी
तळपती तिखट तल्वारी ॥ ५ ॥

केवढी-पुण्याची भिती
पहा ! कांपती
चळचळा वैरी
तळपती तिखट तल्वारी ॥ ६ ॥

## ९. नवा महाराष्ट्र

'स्वरमेळ' १-३-१९६३ प्रीतम अडांगळे (य. मु. अडांगळे)

नव्या महाराष्ट्रा नवशक्ती
नसानसामधुनी मुसमुसती ॥ धृ० ॥

संकटीं धरुनीया धीर
लढले शूर खंबीर वीर
तळहातीं घेऊनीया शीर
पडले धारातीर्थी ॥ १ ॥

पूर्वजांच्या कृत्यें पाहीं
स्फुरली ताजी तरणीं देहीं
दे आव्हान आम्हासी घेईं
ही प्राणाहुती ॥ २ ॥

वैभव सुख संपन्न कराया
झीजवूं प्रेमें अमुची काया
फुलवूं डुलवूं सौख्यें गाया
तव मंगल कीर्ती ॥ ३ ॥

महाराष्ट्रा जीव कोटी कोटी
अहोरात्र झटती तुजसाठीं
प्रीतमा पिढी पुढची मोठी
झटणार आहे पुढतीं ॥ ४ ॥

## १०. महाराष्ट्र गौरवगीत

**'महाराष्ट्र गौरवगीते'** २७-४-१९६० **वसंत अवसरे**

घनवनगिरिशिर भूषित जय हे दुर्गम रम्य प्रदेशा
सह्याद्रि तुंगशिर नील नभाला भेदुनि पाहि अनंता
शोभविती तुज गोदा कृष्णा सरिता परम पवित्रा
तव धवलामल चरणीं
नत सागर दिन रजनी
गाई तव जयगीता
जय हे जय हे जय हे जय जय जय ॐ महाराष्ट्र प्रदेशा ॥ १ ॥

हरिपदरतजनपंडित जय हे कविवर मान्य-प्रदेशा
ज्ञानेश बाल कथि वेदवचनाला गुंगवि पाहि दिगंता
मोर कवी निज आर्यागानीं मोहवि तोहि अनंता

तुकयाची मधु गाणीं
शिवगुरु सुंदर वाणी
दावि तव यश पंथा
जय हे जय हे जय हे जय जय जय ॐ महाराष्ट्र प्रदेशा ॥ २ ॥

नतशिररिपुदलभूषित जय हे वीरसु वीर प्रदेशा
सम्राट हर्ष परि मानधनानें अर्पुनि जाइ पदीं या
तो " जगदीश्वर दिल्लीश्वर वा " वंदित हतबल पाया
भगवा जरिपटका तो
अटकेवर फडफडतो
कंपित करि अरि देशा
जय हे जय हे जय हे जय जय जय ॐ महाराष्ट्र प्रदेशा ॥ ३ ॥

निजमति निजबल रक्षित जय हे उन्नत दिव्य प्रदेशा
नाचेल उंच तव कीर्तिपताका जिंकुनि पूर्ण दिगंता
जय हे जय हे जय हे जय जय जय ॐ महाराष्ट्र प्रदेशा ॥ ४ ॥

## ११. महाराष्ट आपुला

—प्रभाकर अत्रे

क्रांतिशूर वीर विजयी प्रान्त आपुला ॥ धृ० ॥
भोसले सुपुत्रा होती । स्वातंत्र्य-लालसा मोठी
अर्पुनी अर्घ्य रक्ताचा । शंभु पूजिला ॥ १ ॥
महादजी, बाजि, मल्हारी । हाकिती शत्रु बाहेरी
झेलता घाव शत्रूचा । देह रंगला ॥ २ ॥

'मरहठा' शब्द ऐकोनी । अश्वही पीत ना पाणी
मावळी मर्द वीरांची । जरब मोंगला ॥ ३ ॥

इंग्रजा पाजुनी पाणी । जाहली अमर ती वाणी
अबला न, मराठी प्रबला । देइ स्फूर्तिला ॥ ४ ॥

गर्जली सिंहवाणी ती । जन्मसिद्ध हक्कासाठी
केसरी-मराठा त्वेषे । समरि उतरला ॥ ५ ॥

धगधगीत क्रांतिज्वाला । स्वातंत्र्यवीर तो झाला
सैनिकीकरण कार्यार्थी । जीव गुंतला ॥ ६ ॥

महाराष्ट्र-निर्मितीसाठी । एकशे पाच आहूती
आरक्त क्षितिजावरती सूर्य उगवला ॥ ७ ॥

उत्तरेवरिल तो हल्ला । पाहुनी पेटुनी उठला
हिमगिरीस साह्यासाठी । सह्य धावला ॥ ८ ॥

सेनेत मराठी वीर । मिळविती 'परमवीरचक्र'
इतिहास रक्तरंगाचा । देइ साक्षिला ॥ ९ ॥

क्रांतिकार्य घेउनि हाती । घडविली 'भारती'मूर्ती
यशवन्त कीर्तिमन्त महा-राष्ट्र आपुला ॥ १० ॥

# १२. महाराष्ट्र गीत

**'शाहीर साबळे यांनी गायिलेली लोकगीते' भाग १ ला १९६८** **चकोर आजगांवकर**

जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र जय, जयजय राष्ट्र महान
कोटी कोटी प्राणांत उसळतो एक तुझा अभिमान ॥ धृ० ॥

बलीदानें इतिहास रंगला तुझाच पानोपान
तूच ठेविले स्वातंत्र्याचें फडकत उंच निशाण
तूं संतांची, मतिमंतांची, बलवंतांची खाण
तूच ठेविला कर्मयोगमय जागृत यज्ञ महान ॥ १ ॥

मातीच्या चित्रांत ओतले विजयवंत तू प्राण
मराठमोळी वाणी वर्णी वेदांताचें ज्ञान
पंढरीत नांदले अखंडित भक्तिचें जयगान
ब्रीद न सुटलें झुंजाराचें रणीं होता निर्वाण ॥ २ ॥

वज्रापुढती अभंग ठरले तुझेच ना पाषाण !
काळालाही जिंकून गेले इथले प्रज्ञावान
मानवतेचें समतेचें तूं एकच आशास्थान
पराक्रमावर तूझ्या विसंबे अखंड हिंदुस्थान ॥ ३ ॥

# १३. महाराष्ट्रगीत

'तृप्ति' १९६१ —सुहासिनी इर्लेकर

शिवनेरीच्या कुशींत कणकण पुलकित झालेला
पुन्हा तोरणा तोरण भाळीं बांधुन सजलेला
गोदाकांठीं ज्ञानेशाची गहिंवरली ओवी
अभंगात वाहत्या पंढरी अवघी बुडलेली
फडफडतो ध्वज गडागडावर धडधडते नौबत
कोटि कोटि अधरांवर स्फुरलें महाराष्ट्र-गीत. १

इथें सांवळें रुप घेतलें संस्कृत वाणीने
पाहियलें पाषाणदर्पणीं स्वरुप बुद्धाने
राजनीतिला वैराग्याने इथेंच द्यावे धडे
प्राणपणाने सत्तांधासहि चारावेत खडे
फडफडला डफ पुन्हां सुंदरी लावणीहि लज्जित
कोटि कोटि अधरांवर स्फुरलें महाराष्ट्र-गीत. २

संताच्या दासीने येथें ओवावी ओवी
नायकिणीच्या पोरीने भक्तीही पचवावी
धन्य वीरमाता जियेने स्वदेश निर्मियला
झांशीच्या राणीने अवघा देशचि पेटविला
महदंबेच्या धवळ्यांमध्यें इथेंच हरि दंगत
कोटि कोटि अधरांवर स्फुरलें महाराष्ट्र-गीत ३

ठायीं ठायीं वीर गड्यांची इथें स्मारकें किति
मिटलेल्या पापणींत विझली स्वप्नांची आरति
इथें जाणलें गीतेमधलें रहस्य योग्याने
लावियलें हृदयासी पददलिता नरश्रेष्ठाने
मायबोलिचा शब्द शब्द घे शत-खड्गांचें व्रत
कोटि कोटि अधरांवर स्फुरलें महाराष्ट्र-गीत. ४

तुंग गिरीवर, त्यावर सुंदर डुलतें हिरवें वन
अवखळ निर्झर पदीं तयांच्या रुणझुणती पैंजण
गोपाळांचा घुमतो पांवा अन् झुलतें गोधन
संध्येच्या रंगात रंगतें इथें मराठी मन
महाराष्ट्र हा भारतभूचा कंठमणी शोभत
कोटि कोटि अधरांवर स्फुरलें महाराष्ट्र-गीत. ५

# १४. अजून

‘ तृप्ति ’ १९६१ सुहासिनी इर्लेकर

अजून कणकण सह्याद्रीचा
स्पर्शाला तव आसुसलेला;
भयाण रात्रीं आठवणींचा
डोळा फुटतो अंधाराला ! ॥ १ ॥

झपाटलेला पिसाट वारा
गतकाळाची शोधित चाहुल
गिरीगव्हारीं वणवण फिरतो;
कधि न विसावे त्याचें पाउल. ॥ २ ॥

शेवाळ्याची कांबळ सारुन
जलवंतीही हळूच बघते;
मर्द मावळ्याची का कुठुनि
शीळ खुणेची कानीं येते ? ॥ ३ ॥

जीर्ण गडाचा दगड दगडही
अश्रु गाळुनिया तडफडतो;
बुरुजावरचा भगवा ध्वजही
अगतिकतेने नित फडफडतो. ॥ ४ ॥

खूण दौडणाऱ्या खूरांची
वक्षावरतीं लेवुनि सजुनि
धरेस वाटे बेहोषपणें....
देहभान द्यावें उधळूनी ! ॥ ५ ॥

म्यानांतिल तरवार गंजली
म्यानांतच असहाय चुळबुळे;
मंदिरातली शिणली 'आई'
वाटेला तव लावुनी डोळे. ॥ ६ ॥

पाषाणाचें थडगें फोडुनि
हळूच डोकावे 'अफझुल' ही
वदतो "सिंहाशींच झुंजुनी
कवटाळावा पुन्हां मृत्यु मी !"

## १५. श्री महाराष्ट्रगीत

'फुलबाग' १९३६ इंदुकांत (जनार्दन श्रीधर नाईक)

शूर महाराष्ट्रा ! हे सृष्टिनंदना !—
बद्धांजली बालक तुज करी वंदना ! ॥ धृ० ॥

अति मंगल, परमोज्वल तव परंपरा !
पसरो तव कीर्तिप्रभा दिग्दिगंतरा !
थोर, पोर यांची तूं मायमाउली !
तृषित भागल्या जिवांस तूंच सांवली !
निष्क्रिय निज जीवनांस देइं चेतना ! १

शूर वीर सांडि इथें रुधिर, त्यांतुनी—
गडागडावरिल कडा निघे न्हाउनी !
चिरे, दगड, खोरिं, दरी, खिंड खिंड ही—
'हरहर' जयघोष दिव्य घुमविं प्रत्यहीं !
शिकवी नामर्द मना मर्द भावना. २

गगन-श्री-वैभव जशि दिवस-यामिनी—
वैभव तव भक्ति, बुद्धि ज्ञानदायिनी
कांटेरी वेष तुझा! अंतरीं सुधा!
दगडा दे देवपणा तुझी वाक्सुधा!
बळ अमोघ नाहि कुणा हें तुझ्याविना! ३

पुत्र तुझे पारंगत राजकारणीं—
साधुसंत सज्ज तुझे धर्मरक्षणीं—
शौर्या रणिं, प्रणया ये बहर मंचकीं!
तुझ्या कलाचातुरिला तुला नाहिं कीं—
भावी दिग्विजया ही पूर्वयोजना! ४

## १६. माझा महाराष्ट्र

'संगम' १९६४ **पुरुषोत्तम इंगळे**

माझा महाराष्ट्र या जाणिवेने,
उठे रोमरोमांतुनी स्पंदन
फुटुनी फवारे अहा चित्त माझें,
खुली होत कारंजि ही आंतुन ॥ १ ॥

खड्या सह्यराजीवरी दुर्ग पंक्ति,
जसे आंगठीचे खडे कोंदणीं
यशोवैभवाच्या अहो कालच्या हे,
खुलुनी दिसावेत तेजोमणी ॥ २ ॥

कड्यांतून कृष्णा तशा कोयना या,
उफाळून उस्फूर्त देती जळ
वरी, नाचणी, बाजरी, साळ शाळू,
गहूं, हर्बरे, भुईमुगाचे तळ ॥ ३ ॥

इथे मावळे वीर हुर्डा फुकूनी,
वरी ओंजळी गोड प्याले जळ
जरी अर्धपोटी तरी धांव मोठी,
उराडांत ऐरावताचें बळ ॥ ४ ॥

शिवाचा हिमाद्रि सदा उत्तरेला
तसा काश्मिरी स्वर्ग डोक्यावर,
जगत्पावनी दिव्य गंगा नि सिंधु
तशी ब्रह्मपुत्राहि पूर्वोत्तर ॥ ५ ॥

तिथुनी जरा खालती विंध्यराजी,
अहो मेखला नर्मदा भूवर,
पुन्हा पायथ्याशीच कन्या कुमारी,
पद क्षाळितो दक्षिणी सागर ॥ ६ ॥

परंतु अम्हा वेड या स्वप्न-भूचें,
शिवाजी, तुका, ग्यानबा माऊली
सदा पाठिशीं आई तुळजा भवानी,
पुढे पंढरीची विठो माऊली ॥ ७ ॥

मराठी जिथें एक राज्यांत आले
मराठी जिथें एक बोली खडी
माझा महाराष्ट्र हा प्राण माझा,
जरी जाहली वेगळाली कुडी ॥ ८ ॥

वर्षे अहो तीनशे जाहली अन्,
पुन्हा एकभाषी मराठा उरे
म्हणू द्या कुणालाहि संकीर्ण आम्ही,
परी एकराष्ट्रीय आम्ही पुरे ॥ ९ ॥

महाराष्ट्रप्रेमी तरी भारतीय,
क्षणीं भावना भव्य झेपावते
महाराष्ट्र माझा या जणिवेने,
पुरी वृत्ति एकात्म जोसावते ॥ १० ॥

शिवाजी, तुकोबा नि ज्ञानेश्वरादि,
तसे ज्योतिबा, बाळ गंगाधर
तयांच्या स्मृतींना सदा वंदुनियां,
'महाराष्ट्र माझा' म्हणूं सादर ॥ ११ ॥

## १७. महाराष्ट्राची माती गाते

डॉ. कल्याण इनामदार

महाराष्ट्राची माती गाते मंगलमय गाणी
इथे जन्मले ज्ञानेश्वर अन् देहूचा वाणी
मराठमोळी भोळी इथल्या भक्तीची पेठ
ब्रह्म इथे अवघडले येता पायाशी वीट
हरीनामाने पावन अवघ्या संतांची वाणी
मेणाहुनही मऊ मोकळ्या हृदयाची ओल
मन वृंदावन होते येता तुळशीला फूल
फुलापरि कनवाळू इथल्या काव्याची धरणी

दिवा येथल्या अंधाराचा प्रकाशवेधी असे
चिमण्या चोचीतून उद्याची पूर्वा हासतसे
नसे येथला तृतीचा जर, खोटा वरकरणी
जन्म येथला, मरणे येथे, सामर्थ्याचा टिळा
डोळ्यामधुनी सूर्य गोंदला विठू परि सावळा
सोन्याहुनही किमती इथल्या शब्दांच्या खाणी

## १८. समतेचें हें तुफान उठलें

'महाराष्ट्र गाथा' १६९० 'स्वेदगंगा' १९५८ विंदा करंदीकर

उठ, उठ सह्याद्रे, घुमवित बोल मराठी खडे,
समतेचें हें तुफान उठलें; उठले सागरकडे.

हीच मराठी जिच्या मुखानें वदली ज्ञानेश्वरी
शिवबानें तरवार घासली याच मराठीवरी;
ह्रिच्या स्वागतासाठीं झडले तोफांचे चौघडे.

टिळक, गोखले, फुले, रानडे, आगरकर वैखरी
स्वातंत्र्याच्या पांच मशाली जळती वेदीवरी;
ह्या ज्योतीवरी दीप पेटवा चला भविष्याकडे.

स्वतंत्रतेचा मंत्र जयांना गर्भांमध्यें मिळे
तेच मराठे आम्ही; आम्ही सह्याद्रीचे सुळे;
स्वराज्यातुनी पुढे चलारे, चला सुराज्याकडे.

दर्याच्या भरतीच्या लाटा महाराष्ट्र अंगना
कंकणनादा भिउनि तयांच्या शत्रु सोडिती रणा;
वीज माळुनी वेणीवरती त्याही घुसल्या पुढें.

उठ खेडुता, पुन्हां एकदां झाडुनियां घोंगडी;
उठ मजूरा, पुन्हां मारण्या आघाडीवर उडी;
एकजूट ही पाहून पडतिल अन्यायाला तडे.

## १९. माझ्या मराठी मातीत

'पागोळ्या' १९८१ सदाशिव करंदीकर

माझ्या मराठी मातींत सामावल्या शक्ति युक्ति
माझ्या मराठी मातीला सदा स्वातंत्र्याची भक्ति.
माझ्या मराठी मातींत नेते जाहले महान
तिला क्रांतीचे डोहाळे लाल रक्ताची तहान.
माझ्या मराठी मातीनें अन्यायाला दिल्या लाथा
झूकविला नाही कधीं उन्मत्तांच्या पुढें माथा.
माझ्या मराठी मातींत झाले तानाजी, येसाजी
दिसूं लागले शत्रूला इथें पाण्यांत धनाजी.
शत्रूचीहि रूपवती इथें राहे सुखरूप
सत्य शीव सुंदराचें माझ्या मातीचें स्वरूप.
माझ्या मराठी मातींत झोंपलाहे ज्वालामुखी
विझणार नाही कधी असातसा सुखासुखी.
माझ्या मराठी मातींत पेटेलही जेंव्हा पाणी
होरपळून जातील 'नतद्रष्टांची' घराणीं.
माझ्या मराठी बाण्याला आज जितके छळाल !
उद्यां तितके जळाल आणि मातीला मिळाल !!

# २०. मराठा देश

‘ क्षितिज फिरे गरगरा ’ १९७० माधव कदम

देश मराठा वेष मराठा मरहट्टा आमचा बाणा
मायमराठी बोली आमची करवी अमृत पाना ॥ धृ ॥

मराठवाड्याचा झुले पाळणा गात कोंकण अंगाई
विदर्भाचे वरी चांदवे हलवी पुण्याची पुण्याई
मुख हंसरे मुंबापुरीचे खेळे एकतेचा तान्हा ॥ १ ॥

दक्षिण गंगा वाहे गोदा पावन ती चंद्रभागा
कृष्णा, शिना अन् कोयना करती देश जागा
सह्याद्रिची शिखरे गर्जती ठेवा ताठर माना ॥ २ ॥

आई भवानी तुळजा असे आमची कुलदेवता
पंढरीचा विठ्ठल सखा सर्व जगताचा जो पिता
देव मल्हारी आमचा कैवारी पावे भोळ्या भक्तांना ॥ ३ ॥

ज्ञानेशाची ओवी घडवी दर्शन विश्वरुपाचें
तुकयाची अभंग वाणी भक्तिरुपें नाचे
घडवी भागवत जनीं जनार्दनाच्या दर्शना ॥ ४ ॥

शिवरायाच्या कर्तृत्वाने पुनीत ही धरती
मर्द मावळे वीर मराठे पोलादी ज्यांची छाती
अजून घुमते अटकेवर ती ‘हरहर महादेव’ गर्जना ॥ ५ ॥

दणकट, राकट शरीर असे निधडी ज्यांची छाती
एका हातीं धरती पिकवी अन् खड्ग दुज्या हातीं
होतील तुकडे मोडून याचे परि न वाकती माना ॥ ६ ॥

रुप सावळे, साधे, भोळे, वृत्ती उदारपणाची
विनयशीलता, हृदयीं ममता भूषणें ललनेची
बाळमुखीं वीरप्रसवा सोडी भक्तिरसाचा पान्हा ॥ ७ ॥

# २१. माझ्या या देशाच्या मातीत

**माधव कदम**

माझ्या या देशाच्या मातीत
फुटतो पत्थरालाही पाझर
दगडा गोट्याचं माळ रान
घेतं पांघरुन हिरवा पदर ।

माझ्या या देशाच्या मातीत
वदतात रेडेही वेदवाणी
भोळ्या भाबड्या भक्तिला
विश्वात्मकतेची मिळे लेणी ।

माझ्या या देशाच्या मातीत
कृतत्वा त्यागाचा हुंकार
विद्या विनयेन शोभते
वैभवा वैराग्याचा आधार ।

माझ्या या देशाच्या मातीत
घामा ये कस्तुरीचा वास
राबत्या बैलांच्या काना
तुकयाच्या अभंगाची आस ।

माझ्या या देशाच्या मातीत
अक्षय माहेरीचं गोंदण
सावळ्या मालनीच्या ओटीत
सती सावित्रीचं भरलं वाण ।

## २२. शिवकालीन मराठ्यास

'काव्यकौमुदी' ७-१०-१९२४ एस्. सी. करी (जयवंत)

उलथुनि दे परसत्ता ती
शौर्य गाजूं दे भूवरती ॥ धृ० ॥

पळापळाला तव तेज
वाढूं दे सगळें आज
भाला, बरची, बंदुक
घे, तव इतिहासा देख !
शत्रूवर ठेवुनि नजर
घे तुझीच ती समशेर
एकच घाली
म्हणजे सरली
चिंता सगळी
उलथुनि दे परसत्ता ती
शौर्य गाजूं दे भूवरती ॥ १ ॥

घाव सोसले आजवरी
न सोसणें ते अतां तरी
टांचेखालीं शत्रूच्या,
भीरुपणाच्या, काळाच्या
राहुं नको पड बाहेर
शौर्य दाखवी तव थोर
नसानसांतून
वीर तनूंतुन
सदाच नूतन

प्रगट होउं दे तव स्फूर्ती
उलथुनि दे परसत्ता ती
शौर्य गाजूं दे भूवरती ॥ २ ॥

रणमर्दांचे पुत्र तुम्ही
परसत्ता ती अति जुलमी
सहन न झाली वीरांला
लढून गेले स्वर्गाला !
वीष जहर जें जुलुमाचें
बांधव तव प्याले साचे
    वांचवि त्यांना
    नको वल्गना
    हीच प्रार्थना
ऐक ऐक बा ही विनती
शौर्य गाजूं दे भूवरती ॥ ३ ॥

मरणोन्मुख झाली माय
शेवटची घटका-हाय !
पुत्र तिचा तूं शूर असा
रमलासी परदास्यिं कसा ?
शोधावें तुज आईनें
अर्ध्या मिटल्या नयनानें !
    लाजिरवाणी
    स्थिती अजूनी
    कशी सोसुनी
राहसि? होसी मंदमती !
शौर्य गाजूं दे भूवरती ॥ ४ ॥

## २३. दक्षिण महाराष्ट्रभूमि*

'हृदयकमल' १९६३, बा. वा. कारेकर (वासुदेवसुत कारेकर)

वंदनीय चिर अमुची दक्षिण महाराष्ट्रभूमि
विरागशाली, विक्रमशाली गाऊं नित आम्ही ॥ १ ॥

सह्याद्रीसम पाठीराखा सज्ज सदा जीचा
कृष्णा, तुंगा दों बाजूंनी रोधिति पथ रिपुचा ॥ २ ॥

जगदंबा, केदार जागतीं महादैवतें हीं
निर्भयता द्यायास भाविकां उभी खडी पाही ॥ ३ ॥

दूर पिटाळिति वीर मराठे इथुनि यवनशाही
साक्ष तयाची दे करवीरीं हिंदूपदशाही ॥ ४ ॥

जरिपटका नी भगवा झेंडा प्रतीक हें ज्यांचें
विक्रम-वैभव-वैराग्याचें निशाण शूरांचें ॥ ५ ॥

गड अवघड रांगणा, खेळणा लोळवि शत्रूंना
पन्हाळगडची दरड उभट ती भिववी ना कोणा? ॥ ६ ॥

श्लोक वामनी, आर्या मयुरी, प्रभाकरी जडण
देवल-किर्लोस्करी वाग्वधू कोणा मोहवि न? ॥ ७ ॥

शुद्ध मराठी वाणी बोलति येथिल कुलयुवती
गुणवंतांची खाणच भूमी गाजत ही जगतीं ॥ ८ ॥

स्फूर्ति-शक्ति-धृति-युक्ती यांचा संगम मधुर जिथें
त्या या दक्षिण महाराष्ट्रपदिं मोदें शिर नमतें ॥ ९ ॥

## २४. महाराष्ट्र वर्णन

' हृदयकमल ' १९६३ बा. वा. कारेकर

निर्झर झुळझुळ मंजुळ जेथें गाति शांतिपाठ
ज्ञानदेव तुकयादि उभविती जिथें भक्तिपेठ.

ठायीं ठायीं जिथें दैवतें जागृत हांकेला
भवानिचा वरदायि पहारा जेथें वसलेला.

श्रीशिवरायें जेथें केली 'शहावरी मात'
राष्ट्रभक्तिची जिथें समर्थे चेतविली ज्योत.

त्यागवृत्तिचा भगवा झेंडा उंच जिथें डोले
वैभवशाली जरिपटकाही मिरवत जिथ डौले.

त्रिखंडकीर्ती विक्रम जेथें मर्द मराठे ते
अफगाणां, थरकांप निजामा जे झाले करिते.

सह्याद्रीचा कोट दडपवी अरि-छाती-कोट
भीमथडींची तट्टें पळविति अरितें बेछूट.

अजुनि 'मराठा खंदक' भिववी तो बंगाल्याला
सिंधुदुर्ग तो आळा घाली पर-चांचेगिरिला.

कांदाभाकर खाउनि ठेवी रहाणीहि साधी
मराठमोळा भोळा चारी पुरुषार्थहि साधी.

शुद्ध मराठी भाषा जिंकी अमृतातें पैज
रसाळ तितुकी भावोद्दीपक, ओसंडे ओज.

शक्तियुक्तिची भूमि गाजली चारी मुलखांत
बुद्धि, श्रद्धा समान वांटा जिथ हातोहात.

अंकीं स्कंधीं जिच्या विहरतो आम्ही स्वच्छंद
ती ही अमुची महाराष्ट्र-भू प्यारी सुखकंद.

## २५. श्रीमहाराष्ट्र गौरव गीत

'महाराष्ट्र गौरव गीते' १९६०                वासुदेवसुत कारेकर

महाराष्ट्र जय, महाराष्ट्र जय, महाराष्ट्र देशा।
भारतमाता-रम्यमेखला प्रिय अमुच्या देशा ॥ धृ० ॥

'दुर्लभ मानवजन्म, भारतीं दुर्लभतर' त्यांत
जन्म महाराष्ट्रांत तयांना, जेच पुण्यवंत !
'इंद्र' लोकिंच्या देवांमाजिहिं लागतसे स्पर्धा
पुण्यक्षय व्हायाच्या आधीं धडपडतीं शतधा
भाग्य महाराष्ट्राचें तैसें नवनवलाईचें
'विष्णु'हि येती प्रिय पद सोडुनि निज वैकुंठींचें
'पंढरपुरचा' अमाप महिमा उगा न झालेला
'पांडुरंग'–भेटीला अगणित संतांचा मेळा
ज्ञानदेव अन् तुकाराम अन् संत एकनाथ
एकाहुनि का एक मालिका कोठें जगतांत ?    ॥ १ ॥

अगस्ति सम जिथ महातपस्वी तपास आचरित
तोच महाराष्ट्र हा आमुचा महाभाग्यवंत
निःक्षत्रिय करि कितिदां पृथ्वी जिथें परशुराम
दुष्टमर्दना जिथें धांवला दाशरथी राम.
ब्रह्मतेज तें, क्षात्रतेज तें एकरुप जेथ
'शापादपि अन् शरादपि'हि सामर्थ्य जिथे वसत.
कृष्ण त्यजी गोकुळ, मथुरा अन् स्वर्णद्वारकाही
भक्तांभेटी तो जगजेठी 'दिंडिरवनिं' येई.
उभा राहिला 'विठ्ठल' होऊनि कटिं ठेवुनि हात
भक्त-जनमनोवांच्छित पुरवायास असंख्यात    ॥ २ ॥

हिंदुपदपातशाही स्थापिति श्रीशिवराय जिथें
ज्ञान-भक्तिचा मेळ घालिती पंत-संत जेथें
विक्रमात वा वैराग्यातहि हार न कवणाला
स्वराज्य-दानी समर्थ-शिवबा जेथें साक्षिला
झेंडे अटकेपार रोविले ज्यांच्या अश्वांनी
हदरविलें दिल्लीचें कितिदां तक्तहि तें ज्यांनी
जरब केवढी शौर्याची ही शोभतसे ज्यांना
'ज्यांचे घोडे जळांत दिसती अरिच्या अश्वांना'
महाराष्ट्र हा, महाराष्ट्र हा, त्याच मराठ्यांचा
स्वातंत्र्यास्तव प्राणहि देती ऐशा मर्दांचा. ॥ ३ ॥

स्त्रिया–जिजाई–ताराबाई सम कर्तबगार
वीरप्रसवा अनेक ललना जेथें महशूर
प्रभाकरासम राष्ट्रीय शाहीर जिथें जन्मतात
केशवसुत, गोविंदाग्रज कवि जेथें विख्यात
देवल, खाडिलकरादि जन्मति जिथ नाट्याचार्य
जिथें बालगंधर्वासम बहु निपजति नटवर्य.
ललितलेखनीं फडक्यांचा धरि हात न जिथ कोणी
कला जीवनास्तव राबवते खांडेकर-वाणी.
विविध कलागुणनिपुण विभूषित महाराष्ट्र अमुचा
नूरच नोहे कोहिनूर हा भारतमातेचा ॥ ४ ॥

महाराष्ट्र हा असे अग्रणी हरेक क्षेत्रांत
राजकीय वा सामाजिक वा शैक्षणिकहि त्यांत
राजकीय क्षेत्रांत कुणी का विसरे टिळकांना ?
सामाजिक क्षेत्रांत त्यापरी अण्णा कर्व्यांना ?

अस्पृशांचा विचार करितां शाहूरायांना ?
शैक्षणिकाच्या विचारामधें भाऊरावांना ?
देशमुखांचा कसा करारी विसरलेचं बाणा ?
विनोबांचिया त्यापरि कुणि कां विसरे भू-यज्ञा ?
महाराष्ट्र-गौरव-गीता या विसरूं नका कोणी
रचिलें ज्यातें वासुदेवसुत कारेकर यांनी ॥ ५ ॥

## २६. या मातीला चढे रक्तिमा

' शांभवी ' १९६६ — रॉक कार्व्हालो

शतशतकांची यशःपूर्तिचीं तुला महाराष्ट्रा वरदानें
दिशादिशांनीं साज चढवुनी आज उधळिले घे नजराणे.
प्रताप शिवबांचा आठवतो, स्मृतीस उजळी तेज मावळी
तृणपर्णांनी, वनकाष्ठांनीं तरवारीची धार प्राशिली.
जिगिषाप्रेरित वायुगतीनें अश्व दौडले दरीकड्यांतुनि
पाषाणांवर इथें निशाणी त्या टापांची खुलते अजुनी.
जागृत निष्ठा, अमर प्रतिष्ठा समर झुंजली स्वत्वासाठीं
जुमानिला नच जुलुम अमानुष एक मराठी मुलखासाठीं.
तुफान उसळे जनशक्तीचें, या मातीला चढे रक्तिमा
मराठमोळ्या महामानिनी ईर्षेलाही नुरली सीमा.
धुळींतुनी आव्हानें उठलीं, हटली दुष्टांची शिरजोरी
उभी ठाकली छाती निधडी निर्दयता पचवुनी आसुरी.
सत्ता, मत्ता शरण आणिली, यश घेई लोळण चरणांवर
कडाडतां आसूड विजेचा कोसळला पर्जन्य धरेवर !

# २७. नवप्रभात महाराष्ट्राची

' शांभवी ' १९६६ रॉक कार्व्हालो

प्राचीची नवरंगी माया मावळभूवर थयथयते
नवप्रभात महाराष्ट्राची जयघोषानें दुमदुमते ! ॥ धृ० ॥

अभंग आणिक समर्थवाणी
जिभेंत झरते झांजरकाळीं
किरण-वायुच्या लहरींवरतीं
डुले आरती अन् भूपाळी
शिवरायाचें निशाण भगवे मनांत अवघें फडफडतें ! ॥ १ ॥

होनाजीनें माळ-पठारें
उभी शिवारें नित चेतविलीं
संत जनाई, ज्ञानेशांनी
भक्तीची जपमाळ ओंविली
ती ओवी तर पदर खोंवुनी अजुनी जात्यावर दळते ! ॥ २ ॥

कूस जियेची रत्नखनी ती
सह्यमाउली काळी हिरवी
श्वसनामध्यें विशाल समता
दिलांत ममता कणखर कडवी
उचंबळुन वत्सलता आजहि दहिंवरांतुनी गहिवरते ! ॥ ३ ॥

वीज वाहते वीरश्रीची
इथें तापल्या धूलिकणांतुन
शूरत्वाचे सूर गर्जती
कोटि मराठी मनामनांतुन
अन्यायावर या जनतेची झेंप वाघिणीची पडते ! ॥ ४ ॥

# २८. गुलाल आहे इथली माती !

'शांभवी' १९६६ रॉक कार्व्हालो

माय मराठी, हिच्या ललाटीं वैभवरेषा चिरजयवंती
ज्वलंत आहे इथें अस्मिता, गुलाल आहे इथली माती ! ॥ धृ० ॥

रुधिर शिंपिलें उदार होउन, मदार त्यांची स्वातंत्र्याला
संगर खेळुन डोंगरदरीहि साक्ष ठाकली गतकाळाला
विजयोर्मी सरितांच्या घेती यथास्वैर आवेशांत गती
स्मृतींत आहे धृती उसळती, गुलाल आहे इथली माती ! ॥ १ ॥

हृदयीं जागे शूर शिवाजी, मनें मराठी पोलादाची
तृणांत आहे घृणा अजुनहि प्रपातापुढें नत होण्याची
परंपरा शतकांची मागें श्रेय राखण्या उभी जागती
मावळभूमी केवळ स्फूर्ती, गुलाल आहे इथली माती ! ॥ २ ॥

उरांत अरिच्या निर्घृण कीं घण वातावरणीं येथिल कणकण
राळ रगाची खळाळणारी चराचराच्या शिरेशिरेंतुन
अन्याय ठरे अक्षम येथें न अक्षय मृत्युस कांहीं क्षिती
नित्य धरी तृण दास्यहि दातीं, गुलाल आहे इथली माती ! ॥ ३ ॥

कठीण कणखर कणा सह्याद्री, उणा न पडला सामर्थ्याला
खुणा मिरवितो पराक्रमाच्या, तुरा झुलवितो माथ्यावरला
मराठमोळी जनता भोळी, ईर्षेचा परि पलिता हातीं
निधडी आणिक उघडी छाती, गुलाल आहे इथली माती ! ॥ ४ ॥

# २९. पराक्रमी महाराष्ट्र

‘ स्फूर्तिनिनाद ’ १९५०    काव्यविहारी (धों. वा. गद्रे)

विक्रमशाली म्हणुनी गाजे नांव महाराष्ट्राचें ॥ धृ० ॥
धिक्कारुनि परकी सत्तेला
मर्द देश हा सदा झगडला
शरण न गेला कधी कुणाला
कणखर म्हणुनी विश्रुत झालें ब्रीद भारती याचें. ।

सह्यगिरीच्या दऱ्यादऱ्यांतुन
नवस्फूर्तिचें वाहे जीवन
मिळे प्यावया तें रात्रंदिन
वीर म्हणोनी ख्यात जाहले सुत या विक्रमभूचें.

सत्ता जेंव्हा क्रूर यावनी
अखिल भारता टाकी व्यापुनि
सत्तसंगें त्या झगडोनी
फडकत राहे इथेंच विजयी निशाण शिवरायाचें.

दुर्दैवानें भारतदेशा
पुढती ग्रासी दुष्ट अवदशा
परवशतेच्या निर्दय पाशा
तोडायास्तव सदा झगडले सुपुत्र या भूमीचें.

क्रांतिज्वाला जगीं उफाळुनि
विराट आंदोलन ये घडुनी
तदा येथल्या झुंजारांनीं
क्रांतिवीर होउनी मिळविले धन्यवाद जगताचे.

त्यागी उज्ज्वल पराक्रमाची
परंपरा श्रीशिवरायाची
इथें अखंडित चालायाची
म्हणुनि फडकतें निशाण येथें आज नव्या क्रांतीचें.

क्रांतिकालीं जे हिंदभूतले
पराक्रमाने देश गाजले
मुकुटरत्न जो असे त्यांतलें
त्या प्रियदेशा सदैव माझें वंदन सद्भावाचें.
विक्रमशाली म्हणुनी गाजे नांव महाराष्ट्राचें.

## ३०. महाराष्ट्र गौरव

**'महाराष्ट्र गौरव गीते' १९६०** **काव्यविहारी**

थोर महाराष्ट्राचा भाग्यरवी ये उदया
मोदभरें सुस्वागतगीत गोड गाऊं या
वंद्य शिवरायें परवशता निर्दाळुन
भूषविलें रायगडीं रत्नजडित सिंहासन.
अध्यात्मिक बल संतत वैराग्यें वाढवुनी
महाराष्ट्रधर्म इथें जागविला संतांनीं.

शिवशक्ती ग्रासाया अगणित दुरितें आलीं
मर्द महाराष्ट्राने लीलेनें ठोकरली.
त्या काळीं ऐकुनियां नांव महाराष्ट्राचें
थरथरलें भीतीनें मयुरासन दिल्लीचें
परि फिरतां कालचक्र आंग्लयुरोपीय येत
अविलंबें ग्रासियला त्यांनीं अवघा भारत.

परवशताघनिं चमके बिजली झांशीवाली
देखुनियां पोलादी परसत्ता हादरली.
निष्ठुर परसत्तेशीं मग संतत जोमानें
झुंज दिली टिळकांच्या याच महाराष्ट्रानें
वीरविनायक, बापट, राजगुरू, कान्हेरे
प्राणपणानें लढले क्रांतिसिंह हे सारे
मग सत्याग्रहसंगर भारतांत जो झाला
त्यांत महाराष्ट्रानें नव विक्रम गाजविला.
निमुटपणें मग गेली परसत्ता येथोनी
मंगलदिनिं राष्ट्रध्वज फडफडला अस्मानीं.

अखिल महाराष्ट्राची विस्कळलीं जीं शकलें
एकसंघ होत आज भारतांत यत्नबलें
बेळगांव, गोमंतक आदि अजुनि यायाचे
चित्र पुरें होइल मग थोर महाराष्ट्राचे.
प्रबल महाराष्ट्र बघुनि एकसंघ झालेला
झालासे हर्ष बहुत आज सकल सृष्टीला
सिंधुसागरलाटा* नाचतात हर्षानें
डोलतात आनंदें कोंकणचीं माडबनें.
आशीर्वच द्यावयास कृपाछत्र धरुनि वरी
सज्ज उभे रामटेक, सातपुडा, सह्यगिरी.
उत्सुक कृष्णा, गोदा आणि कितिक गिरितनया
शूर महाराष्ट्राला आशीर्वचना द्याया.

आपणही सुस्वागतगीत गोड गाऊं या
थोर महाराष्ट्राचा भाग्यरवी ये उदया.

* अरबी समुद्र

त्यागी उज्ज्वल पराक्रमाची
परंपरा श्रीशिवरायाची
इथें अखंडित चालायाची
म्हणुनि फडकतें निशाण येथें आज नव्या क्रांतीचें.

क्रांतिकाळीं जे हिंदभूतले
पराक्रमाने देश गाजले
मुकुटरत्न जो असे त्यांतलें
त्या प्रियदेशा सदैव माझें वंदन सद्भावाचें.

विक्रमशाली म्हणुनी गाजे नांव महाराष्ट्राचें.

## ३०. महाराष्ट्र गौरव

'महाराष्ट्र गौरव गीते' १९६० काव्यविहारी

थोर महाराष्ट्राचा भाग्यरवी ये उदया
मोदभरें सुस्वागतगीत गोड गाऊं या
वंद्य शिवरायें परवशता निर्दाळुन
भूषविलें रायगडीं रत्नजडित सिंहासन.
अध्यात्मिक बल संतत वैराग्यें वाढवुनी
महाराष्ट्रधर्म इथें जागविला संतांनीं.

शिवशक्ती ग्रासाया अगणित दुरितें आलीं
मर्द महाराष्ट्राने लीलेनें ठोकरली.
त्या काळीं ऐकुनियां नांव महाराष्ट्राचें
थरथरलें भीतीनें मयुरासन दिल्लीचें
परि फिरतां कालचक्र आंग्लयुरोपीय येत
अविलंबें ग्रासियला त्यांनीं अवघा भारत.

परवशताघनिं चमके बिजली झांशीवाली
देखुनियां पोलादी परसत्ता हादरली.
निष्ठुर परसत्तेशीं मग संतत जोमानें
झुंज दिली टिळकांच्या याच महाराष्ट्रानें
वीरविनायक, बापट, राजगुरू, कान्हेरे
प्राणपणानें लढले क्रांतिसिंह हे सारे
मग सत्याग्रहसंगर भारतांत जो झाला
त्यांत महाराष्ट्रानें नव विक्रम गाजविला.
निमुटपणें मग गेली परसत्ता येथोनी
मंगलदिनिं राष्ट्रध्वज फडफडला अस्मानीं.

अखिल महाराष्ट्राची विस्कळलीं जीं शकलें
एकसंघ होत आज भारतांत यत्नबलें
बेळगांव, गोमंतक आदि अजुनि यायाचे
चित्र पुरें होइल मग थोर महाराष्ट्राचे.
प्रबल महाराष्ट्र बघुनि एकसंघ झालेला
झालासे हर्ष बहुत आज सकल सृष्टीला
सिंधुसागरलाटा* नाचतात हर्षानें
डोलतात आनंदें कोंकणचीं माडबनें.
आशीर्वच द्यावयास कृपाछत्र धरुनि वरी
सज्ज उभे रामटेक, सातपुडा, सह्यगिरी.
उत्सुक कृष्णा, गोदा आणि कितिक गिरितनया
शूर महाराष्ट्राला आशीर्वचना द्याया.

आपणही सुस्वागतगीत गोड गाऊं या
थोर महाराष्ट्राचा भाग्यरवी ये उदया.

---

* अरबी समुद्र

## ३१. मी मराठा

'भावपूर्णा' १९४३ रा. अ. काळेले

छातिचा झुंझार ऐसा मी मराठा जातिचा
जन्मला जेथें शिवाजी पूत मी त्या मातिचा !
कासया आम्ही शिकावें शौर्य लोकांपासुनी
काय हो सिंहास देई पाठ वीर्याचे कुणी ?
अन्य लोकांच्या कशाला सांगतां आम्हां कथा ?
आमच्या पूर्वेतिहासाची स्मरा हो धन्यता.
आठवा हे कीं मराठे ते अहो आम्ही असूं
राष्ट्रकल्याणार्थ ज्यांनी सांडले पूर्वी असू !
ते असूं आम्ही मराठे स्वाभिमानाचे धनी
लाडके स्वातंत्र्य ज्यांना जास्त स्वप्राणाहुनी !
हा पहा सह्याद्रि, याचे टेकले सानू नभीं
ही मराठी वैभवाचीं स्मारकें जाणा उभीं !
ते कडे, खोरीं, कपारीं, त्या शिळा, झाडे, लता
सांगतातीं त्या मराठी मर्द पठ्ठयांच्या कथा.
पाहुनी यांना न ज्याचें शीर भक्तीनें लवे
ऊर वा प्रेमें भरेना तो मराठा हो नव्हे !
या मराठी वीर-भूचा पुत्र हो मी औरस
थोर ऐशा त्या मराठ्यांच्या यशाचा वारस !
माउली माझी मराठी ! भक्त-मी मोठा तिचा !
गर्व हा वाटे मला कीं मी मराठा जातीचा ! !

# ३२. हा महाराष्ट्र माझा

'रणदुंदुभि' भाग पहिला १९६६ बाळ कासेगांवकर

हा महाराष्ट्र माझा ! हा महाराष्ट्र माझा !!
जिथे निपजले मर्द मराठे ! जिथे गाजला शिवराजा !! ॥धृ०॥

या मंगल 'गोदा, 'कृष्णा'–शमविती मराठी तृष्णा
या तरवारी लखलखत्या–जणुं स्वराज्य रक्षणकर्त्या
नवसंस्कृतिचें संजीवन हें मृतांनाहि पाजा !!

हा शौर्याचा आवेश–हा शांतीचा संदेश
हा 'कोंकण' अन् हा 'देश' हा 'विदर्भ' हा 'खानदेश'
उत्क्रांतीचा उजळ कीर्तिचा इतिहास ताजा !!

हा उभा इथें 'सह्याद्रि'–जणुं राखणदार करारी
हा 'अरबी' पश्चिम तीरी–किति अथांग माया उदरीं
आक्रमकांना देत राहतिल मरणाचीच सजा !!

हा पूर्वज ज्ञानेशाचा–हा वंशज अन् तुकयाचा
हा पूजक या वेदांचा–हा रामदास दासांचा
अभंग आहे कीर्ति यांची त्रिखंडांत समजा !!

हा पाईक सुसंस्कृतिचा–हा सैनिक भारतभूचा
हा सेवक सद्धर्माचा–हा प्रेषित नव्या मनूचा
क्रांतिवीर हा भारतभूचा उंचाविल दर्जा !!

हा देशभक्त-गुणवंत–हा पंडीतराज महंत
हा विश्वशांतीचा संत–हा दलितांचा यशवंत
सदा झुंजला मुक्तीसाठीं हाच शूर सर्ज्या !!

हा भारतभू अभिमान–हा अमुचा मंगल प्राण
हा उभविल उंच निशाण–हा गाईल नित् यशगान
भाग्यवंत हा शांतीदूत हा जय जय जय गर्जा !!

# ३३. गर्जा जयजयकार

**'रणदुंदुभि' भाग पहिला १९६६ बाळ कासेगांवकर**

गर्जा जयजयकार !
जय महाराष्ट्र ! जय महाराष्ट्र हा गर्जा जयजयकार ! !

शिवरायांचा महाराष्ट्र हा शौर्याचें वरदान
ज्ञानेशांचें, तुकयाचें हें अभंग भक्तिस्थान !
इथेंच स्फुरलें ! इथें रंगलें शाहीरांचें गान
त्या शौर्यानें, त्या भक्तीनें जगीं मिळविला मान !
इथें गाजले, इथें गर्जले महाराष्ट्र झुंजार ! !

सह्यगिरीच्या उरीं उफाळे मंगल-जल, अंगार
देशभक्तिचे मळे बहरले, तेज भरे अनिवार !
त्या तेजानें इथें तळपले नरशार्दुल दिलदार
'लोकमान्य', 'रानडे' 'फुल्या'सम रत्नांचें भांडार !
महाराष्ट्राच्या कंठीं असल्या नररत्नांचे हार ! !

इथें जन्मले, अमर जाहले क्रांतीचे ग्रंथ
कीर्तिसुगंधें बहरून गेले शांतीचे पंथ !
या संस्कृतिला, या सुकृतिला आदि नच अंत !
पिढ्यापिढ्यांतुन जन्मा आले असेच यशवंत !
बलवंतांचा, गुणवंतांचा हा मौलिक संभार ! !

भीमा, भद्रा, निरा, कोयना, गोदावरी, कृष्णा
समृद्धीचे कलश वाहुनी शमवितात तृष्णा
स्त्री-रत्नांची खाण जणूं ही महाराष्ट्र-माता
थोर अहिल्या, झांशीवाली मर्दानी दुहिता !
युगें युगें हा इथें चालला सोन्याचा संसार ! !

महाराष्ट्र हा महान माझा वाण कशाची नसे
ताठ मान परि स्वाभिमान उरीं प्राण भरुनियां वसे
देशभक्तिचा, विश्वशांतिचा मंत्र इथें घुमतो
विश्वाचा इतिहास नवा हा महाराष्ट्र लिहितो !
भारतभूचा दिव्य दिप हा उजळितसे अंधार ! !

## ३४. माझा मराठ्यांचा देश

**'रणदुंदुभि' भाग पहिला १९६६ — बाळ कासेगांवकर**

माझा मराठ्यांचा देश — महाराष्ट्र नांव त्याचें
फडकती ध्वज येथें — क्षात्रतेजाचे शौर्याचे ! !

माझा मराठ्यांचा देश — आहे जुना पुरातन
विठूराया विटेवरी — उभा इथें चिरंतन.

माझा मराठ्यांचा देश — असे सव्वीस जिल्ह्यांचा
पुरंदर, शिवनेरी — सिंहगड या किल्ल्यांचा.

माझा मराठ्यांचा देश — राजधानी मुंबापुरी
इंद्रपुरीसम शोभे — इथें उद्यम नगरी.

माझा मराठ्यांचा देश — गोदा, कृष्णा, कोयनेचा
समृद्धिने सजविती — ग्रंथ इथें जीवनाचा.

माझा मराठ्यांचा देश — दारी उभा सह्यगिरी
येतां संकट बोलावी — भाऊ त्याचा हिमगिरी.

माझा मराठ्यांचा देश तीर्थक्षेत्रांचा पावन
जन्मतात जिथें राम दुष्ट नाशाया रावण

माझा मराठ्यांचा देश तुकाराम, ज्ञानेशाचा
रामदास, एकनाथ चोखा, नामा, गोरोबाचा.

माझा मराठ्यांचा देश जिजाऊ, जनाई माता
पावन चरणीं ज्यांच्या नम्र होई माथा-माथा.

माझा मराठ्यांचा देश शिवरायांचें हें दान
भारतीय स्वातंत्र्याचें ज्यांनी बांधिलें तोरण.

माझा मराठ्यांचा देश कर्मवीरांचा, फुल्यांचा
बाजीराव, बाजीप्रभु बाबू गेनू हुतात्म्यांचा.

माझा मराठ्यांचा देश थोर थोर सारस्वत
खांडेकर, साने आदि साहित्यिक प्रज्ञावंत

माझा मराठ्यांचा देश बलवंत, भाग्यवंत
घरोघरीं जन्मतात असे थोर यशवंत.

माझा मराठ्यांचा देश नररत्नांचीच खाण
कीर्ती, वैभवाला येथें नाही तीळभर वाण.

माझा मराठ्यांचा देश जरी असा साधाभोळा
इथें सदा फुललेला भावभक्तीचाच मळा.

माझा मराठ्यांचा देश घडवील संक्रमण
गाजवुन पराक्रम हटवील आक्रमण.

# ३५. मराठी मनांत

'मधुधारा' १९६२ माधव गोविंद काटकर

स्वातंत्र्याचा मंत्र
मराठी मातींत
मंगल विभूती
प्रखर ज्वलंत.

मराठी अन्नाचा
मराठा महान
रुंद छातीवरी
ताठर गर्दन.

मराठी पाण्यांत
दिव्य भागीरथी
तिच्या संगतींत
वसे सरस्वती.

यत्नदेव जागे
घरांत दारांत
सर्वांभूतीं प्रेम
मराठी मनांत.

ज्ञानेशाच्या मुखीं
अमृतानें न्हाली
मृत्युंजय झाली
धन्य मायबोली.

## ३६. माझा महाराष्ट्र

'महाराष्ट्र गाथा'–'भाववीणा' १९६०    वि. म. कुळकर्णी

माझा महाराष्ट्र, माझा महाराष्ट्र !
माझा महाराष्ट्र, हा सुंदर ॥ धृ० ॥
गोदावरी, कोयना आणि कृष्णा
भली चंद्रभागा इथे वाहते
इंद्रायणी येथ देवाघरींची
गाथा मराठी शिरीं झेलिते ॥ १ ॥

'पूर्णा' सुखाची तशी 'वैनगंगा'!
गातात या गायनें सुंदर
उभा धीर गंभीर सह्याद्रि मागें
पुढें नाचतो हा महासागर! ॥ २ ॥

किती कोट किल्ले उभारुनि छाती
कथा सांगताती अजुनी जुनी;
माता भवानी अम्हां रक्षणारी
राजे शिवाजी प्रतापी गुणी! ॥ ३ ॥

मराठी पहा आमुची एकभाषा
हें अमृताचें असे ताट हो!
घेऊं सुखें घास एका दिलानें
तो धर्मपंथी कुणीही असो! ॥ ४ ॥

ज्ञानामृताचे घडे घेउनिया
समर्थांसवें नाथ, ज्ञानेश्वर;
वीणा करीं घेति नामा-तुकोबा
अभंगांतुनी बोलती 'विठ्ठल'! ॥ ५ ॥

गीता प्रभूची जगा सांगणारे
इथें गाजले बाळ गंगाधर,
येथें महात्मा फुले, भीमराव;
कानांवरी येइ त्यांचा स्वर ! ॥ ६ ॥

हा भारताचा भुजदंड आहे
ध्वजा भारताची उभारीतसे
महाराष्ट्र हा शूर स्वातंत्र्यप्रेमी
छातीवरी वार झेलीतसे ! ॥ ७ ॥

इथें भक्ति, शक्ती, इथें देशप्रीती
हें कीर्ति, प्रीति, सुखाचें वन,
नवीं पुण्यक्षेत्रे फुलतात येथें
याला असो आमुचें वंदन ! ॥ ८ ॥

## ३७. महाराष्ट्र गीत

**'मेघा'** १९५७ **पुरुषोत्तम कुळकर्णी**

महा महाराष्ट्राच्या मर्दा मंत्र मराठीचा
तुझा गर्जु दे घुमवित अवघा प्रांत भारताचा ॥ धृ० ॥
सह्याद्री अन् विंध्याद्री हे ज्याचे आधार
गोदा, कृष्णा, भीमा ह्यांचे गळ्यांमधें हार
देहू, आळंदी, पंचवटी ही अन् पंढरपूर
पुनीत ज्याला करिती क्षेत्रे स्वर्गाहून थोर.
मराठवाडा, गोमांतक हे ऐरावत दोन
तुझ्या घालिती हार गळ्यांमधिं विनीत होऊन

याच महाराष्ट्रीं लढले रणमर्द
याच महाराष्ट्रीं संतांची साद
त्या वाणीतिल, त्या बोलीतिल मंत्र मराठीचा
तुझा गर्जु दे घुमवित अवघा प्रांत भारताचा ॥ १ ॥

इथें नांदलें शिवरायाचें मराठीचें राज्य
महाराष्ट्र हा बोलीसाठीं लढण्या हो सज्ज
रामदास जल कमंडलूतुनि बोध इथें ओती
इथेंच तरली सरितेंपोटीं तुकयाची पोथी
श्री ज्ञानेशांनी हिरे मोतियांनीं
तुला भुषविलें अमृत ती वाणी
त्या वाणीतिल, त्या बोलीतिल मंत्र मराठीचा
तुझा गर्जु दे घुमवित अवघा प्रांत भारताचा ॥ २ ॥

## ३८. 'कांचनी स्वप्न–महाराष्ट्र'

**सौ. इंदिरा कुळकर्णी**

ब्रह्म्याच्या मानसिचे, स्वप्न कांचनी
त्यास महाराष्ट्र असे, नाव त्रिभुवनी ।
सह्याद्रि कणखर हा, रक्षणा इथे
कृष्णा अन् गोदावरी, भूमि फुलविते ।
संतांच्या पदस्पर्शे, पुनित जाहली ।
शूरांची दिव्य खाण, माय येथली ।
विश्वाच्या कंठातिल, कोहिनूर हा ।
प्रिय आम्हा, एक महाराष्ट्र देश हा ॥

# ३९. गोंधळ

'आहुती' १९७२ कुंजविहारी (हरिहर गुरुनाथ सलगरकर —कुळकर्णी)

स्वतंत्रते भगवती उदो गे भारतभू माये ।
शिवाभवानी विभवशालिनी गोंधळास ये ये ॥ धृ० ॥
तुळजापूरवासिनी अंबिके, माय जगज्जननी ।
उग्ररुपिणि खड्गधारिणी महिषासुरमथिनी ॥ १ ॥
महाराष्ट्र–चौरंगावरती रंग तुझा भरिला ।
स्वयंप्रकाशित आत्मज्योतिचा पोत पाजळिला ॥ २ ॥
गणरायासह तेहतिस कोटी देव आळवून ।
समरधुरंधर शूरवीर सत्पुत्र तुझे नमिन ॥ ३ ॥
शिवनेरीच्या सख्या जिवलगा रायरिच्या राया ।
गोब्राह्मणपालका छत्रपति ये ये शिवराया ॥ ४ ॥
रिपुसंहारिणि विभवशालिनी भवानि समशेर ।
आनंदानें मुजरा माझा तिला लाखवार ॥ ५ ॥
प्रेमें नमिली शिवरायाची ती कृष्णा घोडी ।
परवशतेला ठोकर हाणुनि पाताळीं रगडी ॥ ६ ॥
सिंहगडीं नांदतो तान्हा मालुसरे वीर ।
मुरारबाजी पुरंदरीं करि राखण चौफेर ॥ ७ ॥
पावनखिंडित मुजरा केला त्या बाजी प्रभुसी ।
रामदास श्रीसमर्थ नमिला सज्जनगडवासी ॥ ८ ॥
गड अवघड हे चढूं कोठवर भारत भूमाये ।
शिवाभवानी विभवशालिनी गोंधळास ये ये ॥ ९ ॥

जगीं तुझा महशूर शिवाजी भक्त जातिवंत ।
मर्दुमकीचा गोंधळ घालित मावळखोऱ्यांत ॥ १० ॥
दुष्टस्पर्शें महाराष्ट्रभू झाली अपवित्र ।
रिपुरक्ताचा सडा शिंपुनी पवित्र ती करित ॥ ११ ॥
तोरणगडिं नवरात्र घातलें पवित्र समयाला ।
सुरुवातीला बळी घेतला विजापूरवाला ॥ १२ ॥
नररुंडांची माळ वाहिली विजयाष्टमि दिवशीं ।
परवशता हिंडते बिचारी होउनि परदेशी ॥ १३ ॥
समरमंडपीं करिति मराठे शत्रुयज्ञ बरवा ।
दिल्लीपतिला दहशत बसवी 'डोंगरचा चुव्वा' ॥ १४ ॥
दुसऱ्या दिवशीं भगवा ध्वज तो आनंदें डोले ।
चोरांनी लुटलेलें सोनें घरीं परत आणिलें ॥ १५ ॥
राज्य हिंदवी स्थापन झालें भारत भूमाये ।
शिवाभवानी विभवशालिनी गोंधळास ये ये ॥ १६ ॥
शिवरायाला स्वराज्य द्याया सिद्ध जाहलीस ।
सांग अंबिके आज आम्हांवर कां गे रुसलीस? ॥ १७ ॥
अटकेवरती भगवा झेंडा डौलें फडफडला ।
तो अर्ध्यीच्या रणमैदानीं सांग कसा पडला ॥ १८ ॥
शिवरायाचा महाराष्ट्र हा कसा ओळखावा ।
परवशता ही भीषण घेते हृदयाचा चावा ॥ १९ ॥
शस्त्रहीन स्वातंत्र्यहीन आम्हि बनलो या काळीं ।
आम्ही उपाशी परि परक्यांची पिकलीसे पोळी ॥ २० ॥
छत्रपतींच्या महाराष्ट्राची होत मानहानी ।
कसा पाहसी गोंधळ असला उघड्या डोळ्यांनीं? ॥ २१ ॥

हक्काची मागणी पुरवि ही दान नको देऊं ।
हिमतीनें गतवैभव अमुचें परत आम्ही मिळवूं ॥ २२ ॥

समशेरीसह नवा शिवाजी एक आम्हां देई ।
कुंजविहारी विनवि अंबिके अन्य आस नाही ॥ २३ ॥

महाराष्ट्राचा मान वाढवी भारत भूमाये ।
शिवाभवानी विभवशालिनी गोंधळास ये ये ॥ २४ ॥

## ४०. सुदिन

'आहुती' १९७२ — कुंजविहारी

महाराष्ट्र नरसिंह शिवाजी सिंहासनीं शोभला ।
सुदिन हा सोन्याचा उगवला ॥ धृ० ॥

गुलामगिरीची सुरी विषारी जखम जिव्हारीं करी ।
भासतें सारें स्वप्नापरी ॥
असह्य हो अपमान पदोपदीं बावरली जनता ।
नाचते भीषण परवशता ॥
संचरे नवें चैतन्य । जन उदार प्राणावरती ॥
धांवती तरुण समरांत । घेउनी शीर तळहातीं ॥
मृत्यूच्या खेळगड्यांना । जगिं नुरे कुणाची भीती ॥
शुभागमन स्वातंत्र्यदेविचें तोडितसे शृंखला ।
सुदिन हा सोन्याचा उगवला ॥ १ ॥

शूर दिलाच्या वीर वृत्तिच्या तरुणांची टोळी ।
शिवाजी जमवित भंवताली ॥
दडी धरुनि बेधडक शत्रुवर चालुनियां जाती ।
'हर हर महादेव' गर्जती ॥

रणधीर मावळे वीर। मांडतीं रणीं रणयज्ञ ॥
त्या पवित्र धारातीर्थी। घालुनी शत्रुला स्नान ॥
आहुती तयांची द्याया। निज प्राणा करिती कुर्बान ॥
शत्रुमित्र सेविती रणांगणीं चिरविश्रांतीला।
सुदिन हा सोन्याचा उगवला ॥ २ ॥

स्वदेशद्रोही स्वजन नराधम कार्यभाग नाशिती।
तयांची करुनी शिरगणती ॥
कांटे सारुनि दूर बनविला राजमार्ग तो नवा।
उशाला साप कुणी घ्यावा ॥
संगरीं खऱ्या खोट्याच्या। पाहण्यास मग पडताळा ॥
लढवुनी गनीमी कावा। बहु हतबल केलें रिपुला ॥
लाभलें सुयश समरांत। त्या भवानि समशेरीला ॥
महिषासुरमर्दिनी भवानि प्रसन्न दासाला।
सुदिन हा सोन्याचा उगवला ॥ ३ ॥

स्वातंत्र्याचा सूर्य उगवला रायगडावरती।
शिवाजी झाला छत्रपती ॥
सुभाग्य फळले, शत्रु निमाले, संकटनग टळले।
प्रजा मनिं आनंदें डोले ॥
हो विजयी भगवा झेंडा। गर्जना करित रणभेरी ॥
मानाचा मुजरा झडतो। नउ लाख खड्या समशेरी ॥
शिववैभव सुंदर ल्याली। दख्खनची दौलत सारी ॥
महाराष्ट्रमेदिनी आरती ओवाळित त्याला।
सुदिन हा सोन्याचा उगवला ॥ ४ ॥

शिवरायाचें स्मरण मराठ्या अंतरिं धरि कांहीं ।
कृतीविण दास्य ढळत नाही ॥
मर्द गड्या चल मार आघाडी मानधना सुजना ।
कीर्तिचा लाभे नजराणा ॥
करि विनंती कुंजविहारी । बा महाराष्ट्रसिंहा ॥
जागवी जनां लवलाही । जीवीच्या जिवलग जीवा ॥
नव उज्ज्वल स्वातंत्र्याची । करिशील गर्जना केव्हां ॥
त्या नव समया गाण्यासाठीं शक्ती द्यावी मला ।
सुदिन हा सोन्याचा उगवला ॥ ५ ॥

## ४१. महाराष्ट्र यशोगीत

'यशोदायिनी पुस्तक पहिले' १९२८

कुमारयशोद (भी. गु. कुळकर्णी)

धन्य महाराष्ट्र-यशोगीत गाऊं आदरें
ज्याच्चिया यशाविना सुगेय काय जगिं बरें ? ॥ धृ० ॥

पावन गोदा, कृष्णा, भीवरा सुकन्यका,
तुंग, सह्य, विंध्य गिरिवरांचियाहि मालिका
भूषवि ती ज्या देशा, तोचि प्रिय अम्हां बरें ! ॥ १ ॥

संत, कवी, शोधक, तत्त्वज्ञ, राजकारणी
जेथले सुपुत्र मानधन न भीति लव मनीं;
स्वातंत्र्यास्तव मरणें ध्येय जयांचेंच खरें ! ॥ २ ॥

राकट तनु, अचल धैर्य, अतुल शौर्य जेथलें,
वीररत्नभूमि नाम सार्थ जेथ जाहलें;
साक्ष देति दुर्ग अजुनि, बघुनि चित्त गहिंवरें! ॥ ३ ॥

कोमलतनु, चारुशील देवता गृहीं गृहीं,
गृहकृत्यीं कुशल, राजकारणीं रणांत ही
तेजोबल निरखितां भरें रिपुंस कांपरें! ॥ ४ ॥

शरणागत-भयहारक तोच महाराष्ट्र हा!
इप्सितार्थसुख-दायक तोच महाराष्ट्र हा!
भिन्न धर्म, परि बोली एक, कुठें भेद उरें? ॥ ५ ॥

उज्ज्वल इतिहास जया, भाविकाल रम्य तया,
कृतिनीं-नच-वाचेनें सत्य करूं वचना या.
मळवूं नच पूर्वज-यश, झगडूं संगरीं निकरें! ॥ ६ ॥

प्रियदेशा, त्वत्कारणिं देह आमुचा झिजो!
प्रियदेशा, त्वत्पूजनीं ध्येय बीज मनिं रुजो!
प्रियदेशा, घे मुजरा, सेवा घे याच करें! ॥ ७ ॥

## ४२. मराठी माती

'महाराष्ट्र गाथा'–'मराठी माती' १९६० कुसुमाग्रज

माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगाने जागल्या
दऱ्याखोऱ्यांतील शिळा ॥ १ ॥

हिच्या कुशीत जन्मले
काळे कणखर हात
ज्यांच्या दुर्दम धीरानें
केली मृत्युवरी मात. ॥ २ ॥

राकट तनु, अचल धैर्य, अतुल शौर्य जेथलें,
वीररत्नभूमि नाम सार्थ जेथ जाहलें;
साक्ष देति दुर्ग अजुनि, बघुनि चित्त गंहिवरें ! ॥ ३ ॥

कोमलतनु, चारुशील देवता गृहीं गृहीं,
गृहकृत्यीं कुशल, राजकारणीं रणांत ही
तेजोबल निरखितां भरें रिपुंस कांपरें ! ॥ ४ ॥

शरणागत-भयहारक तोच महाराष्ट्र हा !
इप्सितार्थसुख-दायक तोच महाराष्ट्र हा !
भिन्न धर्म, परि बोली एक, कुठें भेद उरें ? ॥ ५ ॥

उज्ज्वल इतिहास जया, भाविकाल रम्य तया,
कृतिंनीं-नच-वाचेनें सत्य करूं वचना या.
मळवूं नच पूर्वज-यश, झगडूं संगरीं निकरें ! ॥ ६ ॥

प्रियदेशा, त्वत्कारणिं देह आमुचा झिजो !
प्रियदेशा, त्वत्पूजनीं ध्येय वीज मनिं रुजो !
प्रियदेशा, घे मुजरा, सेवा घे याच करें ! ॥ ७ ॥

## ४२. मराठी माती

**'महाराष्ट्र गाथा'–'मराठी माती'** १९६० **कुसुमाग्रज**

माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगाने जागल्या
दऱ्याखोऱ्यांतील शिळा ॥ १ ॥

हिच्या कुशीत जन्मले
काळे कणखर हात
ज्यांच्या दुर्दम धीरानें
केली मृत्युवरी मात. ॥ २ ॥

कडेकपारींत उभीं
हिच्या शिवाची देवळें
तेज सरितांमधून
स्वाभिमानाचे ओहळे ॥ ३ ॥

माझ्या मराठी मातीला
नका म्हणूं हीन दीन
स्वर्गलोकाहून थोर
मला हिचें महिमान ॥ ४ ॥

दिवा झोंपडींत मंद
पेटे त्यावर मशाल
तिच्या दिप्तीनें उजळे
घर देशाचें विशाल ॥ ५ ॥

रत्नजडित अभंग
ओंवी अमृताची सखी
चारी वर्णांतुनि फिरे
हिच्या काव्याची पालखी ॥ ६ ॥

येथें देवाचें मंदिर
नाही श्रीमंत सोनेरी
हिच्यासाठी रमापती
राहे वाळवंटावरी ॥ ७ ॥

रसरंगात भिजला
येथें शृंगाराचा स्वर
येथें अहंता द्रवली
झालें वसुधेचें घर ॥ ८ ॥

माझ्या दरिद्री मातीचा
नका करूं अवमान
हिच्या दारिद्र्यांत आहे
भविष्याचें वरदान ॥ ९ ॥

येथें फडकला झेंडा
विळयाकोयत्यांच्यासाठीं
खड्ग खंबीर राहिलें
सदा कंगालांच्या पाठीं ॥ १० ॥

नाही पसरला कर
कधीं मागायास दान
स्वर्णसिंहासनापुढें
कधीं लवली ना मान ॥ ११ ॥

हिच्या गगनांत घुमे
आद्य स्वातंत्र्याची द्वाही
हिच्या पुत्रांच्या बाहूंत
आहे समतेची ग्वाही ॥ १२ ॥

अन्यायाची सुलतानी
कधीं हिनें ना साहिली
आहे मृत्यूच्या दाराशीं
हिच्या श्रद्धेची हवेली ॥ १३ ॥

माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगे जागतील
मायदेशांतील शिळा ॥ १४ ॥

# ४३. निर्धार

‘ हिमरेषा ’ १९६४ **कुसुमाग्रज**

समरभूमिचे सनदी मालक शत युद्धांचे मानकरी
रणफंदीची जात आमुची, कोण अम्हां भयभीत करी !

घोरपडीला दोर बांधुनी पहाड दुर्घट चढलेले
तुटून पडतां मस्तक खालीं धुंद धडानें लढलेले
खंदकांतल्या अंगारावर हांसत खेळत पडलेले

बाप असे कळिकाळ आमुचे कीर्त गाजली दिगंतरीं
रणफंदीची जात आमुची, कोण अम्हां भयभीत करी ! ॥ १ ॥

या मातीने दिला वारसा कठोर छाती दगडाची
दिली नद्यांनी ध्येयासाठीं समर्थता बलिदानाची
पहाड डोंगर इथें सांगती अजिंक्यता अभिमानाची

जगदंबेचा पालव येथें लढवय्यांच्या सदा शिरीं
रणफंदीची जात आमुची, कोण अम्हां भयभीत करी ! ॥ २ ॥

करवत कानस कुणी चालवो, पिकवो कोणी शेतमळा
कलम कागदावरी राबवो, धरो कुणी हातांत तुळा
करांत कंकण असो कुणाच्या वा भाळावर गंधटिळा

शिंग मनोऱ्यावरी वाजतां उभी छावणी घरोघरीं
रणफंदीची जात आमुची कोण अम्हा भयभीत करी ! ॥ ३ ॥

पोलादी निर्धार आमुचा असुर बलाची खंत नसे
स्वतंत्रतेच्या संग्रामाला विजयावाचून अंत नसे
श्रद्धा हृदयांतील आमुच्या वज्राहुनि बलवंत असे

मरण मारूनी पुढें निघाले, गर्व तयांचा कोण हरी
रणफंदीची जात आमुची कोण अम्हां भयभीत करी ! ॥ ४ ॥

भरतभूमिचा वत्सल पालक देवमुनींचा पर्वत तो
रक्त दाबुनी उरांत आम्हां आर्त स्वरानें पुकारतो
हे सह्याचल हे सातपुडा—शब्द अंतरा विदारतो
त्या रक्ताची त्या शब्दाची शपथ आमुच्या जळे उरीं
रणफंदीची जात आमुची कोण अम्हां भयभीत करी ! ॥ ५ ॥

जंगलजाळापरी मराठा पर्वतश्रेष्ठा उठला रे
वणव्याच्या अडदांड गतीला अडसर आतां कुठला रे
तळातळावर ठेंचुन मारुं हा गनिमांचा घाला रे
स्वतंत्रतेचें निशाण अमुचें अजिंक्य राखूं धरेवरी
रणफंदीची जात आमुची, कोण अम्हां भयभीत करी ! ॥ ६ ॥

## ४४. आम्ही मराठे गडी !

कुमुदबांधव' कला पहिली १९२७, कुमुदबांधव (स. अ. शुक्ल)

तेजें मंगल आत्मतेज उजळूं मेल्या महाराष्ट्रिंचें
दावूं अंतरिं शुष्क सह्यगिरिच्या पाणी पुनः जातिचे
फेंका वन्हित एकजात पहिली देशार्थ घालूं उडी
फोडोनी नरडी कडाड रिपुची 'आम्ही मराठे गडी !' १

अंगीं देवकळाच दाविति जिथें निर्जीव पाषाणही
कृष्णेचें जल बिंदुमात्र उठवी जीवंत प्रेतासही
ज्याचें नांवच शत्रुला भिववुनी लावीत देशोधडी
त्या देशात कसे हराम निपजूं 'आम्ही मराठे गडी !' २

आम्ही कर्दन काळ मर्द ! उडवूं काळाचिही गर्दन
दास्याचें करुनी क्षणांत अवघ्या निर्मूळ निर्दालन
प्राणांना विकुनि क्षणार्धिंच करूं स्वातंत्र्यशाही खडी,
निशःस्त्र प्रतिकार नित्य करुनी 'आम्ही मराठे गडी !' ३
सिंहाचें रणगाजि पाक कुळिंचे बच्चे-न हो ! मेंढरें
मेलें रक्त मवाळ गारठुनियां देहांत ना संचरें
मारूं वा मरूं ना पळूं बचवुनी युद्धीं परी कांतडी
नाही ठाउक षंढता कधि अम्हां 'आम्ही मराठे गडी !' ४
ज्यांनी काल कृतांतही नमविला बच्चे तयांचे अम्ही
नामर्दासम कां गुलामगिरीच्या सारे सहूं कर्दमीं ?
धिःकारीं वदतील पूर्वज तरी 'वाचाळता कोरडी—
स्वार्थाचेच गुलाम देशबुडवे कैचे मराठे गडी ?' ५
"शापें जाळि समाधि रायगडची; क्रोधानला पांखडीं
शोकानें तुटती तटाट कढत्या सह्याद्रिची आंतडीं
ओशाळून स्वराज्य माय परक्या दारीं फिरे बापुडी
स्वातंत्र्या गमवोनि स्वार्थ बघतां ! कैचे मराठे गडी !" ६
"स्वार्थी शील विकोनि हाय ! भुलता या वैभवा बेगडी
कच्चे भ्याड तुम्ही बहादुर खरे हे बोलके बांगडी !
संग्रामीं पडली—चिरंजीव परी ती मर्द मेली मढीं
नाही सत्व तुम्हां-जिवंत मुडदे तुम्ही मराठे गडी !" ७
कां दैवा अजि दोष देत रडतां ? साधाच आली घडी
कां ठेवोनि कपाळिं हात बसतां ? आतां करा तांतडी
हातीं आइ भवानि घेउनि पुनः ती लेखणी तागडी
दावूं हा अभिमान सार्थ करुनी 'आम्ही मराठे गडी !' ८

# ४५. सिंहासनिं बैसली मराठी !

'महाराष्ट्र गौरव गीते' स. अ. शुक्ल

सिंहासनिं बैसली मराठी, आली दरबारा
अलम् मराठी दुनियेचा तिज मानाचा मुजरा.

धन्य पुण्यदिन ! 'महाराष्ट्र हा उदयाला आला
दिव्य भव्य आनंद-सोहळा नवलाचा नटला.

'महाराष्ट्र जय महाराष्ट्र' ही चलाचलीं ललकार
सह्याद्रीच्या कडेकपारीं घुमला जयजयकार.

कोटि कोटि कंठांतुनि उसळे प्रचंड जयघोष
रायगडींची समाधि डोलत, पावत संतोष.

अणुरेणुंत चैतन्य उफाळत अभिनव अपरंपार
अनेक शतकांचें सोनेरी स्वप्न आज साकार.

मायभवानी कुलस्वामिनी श्रीशिव–वरदायिनी
देत शुभाशीर्वाद निरंतर महाराष्ट्र तारिणी.

भीमा, कृष्णा आणि कोयना, पूर्णा, गोदावरी
यशोगान साभिमान गाती वात्सल्यें भारी.

अजिंक्य प्यारे शिवरायाचे हे दुर्गम दुर्गही
देती ताजिम खडी आदरें मानवंदना ही !

वसंत हंसरा परिवारासह उधळत सुंदरता
शुकपिक कोकिळ मंजुळ गाती सुस्वागत–गीता.

ध्वजा-तोरणें उभवि तरुलता–नवपल्लव–संभार
वसुंधरा सुंदरा साजरा ल्यालि साज–शिणगार.

सर्वभद्रकर अपूर्व मंगल पर्वकाल आला
नव्या युगाचें नव्या जगाचें आवाहन सकलां.

जरिपटका अन् भगवा झेंडा सांगत गुरुमंत्र
येथ विक्रमासह वैराग्यहि नांदत एकत्र.

चातुर्याची जोड लाभतां सुफलित हो शौर्य
शक्तियुक्तिच्या संयोगानें साधतसे कार्य.

सुरलोकाहुनि थोर मराठी मातीचा महिमा
शिळेंतुनी प्रकटत पुरुषोत्तम उजळत दैन्य–तमा.

वीर मराठ्याचा बाहू दे न्यायाची ग्वाही
दुमदुमली दशदिशांत संतत नीतीची द्वाही.

ताठ मराठी मान न लवली कधिही जुलुमापुढें
शिवशक्तीच्या वज्रमुष्टिनें मरण मरे बापुडें.

शिवप्रभु प्रिय दैवत; जीवन संजीवनमर्म
स्मरुनि तयाचा प्रताप वाढवूं महाराष्ट्रधर्म.

एकदिलानें बुद्धिबलानें अखंड कष्टुनियां
निर्मूंया नव महाराष्ट्र ज्या नांवाजिल दुनिया

विसरुनि भेदाभेद विविध ते जातिधर्मपंथ
महाराष्ट्र–नववैभवमंदिर उभवुं शोभिवंत.

समर्थ सार्थच आर्त रक्षणास्तव हा रणमस्त
महाराष्ट्र हो भारतभूचा सबल खड्गहस्त.

शांतिसुखाचें समृद्धीचें महाराष्ट्रराज्य
समता–ममता–सहकार्याचें मंगल साम्राज्य.

देत जगाला नित समतेचा उज्ज्वल संदेश
भारतभूषण तेजस्वी श्रीमहाराष्ट्र देश !

## ४६. नमस्ते श्री महाराष्ट्रा

' महाराष्ट्र गाथा ' १९६० केशवकुमार

नमस्ते श्री महाराष्ट्रा स्वातंत्र्याच्या जवाहरा,
तीन कोटी मराठ्यांच्या पितृदेवा परात्परा ।

संतांच्या वंद्य माहेरा, वीरांच्या बलसागरा,
तुला निर्मुन ही झाली धन्य वाटे वसुंधरा ।

महाराष्ट्रा, तुझ्या पायीं असो साष्टांग वंदन,
तुझ्यासाठी झिजो माझ्या देहाचें नित्य चंदन ।

तुझे गोटे, तुझे कांटे, फुलांची शेज ही मला,
कणी कोंडा तुझा आहे गोड मांड्याहुनि भला ।

महाराष्ट्रा, तुझ्यापायीं घालूं लोटांगणें किती ?,
तुझीं गाणीं, तुझीं स्तोत्रें भक्तीने मी गाऊं किती ? ।

## ४७. श्री महाराष्ट्र गीत

श्री. कृ. कोल्हटकर

बहु असोत सुंदर संपन्न कीं महा ।
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥
गगनभेदि गिरिविण अणु नच जिथें उणें ।
आकांक्षांपुढतीं जिथें गगन ठेंगणें ।
अटकेवरि जेथील तुरगि जल पिणें ।
तेथ अडे काय जलाशय—नदाविणें ?
पौरुषास अटक गमे जेथ दुःसहा ॥ १ ॥

प्रासाद कशास जेथ हृदय–मंदिरे ।
सद्भावांचीच भव्य दिव्य आगरें ।
रत्नां वा मौक्तिकांही मुल्य मुळी नुरे ।
रमणीची कूस जिथें नृन्मणि–खनि ठरे ।
शुद्ध तिचें शीलहि उजळवि गृहा–गृहा ॥ २ ॥

नग्न खड्ग करीं, उघडे बघुनि मावळे ।
चतुरंग चमूचेंही धैर्यशौर्य मावळे ।
दौडत चहुंकडुनि जवें स्वार जेथले ।
भासति शत–गुणित जरी असति एकले ।
यन्नामा परिसुनि रिपु शमित–बल अहा ॥ ३ ॥

विक्रम–वैराग्य एक जागीं नांदती ।
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती ।
धर्म–राजकारण समवेत चालती ।
शक्ति–युक्ति एकवटुनि कार्य साधिती ।
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा ॥ ४ ॥

गीत मराठ्यांचें हें श्रवणीं मुखीं असो ।
स्फूर्ति–दीप्ति–धृतिहि देत अंतरी ठसो ।
वचनीं लेखनींहि मराठी गिरा दिसो ।
सतत महाराष्ट्र–धर्म–मर्म मनिं वसो ।
देह पडो तत्कारणिं ही असे स्पृहा ॥ ५ ॥

# ४८. महाराष्ट्रा !

'काव्यविलास' २८-११-४१ कृष्णाग्रज (यशवंत महादेव गद्रे)

किती सायासानें कठिणतर जागा निवडुनी,
तुवां सह्याद्रिच्यावरि अमित किल्ले उभवुनी,
मराठ्यांचे झेंडे अखिल भरतीं त्वां मिरविले,
महाराष्ट्रा, कैसें उगिच बसणें आज रुचलें ? – १

तुझ्या नांवा घेता अरिहृदयहि जाती बिचकुनी,
तुझ्या तेजा शत्रू दिपुनि बनती अंध नयनीं;
तुझ्या सच्छीलाची सरि न करूं कोणीहि शकले,
महाराष्ट्रा, कैसें उगिच बसणें आज रुचलें ? – २

अरीचे संग्रामीं वपुवरि जरी वार बसले,
न कोण्याही काळीं वदन पळही त्वां लपविलें;
सदा वाटे तूंतें मरण अपमानाहुनि भलें,
महाराष्ट्रा, कैसें उगिच बसणें आज रुचलें ! – ३

गनीमीकाव्याच्या विविध तव डावा अरि फसे,
तुझ्या चातुर्याची अटकळ न कोणा कळतसे !
विपक्षा लीलेनें अमित समयीं त्वां चकविलें,
महाराष्ट्रा, कैसें उगिच बसणें आज रुचलें ? – ४

शिवाजी, संताजी, समरपटु बाजी सुत तुझे,
हरी, नाना, बापू कुशल धृतिमेरू जगति जे,
परी आतां कोठें सकल सखया सांग लपले ?
महाराष्ट्रा, कैसें उगिच बसणें आज रुचलें ? – ५

दुज्या राष्ट्राहूनी तनु जरि तुझी सान दिसते;
गुणें, धैर्यें, शौर्यें तुज न दुसरी जोड मिळते!
असा तूं सर्वांचा मुकुट म्हणुनी नांव दिधलें,
महाराष्ट्रा, कैसें उगिच बसणें आज रुचलें?–६

तुवां पूर्वी मोठी बहुत रणकीर्ती मिरविली,
तुवां कौशल्याची अरिस अनुभूती घडविली
तुझ्या देहा आतां वद कुठुनि शैथिल्य जडलें?
महाराष्ट्रा, कैसें उगिच बसणें आज रुचलें?–७

तुझी वाणी आणी मृत तनुसही जीवन अहा,
तुझ्या सामर्थ्यांनें गालिततनु होई, अरि महा!
तुवां बा साधावें पदक विजयाचेंच पहिलें,
महाराष्ट्रा, कैसें उगिच बसणें आज रुचलें?–८

समर्थ, ज्ञानोबा, मयुर तुकया वा महिपती,
असे आतां येती कवि न प्रतिभाशाली पुढतीं!
जयांच्या काव्यानें मनुज तनुचें भान विसरे,
महाराष्ट्रा, कैसें उगिच बसणें आज रुचलें?–९

अशी संधी आतां लवकरि न येईल फिरुनी,
नको बैसूं तीतें कधिहि, चतुरा, तूं गमवुनी!
करीं एके जागीं त्वरित तव सामर्थ्य सगळें,
महाराष्ट्रा, कैसें उगिच बसणें आज रुचलें?–१०

# ४९. महाराष्ट्र-संतान

'महाराष्ट्र कवि परंपरा' १९३९ — यशवंत महादेव गद्रे

महाराष्ट्र–संतान ! झणीं    उठ नीज सारी त्यजुनी
स्वातंत्र्याच्या गीतांनीं    निनादते अवघी अवनी
अशा प्रसंगीं । भीति    वाउगी । धरणें अंगीं
उचित काय गा तव जीवा    तूंच जरी शार्दुल छावा १

स्वातंत्र्याचें सौख्य किती    देश जगावर अनुभवती
पाहुनियां परवश तुजसी    उल्लेखिति नित उपहासीं
अपमानाचें, गर्वोक्तीचे,    शब्द कुणाचे,
क्षणभर ज्यास न कधिं पटले    आजच कैंवि तया रुचले २

रणीं नाचले आघाडी    तुझेंच तट्टू भीमथडी
तो भगवा झेंडा भाला    देखुनि वाटे भय काळा
त्या सर्वांशीं, तिलांजलीसी, हाय ! अर्पिसी,
पतकरिसी हतवीर्य जिणें    जिणें कशाचें, हें मरणें ! ३

परवशता तूं न साहिली    आजचि कैशी मग रुचली
कनकाची गोजिरी सुरी    लपवावी कां म्हणुनि उरीं
परवशतेचा, तंग व्हायचा, अधिक रोजचा,
फास हें न कां कळे मना ?    कृती कशी मग होईना ४

कठिण तेवढें प्रिय तुजला    स्फुरण चढे तेणेंच तुला
अग्रपुजेचा मान कुणा    नसे लाधला तुझेविना
त्या युक्तीचा, त्या शौर्याचा, त्या शीलाचा,
झेंडा फडको चोंहिकडे    दुज्यास घाया पुन्हा धडे ! ५

# ५०. धन्य रांगडा देश

'पारिजातक' १९७४ यशवंत खडके

धन्य आमुची मायमाऊली ! धन्य रांगडा देश !
पाईक आम्ही स्वराज्याचे रांगडाच गणवेश ॥ धृ० ॥

भाषा आमुची असे मराठी
सह्यगिरी हा आमच्या पाठी
रक्षण करतो मातेसाठी
समृद्ध केली ज्ञानेशांनी, धन्य जगीं ज्ञानेश ॥ १ ॥

श्रीतुकयाची अभंग गाथा
विसरुन टाकी अवघ्या चिंता
जगदीशाची ज्यास मान्यता
तल्लीन होऊनी गाइ अजुन वारकरी पहाटेस ॥ २ ॥

मराठी माणुस शुर हाडाचा
परि भक्त तो विठोबाचा
नांगर उतरुन खांद्यावरचा
चंद्रभागे तीरि जाऊन घुमवितो विठ्ठल घोष ॥ ३ ॥

धन्य मराठी कणखर मनगट !
श्रीशिवबांचे शिपाई राकट
पोलादाची शरिरें दणकट
अटकेपार फडकले झेंडे मर्दांचा उन्मेष ॥ ४ ॥

असा आमुचा देश हा न्यारा
वेळीच आरेला सुनावणारा
शत्रूवरती भव्य दरारा
झुंजारांची खाण असा हा, भिन्न जरि परिवेश ॥ ५ ॥

# ५१. तुझाच जयजयकार ! !

**यशवंत खडके**

जयजयकार जयजयकार तुझाच जयजयकार ।
पुराण पुरुषा, महाराष्ट्रा तव, गातो गीत झंकार ॥ धृ० ॥

जंगलझाडी कडेकपारी
पाठीराखा भव्य सह्यगिरी
दरी दरीतून तुझ्याच घुमले, वेद घोष ओंकार ॥

अभंगवाणी श्री तुकयाची
अमृत ओवी ज्ञानेशाची
भक्ती रसाचे मधुघट भरले, महिमा अपरंपार ॥

भीमा तापी कृष्णा गोदा
पावन तीर्थी सदा सर्वदा
चैतन्याचे जीवन आगळे, देती पूर्वापार ॥

भीमकाय तो अरबी सागर
आरमाराचा धाक धुरंधर
अखंड तांडव चरणावरती, तुझ्याच वारंवार ॥

तुझी येथली ज्वलंत माती
मराठी रक्तामधली नाती
यूगे यूगे इथं जन्म पावले, नररत्ने अंगार ॥

## ५२. एक काळचा व हल्लींचा महाराष्ट्र

'भावनातरंग' १९३९ — रा. वि. खासनीस

शूर वीर ते शहा, शिवाजी, बाजी, तानाजी,
अंकावरती तुझ्या खेळले इथेंच सूर्याजी
विडा उचलला, देह वाहिला स्वातंत्र्यासाठीं
गोळा केला मावळ-मेळा सह्याद्रीपाठीं !
कुठे परगणा, घेति तोरणा, करती सर किल्ले,
निशाण भगवें झळके वरती परतवितें हल्ले !
खानहि येती, अल्ली येती, बादशहा येती,
कुठें तख्त दिल्लीचें, वरती टक्कर त्या देती.
मर्द मावळे, ख्यात कुळींचे लढले शौर्यानें,
लुटुनी जाती छापछुप्यावरि गनिमी काव्यानें.
पिळदार तनू, शेलाट बांधणी, काय मर्दाची,
पहाड, किल्ले, डोंगर-माथे वस्तीला हेची.
जन्मा येउनि जगतामाजी सार्थकता करुनी,
अजरामर तें नांव कोरिले स्वराज्य स्थापवुनी.
कुठें शक्ति ती ऱ्हास जाहली, न दिसे आज परी
उदयकाळची प्रभा आजला विलया जाय खरी !
रणक्षेत्रें ती भयाण दिसतीं—माळरान माजे
भरुनी येती अश्रू नयनीं पाहावें जें जें
कुठें जंजिरा, अजिंक्यतारा, होता मेळ खरा
खेळुनी गेले शूर शिपाई, भुषण दरबारा.
डोंगर-किल्ले, बाले-किल्ले त्या काळीं लढले,
तेच आजला उभे सताडचि पडले कीं झडले !

निशाणबाजी अतां कोठची, शस्त्रास्त्रें हरलीं,
कुलुपी गोळे, दिपती डोळे ऐकून भंवताली.
करामती त्या नष्ट जाहल्या कारागिर गेले
कोठें जाऊन दडले ते कीं, गेले कां सगळे ?
झळकत होता महाराष्ट्र जो, नांव न तें राही
प्रभावशाली तुझी योग्यता कोठें कीं जाई ?

## ५३. माती अशी मराठी

'गंधसमीर' १९६३ भालचंद्र खांडेकर

जन्मास येथं आल्या कीर्तीसवेंच मूर्ती
खेचून घे यशश्री माती अशी मराठी ॥ धृ० ॥
वाणीत गुंफियेले ओवी तसे अभंग
संसार व्यापुनीही जे राहिले निःसंग
ते संत पंढरीचे होते पुजेत दंग
ना जातीभेद त्यांना, भक्तीवरीच प्रीती ॥ १ ॥
सह्याद्रिच्या कड्याचा उत्तुंग ताठ माथा
त्याच्या कुशीतुनी ये तो मावळा मराठा
ठाऊक त्यास होत्या गुंफा नि आडवाटा
या मातिचाच होता त्यांच्या टिळा ललाटीं ॥ २ ॥
छुन् छुन् कधीं पदींचें ते नाचलेत चाळ
लावण्य लावणीचें खुललें इथें खुशाल
अन् थाप शाहिरांची घुमवी अजून बोल
मर्दास मर्द भिडला मिळवून हात हातीं ॥ ३ ॥

गोमांत-रुप-गौरी, सौंदर्य रोमरोमीं
पायीं समुद्र वेडा, दुर्गांत दिव्य लेणीं
भूमीवरी कला त्या गातें सुरेल गाणीं
पाहून तृप्त व्हावें शोभा नभांत रात्री ॥ ४ ॥

रत्नें कितिक आलीं जन्मास या ठिकाणीं
येथें समर्थ झाली ज्यांच्या मुखांत त्राणी
फाळांत नांगराच्या लक्ष्मी नि चक्रपाणी
ती भूमि धन्य, येथें उन्मेष नांदताती ॥ ५ ॥

## ५७. निर्धार

'पानफूल' १९७३ — सूर्यकांत खांडेकर

हिंदभूमिचे पाइक सारे एक करा निर्धार
शिवरायांची पुन्हा गाजवू पराक्रमी तलवार ! ॥ धृ० ॥

रणांगणाची करी घोषणा । मायभूमिच्या झटू रक्षणा ॥
तळहाती शिर घेऊन आम्ही प्राणपणें लढणार ! ॥ १ ॥

सह्याद्रीचे छावे आपण । लढता लढता करु प्राणार्पण ॥
निधड्या छातीवरती झेलू वज्राचे शत वार ! ॥ २ ॥

चला चेतवू पहाड पत्थर । दुष्ट शत्रुला देऊ टक्कर ॥
रिपुरक्ताने आज उजळुया भंवतीचा अंधार ! ॥ ३ ॥

शर्थ करूया पराक्रमाची । कीर्त गाजवू शिवरायांची ॥
सहर्ष टाकू पुढचे पाउल करीत जयजयकार ! ॥ ४ ॥

# ५५. श्री महाराष्ट्र गीत

'वाग्वैजयंती' राम गणेश गडकरी

मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा !
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ॥ धृ० ॥

राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा ।
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा ॥

अंजनकांचन करवंदीच्या कांटेरी देशा ।
बकुल फुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा ॥

भावभक्तिच्या देशा आणिक बुद्धिच्या देशा ।
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा ॥

ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी
नाचतें करीं ॥

जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासी वैराग्यासी ॥

जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ॥ १ ॥

अपर सिंधुच्या भव्य बांधवा ! महाराष्ट्र देशा ।
सह्याद्रिच्या सख्या ! जिवलगा ! महाराष्ट्र देशा ॥

पाषाणाच्या देहीं वरिसी तूं हिरव्या वेषा ।
गोदा, कृष्णा, भीमा तुझिया ललाटिंच्या रेषा ॥

तुझिया देहीं करी प्रतिष्ठा प्रथम प्राणांची ।
मंगल वसती जनस्थानिची श्रीरघुनाथांची ॥

ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी
नाचतें करीं ॥
जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासी वैराग्यासी ॥
जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ॥ २ ॥

भिन्न वृत्तिची भिन्न भिन्न हीं एक जीवसत्वें ।
तुझिया देहीं प्रकट दाविती दिव्य जीवतत्त्वें ॥
चित्पावन बुद्धिनें करिसी तूं कर्तबगारी ।
देशस्थाच्या खुल्या दिलाची तुजला दिलदारी ॥
कायस्थाचें इमान फिरवी रक्ताचा फेर ।
ठाक मराठी मनगट दावी तुझें हाडपेर ॥

ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी
नाचतें करीं ॥
जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासी वैराग्यासी ॥
जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ॥ ३ ॥

ठायीं ठायीं पांडवलेणीं सह्याद्रिपोटीं ।
किल्ले सत्तावीस बांधिले सह्याद्रीपाठीं ॥

तोरणगडचा, प्रतापगडचा, पन्हाळगडिचाहि ।
लढवय्या झुंझार डोंगरी तूंच सख्या पाही ॥
सिंधुदुर्ग हा, विजयदुर्ग हा, ही अंजनवेल ।
दर्यावर्दी मर्दुमकीची ग्वाही सांगेल ॥

ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरीं
नाचतें करीं ॥
जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासी वैराग्यासी ॥

जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ॥ ४ ॥

तुझ्या भुकेला वरी, नागली आणि कणीकोंडा ।
वहाण पायीं, अंगीं कांबळीं, उशाखालिं धोंडा ॥
विळा, कोयता धरी दिगंबर दख्खनचा हात ।
इकडे कर्नाटक हांसतसे, तिकडे गुजरात ॥
आणि मराठा भाला घेई दख्खन कंगाल ।
तिकडे इस्तंबूल थरारे, तिकडे बंगाल ॥

ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी
नाचतें करीं ॥
जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासी वैराग्यासी ॥

जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ॥ ५ ॥

रायगडावर माय जिवाची गवळण बिनधोक ।
झोंक हिरकणी नांव ठेवुनी जाइ रोखठोक ॥

करीत पावन अर्पुनि पंचप्राणांचा पिंड ।
हिरडस–मावळचा श्रीबाजी, ती पावनखिंड ॥

करी रायगड रायरीचा तो जिजाइचा तान्हा ।
कोंडाण्याचा करी सिंहगड मालुसरा तान्हा ॥

ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी
नाचतें करीं ॥

जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासी वैराग्यासी ॥

जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ॥ ६ ॥

रसवंतीच्या पहिल्या बाळा मुकुंदराजाला ।
पहिला वहिला अष्टांगांनी प्रणाम हा त्याला ॥

शहर पुण्याच्या, शिवनेरीच्या, पंढरिच्या देशा ।
पुंडलिकाच्या, शिवरायांच्या, टिळकांच्या देशा ॥

अनंत कोटी ग्रंथ रचुनिया जोडि तुझ्या नामा ।
वाल्मीकीचें शतकोटी यश विष्णुदास नामा ॥

ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी
नाचतें करीं ॥

जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासी वैराग्यासी ॥

जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ॥ ७ ॥

मयूर कवीच्या पूर्ण यमकमय महाराष्ट्र देशा ।
कवि कृष्णाच्या निर्यमका हे महाराष्ट्र देशा ॥

देवी ज्ञानेश्वरी करि जिथें भक्तीचा खेळ ।
तिथेंच गीतारहस्य बसवी बुद्धीचा मेळ ॥

जिथें रंगली साधीभोळी जनाइची गाणीं ।
तिथेंच खेळे श्रीपादांची कलावती वाणी ॥

ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी
नाचतें करीं ॥

जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासी वैराग्यासी ॥

जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ॥ ८ ॥

विकावयाला अमोल असलीं अभंगमय वाणी ।
करी तुझी बाजारपेठ तो देहूचा वाणी ॥

तुला जागवी ऐन पहांटें गवळी गोपाळ ।
धार दुधाची काढित काढित होनाजी बाळ ॥

मर्दानी इष्काचा प्याला तुझा भरायासी ।
उभा ठाकला सगनभाऊ हा शाहुनगरवासी ॥

ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी
नाचतें करीं ॥

जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासी वैराग्यासी ॥

जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ॥ ९ ॥

प्रभाकराची जडण घडण कडकडित म्हणायाला ।
दो हातांचा मुजरा माझा तुळशीरामाला ॥

भीमथडीवर चहुंमुलुखांवर फिरले धारकरी ।
भीमथडीवर चहुंमुलखांतुनि जमले वारकरी ॥

आळंदीच्या ज्ञानोबांची भिंत घेत धांव ।
पुंडलिकाचें नांव चालवी दगडाची नाव ॥

गोलघुमट घुमवीत मारखा नवलाची भाक ।
जेजूरीवरी चढी पायरी उभी नऊ लाख ॥

ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी
नाचतें करीं ॥

जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासी वैराग्यासी ॥

जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा ।
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ॥ १० ॥

(अपूर्ण)

# ५६. शौर्याची तव परंपरा

'महाराष्ट्राला मुजरा' १९५६ द. ना. गव्हाणकर

शौर्याची तव परंपरा ! महाराष्ट्रा वळुनि बघ जरा
शिवबाच्या कीर्तीचे झडति चौघडे
गडकिल्ले अजुनीही गाति पवाडे
दरि खोरे वीरकथा सांगे पठारा ॥ १ ॥

सिंहगडीं अमरपदीं ताना पहुडला
अन्याया तुडवित संताजि दौडला
आंग्र्यांनी जागविले अरबी सागरा ॥ २ ॥

चांदबिबी, लक्ष्मीनें खड्‌ग पेललें
तात्यानें समरावर वार झेलले
उमाजीनें डोंगरांत केला पुकारा ॥ ३ ॥

वासुदेव फडक्यांना फांस
लोकमान्य टिळकांचे सिंह गर्जले
सत्यास्तव ज्योतिबांनी केलें संगरा ॥ ४ ॥

परशराम, बाबु गेनू, वीर कोतवाल
छातीवर गोळी झेली हंसत बिंदुबाळ
बेचाळीस क्रांतीचा शूर सातारा ॥ ५ ॥

लाखोंनी देशास्तव अर्पियले प्राण
गाति कोयना, कृष्णा त्यांचें कीर्तिगान
सह्याद्री अभिमानें फुलवि पिसारा ॥ ६ ॥

## ५७. संयुक्त महाराष्ट्र येतसे पहा

'महाराष्ट्राला मुजरा' १९५६ द. ना. गव्हाणकर

संयुक्त-महाराष्ट्र येतसे पहा
कोटि कर उंचावुनी उभे रहा ॥ धृ०॥

अरबि सिंधुच्या तिरीं
सह्यगिरीच्या शिरीं
मराठीची ही नगरी
गोदा, कृष्णा वहाती सुवर्ण–प्रवाहा ॥ १ ॥

समतेचें छत्र शिरीं
सौख्याचा दंड करी
आणायास भूवरीं
माझा महाराष्ट्र गर्जा जयघोष हा ॥ २ ॥

उठवा गिरीकंदरा
जागवा चरां चरां
कांपवा दिगंतरां
खवळोनी सिंधुपरी रूप घ्या महा ॥ ३ ॥

मऱ्हाठे सर्व खडे
वाजवीत चौघडे
ध्वज त्यांचा फडफडे
उंच जावोनी नभास तो भिडे पहा ॥ ४ ॥

# ५८. जय महाराष्ट्र !

**'सोनेरी चांदणें' १९६१** **गिरीश**

जय जय जय हे महाराष्ट्र ! तूं भारतमुकुटीं हिरा !
मंगल, कणखर, उर्जस्वल, तूं मराठमोळा खरा ! ॥ धृ० ॥

परंपरा तव थोर पौरुषी गुणशौर्ये निर्मिली !
माय भवानी, माय मराठी सामर्थ्यें पूजिली !
पिढ्यापिढ्यांतुन एक मराठी वळण दिलें अंतरा ! ॥ १ ॥

पारतंत्र्य तुज कधीं न रुचलें ! बंडखोर तूं मनीं !
झुगारिल्या तूं रूढी, अपुल्या परंपरा राखुनी !
शिपाइबाणा सत्यशोधनीं बिलगे तुझिया स्वरा ! ॥ २ ॥

शककर्ते कुणि उदार यादव देवगिरी उभविती;
छत्रपतींचें 'गौरीशंकर शिखर' शोभतें किती !
बाजी–माधव तेजें उसळे सह्याद्रीचा दरा ! ॥ ३ ॥

महानुभावी ज्ञानेशाची रसवंती अमृता—
जिंकुन, निर्मी नामा, एका, कैवल्याची कथा !
समर्थ-तुकया-शाहीरांनी जिवंत केला चिरा ! ॥ ४ ॥

दमयंती–रुक्मिणी चमकल्या थोर तुझ्या कन्यका !
जिजा, अहल्या, उमा न करिती जन्म तुझा धन्य का ?
झांशीवाली लक्ष्मी पिउनी आग भूषवी धरा ! ॥ ५ ॥

अवदशेंतही रंगो बापू, प्रताप, नानासवें—
ज्वलंत फडके, वीर विनायक चेतविती आसवें !
फुले, रानडे, टिळक, गोखले, भीम सुधारकगिरा ! ॥ ६ ॥

कलाकुसर तव पहाडांतुनी राउळांत पसरली,
कैलासाचें अनुपम लेणें साक्ष देइ भूतलीं !
गाननर्तनी, चित्रकारांनी सजवियलें मंदिरा ! ॥ ७ ॥

वाग्वीरांनी आज ‘ तुतारी ’ प्राणस्वर फुंकिली,
डफ-वीणेवर ज्वलत् अस्मिता-गीतें तव गुंफिली !
अमोल उमळे स्वप्नाळूंच्या नववाणीचा झरा ! ॥ ८ ॥

मांगल्याची खाण शोधिली भावभक्तिने तुवां,
वारकऱ्यांचा धारकऱ्यांशीं तूच जोडिला दुवा !
प्रेरक होती शाळू, कपाशी, भात, गहूं, हरभरा ! ॥ ९ ॥

श्रमगंगा ही शेतकऱ्यांची वाहे काळींतूनी,
माय विनोबा डोळाभर ती बघती आनंदुनी !
महात्मतेच्या शिवशक्तीचा गुरु तूं, अन् मोहरा ! ॥ १० ॥

# ५९. महाराष्ट्र गीत

**‘ सोनेरी चांदणें ’** १९६१ **गिरीश**

जयजयकार तुझा नित गाऊं महाराष्ट्रभूमि !
संस्कृति अमुची तूंच, अस्मिता, ज्वलंत तूं उर्मी ! ॥ धृ० ॥

वारा फुलवी टपोरा दाणा,
आणि अंगिचा कणखर बाणा,
खपून काळीमधें मानितों सार्थक तें घामीं ! ॥ १ ॥

वारकऱ्यांची अभंग वाणी,
रसाळ जात्यावरली गाणीं,
डफावरी कडकडे लावणी घाटदार नामी ! ॥ २ ॥

उदात्त, सुंदर, सत्य अंतरीं,
ध्येय हिंदवी वदे वैखरी,
माय भवानी, माय मराठी पूजितसूं आम्हीं ! ॥ ३ ॥

माणुसकीस्तव खड्ग नि वाणी,
झुंझे सह्याद्रीचें पाणी !
शिवशक्तीनें सेवूं भारत, पुजुन तुज धामीं ! ॥ ४ ॥

## ६०. ये मंगल महाराष्ट्रा

'सोनेरी चांदणें' गिरीश

किरण नवे झळझळले ! गंध नवे दरवळले !
रंग नवे आकाशीं बहरूनिया चमचमले !
पुसट तारका नि चंद्र अजुन कसे रेंगळती ?
वैभव हें बघण्याला होतीं कीं मंदगतीं ?
रातराणि ही अजुनी फुलुन कशी मृदु डुलते ?
आम्रांतुन तव तोरण फांदीवर लवथवते !
निर्झरात झुळझुळते फेसांची पुष्परास !
कृष्णा-गोदादि जळें उधळतात का सुवास ?
सह्याद्री कां खुलला करुन उंच ताठ मान,
गड सारे अन् कोकिळ रविकिरणीं भरिति तान ? १

येइ महाराष्ट्रा, तूं तुजसाठीं हे फुलले !
कण कण नव चैतन्यें विश्व जुनें रसरसलें !
गतजन्मीं त्यागाचें गीत गात जो रमला–
भालाइत मावळांत, स्वर दरीत, तो घुमला ?

खेड्यांतिल या गडणी सिंहगडाहुन येती,
घेऊनि सौभाग्य करीं किरणांची पंचारति !
ही प्रतापगडिंच्या ये मंदिरिंची दीपकळी,
रायगडाहून जिजा– माता ही ओवाळी !
अन् कृष्णा घोडीवर जरिपटका फडकावित
गुरु- झेंड्यासह येती छत्रपती स्वागतार्थ ! २

आणि हात पालवीत उज्ज्वल दिव्येतिहास,
येती तरु-पर्णांतुनि मंगल फुलवीत हास !
वारकरी ये दिंडी, 'दासबोध' कुबडीसह;
ये 'अमात्यराजनीति' गौप्य कथित अंतर्वेह !
'राज्यव्यवहारकोश' ओतुनिया रत्नमणी,
बखरींतिल आर्त भाव सामोरा येइ क्षणीं !
आणि नद्यांतील जळें भारतीय, रायगडीं–
अभिषेकी गळलेलीं ताजिम द्यायास खडी !
घोष मधुर सनयांचे, डफ–वीणांचे दडले,
होऊनी ज्वलंत पुन्हां स्वागतार्थ हे उठले ! ३

राज्यनीतिमधिल 'चुका' लज्जित होउनी येती,
'कधीं न करूं अपशकून ! सत्य तेंच करुं' वदती !
आणि 'शत्रु परिवर्तुन आर्त भाव सांगतात,
नव महंत वदती की तरुणांना करुं महंत
म्यानांतिल तलवारी बोलतात भाव नवे–
'गंजु न ! परि वदती की, 'शांतीचे राज्य हवे !'
उद्योगी रमलेली देशदेशिचीं यंत्रें–
'मित्र म्हणा आम्हाला !' प्रेरिति या नव मंत्रें !

क्र. २५ ... २०/७/२०

आलीं श्रमसौंदर्ये आलिंगन तुज द्याया !
समृद्धी ये टोकित पाऊलें, तुज सुखवाया !—४

आणि 'भवानी आई' औक्षणार्थ ही आली,
स्नेहदीप किरणांनी ओवाळुन पुटपुटली,—
'सह्या-सम हो कणखर ठेवुन हृदयीं पाझर !
हिंदवी स्वराज्य करीं हें उदंड सुख निर्भर !'
माय मराठी मग ये हांसत निजगडणिसवें,
झेंड्यावर नाचवीत अमृताचे बोल नवे !
होउनिया रुद्धकंठ गहिवरली तुज पाहून !
आशीर्वच मूक वदे गळणाऱ्या अश्रूंतून,—
नांव 'महाराष्ट्र' करीं सार्थ, नवें युग पचवुन !
'माणुसकी धर्म नवा ! हेंच तुझें संजीवन !'

## ६१. प्रणाम घेई महाराष्ट्रा

'महाराष्ट्र गौरव गीते'—१९६० चारुशीला गुप्ते

शतजन्मींची तव पुण्याई आज फळा आली
प्रणाम घेई महाराष्ट्रा तूं या मंगलकालीं ॥ धृ० ॥

ओवी ज्ञानेशाची स्फुरली यशोगीत गाया
इंद्रायणीचे कुंभ भरोनी गेला श्रीतुकया
तुला अर्पिली जनाबाईनें वाकळ निज न्यारी
तुजसाठीं कबीरानें विणिले शेले जरतारी ॥ १ ॥

निळ्या डफावर थाप हाणुनी शाहिरी वाणी
मानवता रक्षाया गाई तेजस्वी गाणीं
मराठमोळ्या अभिमानाची ती दिव्य कहाणी
शिवरायाची अविरत सेवा सुफलित अजि झाली ॥ २ ॥

तळहातीं शिर घेउनि लढले मर्द मराठी जन
कितिकांनी तुजसाठीं दिधले प्राणांचें दान
तुझ्या कुशीचे तेज झळाळे अटकेच्या पार
भीमाथडीच्या वारूवरती होउनियां स्वार ॥ ३ ॥

तुझ्या पाठिशीं रक्षायाला सह्याद्री हा उभा
यशोपताका भिडवायाला जाई उंच नभा
तुझ्या कीर्तिच्या मांगल्याची पसरे नित द्वाही
डंका, नौबत झडे चौघडा सुरेल तशि सनई ॥ ४ ॥

भीमा, कृष्णा, गोदा, पूर्णा सुजला भाग्यवती
ललाटरेषा जणूं तुझ्या त्या सुफल तुला करिती
कविवर गाती तुझे पवाडे किति वैभवशाली
गोड मानुनी घेशिल का ही शब्दांची अंजली ? ॥ ५ ॥

## ६२. महाराष्ट्र गीत

'स्वातंत्र्यकवी गोविंद यांची कविता' १९४७ स्वातंत्र्यकवी 'गोविंद'
(गोविंद त्र्यंबक दरेकर)

आनंद-वन-भूमि ! गा वीर वर गान ।
देवी ! पुन्हां छान पूर्वीसमान ॥ धृ० ॥

दुर्गेपरी रूप धर कांतिसमान ।
चढुं देच स्फुरणास अवसान पूर्ण ॥ १ ॥

सह्याद्रिच्या शीर्षिं हो गानमान ।
जावो दणाणून हें हिंदुस्थान ॥ २ ॥

मर्दानि रागांत घे मर्द तान ।
वीररस सिंधूस चढुं दे तुफान ॥ ३ ॥

मर्दानि पदिं मांड थैमान छान ।
होवो पराधीन हैराण रान ॥ ४ ॥

तूं गान गाण्यास सामर्थ्यवान ।
हें गान गाईल तुजवीण कोण ॥ ५ ॥

हें गान गाऊन पूर्वीसमान ।
संरक्षि सन्मान मानाभिमान ॥ ६ ॥

निर्मून जनिं वीररस पुण्यवान ।
घाली यशोमान जनतेस स्नान ॥ ७ ॥

गा गान हें छान हें सुखनिधान ! ।
दे लोकदेवीस स्वातंत्र्यदान ॥ ८ ॥

गा गान हें ध्यान कीर्तिमान ! ।
कर राष्ट्र-लक्ष्मीस ऐश्वर्यवान ॥ ९ ॥

कल्याण गुणधाम गाऊन गान ।
हे वीर धीरांब ! दे एक दान ॥ १० ॥

दे दान तें जाण त्रैलोक्यत्राण ।
देवाधिदेवास जें स्वाधिष्ठान ॥ ११ ॥

शुभदान प्रियदान तें तेंच दान ।
दे देवि ! बलदान दे शौर्यदान ॥ १२ ॥

गा गान राष्ट्रास कर चिर महान ।
तूज रामदासाचि शिवबाची आण ॥ १३ ॥

# ६३. महाराष्ट्र देशास

'भारत काव्यसंग्रह' १९६१ गोविंदतनय (चिं.गो.कुळकर्णी)
(कोगनोळीकर) – कल्याण

सह्यगिरीच्या शिवरायाच्या महाराष्ट्र देशा
वंदन करतो परममंगला वीरांच्या देशा
यवनांचे ते परवशतेचे पाश तुझे शीरीं
समरपथावर स्वातंत्र्याला झुंझत समशेरी — १

संत तुकोबा, रामदास हे महाराष्ट्र संत
स्वातंत्र्याचा शिवरायाला देत महामंत्र
वीर मावळा स्वातंत्र्याला समरपथीं लढला
छत्रपती श्री शिवरायाच्या वंदू पदकमलां — २

तोरण पहिलें शिवरायाचें विशाल सिंहगडा
शिवनेरीवर, रायगडावर फडफडला झेंडा
भीमा, भामा, गोदा, कृष्णा पवित्र त्या क्षेत्रीं
पैठण, पंढरपूर, आळंदी, देहू, चाफळ ती — ३

महाराष्ट्राचा भगवा झेंडा अटकेवर डुलला
तिरंगी झेंडा भारतभूचा घेतो हिंदोला
ऐक्यपथाचा मंगल घट हो महाराष्ट्र देशा
यशवंतांचा यशोवान घे प्रणाम परमेशा — ४

## ६४. त्रिभंगलेला अभंग झाला

'महाराष्ट्र गौरव गीते' विद्याधर गोखले

त्रिभंगलेला अभंग झाला तुकयाचा मंगल देश
महा-राष्ट्र धर्माचा पुनरपि घुमविल जगतीं संदेश ॥ धृ० ॥

बहुत दिनांचें स्वप्न आजला बहुतांशीं हो साकार ।
जनता शिव-शक्तीचा गाजे आज नभीं जयजयकार ॥
अखिल मराठा एक जाहला, नुरला वैफल्याचा लेश ।
त्रिभंगलेला अभंग झाला तुकयाचा मंगल देश ॥ १ ॥

सातपुड्याचा जटा-मुकुट तो शिरीं जयाच्या शोभतसे ।
सह्यगिरी कोदंड वीरवर दक्षिण करिं तो धरीतसे, ॥
घनश्याम त्या श्रीरामाचा आज संपला वनवास ।
त्रिभंगलेला अभंग झाला तुकयाचा मंगल देश ॥ २ ॥

आज विघटना-पाशांमधुनी मुक्त-जाहला वनराज ! ।
नव तेजें हा पुनः चमकतो भारतभूचा शिरताज ! ॥
सिंधू-सागर विशालतेचा करितो याच्या उद्घोष ।
त्रिभंगलेला अभंग झाला तुकयाचा मंगल देश ॥ ३ ॥

भारतवर्षासाठीं ज्यानें सदैव अग्रेसर बनुनी ।
निजरुधिराचे मळवट भरुनी केली धरणी सुहासिनी, ॥
प्रदेश तो हा-शिवरायाचा-वीरश्रीचा उन्मेष ।
त्रिभंगलेला अभंग झाला तुकयाचा मंगल देश ॥ ४ ॥

करितां ह्याचें सह्य-केसरी असह्य गर्जित रोषानें ।
अन्यायाचें मदांध कुंजर थरथरती भयभीतीनें ॥
झुंजारांचा असा देश हा, आज गर्जतो सावेश ।
त्रिभंगलेला अभंग झाला तुकयाचा मंगल देश ॥ ५ ॥

शूर मराठी नरवीराचें व्यर्थ न झालें बलिदान।
आज लाभलें या देशाला अभंगतेचें वरदान ॥
पाठीराखा सदैव याचा भक्तपरायण परमेश।
त्रिभंगलेला अभंग झाला तुकयाचा मंगल देश ॥ ६ ॥

रक्त-पिपासू तक्षक सुत हो! जनमेजय हा दक्ष असे।
समानतेचें स्वतंत्रतेचें पूजन हा नित करीतसे ॥
सिद्ध असे हा तनमनपूर्वक सद्धर्माच्या सेवेस।
त्रिभंगलेला अभंग झाला तुकयाचा मंगल देश ॥ ७ ॥

उज्ज्वल याची परंपरा ती, उजळचि याचें भवितव्य!।
नव्या युगांतहि भगवा झेंडा धरील हातीं हा भव्य ॥
विक्रम-वैराग्याचा पाळिल संतांचा हा उपदेश।
त्रिभंगलेला अभंग झाला तुकयाचा मंगल देश ॥ ८ ॥

## ६५. श्रीमहाराष्ट्र गौरव गीत

'महाराष्ट्र गौरव गीते' मधुमालती गोडबोले

मंगलमय महाराष्ट्रा घेई वंदना
गौरव-गित गावयास स्फूर्ति दे मना ॥ धृ० ॥

वेदमंत्र पावन तव हृदयीं कोरले।
तीर्थक्षेत्र मायभूमि धन्य जाहले।
भाषेची सेवा करी ज्ञानदेव हा।
साहित्याची भीमा वाहते अहा।
भक्तवृंद काव्याची देत चेतना ॥ १ ॥

सनातनीं धर्माची दिव्य मंदिरे ।
संस्कृतीची परंपरा पूज्यही ठरे ।
भक्त-भाव सात्त्विक अन् तेज आगळें
अभंगांत संतांच्या प्रेमही मिळे ।
मराठिचा अभिमानही मोद दे मना ॥ २ ॥

भगवा ध्वज उंच नभीं डुले पाहतां ।
शिवबाची आठवते राष्ट्रऐक्यता ।
बाजीप्रभू, खंडोजी, धना, तान्हबा ।
शूर-वीर मावळे नि शूर रायबा ।
खड्‌गतेज लाजवितें शत्रूच्या मना ॥ ३ ॥

महाराष्ट्रीय वृत्तींतून चेतना मिळे ।
देशास्तव केसरीत टिळक गर्जले ।
देशभक्त-मुक्तीस्तव प्राण अर्पिता ।
भारतास लाभली सुखें स्वराज्यता ।
वीरांच्या कार्यांतुन मिळे प्रेरणा ॥ ४ ॥

हिरकणीसम शूर स्त्रिया, वीर जाहले ।
कवि-लेखक विद्वान् महर्षि भले ।
शिल्पकार, शाहीर अन् न्यायमूर्ति जे ।
कलाकार कीर्तिरूपें अमर होत जे ।
मुदित मनें गातें जग स्तुति गायना ॥ ५ ॥

सृष्टि करी कृपावृष्टी सतत तुजवरी ।
सुजल सुफल करुनी तुला धन्य ती करी ।
सह्य-गिरी रक्षितसे मायभूमिला ।
समाधान लाभतसे सदा कृषिवला ।
मोत्यांची रास देई हर्षता जना ॥ ६ ॥

मातेहुनी स्वर्ग फिका हेंच ऐकिलें ।
कष्ट करुनी 'मंगल कलशा'स आणिलें ।
गृहिणी त्या जन्म घेत ह्याच भूवरी ।
थोरांना जन्म देत धन्य त्या तरी ।
देशाचा प्राण तूंच पुण्य पावना ॥ ७ ॥

यशमंदिरीं मूर्ति तुझी, गात चौघडे ।
भारतीय पुजती तुज नित्य सांकडे ।
स्तुति-सुमनें वाहतील भक्तीने तुला ।
ओवाळीत पंचप्राण तुंच निस्तुला ।
महाराष्ट्रा ! घेई आतां मानवंदना ॥ ८ ॥

## ६६. महाराष्ट्र दिन

'तरंग' १९७७ — म. न. घाटुर्ले

मराठ भू ही माझी माझा देश हा
याच दिनी राखण्या शपथ वाहा.

रवी प्रकाश कीं, भगवा चढला
कीं नभीं महाराष्ट्र दिन मानीला
पांखरें कांहो गेली जाना पुर्वेला
की धरेने खगरुपी वर्षाव फुलांचा केला
भाट गात असे बघा महाराष्ट्र हा.

लोपला भगवा फुलांच्या राशींनी
उडे गुल, मेघमाला रवी जनी
स्टेज वरी भानू शांत गलबला
मित्रहो ऐका महाराष्ट्र कितीला
मरीना दुरी इतिहास पहा.

संत ज्ञानेश्वर दास तुका विर
लोकमान्य शिवाजी देजना धीर
सह्याद्रि आखाडा मराठी मल्लांचा
अटकेवर झेंडा चढला त्यांचा
कडा गरजी हरहर महादेवा.

ज्वारी तुरी गहू वाटाना गळीत
फुले फळे ऋतू ही नाना मिळत
सरी अमृत देई नव जीवन
डोंगर दरी पशू पक्षी वसन
निंब बाभूळ असती नाना दवा.

संत विर पंडीत माहेर घर
संकटी पडती सर्व घरा बाहेर
हो टाळ ढोल अभंग वीणा धरी
बॉंब चौघडा गिते बंदूक धारी
प्रगतीत अग्रेसर मराठा विर हा.

प्रभूमाया कधी उन्ह कधी छाया
लोपले गुण ना मिळे अन्न खाया
सोडूनी प्रयत्न बनले आळशी
राख मराठ्या इतिहासात मिशी
चांद एक दिनी पूर्ण होतो पहा.

नाना तऱ्हे रवी देवूनी भाषण
जागृत ते केले निद्रित पाषाण
भाषणा तरू पर्णांनी दिली टाळी
पोचवो पश्चिमी या पुढल्या काळी
शेंदरी रुमाल दावी सौख्ये रहा.

# ६७. महाराष्ट्रा !

'नाथ घाणेकर समग्र कविता' खंड १-१९४२   नाथ घाणेकर

महाराष्ट्रा, राष्ट्रा सकल असती तूं शिकविता
तुझ्या मागें मागें जन अखिल येता निरखितां
प्रमोदाचें येतें हृदयिं भरतें तेंच कवनीं
वरी दृश्यत्वा कीं सममुदित हो बंधु भगिनी—१

महाराष्ट्रीं नाही वद कवण आपत् प्रबलिनी ?
असे दारिद्र्याची खनि न उपमा जीस भुवनीं !
असंख्या व्याधींचें प्रिय सदन हा देश अमुचा
दिला देवें आम्हां वर जणुं दुहीचा सततचा ! —२

प्रकोपा भूपाचे प्रिय गमुनि ही भू सतत तो
मुदें नांदें येथें, सदन जणुं हें स्वीय करितो !
पयोदेंही भूपा अनुसरुनि कोपासि धरितां
निमाली येथोनी सकल धनधान्य प्रचुरता —३

अम्ही आर्यावर्ती प्रबलतम राजे मिरविलों !
अतां आपत्तीच्या गुरुतम गुहेमाजिं पडलों !
अम्हां आर्यावर्ते नमुनि करभारें विनविलें !
अतां आम्ही आहों पिचत परदास्यांत दुबळे—४

परी आपद्देहीं जनन वरि संपद् नियम हा;
इथें राष्ट्रोद्धर्ता प्रथम उगवे माधव पहा !
शिरे सेवाधर्मी, परि न गमवी स्वत्त्व अपुलें;
तयें आर्यावर्ता नव विविध चैतन्य दिधलें ! —५

मराठीचा वाली, समरिं शिवबा, लेखनि तसा
स्वराष्ट्रा, शक्तीचा अचुक पटवीला भरवसा।
जया 'स्वातंत्र्याचा अरुण' पदवी शोभत खरी;
असा विष्णू बाल्यीं बघत हत दैवें यमपुरी! —६

तसा मृत्यू नेई नव उदित त्या आगरकरा
सदा ज्याची रूढी-हननिं विलसे लेखनिं, गिरा,
म्हणे 'त्याज्या रूढी हतकपरसत्ता-भगिनी ही;
इचें ठायीं नांदे भयरहित ती घातुक दुही.'—७

समस्तां विद्यांचा प्रिय सुहृद, पावित्र्य तनुभृत्,
धृतीचा शौर्याचा मुकुटमणि, तत्त्वज्ञ, नयविद्,
अमोघा यद्वाणी, हृदय हलवी लेखनिबलें,
अशा बाला सम्राट पदवि जनतासंमत मिळे! —८

स्वतां त्यागी, त्यागी तरुणगण निर्मी श्रमभुजी,
करी वाक्सामर्थ्यें स्ववश जन गोपाल सहजीं,
तया नीतिज्ञाचें प्रबल दरबारी भय शिरे,
मराठा हा येतां कुटिलमति मंत्री मनिं वरे! —९

करी वैधव्यानें हतबल, सजीवा गतधवा
स्त्रियां विद्या-भूषा चढवि, मनु निर्मी जणुं नवा,
पहा कर्वे शिष्या मिळवुनि सुविद्या अभिनवा,
कुमारी राष्ट्रार्थ श्रमति, सधवा, तेंवि विधवा! —१०

कुविद्येनें झालें मलिन मन, ना स्वत्त्व उरलें,
परस्थांचें जें जें-अधमहि-अम्हां सेव्य गमलें,
म्हणोनी जो विद्या वितरि हितकारी सकलिकां
महाराष्ट्रा भूषा गमत न विजापूरकर का? —११

महाराष्ट्रा, तुझें गतविभव जो सत्य, सकल
यथार्थत्वें गातां मिळत तुज सत्कीर्ति अढळ,
अगाध-ज्ञानी जो गुरु गमतसे पंडितवरां,
सदाचारी विद्याव्यसनि विष्णुभाऊ ऋषि खरा.—१२

धनातें, मानातें भुलुनि परधर्मांत शिरती,
न तेथें सन्मान, द्रविण न, न नष्टा अवनति,
स्वधर्मद्रोहाचें अघ अमित येतें परि शिरीं !
अशा संत्रस्तांचें अवन करि हिंदू मिशनरी !—१३

तसा अस्पृश्यांना जवळ करुनी, त्या शिकवुनी,
स्वधर्मी दे त्यांना धन, सुख, सुकीर्ती मिळवुनी,
स्वधर्मासक्तांचें दल नव उभारी प्रबल तो,
परस्थांच्या शिंदे मिशनरि गणांना नमवितो !—१४

नसे पाश्चात्यांचें धन लव, न पाश्चात्य गुरु वा,
स्वराष्ट्रा दावोनी परि पथ धनाकर्षक नवा,
स्वकीया उद्योगव्यसनरत किर्लोस्कर करी;
स्थिरावें कीं येथें धन, पर हरी जें अजवरी !—१५

तशा ख्याता लोकीं नर सम महाराष्ट्रमहिला
यशें आनंदीच्या वद कवण ना देश भरिला ?
रमेनें नाथाचें व्रत न पडतां खंड वरिलें,
धडे कर्तृत्वाचे अधन अबलांना शिकविले !—१६

महाराष्ट्रा, तूझी समरपटुता, नीतिपटुता,
जगीं गाजे; त्यांचें फल न परि येतें मिळवितां;
रुचावें तें केवी विजयि इतिहासास अपुलें
शिवाची, दासाची शिकवण, तरी तूं, अनुसरे—१७

भवानी त्या सेव्या, धृति, बल तदाशीर्वचन दे,
तियेच्या आधाराविण न पडती बाहिर पदें,
मरूं धर्मासाठीं, म्हणत शिवधर्मा न करूं,
स्वधर्माची शक्ति प्रकटवुनि हे दुर्दिन हरूं—१८

प्रभूतें, धर्मातें शरण रिघुनी मानव जरी
स्वकर्तव्यां धैर्यें करित जय कीं निश्चित करीं,
चरित्रीं दासाचें गुज दिसत हें बिंबित पुरें,
जयश्रींचें त्यांच्या प्रबलतम हें साधन खरें—१९

‘असो माझे ठायीं तव परम विश्वास तुज कीं
नको भीती; चिंता तव करिन मी होशिल सुखी,’
असे गीताग्रंथीं यदुकुलवराश्वासन जगा
महाराष्ट्रा, त्याचा वर न वरिसी; धांवसि उगा.—२०

‘स्वराज्य’, ‘स्वातंत्र्य’ प्रबलतम हे शब्द दिसती
न ते आम्हां स्फूर्ती चिर, अजित देऊंच शकती
परी धर्मापायीं त्यजुं हंसत सर्वस्व अपुलें
महाराष्ट्रा, तूंही त्यजुनि असु धर्मा जगविलें—२१

शिवें, राजारामें, स्वजनिं सृजिली संहति कशी
‘मरूं सारूं मागें, सरूं न परि, हा बावनकशी
कसा बाणा आला ? सबल दुसरा साह्य नसतां
जगज्जेता शत्रू रणिं नमविला केविं पुरता !—२२

स्वधर्मप्रेमानें अतुल करणी, गाढ करणी
तयीं केली; त्यांचे तनुज तरि तन्मार्ग धरुनी
न कां आम्ही झेंडा विजयि मिरवावा फिरुनि तो
महाराष्ट्रा ! पाहीं दुरुनि तुजला तो खुणवितो—२३

महाराष्ट्रा ! आतां पथ न पटला पूर्विल तुला
तरी पंथा अन्या कवणहि वरी; राहि न लुला
विपद्ग्रस्ता तूझी बघुनि करणी चित्त रमतें
परी त्वत्कार्यातें यश न दिसतां तेंच खचतें —२४

पुन्हां ऐक्यें सारे सुगुण अपुले एकत्रटुनी
बलाचें, बुद्धीचें प्रखरपण दावी प्रगटुनी
तुझें आर्यावर्तीं प्रमुखपण बा ! मान्य सकलां
झणीं स्वातंत्र्यानें नटवि, सुखवी 'हिंद-महि' ला.—२५

## ६८. असे काय ही ती महाराष्ट्रभूमि !

'नवकुसुममाला' १९०७ — मल्हार खंडेराव चिटणीस

अहो ! रामदासें जिला उद्धरीलें,
शिवाजीनृपानें जिला तारियेलें;
जगीं जाहली जी खरी धन्यभूमि,
असे काय ही ती महाराष्ट्रभूमि !—१

जिथें जाहले साधु ते पुण्यशील,
जिथें लोक होते सदा धर्मशील;
जगीं जाहली जी खरी धर्मभूमि,
असे काय ही ती महाराष्ट्रभूमि !—२

जिथें पुण्यकारी स्वधर्माभिमान,
जिथें मूर्तिमंत स्वदेशाभिमान;
जगीं जाहली जी खरी पूज्यभूमि,
असे काय ही ती महाराष्ट्रभूमि !—३

प्रजापालनीं दक्ष ते येथ भूप,
जनां तेधवां सौख्य झालें अमूप;
जगीं जाहली जी खरी सौख्यभूमि,
असे काय ही ती महाराष्ट्रभूमि !—४

जिथें जाहल्या त्या स्त्रिया वीरमाता,
जिथें जाहल्या त्या स्त्रिया वीरकांता;
जगीं जाहली जी खरी वीरभूमि,
असे काय ही ती महाराष्ट्रभूमि !—५

जिथें लोकनेते स्वकर्तव्यदक्ष,
जयांचें सदा राष्ट्रकार्यीच लक्ष;
जगीं जाहली जी खरी कार्यभूमि,
असे काय ही ती महाराष्ट्रभूमि !—६

जिथें देशकल्याण हा हेतु पुण्य,
धरोनी मनीं वर्तले लोकमान्य;
जगीं जाहली जी खरी पुण्यभूमि,
असे काय ही ती महाराष्ट्रभूमि !—७

जिथें लोकचित्तीं नसे स्वार्थबुद्धि,
जिथें होय ती देश-सत्कार्य सिद्धि;
जगीं जाहली जी खरी श्रेष्ठभूमि,
असे काय ही ती महाराष्ट्रभूमि !—८

चढे संकटीं धैर्य तें लोकचित्तीं,
जिथें वाटली मृत्युचीही न भीति;
जगीं जाहली जी खरी धैर्यभूमि,
असे काय ही ती महाराष्ट्रभूमि !—९

जिथें देशशत्रु स्वशत्रूसमान,
जनीं मानुनी नष्ट केलेचि तूर्ण;
जगीं जाहली जी खरी शुद्धभूमि,
असे काय ही ती महाराष्ट्रभूमि !—१०

जरी वर्ण नाना तरी ऐक्यभाव,
जिथें राष्ट्रकार्यार्थ होता सदैव;
जगीं जाहली जी खरी ऐक्यभूमि,
असे काय ही ती महाराष्ट्रभूमि !—११

जिथें मातृ-भू-भक्ति होती अलोट,
जनीं शूर कृत्येंहि केली अचाट;
जगीं जाहली जी खरी कीर्तिभूमि,
असे काय ही ती महाराष्ट्रभूमि !—१२

जिथें पूर्वजांच्या महावैभवातें,
स्मरोनी जनीं दाविलें विक्रमातें;
जगीं जाहली जी खरी शौर्यभूमि,
असे काय ही ती महाराष्ट्रभूमि !—१३

प्रयत्नें बलें होउनी दास्यमुक्त,
जनीं स्थापिलें राज्यविख्यात जेथ,
जगीं जाहली जी खरी भाग्यभूमि,
असे काय ही ती महाराष्ट्रभूमि—१४

अशी धन्यभूमि, अशी धर्मभूमि,
अशी पूज्यभूमि, अशी सौख्यभूमि;
अशी वीरभूमि, अशी कार्यभूमि,
अशी पुण्यभूमि, अशी श्रेष्ठभूमि—१५

अशी धैर्यभूमि, अशी शुद्धभूमि,
अशी ऐक्यभूमि, अशी कीर्तिभूमि,
अशी शौर्यभूमि, अशी भाग्यभूमि,
असे काय ही ती महाराष्ट्रभूमि !—१६

ऐकोनि हें सर्व विषाद होई,
तरीहि चित्तीं बहु धीर येई;
जाई निशा, येईल सुप्रभात,
हा चक्रनेमिक्रम या जगांत !—१७

## ६९. माझा महाराष्ट्र देश

'चाहूल' २९-११-५२ अ. र. चिचाळकर

परम पुण्यपावन माझा महाराष्ट्र देश ।
यशोगान करितां थकला अमितजिव्ह शेष ॥ धृ० ॥

मूर्तिमंत वैराग्याचे थोर साधुसंत
वाढवोनि केला ज्यांनी मान्य भक्तिपंथ
जिथें भक्तिभावा भुलुनी उभा द्वारकेश ॥ १ ॥

लढुनि 'भूमिकन्या' केली मुक्त राघवानें
लढुनि मुक्त केली 'भूमी' श्री शिवप्रभूंनें !
पहातांचि ज्याला लोपें दशदिशीं अपेश ॥ २ ॥

धर्म आणि देशासाठीं मरावें-तरावें,
तत्त्व मूर्त ज्यांना वाटे अंतरीं धरावें
इथें जन्म घ्यावा त्यांनी वर्म हें विशेष ॥ ३ ॥

'आज' दैन्य भाळीं लिहिलें नका खेद मानूं !
'उद्या' व्हावयाचा आहे उदित भाग्यभानू !
अंतरांत म्हणुनी याचा सांठवा सुवेष ॥ ४ ॥

## ७०. यावे नव महाराष्ट्रा

'सोपानदेवी' सोपानदेव चौधरी

यावे यावे महाभागा नवमहाराष्ट्र देशा
उधळितो तुजवरी माझ्या फुटलेल्या आशा. १
तुझ्यासाठी जे लढले तया मुजरा मानाने
भावभक्तीने आजच्या हुतात्म्यांना ही वंदने. २
झाला सह्याद्री जागृत आता, झाले सर्व जागे
अहो, मुका सातपुडा, तोहि आज बोलू लागे. ३
जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र तुझें नांव
जयघोषी निनादाने हर हर महादेव.। ४
उधळीतो तुजवरी तुझ्या दिव्य इतिहासा
आज मागतो भंडारा भावी कर्तव्याच्या आशा. ५
आज आम्ही आत्मबले अंगातल्या शक्तीबले
उधळीतो तुजवरी कोटीजनांचे जिव्हाळे. ६
जरी आज काही भक्त केले विभक्त येथले
आणू तया ओढूनिया, करू पुन्हां तुझ्यातले. ७
ध्याऊ ज्ञानाचा तो वेद कर्मयोगाच्या संवादी
घेऊ विज्ञानाचा वेध आम्ही महाराष्ट्रवादी. ८
हिणवोत कुणी आम्हां, यांची वृत्ती संकुचित
अहो, काय तयां ठावे, त्यात विकासाचे व्रत. ९

संकोचातला विकास येथे होतो विश्वंभर
माझ्या ज्ञानेशाने केले विश्व हेच माझे घर. १०
भगवंतमय असा माझा भागवत धर्म
जय जगताचे त्यात येऊनिया गेले मर्म. ११
भारताच्या संरक्षणी धाव घ्यावया तातडी
परंपराच आमुची, घेऊ पहिल्याने उडी. १२
यावे यावे नवयुगी महाराष्ट्र देशा
पूर्ण होईल नव्याने तुझा पूर्ण नकाशा. १३
आज स्वतंत्र भारती लोकशाहीच्या कारणे
उधळीतो तुजवरी नवा जोम, नवी मने. १४
नका भिऊ मराठ्याला, इथे न्यारीच प्रचीती
अहो, आमुच्या भीतीने जगा शिकवीली प्रीती. १५
आम्ही मारू त्यासी तारू, देऊ चैतन्य जीवनी
संतयोगी महात्म्यांनी दिली आम्हा संजीवनी. १६
केला साक्षात् देव उभा, ऐसे संत शिरोमणी
तैसे झाले मृत्युंजय येथे वीर चूडामणी. १७
इथे स्वातंत्र्याचा जन्म, इथे स्वातंत्र्याच्या वाटा
वाट कैशी ती चुकावी, चुकूनीया म्हणू नका. १८
मायमाऊल्या नद्याही इथे उगम पावती
धनधान्याचा तो साठा परप्रांतांलागीं देती. १९
आम्ही त्यागाचे मिराशी, भोग येथे उणा आहे
खावी श्रमाची भाकरी, आत्मतुष्टी बाणा आहे. २०
इथे भाव हाच देव, कष्ट हेच खरे सोने
आहे आराम हराम; तत्त्व झाले येथे जुने. २१

महाराष्ट्र माझा धर्म, देव माझा महादेव
लघुत्वाला नाही जागा, महाराष्ट्र माझें नांव. २२
भारतासी संरक्षाया सैन्ये झाली येथे स्वार
बंडे पुकारीता नेले झेंडे अटकेच्या पार. २३
अहो, याचा इतिहास, राष्ट्रवृक्षाची ती मुळे
त्याच्यावरीच ती पोसली संस्कृतीची फुलेफळे. २४
नांवामधे काय आहे? देवो अशी कुणी ग्वाही
माझी मराठी सांगते, नांवामधे काय नाही? २५
नामशेष करावया कैक आले कैक गेले
मात करणारे अंती इथे मातीत मिळाले. २६
राज्यावरी गेली राज्ये, कैक नकाशे फाटले
तरी मराठे हे ताठ, कधी मागे ना हटले. २७
आज नव्याने सांगतो, दृढ माझा भक्तीभाव
लोकशाही माझी आई, महाराष्ट्र माझे नांव. २८

## ७१. उद्याचा नवा महाराष्ट्र

'सोपानदेवी' सोपानदेव चौधरी

उद्याचा नवा महाराष्ट्र ऐसा हवा.
नव्या अंकुरासवे फुटाव्या
तोडलेल्या शाखा, आणखी भराने
व्हावी उज्ज्वल इतिहासाची पाने
जावोत खोल मुळे लक्ष लक्ष
बहरावा असा महाराष्ट्र वृक्ष

या बहराला तेज चढावे
मराठी मातीमधले !
याचे बी-बियाणे आहे तेजाचे
असा हा याचा विकास
भारताला प्रकाश व्हावा
उद्याचा नवा महाराष्ट्र ऐसा हवा ! १

सह्याद्रीची सहनशीलता
कृष्णा-गोदेची सृजनशक्ती
चंद्रभागेची भागवत भक्ती
महाराष्ट्राच्या नव्या कहाणीला
इंद्रायणीची वाणी स्फुरावी
दगडांचा देश दगडांचाच असावा
परी दगडांखाली पाणी झरावे
शिवप्रभूच्या पदस्पर्शित
भाग्यवंत दगडांतून
शिलाजीत पाझरावे
भले कुणीही करोत हेवा
उद्याचा नवा महाराष्ट्र ऐसा हवा ! २

पक्षीयांचा पक्ष असो कोणताही
वक्ष त्याचे हवे मराठबाण्याचे
अंतरी असावे महाराष्ट्रवादी
इथे मानव्याची तमा आहे
पण अन्यायाला क्षमा नाही
आम्ही लोकशाहीचे पुजारी
जुलूमशाहीचे मारेकरी

इथे अहिंसेसाठी हिंसा
हाच बोध घ्यावा
सत्य शोधण्यासाठी सदा असावा
छत्रपतींचा गनिमी कावा
उद्याचा नवा महाराष्ट्र ऐसा हवा ! ३

या स्वतंत्र भारतात
कमरेची तरवार गेली
आता फक्त सुरवार राहिली
युद्धाची सरली भाषा
आता एकच ही अभिलाषा
हृदयस्थ नारायण जगविण्यासाठी
असावी प्रत्येकाच्या घरी
गाथा अन् ज्ञानेश्वरी !
अंधश्रद्धेचा वेंधळेपणा झडावा
एक मौलिक बदल घडावा
पांडुरंग-रखुमाईसवे
घ्यावे नाम हेही
स्वातंत्र्य अन् लोकशाही
भक्ती आणि शक्तीचा
असा जुळावा दुवा
उद्याचा नवा महाराष्ट्र ऐसा हवा ! ४

हे यंत्रयुग, हे यंत्रयुग !
यंत्राने लावला लळा
परंतु त्याने कापू नये माणसाचा गळा

ज्ञानावरी विज्ञानाने केली मात
विज्ञानाने हात द्यावा, घात करू नये
गिरणीत यंत्र भलेही चालो
परंतु रस्त्याने भिकारी
चालताना दिसू नये
असा हा समन्वय हवा
उद्याचा नवा महाराष्ट्र ऐसा हवा ! ५

आम्ही माणसांचे भुकेले
आमचा कापूस वस्त्र बनो सकलांसाठी
हापूस लागो सकलांच्या ओठी
पिकला गहू हरभरा
पुरून उरावा इतरांसाठी
धान्यकोठारे खुली असावी
दामांसहित दामाजीच्या उदारतेने
यातच रामराज्याचे दर्शन घडावे
भरतप्रेमी अन् भारतप्रेमी बंधुत्वाचे नाते
परप्रांतियांशी जडावे
'जय भारत' जयघोषातुनि
'जय महाराष्ट्र' प्रतिध्वनी उठावा
उद्याचा नवा महाराष्ट्र ऐसा असावा ! ६

# ७२. महाराष्ट्र गीत

'सोपानदेवी' सोपानदेव चौधरी

जय जय महाराष्ट्र
जय महाराष्ट्र माझा.
मराठवाडा विदर्भ आणि
कान्हदेशचे शेतमळे
गोमांतक नंदनवन माझे
कोंकण फुलवी फुलेफळे
तापी-पूर्णा, गोदा, कृष्णा
इंद्रायणी आणिक भीमा
जीवन अर्पित पुढे चालल्या
देशबांधवांच्या कामा
मायमाउल्या गिरिजा.
सह्याद्रीच्या लिपीत लिहिला
वीरश्रीचा इतिहास
पूज्यसमाधी-विरामचिन्हे
संतजनांचा सहवास
शौर्य-धैर्य-त्यागाने ज्यांच्या
भूषविले तुझिया विभवा
शक्ती आणि भक्ती यांचा
इथेच जुळला खरा दुवा
हीच प्रभूची पूजा.
सचेतनासी द्याया मसलत
अचेतनाला फुटे गिरा

मराठमोळ्या तुला सांगतो
रायगडाचा चिराचिरा
इथे पताका आणि भाला
ताल मृदंगी ढाल चढे
वारकऱ्याचा धारकरी हो
रक्ताचे शिंपुनी सडे
जय महाराष्ट्र गर्जा.

ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकया,
समर्थ, संतांची माला
मानवतेचे बीज रोवुनी
सदा जागविती आम्हांला
वंद्य शिवाजी पहिले बाजी
लोकमान्य ऐसे वीर
स्वातंत्र्याचा मंत्र देउनी
केला ज्यांनी संचार
दाऊनिया निजतेजा.

संकट येता लढलो आम्ही
धाव घेत उत्तरेकडे
भारतदेशा संरक्षाया
सैन्य आमुचे सदा खडे
परंपरेने देत अम्हांला
शक्ती आणि वेदना धडे
करात कर घालुनी चालल्या
बुद्धि आणि भावना पुढे
उघड हृदय दरवाजा !

# ७३. क्रान्ति

'सोपानदेवी' सोपानदेव चौधरी

क्रान्ति स्फुरते सह्यगिरीवर
क्रान्ति धुमसते शैलशिखावर !
मराठबाण्याचे बाण घेउनी
स्वातंत्र्याची ज्योत पाजळीत
विंध्याद्रिवरूनी
हरहर महादेव गर्जत
सिंधु-गंगा-यमुनेच्या स्पर्शाने
उत्क्रांत होऊन जाते
उत्तरेकडे संचार करीत
हा नररत्नांचा देश
यात संतांचे संदेश आहेत
योगियांचे आदेश आहेत
ज्ञानेश-तुकयाची भक्ती आहे
समर्थांची युक्ती अन्
शिवछत्रपतींची शक्ती आहे
आशा-आकांक्षांना आई भवानी
त्याग आहुतींनी तोलते आहे—
मराठ्यांच्या यशाची यशवंती
आत्मानंदात डोलते आहे
तिच्या भरलेल्या नयनात
भारताची बाहुली नाचते आहे

अरे, आजच्या प्रखर उन्हांत
उद्याची सावली दिसते आहे
सागरतळीच्या
वडवानलाचे मनोगत
मार्सेलिस बंदरावर
बाहुबलाने तरले गेले
नभोमंडळाच्या
ग्रहगोलांचे गुपित
मंडालेच्या तुरुंगात हेरले गेले
स्वातंत्र्य समराची कहाणी
अन् गीतारहस्याची वाणी!
म्हणा हवे तर दगडांचा देश!
हे दगड कसोटीचे आहेत
हे दगड परिस आहेत
चिंतामणी आहेत
गोफणगोटेही आहेत
कपाळमोक्ष करणारे
हे दगड कृपाळू होऊन
लोण्यालाही लाजविणारे आहेत.
भक्तिभावाचे तरंग उठविणारे
तसेच सुरुंगांचा
बेरंग करणारेही आहेत
हे दगड मारणारे भासले
तरी मारून तारणारे आहेत

अहो, हे दगड तरणारेही आहेत
हे दगड पाझरणारे आहेत
खरा पाझर दगडांचाच !
क्रांती कुठें ? क्रांती कुठें ?
सह्याद्रीच्या क्रांतीचे वारे
संचार करीत जाते
कैलासशिखरावर !
शांती म्हणविली तरी
ती क्रांतीच असते.
ती असते, वसत नाही
क्रांती कधीही 'कैलासवासी'
होत नसते
कारण संचार करणारी
ती गौरीशंकराची 'शिवशक्ति' !
तिसऱ्या नेत्राच्या दीप्तीने
क्रांतीची ज्योत उजळीत
जाते कन्याकुमारीपर्यंत !

## ७४. माझा महाराष्ट्र देश

'मराठमोळा' १४-१-१९३९ मोतीराम चौधरी (कराची)

भीमा, कृष्णा, गोदा ह्यांनी पावन केलेला।
सह्याद्रीच्या सहस्रशिखरीं, उन्नत झालेला ॥
शिवरायाने दिधला ज्यासि, उज्ज्वल संदेश।
सुख शांतीचा दाता माझा महाराष्ट्र देश ॥ १ ॥

पुणें, पंढरी, पैठण ज्यासी, शोभा अति देती ।
करवीरादि क्षेत्रें जेथें, आनंदित करिती ॥
सिंह दुर्ग शिवनेरी ज्याचे, अलंकार शेष ।
सुख शांतीचा दाता माझा महाराष्ट्र देश ॥ २ ॥

दिल्लीचा सम्राटहि जेथें, हतोत्साह झाला ।
संभाजीने धर्मासाठीं, जिथें बळी दिधला ॥
मर्द मराठा वीरांचा हा, सुंदर भू देश ।
सुख शांतीचा दाता माझा महाराष्ट्र देश ॥ ३ ॥

बाजी, तानाजी वीरांनीं, शौर्ये रक्षियला ।
राघोबानें ज्याचा झेंडा, अटकेवरि नेला ॥
ज्याची कीर्ति दिगंत ऐकुनि, येतो आवेश ।
सुख शांतीचा दाता माझा महाराष्ट्र देश ॥ ४ ॥

महादजी, मल्हार होळकर, जिथें जन्म घेती ।
संताजी, सूर्याजी जेथें, वीरगती जाती ॥
स्वातंत्र्याचा केला ज्यांनी, एकचि जयघोष ।
सुख शांतीचा दाता माझा महाराष्ट्र देश ॥ ५ ॥

राजनीतिचे भास्कर नाना, जन्माला आले ।
बाळाजी बल्लाळ वीरवर, होउनिया गेले ॥
ज्याच्यासाठीं यांनी केले, अनंत ते क्लेश ।
सुख शांतीचा दाता माझा महाराष्ट्र देश ॥ ६ ॥

स्वराज्य हिंदी द्यावें आम्हां, ओनामा केला ।
त्या टिळकांच्या जयघोषाचा, नाद जिथें आला ॥
पाळी, पोषी आम्हाला हा, अमुचा परमेश ।
सुख शांतीचा दाता माझा महाराष्ट्र देश ॥ ७ ॥

# ७५. मराठी मना!

'जयवंती' १९७२ द. ग. जयवंत

तुझ्या पूर्वजांच्या यशाचे पवाडे
नको गात राहू मराठी मना
तुझें तूंच कर्तृत्व दावी जरासे
पुरी होय जेणें मनोकामना.
जमाना असे आजचा हा निराळा
मना! कष्टदायी असे हा क्षण
जसा वात वाहे तशी पाठ देणें
विचारी मनाचें असें धोरण. ॥ १ ॥
वृथा नोकरीचा नको ध्यास घेऊं
स्वतःचाच धंदा बरा त्याहुनी
गुलामींत वेचून आयुष्य सारें
मना! साधिशी काय या जीवनीं?
मराठी मनाचा असा कोंडमारा
विवेकी मनाला न तो साहणें
पुढें टाक पाऊल तूं साहसानें
नको रे नको आजचें हें जिणें. ॥ २ ॥
पहा द्राविडी आणि सिंधी जमाती
खडी पाय रोवून झाली इथें
परी चाड नाही मराठी मनाला
सदा दृश्य हें पाहती कौतुकें.
मराठी मना! ताठ ही मान व्हावी
नको मानहानी इथें व्हावया

तुझी टाक तूं पाउलें दक्षतेनें
यशाचा तुझा मार्ग गांठावया. ॥ ३ ॥
'मोडू परी ना कधी वांकणारा'
अशी कीर्ति आहे तुझी उज्ज्वल.
मराठी तुझा हा असे थोर बाणा
तुझी न्याय नीती असे सोज्ज्वल.
धनी आज आहेस भावी पिढीचा
नको शाप घेऊस त्यांचा वृथा
तुझें आजचें काय कर्तव्य आहे
मना ! जाणिले पाहिजे सर्वथा. ॥ ४ ॥

## ७६. धन्य धन्य महाराष्ट्र भूमी

'अभिलाषा' १९७३ प्रभाकर वा. जावरकर

धन्य धन्य महाराष्ट्र भूमी
आहोत आम्ही तुझे बहु ऋणी ॥ धृ० ॥

इथेच जन्मले ज्ञानोबा महान्
इथेची गायिले अभंग तुक्यान्
गोरा, सांवता, चोखामेळा आन्
रामदासादी थोर नामदेवानीं – १

मरता मरता मारिले यवन
रक्षण्या राजा शिवबाचे प्राण
त्या वीर बाजीप्रभूच्या रक्तान्
जाहली पुण्यवान तुझी भूमी – २

एकेक हिरा इथेची जन्मला
शिवबा, नरवीर ताना इथला
इथल्याची लक्ष्मी, जिजाई महिला
दिधले स्वतंत्र्यास्तव प्राण तयांनी – ३

फडके सावरकर, अन् पिंगळे
लोकमान्य सेनापती महर्षी ते
आंबेडकर, सानेगुरुजी, कर्वे
शांतीचा संदेश दिला विनोबांनी – ४

इथेची जन्मले थोर हुतात्मे
इथेची जाहले संतमहात्मे
पंडित, न्यायी, धुरंधर नेते
क्रांतीकारक वीर शिरोमणी – ५

जन्मण्या भाग्य लागे नरयोनीत
त्याहुनी येण्या या भारतांत
महद्‌भाग्यानें होई महाराष्ट्रांत
इथे जन्मुनी पुनीत जाहलो आम्ही – ६

## ७७. नमस्ते महाराष्ट्रवीरा

'दुदुंभि' १९७३ — रंगनाथ ना. जोशी

प्रभातकिरणे जोडुन करद्वय नित्य तुला वंदिती
शिवभूषण तूं तुला काय त्या परकीयांची क्षिती
शौर्यदीप भास्करा — नमस्ते महाराष्ट्रवीरा.

धवल यशाची परंपरा ही तत्र पाठीशी असे
स्वतंत्रतेच्या पूजनार्थ हा रम्य सोहळा दिसे
सशस्त्र हो रणधिरा — नमस्ते महाराष्ट्रवीरा.

कां रामायण – भारत घडले ? तत्त्व घेई जाणुनी
रणावीण स्वातंत्र्य रक्षिले आजवरी का कुणी ?
सुसज्जतेची धुरा — नमस्ते महाराष्ट्रवीरा.

राष्ट्ररक्षणी खचित लाभते भूसेवेचे फल
अभंग ओवीमधुन जाणिजे अध्यात्माचे बल
धर्मबोध हा खरा — नमस्ते महाराष्ट्रवीरा.

## ७८. अम्ही मावळे एक

'दुंदुभि' १९७३ — रंगनाथ ना. जोशी

छत्रपतीला करू हिंदवी राज्याचा अभिषेक
अशी प्रतिज्ञा करू भारती अम्ही मावळे एक.

रक्तांकित ती दिव्य अंगुली शिवपिंडीवर गळे
शिवरायाची सुराज्यध्यासी मतप्राणाली कळे
कळता होते इच्छापूर्ती सैनिक सारे नेक.

युगायुगांची स्फूर्तिदेवता रणचंडी शिवराजा
तेवत राहे दिव्य अस्मिता राष्ट्रासह ही प्रजा
युगकर्त्याचे करुन पूजन स्मरू ती भालाफेक.

रिपुघाताची कशास भीति वृथा उरी का खंत ?
शिवाभवानी रणीं आठवू, क्षणीं होवू यशवंत
परस्त्रियांना प्रभूसम मानू माता-भगिनी-लेक.

पहा पेटला शीत हिमालय रिपुस्पर्शानें क्रोधें
एकी, युक्ती, संयम, शक्ती तत्व आपुलें साधे
हिंदविरांनो सामर्थ्यें घ्या जिंकुन तिन्ही लोक.

## ७९. माझा महाराष्ट्र

'मधुवंती' १९६६ मधुकर जोशी

स्वातंत्र्याच्या सौभाग्याच्या मंगलमय देशा
त्रिवार मुजरा घे हा माझा महाराष्ट्र देशा! ॥ धृ० ॥

सह्याद्रीचा मुकुटमणी हा झळके तुजवरती
भीमा, कृष्णा, गोदा तुझीया पायी झुळझुळती
तुझ्यामुळे या पावन झाल्या येथील दाही दिशा! १

तुझ्या कुशीवर मर्द मराठी वीर नवे येती
अन्यायाशी न्यायपणे ते शौर्याने लढती
तीन जगांहून तुझी थोरवी आहे जगदीशा! २

शिवरायाच्या पराक्रमाचे गाता पोवाडे
गहिवरती या सह्याद्रिचे अजुनी उंच कडे
तुकयाच्या अन् ज्ञानेशाच्या मंगल परमेशा! ३

विरक्त होऊन रक्त अर्पिले येथे वीरांनी
निशाण भगवें कथा सांगतें अजुनी या गगनीं
सरिता, सागर, नभ अन् धरती गाती जयघोषा. ४

जडण मनाची, घडण कवीची, वाणी संतांची
अभंग-ओवी पैजा जिंके श्री ज्ञानेशांची!
रसवंतीच्या रसाळ माझ्या काव्याच्या कलशा! ५

समशेरीचे शिलेदार ते दरीतले मावळे
कृष्णेचे ते घोडे घेऊन अटकेला भिडले !
तोफांचे ते जिथे चौघडे भिडती आकाशा ! ६

## ८०. माझा महाराष्ट्र

**'रावसाहेबांची कविता' १९६१ रावसाहेब र. लु. जोशी**

जयें नित्य जोपासली त्यागवृत्ति
परांच्या सदा सेवनी तन्मय
जयाचे सदा रक्षणीं भारताच्या
उभे ठाकती वीर तेजोमय
स्फुरे अंतरी ध्येयनिष्ठा जयाच्या
मती नित्य ज्ञानार्जना हो भली
विराजे महाराष्ट्र संपन्न ऐशा
गुणें थाटली आमुची माउली.—१

करी सह्यराजी पुरी दक्ष माते !
तुझ्या रम्य गोमांतकी जागल
जिच्या दर्शनें भारूनी लोक सारे
तुझ्या लेकुरांचे दुणावें बल
मनोयोग्य ऐश्वर्य संपन्न राणी
तुझी भव्य मुंबापुरी सुंदरा
तुझी नित्य माते ! तुझी नित्य राहे
तुझी यांत शंका न कांही जरा.—२

उजारे जिवा दिव्य ही सह्यराजी
पुनर्जीवना मुक्त वारा वहे
उले भावना देखुनी वीर्यशाली
शिवाजी नृपाचे उभे दुर्ग हे
तुझे पुत्र गोदातटीं गांजलेले
पुनर्मीलनीं तेजती गौरवें
मुदें घोष चाले तुझा गे विदर्भी
तुला वंदिती लोक निष्ठा रवें.–३

तुझा ध्यास लागे जया नित्य माये
तुझी संतती ही न किंतु जरा
जियें मुक्तकंठे सदा वैभवानें
तुझी गर्जती गे मराठी गिरा.
असो पक्ष जाती न संपर्क बाधे
तुझ्या भाषिकांच्या कदा मिलनी
भरे प्रेम उत्साह येती उमाळे
तिथें एकतानें तुझ्या पूजनीं–४

यशस्वीपणें गुंफिती प्रेमरज्जू
प्रभावे मनाचे मराठे खरे
फुपाट भ्रमाचे त्वरे लुप्त होती
नुरे भेद एकत्व पावें पुरें
मनीं ऐक्य थाटे, हृदीं प्रेम दाटे
अहा भाव हेलावती अंतरीं
'महाराष्ट्र माझा, महाराष्ट्र माझा
उठे लाख कंठांतुनीं वैखरी.'–५

## ८१. हिंदभूमीचा सुपुत्र

'रिमझिम' १९६० योगिनी जोगळेकर

सह्याद्रीच्या पाषाणांनी ताठर केलें छाताड
विंध्याद्रीच्या पहाडासवें कणखर झालें हें हाड
हिमाचलाची अजोड उंची अंतरांतुनी सामावे
उन्नत आशा, उन्नत आयू, उन्नत मायभूस न्यावें.
गंगा गोदा यांचें खेळे नयनी त्या निर्मळ पाणी
कुरुक्षेत्रिच्या श्रीकृष्णाची ओठांतुनि उमटे वाणी.
धनुर्धराच्या तीक्ष्ण शरांची शस्त्रांना याच्या धार
श्रीरामाच्या बाणा ऐसा कधीं न ठावी माघार.

## ८२. महाराष्ट्र धर्म

'काव्यकौमुदी' १९२४ गणेश नारायण टिपणीस (भालचंद्र)

अजीवांत ज्यानें सजीवत्व यावें,
अबुद्धांत ज्यानें प्रबुद्धत्व व्हावें,
अवीर्यांस ज्यानें नवें वीर्य द्यावें,
महाराष्ट्र-धर्मा अशा जागवावें ! ॥ १ ॥

हताशास ज्यानें नवी आस द्यावी,
नवी पालवी जीर्ण खोडा फुटावी,
नवें भाग्य ज्यानें अभाग्यास द्यावें,
महाराष्ट्र-धर्मा अशा जागवावें ! ॥ २ ॥

नवा जोम यावा, नवें तेज यावें,
जुने भोग्य ज्याच्यानियोगें निमावे;
खरे बद्ध ज्यानें पुरे उद्धरावे,
महाराष्ट्र-धर्मा अशा जागवावें ! ॥ ३ ॥

जुन्या द्वैतवैरास ज्यानें हरावें,
जुने भेद ज्याच्यांत सारे विरावे,
महा घोर दौर्बल्य ज्यानें सरावें,
महाराष्ट्र-धर्मा अशा जागवावें ! ॥ ४ ॥

खरी स्फूर्ति व्हावी, खरी शक्ति यावी,
खरी भक्ति राष्ट्रांत ज्यानें भरावी;
महाराष्ट्र ज्यानें खरें श्रेष्ठ व्हावें,
महाराष्ट्र-धर्मा अशा जागवावें ! ॥ ५ ॥

महाराष्ट्र-भक्ती तशी राजभक्ती,
जनीं मानसीं रोमरोमांतरी ती,
खरी संचरावी जयानें प्रभावें,
महाराष्ट्र-धर्मा अशा जागवावें ! ॥ ६ ॥

महाराष्ट्र ज्यानें खरें एक व्हावें,
जळाचें जसे बिंदू वेगें मिळावे,
जयानें कळीकाळही कांपवावें,
महाराष्ट्र-धर्मा अशा जागवावें ! ॥ ७ ॥

स्वराष्ट्रास ऐश्वर्य मांगल्य यावें,
स्वराष्ट्रें महीमंडळा भूषवावें,
स्वराष्ट्रास ज्यानें असें ध्येय द्यावें,
महाराष्ट्र-धर्मा अशा जागवावें ! ॥ ८ ॥

## ८३. धन्य महाराष्ट्र

'आनंदगीत' भाग २ रा १९२४ आनंदराव कृष्णाजी टेकाडे

जो मुकुट हिंददेशाचा । तो हाच धन्य महाराष्ट्र ॥ धृ० ॥
जो 'हर हर' पावन मंत्रा । जन्मतांच वदला वाचे;
गडकोट ठायिठायींचे । हे दिव्य शौर्यवीर्याचे;
जरिपटका भगवा झेंडा । हें विभव तेज जगीं ज्याचें;
कठिणसें तयाला काय ?
टाकियला जेथें पाय
दाविला पराक्रम, विजय
आजवरी ख्याति ही ज्याची । तो हाच धन्य महाराष्ट्र.
राखिलें सनातन धर्मा । तुडवि जया रिपु अभिमानें;
दिपवि जो जगाचे डोळे । आपुल्या राजकाजानें;
तळपविली निज समशेर । अटकेच्या पार जयानें;
आजचा कोणता काळ
बघतांना नयनिं विशाळ
तो घेइल का जपमाळ ?
हें नव्हेंच ब्रीद जयाचें । तो हाच धन्य महाराष्ट्र.
पात्रता ओळखायाची । चवचाल काळ जगताचा,
त्यांतील मर्म जाणोनी । काढि जो मार्ग स्वहिताचा,
आमिषा भुलेना केंव्हा । जें घात करी ब्रीदाचा;
आपुलेपणाची मूर्त
ज्या ठायीं रोमरोमांत
दिसतसे भरतभूमींत;
त्यांमाजि असे जो पहिला । तो हाच धन्य महाराष्ट्र.

द्विजयुग जैं नांदे तेंव्हा । आचरि द्विज कर्तव्याला;
त्या क्षात्रयुगाचें पवनी । जो पाळि क्षात्रधर्माला;
मग अनुभवत्या कालाची । जाणीव काय ना त्याला ?
काळ घे जसा निज वेश,
त्याचाहि तसा आवेश,
भीरुता ठाविना लेश;
इतिहास जयाचा ऐसा । तो हाच धन्य महाराष्ट्र.

होउनी यज्ञ दास्याचा । स्वातंत्र्य जगां लाभावें;
सन्मानें, सामर्थ्यानें । कुणि जिवंत जगिं राहावें;
लोपुनी द्वेष, अभिमान । संतोष, सौख्य नांदावें;
हें कलहकूट उकलाया
धडपडे जगत या समया,
मिळवाया परि त्या विजया
जो समर्थ लोकीं आज । तो एक हाच महाराष्ट्र.

## ८४. माझा महाराष्ट्र

'आनंदगीत' भाग ३ रा १९२८ **आनंदराव कृष्णाजी टेकाडे**

जगिं नाही कुणाचे अम्हीं
आमुचे नसति कोणिही
मग म्हणो कुणी कांहिंही
केसरी केसरीच तो
काक काक तो
जुळे न मन उभयीं । कधींवांही
हा गडी मराठा महाराष्ट्रिचा मराठीच राही.

जो सह्याद्रींत खेळला
करि कृष्णा-जलपानाला
फाटकी घोंगडी त्याला
जो सिंहनादगर्जनीं
पळवि भिववुनी
श्वान-काक-जीवी- । साक्ष देई
तो कोण असे मग महाराष्ट्रिचा ? मराठीच राही.

निज नाथ राज्यदानाला
रिपुकरीं सोडि ज्या काला
तइं एक शूर ती अबला
शिवराष्ट्र–ध्वजरक्षणीं
असुरमर्दिनी
सुमनजीव श्रमवी । भक्तिभावीं
ती कोण रमा मग महाराष्ट्रिची ?–मराठीच राही.

जें मधुर बाल्य असुनिही
घे रणावेश चढवुनी
तळपलें प्रखर रविहुनी
अनुभवा व्यर्थ ठरविलें
जगा कथियलें
ध्यास ज्या हृदयीं । तोच विजयी
तें बाल्य कोठलें महाराष्ट्रिचें ?–मराठीच राही.

जया दिव्य श्लोक-गायनें
जागलीं झोपलीं मनें
प्रति रोम भरे मी-पणें
आनंदव्नभुवन
रुक्ष जें सदन
क्षणिंच तें होई । त्याच देहीं
तो श्लोक कोठला महाराष्ट्रीचा ?—मराठीच राही.

नच धर्म व्रर्ण जाणतां
लोपुनी हृदय—भिन्नता
जी दिसे एकरूपता
तो नादब्रह्म राउळीं
नभोमंडळीं
निनादित होई । 'विठाबाई'
तें ऐक्य कोठलें महाराष्ट्रीचें—मराठीच राही.

वाटलें जरी भ्रष्टला
भासलें जरी नष्टला
लक्षिलें जरी विसरिला
तरि मूलरूप आपुलें
जगा दाविलें
आश्चर्यें दिपवी । ऐन समयीं
तो महाराष्ट्र हा महाराष्ट्रीचा—मराठीच राही.

जो महाराष्ट्रिं जन्मला
जो महाराष्ट्रिं रांगला
जो महाराष्ट्रिं क्रीडला
मग असो कुठेंही जरी
मेदिनीवरी
पुण्यवंत तो कीं । पापपंकीं
तरि शांत निशीं घे झोंप मनानें महाराष्ट्र–अंकीं.

ही महाराष्ट्र–थोरवी
कालच्या दिनीं नाचवी
सर्वथा जगा थइथई
आजही नाचतो शिरीं
कालचेपरी
समस्त जगताच्या । सत्य वाचा
तैसेंच उद्यांही नाचणार तो मनिषेनें प्रभुच्या.

## ८५. मराठा

'मराठमोळा' — ग. ल. ठोकळ

पोटास ज्याच्या मिळे एक वेळा सुकी कोरडी खायला भाकरी
केली इमानास जागून ज्यानें मराठी स्वराज्यामध्यें चाकरी
ज्याला रहायास साधीसुधी ती, असे खिडखोऱ्यामध्यें झोंपडी
हातावरी घेउनी मस्तकाला रणीं झुंजला तो मराठा गडी. ॥ १ ॥

आतां कुठें पूर्वीचा तो मराठा, जयानें स्वराज्यास संरक्षिलें ?
आतां कुठें तो, जयानें स्वतांचें असे रक्त युद्धामध्यें सांडलें ?
कांडी फिरे यक्षिणीची कशी ही, यशोदेवता जाय देशोधडी
दास्यामध्यें गुंतला देश आतां, दडाला कुठें तो मराठा गडी ? ॥ २ ॥

शेतामध्यें औत जुंपून आतां करी तो मराठा गडी शेतकी
झाली जरी पायबंदी तयाची, अशी सेवितो मायभू सारखी
स्वातंत्र्य जिंकून आणावयाला तयांवाचुनी शक्त नाही कुणी
आतां असें लाभली योग्य संधी, पुढें येतसे अंग तो झाडुनी. ॥ ३ ॥

लागे दिसूं चेतलेला निखारा, निघूं लागली राख एकीकडे
ज्वालामुखी लागला पेट घ्याया, धडाडून बाहेर लाव्हा पडे;
लागे सरूं अंधार आतां, फुटूं लागले तेज पूर्वेतुनी
स्वातंत्र्य नांदेल देशांत माझ्या, मराठाच आणील तें जिंकुनी ! ॥ ४ ॥

## ८६. साहित्यिक महाराष्ट्र

मंगलज्योति ' डिसें. १९५५ सौ. शांतादेवी तडवी (परदेशी)

महाराष्ट्र मंगला ! स्वीकरी प्रणाम करितों तुला
दिशा-दिशांतुन, सदैव फांको कीर्ति तुझी उज्ज्वला !
अनेक ते नरमणी पहुडले तुझ्याच अंकावरी !
आळवुनी बहुविधें तवगुणां गाई वागीश्वरी !

निर्मळ ज्ञानेश्वरी तुकाचे अभंग ते सोज्वळ
बहिणा, मुक्ता, जनी भक्तिचा लुटवीती परिमळ.
एकनाथ, पंडित, मोरया, चोखामेळा मळ—
काढुन बनवी भक्ति–जलानें मानव–मन निर्मळ.

थाप डफावर पडे, सु– डौलें भगवा तो फडफडे
उडवित घोडे वीर चालले दख्खनचे फांकडे !
शाहिर ललकारतो पवाडे, अंतराळी स्वर भिडे !
मायभूमिच्या बहादुरांच्या अंगीं रणश्री चढे !
रामदास पाजिती, चहुदिशी बोधामृत भाविकां
भूपाळी ती होनाजीची जागविते सकळिकां !
पानपतीं आहुति किती पडे झाली भाग्यक्षतिऽ
किति सदनीं अंधार दाटला, विझल्या कुलज्योति.
झांशीची दामिनी कडाडून पडली समारंगणीं
हताश झाली जनता थकली, नित्य जाउनी रणीं
लावणिची पिचकारी घेई रामजोशी निज करी
तुषार पडती, मानस–कलिका उमले हळु अंतरीं !
शृंगाराचा फुले फुलोरा महाराष्ट्र अंगणीं
भक्ति, प्रीति बागडती दोन्ही, जशा जुळ्या बहिणी !
स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्काची करी घोषणा
गीतेचें पीयूष पाजिती लोकमान्य बहु–जनां !
आगरकर, चिपळुणकर उघडी ज्ञानाचा खजिना
समाजचित्रें दावी आपटे चित्रपटांसम जनां !
साहित्यिक सम्राट केळकर काढी पत्र केसरी
महाराष्ट्राला पुन्हा जागवी त्याची ललकारी
टिळकांची ती प्रेमळ वाणी आणि गोड गाणीं
केशवसुत, तांबे, शेखर चे स्वर घुमती कानीं
काव्य मानसीं राजहंस तो डुलतो रामाचा
संगर–गीतें गाई तिन्नारी शाहीर देशाचा.

करुण–रसाचा साने गुरुजी वाहविती पूर
पत्थरासही पाझर फोडी हृदयाचा सूर.
बालकवीचा निर्झर मोती उधळित जाई पुढें
ज्युलियनाची शराब, साकी मैफिल कीं उघडे !
रम्य आंबराई गिरीशाची शीतलता देई
यशवंताची येई पुढती ती प्रेमळ 'आई' !
अत्र्यांच्या झेंडुच्या फुलांतिल खाउनिया खोबरें
असा कोण अरसीक जयाचें अंतर नाही स्फुरे
यथाशक्तिने तुला पूजिलें भक्तांनी शारदे !
प्रास, यमक, वृतास विसरले जन–मंजुळ नादें.
ताल–सुराचा नको मुलामा उज्ज्वल काव्याला
साज कशाला निसर्ग सुंदर जें असतें त्याला ?
चंडोलासम स्वैर उडूं दे कवि ! तव वैखरिला
प्रेम–शांतिचा निरोप मंगल देई जगताला.

## ८७. धन्य महाराष्ट्र

'वानगी' १९६० — वि. बा. तानवडे

धन्य महाराष्ट्र जगीं वंद्य जाहला
भारतांत श्रेष्ठ असा देश शोभला ॥ धृ० ॥
धन्य शिवछत्रपती शूर वीर ते
योग असा अपूर्व हा जन्म घेतला ॥ १ ॥
'जन्मसिद्ध हक्कास्तव' एकभाषि राज्यास्तव
प्राणपणें करुनी यत्न आज मिळविला ॥ २ ॥

निर्मियले द्वैभाषिक, अल्पायु ठरलें तें
एकभाषि सरितेचा ओघ पातला ॥ ३ ॥

यशप्राप्ती व्हावयास पुण्याई शिवप्रभुची
रक्षुनिया राष्ट्रधर्म दीप उजळिला ॥ ४ ॥

आशीर्वच भारतीया, रक्षिण्यास स्वातंत्र्या
सबल करा आज महाराष्ट्र आपुला ॥ ५ ॥

## ८८. माझा मराठीचा देश

**'महाराष्ट्र गौरवगीत संग्रह' १९८६ लक्ष्मणराव तायडे**

चोळी शृंगार करोनी । प्रेम आई म्हणवोनी ॥
केली बोळवणी खास । माझा मराठीचा देश ॥ १ ॥

पंढरीचे वाळवंटी । टाळ मृदंगाचे नादी ॥
गातो तुक्या ज्ञानेश । माझा मराठीचा देश ॥ २ ॥

घुमे कोटाकोटातून । शाहीरांचे मर्द गान ॥
येई दगडासही जोश । माझा मराठीचा देश ॥ ३ ॥

माझी मराठीची वाणी । नाचें होऊनी लावणी ॥
साजे मराठीचा वेश । माझा मराठीचा देश ॥ ४ ॥

हिमालयाचे रक्षणी । ढाल केली सह्याद्रिनी ॥
मुखी 'हरहर' घोष । माझा मराठीचा देश ॥ ५ ॥

## ८९. अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला

'काव्यरत्नमाला' १९२० दु. आ. तिवारी

शिवाजी नृपासारखे कीर्तिमान ।
गुरू रामदासापरी बुद्धिमान ॥
प्रयत्नें तयांनी जया मुक्त केला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ १ ॥

दरे आणखी खोल खोरे दडाया ।
चढाया कडे भीति ना जे पडाया ॥
असे मावळे जन्मुनी धन्य झाला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ २ ॥

अहा ! रामदासी सुधा प्राशितांना ।
रणोत्साह आला महाराष्ट्रीयांना ॥
तयांनी जिथें युद्ध कल्लोल केला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ ३ ॥

मिळोनी जिथें देशबंधू समस्त ।
पुरे नष्ट केले शिखानष्ट मस्त ॥
जया नेति ते वैभवाच्या शिराला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ ४ ॥

बरी भाकरी त्यावरी एक कांदा ।
नसो अन्य कांहीं शिदोरीस बांधा ॥
असे कष्ट सोसून जो मुक्त केला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ ५ ॥

प्रसंगीं बहु गाळिल्या रक्तधारा ।
करीती परी देश जे मुक्त सारा ॥
अशा शूर वीरांस जन्मून घाला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ ६ ॥

कटीं एक शेला करीं एक भाला ।
शरीरावरी लांब पोषाख केला ॥
मराठी चमूचा धुराळा उडाला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ ७ ॥

रणाची धुमाळी उडाली उडाली ।
पहा शत्रुसेना बुडाली बुडाली ॥
असा होतसे घोष प्रत्येक वेळा ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ ८ ॥

चहुं बाजुंनीं वेढुनी गांठिला हो ।
मधें शत्रुनें फोडिला दीर्घ टाहो ॥
जिथें गोष्टि या येति ऐकावयाला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ ९ ॥

करीं जाहल्या छिन्न विछिन्न ढाला ।
रणावेश आला मराठे गड्यांला ॥
जयश्री सदा भूषवी ती जयाला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ १० ॥

विजापूरचा मारिला खान आजी ॥
उद्यां दिल्लिचा कापला खान गाजी ॥
जिथें हर्षवीती कथा या मनाला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ ११ ॥

कुठें वीर बाजी कुठें वीर तानू ।
तयांना कसे शब्द-काव्यांत वानूं ॥
लढूनी जिथें वीर प्रत्येक मेला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ १२ ॥

जगीं ठेउनी आपुली दिव्य कीर्ति ।
कुठें जाहल्या सर्व अदृश्य मूर्ती ॥
स्मृती होउनी ध्यास लागे मनाला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ १३ ॥

म्हणे काय ऐका पहा घोडखिंड ।
निघाली इथें शत्रुची पुर्ण धिंड ॥
जिथें शत्रुराष्ट्रास झाला उन्हाळा ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ १४ ॥

पहा आज सह्याद्रिच्या चोरवाटा ।
तशा कोंकणांतील त्या सर्व घाटा ॥
पहा दुर्गही बोलती याच बोला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ १५ ॥

असे पूर्वीचे स्थान आणि प्रसंग ।
स्मरूनी कसें होइना चित्तभंग ॥
स्वभावें मुखीं येतसे शब्दमाला ।
अहाहा ! कुठें तो महाराष्ट्र गेला ॥ १६ ॥

# ९०. एक काळ ऐसा होता

' मराठ्यांचें संग्रामगीत' १९२२ दु. आ. तिवारी

बिनतारीचे संदेश   सोडावे रायगडानें
त्यावरुनी इतर गडांनीं   झुंजावें अति जोमानें
गोळ्यांच्या पर्जन्यानें   भिजवावी रणमैदानें
शौर्याचा पाहुनी थाट
तोंडांत घालुनी बोट
फिरवावी रिपुने पाठ
व्हावी भुई थोडी पळतां   एक काळ ऐसा होता—१

गिरी-कुहरांतुनी उफळोनी   वनराज केसरी यावा
कीं ज्वालामुखि भडकोनी   आगीचा लोळ उठावा
कडकडुनी जलधरमाला   वीजेचा गोल तुटावा
' शिवबाची स्वारी उठली
भ्रुकुटी कोणावर चढली
कोणाची घटिका भरली ?'
ऐकाया ये जन-वार्ता   एक काळ ऐसा होता—२

भूपाल महाराष्ट्राचा   दरबारी जेंव्हा यावा
'श्री छत्रपती शिवराज !'   जयघोष असा उसळावा
सरदार शिलेदारांचा   संघात उभा ठाकावा
गोऱ्याचा टोपीवाला
दिल्लीचा दाढीवाला
मान्य तो तयांसही झाला
लववितात अपुल्या माथां   एक काळ ऐसा होता—३

औरंगपुराचें रुप   बेरंग करोनी फिरती
दाभोळावर वेगानें   टोळासम जाउन पडती
सुरतेच्या सुरतेवरतीं   जे हात फिरउनी येती
गो-विप्रांचे ते वाली
विजयाचा तिलक कपाळीं
लावोनी ज्या त्या वेळीं
झटले जैं देशाकरितां   एक काळ ऐसा होता—४

वेढिला पुरंदर किल्ला   दिल्लीच्या दिल्लिरखानें
कोंडाणा कोंडुन धरिला   'जयसिंह' समर-धीरानें
किल्ल्याचे तट लढताती   शौर्यानें उत्साहानें
जरि शिरें तुटोनी पडतीं
तरि रायाची आज्ञा ती
रणिं कबंध पाळित असती
स्पृहणीय राजभक्तीचा   एक काळ ऐसा होता—५

जन्मभूमीसाठीं सांगा   जातील मृत्युच्या द्वारीं !
कुलकीर्तीसाठीं सांगा   काळाचे होतिल वैरी !
देश बंधुंसाठीं सांगा   शेषावर करिती स्वारी !
समशेरी नाचविणारे
भाल्याला खेळविणारे
चापाला भूषविणारे
या शूरांचा जो दाता   एक काळ ऐसा होता—६

जमवून मांड घोड्याला   भरधांव कसा फेंकावा
जातांना निजखड्गानें   रिपु-कंठ कसा छेदावा
नाचवीत भाला हातीं   शत्रूस कसा वेधावा

हें शिक्षण नव तरुणांचें
'देशभक्त' या पदवीचें
ना बी. ए. एल्. एल्. बी. चें
उपयोग काय पण आतां   एक काळ ऐसा होता–७

शिवरायासाठीं अपुलें   सौभाग्यही मळवायाला
एकुलता एकच पुत्र   तोही पण गमवायाला
तत्पर ज्या होति सुखानें   धन्य! धन्य! साध्वी विदुला
अपुलें फुटलें जरी भाल
सुखि राहो शिवभूपाल
सुखि असो देश चिरकाल
ध्यास हाच युवति-चित्ता   एक काळ ऐसा होता–८

जैं महाराष्ट्र भूमीचीं   भाग्याची होती सृष्टी
कोणाची जननी व्याली   टाकील वांकडी दृष्टी
कोणाची छाती होती   बोलेल वांकड्या गोष्टी
रावा पासोनी रंका
कोणाला नव्हती शंका
शिवबाचा एकच डंका
चहुं दिशेस गाजत होता   एक काळ ऐसा होता–९

घेवोनी उत्कंठेने   वाचावा गत इतिहास
भिजवावी त्याची पानें   सोडावा दिर्घोच्छ्वास
जीर्ण दुर्ग ते पाहोनी   व्हावें हो चित्तिं उदास
आठवून त्या त्या गोष्टी
लक्षून आजची सृष्टी
अंतरांत व्हावें कष्टी
येती वच सहजीं वदता   एक काळ ऐसा होता–१०

# ९१. रायगडाची माती

**खं. स. त्रि. यांचा कविता संग्रह' १९५१   खं. स. त्रिलोकेकर**

गडराया ! श्रीरायगडा तव शिव भगवी माती
चिरमंगल आशेची तांबुस उषा रम्य हंसती
तव धूळीचा बुका उधळिला दिगंतरीं भगवा
शुद्ध सनातन धर्म उभविला कर्मयोग कडवा ॥ १ ॥

स्वराज्य-पाया शिवरायाने खोल येथ रचिला
पुण्यश्रीचा मुकुट मस्तकीं इथेंच चढवीला
स्वातंत्र्याचे दूत धुळीचे कण तव झणिं उडले
शिवनृप अभिषेकाचें कुतुहल जगांत नाचविलें ॥ २ ॥

पुरुषार्थाची नौबत अमुच्या इथेंच कीं झडली
सत्त्व यशाची सुंदर सनई मंजुळ वाजविली
गडद दाट परसत्ता-पटलें भेदुनि कडकडली
सौदामिनि तलवार भवानी इथेंच गजबजली ॥ ३ ॥

मराठमोळा भगव्या झेंड्याभंवति इथें जमला
महाराष्ट्र हा जिवंत अमुचा एक ध्वनि उठला
जरिपटक्याची भरजरतारी सुप्रभ झळझळली
तुळजापुरची देवि भवानी खरी इथें पुजिली ॥ ४ ॥

जीव जीव खडबडुनी जागा शिवपुण्यें झाला
सह्याद्रीच्या खोऱ्यामाजी यज्ञकुंड रचिला
धृति-धृत लावुनि दुर्बलतेच्या भीतीच्या समिधा
अर्पण करुनी उभी जाळिली कुटिल बंध-बाधा ॥ ५ ॥

पुरोडाश हुतशेष श्रेय परि रायगडा घडलें
गंगासागर-तीर्थी अवभृथ मंगलमय झालें
इतिहासाच्या सोज्वळ अमुचा इथें ग्रंथ वाचा
रायगडावरि अखंड अमुच्या लौकिक दौलतिचा ॥ ६ ॥

मनुजामाजी शिवरायापरी दुजा न नर जैसा
दुर्गांचा अधिराज रायगड उभा सुभग तैसा
देहाच्या मातींत आपुल्या मिळवा ती स्फूर्ती
घरोघरीं न्या रायगडाची शिवभगवी माती ॥ ७ ॥

## १२. महाराष्ट्र-भूपाळी

' महाराष्ट्र गाथा ' दत्तो अप्पा तुळजापूरकर

प्रभावशाली परममंगला महाराष्ट्र देशा ।
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा ॥ धृ० ॥

सह्याद्रिच्या सहस्रशिखरीं उन्नत झालेला,
गोदा, कृष्णा, भीमा, ह्यांनी पुनीत केलेला,
पश्चिम सिंधू बंधु पाठिशीं, पूर्वोदधि जामात,
विंध्याद्रीची उंची लक्षी सातपुडा प्रांत,
अलंकार जयाचे पैठण, पंढरपूर,
आळंदी, चाफळ, देहू, तुळजापूर,
कीं पुणें, रायगड, शिवनेरी सुंदर,
रजःकणाला लावुनि भालीं महाराष्ट्र देशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा ॥ १ ॥

वरी, नाचणी, भात पिकवितो कोंकणचा प्रांत
गहूं, बाजरी, कापूस, शाळू देशावर होत
कांबळ खांदीं, वहाण पायीं, डोइस मुंडासें,
शामल वर्णी सान रूप तव सोज्वळ मज भासे
ते विळे-कोयते शस्त्रें हीं हातिंचीं
तीं बटें ठेंगणीं भीमेच्या कांठिचीं,
मिळविती धुळीला कीर्ति बादशाहिची
वीरांना त्या वंदन अमुचें महाराष्ट्र देशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा ॥ २ ॥

वीर प्रतापी राय शिवाजी छत्रपती अमुचा;
धर्म रक्षण्या एकचि केला घोष स्वराज्याचा;
भगवा झेंडा धन्य करी हें आनंदवनभुवन;
स्वातंत्र्याच्या जरिपटक्याला लक्ष वेळ नमन
पुण्याई पुरलीं शिवभूपाची पुढें
पेशवे पुण्याचे वळले अटकेकडे,
साम्राज्य मराठी पसरे चोहोंकडे,
स्मरणें स्फुरतें, हृदय वांकतें महाराष्ट्र देशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा ॥ ३ ॥

भीमा वाही तिच्या सुरावर गाई जी गीत
तीच मराठी भाषा अमुची ठसली हृदयांत;
ज्ञानेशाची ओंवी, अभंगवाणी तुकयाची
श्लोक वामनी जिला भूषवी आर्या मयूराची;

एकनाथ, चोखा, गोरा, ज्ञानेश्वर,
रामदास, तुकया, नामा, मुक्तेश्वर,
नच जात पहातो भक्तांची ईश्वर,
संतमंडळां लववूं माथा महाराष्ट्र देशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा ॥ ४ ॥

मुक्ताबाई, तशी जनाई आळविते देवा,
सद्भावाला सहज लाभतो मोक्षाचा ठेवा,
गतवीरांची पुण्य-चरित्रें गाऊनि अंगाई
बाळा करितें महाराष्ट्रींची भगिनी वा आई
शोभवी अहल्या होळकरांची पुरी,
ती सती रमा भटवंशाला उद्धरी,
स्वातंत्र्यलक्ष्मी प्रचंड संगर करी,
प्रणिपात असो ह्या देवींना महाराष्ट्र देशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा ॥ ५ ॥

# १३. महाराष्ट्र गीत

'महाराष्ट्र गाथा' — दत्तो अप्पाजी तुळजापूरकर

जय जय महाराष्ट्र बोला । स्वातंत्र्यदेवतेला ।
वंदन करुनि स्मरुनि अंतरीं श्रीशिवरायाला ॥ धृ० ॥

पांडित्य माजलें फार ।
धर्मांत शिरे अंधार ।
तों प्रकटे ज्ञानेश्वर ।
करि बंड लाविली तीट मराठी महाराष्ट्र भाला ॥ १ ॥

सत्त्यावर चढलें कीट ।
पसरला दंभ मोकाट ।
तों अभंग लिहिले कोट ।
विठ्ठल--विठ्ठल तुकाराम या करि जयघोषाला ॥ २ ॥

तो थोर शिवाजी राणा ।
स्वातंत्र्य तयाचा बाणा ।
तो संत येथला जाणा ।
कीं महाराष्ट्र जो आज रक्षण्या देवदूत झाला ॥ ३ ॥

लोकांस करुनिया जागे ।
शिवराज रहस्या सांगे ।
निजधर्म उजळण्या लागे ।
तो राजकारणी संत एकला रामदास अपुला ॥ ४ ॥

दुर्दैव जरी ओढवलें ।
कर्तव्य सारखें केलें ।
पावित्र्य जीवनीं भरलें ।
ती राजयोगिनी सती अहल्या भूषण धर्माला ॥ ५ ॥

शेवटची चमके बिजली ।
ती राणी झांशीवाली ।
स्वातंत्र्य संगरीं पडली ।
महाराष्ट्राची लक्ष्मी देवी वंद्य भारताला ॥ ६ ॥

रणमर्द मराठे वीर ।
पूर्वजें कथियला थोर ।
स्वातंत्र्य-मंत्र-गंभीर ।
तोडण्या शृंखला जपा मंत्र तो घ्या घ्या शपथेला ।
'हरहर महादेव' बोला । रणवीर, गर्जनेला ॥ ७ ॥

## ९४. मावळ्यांस आमंत्रण

'दत्तांची कविता' १९२२ कवि दत्त (दत्तात्रेय कोंडो घाटे)

चला मावळे वीर हो ! या घडीला;
धनी संगरा बोलवीतो तुम्हांला;
लढाया चला सोडुनी सर्व काज,
रणीं दाखवा शत्रुला शौर्य आज – १

चला सज्ज व्हा, घ्या यशस्वी हत्यारें
चला ज्वान हो ! वृद्ध हो ! आज सारे,
चराया गुरें राहुं द्यावीं वनींच,
असें सांगतो मी न, सांगे धनीच – २

त्यजा चालत्या नांगराला तसाच;
धन्याची करी चाकरी आज साच
पुरें तोडणें वृक्ष, घ्यावी कुठार
रणीं शत्रुला मारण्या आज ठार – ३

पुरें जेवणें हातचा घास टाका,
उठा, सज्ज व्हा, दुंदुभीनाद ऐका;
नका घालवू वेळ होतो उशीर,
रणीं पाहतें शत्रुचें वाट शीर – ४

उठा, आंवळा कंबरा, वेळ झाला;
चला ढाल घ्या, खड्ग घ्या, लांब भाला,
कुणी गोफणी, तीर वा घ्या कृपाण;
अरी-संगरीं माजवावें तुफान – ५

निघा सत्वरी वादळीं जेंवि लाटा;
चला वेळ झाला, धरा चोरवाटा,
जमा इष्ट जागीं पळा वायुवेगें
त्यजा आळसा चित्त ठेवा न मागें – ६

चला मावळे वीर हो! या घडीला;
शिवाजी रणीं बोलवीतो तुम्हांला;
लढाया चला सोडुनी सर्व काज;
रणीं दाखवा शत्रुला शौर्य आज – ७

## ९५. असे लाडका सह्याद्रीचा

**‘रा. वा. दाते उर्फ राम शाहीर यांची कविता’ १९२९**

**रामचंद्र वासुदेव दाते, (‘रामशाहीर’)**

असे लाडका सह्याद्रीचा महाराष्ट्र बोला।
महामंत्र जप पावित्र्याचा रघूवीर बोला ॥ धृ० ॥

शिवराजाची जन्मभूमि तूं मंगल शिवनेरी।
सह्याद्रीच्या महाराष्ट्राला शिकवी रणभेरी ॥ १ ॥

प्रतापशाली विजयी भाला नेउनि अटकेला।
धन्य काळ तो महाराष्ट्राचा झेंडा फडकविला ॥ २ ॥

शिवबाजीच्या प्रभावळीची प्रभा तेजदार।
महाराष्ट्र मुगुटीं झळकती मोतिं पाणिदार ॥ ३ ॥

हे दख्खनचे वीर मराठे स्वयंस्फूर्तिवाले।
परिस्थितीला पडताळोनी तेजा प्रगटविलें ॥ ४ ॥

अटकेसन्निध सिंधुनदाचें पाणी प्यायाला।
भीमथडीची तट्टें नेऊनि झेंडा रोंवियला ॥ ५ ॥

धर्मरक्षणा कुणी धाडिलें वारकरी संत ।
तूंच शिकविला क्षात्रवृत्तिचा महाराष्ट्र पंथ ॥ ६ ॥

भगवा झेंडा महाराष्ट्राचा रामदासि पेशा ।
परंपरेची स्फूर्तिदेवता गेली वनवासा ॥ ७ ॥

इतिहासाच्या उज्ज्वलतेची जागृति ठेवावी ।
गनिमी कावा महाराष्ट्राचा संस्कृती राखावी ॥ ८ ॥

## ९६. स्वातंत्र्यसंगरीं लढला

**'रा. वा. दाते यांची कविता' रामचंद्र वा. दाते–रामशाहीर**

स्वातंत्र्यसंगरीं लढला । तो देह चिरंजीव झाला ॥ धृ० ॥

कडेपठार सह्याद्रींत । गवसले हिरे खाणींत ।
शिवराय छत्रपति झाला ॥ १ ॥

रणशूर मावळा तान्हा । देशार्थ अर्पि जो प्राणा ।
प्रभु बाजी करामतवाला ॥ २ ॥

धर्मार्थ राज संभाजी । डरला न मृत्युला गाजी ।
अलम्गीरनें छळियलें त्याला ॥ ३ ॥

संताजी, धनाजी वीर । मावळे कैक झुंझार ।
जोहार तयांनी केला ॥ ४ ॥

मल्हारराव होळकर । जनकोजी शिंदे रणशूर ।
रणशार्दुल बाजी झाला ॥ ५ ॥

चिमाजी आप्पा वसईत । दाखवी फिरंग्या हात ।
हिंदुधर्म तारायाला ॥ ६ ॥

गर्जला भाऊ झुंजार । देशार्थ करुनि जोहार ।
दाखवी क्षात्रतेजाला ॥ ७ ॥

पाटीलबुवा शिंद्याची । चमकली फेंक भाल्याची ।
शह दिला थेट दिल्लीला ॥ ८ ॥

गोखले बापू झुंजार । ही अखेरची समशेर ।
पडतांचि, दास्य देशाला ॥ ९ ॥

महाराष्ट्रीय गनिमी कावा । जरिपटका झेंडा भगवा ।
हा ! हाय दिवंगत झाला ॥ १० ॥

इतिहास धडा गिरवावा । ध्येयार्थ मार्ग काढावा ।
ओळखा नव्या काळाला ॥ ११ ॥

जय भवानिकी बोला । जय महाराष्ट्र बोला ।
जय वंदे मातरम् बोला ॥ १२ ॥

## १७. मर्द मराठे चिरंजीव झाले

'रा. वा. दाते, यांची कविता' रा. वा. दाते (रामशाहीर)

स्वातंत्र्य संगरीं मर्द मराठे चिरंजीव झाले ॥ धृ० ॥

शिवरायानें देह झिजविला स्वातंत्र्यासाठीं ।
सिंहगडावर तानाजीचा देह पडे त्यासाठीं ॥ १ ॥

स्वातंत्र्य संगरीं मुरारबाजी लढतां लढतां पडला ।
खिंड रांगणा बाजि प्रभुचा हलवी स्मारक झाला ॥ २ ॥

कैक मावळे कैक मराठे लढतां लढतां मेले ।
मायभुमिच्या यशोमंदिरीं कळस लावुनी गेले ॥ ३ ॥

विजापूरची आदिलशाही अभेद्य हा किल्ला ।
तरी मराठे वीरांनी तो जमिनदोस्त केला ॥ ४ ॥

घमेंडिनें जो औरंगजेबहि दक्षिणेंत आला ।
घमेंड जिरतां करूं लागला या तोबा या अल्ला ॥ ५ ॥

अलमगिराच्या कळस तंबूचे कापोनि आणिले ।
संताजि बहाद्दर वीर मराठा नांव सार्थ केलें ॥ ६ ॥

संभाजिवधानें सर्व मराठा खवळुन जो गेला ।
सूडश्रीनें रणकुंडाच्या भडकविल्या ज्वाळा ॥ ७ ॥

धन्य वीर तो धन्य काळ तो सतरावें शतक ।
तसें गर्जलें पेशवाईचें अठरावें शतक ॥ ८ ॥

समशेर यशस्वी विजयी सेना बाजी लढनेवाला ।
भाऊसाहेब समरधुरंधर माधव गुणि झाला ॥ ९ ॥

जनकोजि दमाजी मल्हारबाबा पाटीलबोवा शूर ।
तशी चमकली बापू गोखले शेवटली समशेर ॥ १० ॥

गतस्मरणानें जीव तळमळे कासाविस होतो ।
काय करावें सुचे न कांहीं भ्रम मतिला पडतो ॥ ११ ॥

खालिल पोहरा वरती येतो तत्त्व ध्यानीं ठेवा ।
इतिहासाची पुनरावृत्ती बोध मनीं ठेवा ॥ १२ ॥

## १८. वाजवा दुडूंम् दुडूंम् नौबद

'रा. वा. दाते यांची कविता'          रा. वा. दाते (रामशाहीर)

दुडुंम् दुडुंम् नौबद । वाजवा, दुडुंम् दुडुंम् नौबद ! ॥ धृ० ॥
जय छत्रपतीचा बोला । जय भवानीकि जय बोला ।
स्वातंत्र्यदेवी जय बोला ॥ १ ॥
महाराष्ट्र देश हा आमुचा । मावळे मराठे ह्यांचा ।
तो नाही अन्य कोणाचा ॥ २ ॥
सह्याद्रि दऱ्याखोऱ्यांत । अद्यापि नाद हा घुमत ।
स्वातंत्र्य घोषणा होत ॥ ३ ॥
श्रीसमर्थ झेंडा भगवा । शिवराय गनिमी कावा ।
जरिपटका शाबुद ठेवा ॥ ४ ॥
स्वातंत्र्यसंगरीं लढले । ते वीर चिरंजीव झाले ।
हे दूत तयांचे किल्ले ॥ ५ ॥
सह्याद्री पर्वतावरती । स्मारकें दृष्टिला पडती ।
गडदुर्ग बोलके होती ॥ ६ ॥
किल्ल्यांची भाषा मुग्ध । जीवाला करते दग्ध ।
सुचवितें काय प्रारब्ध ॥ ७ ॥
ठकवाया ठक जो आला । पाहिजे उलट ठकविला ।
भारती कृष्ण हें वदला ॥ ८ ॥
देशार्थ देह ठेवावा । धर्मार्थ देह वेचावा ।
नरजन्म हेतु साधावा ॥ ९ ॥
स्वातंत्र्य मिळे इहलोकीं । देतसे मोक्ष परलोकीं ।
तो धर्म सत्य अवलोकीं ॥ १० ॥

## ९९. तुमकु नहिं डरनेवाला

'रा. वा. दाते यांची कविता' रा. वा. दाते ( रामशाहीर )

हम मर्द मराठा है । तुमकू नहि डरनेवाला ।। धृ० ।।
महाराष्ट्रावर परदास्याची रजनी ज्यावेळीं ।
महाप्रतापी भानु प्रगटला, शिवाजी नृप त्यावेळी ।। १ ।।
धन्य जिजाई धन्य माउली, शिवनेरी किल्ला ।
प्रचंड अरिला लावि म्हणाया, 'या तोबा या अल्ला' ।। २ ।।
इथेंच लिहिला महाराष्ट्राचा, मन्वंतर इतिहास ।
लिहावयाला मराठमेळा साह्य करी शिववास ।। ३ ।।
दिग्विजयी वीरांच्या नादें घुमलें वातावरण ।
तेथिल तट्टें करुनी आलीं सिंधु नदाचें पान ।। ४ ।।
स्वराज्यार्थ ही शिवरायानें, इथें घातली शाळा ।
शिकुनि शिष्यगण बाहेर पडतां, अजिंक्य हो कळिकाळा ।। ५ ।।
शिवाजी राजा, तान्हा, येसू, धनाजी, संताजी ।
मर्द मराठे वीरांचे कीं वंशज आम्ही आजी ।। ६ ।।
गगन कोसळो, वीज कडाडो, रसरस अग्नी येवो ।
कृतांत काळा भिणार नाही, शीर तुटो वा राहो ।। ७ ।।
सह्याद्रीचे जिवंत निर्झर, अद्यापी वहाती ।
अभेद्य किल्ले स्मारकरूपें दृष्टीला पडती ।। ८ ।।
सह्याद्रीवर वीरांचे, हे हालती स्मारक झाले ।
स्वातंत्र्याच्या रणांगणीं ते चिरंजीव झाले ।। ९ ।।
बाहुबलानें दिल्लीपतिला, हादरून सोडियलें ।
महाराष्ट्राच्या दास्यतटाचे तुकडे तुकडे केले ।। १० ।।
महाराष्ट्र केसरीचे छावे आम्ही, हें न कधीं विसरूं ।
सत्त्व राखण्या समरभूमिवर मरूं किंवा मारूं ।। ११ ।।

# १००. महाराष्ट्र मुलुख

'कवि संमेलन' भाग २ रा — दासगणू

१७-४-१९३१ — (गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे)

(चांगदेव द्वारकेला गेले होते. त्यावेळी परमात्मा त्यांच्या एका भक्ताच्या बायकोच्या बाळंतपणासाठीं गेला होता. चांगदेवांनी रुक्मिणीची भेट घेतली व देवाविषयीं विचारलें. महाराष्ट्रीय संतांमुळें पदोपदीं आपल्याला पतिविरहाचें दुःख भोगावें लागतें या रागानें ती त्यांना उद्देशून खालील उद्गार काढते. त्यांत प्रभूचा महाराष्ट्र-संतांविषयीं असलेला जिव्हाळा सहृदयतेने वर्णिला आहे.)

महाराष्ट्र-मुलुख बहु खट
त्यांतुन विशेष गोदेचें तट
उमगूं न देति कधिं वाट सुखाची कवणा
जरि सर्वशक्तिभगवान परी केली दैना ॥ धृ० ॥

कुणि दिल्या खांद्यावरि कावडी
कुणि केला बिन पैशाचा गडी
चोंख्याची अवघ्यावर कडी वोढविलिं ढोरं
वैकुंठपति दाम्यानें बनविला महार

अवदसा जनी आगजाळी
दळण्या बैसवीत वनमाळी
मोठा कठिण सांवतामाळी लावि खुरपाया
गोरा नेत धरुन हातास चिखल तुडवाया

तूंहि चांग्या ! आहेस त्यांतला
महाराष्ट्रि निर्दया-खला
बनवून सुइण सांवळा महीच्या कांठीं
नेलास, रुक्मिणी म्हणे दया नाहिं पोटीं

इकडील संत ते बरे
केलें नाहीं माझें कधिं मातेरें
जेथें जेथें उभयतां बारे ! गेलों थाटानं
मेहत्याचें लग्न पहा दासगणू कथि खूण.

## १०१. महाराष्ट्र गौरव

'महाराष्ट्र गौरवगीते' — आशा दामले

आज हो महाराष्ट्र साकार
नवतेजानें तळपूं लागे, रत्नांचें भांडार ॥ धृ० ॥

झगडत झगडत अन्यायाशीं
बाळगिलें जें स्वप्न उराशीं
साकारें हें आज प्रकाशीं
उल्हासानें नाचत मन हें । गर्जे जयजयकार ॥ १ ॥

अचल अचेतन स्तंभ जसा की
फोडुनि प्रगटे न्याय-रक्षणीं
हिरण्य-कश्यपु वधिला ज्यांनीं
प्रल्हादाचा पाठीराखा खास जगीं असणार ॥ २ ॥

मेघांनी जरी वर्षाकाली
किरणें रवीची अडवुनि धरिलीं
प्रभात मंगल शरदामधलीं
कसें म्हणावें आम्ही तिजला । कायम अंतरणार ॥ ३ ॥

गोदा-भीमा-कृष्णातीरीं
अमृतवाणी ज्ञानेशांची
सु-यशोगीतें शिवरायाची
रिझवायाला भारतभूला । पुनश्च दुमदुमणार ॥ ४ ॥

स्वतंत्रते तव भालप्रदेशी
सौभाग्याचा तिलक रेखीशी
मंगल त्याला रूप द्यावया
आजवरीच्या निष्ठेने हा । महाराष्ट्र लढणार ॥ ५ ॥

अतां मराठी वाणी-लेखणी
गर्जत गाणीं कीर्ति प्रांगणीं
चढेल पुनरपि राज्य आसनी
सह्याद्रीची रुद्रतपस्या । आज फला येणार ॥ ६ ॥

# १०२. देश हा मर्द मराठ्यांचा

' श्री शिवगीतांजली ' १९७० प्रा. स. ना. दिक्षित

महाराष्ट्राचा प्रदेश आमुचा मर्द मराठ्यांचा !
देश हा मर्द मराठ्यांचा !
सह्याद्रीतिल वनराजाचा ! वीर शिवाजीचा ! ॥ धृ० ॥

रौद्र निळे जांभळे इथे हे पर्वत उत्तुंग
वज्राहुनिही अभेद्य कणखर इथले गडदुर्ग !
सह्यगिरीतुन स्वतंत्रतेचा संचरतो वारा
कृष्णा, गोदा आम्हां पाजिती नित अमृतधारा,
पवित्र तीर्थ-क्षेत्रे करिती इथे अहो दाटी
श्रीरामाच्या चरणस्पर्शे पावन पंचवटी !
सिंधु सागरानें, अनंत लहरींनी
दिलें अर्घ्य याच्या मंगलमय चरणीं
निळे सावळे मेघ भिजविती कण कण भूमीचा
सोने पिकवी हात लाविता, गुण या मातीचा ॥ १ ॥

अमृताहुनी गोड आमुची असे मायबोली
नक्षत्रासम तेजस्वी जी अलंकार ल्याली
ज्ञानेशाची अमृतवाणी देइ जनां तृप्ती
अभंगवाणी श्रीतुकयाची घरोघरी गाती
समर्थ सद्‌गुरु दिव्य सांगती मंत्र स्वराज्याचा
निजदेशाचा, निजधर्माचा; मार्ग प्रवृत्तीचा !
विठ्ठलभक्तांनी, महाराष्ट्रभूवनीं,
आळविला देव आपुल्या भजनांनी
दीप उजळिला या संतांनी आत्मज्ञानाचा
मळा पिकविला भागवतांनी भगवद्भक्तिचा ! ॥ २ ॥

शिवप्रभूला जन्म दिला या इथे जिजाईने
इथे हिंदवी राज्य स्थापिले वीर शिवाजीने
'वासुदेव बळवंत' गर्जला प्रथम क्रांतिकारी
स्वतंत्रतेचें स्वप्न देखिले ज्यानें अंधारीं
'स्वराज्य माझा जन्मसिद्ध अधिकार!' असें गर्जुनी–
साम्राज्यासन कंपित केलें इथेचि टिळकांनी
इथें हुतात्म्यांनी, स्वदेश वीरांनी,
निजबलिदानानें, तोषविली जननी !
तेजस्वी इतिहास झळकतो आमुच्या राष्ट्राचा
महाराष्ट्र हा आज जाहला प्राण भारताचा ॥ ३ ॥

## १०३. महाराष्ट्र राज्य संस्थापना दिन

'फावड' १९६४ — पांडुरंग दिक्षित

आनंदाने डुलति हुतात्मे स्वर्गीं मंत्र गर्जला ।
हरहर महादेव बोला ॥
लाख करांनी शिवरायाच्या शिरीं तुरा खोंविला ।
हरहर महादेव बोला ॥ धृ० ॥
आज बाजीनें बाजि जिंकली
तानाजीची तहान भागली
मरहट्ट्यांच्या इतिहासाला आज नवा उजळा ॥ १ ॥
तिथें गर्जती स्वर्गी खडावा
रामदासीं शिवभाव जडावा
'जयजय रघुवीर समर्थ' आशिष तोच महाराष्ट्राला ॥ २ ॥

इंद्रायणीवर अभंग घुमला
ओवि रंगली आळंदीला
घाली पिंगा गवळण पैठणिं नाथ जनार्दनिं रमला ॥ ३ ॥

गडागडांच्या कड्याकड्यांवर
जलदुर्गांच्या जललाटांवर
गतस्मृतींना चैतन्याचा नवा तजेला चढला ॥ ४ ॥

भीम-ज्योतिबा देति आलिंगन
गुरुजी फुलविती सान निरंजन
टिळकांच्या भालावरी तुम्ही विजय 'तिलक' लाविला ॥ ५ ॥

## १०४. मराठी बाणा

'महाराष्ट्र गौरव गीत' संग्रह १९८६ शिवराम देवलकर

महाराष्ट्र जागला, जागे मराठे, जागती स्वाभिमाना
देशरक्षण्या अर्पिति प्राणा, हाच मराठी बाणा ॥

झुंजार झुंजला रणी, दंड ठोकुनी, याच मर्दानी
उन्मत रिपूंना आठवते ना ? लोळविले मैदानी
ती घोडदौड स्वाराची
अभिमानी शूर वीरांची
धगधगत्या अंगाराची
प्रेरणा शिवशक्तिची
चेतला, पुढे चालला, शत्रूची उडवूनी दैना
देश रक्षण्या अर्पिती प्राणा, हाच मराठी बाणा ॥ १ ॥

उगवते पीक ज्ञानाचे, इथे संताचे कलावंतांचे
स्वातंत्र्य नरवीरांचे, त्यागी महात्म्यांचे, ज्ञानी महर्षींचे
ती वदली ज्ञानेश्वरी
की झरती अमृतसरी
ही तुकयाची वैखरी
भावभक्तिची मंजिरी
अर्पुनी तिलक वाहूनी प्रसंगी लढती वीरांगना
देश रक्षण्या अर्पिति प्राणा, हाच मराठी बाणा ॥ २ ॥

इतिहास घडविला इथे मंत्र स्वातंत्र्य दिला भारती
त्याचे यशाचे धडे शिकविते माझी मराठी माती
अभिमान डिवचण्या याल
हा बदलाया भूगोल
परि शिवबाचा हा लाल
शत्रूचा तो कर्दन काळ
गर्जेल, पुन्हा धावेल घेऊनी सह्याद्रीची सेना
देश रक्षण्या अर्पिति प्राणा, हाच मराठी बाणा ॥ ३ ॥

## १०५. मराठी बाणा

'प्रियकविते' १९७४ — मा. का. देशपांडे

पोलादाचा सुरा
मराठी बाणा ताठर पुरा
जरि नसे मराठा कुबेर कुणी सुखी,
जरि कांदाभाकर हीच मिठाई मुखीं
ना झेलायाचा कधीं कुणाची थुकी
मात्र मनांतून स्वच्छ वाहतो सह्याद्रीचा झरा,
मराठी बाणा ताठर पुरा.

जरि कधी न मुजरा उगा कुणा ठोकला
परि संतपदावर नित माथा ठेविला
घेउनी तयांते शिरीं नाच नाचला
वाघ रानचा, परी सज्जनांपुढे जोडितो करां;
मराठी बाणा ताठर पुरा.

जरि कळे न त्याते प्रेम वदावे कसे
जरि जमे कधी ना कधी नाटकी हंसे
तें रक्त खरें! त्या अस्सलतेचें पिसें
देशासाठी उघडी छाती–मर्द खडा संगरां
मराठी बाणा ताठर पुरा.

जरि रमे न त्याच्या घरीं सृष्टिसुंदरी
जरि हिमालयासम भव्य भव्य ना गिरी
जान्हवी परी वाहते खोल अंतरीं
जरी पाहिजे सुधा, भाकरी या चाखाया घरां
मराठी बाणा ताठर पुरा.

जिंकाल तरी या प्रेम घेउनी उरीं
जाणतो मराठा प्रेमाची चाकरी
घेईल भाबडा लोटांगण भूवरी,
मात्र डिंवचता-अचूक तुमच्या दंश विषारी करां
मराठी बाणा ताठर पुरा.

# १०६. मराठी भाकर

'प्रिय कविते'

मा. का. देशपांडे

माझी मराठी भाकर, भारी गोड गोड, बाई
वाटे मराठी जिभेला भावनगरी मिठाई.

कधीं पांढरा जोंधळा, दुधावाणी गोरीगोरी
कधीं नांचण्या तांबुस, नार सांवळी, लाजरी !

माझ्या मावळचा कांदा, लाल तेजाचें माणिक
जानी दोस्त भाकरीचा, काय पाहिजे आणिक ?

करी जिभेवरी प्रीत, लाल चटणीचा गोळा
जात पाहिजे मर्दाची पचवाया निखाऱ्याला.

काय नाजूक मिठाई घेई वरणाचा घोट ?
काय तूप रोटी खाई कधी काळे तीळकूट ?

कोणी कापले शत्रूला खात पुरणाची पोळी ?
काय खात पेढे बर्फी सैन्य लढले मावळी ?

माझी मराठी भाकर, रक्त जागे जागे ठेवी
वीज पाहिजे देहाला ? – हीच मेजवानी खावी.

बाणा ताठर मराठी, नाही कोणाची लाचारी
रक्त वीराचे पोशिले माझी मराठी भाकरी.

# १०७. यशोगान

'उगवते तारे' १४-१-४२ गो. वि. देशपांडे

महाराष्ट्र-वैभवा मराठ्या ! प्रभात बघ होई
उठवाया तुज सह्याचल हा यशोगान गाई
निबिड तिमिर लोपलें तांबडें फुटलें पूर्व-तळीं
प्रवाळ-पाटलकांति विखुरली शोभति गिरि-मौळी
शीत मंद मकरंदयुक्त या सुटति पवन-लहरी
सुधातुषारा सिंचुनि करिति जीवन नव शरिरीं
उत्साह उषःकाली सर्वत्र असे भरला
गर्जुनीं सजलिं राष्ट्रं यश-शैल चढायाला
निद्रेंत बघुनि तुजला वाटते नवल गिरिला
महाराष्ट्र पाडसा ! मावळ्या ! उठि गा लवलाही
सह्याचल हा खड्या सुरानें यशोगान गाई – १

सोंपविलें तुज निज-अंकावरि आजवरी जागुनी
प्रभात पाहुनि प्रेमभरानें उठवायाकारणीं
धीर नादगंभीर सुरानें आळवितो गाणीं
धृपद गाइ त्या गाना 'हरहर महादेव' वाणी
साथ तया द्विज मयूरकुक्कुट करिति रवा सु-निजा
स्वनत मधुर गिरि-निर्झर नाना नादवाद्यकाजा
शाहीर अपूर्व खरा स्फूर्तीचा स्फुरत झरा
निनाद गगनिं भिडला ध्वनि दुमदुमला सारा
पडसाद थोर झाला रोमांच उठे शरिरा
ऐक डफावरी थाप खणाणे, झणि जागा होई
सह्याचल हा खड्या सुरानें यशोगान गाई – २

जातिवंत हा कवी खरोखर प्रसाद जिऩ्हेवरी
वर्ण्य विषय जो गाई दिसतसे प्रत्यक्षचि भूवरी
धरुनि वेष तापसी सुमित्रा-पुत्र राम जानकीं
मूर्तिमंत आदर्श जगाला संचरतीं दंडकीं
होनाजीचें गान दाविती घनःश्याम मूर्ती
प्रभातकाळीं पाहि भारती रम्य कशी रीती
श्रीज्ञानदेव, तुकया इत्यादि संतश्रेणी
अध्यात्मपाठ देती प्रवचनीं अमृतवाणी
ती रामदास-स्मरणी स्वातंत्र्यमंत्र जपुनी
'जय रघुवीर समर्थ' निनादत ध्वनि ठायिं ठायीं
सह्याचल हा खड्या सुरानें यशोगान गाई — ३

घोर झडति संग्राम खणाणत बघ मावळि भाला
महीवरि दावि मराठी वीर विक्रमाला!
मुरारजीच्या धडानेंच रणिं कहर कोण केला
उडत तयांतुनि रुधिर गगनिं करि पावन स्वर्गाला
गडागडावरि स्वातंत्र्यश्री स्वैर विहार करी
जरिपटक्यासह झेंडा भगवा फडके सौध-शिरीं
तो सिंह सह्यगिरीचा उभवुनी छत्र श्रमला
अंबांकिं प्रभु शिवबा निद्रिस्त गाढ झाला
अर्पीत जिजामाता प्रेमाश्रु-सुमन-माला
पाहि स्फूर्तिचें दृश्य दिव्य तें उठिं दर्शन घेई
सह्याचल हा खड्या सुरानें यशोगान गाई — ४

# १०८. महाराष्ट्र गाथा

'कोरीव लेणी'

सौ. अपर्णा देशपांडे-बडोदे

महाराष्ट्र माझा देश । माय मराठी ही माझी ।
यांच्यासाठी ओविलीं ही । भाव-कळ्या-फुलें ताजीं ॥ १ ॥
'निवृत्ती'चा हा स्वभाव । प्रवृत्तीचें करी कार्य ।
'समर्थां'ची शिकवण । येथें होई कृतकार्य ॥ २ ॥
'ज्ञानदेवां'च्या ओवींत । ओंवियलासे 'अभंग' ।
हार संत सुमनांचा । याचा सुगंध अभंग ॥ ३ ॥
कर्तव्याच्या 'सोपाना'ने । 'दिंडी' पताका ही चढो ।
संतरत्न 'मुक्ता' माला । एक एक मणी वाढो ॥ ४ ॥
माझ्या मराठी आईला । 'महाराष्ट्र' 'एकनाथ' ।
पतिव्रतांचा हा देश । हीच जगीं गाजे मात ॥ ५ ॥
'नामदेव' माना म्हणे । शिकवितो नाम भक्ती ।
नाम यानें गाजविलें । संतीं, महंतीं नी भक्तीं ॥ ६ ॥
तूं का राम? मीहि राम । माझ्या मनगटीं राम ।
छाती फाडुनी दावीन । हनूमंतावाणी राम ॥ ७ ॥
याच्या आरामींहि राम । स्वागतात याच्या राम ।
महाराष्ट्र कणोकणीं । पहा भरलासे राम ॥ ८ ॥
'विठ्ठल' मी 'रखुमाई' । राम याचें दैवतांत ।
'राम'–'सीतामाई' देखा 'रामदास' म्हणतात ॥ ९ ॥
'इंद्रायणी' 'चंद्रभागा' । 'कोयना' नी कृष्णामाई ।
'गोदावरी', 'भीमा' 'वेण्या' । 'प्रवरा' ही धांव घेई ॥ १० ॥
'कर्तव्या'ची थोर निष्ठा । 'तत्व' हेंच याचें 'शील' ।
'मरूं परी नच हटूं' । पाळीतसे 'पंचशील' ॥ ११ ॥

## १०९. जय महाराष्ट्र भूमाते !

' महाराष्ट्र गौरवगीत संग्रह ' १९८६ —सुरेश देशपांडे

जय महाराष्ट्र भूमाते
तव पूजेस्तव पूर्ण फुलू दे या जीवन पुष्पाते
ज्ञानेशांची डोळस भक्ती
दे तुकयाची करुणा वृत्ती
श्री दासांची प्रयत्न, युक्ती
शिवरायांचे शौर्य धैर्य दे, दे कर्तृत्व कराते
सह्यकड्याची छाती निधडी
मुखी मऱ्हाटी सरस रांगडी
स्नेहसुधेची भीमा दुथडी
उरी विरक्ती तरी जागती स्वकर्म गीता येथे
लोकमान्य ते, वीर विनायक
फुले महात्मा सत्योपासक
भीमरावही दीनोद्धारक
परंपरा ही गौरवशाली चालो आमुच्या हाते

## ११०. महाराष्ट्र माझा

' मधुलहरी ' २६-१-६९—बाळासाहेब पिसाळ देशमुख, कराड

महाराष्ट्र माझा, महाराष्ट्र माझा
हो, हो ! दगड देश माझा ॥ धृ० ॥

या दगडावर इतिहास आहे
वीरश्रीचा, विजयश्रीचा
या दगडात सहवास आहे
—भक्तीचा अन् ज्ञानाचा
वीरश्रीचा, विजयश्रीचा, भक्तीचा अन् ज्ञानाचा
महाराष्ट्र माझा, महाराष्ट्र माझा
हो, हो ! दगड देश माझा ॥ १ ॥

या दगडाच्या श्वासामधून
या दगडाच्या हृदयातून
ऐका ऐका घोष अजून
हरहर महादेव गर्जा, हरहर महादेव गर्जा
महाराष्ट्र माझा, महाराष्ट्र माझा
हो, हो ! दगड देश माझा ॥ २ ॥

या दगडात आग आहे—भूकंपाची
या दगडात जाग आहे—विदर्भाची
या दगडात बाग आहे—गोव्याची
या दगडाला पाझर आहे—तापी, कृष्णा, गोदेचा
या दगडात निर्झर आहे—इंद्रेचा अन् भीमेचा
हा निर्झर, हा पाझर—पाईक आहे सीमेचा
त्या सीमेला मुजरा वाकून मर्द मराठ्यांचा
महाराष्ट्र माझा, महाराष्ट्र माझा
हो, हो ! दगड देश माझा ॥ ३ ॥

# १११. मंगलमय महाराष्ट्र

' भारत काव्यसंग्रह ' १९६१ गुरुनाथ देशमुख–देगलूर

मंगलमय महाराष्ट्र पुन: प्रगटला
धैर्य, शौर्य, साहसांत मेरू शोभला ॥ ध्रु० ॥

अटकेतुनि श्रीशिवाजी ज्यास्तव सुटले
कणसें खाउनि बाजी ज्यास्तव झटले
सिंहगडीं तानाजी ज्यास्तव मिटले
नारायण ज्याच्यास्तव सावध झाला ॥ १ ॥

अमृत आणि मराठींत पैज लावुनी
वज्राहुनि कठिण विष्णुदास सांगुनी
भागवत ग्रंथास मराठींत गाउनी
जयजय रघुवीर दऱ्यांतूनि गर्जला ॥ २ ॥

पंत, संत, तंत काव्य ओघ वाहुनी
निबंधांत स्पष्टोक्ती नीट साधुनी
बहुरंगी साहित्या जन्म देउनी
शब्दकोश संपादुनि अमर जाहला ॥ ३ ॥

बुरसटल्या भावनांस दूर सारुनी
अंतरात संस्कृतीस वंद्य मानुनी
भारत हा एकच महाराष्ट्र मानुनी
अपुल्यासह सर्वांचा पिकविण्या मळा ॥ ४ ॥

# ११२. महाराष्ट्र गीत

'महाराष्ट्र गौरव गीत संग्रह' १९८६ प्रा. बी. पी. धारराव
'सिन्नर' (नासिक)

जय महाराष्ट्रा, जय शीवराष्ट्रा,
तुझा आम्हा अभिमान,
तू नररत्नांची खाण,
गाऊ तुझे गुणगान.

शाहू छत्रपति जनकल्याणी,
सुधारकांचे जणू अग्रणी,
आदर्श पुढती शिवरायांचा,
वाली शोभतो दीनदलितांचा.

टिळक, आगरकर, कर्वे, फुले,
तुझी प्रतापी गुणी मुले,
देशासाठी देह झिजविले,
पुष्पलतांनी तुला सजविले.

क्रांतिकारी सावरकर,
पोहूनी आले अथांग सागर,
तुझ्या भेटीची सदैव हुरहुर,
सदैव नशिबी तुरुंग हे घर.

शिक्षण महर्षी भाऊराव,
नाही ठेवला स्वार्थभाव,
ज्ञानगंगा, बहुजन अंगा,
खेळविली अपरंपार.

क्रांतिसिंह पाटील नाना,
मर्द मराठी अंगी बाणा,
देशसेवेच्या घेऊनी आणा,
नाही झुकविल्या कुठेच माना.

किती अनामिक धारातीर्थी,
जगी फडकली तुझीच किर्ती,
इतिहासाची घेऊनी स्फूर्ती,
करु आम्ही बलीदान.

## ११३. भूषण नवमहाराष्ट्र जगीं भारताला

'भारत अमुचा जगीं महान' १९६५ — वसंत नलावडे

भूषण नवमहाराष्ट्र जगीं भारताला
शक्तिशाली, बुद्धिशाली, विजयानें नटलेला ॥
'शिवा', 'तुका', 'ज्ञानोबा वंदले जयाला
प्राणाहुनि प्यार अति वंद्य जो आम्हांला ॥ भूषण....१ ॥

पोलादी मनगट हे, खंत ना तयाला
शक्ति-बुद्धि कंकणे शोभती जयाला ॥
नीतीचा थोर जगीं वंद्य भारताला
भूतकाळ साक्ष देत सांगतो जगाला ॥ भूषण....२ ॥

त्याग, शौर्य, स्फूर्तीची गात गीत माला
गिरिकुशींत वाढला हा मराठमोळा ॥
कोटि कोटि जनतेचा हा पिता महात्मा
देव, देश, धर्मास्तव सज्ज रक्षणाला ॥ भूषण....३ ॥

भूत, वर्तमान, भावि-भाग्य जया भालीं
शौर्याची, कीर्तिची धुरा जयें ल्याली ॥
न्यायप्रिय समतेचा, सत्याचा वाली
"सह्याद्रि" "हिमालयि" एकरूप झाला ॥ भूषण....४ ॥

## ११४. महाराष्ट्र हें आपुलें राज

**'भारत अमुचा जगीं महान' १ मे १९६०** **वसंत नलावडे**

महाराष्ट्र हें आपुलें राज ॥ धृ० ॥

आज संपली हुकूमशाही
आज लोपली भांडवलशाही
लाख मुखांतुनि लोकशाहिचा
दिशांदिशांतुनी उठे आवाज ॥ महाराष्ट्र.... ॥ १ ॥

महाराष्ट्राचा धर्म आगळा
जाति-भेद हा गाडुनि सगळा
आज जागला मराठमोळा
उच्च-नीच हा मिटला वाद ॥ महाराष्ट्र.... ॥ २ ॥

मानवता हा धर्म आपुला
सत्य नि समता सांगे सकलां ॥
मानवतेच्या मंदिरांतला
जागृत झाला देवहि आज ॥ महाराष्ट्र.... ॥ ३ ॥

महाराष्ट्र हा भारत भूषण
आज सांगतो तुम्हांस गर्जुन ॥
महाराष्ट्राच्या तना-मनांतून
शिवरायांचें घडवा दर्शन
गगनाला या भिडे आवाज ॥ महाराष्ट्र.... ॥ ४ ॥

# ११५. इथें जन्मला शूर शिवाजी

'भारत अमुचा जगीं महान'     वसंत नलावडे

इथें जन्मला बाळ शिवाजी
इयें वाढला वीर शिवाजी ॥
पिता तयाचे शूर शहाजी
वंद्य तयाचे गुरु दादोजी—१

मंगल माता धन्य जिजाई
शक्ती, स्फूर्ती देइ शिवाई ॥
आशिर्वाद हा हिचा लाभला
महाराष्ट्राला-शिवरायाला—२

इथें ऐकुनी पुराण-गाथा
आणि घेऊनी आणा-शपथा ॥
सह्याद्रीचा सिंह गर्जता
प्रसन्न झाली भारतमाता—३

धर्मासाठीं-शीलासाठीं
मायभूमिच्या मुक्तीसाठीं ॥
रक्तामध्यें इथे नाहले
श्रीशिवबाचे मर्द मावळे—४

इथें तळपल्या म्यानांमधुनी
यवनांवरती नग्न नागिणी ॥
इयेंच झडला नभीं चौघडा
आणि फडकला भगवा झेंडा—५

धन्य येथली जमीन, डोंगर
इथें जन्मला श्रीशिवशंकर ॥
धन्य धन्य ही पर्वतराजी
इथें जन्मला शूर शिवाजी—६

सह्याद्रीच्या कड्याकपारी
आज वाजते गोड पावरी ॥
पवित्र गड हा जगिं शिवनेरी
प्रणाम त्याला आज मी करी ॥ ७ ॥

## ११६. नव महाराष्ट्र गीत

दैनिक 'नवशक्ति' २६-४-१९८७ शांताराम नांदगांवकर

आम्ही राष्ट्रभक्त सांडितो रक्त देशास्तव संकटकाली
जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र बलशाली ! !

हा कृष्ण; कोयना, गोदावरीच्या जलामृताचा देश
या हरित तृणातून दगडामातीतून श्रमाचाच संदेश
हे दुर्ग, मंदिरे, मशिदी कथिती मानवता परमेश
या इथें दंभ वा दुष्टपणाचा मुळी नसे लवलेश
ही भूमि मानवी नररत्नांच्या सौभाग्याने न्हाली ! – १

इथं संत जनांनी सोनं केलं काळ्या मातिचं
ज्ञानबा, तुकोबा, चोखोबाच्या मोल अभंगाचं
मुक्ताई, जनाई, बहिणाईची ओवी
रामप्रहराला जात्यावर गावी
एकनाथ वाळवंटी गर्दभासि गंगा देती
इंद्रायणीच्या तरंगी गाथा तुक्याच्या तरती
दासबोध घेऊनी शिवरायाने सिंहगर्जना केली ! – २

शिवराज किर्तीचा ताज गुणांची गाथा
तो मूर्त शौर्य, औदार्य, धैर्य जनत्राता
कर्तव्यकर्म, जनप्रीत, घोर हा चित्ता
महाराष्ट्र धर्म मानीला न्याय अन् निष्ठा
त्या जिजाबाईने पुत्ररुप तलवार आम्हाला दिधली – ३

धडधडा तोफा गर्जल्या, बंदुका झडल्या
खिंडीला भिडल्या, मांडिले तांडव कीं गगनांत
धावला दुष्मन या मुलखात
बाजीनं केली तयावर मात जी–जी ऽऽ
रायबाचं लगीन ठेवून
कोंडाण आधी जिंकीन
स्वामीसाठी वचन पाळून
तानाजीनं जीव केला दान
तानाजी, बाजी पेटविती हो इथेच प्राण मशाली – ४

ते टिळक गोखले स्वातंत्र्याच्या स्फुलिंगा जागविती
श्री स्वतंत्रतेला 'जयोस्तुतेने' सावरकर आळविती
ज्योतिबा फुले, धोंडो कर्वे पतितांचे वाली झाले
अन् स्वयं तेज दावूनी भिमाने अढळ स्थान मिळवियले
या कर्तृत्वाचा वाजे डंका नित्य नभाच्या खाली – ५

या इथे शाहिरी गौरवगाथा मर्दुमकी गावूनी
किती कथा, नाटके, काव्य कलांनी दुनियेला रमवूनी
निज साहित्यातून मुक्या भावना सजीवपणे मांडूनी
संस्कार, संस्कृति या देशाची प्रियतम केली जनी
स्वरलता बहरली, आशा फुलली स्वरगंगेच्या पात्री
गणितज्ञ गाजले जयंत, तैसे गावस्कर यश यात्री
त्या पुण्यभूमीच्या धुलिकणांचा तिलक लावूया भाळी
जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र, जय महाराष्ट्र बलशाली ! ! – ६

## ११७. महाराष्ट्रप्रीति

'काव्यानंद मंजुषा' भाग ३ रा, १९१८ एकनाथ यादव निफाडकर

राष्ट्रीं महाराष्ट्र देशास पाहा
पुन्हां लोचनांनो, पहा हो पहा ! ॥ ध्रृ० ॥

हा वीर्यदाता तसा दुःखहर्ता
अशा कार्यकर्त्यास आत्मा वहा !
ही कामधेनू, सुरांचीहि वेणू,
किती यास वानुं असें होतसें;
यातें जरी या शिरी मी धरितों
तरी सौख्य सीमेस ना घेतसे.
नाही अशी सौख्यसीमा कुठेंही,
जरी पाहिजे मोद तुम्हां महा- ॥ १ ॥

ही आत्मवल्ली जधीं सेविली मी
तदा पावली स्फूर्ति या अंतरीं;
त्या स्फूर्तिनें, या मनें चिंतियेलीं—
तशी गायनें मी करी सत्वरीं.
देवा, अशा दिव्य राष्ट्रार्थ माझी
घडो नित्य सेवा असें मागणें
छे, मी करी याचना याचदेशीं
घडो जन्म सारे, न हें सांगणें.
येवो कसेही मला जन्म येथें,
अहो लोचनांनो सहा ते सहा ! ॥ २ ॥

हा देश माझा स्वदेशार्थ मोहे
असें नित्य नातें पुरा जोडिलें;
आतां न तोडी सुमैत्रीस तीचें
पहा वेड माझ्या मना लागलें!
प्राणाहुनी प्यार आहे मला फार;
याचाच आधार जीवा असे
हा संकटीं बंधु आनंदिं बंधू
सदा बंधु बंधुत्व दावीतसे.
याचें कसें श्रेष्ठ तें बंधुनातें
पहा भारितें या दिशाही दहा! ॥ ३ ॥

अंधास काठी तशी गोमटी स्त्री
जशीं कामलुब्धा जगीं होतसे;
नेत्रा तसा देश हा सौख्यसृष्टी
न दृष्टी कदां न्यून शोधीतसे.
होवो किती हीन होवो किती दीन
होवो किती म्लान हा अंतरीं,
यातें न सोडी, जोडीन, ठेवीन,
पाहीन या अंतरीं मी तरी.
यातें सदा अंतरीं सांठवीन
जरी जाहला देहही भग्न हा;
राष्ट्रीं महाराष्ट्र देशास पाहा,
पुन्हां लोचनांनो, पहा हो पहा! ॥ ४ ॥

## ११८. माझा महाराष्ट्र

'पद्मदल' १९२७ — स. वा. निफाडकर

भूषागणीं हिंदभूच्या गळीं तन्मणी वा शिरीं सन्मणी शोभला
देवादिकीं शक्र, नक्षत्रिं कीं शुक्र, मीनांमधें नक्र तैं जाहला
देवर्षिमाजीं मिळे मान्यता जी अहो नारदा, मान्यता पावला
माझा महाराष्ट्र राष्ट्राधिराजा ! मुदें वंदितों मी तया पाउलां—१

स्वातंत्र्यसंपादनीं आणि सद्धर्मसंरक्षणीं प्राणही अर्पिले
ज्याच्या सुपुत्रीं सदा दिव्यक्षेत्रीं सुखानें स्वयें संगरीं आपुलें
संहारुनी आपदा आणि संपादुनी संपदा सद्यशा वर्धिले
माझा महाराष्ट्र राष्ट्राधिराजा ! मुदें वंदितो मी अशीं पाउलें—२

जी कर्मभूमी, तपोभूमिही, तेजभूमी तशी पुण्यभू गाजली
ती कर्मनिष्ठा तशी तत्वनिष्ठा अणी बुद्धिमत्ता जिथें नांदली
वीरां महन्मंगलकारणें जन्म देऊनि वीरप्रसू जाहली
माझा महाराष्ट्र राष्ट्राधिराजा ! अशी मायभू वंदिली माउली—३

गोदावरी आणि कृष्णा वहाती अशी कीर्ति ज्यांची पुराणांतरीं
चैतन्य संचार झाला अहो राष्ट्रकार्यार्थ येथें जडाभीतरीं
बोला अशी पुण्यभूमी असे कां तुम्हां ठाउकी अन्य कोठेंतरी
माझा महाराष्ट्र राष्ट्राधिराजा ! तया वंदनातें सदा मी करी—४

दुर्दैवयोगें महद्भाग्य भागे तयापासुनी दूर वेगें जरी
स्वातंत्र्यलक्ष्मी नसे आज गेहीं, जरी रंगली श्वेतद्विपांतरीं
हा आत्मविश्वास आणीन ती खास आहे असा अंतरीं जोंवरी
माझ्या महाराष्ट्रभूमींत घेईन जन्मास मी हो सदा तोंवरी—५

## ११९. नव महाराष्ट्र गीत

'सावरसुधा' १७-१०-८२   शिवकुमार (शं. त्र्यं.) नेवासकर

श्यामल उपलांचे अंतस्तल वाही अमृत धारा
गोपा-कृष्णा, सह्यगिरीचा वाहे निर्भय वारा
राष्ट्रकूट-चालुक्य पराक्रम तुझीच गौरव गीते
महाराष्ट्र जय ! महाराष्ट्र जय ! महाराष्ट्र जयते ॥ १ ॥

उत्तरभागीं तुझ्या नर्मदा नदी पयोष्णी वाहे
दक्षिण भागी घटप्रभेचा प्रभाव गाजत आहे
पूर्वी वाईनगंगा पश्चिम गाई सागर गीते
महाराष्ट्र जय ! महाराष्ट्र जय ! महाराष्ट्र जयते ॥ २ ॥

भरज्वानीची ज्वारी डोले विशाल इक्षूराजी
वैदर्भी कर्पासे कोंकण श्रीफल आम्र निकुंजी
धन्य मुंबई अमुची सागर-तेल पुरवठा करिते
महाराष्ट्र जय ! महाराष्ट्र जय ! महाराष्ट्र जयते ॥ ३ ॥

विश्वमोहिनी शिल्पकला तव वेरूळ आणि अजिंठा
बघता सारा स्वर्गलोकही झाला बहु शरमिंदा
अमृतास ती ओंवी जिंके मराठीत जी गाते
महाराष्ट्र जय ! महाराष्ट्र जय ! महाराष्ट्र जयते ॥ ४ ॥

हिंदु-ख्रिश्चन-मुसलमान हे धर्म-भावना भेद
अर्पी जीवन एकचि सर्वां मायभूमि निज हार्द
खेळीमेळी जीवन फुलवा या आशेने जगते
महाराष्ट्र जय ! महाराष्ट्र जय ! महाराष्ट्र जयते ॥ ५ ॥

जगांत सुख वा वैभव मिळतें अकस्मात तें नाही
ज्ञान-शिस्त-समतेची चढवा पुरुषार्थाने बाही
टाका आळस जो जें वांछी ते ते होतचि जाते
महाराष्ट्र जय ! महाराष्ट्र जय ! महाराष्ट्र जयते ॥ ६ ॥

## १२०. उठ मराठ्या !

'निशिकान्त', धुळे

'जय महाराष्ट्र' (श्री. डी. व्ही. कुळकर्णी)

उठ मराठ्या, उठ मावळ्या इतिहासाला घडवूं जगीं ।
तव भाग्याची शेती बहरे, मराठ देशीं येई सुगी ॥

तुझ्या पाठीशी उभी राहिली संतांची पावन वाणी ।
आशीर्वादा देई तुजला तुळजापुरची भवानी ॥

युगा युगांचे शिव-बाजींचे स्वप्न आजला होत खरे ।
आज फडकले तुझ्या यशाचे सह्याद्रिच्या माथीं तुरे ॥

ज्ञानेशांची अमृत-वाणी अतां वैभवे मिरवेल ।
अभंग-वाणी तुकयाची अन् मुक्त स्वरें ही गाईल ॥

माय-मराठी आज जाहली पाश सोडुनी मुक्त जरी ।
नव राज्याची जबाबदारी येई तुझिया आज शिरीं ॥

राष्ट्रासाठीं जगणें मरणे परंपरेचे ब्रिद अपुले ।
त्या ध्येयाची याद राहूं दे शाहिराने गित म्हटले ॥

# १२१. स्वराज्याचा पोवाडा

'फुलोरा', जुलै १९८२ **श्रीराम पचिंद्रे**

पावन झाला नरवीरांच्या न्हाऊन रक्तांनी,
सह्यगिरीचा कणकण सांगे अजुन ती कहाणी ॥ धृ० ॥

जुल्मी सत्ता मत्त जाहली,
भारतभूला गिळू लागली,
मराठशक्ती तरी झोपली,
त्यावेळी अवतार घेतला शिवभूपालांनी—१

आकांक्षा ही दाटली उरी,
'व्हावे अमुचे राज्य भूवरी',
ध्येय पूजिले हृदयमंदिरी,
सादेला पडसाद दिला त्या कडेकपाऱ्यांनी—२

शूर केसरी अहा गर्जला,
पहाडातला शूर मावळा,
शत्रु मर्दण्या सिद्ध जाहला,
उभी पाठिशी तुळजापुरची चंडिका भवानी—३

दैत्य जणू ते चालुन आले,
इथेंच त्यांना खडे चारिले,
स्वप्न सर्व साकार जाहले,
छत्र ढाळिले शिवरायांवर स्वतःच देवांनी—४

त्यासम तोची भूप जाणता,
शिवराया तर अमुची अस्मिता,
शब्दहि सरले कवनी गाता—
शिवचरणी ही असे वाहिली शाहीरी वाणी—५

# १२२. आम्ही महाराष्ट्रकन्या

'आकाशवेडी' १९६८ | पद्मा

आम्ही महाराष्ट्रकन्या
माय मराठी आमुची;
स्वर्गाहुनीहि आम्हांला
माया मराठी भूमीची. १

काळा सह्याद्रीचा कडा
कळसूबाईचें शिखर
कृष्णा भीमा गोदे संगें
आहे आमुचें माहेर. २

मुक्ता, जना जागविती
भोळ्या भक्तीने पहाटे,
जिजा, लक्ष्मी शिकविती
आम्हां स्वातंत्र्याची गीतें. ३

आम्ही महाराष्ट्रकन्या
कुळधर्म भागवत,
आम्हां विठूच्या लेकरां
एक विठूचीच जात. ४

आम्ही महाराष्ट्रकन्या
नका जाऊं कोणी वाटे;
हिरव्या कोंकणांत आहे
गुप्त तलवारीचें पातें. ५

म्हणा कळ्या या जाईच्या
परी मायभूमीसाठी
करूं हातांचीहि ढाल
बाळ बांधूनिया पाठी. ६

अवघ्या भारताची सेवा
बाणा आमुचा मराठी,
प्राण तळहातावरी
देशासाठी, धर्मासाठी. ७

## १२३. महाराष्ट्राप्रत

'काव्यसरिता' १-५-६३ ल. म. पटवर्धन

ज्ञानेश काव्या तव भूषवीती ।
जिवांस संजीवन नित्य देती ।।
जनाई मुक्तेश तुझीच लेणी ।
आणि तुकोबाची अभंगवाणी ।। १ ।।

सामर्थ्य डिंडीम समर्थ गर्जे ।
युद्धास व्हा सज्ज झणिं निघारे ।।
शिवप्रभू हा तव सारथी भला ।
तान्हाजि सेनानी तुला लाभला ।। २ ।।

येसाजि बाजी आणि तो मुरारी ।
महारथी हे रथि कितीतरी ।।
स्वातंत्र्ययुद्धार्थ रणांत ठाकले ।
झुंझार योद्धेहि मराठमोळे ।। ३ ।।

खिंडीत शत्रू कधिं गाठिती ते ।
अकस्मात घाला कधिं घालिती ते ।।
कावा गनीमी लढण्याची रीती ।
रिपूस बेजार करीत होती ।। ४ ।।

करून म्लेंच्छांवर घोर हल्ले ।
घेती अहो जिंकुनि कोट किल्ले ।।
दिल्लीपतीशी कधीं झुंज घेती ।
काळाशी खेळा जणु खेळताती ।। ५ ।।

मरून म्लेंच्छांसहि मारिताती ।
मारीत मारीत स्वराज्य घेती ॥
घरां जयश्री निज आणिती ते ।
ते धन्य त्वत्पुत्र गमे अम्हांते ॥ ६ ॥

## १२४. जय महाराष्ट्र

‘अग्रणी’ एप्रिल १९६९ **सोना पठारे**

जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र ललकार
घुमवित जयजयकार ठेऊं या घुमवित जयजयकार ॥ धृ० ॥
उजळत येतिल दाही दिशांना किरणें बालरवीची
जागीं होतिल रानपांखरें गीत नवें तीं गातीं
नाचति लतिका फुले झरे अन् त्यांतून ये झंकार—१
सह्याद्रीच्या गिरी कपारी घुमवा हीच लकेरी
खवळे सागर मावळतीला डोलत नौका वरती
फडफडा उडोनी शिडें तयांची त्यांतुन ये आवाज—२
नागपूर अन् सारी मुंबई कामकरी जनतेची
मराठवाडा वऱ्हाडप्रांतीं शेती शेतकऱ्यांची
कसणारांची करुया धरती राहूं एक समान—३
जर कां असली या धरतीवर अन्यायी आसनें
आव्हान पुकारित देती त्यांना महाराष्ट्राचीं मनें
टाकूं पाऊलें प्रगतिपथावर अतां कशी माघार—४
रोवुनि झेंडे अटकेवरती वीर मराठे येती
लढे लढविले स्वातंत्र्याचे महाराष्ट्र अग्रणी
पुन्हां पताका समानतेची इथेंच फडफडणार—५

## १२५. रायगडा

'शिवस्वप्न' १७-१२-६१ — प्रफुल्लदत्त (द. वि. तेंडुलकर)

सह्याद्रीचा कडाकडा
रक्षिलास तूं रायगडा ॥ धृ० ॥

मावळच्या खोऱ्याखोऱ्यांतिल
शार्दुलांचें उभारुनी दल
जागविलें अवघें कोंकणतल
ठेविलास अंमल करडा. १

पराजयाचें स्वप्न जयास न
समरव्रणांचे अंगीं भूषण
"मरेन परि ना फिरेन" करि पण
असा शिपाई करुनि खडा. २

स्वातंत्र्यास्तव होउनि वेडा
इथें नाचला अरबी घोडा
शौर्याचा घुमवीत पवाडा
शत्रूला चारीत खडा. ३

तुझा पाहुनी दुरुनीही ध्वज
थरारलें गनिमांचें काळिज
समजुनि होते मदोन्मत्त गज
व्यर्थ मराठ्यांशीं झगडा. ४

भोंवतालच्या खेड्यांमधुनी
अजून गाती किसान-रमणी
पराक्रमाची तुझिया गाणीं
कधीं शिंपिता शेण-सडा. ५

अनाथ येथें आज उभा तूं
म्हणुनि चहुंकडे चाले मी-तूं
साधियले परक्यांनी हेतू
मुलुख तुझा पडतां उघडा. ६

## १२६. माझी माती

'कैरविणी' सप्टेंबर १९६२ प्रफुल्लदत्त (द. वि. तेंडुलकर)

आज प्रयासांवाचुनि जुळती प्रास, विरे पदिं छंद
रसवंतीच्या अधरीं भिजला माझा जीवन-गंध ॥ धृ० ॥

माझी माती झाली पणती संतदर्शनासाठीं
आर्त अंतरीं तिनें फुलविल्या कितीतरी फुलवाती
कणकण करुनी गोमय, कोरुनि उरीं स्वस्तिकाकार
तिनें वाहिला ज्ञानेशाच्या चौरंगाचा भार
जनाबाईच्या पर्णकुटीला तिनें चढवितां रंग
जात्यासह जोडाया नातें अवतरला श्रीरंग
तुकयाच्या नजरेला जडतां प्यास पांडुरंगाचा
हिरवळला त्या अभंगात मम भाव अंतरंगाचा.
रामदास गर्जले इथें "जय, जय रघुवीर समर्थ"
जीवन झालें सार्थ, उतरलें कुशींत शिव-सामर्थ्य.
तिच्या स्नेहज्योतींत उमललें विश्वाचे संबंध
रसवंतीच्या अधरीं भिजला माझा जीवन-गंध.
मातीच्या पेल्यांत माझिया शिव-स्वप्नांचे रंग
चर्चुनि ते अंगांगा झाला महाराष्ट्र बजरंग.
दिगंत ग्रासित येतां असुरी स्वामित्वाची मूठ
अश्वखुरांतुनि प्रस्फुरले मीं, "अतां मराठ्या उठ!"
थयथयला मग तो जाळाया अन्यायाची लंका
दुमदुमला आसेतुहिमाचल शौर्याचा त्या डंका.
सह्याद्रीनें बहाल केल्या कड्याकड्यांच्या ढाली
गडागडावरि माय भवानी रिपु-रक्तानें न्हाली.
वज्राचे आघात झेलिले उरिं माझ्या मातीनें
ज्वलंत अभिमानाच्या अपुल्या बुरुजाच्या छातीनें
चित्याच्या झेपेपरि भिडली, लढली होउनि धुंद
रसवंतीच्या अधरीं भिजला माझा जीवन-गंध.

# १२७. महाराष्ट्र उन्मेषशाली

'सरिता' १०-१०-७२ प्रफुल्लदत्त (द. वि. तेंडुलकर)

महाराष्ट्र हा स्वामिकार्यार्थ येथे
उभी राहिली संघशक्ती सदा
इथें खड्ग भाल्यावरी शौर्य नाचे
दुभंगावया उद्धत्तांच्या गदा—१

मराठा वरी राजनीती शिवाची
पदी नम्र होतो समर्थांचिया
गुणांची जिथे होतसे बूज तेथे
प्रसंगी घजे प्राण अर्पावया—२

तुका एकतारीत ध्यानस्थ होता
व्यथा बोलती हो अभंगातुनी
चढे लोचनी नीर इंद्रायणीचें
भ्रमे नाव निवृत्तिच्या रंगणीं—३

इथें पैंजणांची नशा पौरुषाला
भिजे रात्र इष्कात येथे जरी
तरी राउळी कीर्तनी श्रीहरीच्या
खरी रांगते भाबडी वैखरी—४

तशी येथली मृत्तिका ही विरागी
जटा, छे! तपस्या शिरी धारिते
कधी रौद्ररूपें दिगंतास वेढी
कधी पाप गंगेपरी वारिते—५

इथे अर्चना होइ विद्याधराची
इथे भेटतो अर्जुनाला हरी
मिळे येथ चौरंग गीतेस त्याच्या
गुरुत्वा इथे मान ब्रह्म्यापरी—६

इथे याचिता याचितो ओंजळीने
प्रपातातुनी दान हाती पडे
तपःपूत जो दंडकारण्य लंघी
तयाचेच ओलावते आंतडे—७

असा हा महाराष्ट्र उन्मेषशाली
इथे भाव-पंचामृताचे घडे
उभा ठाकता स्वत्व संरक्षणाला
झडे झुंज, वैरी दिगंती दडे!—८

# १२८. पुनः पुन्हा

२०-१२-८७ —दि. मा. प्रभुदेसाई

महाराष्ट्र माझा, महाराष्ट्र माझा, '**महा-राष्ट्र**' व्हावा पुन्हां भारतीं
पुन्हां सर्व व्हावे तया पायीं लीन, गावी तयांनी पुन्हां आरती—१

पुन्हां जन्म घ्यावा 'शिवा'ने इथे अन् करावी शिवशाहीची स्थापना
वरदायिनी होवो आई भवानी असे आमुची हीच विज्ञापना–२

पुन्हां एकदां 'लोकमान्यां'नी यावे, 'गीता-रहस्या' कथावे पुन्हां
षंढत्व टाकोनी मराठा उठावा, करावी तयें शौर्य-आराधना–३

किती जातीभेद, किती धर्म-पंथ, किती अंधश्रद्धा बळावे जनीं
'स्वातंत्र्यवीरा'! पुन्हां जन्म घ्याना, करा मुक्त त्या शृंखला तोडुनी-४

असें स्वप्न वेडें, अशी आस मोठी, करुं कां अशी रम्य ही कल्पना?
'पुनर्जन्म घेतो इतिहास' येथें असें ज्ञात हे सर्व विद्वज्जनां–५

## १२९. शाहिरी मुजरा

'देवदर्शन' २६-१-६४ शाहीर हरीभाऊ पाटील

कोटी मुखांतुनी बोल उमटला, जय जय महाराष्ट्रा
शाहिरी मुजरा महाराष्ट्रा ॥ धृ० ॥

भावभक्तिचा, देश आमुचा
शिवशक्तिचा, देश आमुचा
शूरवीराचा, मर्द गड्याचा,
सह्यगिरीचा, सातपुड्याचा,
तापी, गोदा, कृष्णाकडेचा
महाराष्ट्राचा सूर्य प्रतापी उदयाचलिं आला, हरहर महादेव बोला. १

वीर प्रतापी राय शिवाजी
बाजी प्रभु अन् मुरारबाजी
शेलारमामा, नरवीर तानाजी
सगनभाऊ, शाहीर होनाजी,
वासुदेव बळवंत, उमाजी
त्वरा करा, या, बघण्या अपुल्या स्वतंत्र महाराष्ट्रा. २

सह्याद्रिच्या कडेकपारीं
आज घुमतसे दिव्य तुतारी
गगनाना गवसे ललकारी
पावन झाला गड शिवनेरी
लाख मनांतुनी उंच उसळला, गगनीं जरिपटका. ३

लढतां लढतां पुढेंच जाणें
चढतां चढतां शिखर गांठणें
पळतां पळतां घासच गिळणें
मरतां मरतां अमरच होणें
झंझावाती जीवन जगणें
वाऱ्यावरती स्वार होऊन, घोडदौड दौडता. ४

संतांची ही संतभूमि ही
ज्ञानेशाची ज्ञानभूमि ही
शूरवीरांची शूरभूमि ही
कर्मविरांची कर्मभूमि ही
पुण्यात्म्यांची पुण्यभूमि ही
कणकण झिजली, क्षण न थांबली माझी मायबोली
मराठी सिंहासनीं बैसली. ५

# १३०. महाराष्ट्र राज्य

'पुष्पगंधा' १३-१-६६ **यशवंत पारखी**

मराठ्यांची ध्वजा उत्तुंग आकाशी उभी आहे,
महाराष्ट्रातली देवी भवानी तोषली आहे.

मराठी रामदासाचा, तुक्याचा बोल घुमताहे,
सुभाषा ज्ञानदेवाची सुधेशी पैज करताहे.

महाराष्ट्रातली माती मराठी मातिचे वाडे,
मराठा करविता कर्ता मराठी जिद्द ही आहे.

मराठा जन्मला येथे, मराठा पोसला येथे,
मराठ्यांच्या कमाईच्या महाराष्ट्रात तो आहे.

मराठी छातिचा दगडी सिमेचा कोट जो आहे,
मराठी मनगटांवरती भरोंसा भारता आहे.

मराठी राज्यशकटाचा मराठी सारथी आहे,
मराठी राज्यदरबारी मराठी मावळा आहे.

मराठी आसनावरती मराठी वारसा आहे,
शिवाजीच्याच आत्म्याची तयाला मान्यता आहे.

उठा निद्रेतुनी जागे, उठा स्वप्नातुनी जागे,
मशाली घेउनी हाती तमी कोणी उभा आहे.

महाराष्ट्रा ! विकासाची तुतारी वाजते आहे,
तुझ्या स्वप्नातल्या आशा पहा साकार होताहे.

विदर्भी वैनगंगेला मिळाया कोयना धावे,
सातपुड्यातला वारा सह्याद्रीच्या शिरी वाहे.

## १३१. माझा महाराष्ट्र

‘वसंत’ ५-१०-८४ वसंत पालेकर

आम्ही मराठी जगू राष्ट्र-धर्मी
त्यजू प्राण हे भारतासाठी या ।
रक्तात आहे विजीगीषु वृत्ती
कधीही न भीती उभ्या भारता ।
सामर्थ्यशाली यशो-बुद्धि-कीर्ती
जिच्या गाति गाथा स्वयंसाक्षि हा ।
उद्‌घोष होतो जयाच्या युयुत्सी
हृदी राष्ट्र-निष्ठा असे अस्मिता ।—१

वैराग्य दावू प्रसंगी अखंडी
समर्पू सदा आमुची जीवने ।
घेऊनि हातात झेंडा तिरंगी
महाराष्ट्र माझा उभा विक्रमे
झुंझार बाणा प्रसिद्धी दिगंती
क्षिती कैसी आम्हा धरा कारणे ।
अन्याय ठेचूनि रक्तात रंगी
हटू ना कधीही कृतांतापुढे ।—२

येथे खडा हा कणा भारताचा
उभा रांगडा सह्य द्रोणागिरी ।
पान्हा फुटावा भिमा-चंद्रभागा
सु-कृष्णासवे पुण्य गोदावरी ।
आहे पहारा सदा सागराचा
करी मुक्तवर्षा गिरी भूवरी ।
तैशा घडाव्या नव्या भाग्यरेषा
उद्या जीवनी भव्य कारागिरी ।—३

ज्ञानेश्वरांची इथे गाइ वाणी
तुका, नाथ, चोखा चिरंजीव ते ।
वंदी दऱ्या रामदासास साक्षी
इथे गाइ मुक्ता जनाई मुदे ।
वैराग्य-वारी दिल्या ज्यांनी खाणी
पताका समानी उभारीति जे ।
शौर्यत्व-शांती इथे गाति गाणी
जगी वैखरी अमृता शोभते ।—४

राजे शिवाजी प्रभू, मावळ्यांचे
मराठे तसे पेशवे झुंजती ।
दिल्लीश्वरांचे ठरावे विधाते
इमानी लढावे रणी गर्जती ।
बाजी इथे पावनी रक्त गाते
चिरंजीव तो सिंह नाना व्रतीं ।
लक्ष्मी-अहिल्या सती रागिणींचे
धरा भूषवी सात्त्विकी आरती ।—५

क्रांति विराजे नव्या भारताची
स्वराजार्थ चेते पुन्हा यज्ञ तो ।
गर्जे इथें लेखणी 'केसरी'ची
फुले रानडे गोखले वंदितो ।
बुद्धी स्फुरावीच आगरकरांची
करा मूजरा वासुदेवास तो ।
शाहू नि कर्वे व सावरकरांची
स्फुरे कर्मभूमी सदा मानितो ।—६

येथे विसावा प्रभू रामचंद्रा
घडावे जणू ऐक्य ते संस्कृती ।
भेटीस येई विठूदेव भक्ता
विटेतून जन्मे उभी पंढरी ।
लिंगे स्वयंभू इथे ज्योति बारा
गणेशास अष्टी चला जेजूरी ।
शांती मनाला खऱ्या देशधर्मा
महामंत्र लाभे नवी जागृती ।—७

किल्ले गडांनो ! महादेव गर्जा ! !
झरा पाझरा शौर्य दावा पुन्हा ।
बा शाहिरांनो ! म्हणा वीर गाथा
डफाला करा जाग सांगा गुणा ।
येवो जरी आक्रमी शत्रु-राष्ट्रा
महाराष्ट्र धावे न राहे उणा ।
विश्वास ठेवा महाराष्ट्र माझा
जणू भारताचा ठरावा कणा ।—८

## १३२. अवतान

'महाराष्ट्राला मुजरा' आत्माराम पाटील

लोकशाहींत लोकं नाहि उठलं
तर लोकांचं सौराज्य कुठलं ? ॥ धृ० ॥

स्वराज्याचा मावळला सूर्य शिवाजी
पडला रायगड झाला कैद संभाजी
औरंगजेब काळ आला राजाराम जिंजी
काय धनाजीचं घोडं उटलं
छा ! छा ! सह्याद्रीचं रान पेटलं ॥
सिंहगडावर सिंहभूमीवर, शत्रू उरावर
किल्ला केला सर दुश्मान खुटलं
नाही मराठी माघारीं हटलं ॥
पावनखिंड बाजी, वसईला बाजी, आणिबाणीस जी
तोफे तोंडीं द्या अप्पानं म्हटलं
नाहि मराठी माघारी हटलं ॥
झालं पानीपत । जरी झाला अंत । दिली नाही पाठ ।
साऱ्या मुलखाचं शिणगार लुटलं
नाहि मराठी माघारीं हटलं ॥
आज आणिबाणीचा वखत मराठ्या तुला
घाव मुळास बसलाय आज तुझ्या रोपट्याला
तुझ्या राज्यामंदी तोंड उघडायूची चोरिरं तुला
आज वक्ताला जाग, तुझ्या रक्ताला जाग, तुझ्या तक्ताला जाग
जर वक्ताला अवसान सुटलं
तर लोकांचं नशीब फुटलं ॥
काका, मामा, भाऊ उजवं वीर गेलं
देव धडकलं, डावं अडकलं
डावं जिंका तर झेंडा फडकलं
कृष्णा, गोदाचं दूध नाहि आटलं
सारं सह्याद्रीचं रान पेटलं ॥

हंगामाला घाम त्याच्या बरकतीला जोम
महाराष्ट्राची मुंबई, नेटाचा घाम
बरकतीनं हरकत जाइल सांगे आत्माराम.
जर हाटलं तर मराठं कुठलं
चला आखरीचं अवसान सुटलं ॥

## १३३. जय महाराष्ट्र देशा

'भारत काव्यसंग्रह' प्रभाकर पाध्ये-ठाणें

जय जय जय जय महत् राष्ट्रा नव महाराष्ट्र देशा
वारकऱ्यांच्या, धारकऱ्यांच्या, शृंगाराच्या देशा-
जय महाराष्ट्र देशा ॥ धृ० ॥

परशुरामा-रामप्रभूंची, पुंडलिकाची भूमी
हिच्याच उदरीं शिवबा, बाजी घे राघो भरारी
नाना, लक्ष्मी, क्रांतिवीर ते त्यांची इथली माती
त्या मातीच्या सह्याद्रीच्या नव महाराष्ट्र देशा ॥ १ ॥

महानुभावी चक्रधरांच्या लीलांची तूं महती
अमृतवाणी ज्ञानेशाची पसायदाना हातीं
समर्थवाणी, नामा, एका, तुकया अभंगवाणी
त्या वाणीच्या निर्मल पाण्या नव महाराष्ट्र देशा ॥ २ ॥

मुक्तेश्वर ते पंडित वामन, मयूर कविंची ख्याती
पुराणांतुनी वेचूनि रत्नें सजली प्राकृत बरवी
थाप डफावरी सगन, प्रभाकर कविरायांची द्वाही
त्या द्वाहीच्या, भूपाळीच्या नव महाराष्ट्र देशा ॥ ३ ॥

दर्पण, माला, काळ, केसरी दावी अपुलें पाणी
आगरकर अन् फुले ज्योतिबा, कऽ्यांची पुण्याई
पांच कवींची, तांबे, बींची रविकिरणाची स्फूर्ति
त्या स्फूर्तीच्या नऽ्या मनूच्या नव महाराष्ट्र देशा ॥ ४ ॥

हुत आत्म्यांची मंगल करणी अपूर्व त्यांची भक्ती
साथ तयांना मराठमोळ्या उज्ज्वल इतिहासाची
त्याच प्रभावीं तुला लाभली धवला मंगल कीर्ती
त्या कीर्तीच्या शिवशक्तीच्या नव महाराष्ट्र देशा ॥ ५ ॥

## १३४. जय महाराष्ट्र

'महाराष्ट्र गौरवगीते' मंगेश पाडगांवकर

जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र जय सळसळता अभिमान
जय डोंगर हे; जय जल इथलें; जय वृक्ष आणि पाषाण. ॥धृ०॥

घरांघरांतुन इथल्या घुमलीं महानुभावी गाणीं
ओवि ऐकतां जनाबाइची डोळां दाटे पाणी
तिन्ही लोक आनंदें भरिते श्रीतुकयाची वाणी
शक्तीचें भक्तीचें आहे येथें तीर्थस्थान—१

हिरवें कोंकण करी वळेसर गंधित बकुलफुलांचा
कृष्णाकांठीं काळी माती उधळी खच मोत्यांचा
गोमंतक भूमी ही नटली साज लाख रत्नांचा
फुलांफुलांतुन झऱ्याझऱ्यांतुन सौंदर्याचें गान—२

घामाच्या थेंबात येथल्या संगम शततीर्थांचा
थाप डफावर पडतां उसळे थेंब थेंब रक्ताचा
पराक्रमाचा कंठ भूषवी हारच शृंगाराचा
कडकडतो पोवाडा; लचके लावणिची मग तान—३

अन्यायावर पाय रोवूनी किल्ले शूर मराठी
अन् शूरांचा गरम पवाडा शूर अजूनहि गाती
आपत्तींचा पहाड दचके बघुनि मराठी छाती
शिवरायांच्या चारित्र्यावर विश्वगोल कुर्बान—४

इथेंच हरिनें अहो वाहिलें पाणी नाथांसाठीं
जनाबाईचें दळण घेऊनी बैसे तो जगजेठी
इथें बोबडा नामा भरवी घांस विठूच्या ओठीं
या मातीच्या भक्तीसाठीं देवहि होत लहान—५

श्रमणारांच्या नव स्वप्नांचा इथें घुमे ललकार
पहिल्या घांसावरती येथें श्रमिकाचा अधिकार
समसत्तेला हरेक इथलें मनगट हो आधार
इथें विसरतिल मानवतेस्तव सारे भूक तहान—६

शिवरायाच्या तलवारीचें तेज इथें प्राणांना
तानाजीच्या कुर्बानीची धार इथें गाण्यांना
इथें जिण्याची अम्हां न पर्वा न्यायास्तव लढतांना
सह्याद्रीच्या उंच कड्यांवर अहो घुमे जयगान—७

दूर तिथें क्षितिजावर देखा नवीन तेजोरेषा
खेड्यांमधल्या घराघरांतुन नवी थरारे आशा
नवींच स्वप्नें, नवींच ध्येयें, नवींच त्यांची भाषा
या स्वप्नांचें या ध्येयांचें फडके उंच निशाण—८

# १३५. (१) माझा महाराष्ट्र
# (२) महाराष्ट्र महोदय

'महाराष्ट्र गाथा' ल. रा. पांगारकर

(कै. ल. रा. पांगारकर यांच्या 'चरित्रचंद्र' या आत्मचरित्रात सदरहू गीत पांच कडव्यांचे असून त्याचे शीर्षक 'माझा महाराष्ट्र' असे आहे. 'महाराष्ट्र गाथा'त या गीताची पंधरा कडवी असून शीर्षक 'महाराष्ट्र महोदय' असे आहे. नऊ क्रमांकापासून पुढे शिवाजी राजांचे वर्णन असल्यामुळे ती कडवी येथे घेतलेली नाहीत.)

महाराष्ट्र माझा असे हा पवित्र
हरिप्रीतिला या जगीं पूर्णपात्र ।
असा पुण्यभूभाग अन्यत्र नाही
मला नावडे यापुढे स्वर्ग कांहीं ॥ १ ॥

इथें चंद्रभागातटीं देव राहे
इथें पुण्य गोदावरीनीर वाहे ।
त्रिलोकीं पहा ! ज्ञानदेवी समान
नसे ग्रंथ सर्वांग संपूर्ण जाण ॥ २ ॥

महाराष्ट्र माझा त्रिलोकीं प्रसिद्ध
इथें नांदती सत्कवी संत सिद्ध ।
इथें शत्रुनिर्दाळणीं शूर वीर
इथें नांदती मानवांमाजि हीर ॥ ३ ॥

इथें कार्यकर्ते इथें विश्वधर्ते
इथें शोकहर्ते इथें लोकभर्ते ।
इहामुत्र सर्वाभवीं कर्णधार
इथें नांदले, नांदती, नांदणार ॥ ४ ॥

इथें गाजला मर्द राजा शिवाजी
तुकाराम भक्ताग्रणी वीर गाजी ।
इथें रामदास प्रभू तो समर्थ
अशा ना मिळे कोणता हो पुमर्थ ? ॥५॥

असो आज गाईन या सुप्रसंगीं
कथा प्रेमळा सोज्वळा अंतरंगीं ।
महाराष्ट्र सद्भाग्यसंपन्न झाला
स्मरूं आदरें पूर्वजांच्या यशाला ॥ ६ ॥

शिवाची विभूतीच राजा शिवाजी
महाभाग त्या जाहलें विश्व राजी ।
भले भावडे, गावळे मावळे ते
तयां वेधिलें लाविलें क्षात्र पंथे ॥ ७ ॥

बळी मावळे वीर तानाजी, बाजी
येसाजी प्रभूवीर मुरारबाजी ।
फिरंगोजी, नेताजी, धनाजी, गाजी
शिवाजीहि सप्रेम ज्यांतें नवाजी ॥ ८ ॥

---

'आनंदलहरी' प्रकाशन १९२०. लेखन–दासनवमी शके १८४१ पुणे (सन १९१९). प्रकाशक—ल. रा. पांगारकर.

या काव्यसंग्रहात शीर्षक 'महाराष्ट्र महोदय' असे असून पहिल्या कडव्यात 'या जगीं' या ऐवजी 'सर्वथा' हा शब्द आहे.

# १३६. माझा महाराष्ट्र

'आनंदलहरी' १९२० — ल. रा. पांगारकर

महाराष्ट्र माझा अत्यंत पवित्र ।
हरिकृपापात्र पुण्यभूमी ॥ १ ॥

कृष्णागोदाभीमातटिनींचा प्रांत ।
येथ पावे श्रांत विश्रांती तें ॥ २ ॥

साधुसंत कवी येथें थोर थोर ।
होती सच्चरित्र विश्वाद्भुतें ॥ ३ ॥

वेदशास्त्रधर्म पुराणांची चर्चा ।
देवतांची अर्चा जेथें तेथें ॥ ४ ॥

विठ्ठला राघवा दत्त शिवाशिवा ।
नामरुपें देवा पूजिताती ॥ ५ ॥

साधुसंतांपरी शूरवीर धीर ।
पुरुषांचें माहेर महाराष्ट्र ॥ ६ ॥

प्रपंच परमार्थ दोन्ही यथासांग ।
संपादिती व्यंग न ठेवितां ॥ ७ ॥

महाराष्ट्र प्रयागीं मिळती अति प्रीती ।
प्रवृत्ति निवृत्ती एकरूपें ॥ ८ ॥

महाराष्ट्र राजा राष्ट्रांसीं सकळां ।
कांपती चळचळां सानथोर ॥ ९ ॥

महाराष्ट्रीयांतें मराठे म्हणती ।
मरेंतों न हटती मरहट्ट ॥ १० ॥

सह्याचलोदरीं नृसिंह उपजती ।
प्रतापें कांपविती मेदिनी हे ॥ ११ ॥

धर्डिती चिर्डिती रडविती बळें ।
महारिपुदलें लोळवीती ॥ १२ ॥

निष्णात अत्यंत शस्त्रप्रहरणीं ।
जयांची करणी अघटित ॥ १३ ॥

मर्द मानी धीट वीरश्रीचे भोक्ते ।
वक्ते आणि कर्ते शूरमर्द ॥ १४ ॥

धर्मसंरक्षणीं राज्यसंपादनीं ।
आपदुद्धरणीं शूरमर्द ॥ १५ ॥

संत शिरोमणी वीर चूडामणी ।
मंत्रिलोकाग्रणी विश्वख्यात ॥ १६ ॥

शस्त्रीं आणि शास्त्रीं धर्मी आणि कर्मी ।
निपुण सद्धर्मी शोधकर्ते ॥ १७ ॥

स्वधर्म स्वदेश स्वभावादिकांतें ।
प्रिय प्राणांपरतें मानिताती ॥ १८ ॥

सिद्धमुनीसंतमहंतांची माय ।
ऐसें विश्व गाय भारतातें ॥ १९ ॥

भारताच्या वक्षस्थळीचा कौस्तुभ ।
सर्वराष्ट्रककुभ महाराष्ट्र ॥ २० ॥

एवं महाराष्ट्र आत्मा भारताचा ।
झेंडा नाचे त्याचा त्रैलोकांत ॥ २१ ॥

# १३७. मुशाफिरा चल माझ्यासाठी

'गंगा-जमुना' 		पी. सावळाराम

मुशाफिरा चल माझ्यासाठी
महाराष्ट्राच्या कृष्णेकाठी ॥ धृ० ॥

अपूर्व सुंदर मूर्त होऊनी
जिथें नांदते शौर्य मराठी
हरहर गर्जत जरिपटक्याची
जिथें नाचली भगवी काठी ॥ १ ॥

रक्त ठिबकल्या समशेरीचा
टिका शोभतो जिच्या ललाटी
शिवचरणावर जिने उधळली
जलपुष्पे ती अनंत कोटी ॥ २ ॥

तीर्थ रूपले जिच्या तटाकी
दत्त दिगंबर भक्तीसाठी
जिला लाभली समर्थ गुरूची
चैतन्याची शिकवण मोठी ॥ ३ ॥

शीळ घालते नरसिंहांना
जिथे लावणी सुस्वरकंठी
थाप डफावर ऐकून जेथे
उठती प्रेते क्रांतीसाठी ॥ ४ ॥

सह्याचलोदरीं नृसिंह उपजती ।
प्रतापें कांपविती मेदिनी हे ॥ ११ ॥

घर्डिती चिर्डिती रडविती बळें ।
महारिपुदळें लोळवीती ॥ १२ ॥

निष्णात अत्यंत शस्त्रप्रहरणीं ।
जयांची करणी अघटित ॥ १३ ॥

मर्द मानी धीट वीरश्रीचे भोक्ते ।
वक्ते आणि कर्ते शूरमर्द ॥ १४ ॥

धर्मसंरक्षणीं राज्यसंपादनीं ।
आपदुद्धरणीं शूरमर्द ॥ १५ ॥

संत शिरोमणी वीर चूडामणी ।
मंत्रिलोकाग्रणी विश्वख्यात ॥ १६ ॥

शस्त्रीं आणि शास्त्रीं धर्मी आणि कर्मी ।
निपुण सद्धर्मी शोधकर्ते ॥ १७ ॥

स्वधर्म स्वदेश स्वभावादिकांतें ।
प्रिय प्राणांपरतें मानिताती ॥ १८ ॥

सिद्धमुनीसंतमहंतांची माय ।
ऐसें विश्व गाय भारतातें ॥ १९ ॥

भारताच्या वक्षस्थळीचा कौस्तुभ ।
सर्वराष्ट्रककुभ महाराष्ट्र ॥ २० ॥

एवं महाराष्ट्र आत्मा भारताचा ।
झेंडा नाचे त्याचा त्रैलोकांत ॥ २१ ॥

## १३७. मुशाफिरा चल माझ्यासाठी

'गंगा-जमुना' — पी. सावळाराम

मुशाफिरा चल माझ्यासाठी
महाराष्ट्राच्या कृष्णेकाठी ॥ धृ० ॥

अपूर्व सुंदर मूर्त होऊनी
जिथें नांदते शौर्य मराठी
हरहर गर्जत जरिपटक्याची
जिथें नाचली भगवी काठी ॥ १ ॥

रक्त ठिबकल्या समशेरीचा
टिका शोभतो जिच्या ललाटी
शिवचरणावर जिने उधळली
जलपुष्पे ती अनंत कोटी ॥ २ ॥

तीर्थ रूपले जिच्या तटाकी
दत्त दिगंबर भक्तीसाठी
जिला लाभली समर्थ गुरूची
चैतन्याची शिकवण मोठी ॥ ३ ॥

शील घालते नरसिंहांना
जिथे लावणी सुस्वरकंठी
थाप डफावर ऐकून जेथे
उठती प्रेते क्रांतीसाठी ॥ ४ ॥

# १३८. महाराष्ट्र पुरुषोत्तम

'कोरीव लेणी' —पी. सावळाराम

नमोनमः नमोनमः
श्रीमन्महाराष्ट्र-पुरुषोत्तमा ॥ धृ० ॥

बावनगडची समररागिणी
मराठियेची कुलस्वामिनी
विजयश्री समशेर भवानी
पूजित तुझिया पराक्रमा-१

ज्ञानेशाच्या अमृत-ओठीं
वेद बोलतां तुझी मराठी
अभंग देही देहू कांठी
गर्जत तुकया विठ्ठलनामा-२

गोदातीरीं नाथ, जनार्दन,
कृष्णाकाठीं समर्थ होऊन
भीमे ठायीं ध्वज उंचावुन
उभा ठाकसी तूं अभिरामा-३

थाप डफावर तुझ्या यशाची
उधळित कवनें शाहीरांची
नाचत गौळण शृंगाराची
लुब्ध तुझ्यावर राधेश्यामा-४

सत्ता शासी तुझ्या मुखांतुन
निःस्पृहवाणी येता गर्जुन
कर्मयोगि ते, गेली निर्मुन
मृत्युंजय तूं वंद्य हुतात्मा-५

तूं बळीराजा तूंही वामन !
कोप अगस्ती तुझाच होऊन
होई सागर, एक आचमन
विराटरूपी तूं विश्वात्मा-६

दशांगुळें त्या तुझ्या शिरावर
जिरेटोप झळकतो युगंधर
रविचंद्राचें उजळत अंबर
मायबाप हो जन्मोजन्मा-७

# १३९. महाराष्ट्र गीत गाऊ!

'महाराष्ट्र गौरवगीत संग्रह' १९८६ —राजीव पांडे

गुढ्या तोरणे फुले लावू
चला महाराष्ट्रगीत गाऊ ॥
माझी महाराष्ट्र मायभूमी
तिच्यासाठी जगावे आम्ही
तिच्या इतिहास गाथेतले
पान सोनेरी व्हावे आम्ही–
राष्ट्र कार्याला जन्म वाहू ॥ १ ॥
इथं वऱ्हाडचा गोडवा
वरी पराक्रमी माळवा
लेणी मराठवाड्यातली
आणि कोकणची न्यारी हवा
रुप डोळे भरुन पाहू ॥ २ ॥
माझा महाराष्ट्र शिवबांचा
संत तुकडोजी ज्ञानोबांचा
झाला सन्मान भूमीत या
शूर वीरांचा सज्जनांचा
आम्ही त्यांच्या समान होऊ ॥ ३ ॥
सुख शांति रहावे इथे
भेद सारे विरावे इथे
राष्ट्र देवाची पूजा करी
साम्य सर्व धर्मास व्हावे जिथे
आम्ही सारेच एक होऊ ॥ ४ ॥

## १४०. महाराष्ट्र भूमींत

'ज्योत' मा. रा. पोतदार

माझ्या महाराष्ट्र भूमींत कितिक रत्नें महान
तेज तयांचे टाकी देश सारा उजळून ॥

माझ्या महाराष्ट्र भूमींत झाले ज्ञाना-तुकोबा
एकनाथ-नामा-मुक्ता-जना-दास-चोखोबा ॥

माझ्या महाराष्ट्र भूमींत वासुदेव क्रांतिवीर
जन्मली लक्ष्मी आणिक तात्या टोपेहि शूर ॥

माझ्या महाराष्ट्र भूमींत सह्याद्रीचा भव्य कडा
दे आठव शिवबाची आणि स्फूर्तीचा धडा ॥

माझ्या महाराष्ट्र भूमींत जन्मले 'बाळ-गोपाळ'
ज्योतिबा, कर्वे, साने अन् गोखले गोपाळ ॥

माझ्या महाराष्ट्र भूमींत धन्य माउली विनोबा
इथेच जन्मले थोर ते महापुरुष बाबा ॥

माझ्या महाराष्ट्र भूमींत अर्थरत्न चिंतामणी
न करी तुलना त्यांची अन्य देशाही कोणी ॥

माझ्या महाराष्ट्र भूमींत क्रांतिमेरू विनायक
सेनापती बापट तसे अगणित हिरे लाख ॥

माझ्या महाराष्ट्र भूमींत झाली; होतिलहि रत्नें
नुरते उणीव कशाची फुलते भूमी हर्षानें ! ॥

# १४१. नमोस्तुते महाराष्ट्रा

**महाराष्ट्र गौरवगीते** **श्रीकृष्ण पोवळे**

नमोस्तुते महाराष्ट्रा माझ्या मायदेशा
ज्ञानेशाच्या कसोटीची इथें स्वर्णरेषा–१

स्नानापाठीमागें धांवे येथें अन्नदाता
महाराचें पोर उरीं लावी ब्रह्मज्ञाता–२

वज्रा भेदणारा येथें जन्मला अभंग
कुंभाराचा, महाराचा येथें संतसंग–३

संन्याशाच्या झोळीमाजीं दान राजश्रीचें
कमंडलूंतून ओज सांडतें शस्त्राचें–४

झाला शंकराचा शूल भवानीचें पातें
सिंहाशींच लावी गड कोंडाणा हा नातें–५

तुटे खांद्यातून हात शस्त्र सुटेनाच
भांडीं वाजल्यावांचून प्राण जाईनाच–६

धुंद होऊन मद्यानें चूक होतां थोडी
स्वत्वरक्षणा सोलून घावींत कातडी–७

वैभवांत संन्यासी हा व्रती, कर्मयोगी
क्षात्रधर्म अंगीकारी प्रसंगीं विरागीं–८

येथें शिलाखंडामाजीं कैलासाचा वास
सह्यगिरीच्या माथ्याला ठेंगणें आकाश–९

# १४२. गर्जा संयुक्त-महाराष्ट्र भारती

महाराष्ट्र गाथा' डॉ. सुधीर फडके

जनतेच्या सत्तेची ज्योत जागती ।
गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती ॥ धृ० ॥

फिरंग्यास गोव्याच्या चारुनी खडे ।
माय मराठी बोली चालली पुढें ॥
एक भाषिकांची हो येथ संगती ॥ गर्जा ॥–१

हो निजाम, कोल्हापूर, औंध, जंजिरा ।
जनतेच्या दास्याच्या कुजट जंजिरा ॥
तोडी त्या एक महाराष्ट्र संस्कृति ॥ गर्जा ॥–२

सह्यपठारीच्या तेजस्वी रणकथा ।
रंगती शाहीर मुखें अजुनी ऐकतां ॥
इतिहासीं एक मिळे स्फूर्ति अन् गती ॥ गर्जा ॥–३

कोंकणच्या दुःखाची तरल स्पंदनें ।
नागपुरी जनतेची हलविती मनें ॥
माय एक धरणीला जेथ मानिती ॥ गर्जा ॥–४

शेतकरी जमिनीचा एथल्या धनी ।
कामगार जनतेचा येथ अग्रणी ॥
श्रमजीवी सत्तेची जेथ शाश्वती ॥ गर्जा ॥–५

भिन्न धर्म, जातीची सर्व बंधनें
तोडुनिया एकजीव जाहली मनें ॥
लोकयुगासाठीं जियें रक्त सांडती ॥ गर्जा ॥–६

## १४३. जय महाराष्ट्र

'मंदिका' २-१०-१९७६ राजा बढे

जय जय महाराष्ट्र माझा-गर्जा महाराष्ट्र माझा
रावी ते कावेरी भारत भाग्याच्या रेषा
निळे निळे आकाश झाकते या पावन देशा.
तुंग हिमालय, विंध्य, अरवली, सह्याद्री निलगिरी
उत्तर दक्षिण वारे पाऊस वर्षविती भूवरी
रेवा, वरदा, कृष्ण, कोयना, भद्रा गोदावरी
एकपणाचे भरती पाणी मातीच्या घागरी
भीष्मथडीच्या तट्टांना या यमुनेचे पाणी पाजा ॥ गर्जा....
भीति न आम्हां तुझी मुळीहि गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रिचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतुन नाद गुंजला महाराष्ट्र माझा ॥ गर्जा....
गलमुच्छे पिळदार मिशीवर उभे राहते लिंबू
चघळित पाने पिकली करितो दो ओठांचा चंबू
मर्द मराठा गडी ओढतो थंडीची गुडगुडी
ठसक्याची लावणी तशी ही ठसकदार गुलछडी
रंगरंगेला रंगेल मोठा करितो रणमौजा ॥ गर्जा....
काळ्या छातीवरी कोरली अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती खेळ जीवघेणी
निढळाच्या घामाने भिजला
दारिद्र्याच्या उन्हांत शिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचेही तख्त राखितो महाराष्ट्र माझा ॥ गर्जा....

# १४४. श्रीमहाराष्ट्र अमुचा नव्या नवलाचा

'कुमार पुष्पक' १९६१    कवि बलवंत (नरहर दिनकर दुगल)

श्रीमहाराष्ट्र अमुचा नव्या नवलाचा ॥ धृ० ॥

स्वातंत्र्यास्तव यज्ञ मांडुनी । प्राणांची आहुती अर्पुनी ।
अज्ञदीन दलितांना सुखवी । अमृतवाणीचा ॥ १ ॥

सह्याद्रीच्या कडेपठारीं । फुलवित डुलवित मावळखोरीं ।
भीमा, गोदा, कृष्णामाई । तापि, कोयनेचा ॥ २ ॥

परशुराम शिवखंडेराया । भवानिमाता सांभाळाया ।
हरिनामाचा गजर विठूचा । गर्जे भक्तांचा ॥ ३ ॥

ज्ञानदेव, तुकया, चोखोबा । रामदास, नामा, गोरोबा ।
एकनाथ जो नाथ अनाथां । संत शिरोमणिंचा ॥ ४ ॥

सत्याश्रय पुलकेशी पुरातन । शककर्ता तो शालिवाहन ।
छत्रपती शिवबा, संभाजी । ऐशा राजांचा ॥ ५ ॥

सिंधुदुर्ग गड सिंहपराक्रमी । शनिवारवाडा किल्ला वसई ।
शिंदे, पेशवे, होळकर, गाजी । मर्द मराठ्यांचा ॥ ६ ॥

सेनापती संताजी, धनाजी । तात्या टोपे शूर सवाई ।
अखंड झुंजत परसत्तेशीं । गनिमी काव्याचा ॥ ७ ॥

माय जिजाई देवि अहिल्या । स्फूर्ति देति ज्या सति मांगल्या ।
वीरोचित वर्षति वात्सल्या । राणी लक्ष्मीचा ॥ ८ ॥

न्यायमूर्ती गुरु भारतसेवक । पाटिल कर्वे समाजसेवक ।
भीम-ज्योतिबा आगरकर नव- । समाजद्रष्ट्यांचा ॥ ९ ॥

सेनापति बापट, पटवर्धन । अंत्यज दलितांचें उद्धारण ।
आंतरभारति ध्येय सनातन । सानेगुरुजींचा ॥ १० ॥

क्रांतिवीर फडके, सावरकर । लोकमान्य ते टिळक वीरवर ।
"स्वराज्य माझा हक्क असे" चिर । सिंहगर्जनेचा ॥ ११ ॥

चिनी असो वा पाकिस्तानी । संकट दिसतां अमुच्या भुवनीं ।
खड्ग उसळतें म्यानातूनी । काळ दुष्मनांचा ॥ १२ ॥

देशरक्षणा धांवुनि जाणें । तळहातावर शिरासि घेणें ।
स्वत्व राखण्या प्राण वेचणें । अशा मराठ्यांचा ॥ १३ ॥

ब्रीद न अमुचें कधीं ढळेल । सह्य न अमुचा कधी चळेल ।
हिमालयाला आश्वासील । अद्रि निर्भयाचा ॥ १४ ॥

जगताच्या उद्धारासाठीं । महाराष्ट्र घे अवतारासी ।
ज्ञानवीर्यकरुणेच्या पोटीं । ऋषी विनोबांचा ॥ १५ ॥

## १४५. अरं ही माती मराठ मुलखाची

'चमकणारे क्षण' १९७६ — आबासाहेब बल्लाळ (दत्तात्रय भोजराज बल्लाळ)

अरं ही माती मराठ मुलखाची ॥ धृ० ॥

दया क्षमा शांतीची
समतेची अन् ममतेची
त्यागाची बलिदानाची–१

थोर समाजसुधारकांची
सरस्वतीच्या मधुर स्वरांची
ज्ञानेशांच्या ओव्यांची
तुकारामाच्या अभंग वाणीची–२

चोखा, रोहिदास, सावताची
नरहर, गोरा, सेनाची
आळंदी, देहू, इंद्रायणीची
पैठण, पंढरी क्षेत्रांची–३

संत सखू जनाबाईची
जिजा अहिल्या माईची
ताराबाई, चांदबिबीची
झांशीवाल्या मर्दानीची–४

युगांतराच्या कीर्तीची
ही माती मराठ प्रांताची
राष्ट्रीय स्वातंत्र्याची
सदासर्वदा स्फूर्तीची—५

वडबाभुळ लिंबाची
पिंपळ, पिंप्रण, चिंचेची
हिरडी, माकडी, ऐनांची
लतावेलिंची, रानफुलांची—६

बोरे, कारे, करवंदीची
जांभूळ, हुंबूर, सागाची
भात, बाजरी, ज्वारीची
तूर, वटाणा, राळ्यांची—७

अफाटसफाट मैदानांची
दरडी, जंगल, खोऱ्यांची
रानडुकरे, वाघांची
कोल्हं, लांडगं, तरसांची—८

राघू, मैना, चिमणिंची
मोर, लांडोरी, पारव्यांची
कबुतर, कोकिळ, होल्ह्यांची
टिटवी, घुबाड, पिंगळ्यांची
—होर सांगणारांची—९

तांबाड-काळ्या रंगाची
खाऱ्या पांढऱ्या मोड्याची
खड्काळ दगड धोंड्यांची
विराट वैराण वनांची—१०

गडकोट रायगडाची
पुण्यामुंबई सातारची
वऱ्हाड, नागपूर, कोल्हापूरची
जय भवानी तुळजापूरची—११

पंढरीच्या त्या पांडुरंगाची
पेठ पालीच्या मंगळसुळीची
जेजूरीच्या शूर उमाजिची
यळकोट मल्हार मार्तंडाची—१२

अरबी सागर किनाऱ्याची
कार्ले वेरूळ लेण्यांची
गिरीकंदरें कैक गुहांची
साक्ष झळकत्या इतिहासाची-१३

सह्यगिरीच्या कणखरतेची
कृष्णा-कोयना प्रीतीची
पंचगंगा पावनतेची
मोरणा वारणा कांठाची—१४

माग, रामोशी, बौद्धांची
कुणबी, सुतार, लोहारांची
चांभार, कुंभार, धनगरांची
तेल्यांची, बारा बलुतेदारांची-१५

विशाल वैभव-कालांची
सर्वधर्म सहिष्णुतेची
लेखक, पंडित, महाकविंची
राष्ट्रीय एकात्म्याची—१६

१८५७ च्या स्वातंत्र्यवीरांची
बाबू गेनू अन् नाना पाटलांची
'पत्रीसरकार'च्या
हिंमतीची-१७

धर्मवीर संभाजिंची
राष्ट्ररक्षक संताजिंची
न्यायी प्रभुणे शास्त्रींची
स्वामिनिष्ठ बल्लाळांची–१८

पुरंदरच्या मुरारजींची
सिंहगडाच्या मालुसऱ्यांची
पावनखिंड-बाजीप्रभुंची
प्रतापगडच्या जिवाशिवांची-१९

प्रेरणा श्री समर्थांची
स्त्री-दाक्षिण्याची
राष्ट्रधर्म राज्यनिर्मितीची
शूर प्रतापी शिवरायांची–२०

किर झाडी जंगलांची
कात्रज, बोरघाट, खंडाळ्याची
बारा मावळ प्रांतांची
दुर्गमावघड वळणांची–२१

महर्षि शिंदे, शाहूंची
म. फुले आंबेडकरांची
सावरकर विनायकाची
वीर लहूजी फकिरांची–२२

टिळकागरकर, अत्र्यांची
अण्णाभाऊ, होनाजिंची
अमरशेख, गव्हाणकरांची
विनोबा राष्ट्रसंत तुकडोजिंची-२३

पहिल्या बाजीरावांची
घोडदौड दिल्लीवरची
बेधडक राघोबांची
भरारी अटकेवरची–२४

दुर्दम्य पहाडी छातीची
बळकट दणकट मनगटांची
रंगेल करड्या नजरेची
मराठ रांगड्या भाषेची–२५

महाराष्ट्रीय जवानांची
नडल्या, पिडल्या, रडलेल्यांची
चिडलेल्या शूर पँथरांची
परी देशासाठी मरणारांची–२६

नरनार समरवीरांची
अजोड अस्मितेची
दख्खन हिंदुस्थानची
इतिहास जननशक्तींची–२७

माती मराठ प्रांताची
नाही कोणाची एकाची
अथवा त्याच्या बापाची
(अगर) कोट्याधीश धनिकांची
अरं, तुमची, आमची रयतेची–२८

अशी ही माती घ्या लावून भालावरती
पवित्र पावन मानोनी
हरहर महादेव गर्जोनी
परत उफाळून उठण्याची--२९

## १४६. हा एक मराठा देश

'शिंग फुंकिलें रणीं' वसंत बापट

एकदिलाने एकमुखाने दुमदुमवा संदेश
गोवा-कोंकण-वऱ्हाड-दख्खन एक मराठा देश ॥

एकच आहे शांतादुर्गा-तुळजा मायभवानी
एकच ही कोंकणी-पुणेरी-नागपुरी-अहिराणी
एक असे हा भीमाशंकर-महादेव-मंगेश ॥ १ ॥

मंगेशाला नवस बोलती देशावरल्या माता
गोमंताचें हृदय हालतें नांव विठूचें गातां
म्हणा तुकोबा, म्हणा सोयरा, एक हृदय दो वेष ॥ २ ॥

सई कराया वसई तेथें वीर लढे चिमणाजी
सत्तरीतले राणे लावति येथे जीवाची बाजी
धुळीस मिळवूं राज्य फिरंगी एकच हा आवेश ॥ ३ ॥

गोमंताच्या रंगभूमिवर नांदे नाट्य मराठी
मंगेशीच्या लता बहरल्या कृष्णा-गोदाकांठीं
कवि कृष्णाची गाणी गाई दिनानाथ सावेश ॥ ४ ॥

शेतमळ्यांची कुळागरांची एकच आहे आशा
हिंदु म्हणा वा म्हणा इसाई ही वरवरची भाषा
धमनीमधलें रक्त एक हें, एक असे हृदयेश ॥ ५ ॥

# १४७. केवळ माझा सह्यकडा

‘ शिंग फुंकिलें रणीं ’ वसंत बापट

भव्य हिमालय तुमचा अमुचा केवळ माझा सह्यकडा
गौरीशंकर उभ्या जगाचा, मनांत पूजिन रायगडा
तुमच्या अमुच्या गंगायमुना, केवळ माझी भीवरथडी
प्यार मला हे कभिन्न कातळ, प्यार मला छाती निधडी
मधुगुंजन लखलाभ तुम्हाला, बोल रांगडा प्यार मला
ख्रिस्त, बुद्ध विश्वाचे शास्ते, तुकयाचा आधार मला.

धिक् तुमचे स्वर्गहि साती
इथली चुंबिन मी माती
या मातीचे कण लोहाचे, तृणपात्यांना खड्गकळा
कृष्णेच्या पाण्यातुन अजुनी वाहतसे लाव्हा सगळा.

कबीर माझा, तुलसी माझा, ज्ञानेश्वर परि माझाच
जयदेवाचा जय बोला परी माझा नाम्याचा नाच
जनीं जनार्दन बघणारा तो ‘एका’ हृदयीं एकवटे
जनाबाईच्या ओवीमध्यें माझी मजला खूण पटे
इंद्रायणीच्या डोहामधली गाथा ओली ती ओली
ती माझी मी तिचाच ऐशी जवळीक कायमची झाली

भक्तीचा मेळा दाटे
चोरट्याची पैरण फाटे
निर्गुण मानवतेची पूजा करणारे करू देत भले
माझ्यासाठी भीमाकाठीं भावभक्तिची पेठ खुले.

रामायण तर तुमचे माझे भारत भारतवर्षाचे
छत्रपतीची वीरकहाणी निधान माझ्या हर्षाचे
रजपूतांची विक्रमगाथा तुमच्यापरी मजला रुचते
हृदयाच्या हृदयांत परंतु बाजी बाजीची सुचते
अभिमन्यूचा अवतारच तो होता माझा जनकोजी
दत्ताजीचे शेवटचे ते शब्द अजुनि हृदयामाजीं
बच जायें तो और लढे
पाऊल राहील सदा पुढें
तुम्हास तुमचे रुसवे फुगवे घ्या सगळा नाजुक नखरा
माझ्यासाठीं राहील गांठी मरहट्ट्याचा हट्ट खरा.

तुमचे माझे ख्याल तराणे, दोघेही ऐकू गझलां
होनाजीची सोनलावणी वेड लावते परि मजला
मृदंग मोठा सुमधुर बोले, मंजुळ विणा अन् मुरली
थाप डफाची कडकडता परि बाही माझी फुरफुरली
कडाडणारा बोल खडा जो दरीदरीमधुनी घुमला
उघडुनि माझ्या हृदयकवाडा तोच पवाडा दुमदुमला
तटातटा तुटती बंद
भिवईवर चढते धुंद
ओठ हात देहांत अचानक वादळ घुसमटुनी जाते
उचंबळे हृदयांत पुन्हां ते इतिहासाशी दृढ नाते.

कळे मला काळाचे पाऊल द्रुत वेगाने पुढति पडे
कळे मला क्षितीजाचे वर्तुळ क्षणोंक्षणीं अधिकचि उघडे
दहा दिशांचे तट कोसळले ध्रुव दोन्ही आले जवळी
मीही माझे बाहु पसरून अवघ्या विश्वातें कवळी

विशाल दारे माझ्या घरची खुशाल ही राहोत खुली
मज गरीबाची कांबळ वाकळ सकलांसाठी अंथरली
मात्र भाबड्या हृदयांत
तेवत आहे जी ज्योत
ती विझवाया पहाल कोणी मुक्त करुनि झंझावात
कोटिकोटि छात्यांचा येथे कोट उभारू निमिषांत.

## १४८. महाराष्ट्र जयगान

'शिंग फुंकिलें रणीं' वसंत बापट

जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र हा गर्जा जयजयकार
जय वारकरी, जय धारकरी, जय शिवबाची तलवार ॥ धृ० ॥
जय अमुची प्राकृत वाणी
जय सप्तशतीतिल गाणी
जय संतकवी, जय पंतकवी, जय तंतकवी रसदार.
जय यादववंशी राणा
जय शिवरायाचा बाणा
जय भीमथडी, जय वीरगडी, जय रांगडेच सरदार.
जय रायगडचा माथा
जय सिंहगडचा ताठा
जय सह्यगिरी, पाताळदरी, जय सिंधुदुर्ग झुंजार.
जय वऱ्हाडचे आजोळ
जय अजंठा नि वेरूळ
जय बारा मावळ, वाई जावळ, रांगडेच सरदार.

जय गोमांतक रंगेल
जय कोल्हापूर रंगेल
जय लाल घाट, जय तुंग घाट, जय कृष्णेची जलधार.
जय तुळजा तुळजापूरची
जय मायभवानी अमुची
जय भावपंढरी, शिखर जेजूरी, जयतु देव मल्हार.
जय सकल लोकमान्यांचा
जय सगळ्या सामान्यांचा
जय शेतकरी, जय कामकरी, जय स्वाभिमान साकार.

## १४९. हे रायगडाचे कडे

'शिंग फुंकिलें रणीं' वसंत बापट

छत्रपतींची अजिंक्य विजयी नौबत जेथे झडे
उभे हे रायगडाचे कडे.
कातळकाळी उघडी छाती
अंगावर खड्गांची पाती
चिलखतधारी सुलतानांना वेडावित नागडे
उभे हे रायगडाचे कडे.
जखमांची उरीं मिरवत नक्षी
इथुन उडाला दिगंत पक्षी
कैक विषारी नागकुळांचे मोडून पडले फडे
उभे हे रायगडाचे कडे.
आदिलशहाची दौलत बुडली
अलमगिराची निद्रा उडली
मर्द मराठी पराक्रमाचे दुमदुमले चौघडे
उभे हे रायगडाचे कडे.

उन्मत्तांनो जपुन पुढे व्हा
या काळाच्या दाढा जिव्हा
अन्यायाचा, छळ्जुलुमाचा येथे फडशा पडे
उभे हे रायगडाचे कडे.

स्वातंत्र्यास्तव जे जे जागृत
त्या सर्वांचें हें कुलदैवत
विश्रामघरल्या शिवशक्तीचें शाश्वत मंदिर खडे
उभे हे रायगडाचे कडे.

हे शिवसुंदर मंदिर बघतां
क्षणभर थांबे रवी मावळता
दिग्गज आणति अभिषेकाला स्वर्गंगेचे घडे
उभे हे रायगडाचे कडे.

## १५०. महाराष्ट्राचे जयगान

वसंत बापट

जय महाराष्ट्र जय महाराष्ट्र हा प्रियतम देश महान
रुधिरामधुनी या मातीचा धगधगतो अभिमान ॥

लाव्हाच्या तप्त रसाने घातला जयाचा पाया
सह्याद्री-सातपुड्यांनी घडविली जयाची काया
संतांनी निज करुणेने भिजवली जेथली माती
अमृतास जिंके ऐशी लेखणी कवींच्या हाती
घरट्यातुन रायगडाच्या घेताच झेप गरुडाने
थरथरली शाही तख्ते धाकाने प्राणभयाने
मर्दांचे गाइ पवाडे सावेश शाहिरी वाणी
पैजणांसवे रुमझुमली शृंगाररसाची गाणी

किति समर्थ अमुची भूमी
किती सुंदर अमुची भूमी
उज्ज्वल मंगल या भूमीचे महाराष्ट्र अभिधान ॥

शृंखला खळाखळ सुटल्या गर्जता कुणी बलवंत
अन्याय जाळण्यासाठी ज्योतीवर पेटे ज्योत
फुंकली तुतारी कोणी समतेची मानवतेची
स्वप्नांत गुंफली गाणी कुणि भोळ्या फुलराणीची
राष्ट्रास्तव लढले येथे स्वातंत्रवीर झुंजार
छातीवर झेलत गोळ्या गळफास मानले हार
समिधेपरि जळले कोणी कुणि सबल करी अबलांना
कुणि भीमबळाने केल्या दलितांच्या उन्नत माना
हे महाराष्ट्र बलवंता
हे महाराष्ट्र गुणवंता
तुझ्या बळावर कळिकाळाला देउ आम्ही आव्हान ॥

## १५१. क्षत्रधन महाराष्ट्र

'चैतन्य गाथा' (सेनापती) **पां. म. बापट**

तुम्हां महाराष्ट्रजनां । माझी मूळ ही प्रार्थना ॥
तुम्हांवरी माझा भार । माझ्या देशिंचा संसार ॥
तुम्हांवीण कोठें जाऊं । काय कोणासी विनवूं ? ॥
तुम्ही जरी आळसाल । विसराल देशकाल ॥
तरी पांडुरंग म्हणे । महाराष्ट्रा लाजिरवाणें ॥ १ ॥

माझा महाराष्ट्रजन । महा थोर क्षत्रधन ॥
क्षत्रधन हें देशाचें । महाराष्ट्र असे साचें ॥
हेंच धन या देशाचें । दैन्य नाशील आमुचें ॥
ऐसी विश्वासाची वाणी । बोलिलो मी सर्व जनीं ॥
तुम्ही महाराष्ट्रजन । शिवबाचें क्षत्रधन ॥
तुम्ही जर आळसाल । विसराल देशकाल ॥
तरी पांडुरंग म्हणे । महाराष्ट्रा लाजिरवाणें ॥ २ ॥

माझ्या महाराष्ट्रीं संत । किती झाले जातिवंत ॥
"आनंदाचें वनभुवन" । समर्थांचें तें हें स्थान ॥
ज्ञानदेव, एकनाथ । यांणी केला हा सनाथ ॥
नामदेव, तुकावाणी । यांची येथे गर्जे वाणी ॥
म्हार विठ्याचा दामाजी । तोही येथींचाच गाजी ॥
सजन, सांवत्या तो माळी । गोरा, चोखा येचि स्थळीं ॥
मुक्ता, गोणाई, जनाई । यांची वस्ती याचि ठांई ॥
गडी मावळे शिवबा । यांची येथ पुण्यप्रभा ॥
परउपकारासाठीं । हरि पडावया गांठी ॥
केला सर्वस्वाचा यज्ञ । ऐसे नारीनर प्रज्ञ ॥
जाले महाराष्ट्रीं किती । ठावें सर्व तुम्हांप्रति ॥
जातिवंत संतजन । त्यांचे कुळीचे हे जन ॥
महाराष्ट्रीय या देशा । सोडवितील ही आशा ॥
बोलिलो मी सर्व जनीं । तुम्हांवरी विश्वासूनी ॥
तुम्ही जरी आळसाल । विसराल देशकाल ॥
तरी पांडुरंग म्हणे । महाराष्ट्रा लाजिरवाणे ॥ ३ ॥

## १५२. अध्यात्माचा डंका

'**चैतन्य गाथा**' भाग १ ते १०–१९२३ (सेनापती) **पां. म. बापट**

थोर संतांचें हें स्थान । महाराष्ट्राचे भुवन ॥
हरि पडावया गांठी । थोर येथे आटापीटी ॥
महाराष्ट्रधर्मपीठ । समर्थांचें हें अवीट ॥
येथें पंढरी नगर । संतजनांचें माहेर ॥
येथें किल्ला शिवनेर । शिवराय जन्मघर ॥
महाराष्ट्र धर्ममठ । थोर मोक्षधर्म-पठ ॥
ऐसें दोन्हीं अंगीं पूर्ण । आहे माझें हें ठिकाण ॥
येथें डंका अध्यात्माचा । येथें वारा स्वातंत्र्याचा ॥
डंका श्रवणीं भरला । देहीं वारा संचरला ॥
आतां पांडुरंग म्हणे । करो हरी जें करणें ॥

## १५३. महाराष्ट्र आधार या भारताचा

**सेनापती बापट 'समग्र वाङ्मय'** **पां. म. बापट**

महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेलें ।
मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले ॥
खरा वीर वैरी पराधीनतेचा ।
महाराष्ट्र आधार या भारताचा ॥ १ ॥
महाराष्ट्रतेजस्विता नाहिं मेली ।
महाराष्ट्रतेजस्विता ही निजेली ॥
महाराष्ट्रतेजस्विता जागवाया ।
चला या चला बंधूनो ! या चला या ॥२॥

# १५४. महाराष्ट्राचा अभिमान

'महाराष्ट्र गौरव गीते' सुशीला बापट

निधडी छाती, निःस्पृह बाणा लववी ना मान ।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ धृ० ॥

प्रिय आम्हांला अमुची भूमि असुं द्या खडकाळ ।
उघडे अन् वैराण आमुचे प्रिय आम्हां माळ ।
आम्हांस ठावें इथेंच येती 'समर्थ' जन्माला ।
पाषाणांतुनि प्रगटविती जे 'कुबडी-तीर्था'ला ।
कडेकपारीं खेळवि आम्हां सह्यगिरी तात ।
रक्षित आला, रक्षित राहिल, सोडिल ना साथ ।
तयेंच केलें कणखर आम्हां, दिसलों जरि सान ।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ १ ॥

तलवारीवर पाणी चढवी कृष्णेचें पाणी ।
गोदेंतून ह्या अखंड वाहे संतांची वाणी ।
इंद्रायणीने अहा तारिली तुकयाची गाथा ।
सान जरि ह्या, सदैव अमुच्या पूज्य अम्हां सरिता ।
देशावरती भाकर कांदा खाऊं शेतांत ।
कोकणांत ना कमी कुणाला भाजी आणि भात ।
रत्नागिरीचा हपुस असे हो आमुचें वरदान ।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ २ ॥

वनदेवीला फार आवडे कोंकणची भूमि ।
सागर राजा साथ करी तिज गाऊनियां गाणीं ।
लालमातीवर शोभे राई हिरवी घनदाट ।
कूजति मंजूळ रंगदार हे सृष्टीचे भाट ।
देशावरच्या प्रसिद्ध बहिणी बाभुळ आणि बोरी ।
त्या बोरींना पुनित कराया, इथेंच हो शबरी ।
'श्रद्धेने हो सुसह्य जीवन' दे मौलिक ज्ञान ।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ३ ॥

'सुजला सुफला सस्य श्यामला' विदर्भ भू शोभे ।
शुभ्र कपाशी कशिदावरती, जीव अहा लोभे ।
कवळा कवळा हुरडा इथला, एकदांच खाल ।
विदर्भास या विसरूं म्हणुनी कधीं न विसराल ।
विदर्भ देशीं इंद्र राहिले येउन स्वर्गीचे ।
अमरावती स्थापिली, तीमध्यें देऊळ अंबेचें ।
रुक्मिणीस त्या प्रसन्न झाले तेथें भगवान ।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ४ ॥

स्वातंत्र्यास्तव आणि धर्मास्तव लढला झुंजार ।
अतुल धोरणी राजा अमुचा शिवबा रणधीर ।
घोड्यावरूनि कधि न उतरला बाजीराव शूर ।
पुण्यांत असतां बसे दरारा दिल्लीसही दूर ।
टिळक-प्रकाशें दिपुनी गेला, आंग्ल अहा वदला ।
'एकच माणूस देखियला नच लांचेनें बधला' ।
सावरकर तर हिंदुत्वाचा ज्वलंत अभिमान ।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ५ ॥

उग्र घेऊनी रुप, पेटता कलहाचा वन्ही ।
संत धावले, शांतीरसाचें घेऊनियां पाणी ।
ज्ञानदेव अन् तुकया-नामा-दास-एकनाथ ।
ज्ञानेश्वरीसम रचिले ज्यांनी अद्‌भुत हो ग्रंथ ।
स्त्री-उद्धारक तसे सुधारक प्रथम इथें झाले ।
आगरकर, गोखले, रानडे, अण्णा अवतरले ।
पाणीदार त्या ललना म्हणुनी ! ताठ सदा मान ।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ६ ॥

सरस्वतीचें पुण्यास आहे अमुच्या माहेर ।
पंढरपुर ना कुणास ठावें ? तीर्थांचें सार ।
'दख्खनकाशी' कोल्हापुर हें खरें कलापूर ।
आंतरराष्ट्रिय कीर्ति पावले किती कलाकार ।
प्रिय आम्हांतें असे मुंबई प्राणाहुनि खास ।
महाराष्ट्राला घेणें मुष्कील तिजविण की श्वास ।
—'जगामधील हो एक'—मिळाला असा जिला मान ।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ७ ॥

साधेंभोळें जीवन अमुचें साधें हें अन्न ।
माणुसकीला जिवंत ठेवी, अमुचें हें दैन्य ।
नसांनसांतुनि अमुच्या खेळे 'इमान' बाजीचें ।
त्यागाचें अन् शुचित्व देही त्या 'तानाजी'चें ।
हांजी हांजी न रुचे आम्हां, रुचे न अन्याय ।
हुकुमशहाच्या माथ्यावरती ठेवूं अम्ही पाय ।
बुद्धिची तरवार न ज्यानें केली कधिं म्यान ।
अशा आमुच्या महाराष्ट्राचा अम्हांस अभिमान ॥ ८ ॥

## १५५. माझा महाराष्ट्र

'समग्र बालकवी' १९६६ — बालकवी ठोमरे

महाराष्ट्र जय महाराष्ट्र हा निनाद अंबर भरी,
महाराष्ट्र-यश दिव्य गाइलें अनंत लोकेश्वरीं;
थोर थोर नरवीर धैर्यधर-संत-सन्मणी गुणी
तुझ्याच चरणीं लीन जाहले माय विश्वपावनी ! १
मानवतेची शुद्ध बंधुता एक भरी चित्तीं
आत्मानंदीं एकरूपता स्वर्भूला देती;
ऋषीश्वरांचें पुण्यधाम हें भूमंडळ केलें,
यक्षदेवगंधर्व आणिलें तोंच तिनें खालें. (अपूर्ण-अप्रकाशित)

## १५६. माती माझी अभिमानी

'जयतू भारती' २८-९-६३ — सुभाष दामोदर बिडकर

धन्य ही माती मराठी
लावी मांगल्याची उटी
गाथा तुक्याची हंसते
इंद्रायणीच्या रे कांठीं ॥ १ ॥

चंद्रभागा वाळवंटी
नांदे टाळ मृदंगात
फिरे सुवर्ण पालखी
पावन परिसरांत ॥ २ ॥

तव मुखांत गर्जंती
वेद जगतांचे चारी
दिव्य मर्म वदवीते
ज्ञानोबाची ज्ञानेश्वरी ॥ ३ ॥

दास बोध समर्थाचे
वदविले तव भाळी
पंढरीच्या दारी उभी
साध्वी रे मराठी भोळी ॥ ४ ॥

कलेच्या महंतेतूनी
अजिंठ्याचे शिल्पातूनी
दिसे लावण्याची लेणी
माती माझी अभिमानी ॥ ५ ॥

मराठ भोळ्या वीरांना
वीरश्री अभय करी
अटकेपार डोलली
ध्वजा शिवाची अंबरी ॥ ६ ॥

# १५७. मराठी पुण्यभूमी

'जयतु भारती' सुभाष दामोदर बिडकर

भूमि मराठी असे आमुची माती मराठमोळ्यांची ।
अशी खाण मांगल्याची, माला रम्य बुरूजांची ॥ १ ॥

कडे कपारीत ठसे, पूर्व पोलादी हस्तानचे ।
गिरी कुशीतून वाढले, बीज शूर मराठ्यांचे ॥ २ ॥

रक्त इथें या ठायीं गळ्लें, वीर झुंजतां मर्दांचे ।
पडे शौर्याचे उंबरठ्यावर, पुण्यामृत भविष्याचे ॥ ३ ॥

कडे, कपारीतून ही मशाल, पाजळिती बलवंत ।
बाजीसारख्या शूर वीराने, केली मृत्युवर मात ॥ ४ ॥

भूमीसाठी रास उधळली ही रक्तांकित रत्नांची ।
ही कुलज्योत तेवली, वीर्यशालिनी झांशीची ॥ ५ ॥

समर भूमीवर वीर इथें हा सिंह शिवाजी लढला ।
वेशीवर अटकेपार, भाऊने ध्वज तो फडकविला ॥ ६ ॥

लोकमान्य अवतरला हा महापंडित शास्त्राचा ।
देशासाठी लढला असा युगपुरुष भूमीचा ॥ ७ ॥

भैरवी गाते भूमि अपुल्या धाडशी रणकथेची ।
दिव्य ज्योत ज्वलंत तेवते, भूमिच्या इतिहासाची ॥८॥

चहुकडे ओसंडला अखंड वीररस विरश्रीचा ।
रविसम प्रकाशला नंदादीप जागे माऊलीचा ॥ ९ ॥

फुलवा देशाभिमान कृतीतून सकल राव रंकांत ।
मायबोलीचे माहेर स्वामीत्वाच्या झोंपडीत ॥ १० ॥

पावन हा शोभे मुकुटमणी धन्य सप्तश्रृंगी गड ।
मातीतून चिरंजीव बनले पन्हाळा, सिंहगड ॥ ११ ॥

भु गर्भातून वाहते चंद्रभागा, गोदावरी ।
येळकोट शिव मल्हारी खंडोबाचा गड जेजुरी ॥ १२ ॥
देहू, आळंदी आणि शिरडी संत तपोवन भूमीचे
वसे जागृत तुळजापूर आद्यशक्ति भवानीचे ॥ १३ ॥
इथें अजिंठा वेरुळ लेणें हें कोरले शिल्पाचे ।
जागोजागीं उभे ठाकले देवालय हे कळसाचे ॥ १४ ॥
नवविश्व बहरलें महान विभूतींच्या महतींचें
सर्वांमुखीं दिव्यत्व प्रगटले दासबोध समर्थांचे ॥ १५ ॥
गाते मर्म ज्ञानेश्वरी अनंतात गूढ सकृताचे ।
हसले प्रभूच्या चरणीं अभंग जनी, नामा, तुकयाचे ॥ १६ ॥
निघे सुकवि लेखणीतून वाणी उमटे वेदाची ।
ओवी माळा अभंगात वाहते गंगा ज्ञानाची ॥ १७ ॥
ईश्वरी साक्षात्काराचा कुणासी न सापडे अंत ।
इथे आधारावाचून चालाया लागली भिंत ॥ १८ ॥
गुणसंपन्न बाळांना आला सेवा कीर्तीचा बहर ।
उभा राहिला पुंडलिकासाठी देव इथे विटेवर ॥ १९ ॥
गृहा गृहांत नांदते पूर्वपुण्याईची वाट ।
विशाल भूप्रदेशांत मराठीचा भोळा थाट ॥ २० ॥
टाळ मृदंगाच्या नादीं भक्तजन रंगतात भजनीं ।
भक्तिधारा सरितेची वाहते ही पंढरीतून ॥ २१ ॥
पावन सरितेच्या कुशीवर मेळा संतांचा जमला ।
भोळ्या संत पामराच्यासवें दयासिंधु हा रमला ॥ २२ ॥
देह राख सामावली धरणीत तपस्वी महात्म्यांची ।
पूर्वजांच्या समाधीवर प्रसवे वंशलता श्रद्धेची ॥ २३ ॥

सिंहासन मराठीचे देई जाग रे मानवाला ।
फुटे हिच्या पावित्र्याचा आज गहिवर पाषाणाला ॥ २४ ॥
रूढीच्या परंपरेचा, मातृभूमीचा श्रृंगार ।
मम प्रतिभा हसते; रमते येऊन फुलोऱ्यावर ॥ २५ ॥
घोर तप जागतो हिचा बेचाळीस पूर्वजांचा ।
मराठी पुण्यभूमीचा चढे साज असा लावण्याचा ॥ २६ ॥

## १५८. मायभूमीस

'मातृगितांजली'—१९२६ **प्रा. ना. के. बेहरे**

असो मायभूमी ! माझा तुला नमस्कार
देह तुझ्या सेवे लागो, आस हीच फार ॥ धृ० ॥
तुझें गीत गातां देवी कसा कंठ दाटे
स्मृती होय इतिहासाची प्रेम मनीं लोटे
श्रेष्ठवीर दिसती नयनीं मावळे मराठे
स्वप्न वदो कोणी याला, गमे सत्य-सार ॥ १ ॥
कुजन फार छळिती जेंव्हां हिंद-भूमि-प्राण
गोंधळुनी गेले सारे, बघोनी तुफान
परिस्थिती नमवी तेंव्हा शिवाजी महान
नवी राज्यनौका हांकी नवा कर्णधार ॥ २ ॥
शूर मर्द बाजी, राघो, चतुर फडणवीस
तुकाराम, ज्ञानोबा वा संत रामदास
अलंकार घालुनि चमके श्रेष्ठ महाराष्ट्र
वीर संत झाले येथें खचित थोर थोर ॥ ३ ॥

नमस्कार करतां तुजला पूर्व-स्मृती जागे
'अद्य' विसर पडतो सारा माय माउली गे
दिसे फक्त भगवा झेंडा चित्त किती रंगे
स्फुरण चढे, बनतों आम्ही शूर, मर्द वीर ॥ ४ ॥

तुझे पांग फेडूं कैसे हीन दीन आज
वीर पुरुष स्मरतां वाटे मला माझि लाज
अंत नको पाहूं देवी करिन कामकाज
कळस जरी झालों नाहीं वाहिन मी भार ॥ ५ ॥

श्रेष्ठ असे अपुल्या परिनें दगड पायऱ्यांचा
दृष्टिआड राहुनि वाही भार मंदिराचा
कुणाच्याहि पुण्यें गवसो मार्ग तो यशाचा
दगड आम्हीं लाखो मिळुनी साह्य करूं त्यास ! ॥ ६ ॥

## १५९. उभ्या भारताचा पहारेकरी

'अनुरागिणी' सप्टें. १९८२ बा. भ. बोरकर

कुठेंही कुणा द्रोह अन्याय होवो
तयाचा इथे क्षोभ अन् वेदना
इथें वेधितें स्वप्न उन्मार्गगामी
नव्या संगराची घुमे घोषणा
कणा भारताचा असा सह्य येथें
कधीं मेरु, मंदार, द्रोणागिरी
महाराष्ट्र माझा असा वज्रदेही
उभ्या भारताचा पहारेकरी.

इथें रात्रिची ज्योत जागे भवानी
दिसा कष्टतो स्वेदगंगाधर
शिजे ब्रह्मनैवद्यसे अन्न येथें
तया मंत्रितो वेदवैश्वानर
नद्या या न या भाग्यरेषा उद्यांच्या
झरे तेज त्यांचें घरीं डोंगरीं
महाराष्ट्र माझा प्रतापी विरागी
उभ्या भारताचा पहारेकरी.

इथें गर्जते मर्द भाषा मराठी
जिचीं अमृता झोंबती अक्षरें
रसें वेधिते सत्त्वगुह्यार्थ सारे
स्वरें छेदिते अनृताची शिरें
इथें देव भक्तास धुंडीत येतो
विटेतून येथें उठे पंढरी
महाराष्ट्र माझा असा भक्तिगाथा
उभ्या भारताचा पहारेकरी.

इथें नांदले धर्मसाम्राज्य पूर्वी
उभी आजला राष्ट्रधर्मध्वजा
जगीं स्थापण्या क्रांति-मुल्यें युगाचीं
गजारूढ ही सामराज्य-प्रजा
हिनें खोदिलीं भूतकाळांत लेणीं
पुढें याहुनी दिव्य कारागिरी
महाराष्ट्र माझा महत्स्वप्नद्रष्टा
उभ्या भारताचा पहारेकरी.

अशी तापसी स्वातंत्र्यभू ही
शुचिष्मंत चारित्र्य येथें पिके
कधींही कधींही कृतांतापुढेंही
तृणाचाहि माथा न येथें झुके
जयां स्वप्न हें मोहि ते सर्व या रे
करा धन्य येथें कुडी वैखरी
महाराष्ट्र माझा तसा आपुलाही
उभ्या भारताचा पहारेकरी.

## १६०. महाराष्ट्र गीत

'प्रतिभा' १९३० — बा. भ. बोरकर

झंझावाताच्या शौर्याला मेघराज तोही थरके,
महाराष्ट्राचे निशाण उज्ज्वल बेदरकार परी फडके.
मेखुर तिमिरीं छत्रपतीची चंचल चपला चकमकते,
स्वातंत्र्याचें तेज इमानी नभोमंडळीं लकलकते.
स्वयंस्फूर्तिची समर्थवाणी दिक्पर्वतही हालविते,
साधीभोळी मनें मराठी चैतन्यानें कोंदविते.
राकट कणखर देश मराठा जिव्हा हिंदवी रक्ताचा,
सरळ मनाचा सिधा शिपाई भीम जसा कीं कुंतीचा.
दणदणीत मर्दानी कवनें शाहिर गातां ललकारी,
अंगिं शिरशिरी भरली, हरहर धडधडली ती रणभेरी.
स्वातंत्र्याच्या राष्ट्रविजयिनी स्वयंस्फूर्तिनें फुरफुरुनी,
दुखावली नागीण उफळली मराठियांच्या रक्तानीं.

पर्वतकुहरीं दरीपठारीं सूर मराठी निनादले,
राष्ट्रदेविच्या निश्वासांनीं भरलीं सारीं रानफुलें.

शाहिरांनीं संगरोन्मदें डफावरी देतां थाप,
भरिती मिशांना पीळ मराठे हो शत्रूंचा थरकांप.

अबलख वाजी दौडी गाजी भाला फिरके भंवताली,
दख्खन तकदीराचे आंखीं आली रक्ताची लाली.

विळा मराठी फिरता अव्वल महावृक्षही उन्मळले,
महाराष्ट्राच्या रणनादानें कडे मेरुचे कोसळले.

संगरतांडव चौफेर करी रक्त-तृषित तो शौर्याग्नि,
यवन कर्दुनी भूमि शमविली सह्याद्रीच्या मर्दांनी.

संगरबाला हिय्येवाल्या कितीतरी गेल्या समरीं,
विवाहकाली करीं घेतल्या उज्ज्वल त्यांनी समशेरी.

धन्य सती त्या, धन्य मराठे राष्ट्रमुक्तिस्तव मरणारे,
आज तयांचे वंशज सारे आजीमागें दडणारे.

कुवत करारी घेत भरारी रणशूरांच्या पट्टयांची;
वळवळणीं ही व्यर्थ आमुच्या लांब जिभांच्या पट्टयांची.

## १६१. मुजरा

'गीतगौरव' २६-१-६८ — रघु बोरगांवकर

मराठमोळ्या महाराष्ट्रा घे मुजरा मानाचा
तुझ्या यशाची कीर्ती गातो बोल मराठीचा ॥ धृ० ॥

थाप डफावर कडकडली ति भरला आवेश
वंदन माझे शिवरायांना तुकया ज्ञानेश
संतवीरांच्या महाराष्ट्रा घे प्रणाम हा अमुचा ॥ १ ॥

सह्याद्रीतून सिंहगर्जना उठली वीरांची
भीमाकांठीं गजर दिंडीचा वाणी संतांची
'उदो उदो जगदंबे' घुमतो बोल भवानीचा ॥ २ ॥

हिमालयाची हांक ऐकूनी सह्याद्रि उठला
दंड थोपटूनी रणी उभा तो लाल चिनी भ्याला
सीमेवरती यज्ञ चालला मर्द मराठ्यांचा ॥ ३ ॥

## १६२. माझा महाराष्ट्र

'गंधवेडी' १४-१-६६ — सौ. मंदा बोडस

त्रिखंडांत गाजलेली — कीर्ति ज्याची गाती भाट
असा माझा महाराष्ट्र — असा माझा महाराष्ट्र ॥ धृ० ॥

भोळा भावडा रांगडा — मराठा हा या देशाचा
कडा काटक कठोर — कणखर सह्याद्रीचा
झुळुझुळु वाहे झरा — कोट फोडी कातळाचा
तसें प्रेम अंतरांत — भरलेलें कांठोकांठ
असा माझा महाराष्ट्र — असा माझा महाराष्ट्र ॥ १ ॥

कलावंत महाराष्ट्र — पहा वेरूळच्या लेणीं
पत्थराला केलें धन्य — ज्यांच्या छिन्नी हातोड्यांनी
कलेसाठी रावली ही — कलावंतांची घराणीं
गरीबींतही रंगला — सौंदर्याचा सारीपाट
असा माझा महाराष्ट्र — असा माझा महाराष्ट्र ॥ २ ॥

नररत्नांची निर्मिती करी येथलीच माती
पौरुषाला आवाहन होतां विस्तारते छाती
वीररसाचा पोवाडा रंगे शाहीरांच्या ओठीं
शिवप्रभूची भवानी नाचे दुष्टां निर्दाळत
असा माझा महाराष्ट्र असा माझा महाराष्ट्र ॥ ३ ॥

माझ्या मराठी भाषेचा काय सांगू मोठेपणा
'ज्ञानेश्वरी' हीच बोले रंगे त्रैलोक्याचा राणा
सोळा शृंगारांत भिजे घेत लावणीच्या ताना
तुकारामाची ऐकतां गाथा नाचे भीमाकांठ
असा माझा महाराष्ट्र असा माझा महाराष्ट्र ॥ ४ ॥

कण कण या मातीचा मला प्राणाहून प्यार
असो घांस भाकरीचा माया लाभते अपार
साध्या ओवींत गुंफले अमृतानें सप्तस्वर
तुच्छ वाटते त्यापुढें मला स्वर्गाचीही वाट
असा माझा महाराष्ट्र असा माझा महाराष्ट्र ॥ ५ ॥

## १६३. महाराष्ट्र

'गंधवेडी' सौ. मंदा बोडस

माझा महाराष्ट्र देश आहे डोंगरदऱ्यांचा
झाडामाडांचा नद्यांचा खळाळत्या निर्झरांचा
माझ्या महाराष्ट्र देशीं नाही गुलाबाची बाग
परी सुगंध भरला रानफुलीं शिगोशिग

माझ्या महाराष्ट्र देशीं गोदा, तापी यांचा वास
संतभूमी आहे माझा पवित्र नि त्यागी देश
माझ्या महाराष्ट्र देशीं 'अरे तुरे'चीच भाषा
करी आदर सत्कार जरी घांस भाकरीचा
माझा महाराष्ट्र देश आहे भोळा नि भावडा
दिला शब्द पाळी येथें गडी राकट रांगडा
माझा महाराष्ट्र देश नाही सौंदर्याची खाण
कणखर नेतृत्वाची नाही परी येथें वाण
माझ्या महाराष्ट्र देशा नेता लाभे यशवंत
प्रगतीच्या पथावर देश होवो यशवंत.

## १६४. पंढरी

**'बोबडे यांची कविता' १९३७ श्रीनिवास रामचंद्र बोबडे**

सगुण ब्रह्म सांवळें विटेवरी उभा पांडुरंग
भोळा भाविक भक्त-तुकोबा गातो अभंग.

हरिनामाचे घोष चालले गजर नभीं भरला
फुलले साधुजनांचे मेळे नाद एक उठला.

ज्ञानोबा पालखीत बसुनी येती मिरवीत
भावार्थाची उच्च दीपिका सतेज पाजळित.

भागवताचा पाया रचुनी धन्य धन्य झाला
नामा भगवद्भक्त कुटुंबासह तेथें आला.

भगवंताचा केवळ ताईत धन्य पुंडरीक
प्रभु हृत्कमळीं बैसुनि घेई प्रभुपाशीं भाक.

राजयोगि एकनाथ आले हत्तीवर स्वारी
भागवताचें पुराण सांगति डोलति नरनारी.
भक्तिमार्ग कळसास पोचवुनि मंदिर पूर्ण करी
महाराष्ट्राचा वेद गात ये तुकयाची स्वारी.
एकतारिवर सूर लावुनी येत मिराबाई
प्रेमानें जी पंढरपुरचा नाथ विकत घेई.
या दुःखावेगळें एकदां करि पंढरिराया
गाऱ्हाणें सांगण्यास आली सखू हरीपाया.
धन्य देश महाराष्ट्र मराठे लोक धन्य धन्य
पन्नगशायी उभा विटेवरी हें ज्यांचें पुण्य.
पृथ्वीचें वैकुंठ पंढरी नगर आटपाट
प्रेमाचा दरबार प्रेमळ भक्तीची पेठ.
'वृत्तींची विषमता लोपली द्वैतभाव हरला'
महाराष्ट्राचा सर्व मराठा त्यांत एक झाला.
पंढरपुरच्या राउळामधें ऐक्यध्वज उभवे
त्या ऐक्यानें देश एकदां नवजीवन पावे.
महाराष्ट्राचें स्वराज्य झालें स्थापन रायगडीं
परी तयाचें बीज रोविलें भिवरेच्याच थडीं.
महाराष्ट्राची कीर्ती केली मावळवीरांनी
परी तयांना समर्थ केलें भक्ति-समर्थांनी.
पंढरपुरची रुकमाबाई तुळजापुरि गेली
जगदंबारूपानें शिवकरिं भवानि अर्पियली.
गर्जे पंढरपूर 'ग्यानबा तुकाराम' नादें
'श्रीहरहर महादेव' शब्द तो रायगडीं कोंदे.

भगवंतानें महाराष्ट्र हें धन्य धन्य केलें
वैकुंठीचें नगर उचलुनी येथें वसवीलें.
खरा मराठा पंढरपुरची प्रौढी मिरवील
महाराष्ट्र-भांडार-पंढरी यश-गुण गाईल.
महाराष्ट्राचें मंगल खेळें खेळ वाळवंटी
महाराष्ट्राचा नाथ जागतो भीमेच्या कांठीं.

## १६५. गडि मर्द मराठा वीर

**'बोवडे यांची कविता' १९३७ श्रीनिवास रामचंद्र बोवडे**

गडि मर्द मराठा वीर । गाजला रणीं रणधीर
होऊन वारुवर स्वार । चालला अटकेच्या पार
जणुं कमठ्यावरचा तीर

सूर्योदय कावेरीचा । सूर्यास्त सिंधुतीराचा
भाल्यावर अरि झेलीत । ढालेंत विजय वेचीत
फडकावित भगवा झेंडा । दिल्लीचा फोडित बेडा
चालला मराठा स्वार । दशदिशा धाक अनिवार
हरहर महादेव हरहर । जयघोषें गर्जे अंबर
पिळदार मिशी मर्दानी, चमकला रणीं,
शूरांचा शूर । गडि मर्द मराठा वीर.

मराठ्यानेच जंग लढावा । मराठ्यानेच जय मिळवावा
मराठ्यास शोभे तरवार । मराठाच पराक्रमी वीर
मराठ्यानेच कीर्ती केली । मराठ्यासच श्री वश झाली.
मराठाच रवीची ज्योत । गनीम ते सर्व खद्योत
मराठाच चमकला हीर । गनीम ते सारे फत्तर
धडक ती मराठी भारी, चालली स्वारी,
कुणिहि द्या समर । गडि मर्द मराठा वीर.

मोंगलास केलें धुळधाण । पळविला नीच पठाण
निजामास दाविला हात । टिपु सिंह चरण चाटीत
मुंबईचा टोपीवाला । लोटांगण घालित आला.
'सैतान खडा लढनेको । या खुदा बचावो हमको
यह आज बचावो जान । नहि होना हिंदुस्थान'
कापिले शत्रुसंभार । कुणि उरे न द्याया खबर
मराठ्यांची नौबद वाजे । भूगगन एकदां गरजे
शौर्याचा मेरूमणी, वीर नर-मणी,
खडा खंबीर । गडि मर्द मराठा वीर.

भाल्याची चंचल फेक । फेकीत रोखुनी रोख
करि उडती चिडिया ठार । क्या बिशाद घोडेस्वार
समशेर मराठ्यांचीच । काळाचा नंगा नाच
चम् चम् चम् म्यानांतून । निघताना दिपती नयन
'वारावर घे घे वार । चल उतर फिरंग्या ! शीर'
विजली जशि अस्मानांत । कडकडुनि घुसे पृथ्वींत
तसें घोड्यांसह स्वारांचें । दशदिशांस बळी व्हायाचें
मराठ्यांच्या करीं चमकला, धन्य तो भाला,
धन्य समशेर । गडि मर्द मराठा वीर.

देवांचे हे अवतार । गडि मर्द मराठे वीर
उतरण्या धरणीभार । अवतरला देवसंभार
तो धन्य धन्य शिवराय । अवतार शिवाचा होय
म्लेच्छांचा कर्दनकाळ । हा प्रताप रवि तेजाळ
प्रत्यक्ष सांब त्रिपुरारी । शिवराय शत्रूला भारी
तो धन्य धन्य तो काळ । जाहले देव भूपाळ
गर्जले वीर रणगाजी, शूर शिव, बाजी
धन्य संसार । गडि मर्द मराठा वीर.

संपले दिवस शूरांचे । संग्राम धीरवीरांचे
ते दिवस मुलुखगिरीचे । ते दिवस मराठे मर्दांचे
ते दिवस देशनिष्ठेचे । ते दिवस राजनिष्ठेचे
महाराष्ट्र विभव सूर्याचे । ते दिवस अभिमानाचे
ते दिवस कधिंच मावळले, शौर्य तें लपलें
लोपले शूर । गडि मर्द मराठा वीर.

## १६६. हरहर महादेव

**'बोबडे यांची कविता'** **श्रीनिवास रामचंद्र बोबडे**

या भाईनो ! या या 'हरहर महादेव' बोला
वीरांची ही वीरगर्जना शोभे वीराला ॥ धृ० ॥

महाराष्ट्र-नरसिंह शिवाची वीरगर्जना ही
रायगडाचे बुरुज भेदुनी घुमत दिशा दाही
ज्या हांकेनें जागृत केलें या महाराष्ट्राला
तीच हाक ही बोला 'हरहर महादेव' बोला–१

या मंत्राचा उपदेष्टा श्री समर्थ महाभाग
या मंत्रें वीरांना आली खडबडुनी जाग
या मंत्रानें महाराष्ट्र हें 'महा-राष्ट्र' झालें
या मंत्रानें महाराष्ट्राला नवजीवन आलें
समर्थ गुरुचा महामंत्र जो शिवरायें जपला
तोच मंत्र हा बोला 'हरहर महादेव' बोला–२

२५८४
क्र. २५७०७
२७/१२/

स्फुरण पावतां दिव्य मंत्र हा या महाराष्ट्रांत
दिल्लीचें सिंहासन झालें क्षणांत डळमळित.
या मंत्राचा धाक वाटला साऱ्या दख्खनला
या मंत्रानें भूतें पळालीं सर्व दिगंताला
राजमुकुट म्लेंच्छांचे पडले उलथुनि धूळीला
'जयोऽस्तु जयजय' बोला 'हरहर महादेव' बोला–३

महाराष्ट्र–वैभव सूर्याच्या शुभ प्रातःकाळीं
पावा फुंकुनि या मंत्राची जादु शिवें केली
या मंत्राची जादु पसरतां या महाराष्ट्रांत
क्षणामध्यें लाखांनी पिकलें वीरांचें शेत
या जादूनें शेतकऱ्यांचे झाले रणशूर
विळे कोयते क्षणांत बनले भाले तलवार
या मंत्राची जादू पसरतां झडल्या समशेरी
भीमथडीचे घोडे चढले अटकेवर स्वारी
चहुकडे आसेतु हिमाचल करीत दिग्विजय
जरिपटक्याचा हत्ती फिरला तुडवित अरिहृदय
या जादूनें महाराष्ट्र-यश जाय दिगंताला
तीच जादु ही बोला 'हरहर महादेव' बोला–४

त्या मंत्राचा महाराष्ट्राला विसर कसा पडला
समशेरीचें पाणी उतरुनि जंग तिला चढला
या मंत्राची जादू सरता सरली पुण्याई
वीरांचे विक्रमही सरले विभव लया जाई
पुनः कराया जागृत आतां या महाराष्ट्राला
'जयोऽस्तु जयजय' बोला 'हरहर महादेव' बोला—५

अष्ट दिशांचे पडदे फाडुनि भेदिल गगनाला
करुनि असा ध्वनि, बोला 'हरहर महादेव' बोला
निजलेला महाराष्ट्र जागविल स्फुरवुनि वृत्तीला
राष्ट्रगीत हें बोला 'हरहर महादेव' बोला
दिव्य ध्वनिच्या या रसरंगीं वीरांनो डोला
पुनः एकदां बोला 'हरहर महादेव' बोला—६

## १६७. नव महाराष्ट्र गीत

**'रंग माझा वेगळा'** मार्च १९७४ — **सुरेश भट**

बदलवून टाकू अपुला महाराष्ट्र सारा,
वर्षवू इथे घामाच्या अहोरात्र धारा !

ह्याच कातळांना आणू
कळा सोनियाची;
ह्याच माळरानीं काढू
पिके मोतियांची;
भुकेल्यास भाकर देऊ, अनाथा निवारा !

चालवून गिरणीमधला
एकएक साचा
अम्ही पुन्हा हाती घेऊ
हात भविष्याचा
उद्याच्या यशाने केला आमुचा पुकारा !

अम्हावरी खिळले डोळे
उद्यांच्या पिढ्यांचे;
आज स्वप्न बघतो आम्ही
उद्याच्या दिसाचे !
आता कुठे इतिहासाचा समजलो इशारा !

माय कोयनेची माया
बळ अम्हांस देई;
गांवगांव गहिवरलेले
तिचे नाम घेई;
मराठी विजेला फुटला विजांचा धुमारा !

घरोघरी स्वातंत्र्याचा
पांडुरंग आला;
महाराष्ट्र भेटीसाठी
पुंडलीक झाला;
विटेवरी आम्ही ठेवू जागता पहारा !

## १६८. मराठ्या

'महाराष्ट्राला मुजरा' १९५६ सुरेश भट

मराठ्या उचल तुझी तलवार ।
एकिची उचल तुझी तलवार ॥
शपथ तुला आईच्या दुधाची ।
घेऊं नको माघार, मराठ्या ॥ १

शपथ तुला शिवछत्रपतींची ।
चळचळ कांपत अत्रनी सारी ॥
काय विसरली दिल्ली तुझिया ।
तलवारीची धार, मराठ्या ॥ २

दाहि दिशांना तुडवित होत्या ।
रे तुझ्याच घोड्याच्या टापा ।
सारा भारत पाहात होता ।
गड्या तुझ्या वाघासम झापा ।
तुझी जात मर्दाची मर्दा ।
कर शेवटचा वार, मराठ्या ॥ ३

आतां दाखव तराजूस तूं ।
अपुल्या तलवारीचें पाणी ।
सांग विकत का घेतिल तुजला ।
बनियाच्या थैलितिल नाणीं ?
भीक कशाला ? घे हक्कानें ।
तुझेंच तूं भांडार, मराठ्या ॥ ४

कमनशिबानें तुझे पुढारी ।
बाजिराव पळपुटे निघाले ।
नव्याच बाळाजी पंतानें ।
निशाण चोरांचें फडकविलें ।
अशा पिसाळा उडवाया कर ।
ऐक्याचा निर्धार, मराठ्या ॥ ५

स्वर्गामधल्या पुण्यात्म्यांचे ।
तुजवर मर्दा खिळले डोळे ।
आणिक टपून बसले दुष्मन ।
तुझें पुरें करण्या वाटोळें ।
जिंकलास तर अखिल विश्व तव ।
करील जयजयकार, मराठ्या ॥ ६

## १६९. लवत्रा इथे माथे सदा

'उषग' २२-८-६२ —भाऊ भालेराव

'महाराष्ट्र' हा, पांथस्थ हो ! या या इथें हा पाहण्या ।
जो सज्ज देशा रक्षणा ।
ही हीच भू सरसावली रक्षावया या भारता ।
लवत्रा इथें माथे सदा । १

ही संस्कृति हे देवहि दिसतात जे का आजला ।
अन् धर्म का हा राहिला ।
रक्ताळल्या खड्गा पुसा रक्ताळलेल्या आपदा ।
लवत्रा इथें माथे सदा । २

तें पंढरीचें एकचि धार्मिकतेचें 'तीर्थ' जे ।
लक्षावधी 'रुधिरीं' सजे ।
वज्रासही भेदूं अशी शक्ति हृदीं भरली जिथे ।
परि 'ताज' दगडाचे इथे । ३

"जो जें इथे मागेल त्याते देऊ" सर्वस्वा त्यजूनी ।
घ्या प्रचिति येऊनी ।
"देऊ कांसेची लंगोटी" ही दया-सीमा इथे ।
दावा तरी लाभे कुठे । ४

"हें विश्वचि घर आमुचें" व्याप्ति अशी या अंतरीं ।
मोजाल ती कैशी परि ? ।
कैलासहि कण भासतो दिव्यत्त्व येथील पाहता ।
आकाश पावे क्षुद्रता । ५

आणाल कोठून माप तें मापावया उंची अशी ।
का उगा पडता फशी ।
का सागराते बाहता जो भासतोचि निर्झरी ।
तो सूर्यहि पणती परि । ६

मानव्य तें मांगल्य ल्यालें देवता देवत्वहि ।
शूरता शूरत्व घेई ।
धैर्य धैर्यत्वास पावे प्रेम पावित्र्याप्रति ।
ही अशी महति किती । ७

सुख भावना विष मानल्या माणुसकी सुख मानले ।
'जग हो सुखी' ब्रिद बाणले ।
हें ध्येय आहे–आस ही अन् हीच आमुची संपदा ।
लववा इथे माथे सदा । ८

## १७०. बृहन्महाराष्ट्र गीत

'गीत गंमत' शके १८९२, सन १९७० वि. ग. भिडे

महाराष्ट्रभूमी जरी जाहली पारखी दूर आलो तिच्यापासुनी ।
तिचे भक्त होतात एकत्र भाषा मराठी तया स्फूर्ति संजीवनी ॥
न कृष्णा न गोदावरी, चंद्रभागा नसे देहु आळंदी वा पंढरी ।
वैशिष्ट्य आत्म्यांत सामावले व्याघ्र सह्याद्रिचे पृष्ठि पाठीवरी ॥ १ ॥

ज्ञानेश्वरी संतकाव्ये पवाडे सुसमृद्ध भांडार आम्हां खुले ।
यशाच्या खुणा ठेवुनी अन्यदेशी मराठ्यांनि सर्वांस प्रोत्साहिले ॥
स्वातंत्र्य संग्रामि अर्पून काया दिला दिव्य संदेश कानीं घुमे ।
खाणीतुनी न्या कुठेही हिरा तेज पैलूतुनी त्याचिया चम्‌चमे ॥ २ ॥

महाराष्ट्र माते तुझे कष्ट नष्टावया ठाकली ही तुझी बालके ।
जरी अल्पसंख्यांक एकाकि शिस्तीत दावू करूनी जगा कौतुके ॥
परप्रांत बंधूंत फैलावुनी प्रेम, आशिर्वचें झेलु द्रोणागिरी ।
दु:खार्णवी डुंबलेल्या उराशीं धरु आणु ओढून कांठावरी ॥ ३ ॥

नाही मला खंत ओलांडिला प्रांत माझा अतिप्यार प्राणाहुनी ।
खुराड्यात संकोचल्या वृत्ति संधी विकासास लाभे प्रवासातुनी ॥
महाराष्ट्र मोहोळ बोधामधाने भरू गच्च ही अंतरी भावना ।
नव्या गोष्टि पाहूनि ऐकूनि वाढेल सामर्थ्य अन्याय उच्चाटना ॥ ४ ॥

चंद्रावरी वस्तिप्रीत्यर्थ उड्डाण घेती अशा मानवांचे युग ।
सातां समुद्रांत संचारणें भाग्य माना दिशा दाहि हिंडे खग ॥
तरी लक्ष वृक्षी जिथे आयुपक्षी पिले एकमेकांसवें काढिती ।
'मराठी' 'महाराष्ट्र' नेत्रापुढें पंचखंडांत होवो भ्रमंती किती ॥५॥

राष्ट्रीय भाषा असे भारताची सर्वत्र हिंदी महासागर ।
महाराष्ट्र बेटा, तुझी हिंदमाता, सेवा सहाय्या रहा तत्पर ॥

# १७१. माझ्या मराठी मनांत

'प्रेषित' ७-१२-८५ — सुरेंद्र भोसले

माझ्या मराठी मनांत
आहे एक ज्ञानदेवी
भोळ्या नाम्याच्या अभंगात
जनी नाचते दिवाणी—१

माझ्या मराठी मनांत
सारे सामावले विश्व
नाही येथे जाति-भेद
सारा नांदे बंधु-भाव—२

माझ्या मराठी मनांत
स्वप्न फुले पानोपान
माय वहिणींच्या ओठीं
झरे प्रेमाचेच गान—३

माझ्या मराठी मनांत
वाहे सुखाचा सागर
तृप्त संसारात येथें
आहे आनंद आगर—४

माझ्या मराठी मनांत
नाही गरीब श्रीमंत
सारे कष्टात नहाती
नाही कोणालाही खंत—५

माझ्या मराठी मनांत
भाव-भक्तीचा फुलोरा
आणि बुद्धिचा विलास
प्रगटे हो जनी सारा—६

माझ्या मराठी मनांत
भेटतसे संतजन
आणि विज्ञान सांगत
येती शास्त्रज्ञ महान–७

माझ्या मराठी मनांत
तेजाळल्या स्नेह-वाती
विषमता जळे येथे
मिळे सर्वांना सद्‌गती–८

## १७२. स्वतंत्र महाराष्ट्राचें स्वागत

'पंचगंगा' फेब्रु. १९६४ **राजकवी शं. बं. भोसले**

चला दिवाळी करूं साजरी
दीप पाजळा घरोघरीं ॥ धृ० ॥

स्वतंत्र महाराष्ट्राच्या आतां
हर्षभराने करूं स्वागता
छत्रपती श्री शिवरायाला, आठवुनी अंतरीं ॥ १ ॥

कोटि जनांनी कौल लाविला
गोळ्यांचा वर्षाव झेलला
कळस तयांच्या चढेल आतां, यशोमंदिरावरी ॥ २ ॥

होईल माझी माय मराठी
स्वतंत्र राज्याची सम्राज्ञी
गातिल महिमा तिचा देवगण, आनंदें सुस्वरीं ॥ ३ ॥

धन, धान्यें घेऊनी कोयना
येईल नवमहाराष्ट्रदर्शना
स्वप्नें आमुची गोड गोड ती, होतील आतां खरी ॥ ४ ॥

गड किल्ल्यावर नौबत झडली
जड सृष्टीही नाचुं लागली
भगवा झेंडा अभिमानानें, उंचावत अंबरीं ॥ ५ ॥

धन्य हुतात्मे स्वर्गी हंसती
मनीं आज ते कृतार्थ होती
ओंवाळा आरती तयांना आज नव्या दरबारी ॥ ६ ॥

## १७३. महाराष्ट्र वंदन

'पंचगंगा' राजकवी शं. वं. भोसले

जय जय जय जय, जय महाराष्ट्रा
नाद घुमे हा दाहि दिशांना
साधुजनांच्या नरवीरांच्या
प्रणाम माझा महाराष्ट्राला ॥ धृ० ॥

भगवा झेंडा नेऊनि ज्यांनी
अटकेवरी तो फडकविला
छत्रपती त्या शिवरायाच्या
प्रणाम माझा महाराष्ट्राला—१

सह्याद्रि, गड, किल्ले ज्याच्या
सदा राहती दिमतीला
वैभवशाली शूर वीर त्या
प्रणाम माझा महाराष्ट्राला—२

कृष्णा, भोगावती, कोयना
सदा वाहती चरणाला
फलपुष्पांनी नटे सदा त्या
प्रणाम माझा महाराष्ट्राला—३

जलाशयाचा लाभ घ्यावया
गंगा आमुची सज्ज कोयना
उठ मावळ्या आडव तिजला
करी भगीरथ यत्नाला—४

धरणावरुनी अमृतधारा
ओतील जेंव्हा माय कोयना
प्रचंड शक्ती देईल आम्हां
वीज राबवूं सेवेला—५

पिकवूं भूमी महाराष्ट्राची
रास रचूंया धनधान्याची
उद्योगानें चला करू या
नंदनवन हा देश आपला—६

# १७४. महाराष्ट्र गीत

'उषःकाल'—१९७१ गंगाधर महाम्बरे

एकदिलाने एकस्वराने गाऊ हे सहगान
महाराष्ट्राचे गान गाऊ या महाराष्ट्राचे गान
स्मरुनि हुतात्मे ज्यांनी वेचिले महाराष्ट्रास्तव प्राण
महाराष्ट्राचे गान गाऊ या महाराष्ट्राचे गान—१

सह्याद्रीचा गिरी पाठिशी ग्वाही देइ निर्भयतेची
कृष्णा, भीमा, गोदा, पूर्णा तीर्थे ही पावित्र्याची
गडदुर्गांचे, मंदिरांचे मंगल हेचि स्थान
महाराष्ट्राचे गान गाऊ या महाराष्ट्राचे गान—२

सस्यशामला धरती इथल्या हरिततृणांची पाती
स्वैर वाऱ्यावरी पवाडे, अभंग, ओव्या ती गाती
वेदमंत्रांचे बळ आम्हा, मातीचा अभिमान
महाराष्ट्राचे गान गाऊ या महाराष्ट्राचे गान—३

शूर आम्ही हो वारस ज्यांची रणि मर्दुमकी अनिवार
ज्यांनी रोविले निशाण अपुले दूरदूर अटकेपार
इतिहासी महाराष्ट्र शोभते सोनियाचे पान
महाराष्ट्राचे गान गाऊ या महाराष्ट्राचे गान—४

कोटी कोटी वीर मराठे नांदु गुण्यागोविंदाने
देश मराठा, धर्म मराठा, जगू मराठी बाण्याने
देवांहुनिही वंद्य अम्हां; हें अमुचें राष्ट्र महान
महाराष्ट्राचे गान गाऊ या महाराष्ट्राचे गान—५

# १७५. महाराष्ट्र देश

,आनंदाचे डोही'—१९८६ श्री. गंगाधर महाम्बरे

हजार जिव्हा मला लाभू दे शेषासम ईशा
गाऊ दे महाराष्ट्र देशा
पूर्व दिशेला सह्याद्रीची रेखियली रेषा
व्यापितो सागर पश्चिम दिशा
गोदा, कृष्णा, तापी, पूर्णा वत्सल जलवाहिनी
सुफलित कृषीवला जीवनी
निशिदिनि बहरुनि फुले वेलिची गंध सदा देऊनी
फुलविति प्रमोद लोभावुनी
ऋतुवर्षा नव नक्षत्रांनी सुखावतो भिजुनी
करिता छान पीकपेरणी
सुगी साधुनी पंख पसरिती किलबिलते पक्षी
अळवुनि सुरेल स्वरनक्षी
गुणगुणती अपुल्याशी कवने झुळझुळती वारे
वरुनी गगन बघे सारे
अभंग भजनी अबिर बुक्यांनी शोभिवंत मळवटे
रंगती इथे वाळवंटे
शाहिराची तिथे पडे ती थाप डफावरती
थरथरे क्षणार्धात धरती
पैंजण बांधुन लावण्याचे नाचत ये लावणी
छुमछुमे गुणी गुणवती कुणी
मर्दुमकीची गाथा अपुली मर्द मराठ्याने
लिहिली सुवर्णाक्षराने

दर्यावर्दी झुंजाराची कीर्ती संवादुनी
कथिली ह्या गड दुर्गांनी

## १७६. स्फूर्तीगीत

'स्फूर्तीगीते' गंगाधर महाम्बरे

महाराष्ट्रा ! तुझ्या गीती मला दे निशिदिनी स्फूर्ती
तुझी विश्वात पसरु दे कलाशास्त्रातली कीर्ती ॥ धृ० ॥

तुझ्या दारि फुले बघ कल्पनांचा दिव्य कल्पतरू
तुझ्या घरि राष्ट्रप्रेमाच्याच येती भावना बहरू
जरि परदेशी मी झालो ठसावी मनि तुझी मूर्ती
तुझी विश्वात पसरु दे कलाशास्त्रातली कीर्ती—१

जगाच्या विविध भाषाशैली जरि आकृष्ट करितील
मनाच्या खोल गाभाऱ्यात मराठी बोल असतील
गुरु होऊनिया जगता तुझा राहिन विद्यार्थी
तुझी विश्वात पसरु दे कलाशास्त्रातली कीर्ती—२

जिने जोपासली मूल्येच मानवता प्रमाणांची
तुझे जयगान गाईल बासरी ही पाच प्राणांची
मनि जे ध्येय धरिलेले करावी तू सदा पूर्ती
तुझी विश्वात पसरु दे कलाशास्त्रातली कीर्ती—३

एक दिलांनी इथे नांदती पहा विविध धर्मी
अशी ही वंद्य मातृभूमी....
अभिमानाचा मानबिंदु हा जणु भारतवर्षा
गाऊ दे महाराष्ट्र देशा

## १७७. माझा महाराष्ट्र

आनंदाचे डोही–१९८६ गंगाधर महाम्बरे

उभ्या नंदनवनी घेऊन चला
माझा महाराष्ट्र आवडे मला—
नदीनाल्यात खेळतसे पाणी
घराघरात घुमे संतवाणी
गडदुर्गांची कांति वसुधेला—
रत्नखाण शूर योद्ध्यांची
पूर्वकाली आशा उद्याची
शोभे सह्यगिरी हिमाचला—
डुलतात हंगामी शेते
भुई सुपीक पीक हे देते
वरदान भूमि कृषिवला—
यंत्राचे मंत्ररूप गाणे
दिनरात गात कारखाने
नसे उणे काही आनंदाला—
खेड्याखेड्यात चमकली बिजली
मने मराठी सुखात भिजली
येई उमाळा मराठमोळा—

## १७८. जय महाराष्ट्र

'मधुवंती'–१९६६ मधुगंध (ना. रा. पगारे)

याहो सारे आधी गर्जू नमवूनी माथा जयहिंद,
गर्जना करू मग ही–जय जय महाराष्ट्र देशा !
जय जय जय, जय जय, जय महाराष्ट्र देशा ! ॥ धृ० ॥

हिंदमातेच्या कुशीं रत्नजडीत तूं सुपुत्र देशा
सह्याद्रि हा किरीट शोभे बा मस्तकीं तव उज्ज्वल
पश्चिम सिंधु त्यावरि करी अविरत अभिषेक
चरणांवर त्वां लोळण घेति मुळा-मुठा सोज्वल
झिजविती काया तुझियासाठीं भीमा-कृष्णा-कोयना
पवित्र गोदा देत सुधा–करी नीरा तुज अमर
प्रणाम करिती जोडुनि हातां इंद्रायणी-दारणा
पंचवटीच्या छायीं चाले तुझाच जयजयकार !–१

मुळशी-राधा-खडकवासला-गंगापूर-कोयना
सेवारत हे सुसज्ज भाटघर नि भंडारदारा
मुंबापुरी ही भारतद्वार कटीवर हांसे तुझ्या
बगीचा ठाणें, दे साखर नगर, सोलापूर ज्वारी,
भात कुलाबा, कपास खान्देश, दे कोल्हापूर गूळ
गहूं, बाजरी, द्राक्षें नाशिकीं, पुणें विद्येचे माहेर
सारी बाळें स्वकार्यारत वरदान तुझे म्हणून
जय जय जय, जय जय, जय महाराष्ट्र देशा !–२

पूजा करिती आळंदी-पैठण-पंढरपूर क्षेत्रें
वेरूळ-अजिंठा-घारापुरी तव सुभाग्य लक्षणें
शिवबा-फुले-टिळक-आगरकर-‘बाबा’-‘तात्याराव’
मानव्याचे सजीव पुतळे ठरले तुज वरदान !
ज्ञानेश-तुका-समर्थ-तुकड्या, ही संत जना थोर
भाटसृष्टीचे ‘केशवसुत’-‘गिरीश’-‘कुसुमाग्रज’
उधळी ‘यशवंत’ भावफुले तुझिया नांवावर
जय जय जय, जय जय, जय महाराष्ट्र देशा !–३

धना, संता, बाजी, ताना नेती त्वां यशशिखरावर
फडकावूं पताका त्यांची चढतां यशोगिरीवर
प्रलय लागतां हिमालयाला हा सह्याद्रि धांवला
गर्जत जाऊं दे साथ यशवंत विजयी व्हाया.
गर्जत गाठूं यशोगिरी—या गात 'जय महाराष्ट्र' !
विनवी 'मधुगंध' सर्वां करा महाराष्ट्र उद्धार
नमवुनी माथा याहो सारे गर्जूं पुन्हां जयहिन्द !
नि गर्जा मागुती, जयजय, जय महाराष्ट्र देशा ! ४

## १७९. महाराष्ट्र प्रभा

'मनुका' १९६५ —पंडित महाजन

समृद्धी 'बुद्धीची' उपजत तिचा वासहि जिथे ।
जिथे 'रक्ती' पाही अनुपमहि ते शौर्यहि तिथे ।
तिथे औदार्याचे 'विपुल नमुने' त्यागहि तसा ।
तसा नाही कोठे जगति दिसला देशहि असा ॥ १ ॥

समर्थांची वाणी शिकवण सदा ती तुजसवे ।
सवे गाथा, ज्ञानेश्वरी करि तशी तीहि मिरवे ।
रवे संतांनांहि उजळित तुझा 'नाथ' हि खरा ।
खरा देई हद्रा हरिजन घरी जेवुनि बरा ॥ २ ॥

तुझ्या चारित्र्याची फडकत पताका रिपु-स्नुषा ।
स्नुषा वंदावी तू वदुनी जननी दाविसि दिशा ।
दिशा दावी न्यायी प्रभु जरि चुके निर्भय असा ।
असा देहान्ताची सुनविशि सजा निःस्पृह तसा ॥ ३ ॥

स्वराज्याच्या हक्कास्तव गरजता वाणिहि खडी ।
खडी मागे ती ही सकल जनता ही हरघडी ।
घडी मोलाची घडविशि असा जैं भरवसा ।
वसाया चित्तीं तूं 'तिलक' ठरसी मंगल असा ॥ ४ ॥

त्रिखंडी जी गाजे उडि जगति ती हो गलबला ।
बलाढ्याचा नक्षा उतरवि असा साहसि भला ।
भला लाभे ऐसा सुतगण तुला वंद्यहि असा ।
असा नाही कोठे जगति जगला एकचि असा ॥ ५ ॥

नऊवारी साडी कुतुकहि जगा ती नथ जशी ।
जशी त्यागी ती ही दिसत महिला नम्रही तशी ।
तशी शृंगाराची थयथय सुरा नाचवि पहा ।
पहाया चाखाया मिळत न कुठे काव्यहि महा ॥ ६ ॥

अहा ! धर्मासाठी लवशि न परी मोडशि असा ।
असा होशी मानी तद्वत् इमानी गुण असा ।
असाह्या दे साह्या जगविशि जगीं ब्रीदहि महा ।
महाराष्ट्रा ! ! लाभे अतुलहि प्रभा उज्ज्वल पहा ॥ ७ ॥

## १८०. महाराष्ट्र देश

**'भावभेट'** १९३२ **मनोहर**

सुंदर देशा, पवित्र देशा, भाग्यवान देशा,
कणखर देशा, मोहक देशा, महाराष्ट्र देशा.
नरवीरांच्या स्वतंत्र देशा, आडदांड देशा,
रामदासि बाण्याच्या देशा, महाराष्ट्र देशा.

सत्पुरुषांची मुत्सद्यांची तूंच, सख्या खाण !
रसवंतीच्या वागीशांची तुला न कधिं वाण !
पतिव्रतांच्या देशा, मंगल साध्वींच्या देशा,
पाणथळीच्या हिरव्या देशा, माळांच्या देशा.

प्रभुवर आले दंडक विपिनीं शरयू तळमळते !
पंचवटीला गोदावरिचें हृदय उचंबळतें !
आयोध्येचा राजकुमर ये, तुझ्या जनस्थानीं,
गाया संसाराची पहिलीं नवीं गोड गाणीं !

रघुवीरांच्या संसाराचें फुलें येथ फूल !
परदेशी दैत्यांस चारिली तूंच सदा धूल !
हस्तिनपुरच्या पांचालीचे दिव्य पंचप्राण,
पतिव्रतेच्या पावित्र्यास्तव घालिति थैमान !

विराटनगरीमाजी तुझिया, भीमकाय भीम,
प्रमत्त कीचक वधुनी करितो पावन तत्र धाम.
विराटगड हा, पांडवगड हा, हीं पांडवलेणीं,
सह्याद्रीवर गाती अजुनी द्वापरचीं गाणीं !

रत्नाकर तुजसवें घालितो सदैव धिंगाणा !
रत्नागिरिला उधळुनि देतो रत्ने, मणि, नाना !
त्या रत्नांचा प्रकाश फांके तुझ्या पठारांत,
लेखणिनें कुणि समशेरीनें, नाचविती तख्त !

स्वातंत्र्याची वैराग्याची, पहिली आरोळी
दिधली, ज्यांनी करुनी भेकड भीतीची होळी !
शक्ति, युक्ति, मति, भक्तीचा जो दयावंत राणा,
अष्टांगांचा प्रणाम माझा रामदासचरणां !

समर्थ स्वामी रामदासकृत ही अद्‌भुत लीला,
परळीला शुभ चरण लागतां सज्जनगड झाला !
जपुनि ठेविली शिवथर घळिला पुण्याची ठेव !
समर्थ चरणांवरती लोळती अजुनि किती देव !

प्रथम लावुनी हृदयीं राष्ट्रप्रेमाची ज्योत,
जागा करि जो निद्रेतुनि तुज रामदास पंथ.
त्या पंथाचें आद्यपीठ तव उर्वशीचें कांठीं,
तुला लाभलें, महाराष्ट्रा तव पूर्व पुण्य गांठीं !

त्या पंथाचा एक एक रणवीर, शूर, गाजी,
गांवोगांवीं मेलीं हृदयें करी पुन्हां ताजीं !
त्या पंथाची साथ करित तो देहूचा वाणी,
ज्याची वाणी येता कानीं डुले चक्रपाणी.

त्या पंथाचा आद्य ग्रंथ जो लिहिती कल्याण,
चाफळखोऱ्यामधें उघडली सौख्याची खाण !
परमार्थाचा व्यवहाराचा, सुंदर आदर्श,
दासबोध हा ग्रंथराज तुज देत सदा हर्ष.

रामदास पंथाचा पहिला करडा उमराव,
कल्याणांचें नांव थोपवी कामाची धाव !
रामदासपंथाचा पहिला, वीर राजबिंडा,
रायगडाचा राया रोवी स्वराज्य-सुख-झेंडा

परदास्याची धूळ उडविली शिवबांनी दूर !
स्वातंत्र्याचें लेणें दिधलें तुला पुरेपुर !
छत्रपतींचा कर्मयोगही उज्ज्वल निष्काम,
भगवा झेंडा अजुनि सांगतो शिवबाचें नाम !

समर्थचरणीं शिवरायांची भक्ति किती सार्थ,
साक्ष देत तें रामघळीला आज कुबडि तीर्थ!
गो-ब्राह्मण-प्रतिपालक, स्वराज्य संस्थापक प्रभुला,
शाहीराचा मुजरा पहिला त्या शिवभूपाला!

महाराष्ट्र, तव आकाशांतिल शुक्राचा तारा,
अजिंक्य ताऱ्याजवळी बसला सुंदर सातारा!
महाराष्ट्रा, तव कोंदणातला हिरा चमकणारा,
शिवशाहीचें हंसरें वैभव, सुंदर सातारा!

स्वराज्य बाजाराची पहिली स्वतंत्र ही पेठ!
स्वराज्य देवीच्या गालावरि हा सुंदर तीट!
प्रेमळ दृष्टी साताऱ्यावरि या सज्जनगडची!
पडते प्रेमें कृपासाउली त्या यवतेश्वरची!

साताऱ्याच्या पाठिशीं हा उंच अजिम्-तारा,
शिवशाहीचा भव्य कळस हा नभीं तळपणारा!
इकडे राखी द्वार जरंडेश्वर साताऱ्याचें!
सज्ज सदाचें धनुष्य तिकडे भार्गवरामाचें!

अजिंक्यतारा सुखें खेळवी उर्वशीस इकडे!
कृष्णामाई वेढा घाली जरंड्यास तिकडे!
उभा जरंडेश्वर पाठीला, कृष्णा पायाशीं,
इकडे कोमल वेण्णा बाला खेळे माहुलिसी!

गजांत लक्ष्मी, अखंड वैभव या साताऱ्याचें,
दिमाख दसऱ्याच्या स्वारीचा उत्तरेत नाचे!
हात जोडुनी उभे निरंतर महारुद्र अक्का,
चाफळच्या श्रीरामाभोंवति, दरडावितो शक्का!

बुक्का उडवुनि आनंदानें हो पंढरी काळी !
उडवुनि भंडारा देहावरि पाली हो पिवळी !
हरिनामाचा गजर होतसे श्रीरंगापुढती !
खंडेरायापुढतीं मुरळ्या सदा नाचताती !

औदुंबरचें नित्यनिरंजन पूजिसि तूं भक्त,
नृसिंहवाडी समूळ पळवी खोडसाळ भूत !
खेडोंपाडीं खडे ठाकले सदैव बजरंग,
कुस्त्यांचा फड करितो गांवीं जत्रेला दंग !

रानफुलांची माळ सावता माळी तुज घाली !
नाचे गोरा मोदें, मेलें पोर पदाखालीं !
सजीव रेडा कापुनि भरितो हंडि रंगनाथ !
उठवी मेली घार अंबरीं दासांचा नाथ !

भावभक्तिनें नामा फिरवी दगडी राऊळ !
जनाबाइसह गाणीं गातो नंदाचा बाळ !
वेद बोलवी रेड्याकरवीं संन्याशी पोर !
साध्वी मुक्ताबाई लाजवि संन्याशी थोर !

शांति ब्रह्माचा तो पुतळा भक्त एकनाथ,
घरांत ज्याच्या पाणी भरितो सुखें रमाकांत !
ब्राह्मण लुटिती दामाजीचें भरलें कोठार,
एकनाथ मृत पितर जेववी विप्रांचे थोर !

छत्रपतींचें राज्य वाढलें समर्थ-झोळींत !
पंचप्राणांची पूर्णाहूति संभाजी देत !
जबडा फाडी वाघाचा तो जवान संभाजी,
मोगल सेनासागर उसळे टक्कर दे जिंजी

मर्द धनाजी गनिमी कावा लढवी रणगाजी,
सैरावरा मोगल पळवी जवान संताजी.
कल्पित छाया बघुनि उदकीं थरारती वाजी,
येत धनाजी वदतां पळती मोगल रणगाजी

'कृष्णा' घोडी कडेकपारी उधळे चौफेर,
छत्रपतींच्या चितेत घाली उडि 'मोत्या' वीर
तानाजीला बरकत देई विजयी 'यशवंती'
पाटिलबोवांची रणिं चमके 'विजली' पानपतीं !

श्रीधर कविची अलंकारमय रसाळ रसवंती,
हरिविजयातुनि वाहे तुझिया कृष्णेच्या प्रांतीं !
भक्तिरसाची निर्मल गंगा, मुक्तेश्वरवाणी,
करुणरसानें सदैव आणी तव नयनां पाणी

यमक्या वामन पंडित चढवी यमकाऽलंकार,
भाव उसळला कविता बाला हृदयीं गंभीर !
मयूरपंडित भक्तिरसाच्या कवितेचा श्वास !
भारत, रामायण मंथुनि तुज देई रत्नांस

नाथ, दास, ज्ञानेश, तुका हे मूर्तिमंत वेद,
गोविंदाला वेड लाविती महाराष्ट्र वेद !
सह्याद्रीच्या, सज्जनगडच्या डोंगराळ देशा,
साताऱ्याच्या, श्रीकृष्णेच्या, महाराष्ट्र देशा

दिल्लीहुनि ये साताऱ्याला राज्याची हाव !
साताऱ्याहुनि पुण्यपत्तनां शौर्य घेइ धांव !
छत्रपतींची दमली पुढती विजयी समशेर
पेशवाइची बाहिर आली निजली तरवार !

रत्नागिरीवर उगम पावली शौर्याची गंगा !
अलोट लाटा अफाट करिती उत्तरेंत दंगा !
दख्खनची ही टोळधाड मग करी बेचिराख
उत्तरेतला दिमाख घाशी बाजिपुढें नाक !

दख्खनचा हा सिंह लोळवी दिल्लीचें धूड !
बंगाल्याचें नरडें फोडी गरुड काडकाड !
अटकेवरतीं नाच नाचला दख्खनचा भाला
हिंदुस्थानां दरडावी मग दख्खनचा डोळा !

हा रणगाजी हिंदुस्थानीं करितो थैमान !
सुंदर मस्तानि परि करिते याला बेभान !
वरची सुंदर चपला भेटे शौर्यसागराला !
गंभीर सागर उसळे बघतां चटक चांदणीला !

विश्वासाच्या, मस्तानीच्या सुंदरशा देशा,
बाजि, धनाजी, मल्हारीच्या आडदांड देशा.
पुण्यपत्तनां रक्षायाला, पुण्याचा कोट,
आळंदीचे संत देहुचे, बांधतात नीट !

गिरिच्या बाळा सान टेकड्या खेळति भंवताली,
श्रृंगाच्या रम्य कल्पना जणुं वीराजवळी !
शनवाराच्या वाड्यामध्यें श्रीमंती खेळे !
सौंदर्यानें, मंजुळ गानें, हिराबाग डोले !

डोकें लढवीं चातुर्यानें तो नानावाडा !
वानवडीला नाचे उमदा सदा लाख घोडा !
श्रीमंतांचा वाडा बघतो मोठ्या डौलानें !
मस्तानीचा महाल पाही खालीं लज्जेनें !

सरस्वती, श्री, शौर्यदेवता यांचें माहेर,
भारतभूला शहर पुण्याचा सुंदर आहेर !
शहर पुण्यानें धुळीं मिळविले मोगल रणगाजी !
परदेशी चोरांना अजुनी पाणी हें पाजी !

दिल्लीच्या तख्ताची शकलें सदाशीव उधळी !
पानपतावरि लाख बांगडी दुर्दैवें फुटली !
ऐश्वर्याचा कळस मोडुनि पानपतीं पडला !
राघु भरारी अरिचीं नरडीं फोडी अटकेला !

रडूं नको, प्रिय सख्या, जिवलगा, महाराष्ट्र देशा,
सूर्यावरती मेघ धांवती, कमनशिबी देशा !
घरीं लेखणी खेळे, समरीं नाचे तरवार,
नाना बघती घरांत, पाटिल घोड्यावरि स्वार.

पुन्हा पुण्याला धरुनि आणली विजयश्री रुसली,
पाटिलबोवावरी तारका नशिबाची हंसली !
खर्ड्यावरतीं माधव लिहितो तव वैभव-गीत !
कोरेगांवीं बाजीरावी गेली मातींत !

उभा रायगड, निजे भवानी, महाराष्ट्र, आतां,
हिंदुस्थानीं गाजे तुझिया लेखणिची सत्ता !
दीड शहाणे बारभाइच्या कारस्थानांत,
पाटिलबोवा डाव खेळति हिंदुस्थानांत.

पुण्यपत्तनी गोळा झाले तमाम सरदार
श्रीमंतांचा विवाह, हौशी, नाना करणार !
पेशवाइच्या ऐश्वर्याचा पाहिलास पूर !
महाराष्ट्रा, तूं पाहिलास ना सोन्याचा धूर !

धारवाडि न्यायाचा कांटा धरी रामशास्त्री,
कारंजावरी उडी घेतसे पेशवाइ रात्री !
समरभूमिवर मल्हारी हा उडवी कल्होळ !
दर्यावरती करी सावळ्या दंगा तांडेल !

सौंदर्याच्या, संपत्तीच्या हे हंसऱ्या देशा,
रणीं लढोनी, घरीं हंसावें हाच तुझा पेशा.
समरीं संगर खेळुनि दमले यापुढती हात !
महाराष्ट्रा, तव मस्तक करि मग जगावरी मात !

धनंजयाला सांगे गीता समरीं गोपाळ,
सांगे गीतारहस्य तुजला तुरुंगांत बाळ !
वाणी, करणी एक जयांची असे लोकमान्य,
आर्यनिवासस्थान शोधिती हे विद्वन्मान्य.

रत्नागिरिचें रत्न चमकलें हिंदुस्थानांत !
प्रभा तयाची दूर फाकली साऱ्या विश्वांत !
अज्ञानासह ज्ञान झगडतें, शक्तीसह युक्ती !
परदास्याचें नरडें दाबी देशाची भक्ती !

स्वार्थाला दे लाथ, सुखाच्या मानेवर हात !
कर्मयोग निष्काम आचरी हा भगवद्भक्त !
महाराष्ट्राचा पंचानन हा बाळ टिळक वीर !
शहर पुण्याचा पंचप्राण हा लोकमान्य धीर !

शिवरायांची कर्तबगारी, दासांचें ज्ञान,
महाराष्ट्रा तुज तारायाला आलें धावून !
विद्वन्मणि, नरशार्दुल, योगी, भक्ता, टिळकवरां,
महाराष्ट्राच्या अनाभिषिक्त भूपाला हा मुजरा !

राजकारणी, मुत्सद्दी हा महाराष्ट्रप्राण,
स्वार्थत्यागी वीर, अरींची करि दाणादाण !
विद्वानांच्या भिषग्वरांच्या वक्त्यांच्या देशा,
धुरंधरांच्या, सचित्रदेशा, लोकमान्य देशा.

शहर पुण्याचा वीर केसरी जेथें गुरगुरतो,
अचुक मारुनी 'भाला' फेकी 'काळ' तेथ हसतो,
विनोदपंडित श्रीपादांची हंसरी रसवंती,
'मनोरंजना'करितां धांवे सचित्र तंत्र जगतीं.

भारतगौरवमाला गौरवि तुला महाराष्ट्रा,
अभिनव काव्याची माला तुज हसवि महाराष्ट्रा.
'विविधज्ञानविस्तार' करी तव ज्ञानाचा जेथें
'रत्नावलि'चें सुंदर लेणें कवितेला तेथें.

अखंड कीर्ति कविवर गाती तुझी मायदेशा,
अजाण कविचा मुजरा घे हा महाराष्ट्र देशा.
कविरत्नांच्या पूर्ण काव्यमय महाराष्ट्र देशा !
कवी मनोहर तुजवरि बांधी उन्नतिची आशा !

अनंतफंदी नरजन्माचे कटाव गातात,
विनायकाच्या जोहाराची आग पेट घेत !
उसळे 'स्फूर्ती' मनीं, 'तुतारी' वाजवि हस्तानें,
'नवा शिपाई' 'श्रेय हरपलें' शोधी 'प्रतिभेनें'.

मनीं 'झपुर्झा' खेळे ऐके 'बोल सतारीचे',
बघुनी 'म्हातारी' केशवसुत काव्य 'भृंग'नाचे !
'प्रणयकथन' करुनियां सांगतो मग 'आम्ही कोण' !
गोविंदाग्रज कविच्या गुरुला सद्भावें नमन.

'संध्या' रागें रंगुनि उसळे 'अरुणा'च्या हृदयीं !
'निर्झर' तीरीं 'फुलराणी'ला बालकवी गाई !
सृष्टिसतीचा प्रेमळ गायक बाल 'धर्मवीर',
उदास गोविंदाग्रज हृदयां देत जरा धीर !

गात 'चिमुकली कविता', 'मुरली', 'राजहंस निजला',
'एखाद्याचें नशीब' रडवी 'अल्लड प्रेमाला'.
गोड 'गुलाबी कोडें' सुटलें 'प्रेमपाठ' गातां !
एका शब्दासाठि विनंती 'प्रेमकाळ' येतां !

'पुनर्जात प्रेमास' लागली 'हुरहुर' 'ती कोण'?
कधीं 'जिवाची बाला' देइल 'प्रेम आणि मरण' !
'कृष्णाकांठीं कुंडल' सुचवी 'विचार' 'घुबडा'ला !
'दसरा' देतो 'विराम चिन्हें' 'स्मशानगीताला' !

'वेडा' पुसतो 'काय करावे' 'निर्दय बालेस' !
'पहिलें चुंबन' घेतां गाई 'त्याच तारकेस' !
'गोड निराशेपुढे' ठाकला 'प्रेमप्रलयकाळ' !
दीन मनोहर, कविराया, तव पायांची धूळ !

महाराष्ट्रा, तव सात्विक प्रेमाचा हा शाहीर,
रसवंतीला गोविंदाग्रज कविचा आधार !
बाल कवीच्या, श्रीगोविंदाग्रजकविच्या, देशा
कवि कृष्णाच्या, पूर्णकाव्यमय, हृदयंगम देशा.

'उषःकाल उठवीत तुला मग 'सूर्योदय' फुलवी !,
'मध्यान्हीचा सूर्य वैभवें महाराष्ट्रा, नटवी !
'गड आला पण सिंह चालला' हो 'वज्राघात',
'आजकालच्या गोष्टी' बघतां हंसे 'चंद्रगुप्त !'

‘मायेचा बाजार’ भुलवितो ‘रूपनगर कन्या’,
‘मी’ मी करितां ‘असेंच जग हें’ गुंगवितें मान्यां !
हरि नारायण नवलकथांची माळ तुला देत,
‘दिव्य भयंकर’ ‘कोण परी हें घेतो लक्षांत’ !

जिथें कडाडे श्रीकृष्णांची थरारती वाणी,
तिथें गडकरी तुझिया नयनां आणितात पाणी !
जेथें केलें श्रीकृष्णांनी ‘बंड बायकांचें’ !
तेथें झालें नरसिंहाच्या ‘बंड तोतयाचें’ !

‘कृष्णार्जुन युद्धांत’ फडकला ‘प्रेमध्वज’ जेथें !
‘एकच प्याला’ तेथें रडवी ‘पुण्यप्रभावातें’ !
‘वीरतनय’ झुंजतो संगरीं ‘मूकनायकाशीं’ !
‘वधूपरिक्षा’ कारण झाली ‘प्रेमशोधनाशी’ !

‘भावबंधना’साठीं झुरतो जयंत संन्यासी !
‘तोड माळ ही’ म्हणे ‘शारदा’ ‘जन्मरहस्यासी’
‘गंधर्वाचें’ गाणें कोमल, मंजुल तान जिथें,
शुद्ध पहाडी कडाडती घे ‘केशव’ तान तिथें

‘माधव’ राष्ट्रप्रेमी शाहिर, प्रेमळ ‘आनंद’
‘अरविंदा’ची अजुनी फुलते कळी मंदमंद !
नव्याजुन्यांच्या रसवंतीचा हा बंदा दास
रानफुलांची ओंजळ वाही तव साहित्यास !

तुला गावया सजला गोविंदाग्रज शाहीर,
प्रतिध्वनी ये हृदयामधला केवळ बाहेर
आकाशाची कुऱ्हाड पडली तोंच तुझ्यावरती !
अश्रु वाळले नाही अजुनी तुझ्या मुखावरती !

वागीशांची नाचे; बघुनी तुजला, रसवंती
कशी न येईल अजाण हृदयां प्रेमाची भरती ?
सद्भक्तांची भक्ती येथें, योग्यांचें ज्ञान !
सच्छिषांची सेवा येथें, कर्णाचें दान ?

नरवीरांचें शौर्य खेळतें येथें दिलदार !
संपत्तिचें कुबेर उधळी येथें भांडार !
सह्याद्रीवर सदा खेळतो वसंत पुष्पांचा,
देशावरती वर्षा वर्षे तो धनधान्याचा !

सौंदर्याला पूर येतसे, येथें गंभीर !
गाणीं गाती सात्विक प्रेमालागीं शाहीर !
गंधर्वांचे आलाप कोमल येथें घुमताती
कलाविशारद सरस्वतीचे भक्त येथ रमती !

गुणगणमंडित, पवित्र, सुंदर, शूर मायदेशा
गोड करूनि घे, मनोहराची भक्तीची भाषा !

## १८१. चालवितो शाहीरगिरी

'कवि माधव यांची कविता' — कवि 'माधव'
नोव्हें. १९३५ — (माधव केशव काटदरे)

साधायाला व्यक्तिहित
राष्ट्राचा करिती घात,
पद त्यांच्या देऊन शिरीं
चालवितो शाहिरगिरी !
सावधान ! सावधान !! सावधान !!!

निज राष्ट्राच्या उद्धरणीं
रक्ताचें केलें पाणी,
त्यांच्यास्तव शाहीरांचें
तंतुवाद्य बोलायाचें !

दास्याचा दावेदार
महाराष्ट्र पूर्वापार !
पर्जन्य पडो वज्रांचा
उन्नत तरि माथा याचा !
मृण्मयही याची सेना
शत्रूंची उडवी दैना !
मात करी यांचा नृपती
हूणहरिण सिंहांवरतीं !
यदुवंशा उच्छदूनी
कितिहि गाजली सुल्तानी
तरि तिजला झाला काळ
शिव सरजाचा करवाल !
प्रचंड हिमनगसम पुढतीं
कोसळल्या जरी आपत्ति,
तरि राष्ट्रा देई धीर
रायरिचा खंदा वीर !
त्याच्यास्तव शाहीरांचें
तन्तुवाद्य बोलायाचें
कर्तव्याची हांक करी
निनदित जेंव्हा दरी दरी

रणिं भिडले छातीठोक
मर्द मराठ्यांचे लेक !
मोंगलशाही मस्त तरी
उडे तिची ठिकरी ठिकरी !
सुल्तानीवर ही मात
विश्व होय विस्मयचकित !
चळचळ कांपे बंगाला
दख्खनचा बघता भाला;
लढवय्ये जरी पिढिजाद
गडबडले रजपूत मर्द !
अटकेवर वळल्या ढाला
समरघोष 'हर ! हर !' झाला
करि गिलच्यां नामोहरम
पानिपताचा संग्राम !
मरूनि मृत्युवर ही मात
विश्व होय विस्मयचकित !
शस्त्रांचा झाला न्यास
परवशता घाली पाश !
पोवाडे निश्वासांचे
शेवटल्या शाहीरांचे
गुणगुणती अजुनी कानीं
जरि विरले वातावरणीं !
धारण त्यांतें करुनि शिरीं
चालवितो शाहिरगिरी
सावधान ! सावधान !! सावधान !!!

# १८२. शिवकालीन रायगड

**‘कवि माधव’ यांची कविता**—नोव्हें. १९३५ **कवि ‘माधव’**

“तुंग नगशिरीं दुर्ग कुणाचा हा झुलतो आहे ?
चंद्रहीन हा ध्वज कोणाचा फडकत वरि राहे ?
मुकुट मस्तकीं संध्या ज्याच्या सोन्याचा घाली,
गड कोणाचा वदा असे हा असा भाग्यशाली ?”
‘काय पुसतसां ? सह्याद्रिच्या बाळा जे काळ,
त्या काळांना काळ जाहला ज्याचा करवाल,
यश कैलासासम ज्याचें, जो आर्तांचा वाली,
रविप्रखरता, शशिशीतलता ज्यांत एक झाली !
शक्तियुक्तिचें, नीतिभक्तिचें मीलन ज्यामाजीं,
जिंकायाला समर्थ ज्याला नच झाले गाजी !
दुर्गराज हा गिरिशिखरींचा त्याच महात्म्याचा
शिवरायाचा, छत्रपतीचा, स्वराज्यदेवाचा !
उठ शारदे, डोळे भरूनी घे हा पाहून,
गा या मंगल कालीं यावरि मंगलमय गान ! १

“गिरि सिंहासन, वरी विराजे दुर्गांचा राणा !
सिंधुदुर्ग यापुढें वांकुनी देती नजराणा !
उभे राहूनी सह्याद्रीच्या निळ्या शिरीं कोणी
गड करिताती सेवा याची चवऱ्या ढाळोनी !
अभ्रांचे यावरी शोभतें छत्र शुभ्रवर्ण
अनिल यावरी गाउनि निनवी रसिकांचे कर्ण !
असेल याला दृष्ट लागली कोणा पाप्याची,
उषा म्हणुनि यावरि ओंवाळी उडुरत्नें साचीं !

करितो सारें रामाच्या हा नांवानें कर्म,
स्वर्ग आणणें भूलोकावरि हा याचा धर्म !
कर्तव्याचें, कर्तृत्वाचें हा झाला धाम,
हा शौर्याला, हा धैर्याला वाटे विश्राम !
दुर्गराज हा **रायगड** महा-राष्ट्राचें हृदय !
हृदयाचें या हृदय महात्मा ज्ञानी शिवराय ! २

बुरुज हिरकणी मातृप्रेमा दाखवितो इकडे,
टकमक टकमक टोंक बैसलें अवलोकित तिकडे !
घन तिमिराला भेदुनि येतां दिव्य अरुणकिरण
प्रतिप्रभातीं करी भवानी त्यांमाजी स्नान !
आग्नेयीला जराच पुढतीं श्रीगोंदा गेलें,
कुशावर्त तन्निकट, तयाच्या उदकीं कमलकुलें !
सप्तर्षींचें मंडल, हिमकर तारांच्या माला
गंगासागरसरीं उतरती रात्रीं स्नानाला !
राष्ट्रीं चाले चळवळ, तीचें हें केंद्रस्थान,
भक्तोद्धारक भगवंताचें येथ अधिष्ठान !
कर्तव्याची हांक हालवी सह्याचल सानु
चैतन्यानें स्फुरलें तेंव्हा येथिल अणुरेणु !
अनंतभास्करयुक्त निशेच्या गणी न परिवारा,
रायगडाला वंद्य सर्वदा दिवसाचा तारा ! ३

श्रीजगदीश्वररम्यमंदिरीं घंटांचा नाद
होतां त्याचा उठे शिवाच्या हृदयीं पडसाद
बल राज्याचें दाखविती या अष्टादश शाला,
व्यक्त द्वादश कोश करीती राज्यैश्वर्याला !

अरिला खड्गें, मना संयमें जिंकियलें ज्यांनी
त्या वीरांची इथे विराजे ही सौधश्रेणी !
राष्ट्रकुटुंबीं शिवरायाच्या विश्वासा पात्र,
चिंता चित्तीं राष्ट्रहिताची ज्यांस अहोरात्र,
सदनें ही त्या नृपसचिवांचीं, सुनीतिमंतांचीं,
गुणवंतांचीं, धीमंतांचीं, राज्याधारांचीं
उदात्ततेचें, मंगलतेचें हें वसतिस्थान,
जलदेवींना, स्थलदेवींना याचा अभिमान !
अलकावति ! तव गंजांतलक्ष्मीं रायगडीं रमली,
अमरावति ! तव अनुपम शोभा रायगडें वरिली ! ४

वर्षाकालीं कृष्ण घनांच्या थकलेल्या पंक्ति
प्रासादांच्या शिखरावरतीं घेती विश्रांती !
संतत धरुनी विमल जलाची दुर्गशिरीं धार
वाटे हलका करिति आपुला दुर्वह जलभार !
इंद्रधनूचें सांजसकाळीं तोरण बांधून
दुंदुभिनादीं गर्जित अपुलें देती मिळवून !
स्पर्धा धरुनी नवयुवतींच्या चंचल नयनांशीं
चंचलता चंचला आपुली दावितसे त्यांसी
श्यामपयोधरपटलाच्छादित ताऱ्यांच्या श्रेणी
लक्षावधि खद्योत नाचती हर्षभरें म्हणुनी !
सिंधु मंथुनी, करुनि अरण्यें अवघीं उध्वस्त
प्राकारांशीं झुंजत राहे खल झंझावात !
झंझावाता ! विझवायाला तुज नाही शक्ति
रायगडींची सदा जागती स्वातंत्र्यज्योति ! ५

अगस्ति तारा अंत सुचवितो वर्षाकालाचा,
भगवा झेंडा अंत सुचवितो दुर्मद राजांचा !
रहा अगस्ते ! सदैव चमकत नील अंबरांत,
फडकत राहिल भगवा झेंडा येथ अविश्रांत !
विरल विरल कर सजल घनांचे गगनीं समुदाय !
करिल अरींना विरल भूतळीं सरजा शिवराय !
कार्पासाच्या जागोंजागीं जणु रचिल्या राशी,
दिसोत ऐसे मेघ येउनी शुभ्रपणा त्यांसी !
दिसेल मग ही महाराष्ट्रभू स्वर्गासम सारी,
राष्ट्राचा संसार कराया सजतिल नरनारी !
अरविंदांवरीं मिलिंद गुंगुनि करोत झंकार,
पोवाडे शिवदेवावरुनि गातिल शाहीर !
कन्या दख्खन तुझी अगस्ते ! तिजला चिरकाल
प्रतापशाली शाहसून हा शिव होवो ढाल ! ६

हें एकाचें नव्हे कुणाचें, स्वराज्य सकलांचें;
सुसंस्कृतांचें, असंस्कृतांचें, श्रेष्ठकनिष्ठांचें !
प्रवृत्ति आणिक निवृत्ति यांचा येथें संयोग,
ज्ञाननदीचा यांतुनि वाहे संथपणें ओघ !
परधर्मीयां लेश न येथें धर्माचा जाच,
धर्मप्रसारवेताळाचा येथें नच नाच !
रिपुरमणींवर कधीं न होतो येथ बलात्कार,
जित शत्रूंचा करिती येथिल जेते सत्कार !
महाराष्ट्र हा तनय पार्वतीपरमेश्वर यांचा,
द्वेष याजला जन्मापासुनि जुलमी सत्तेचा !

विनाश याचा करावयाला येइल जरि कोण,
शाण्णव कुळिंचे भूपति यास्तव देतील प्राण !
'फड फड' शब्दीं वजावीत हें अरिला चिरकाल
राष्ट्रपताके ! कविस्फूर्तिला हलवित तूं डोल ! ७

प्रयाग, काशी, मथुरा, वृन्दावन हीं कोणाला ?
नसेल ठावा रायगड जया, त्या हतभाग्याला !
हा क्षेत्रांचें क्षेत्र रायगड, तीर्थांचें तीर्थ !
गंगासागरकृतिस कराया गंगा असमर्थ !
उडति थुइथुई कारंज्याच्या जेथें जलधारा,
जलबिंदूंशीं जिथें खेळतो स्वच्छंदी वारा,
निकट तयाच्या एक विराजे भव्य प्रासाद,
सजवुनि त्याला आंत लाविला जडिताचा चांद;
मंद वायुनें हलति झालरी मोत्यांच्या मधुनी
चमकुनि अपुलें हिरेमाणकें दाखविती पाणी;
वरतिं छतावरि बसला बहुविध रत्नांचा थाट
सभा खालतीं नररत्नांची बसली घनदाट !
सेवक मागें, पुढें प्रजाजन, पार्श्वी उमराव,
मध्यें शोभे सुवर्णासनीं दुर्गराजदेव ! ८

हा भीष्मासम समरधुरंधर, कर्णासम दाता,
धर्मनृपासम हा पुण्यात्मा, धर्मात्मा ज्ञाता !
समर्थाचियां सद्बोधाचें या कळलें मर्म,
नरतनुधारी परमोज्ज्वल हा महाराष्ट्रधर्म !
हा संतांना, हा योग्यांना पूज्य महाभाग,
हा योगेश्वर कृष्णाचा निष्कामकर्मयोग !

शिवस्वरूपी सदाशिवाचा हा नृप अवतार
पतितोद्धारा ! शिवा ! उदारा ! तुला नमस्कार !" ९

## १८३. महाराष्ट्र गीत

'भावनिर्झर' १९३८ वा. गो. मायदेव

नमन महाराष्ट्रभूमि करितसों तुला
तुझियासम तूंच धन्य माय निस्तुला ॥ धृ० ॥

तव पर्वत विंध्य सह्य शक्ति वितरिती
गोदाकृष्णादि नद्या स्फूर्ति अर्पिती
देसि विविध धान्य आणि किती फळां-फुलां—१

श्रेष्ठ सदाचार युक्त नाथ सुचविती
भक्तमणी तव तुकया भक्ति बोधितो
यत्नमार्ग रामदास शिकवि आपुला—२

मावळचे कणखर तव पुत्र मावळे
तव सत्ता निर्माया शक्त जाहले
तुझियास्तव त्यांहिं न का प्राण वेचिला !—३

राखण्या स्वधर्म येथ एक जाहलों
नेला ध्वज अटकेवर हें न विसरलों
केलें नच दूर तुझ्या वंद्य पाउलां—४

ऐक्याचा मंत्र जपुनि एक होउनी
राखणार मान तुझा जननि मानिनी
आशिर्वच दे माते ! या तुझ्या मुलां—५

# १८४. मंगलदिन आला

**‘महाराष्ट्र गौरव गीते’** **वा. गो. मायदेव**

पहा महर्षे ! तूं वांछियला मंगलदिन आला !
आला मंगलदिन आला !

शताब्दिकालीं तूं प्रकटविली जै अपुली आशा
महाराष्ट्रगगनाच्या तैं तूं पूर्ण उजळिल्या आशा !

कुणी निंदिलें तुला म्हणाले म्हातारा चळला
मराठी-मना महामंत्र तव शब्द परी कळला.

कुणी म्हणाले औचित्या तूं कलंक लावियला
कचरणार पण कधिं न मराठा मनचें बोलायाला.

कुणी बोलले दिसते याला लिहुन दिलें कोणी
खरेंच कळण्या कठीण कोणतें ताक आणखी लोणी !

जीवन ज्यानें सर्व वेचिलें पुण्यें करण्यांत
देवहि मानी धन्य तयाचे हेतु पुरविण्यांत

तुझ्याच वदनें होवो येती शुभदिन ललकारी
महाराष्ट्र जय ! सर्व मराठा वदूं दे जयजयकारीं !!

# १८५. मराठबाणा

'स्वप्नलहरी' १९५३ माधव ज्युलियन् (माधव त्र्यंबक पटवर्धन)

महासिंधु याला असे पाठीराखा, तसे साह्य सह्याचलाचे कडे,
खडे दुर्ग साल्हेर, फोंडा, परांडा, अशेरी असे दक्ष चोहीकडे;
महाराष्ट्र हा कृष्णपाषाणदेही, परी लोहपाणीहि अंगांत या;
नद्या न्हाणिती तापि, कृष्णा नि गोदा, भिमा,
मांजरा वैनगंगा तया ॥ १ ॥

महात्मा खरा जो स्वधर्माभिमानी परी धर्मवेडास थारा न दे,
समत्वें गुणग्राहकत्वेंच योजी स्वकीयांस जो राष्ट्रकार्यामधे,
सदा वंद्य जो क्षात्रकर्मप्रणेता महाराष्ट्रसम्राट शिवाजी प्रभू
तया पूज्य ती पूज्य तत्सेवकाला न कां संतमाता महाराष्ट्रभू? ॥२॥

जिचा 'अमृतांतेहि जिंकील पैजा' असा बोल ये प्रत्ययाचा निका,
पहा भिन्नजातीय पुष्पांकरांहिं दिसे गालिचा की हिची वाटिका,
मराठी अशी ज्ञानदेवी जयाची असे मायबोली मराठीच तो,
हृदीं रक्त दे साक्ष तो बंधु माझा, कुठेहि असो
उच्च वा नीच तो ॥ ३ ॥

मराठीस अन्याय कोठेहि झाला, स्वदेशीं विदेशीं कुणी गांजिलें
मराठी कसा मी मनस्ताप माझा धडाडे जरी तीव्र दुःखानिलें?
मराठी जनांचेंच वर्चस्व राहो स्वतःच्या महाराष्ट्रदेशीं तरी—
प्रसादें तुझ्या कोणती व्यक्त आशा करूं अन्य हे
वंद्य वागीश्वरी? ॥ ४ ॥

## १८६. महाराष्ट्र गीत

‘स्वप्नरंजन’ ‘स्वप्नलहरी’ माधव ज्युलियन्

मराठीला संगोपून वैभव दे ज्ञानेश
मराठ्यांना मेळवा हा समर्थांचा संदेश
महाराष्ट्र जन्म पावे धन्य धन्य स्वदेश !
येई शिव निवाराया सारे दास्याचे क्लेश—१

वतनाचे बंदे खंदे आपसांत लढले,
स्वामिभक्तीमध्यें राष्ट्र बुडवूनी चढले,
कुळ-वाडीपायी पहा कलमाही पडले,
परकीयदास्यपंकीं स्वस्थ झाले विशेष—२

भांजलेल्या धर्ममूर्ती रानोमाळ पडती,
गांजलेल्या हिंदु देवी जनान्यांत कढती,
खेडवळ मुके जीव दारिद्र्यांत कुढती,
चाले परी अमीरांचा ऐशाराम हमेश !—३

पंढरीचा संत तोही भक्तिभाव गौरवी,
आध्यात्मिक मुक्तींतच मानी सुखथोरवी,
राष्ट्रमुक्तीचाच परी उदयाला ये रवी
योगी कर्म-कुशलाला कशाचें हो अपेश ?—४

मावळींचे प्रामाणिक मावळे हे बावळे,
त्यांच्या पुढें शिद्दी-तुरुकांची छबी मावळे,
नेता यांचा श्रीशिवाजी तेज याचें आगळें,
हरहर महादेव ! चिरंजीव स्वदेश—५

म्लेच्छांपुढें मराठ्यांनो कां व्हा दीन, कां वाका ?
फडफडे भोसल्यांच्या प्रतापाची पताका !
अल्पसंतुष्टता कां रे ? ठेवा थोर आवाका !
पसरूं द्या हिंदुस्थानभर नवा आवेश !–६

## १८७. महाराष्ट्रास

'वासंती' १९२९ — ग. त्र्यं. माडखोलकर

पावित्र्याचें मंदिर तूं । जगदुद्धरणीं तव हेतु ।
संतकवींची तूं स्फूर्ती । परात्पराची तूं प्रीती
मांगल्याचा ।
देशभक्तिचा ।
सुरम्यतेचा ।
संगम अभिनव हा झाला । महाराष्ट्र रूपा आला ॥ १ ॥

तुझ्या समर्थांची गीतें । गाउं अम्ही अभिनव चित्तें ।
अभिनव चित्तें तीं गीतें । गाउं, जागवूं जनतेतें ।
तीच जागृती ।
देइल अंतीं ।
दास्या मुक्ति ।
तव यश नेइल शिखरांतें । गाउं समर्थांची गीतें ॥ २ ॥

अभंग तत्त्वें धर्माचीं । अभंग कीर्ती देशाची ।
अभंग सेवा भाषेची । अभंग वाणी तुकयाची ।
भावभक्तिचें ।
स्वानंदाचें ।
स्थान सुधेचें ।
तुझ्या तुक्याची ही गीतें । शांतवितीं अमुची चित्तें ॥ ३ ॥

स्वातंत्र्याची तूं भूमी । प्रभु एक तुझा तो स्वामी ।
निधान तुझिया प्रेमाचें । नाम तुझ्या शिवरायाचें ।
तो तानाजी ।
माधव, बाजी ।
नाना गाजी ।
सकळ मराठा मेळविला । भगवा झेंडा खेळविला ।। ४ ।।

जय बोला हो जय बोला । अरुण देव उदया आला ।
जय जय जयजय जय शब्दें । दुरितांचीं पळवूं अब्दें ।
दैन्य पळालें ।
विश्व उजळलें ।
नवयुग आलें ।
तुझें गीत गाऊं आम्ही । महाराष्ट्र सेवाधर्मी ।। ५ ।।

तुझे धीर ते राऊत । महाराष्ट्र सेवक संत ।
अश्रूंचे घातले सडे । म्हणुनि उभें हें पीक पुढें ।
सुधारणेचें ।
जनसेवेचें
कार्य तयांचें ।
पूर्णतेस नेऊं आम्ही । महाराष्ट्र सेवाधर्मी ।। ६ ।।

परंपरेचा, कीर्तीचा । भूतकाल उज्ज्वल त्याचा ।
संतांच्या कर्तृत्वाचा । अभेद्य पाया प्रेमाचा ।
नवतेजाचें ।
नवधर्माचें ।
नवराष्ट्राचें ।
मंदिर त्यावर उभवूं अम्ही । महाराष्ट्र सेवाधर्मी ।। ७ ।।

तुझे नवे भालाईत । अम्ही सकल जमलों येथ ।
रडोत रडतिल मढीं जुनीं । धरुन त्यांची खंत मनीं ।
स्वातंत्र्याचें ।
चिरसमतेचें ।
अभिनवतेचें ।
निशाण उभवुं नवें अम्ही । महाराष्ट्र सेवाधर्मी ॥ ८ ॥

परवशतेचा हा भाला । रुतला तुझिया हृदयाला ।
नव्या दमाचे वीर अम्ही । कीर्ति तुझि नेऊं व्योमीं ।
प्राणहि देऊं ।
स्वर्गी जाऊं ।
निशाण रोवूं ।
दास्य तुझें निवटूं आम्ही । महाराष्ट्र सेवाधर्मी ॥ ९ ॥

पुढें पुढें हो पुढें पुढें । स्वातंत्र्याच्या गिरीकडे ।
अश्रूंचे घालीत सडे । राष्ट्राचे राउत निधडे ।
स्वार्थी मेले ।
तेजें न्हाले ।
पुढें चालले ।
गीत तयांचें गाइन मी । महाराष्ट्र सेवाधर्मी ॥ १० ॥

# १८८. (१) मानधन महाराष्ट्र
# (२) महाराष्ट्र मंगलगीत

'कवन गुच्छ' भाग १ व २, १९२१ — ग. त्र्यं. माडखोलकर

मानधन महाराष्ट्रा ! जीवित धन्य तुझें झालें
शिवदेवानें आज तुझें यश दिगंत हें केलें;
भावि पिढ्यांना तव दिव्ययशःस्नात दिशा दाही
तुझिया अद्‌भुत उत्कर्षाची देतिल या ग्वाही
"स्वातंत्र्यप्रिय नरवरपूजित महाराष्ट्र देश
लीलेने हा झुगारितो परसत्तेचे पाश !
धर्मद्रोही राष्ट्रद्रोही जुलमी जेत्यांना
खुशाल होवो वश हा भारत सांडुनि अभिमाना;
नष्ट जाहलें क्षात्रतेज जरि अखिल भारताचें
भ्रष्ट जाहलें धर्मजीवन प्रसुप्त जनतेचें,—
महाराष्ट्र तरि परसत्तेला कधीं न वांकेल
स्वातंत्र्यरणीं झगडायातें पुढता ठाकेल !
दासांचें हें राष्ट्र न;—तेजस्तत्त्वाचा श्वास
प्रतापशाली रणसिंहांचा स्वतंत्र हा देश !
काळालाही तें अत्युग्र क्षात्रतेज याचें
दुःसह झालें !" गभीरगर्जित हें इतिहासाचें—
ब्रह्मकटाहापर्यंत महाराष्ट्रा ! थडकेल
आणि तुझ्या दुर्मद जेत्यांचें काळिज तडकेल !
तुझा जयध्वनि ऐकुनि हा ब्रह्मांड थरारेल !
अचेतनांतहि पुनरपि तेजःस्फूर्ति भरारेल !

प्रतिपश्चंद्रा ! त्रिभुवन तुझिया तेजें धवळावें
जगाकडे या पुनरपि दास्यध्वांतें न वळावें !
तुझ्या कृपेनें स्वतंत्र हतबल राष्ट्रांनीं व्हावें !
उर्जस्वल जयगीत तुझें हें जगतानें गावें !
आनंदाची अश्रुफुले तुजवरुनी उधळीत
शिवप्रभूचा शाहिर गातो हें मंगलगीत !

---

(श्रीशिवराज्याभिषेक या काव्यातून)

## १८९. मराठ्यांचें संचलन गीत

'**समरगीते**' गांधीजयंती, १९७०     **ग. दि. माडगुळकर**

बळ शत्रूचें जोखा;
पाऊल पुढती टाका ! ॥ धृ० ।

दूर राहिला मुलुख मराठी, दूर राहिले गाव
हिंदभूमिचा उमदा सैनिक हेंच शरीरा नांव
एकच रस्ता लाखा,
पाऊल पुढती टाका !—१

दूर राहिली मुले लेकरे, दूर राहिली माय
मायेमध्यें गुंतु नका रे, नका विसावू पाय
एक राहू द्या ठेका,
पाऊल पुढती टाका !—२

विसरा आता निंबबाभळी, विसरा हिरवे माड
बाळपणाच्या वेशीवरचे उंच वडाचे झाड
मंत्र लढ्याचा घोका,
पाऊल पुढती टाका !—३

सुगोसराई विसरा, विसरा लिंबुर हुरडा गोड
बहाद्दुरांनो, आज लागली, मरणासंगे होड
रणी यमाला जिंका,
पाऊल पुढती टाका !–४

'जय भारत' हा एक राहूद्या ओठावरती बोल
देशासाठी आज द्यायचे सर्वस्वाचे मोल
शिंग वाजते ऐका,
पाऊल पुढती टाका !–५

## १९०. आज आनंदाचें वनीं

'महाराष्ट्र गौरवगीते' — ग. दि. माडगुळकर

आज आनंदाचें वनीं
उभे ठाकलें भूवन,
एका समर्थ स्वप्नांत
आज जागलें जीवन–१

पैज जिंकली जिंकली
आज हरलें अमृत,
पुनः पोहले अभंग
इंद्रायणीच्या पाण्यांत–२

सह्यगिरी-शिरीं उठे
युगंधराचें पाऊल,
जाग्या निमिषाला लागे
नव्या शकाची चाहूल–३

दुखाविता अभिमान
आज सोडितो निःश्वास,
छातीबाहेर ओसंडे
'उद्यां' वरचा विश्वास–४

सम-चरणा-तळींची
बळकट झाली वीट,
आर्त, अपेक्षित यांची
उराउरीं झाली भेट–५

लाख मनांचें पारणें
आज डोळयांनी फेडलें
औटकोटि शिरांवर
राज-मुकुट चढले–६

लोकशक्तीचा विजय
गाजे भारताच्या पाठीं
आज राणीवे बैसली
मायमाउली मराठी—७

## १९१. महाराष्ट्र की जय !

'महाराष्ट्र गौरव गीतसंग्रह' १९८६ ग. दि. माडगूळकर

मातृभू महाराष्ट्र की जय
उन्नतमस्तक हिची संतती, बुद्धिमती, निर्भय
आकांक्षांच्या उंच पर्वता
आकारित करि यत्नशीलता
मेघांमधल्या बिंदु बिंदुचा हिच्या उरी संचय
मानवनिर्मित जलाशयांनी
प्रसन्न हो ही अन्नदायिनी
स्वयंपूर्णता होउन विहरे कृषिकांचा निश्चय
संकर धान्ये, यांत्रिक शेती
दिसे दृष्टिला हरित-क्रांती
प्रौढपणाही पुनश्च लाधे यौवनातले वय
विज्ञानाचे नवीन वारे
अंगाअंगातुन हिच्या संचरे
हिच्या पदाची प्रगती साधी कालगतीशी लय
सदा यशोदा, सदा विजयिनी
उभ्या भारती पुरोगामिनी
युगंधराच्या या जननीचे भविष्य तेजोमय.

## १९२. जय जय महाराष्ट्र देशा !

'नवमी' २६-३-१९६३ नी. ज. मांदाडे

सह्याद्रीच्या कणांकणांतुन सिंहनाद उठला
जय जय महाराष्ट्र देशा ॥ धृ० ॥

महाराष्ट्र मेळा
तुझा दिलदार अहा सजला
भाविक संतांचा
चौघडा मंगलमय वाजला
उजळत अभिलाषा—१

कृष्णा कावेरी
धावली तुझ्या दर्शनाला
गंगा गोदा ही
अमृताचा घेऊनि प्याला
उद्धरि सुखस्पर्शा—२

शूर वीर सारे
सजले शिवाजीचे वंश
रोम रोम भरला
जयामधिं स्फूर्तीचा अंश
तूंच परमेशा—३

सुजल सुफल सजला
तुझा हा शिवार चहुबाजू
सुखसौख्याचा हा
सह्याद्री आजूबाजू
पुरवीतो आशा—४

## १९३. जय महाराष्ट्र देशा....!

पूर्णानंद मांगूळकर

राष्ट्र रक्षका, भारत भूषणा, महाराष्ट्र देशा
महाराष्ट्र जय, महाराष्ट्र जय, महाराष्ट्र देशा....!! ॥ धृ० ॥
सह्याद्रिच्या कडेकपारी घुमली मराठवाणी
गोदाकृष्णा सरिता जीवनी भरली संजीवनी
विंध्यांद्री अन् सातपुडाही उत्तर तटही दोन्ही
पैठण पंढरपुरी नित्यही भावभक्ती पर्वणी
कणाकणांनी मंगलपावन....महाराष्ट्र देशा....!! ॥ १ ॥

कोकण पिकवी भात वऱ्हाडी ज्वारी बाजरी वाणी
कांबळ खांदी, वहाण पायी पगडी मर्दही डोयी
रूप सावळे परंतु सोज्वळ मर्द मराठा पाही
विळे कोयते या शस्त्रांनी रक्षिती स्वातंत्र्याही
वंदनीय त्या विरांच्या....जय महाराष्ट्र देशा....!! ॥ २ ॥

परमप्रतापी राजा अमुचा शिवबा प्रभावशाली
माता म्हणूनी परत पाठवी 'कल्याणची कल्याणी'
प्राणाहूनही धर्मप्रिय हा कथी जो निज कृतिनेही
ज्यांच्या स्फूर्तीमुळेच लहरे अटके ध्वज भगवाही
स्फूर्तीदायी इतिहासाच्या....महाराष्ट्र देशा....!! ॥ ३ ॥

माय मराठी अमर जाहली ही भिमेच्या तिरी
ओवीसह ती अभंग वाणी घुमली हृन्मंदिरी
श्लोक वामनी, मयुर आर्या, अविट ती माधुरी
संतकवी विद्वानही भूषणे अर्पिती वैभव चरणी
समतावादी संतांच्या....जय महाराष्ट्र देशा....!! ॥ ४ ॥

निर्मित झाली उज्वलदायी स्त्री रत्नांची माला
मुक्ताबाई ती जनाई करीती पावन सकला
धर्मशील ती अहिल्याबाई सत्कीर्ती कळसही केला
स्वातंत्र्याची दिव्यज्योतही-लक्ष्मी चमके चपला
वंदनीय ह्या देवींच्याही....महाराष्ट्र देशा....!! ॥ ५ ॥

# १९४. संयुक्त महाराष्ट्राचे गान

**‘महाराष्ट्र गौरव गीत संग्रह’ १९८६ शाहीर शरद मुठे**

संयुक्त महाराष्ट्राचे आमुच्या सदा मुखावरि गान
हीच आमुची शान-हाच आमुचा अभिमान ॥ धृ० ॥

ज्ञानेशाच्या ओवीमधुनी दिसते माय मराठी
अभंगगाथा त्यांतुन दर्शन देते माय मराठी
संतांची जी अमृतवाणी पावन माय मराठी
बाजीराव अन् शिवाजी राजा त्यांची माय मराठी
अटकेपाशी जाउन भिडली गर्जत माय मराठी
शाहीरांच्या डफात घुमते कणखर माय मराठी
गहिवरते परपीडा पाहुन कोमल माय मराठी
तीन कोट ही जनता म्हणते अमुची माय मराठी
कठिण समय आजला तिच्यावर, कुठली भूक तहान ? ॥ १ ॥

नद्या वाहती झुळुझुळु येथील जणू रुप्याच्या धारा
माय धरित्री फक्त मानतो इथला किसान सारा
कंदमूळ फळफूल पिकांची लूट मासही बारा
हिंददेविच्या मुगुटामधला कोहिनूर हा हिरा
नाव काढता शत्रु थरथरे इथला असा दरारा
दुनिया दिपते पाहून असला तेजस्वी हा तारा
मुंबईसह महाराष्ट्र अम्हाला प्राणाहुनही प्यारा
घेई तेव्हा राहि मराठा जाइल ना माघारा
ध्येयासाठी तयार झालो करावया बलिदान ॥ २ ॥

सह्याद्रीची विशाल शिखरे दरीकपारी जेथे
खणखणाट समशेरिंचा अजूनी ऐकू येतो तेथे
होनाजीची अखेरची ती लकेर अजुनी घुमते
शनवार वाड्यामध्ये ऐका कुणीतरी कुजबुजते
शिवनेरीवर जीजाई माता नवस पहा ती करिते
भव्य झाशीच्या किल्यामध्ये बिल्वरही किणकिणते
फडणवीस नानाची लेखणी कुरुकुरु काही लिहिते
संभाजीच्या क्रोधाग्नीची ज्वाला लाल धुमसते
जिवंत होऊनि म्हणती प्रेते ठेवा हो अवधान ! ! ॥ ३ ॥

वासुदेव फडक्यांचे जीवन हसले फासावरती
उमाजिच्या दंडांत खेळली पोलादाची शक्ती
बाबु गेनुचे भीषण धाडस अजून डोळ्यापुढती
लोकमान्य अन् आगरकरांची स्मृती न कोणा जगती ?
कोतवाल लाभले धन्य ती सातार्‍याची धरती
ज्योतीबांनी केले संगर सदैव सत्यासाठी
साने गुरुजी ठेउनि गेले अमर आपुली कीर्ती
शौर्य धैर्य अन् त्याग सागरा सदैव येथे भरती
परंपरेचा प्रत्यय, उलटा इतिहासाचे पान ! ॥ ४ ॥

पलीकडून या अलीकडे हा शाहिर गाइ पवाडे
येई मराठा, इतिहासाचे पुनः पुन्हा गिरवीत धडे
उठला भारत गोव्यासाठी पोर्तुगिजांचे सैन्य खडे
सत्याग्रह धुमसता मराठी वीर ठाकले सदा पुढे
वृद्ध पहाता 'सेनापति' ते 'शेलारांची' साक्ष घडे
हिरवे गुरुजी गोळी लागुन क्षणात धरणीवरती पडे

थोरात, चौधरी विदर्भातले तयें शिंपीले रुधिर सडे
प्राण जाई पण झेंडा गगनी मानाने फडफडे
कंठ दाटतो, शब्द गोठतो, पाहून यज्ञ महान् ! ॥ ५ ॥

मानवतेचे दूत विनोबा महाराष्ट्राचा कंठमणी
नवा घेउनी मंत्र निघाले "भूहीनांना द्या धरणी"
लक्ष वेधले विश्वाचे की, 'दिव्य कुणाची ही वाणी ?'
पाउल पडता पिढ्या पिढ्यांचे वैरही सरले क्षणोक्षणी
भय मृत्यूला, बघता कर्वे अजून कणखर वृद्धपणी
'सदैव पाहिन हित महिलांचे', अजून आहे ध्यास मनीं
अभिवादन त्या 'भारतरत्ना' जाताना शतकामधुनी
भविष्यकाळी दिसतील रत्ने, असतिल दडली अजूनी
आशा आकांक्षांची येथे कधी न पडली वाण ! ॥ ६ ॥

## १९५. वारकरी हा, धारकरी हा

'महाराष्ट्र गौरवगीते' नारायण रामचंद्र मोरे

वारकरी हा, धारकरी हा महाराष्ट्र देश ।
पुष्पाहुनिही मृदुल, कठिणता वज्राची यास ॥

हा शक्तीचा, हा भक्तीचा, हा नवनीतीचा ।
महाराष्ट्र प्रिय देश आमुचा प्रतिभावंतांचा ॥

देव आमुचा, धर्म आमुचा सर्वस्वहि हाच ।
हृदयें अमुचीं फुलतीं याचें दर्शन होतांच ॥

सहन न आम्हीं करूं कधींही याचा अपमान ।
यास्तव आम्ही करून टाकूं जीवहि कुर्बान ॥

याच्या रक्षणकार्यी पडले लक्षावधि वीर ।
अबला झाल्या प्रबला यास्तव गाजवुनी समर ॥

आजहि अपुलें खड्ग गाजवी वीर मराठा तो ।
भयें पांढरीं तोंडें साऱ्या शत्रुंचीं करितो ॥

परस्परांना मिठी मारुनी दृढ सुदृढ खाशीं ।
धर्मराजकारणें चालतीं महाराष्ट्र-देशीं ॥

हा शूरांचा हा वीरांचा महाराष्ट्र देश ।
सत्पुरुषांचा आचार्यांचा येथें अधिवास ॥

इथें वहाती भीमा, गोदा, पुण्यजला सरिता ।
इथें विटेवरि ब्रह्म उभें प्रिय पुंडलिकाकरितां ॥

रिपुललनांना अभय निरंतर महाराष्ट्र देशीं ।
माता, भगिनी, कन्या त्यांचें नातें आम्हांशीं ॥

ध्यानीं स्वप्नीं सतत दिसावा महाराष्ट्र अमुचा ।
एक मागणें हेंच आमुचें हीच एक इच्छा ॥

प्रतापशाली शिवरायांच्या महाराष्ट्र देशा ! ।
समरधुरंधर टिळकांच्या हे महाराष्ट्र देशा ! ॥

सदा भुकेले लोचन अमुचे तुझ्या दर्शनाला ।
श्रेष्ठ न दुसरा तुजविण जगतीं कोणी आम्हांला ! ॥

वाणी अमुची सदा तुझ्या गुणवर्णनांत मग्न ।
तुझ्या कथाश्रवणांत सदोदित आम्ही तल्लीन ॥

पाहूं का तुज वद इंद्राच्या सहस्र नयनांनीं ? ।
गाऊं का तुज वद शेषाच्या सहस्र वदनांनीं ? ॥

# १९६. माझा महाराष्ट्र

'महाराष्ट्र गाथा' (येरवडा १५-८-१९२५) यशवंत

नकाशा पुढें पाहतां भारताचा महाराष्ट्र आधीं भरे लोचनीं ।
असे हीच माझी मायभूमी असे बोल येतात तोंडांतूनी ॥
हिच्या वैभवोत्कर्षसंवर्धना मी, पडे प्रश्न, आयास केले किती ।
कळोनी परी आत्मनिष्क्रीयता ती तदा हाय पस्तावते मन्मति ॥ १ ॥

महाराष्ट्र माझा ! महाराष्ट्र माझा ! मुखानें वृथा चालते घोषणा ।
परंतू न संसारभाराविना या दुजा कामधंदा सुचेना मना ॥
फिरावे परीघात एकाच, जैसा फिरे बैल घाण्यास जो जुंपिला ।
स्वताचे सदा गाळुनि घर्मबिंदू दुजाचा मळा मात्र मी शिंपिला ॥ २ ॥

जिरूं लागल्या पार आतां उमेदी, सरूं लागलें पारतंत्र्यीं जिणें ।
झुरूं लागुनी जीव खाली वरी हो, जसें पांखरूं होय पंखाविणे ॥
कुणाचा धरूं हात हातांत आतां ? सुचेना वरूं मार्ग मी कोणते ।
न सेवा तुझी हातुनी जाहली या सदा शल्य हें मानसीं टोचते ॥ ३ ॥

अमर्याद भूगोल विस्तारलेला किती त्यामधीं देश पुंजाळले ।
महाराष्ट्रभूचें परी त्यांत माझ्या दिसे संप्रती तेज मंदावले ॥
तयांसारिखा दिव्य तेजोगुणी हा महाराष्ट्र होईल केव्हा पुन्हां ? ।
महाराष्ट्रमाते ! जना बुद्धि दे या तुझ्या वैभवोत्कर्षसंवर्धना ॥ ४ ॥

सहा गव्हरांतून सह्याद्रिच्या जे इथे झोत येतात देशावरी ।
पवाडेच गाती जणूं पूर्वजांचे स्फुरायास चैतन्य लोकांतरी ॥
निमाल्या महा पूर्वजांच्याच किंवा मनीषा मरुद्वैखरी बोलती ।
तयांनी जित्या होऊनी भावना या घडो हातुनी मायसेवाकृती ॥ ५ ॥

'महाराष्ट्र माझा' असें आज जरी जन्मलाभामुळें बोलणें ।
'महाराष्ट्र माझा..असें' घातलेल्या कधीं भूषणांच्यामुळें बोलणें ? ॥ ६ ॥

## १९७. नवा महाराष्ट्र

'कमण्डलु' १ मे १९६२ (१९-४-१९६०) यशवंत

नवा महाराष्ट्र येतसे उदया
पुकार करती चौघडे सनया
शिवनेरीवरी पाळणा फिरून
नवीन युगाचा राहे आंदोलुन

गेली हेलावून आज इंद्रायणी
आज चंद्रभागा गेली मोहरूनी
कृष्णा कोयनांचा सारा परिसर
सहस्रशीर्ष हा सह्यगिरिवर
मावेना तयाच्या पोटांत आनंद
थबथबे त्यानें जांब करवंद.

चाफळचा राम बह्याचा मारुती
खंडोबा जोतीबा यमाई गोमटी
तिष्ठला विठ्ठल चंद्रभागा-तटीं
मंगल पाहाया काय हीच घटी
सज्जनगडींच्या समाधीमधून
घुमाया लागती बोल ते फिरून

"शिवरायाचा तो आठवा प्रताप
शिवरायाचा तो आठवा साक्षेप"
नवा महाराष्ट्र येतसे उदया
येई आनंदाचें भरतें हृदया
भरतीच्या ह्याच लाटालाटांतून
भविष्य नेमकें ठेवा निरखून

लाटांच्या ललाटीं फेस-मुंडावळ्या
नक्षत्रांच्या लडी जणूं लगडल्या
तैशाच सदाच कपाळीं आपुल्या
पाहिजेत माळा मोत्यांच्या शोभल्या

सागराच्या लाटा थयथयतात
कोटी कोटी काय पालवी तो हात
गर्जे "अविश्रांत हात राबती जे
अंतःपुरीं लक्ष्मी त्यांच्याच विराजे."

आज महाराष्ट्र संभवे नवीन
गतकाळावर नको गुजराण
नवीन चैतन्य नसांनसांतून
कारंजासारखें यावें उफाळून.

नवीन करूंया मनांत संकल्प
नको एकमेकां- विषयीं विकल्प
पुरातन जीं जीं भुतें मानगुटीं
देऊन टाकूं त्या त्वरें मुठमाती
भट्टीतून जैसें निघतें सुवर्ण
तैसाच घडावा आज पुनर्जन्म
नकोत इमले हवेंतले उगा
नको नाचविणें मनोरथ-फुगा
बोलून बोलून संपण्यापरिस
कृतीनें संपादूं कर्तृत्व-परिस
बुद्धीचा परिस स्फूर्तीचा परीस
लावूं महाराष्ट्रीं कडेकपारीस

हिऱ्यामोत्यांहून मौल्यवान खाणी
फैलावतील हो कोनाकोनांतुनी
किमया करून दाखवूं आगळी
होईल ही काळी द्रौपदीची थाळी
हनुमंत-भक्ति आमुचिया कुळीं
द्रोणाद्रि लिलया तोलूं करतळीं.

भवितव्य भव्य घडवूं उज्ज्वल
कृतार्थ होतील अजंठा वेरूळ.

## १९८. तो महाराष्ट्र हा प्यारा (महाराष्ट्र गीत)

'कमण्डलु' यशवंत

मज महाराष्ट्र हा प्राणाहुनिही प्यारा
त्याचिया यशाचा झडो अखंड नगारा
तो महाराष्ट्र हा प्यारा.

पंढरी, अळंदी, देहु भक्तिच्या मळ्या
नारळी-पोफळी-काजूंच्या घनराया
'साऱ्याच जिजाऊ आपण आया-बाया'
ही सतार रमणी-हृदयीं करी झंकारा
तो महाराष्ट्र हा प्यारा–१

भरघोस पिकें ही कापुस, शाळू, साळी
राउळीं शिवारीं घुमती सांज-सकाळीं
लावणी, पवाडा, अभंग, गोड भुपाळी
पुरुषार्थां चारहि लाभे ज्यांत निवारा
तो महाराष्ट्र हा प्यारा–२

ह्या सह्याद्री तर कणाच कणखर ताठ
वाहती ज्यांतुनी वीररसाचे पाट
वारणा-कोयना-कृष्णा-गोदा-कांठ
परजल्या दुधारी जणुं खड्गाच्या धारा
तो महाराष्ट्र हा प्यारा–३

नांदेड दख्खनीं पावनतीर्थ शिखांसी
काश्मीर-वनश्री हो गोमांतकवासी
त्या रामगिरिहुनि निघती मेघ प्रवासी
स्वप्नेंहि चिंतिलीं घेति जिथें आकारा
तो महाराष्ट्र हा प्यारा–४

भारता मिळावा अग्रपुजेचा मान
हें बांधुनि गांठीं एकच एक इमान
करूं निर्वाणीला तन-मन-धन कुर्बान
ही स्फूर्ति निरंतर देइ जेथला वारा
तो महाराष्ट्र हा प्यारा–५

## १९९. मंत्राक्षता

**'कमण्डलु'** **यशवंत**

"माझा महाराष्ट्र, मी हा मराठी"
अशा घोषणांनी पुरें, गोपुरें—
गेलीं निनादून उंडारली तेंवि
ह्या घोषणांनी शिवारीं गुरें.

लाटा-करीं फेनमाला धरोनी
उभा सिंधु हा ज्याचिया स्वागता
त्या पर्वकाळाचिया पूजनीं मी
समर्पू सजे आज मंत्राक्षता.

"माझा महाराष्ट्र होईल संपन्न
सामर्थ्यशाली कसा, केधवां ?"
प्रत्येक ही हालचालींत माझ्या
स्फुरावी सदा दाटलेली हवा
"मी हा मराठी, महाराष्ट्रधर्मी"
असा विक्रमा ध्यास माझ्या हवा
ग्लानीमधें तेंवि झोपेमधेंही
असा श्वास-उच्छ्वास माझा हवा.

"मी हा मराठी, महाराष्ट्रधर्मी"
अहो, एक ह्या तालठेक्यावर
लागे जरी वावराया शिवारीं
विळा, कोयता, मोट वा ट्रॅक्टर.
तेथें नफा आणि तोटा कुणाचा ?
कुणाचा धनी कोण वा चाकर ?
चालावयाच्या न तेथें कुऱ्हाडी
कधींही कुणाच्याहि मानेवर.

"मी हा मराठी, महाराष्ट्रधर्मी"
छिनीनेंच ह्या हो घडावा चिरा
ऐसा चिरा कोहिनूराहुनी त्या
ठरावा न का दिव्य दीप्ती हिरा.

"मी हा मराठी, महाराष्ट्रधर्मी"
        गिलावा जरीं हा घरां मंदिरां
तेथें पहारा न लागेल कोणा,
        कधींही न फावेल त्या तस्करा.

"मी हा मराठी उरीं रोमरंध्रीं"
        असा दाटता गाढ माझेपणा
कां व्हायचे ना लुळे हात ते हो
        उगारून येतील जे जे घणा
"माझा महाराष्ट्र, मी हा मराठी"
        जरी प्रेमपान्हा उरीं पाझरे
वैराग्निचे जातिजातींतल्या का
        फुलावेत तेथें निखारे बरे ?

"मी हा मराठी, महाराष्ट्रधर्मी"
        असो हाच ताईत गंडा गळां
यज्ञोपवीताचिया धारणाचा
        घडो ह्या न मंत्राविना सोहळा
एकात्मतेला तडे जावयाची
        कुणालाहि यावी न शंका कधीं
ह्या धोरणानें प्रवर्तेल जो तो,
        विवंचून वागेल मंत्री सुधी.

"आम्ही मराठी, महाराष्ट्रधर्मी"
        असा घोष येतांच कानांवरी
जो संभ्रमीं, संकटीं, कर्दमीं त्या
        नवा धैर्य-संचार व्हावा उरीं

“आम्ही मराठी, महाराष्ट्रधर्मी”
पताका अशी श्रीदमुद्रांकिता
देखोन वाटेल दैत्यां दरारा,
महन्मंगला तारिणी भारता.

## २००. महाराष्ट्र गीत

**‘भावमंथन’** फेब्रु. १९३० **यशवंत**

वंदितो हे महाराष्ट्र-माते ! तुला
तूझिया गायनीं स्फूर्ति दे या मुला
जागतीं दैवतें, गाजती गोपुरें,
व्योम-चुंबी उभीं भव्य हीं मंदिरें;
कीर्तनें चालती, नर्तने रंगती
आणि दिंड्या पताका किती डोलती
छेडिती भक्तिनें एकतारी कुणी;
गाति जात्यावरी गोड ओव्या कुणी;
सारखी भक्तिची लाट हेलावते,
भासतो हा महाराष्ट्र वैकुंठ तें–१

कोयना, वारणा आणि इंद्रायणी
तेंवि कृष्णादि या मूर्त मंदाकिनी
वाहुनी नेति कीं वाहुनी पातकें
तो महाराष्ट्र हा पुण्य जेथें पिके.
नांदले जेथ सौमित्र, सीता-प्रभु
दंडकारण्य हें ही महाराष्ट्रभू
तिष्ठला, कष्टला रुक्मिणीचा पती
धन्य तेणें महाराष्ट्र हा भारतीं–२

खौळले सिंधुसे, धावले व्याघ्रसे,
शत्रु-घूकाप्रती जाहले सूर्यसे,
नाममात्रेंहि जे बागुलासारखे,
कौस्तुभाची द्युती ज्यांपुढे ना टिके,
वैनतेयापरी जिंकुनी पियुषा
दास्यमुक्तीसवें साधिती सद्यशा,
अंजनिबाळसे राष्ट्रकार्यांत जे
वीर ऐसे महाराष्ट्र-माते ! तुझे—३

रामदासी गिरा दिव्य संजीवनी,
वेद आले रहाया अभंगांतुनी,
देव-दैत्यापरी काळसिंधूप्रती
मंथुनी काढिती दिव्य रत्नें किती
कालही आजही पुत्र ऐसे तुझे
ज्यामुळें मेरुमांदार होती खुजे,
घेत लोटांगणें सिंधुलाटा महा
स्तोत्र गाती जया तो महाराष्ट्र हा—४

काय माझी तिथें तोकडी वैखरी !
तेवि ही लेखणी कष्टवूं कां तरी ?
अल्पसेवा तरी होऊं दे हातुनीं
याचितों हे महाराष्ट्रभू ! वंदनीं !!

## २०१. रणशिंगाचा ललकार

'जयनाद' एप्रिल १९६५ — यशवंत

शिंगाचा ललकार
घुमे रणशिंगाचा ललकार
'गडी मराठा धनी यशाचा' द्याया साक्षात्कार

आम्ही भोक्ते स्वातंत्र्याचे
कधिं न साहु अधिराज्य दुजांचे
विजयश्रीचे पण जिंकाया कमरेला तलवार.

परकियांच्या येता स्वाऱ्या
मारुनि मजला घेत भराऱ्या
लावियली माघार ध्यावया त्यांना अटकेपार.

नक्र गजेंद्रा गिळू पाहता
करी तयाची विष्णू मुक्तता
हाकेसरशी दिला छत्रसालास हाच आधार.

गोमांतक वा दीव दमण वा
फिरंगियांचा तिथल्या दावा
मोडुनि काढुनि पुन्हा पटविला शौर्य-धर्म-आचार.

अशा यशाचा गडी मराठी
आहे जागत गिरीकपाटीं
ऐक दुष्मना ! येइ उफाळुनि गर्जत जयमल्हार

भारतभूची घ्याया इज्जत
निरी हिसकशी का बेदिक्कत
लुळे तुझे परि पडेल मनगट ऐकुन भूभूक्कार.

असोत कितिही शस्त्रास्त्रे तव
अम्हां न भिववी त्यांचे तांडव
दधीचिच्या अस्थिचा आमुचा अतुल शस्त्रसंभार

## २०२. महाराष्ट्राचे गौरवगान–

**'महाराष्ट्र गौरव गीत संग्रह' १९८६ प्रा. वसन्त रत्नपारखी**

या हो सारे आपण करु या महाराष्ट्राचे गौरवगान
शिवरायाच्या चरणस्पर्शे पुनीत झाले ते हे स्थान ।
सह्यगिरीच्या शिखरांनी बनला अपुला हा कणखर देश
कृष्णा गोदा पूर्णा देती जीवन-एकीचा संदेश ।
सुवर्णाक्षरे इतिहासाची अर्पिति यावर अपुला पावन वेष
ठायी ठायी उभा पाठिशी अमुच्या शंभु परेश ।
भारतात या स्वये वाढवू आपण त्याचा चिरसन्मान ॥ १ ॥

ज्ञानेशाची ओवी चढवीं लेणें अमुच्या भाषेला
अभंगवाणी श्री तुकयाची भिडते अमुच्या हृदयाला
कडकडणारे डफ शाहीरी देती स्फूर्ती बाहूला ।
लावणिचे पैंजण छुन् छुन् मोहविताती रसिकाला
धन्य मराठी माय अमुची गीत मराठी अमुची शान ॥ २ ॥

व्यक्तित्वाची पडे आहुती होम इथे हो सर्वस्वाचा
देशासाठी पाउल पुढती, बाणा राही प्रत्येकाचा ।
कोंडाण्याचे लगीन आधी, लावी तान्हा शिवबाचा
केली पावन खिंड बाजीने, कोट उभारुन निजछातीचा
स्वदेशसेवेचे व्रत शिकवी येथे कराया नित बलिदान ॥ ३ ॥

क्रांति-ज्वाला चेतवि फडके वीर कितिक ते अज्ञात
'स्वराज्य माझा हक्क' गर्जले मंत्र टिळक या भूमीत ।
आनंदे स्वातंत्र्यवीरही रमले भयाण कारागारात
नररत्नांचा अमर त्याग हा, करील अमुचे चिरउत्थान ॥ ४ ॥

सेवाग्रामही गांधीजींचे कार्य कराया देई स्फूर्ती
भूदानास्तव वणवण फिरले संत विनोबा प्रांतोप्रांती ।
दलितोद्धारक घटनापंडित भीमाची दुमदुमली कीर्ती
भारतरत्न महर्षि कर्वे, धन्य महात्मा ज्योती ।
नररत्नांची कधीच येथे पडली नाही मुळीही वाण ॥ ५ ॥

## २०३. आनंदवनभुवन

**समर्थ ग्रंथ भांडार** **समर्थ रामदास**

जन्मदुःखें जरादुःखें । नित्यदुःखें पुनःपुन्हाः ।
संसार त्यागणें जाणें । आनंदवनभुवना ॥ १ ॥

वेधलें चित्त जाणावें । रामवेधीं निरंतरीं ।
रागें हो वीतरागें हो । आनंदवनभुवना ॥ २ ॥

संसार वोढितां दुःखें । ज्याचें त्यासीच ठाउकें ।
परंतु येकदां जावें । आनंदवनभुवना ॥ ३ ॥

न सोसे दुःख तें होतें । दुःख शोक परोपरी ।
येकाकी येकदा जावें । आनंदवनभुवना ॥ ४ ॥

कष्टलों कष्टलों देवा । पुरे संसार जाहला ।
देहत्यागासि येणें हो । आनंदवनभुवना ॥ ५ ॥

जन्म ते सोसिले मोठे । अपाय बहुतांपरी ।
उपायें धाडिलें देवें । आनंदवनभुवना ॥ ६ ॥

स्वप्नीं जें देखिलें रात्रीं । तें तें तैसेंची होतसे ।
हिंडतां फिरतां गेलों । आनंदवनभुवना ॥ ७ ॥

हे साक्ष देखिली दृष्टी । किती कल्लोळ उठिले ।
विघ्नघ्ना प्रार्थिलें गेलों । आनंदवनभुवना ॥ ८ ॥

स्वधर्माआड जें विघ्नें । तें तें सर्वत्र उठीलीं ।
लाटिलीं कुटिलीं देवें । दापिलीं कांपिलीं बहू ॥ ९ ॥

विघ्नाच्या उठिल्या फौजा । भीम त्यावरी लोटला ।
घर्डिलीं चिर्डिलीं रागें । रडविलीं बडविलीं बळें ॥ १० ॥

हांकिलीं टांकिलीं तेणें । आनंदवनभुवनीं ।
हांकबोंब बहू जाली । पुढें खतल्ल मांडिलें ॥ ११ ॥

खौळले लोक देवाचे । मुख्य देवची उठीला ।
कळेना काय रे होतें । आनंदवनभुवनीं ॥ १२ ॥

स्वर्गीची लोटली जेथें । रामगंगा माहानदी ।
तीर्थासि तुळणा नाहीं । आनंदवनभुवनीं ॥ १३ ॥

ग्रंथीं जें वर्णिली मागें । गुप्तगंगा माहानदी ।
जळांत रोकडें प्राणी । आनंदवनभुवनीं ॥ १४ ॥

सकळ देवची साक्षी । गुप्त ऊदंड भूवनें ।
सौख्यचिपावणें जाणें । आनंदवनभुवनी ॥ १५ ॥

त्रैलोक्य चालिलें तेथें । देव गंधर्व मानवी ।
ऋषी मुनी माहायोगी । आनंदवनभुवनीं ॥ १६ ॥

अक्रा अक्रा बहु आक्रा । काये अक्रा कळेचिना ।
गुप्त तें गुप्त जाणावें । आनंदवनभुवनीं ॥ १७ ॥

त्रैलोक्य चालिल्या फौजा । सौख्य बंदविमोचनें ।
मोहीम मांडली मोठी । आनंदवनभुवनीं ॥ १८ ॥

सुरेश उठिला आंगें । सुरसेना परोपरी ।
विकटें कर्कशें यानें । शस्त्रपाणी माहाबळी ॥ १९ ॥

देव देव बहू देव । नाना देव परोपरीं ।
दाटणी जाहाली मोठी । आनंदवनभुवनीं ॥ २० ॥

दिग्पती चालिले सर्वै । नाना सेना परोपरीं ।
वेष्टीत चालिले सकळै । आनंदवनभुवनीं ॥ २१ ॥

मंगळें वाजती वाद्यें । माहागणासमागमें ।
आरंभीं चालिला पुढें । आनंदवनभुवनीं ॥ २२ ॥

राशभें राखिलीं मागें । तेणें रागेंची चालिला ।
सर्वत्र पाठीसीं फौजा । आनंदवनभुवनीं ॥ २३ ॥

अनेक वाजती वाद्यें । ध्वनीकल्लोळ उठीला ।
छत्रीनें डोलती ढाला । आनंदवनभूवनीं ॥ २४ ॥

विजई दीस जो आहे । ते दिसीं सर्व ऊठती ।
अनर्थ मांडला मोठा । आनंदवनभुवनीं ॥ २५ ॥

देवची तुष्टला होता । त्याचे भक्तीस भुलला ।
मागुता क्षोभला दुःखें । आनंदवनभुवनीं ॥ २६ ॥

कल्पांत मांडला मोठा । म्लेंच्छदैत्य बुडावया ।
कैपक्ष घेतला देवीं । आनंदवनभूवनीं ॥ २७ ॥

बुडाले सर्व ही पापी । हिंदुस्थान बळावलें ।
अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभुवनीं ॥ २८ ॥

पूर्वी जे मारिले होते । तेचि आतां बळावले ।
कोपला देव देवांचा । आनंदवनभुवनीं ॥ २९ ॥

त्रैलोक्य गांजिलें मागें । ठाउकें विवेकीं जना ।
कैपक्ष घेतला रामें । आनंदवनभुवनीं ॥ ३० ॥

भीमची धाडिला देवें । वैभवें धांव घेतली ।
लांगूळ चालिलें पुढें । आनंदवनभूवनीं ॥ ३१ ॥

येथून वाढला धर्मु । रमाधर्मे समागमें ।
संतोष मांडला मोठा । आनंदवनभुवनीं ॥ ३२ ॥

बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छ संहार जाहला ।
मोडलीं मांडलीं क्षेत्रें । आनंदवनभुवनीं ॥ ३३ ॥

बुडाले भेदवाही ते । नष्ट चांडाळ पातकी ।
ताडिले पाडिले देवें । आनंदवनभूवनीं ॥ ३४ ॥

गळाले पळाले मेले । जाले देशधडी पुढें ।
निर्मळ जाहाली पृथ्वी । आनंदवनभुवनीं ॥ ३५ ॥

उदंड जाहलें पाणी । स्नान संध्या करावया ।
जप तप अनुष्ठानें । आनंदवनभुवनीं ॥ ३६ ॥

नाना तपें पुरश्चरणें । नानाधर्म परोपरीं ।
गाजली भक्ति हे मोठी । आनंदवनभुवनीं ॥ ३७ ॥

लिहिला प्रत्ययो आला । मोठा आनंद जाहाला ।
चढता वाढता प्रेमा । आनंदवनभुवनीं ॥ ३८ ॥

बंड पाषांड उडालें । शुद्ध अध्यात्म वाढलें ।
राम कर्ता राम भोक्ता । आनंदवनभुवनीं ॥ ३९ ॥

देवालयें दीपमाळा । रंगमाळा बहूविधा ।
पूजिला देव देवांचा । आनंदवनभुवनीं ॥ ४० ॥

रामवरदायिनी माता । गर्द घेउनी उठिली ।
मर्दिलें पुर्विचे पापी । आनंदवनभुवनीं ॥ ४१ ॥

प्रत्यक्ष चालिली राया । मूळमाया समागमें ।
नष्ट चांडाळ ते खाया । आनंदवनभुवनीं ॥ ४२ ॥

भक्तांसी रक्षिलें मागें । आतांही रक्षिते पाहा ।
भक्तांसी दीधलें सर्वै । आनंदवनभुवनीं ॥ ४३ ॥

आरोग्य जाहाली काया । वैभवें सांडिली सिमा ।
सार सर्वस्व देवाचें । आनंदवनभुवनीं ॥ ४४ ॥

देव सर्वस्व भक्तांचा । देव भक्त दुजें नसे ।
संदेह तुटला मोठा । आनंदवनभुवनीं ॥ ४५ ॥

देव भक्त येक जाले । मिळाले जीव सर्वहि ।
संतोष पावले तेथें । आनंदवनभूवनीं ॥ ४६ ॥

सामर्थ्ये यशकीर्तीची । प्रतापें सांडिली सिमा ।
श्रीदेंचि दिधलीं सर्वै । आनंदवनभुवनीं ॥ ४७ ॥

राम कर्ता राम भोक्ता । रामराज्य भूमंडळीं ।
सर्वस्व मीच देवाचा । माझा देव कसा म्हणों ॥ ४८ ॥

हेंचि शोधूनी पाहावें । राहावें निश्चळीं सदा ।
सार्थक श्रवणें होतें । आनंदवनभुवनीं ॥ ४९ ॥

वेद शास्त्र धर्मचर्चा । पुराणें महात्में किती ।
कवित्वें नूतनें जीर्णे । आनंदवनभुवनीं ॥ ५० ॥

गीत संगीत सामर्थ्ये । वाद्यकल्लोळ ऊठीला ।
मिळाले सर्व अर्थार्थी । आनंदवनभूवनीं ॥ ५१ ॥

वेद तो मंद जाणावा । सिद्ध आनंदवनभुवनीं ।
अतुळ महिमा तेथें । आनंदवनभुवनीं ॥ ५२ ॥

मनासी प्रचीत आली । शब्दीं विश्वास वाटला ।
कामना पुरती सर्वै । आनंदवनभुवनीं ॥ ५३ ॥

येथुनी वांचती सर्वै । ते ते सर्वत्र देखती ।
सामर्थ्य काय बोलावें । आनंदवनभुवनीं ॥ ५४ ॥

महिमा तो वर्णवेना । विशेष बहुतांपरीं ।
विद्यापीठ तें आहे । आनंदवनभुवनीं ॥ ५५ ॥

सर्वसद्या कळा विद्या । न भूतो न भविष्यति ।
वैराग्य जाहालें सर्वै । आनंदवनभुवनीं ॥ ५६ ॥

## २०४. तुम्हि तेच मराठे गडि का ?

'चंद्रज्योति' १४-१०-१९६६ — शरच्चंद्र वामन रानडे

तुम्हि तेच मराठे गडि का ।
यश-डंका झडत त्रिलोकां ॥ धृ० ॥

दिल्लीस होतां शिवबा बंदी
सात्त्विकतेची न धरी प्रौढी
युक्तिनेच मेळवि सुटका—१

जरि स्त्रीजाती, न करी वाती
शौर्य उपजवी स्वसुतां चित्तीं
जेथ जिजा पुण्यश्लोका—२

"भल्यासि देऊ कटिचि लंगुटी
नाठाळा परि हाणू काठी"
जेथला वदे संत तुका—३

शूर धनाजी ते संताजी
ज्यांचा गनिमीकावा गाजी
बाच्छाइतीस दे धडका—४

चोहीबाजू प्रबल शत्रु तरि
सकलांसहि जे झाले भारी
मुत्सद्देगिरिने एका—५

वरिली न शांती-कर्मठ भक्ती
न राजकारणि सोडिली वृत्ती
ना युक्तायुक्त विवेका—६

दुर्दैवाच्या आपत्कालिहि
बुद्धिमत्ता गाजलि दिशि चोही
सादर जन भी ज्यां परका—७

बुद्धिमत्त तें सकल जाउनी
भाबडि श्रद्धा येत कोठुनी ?
दौर्बल्या हृदयिचे टाका—८

नोकरशाहीचीये व्यूहीं
बद्धचि होऊ भीती का ही ?
वीरां ही अनुचित शंका—९

परंपरेसी धरुनी वागा
नांव मराठे त्यासी जागा
जग सर्व करो या कुतुका—१०

# २०५. सह्याद्री हा खडा

'लुकलुक' १९५४ **भा. ल. रानडे**

देशभंजका, भरेल कधिंतरि तव पापाचा घडा !
कडेलोट करण्या जुलुमाचा सह्याद्री हा खडा ॥ धृ० ॥

ऐकुं इथें नाहीत यायचे मूर्ख अजागल सूर ।
दणाणतो रे अरण्य येथें पहा केसरी क्रूर ॥ १ ॥

दुर्बल लीला-लाघवास नच ठाव मिळायाचा ।
राकट मानी मर्द मराठा इथें ठरायाचा ॥ २ ॥

यवनमर्दनीं उच्च अंक तो गांठियला कोणी ।
असंतोष-अनला प्रज्वालित केलें आधिं कुणी ? ॥ ३ ॥

त्या ज्वालांमधिं जुलुम जाळिला परक्या सत्तेचा ।
मार्ग दाविला समस्त राष्ट्रा खऱ्या स्वराज्याचा ॥ ४ ॥

खाडदिशीं समशेर निघे म्यानांतुनि बाहेर ।
खाटकास तो बालशिवाजी करितो आहेर ॥ ५ ॥

गाजी बाजी-वाजीची हो दुमदुमली दौड ।
उत्तरेकडे पराक्रमाला नुरे खरोखर तोड ॥ ६ ॥

वडगांवीं महादजी जिरवित पुरी इंग्रजांची ।
खडे चारुनी आम्ही उतरली नशा निजामाची ॥ ७ ॥

सत्तावनचें समर लढविलें तात्या-नानांनी ।
बंदुकिचेही बार काढिले बळवंत-सुतांनीं ॥ ८ ॥

पुरुषोत्तम युगपुरुष जाहले लोकमान्य येथें ।
पुण्यास होतां भाषण ज्यांचें लंडन हांदरें तें ॥ ९ ॥

वंगप्रांतीं रघू नातरी भोसलेच दुसरा ।
घुसेल पुन्हां पळवित रिपुला तो सैरावैरा ॥ १० ॥

पंजाबावर पुन्हां उठविणें प्रताप-पंजाला ।
दक्षिण जाणे ! बिजा करे सो खाई गोत्याला ॥ ११ ॥
सह्याद्रीला बुवाबाजिची बडबड ना मान्य ।
'समर्थ' तत्त्वज्ञान तयाचें; नकोत गुरु अन्य ॥ १२ ॥
स्वजनांचा बहु द्रोह जाहला, रक्ताचा हो सडा ।
सह्याद्रि आदेश देतसे एकीनें द्या लढा ॥ १३ ॥
फिरुनि एकदां गर्जणार रणचंडीचा चौघडा ।
धीर, धडा देशास द्यावया सह्याद्री हा खडा ॥ १४ ॥

## २०६. महाराष्ट्र-गीत

दि. ११-९-८७ भा. ल. रानडे

महाराष्ट्राचे मंगल उज्वल गाऊ गौरव गान
फडकत पूर्वापार निशाण
प्रेम, धीर, भारता द्यावया; धर्मावरती ध्यान ॥ धृ० ॥

ते यादव राजे इथे छान नांदले
शिवछत्रपतींचे सिंहासन शोभले
पेशवे प्रतापी भारतभर गाजले
मनी कृपा शोभली, मनगटी घे त्राणास कृपाण
ह्याची सदाच उन्नत मान ॥ १ ॥

ती कोकणपट्टी, मस्तक मुंबापुरी
लवथवती कृष्णा-गोदा खांद्यावरी
बहरली साजिरी मराठिची मोगरी
थोर अग्रणी इथे जन्मले, स्त्रीरत्नां ना वाण ॥ २ ॥

ज्ञानेश्वर, तुकया, समर्थ बोधिति बरे
तडफेचे शाहिर गाति डफाचे खरे
दरि-खोरी, किल्ले, झरे तसे नाचरे
इथे जीवनी नाट्य विलसते, घेत लावणी तान
चिंतनी चित्त होत बेभान ॥ ३ ॥

ती धर्मक्षेत्रे इथे विपुल विखुरली
अन् धारातीर्थे अगणित ही पसरली
श्रीतुळजा-शंकर कृपा, भक्ति विठ्ठली
खड्गहस्त हो भरतभूमिचा, जनसेवेचे वाण
येऊ द्या उल्हासास उधाण ! ॥ ४ ॥

नऊवारी, नथ अन् लामणदिवा हि झळके
रंगेल गडी रांगडा मराठा धडके
जरिपटका, भगवा ध्वज डौलाने फडके
सत्याचा, न्यायाचा बाणा, अभिमानाची आण ॥ ५ ॥

## २०७. महाराष्ट्र गीत

**'महाराष्ट्र गौरव गीते'** **पुरुषोत्तम शिवराम रेगे**

जय महाराष्ट्र! जय महाराष्ट्र!! जय महाराष्ट्र हा!!!
वर्धिति याला भीमा, कृष्णा,
तापी, गोदा, आणि कोयना;
समुद्र याचा निळा पाळणा;
सातपुडा–सह्याद्रीचे कडे खडे जागती पहा! १

श्रीरामाची शरण्यभूमी;
शिवरायाची समर्थभूमी;
दगडफुलांची अमुची भूमी;
संतांच्या भक्तिचा मळा; कवीश्वरांचें काव्य महा! २

सत्वरक्षणीं कंकण बांधुनि,
बुद्धि-वीर्य-चापल्य गाजवुनि,
भूषवील हा त्रिखंड अवनी,
सर्वांचा आधार खरा एकछत्र भारतांत हा! ३

## २०८. किती महान!

'महाराष्ट्र गौरव गीत संग्रह'-१९८६ जयभीम लळिंगकर

काय वर्णू, कसा वर्णू मी तिची महती
किती महान माझ्या महाराष्ट्राची माती ॥

दक्षिणेला खडा सह्याद्रीचा कडा
उत्तरेस उभा पर्वतराज सातपुडा
करिती जणु जागता पहारा खडा
अभिमानानं पुढं काढुनिया छाती ॥ १ ॥ किती महान ॥

माझ्या महाराष्ट्राची माणसं
कष्टताति रात्रं-दिवस
उगवती मोत्यांची कणसं
मातीवर काळ्या चांदण्या चमकती ॥ २ ॥ किती महान ॥

शेताशेतातुन कापसाची रास
धरेवर दिसे जसा पांढरा फेस
कुठे दिमाखानं डुले हिरवा ऊस
सारे शेतकरी या मातीचा गोडवा गाती ॥ ३ ॥ किती महान ॥

महाराष्ट्राची माती, थोरांची जननी
संत, कवी, थोर आले कुशीतुनी
नाव उजळती हिचे निशींदिनी
जय भीमाचे दोन हस्त येथे श्रद्धेनें जुळती
किती महान माझ्या महाराष्ट्राची माती ॥ ४ ॥

## २०९. मुंबई भूषण महाराष्ट्राला

'अग्रणी' प्रभाकर वरळीकर

एकमुखाने गर्जत बोला
मुंबई भूषण महाराष्ट्राला ॥ धृ० ॥

बिजली, पाणी, अन्न देवूनी
वैभवशाली केली श्रमुनी
किनारी कोळी जमात वसली
उभा मराठा मुंबई भंवती
महाराष्ट्राच्या सुखदु:खाला
मुंबई लाविल प्राणपणाला–१

शिलाहारांची प्रजा सुखाची
दर्यावर्दी सरखेलांची
प्राकृत बोली, दिव्य संस्कृती
समानतेची इथे जागृती
इतिहासाचा असे दाखला
मुंबई अमुची महाराष्ट्राला–२

मिश्र संस्कृती एक मिळूनी
राष्ट्रहिताची दृष्टी ठेवुनी
विशालतेची राखू भावना
खरा असे हा मराठी बाणा
सुराज्याच्या भाग्योदयाला
सदैव मुंबई आघाडीला–३

## २१०. कोजागर

'पुष्पवाटिका' वसंतविहार (दादर)

ते शिलेदार शौर्याचे । भालाइत खंदे वीर
मावळचे शूर मराठे । भात्यांतुनि सुटले तीर
रिपुवरती घालिति घाले । पळभरही ज्या न उशीर
स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं
बंधनें तोडण्यासाठीं
हिंदुत्व रक्षणासाठीं
ध्वनि 'हरहर' नभिं दुमदुमला । कोजागर तेंव्हा झाला ॥ १ ॥

जन्मले क्षात्रवंशी ते । लखलखती व्योमीं तारे
पाहुनी पौरुषा ज्यांच्या । भयकंपित मोंगल सारे
रण-देवी अंगीं खेळे । बादल बिजलीच थरारे
मी हिंदु हिंदु ते माझे
हे मोंगल कुठले राजे
कां अंमल यांचा गाजे ?
जाणीव होय राष्ट्राला । कोजागर तेंव्हा झाला ॥ २ ॥

म्यानांत कधींही नव्हत्या । त्या सुप्त हिंदु समशेरी
स्वप्नांतहि दचकत होते । हिंदूंस पाहुनी वैरी
हिंदूंचा हाच दरारा । ऐकविती समरीं भेरी
रिपु मोंगल गर्व हराया
गो-ब्रह्मवृंद ताराया
धर्माचा ध्वज उभवाया
जागती स्वकर्तव्याला । कोजागर तेंव्हा झाला ॥ ३ ॥

धर्मात जागृती होती । वीरांत जागती ज्योति
संतांची एकच वृत्ति । राष्ट्राची मंगल मुक्ति
नारींच्या हृदयीं मूर्ती । स्वातंत्र्य सौख्यदा प्रीति
बाळेंही स्वातंत्र्यार्थ
खेळती युद्ध खेळांत
धर्माची स्फूर्ति जयांत
ये स्फुरण महाराष्ट्राला । कोजागर तेंव्हा झाला ॥ ४ ॥

"हर हर" या रणघोषानें । दिङ्मंगल जागत होते
"हर हर" या जयघोषानें । नर केसरि गर्जत होते
"हर हर" या शुभमंत्रानें । गिरि दुर्गहि पूत अहो ते
"हरहर" हें जीवनसार
"हरहर" हा राष्ट्राधार
गातसे 'वसंतविहार'
ये स्फुरण हिंदुहिंदूला । कोजागर तेंव्हा झाला ॥ ५ ॥

## २११. महाराष्ट्र गीत

**'महाराष्ट्र गौरव गीते'** **विश्वनाथ दामोदर वऱ्हाडपांडे**

महाराष्ट्राच्या भाग्यदेवते ! भारतवर्षांतरी ।
अमर हो नांद सुखें मंदिरीं ! ॥ धृ० ॥

इतिहासांतरिं नवराज्याची पुण्यनिर्मिती अहा ।
पहा आनंदसोहळा महा ॥
छत्रपतींच्या पुण्याईनें टिळकांनी रेखिला ।
तिलक तो अखंड राहो तुला ॥

(चाल) हें लोकशाहीचें राज्य उदय पावलें ।
जनतंत्र जयाचें ब्रीद असे थोरलें ।
बहुरंग स्वरूपें मुंबापूर गर्जलें ।
भारताचिये भूषण नगरी राजधानि सुंदरी ।
अमर हो नांद सुखें मंदिरीं ! ॥ १ ॥

विदर्भ आणि मराठवाडा कोंकणचा प्रांत हा ।
रम्य तो महाराष्ट्र देश हा ॥
भक्तिदेश हा ज्ञानदेश हा शूरांचा देश हा ।
सुभग तो पराक्रमी देश हा ॥
(चाल) ज्या मायभूमिनें क्रांतिवीर निर्मिले ।
जे मर्द मराठे देशांतरिं गाजले ॥
इतिहास तयांचें करितां पूजन भलें ॥
नवराज्याच्या मंगलदिनिं त्या वंदन वरचेवरी ।
अमर हो नांद सुखें मंदिरीं ॥ २ ॥

तुकाराम श्रीज्ञानेश्वरहि रामदास आजला ।
सहर्षे आशिस देती तुला ॥
देशभक्त जे होऊनि गेले स्वर्गांतुनि पाहती ।
तुजवरी पुण्यांजलि अर्पिती ॥
(चाल) ती परंपरा तूं याहि पुढें चालवी ।
स्वातंत्र्य रक्षण्या महाराष्ट्र जागवी ॥
जयहिंद घोषणें राज्य नवें गर्जवी ॥
जयजयकारें ध्वजा फडकवीं सह्याद्रीं अंबरीं ।
अमर हो नांद सुखें मंदिरीं ॥ ३ ॥

समता येइल, विकास होइल जन होतिल प्रेमळ ।
मनीं ज्या राष्ट्राची तळमळ ॥
गोदा, वरदा, चंद्रभागेचें नीर जिथें निर्मळ ।
विषमता नष्ट करी सोज्ज्वळ ॥

(चाल) राज्यांत होउं दे महाग्रंथनिर्मिती ।
नव ओघ होउं दे आणि नवी जागृती ॥
वाढूं दे उंच ही भारतीय संस्कृती ! ॥
राज्यपदीं बैसली मराठी आज सुवर्णाक्षरीं ! ।
अमर हो नांद सुखें मंदिरीं ! ॥ ४ ॥

## २१२. कुठे ते मराठे स्वराज्याभिमानी ?

'काव्य-हार' भाग १ ला १९२७ — लक्ष्मण गणेश घड्डे

परांच्या छळाने अति त्रस्त झाला
महाराष्ट्र जेंव्हा विलापीं बुडाला
रणीं दिव्य केलें स्वदेशार्थ ज्यांनी
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?—१

खरे धीर गंभीर वीर प्रभावी
सु-नीत स्वधर्मी सुधी सुस्वभावी
रणोत्कंठ, ऐकेच्छु देशाभिमानी
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?—२

करीं खड्ग खांद्यावरी तीक्ष्ण भाला
निघाले रिपूमर्दनाला रणाला
शिरोभाग शोभे जयश्री तुऱ्यांनी
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?—३

रणीं मारिले शत्रु खड्गप्रहारें
तसें संकटांना दिलें तोंड धीरें
धरा नादविली यशोदुंदुभींनी
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?—४

'कडे पर्वतांचे वनें श्वापदांची
गृहें हीच राहावया भव्य साची
क्षुधा दाबिली वन्य मूळाफळांनीं
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?—५

महाराष्ट्र लक्ष्मीप्रती रक्षण्याला
जिवाचा चूर युद्धभूमींत केला
सदा ठेविला भाव भगव्या निशाणीं
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?—६

घरीं दारिं गांवीं वनीं वा गडांत
अरी-मर्दनाच्याच गोष्टी करीत
जयांची पहा रंगली नित्यवाणी
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?—७

स्वदेशार्थ सोडूनियां हे विलास
विकीलें जयांनी सुखानें तनूस
जनां चेतवीले पवाडे म्हणोनी
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?—८

जयांच्या हृदीं नित्य देशैक्यभाव
विनाशी असे कल्पनांचा अभाव
अहंता वृथा त्यागियेली जयांनी
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?—९

महाराष्ट्र दास्यातुनी मुक्त केला
जगीं वैभवाच्या शिरीं बैसवीला
महा श्रेष्ठता मेळविली जयांनी
कुठें ते मराठे स्वराज्याभिमानी ?—१०

## २१३. नमोस्तुते

रश्मिबंध' २४-५-१९८० मधु वाघोडकर

नमोस्तुते जय महन्मंगले, महाराष्ट्र माते,
जय जय महाराष्ट्र माते ॥ धृ० ॥
अटकेपारहि झडली नौबत, चंडी नाचली रणांगणातें
सह्यगिरीचे पिऊनी वारे, प्रताप घडती शौर्याचे
माय भवानी शिवकल्याणी, अर्पण करिता समशेरीते
पराक्रमाची शर्थ जाहली, तक्त थरकले दिल्लीचे—१
पर्वत, पत्थर झरती अमृत, घडविती मनगट पोलादाचे
गिरिकुहरातुन वाघ गर्जती, निनाद भिडती गगनाते
स्वागत करिते कांबळ, वाकळ, अपार गोडी गुळपाण्याते
इथें जिंकली माय मराठी, अमृत हरले पैजेते—२
महानुभावी घुमली गाणी, साथ ओविशी करिते जातें
बुडले पापी अवघे येथें, गाथा तुकयाची तरते
अफाट येती खळ्यांत मोती, चव पक्वान्नां लाजविते
'मुळा नि भाजी विठूच माझी' असली भक्ती येथे पिकते—३
धावूनी आला विठ्ठल येथें, पाणि वाहिले नाथाघरचे
घास भक्षुनी हट्टापोटीं, घेई देवही येथें नमते
रामायण तर मीहि पाहिले, पंचवटीला गोदा म्हणते
एकचक्र नगरीत येथल्या, भीम गाजवी पराक्रमाते—४

विराग येथें, विक्रम येथें, पटका चढला उंच नभाते
धर्म सांगतो राजकाज अन् दाही दिशांना कीर्ति लंघते
देश मराठी, वेष मराठी, जपू मराठी बाण्याते
भेदभावही विसरून अवघे, गर्जु 'जय जय भारत माते'–५

## २१४. माती मराठी मोलाची

'द्राक्षवेल' ६-७-१९६२ सीताकांत वालावलकर

माझ्या झांकल्या मुठींत
चीज लाख रे मोलाची
हिच्या रक्षणाकरितां
बाजी लावीन जिवाची–१

नको लावुन परीस
हिची करूं तूं पारख
औरंगजेबाची कबर
तुला सांगेल ओळख–२

सह्याद्रीच्या छातीवर
हिच्या पावलांची खूण
चौपाटीच्या रेतीवर
हिच्या रक्ताचें सिंचन–३

हिचें इमान जागतें
हिचा जागता दरारा
गत कालाच्या स्मृतीनें
दिल्ली कांपे थरथरा–४

माझ्या झांकल्या मुठींत
माती मराठी मोलाची
हिच्या रक्षणाकरितां
बाजी लावीन जीवाची–५

# २१५. वीर कथा महाराष्ट्राची

'द्राक्षवेल' ६-७-१९६२ सीताकांत पु. वालावलकर

या बाळांनो, तुम्हां सांगतो वीर कथा महाराष्ट्राची
ह्या भूमीच्या कणाकणावर खूण असे शिवरायाची
जय बोला महाराष्ट्र, जय बोला महाराष्ट्र ॥ धृ० ॥

शिवनेरीवर सूर्य उगवला परदास्याच्या रात्रीमधें
स्वातंत्र्याचे किरण दौडले क्षणार्धांत दशदिशांमधें
चेतवणारी ठिणगी पडशी धगधगणाऱ्या मनांमधें
ज्वाला भिडता या अग्नीच्या वाताहात हो शत्रूंची–१

आयुष्याचा दोर बांधला सिंहगडीं तानाजीनें
देहाचा उंबरठा केला पावनखिंडीं बाजीनें
शिरावेगळें धड लढविलें निर्भय मुरारबाजीनें
रक्ताच्या बिंदूतून होती ईर्षा केवळ त्यागाची–२

धर्मासाठी मृत्युच्या वेदीवर चढला संभाजी
अंगावर फटके बसले पण मुका राहिला खंडोजी
शत्रूंनाही पुरुन उरले धनाजी आणि संताजी
कबर इथें बांधली मातीनें अखेर औरंगजेबाची–३

दख्खनच्या सनदा मिळविल्या विश्वनाथ बाळाजीनें
वसईचा किल्ला लढविला शूर चिमाजी अप्पानें
भगवा झेंडा अटकेवरती फडकविला राघोबानें
शत्रूंना जिंकून राहिली विजयपताका शौर्याची–४

अबदालीनें स्वारी केली, दिल्लीला वेढा दिधला
'बच जाऒं तों और लढेंगे' दत्ताजी खाली पडला
मर्द मराठा त्यावेळेला साऱ्या शक्तींनी लढला
पानीपतावर ज्योत विझाली अखेरची स्वातंत्र्याची–५

अन्यायानें चेतविली ही ज्योत पुन्हां मुंबापुरीला
मर्द मराठा रस्तोरस्तीं निधड्या छातीनें लढला
चौपाटीच्या रेतीचा कण रक्तानें पूनित झाला
चौथऱ्यावरी स्मृती कोरली उज्ज्वलशा भवितव्याची–६

घोड्यावरती खोगीर घालून उभा शिवाजी वेशीशीं
सह्याद्रीची ढाल बांधली सदैव त्यानें पाठीशीं
लखलखती तलवार सांगते गर्जून साऱ्या दुनियेशीं
खबरदार जर लुटाल पुन्हां आठव ठेवा काळाची–७

## २१६. महाराष्ट्र

'युगे' जानेवारी १९७३ **शं. श्री. वाशीकर**

कणाकणांवर, मनामनांवर महानतेचा जिथे ठसा,
महाराष्ट्र हा देश असा ! ॥ धृ० ॥

मृदु कुसुमाहुन पूजेसाठी सह्याद्रीचा कडाकडा !
कठिण वज्रसम लढावयाला उभा राहिला सदा खडा !
मर्द मराठा जीवन-वैभव ठाउक आहे गडा गडा !
पूर्वदिव्य हें स्फूर्ती देतें आज आमुच्या नसानसा ! ॥ १ ॥

उत्कट भक्ती भरुन वाहते भीमेमध्ये युगेयुगे !
गोदा गर्जे समर्थ वाणी स्फूर्तीदायी युगेयुगे !
पश्चिमसागर जीवन देई अनंत हस्तें युगेयुगे !
मुठभर मातीमधुनी निघती मोती येथें पसापसा ! ॥ २ ॥

सह्याद्रीने हृदयीं जपला हिमालयाचा कैलास !
गोदामाईच्या स्पर्शातुन होई गंगेचा भास !
भारतभूचा महाद्वार हा ! भारतमातेचा ध्यास !
महाराष्ट्र हा महाभारतीं शोभे कोंदणि हिरा जसा ! ॥ ३ ॥

## २१७. उठा हो ! उठा हो ! मराठे, उठा हो !*

**'सचित्र फुलांची बाग' १९४१ वासुदेवाग्रज (मल्हार बा. शिंदे)**

उठा हो ! उठा हो ! मराठे, उठा हो !
यशाचे भरा शुभ्र आतां घडे
कृती कांहीं थोडी करा, शौर्य दावा,
नका मात्र बोलूं उगें तेवढें !—१

कृतीचा असे काळ हा आज आला
नको शब्दपांडित्य ! आतां पुरे !
व्याख्यानबाजी पुरे ! वीरबाजी—
तुम्ही युद्ध-गाजी रणीं व्हा खरे !—२

शस्त्रें जरी गेलिं वा हातचीं तीं
नका मान टाकूं अशी नेभळीं !
उठा सज्ज घेउनि अस्त्रें मनाचीं
मनोरूप अस्त्रेंच ही चांगलीं—३

उभे छाति काढोनि राहा असे नीट
बच्चे कुणाचे तुम्ही, नेणतां !
मराठा गडी, मायबोली मराठी—
जयाची असे तोचि हो तत्त्वता—४

असो तो कुणीही न पर्वा तयाची
असो मात्र तो जन्मला भारतीं
मराठा गडी तो मला वंद्य ! काया—
तयाच्या सुखा अर्पुं ही संप्रती—५

इथें हें पहा, मातलें रान सारें
इथें केवढी घाण ही सांचली !
मराठा समाजीं किती दुष्ट चाली
किती रूढ तत्त्वें वृथा बिंबली !—६

करा नेस्तनाबूत हीं आज आधीं
करा जागृती अज्ञ लोकीं स्वता
खरे प्यार हे मावळे त्या शिवाला
जिवाला दिला जीव ज्यांनी स्वता—७

## २१८. महाराष्ट्र-लक्ष्मी

'विनायक'.
(विनायक जनार्दन करंदीकर)

'**महाराष्ट्र गाथा**'
'विनायकाची कविता' १९४७

महाराष्ट्र-लक्ष्मी मातें जगीं धन्य वाटे
यशोगीत तीचें गातां मनीं हर्ष वाटे ॥ धृ० ॥
पुनःपुन्हा परचक्रानें ताडिली बिचारी
दीर्घकाल खचली होती पारतंत्र्यभारीं
द्वादशाब्द दुष्काळानें जाहली भिकारी
संकटांत तीच म्हणोनी करी उंच माथें ॥ १ ॥

मावळांत वास, न ठावे जया बाह्य वारे,
नेत्रधर्म ज्यांचें लोकीं कृषीकर्म सारें,
विळा कोयतीच जयांचीं काय तीं हत्यारें
तेच वीर बनले समयीं मावळे मराठे ॥ २ ॥

न ये नीट धरितां ज्याला लेखणी करांनीं,
कृपादृष्टि संपत्तीची न ज्याचे ठिकाणीं,
परी यवनसत्तेची जो करी धुळधाणी
कोण तया शिवरायाच्या पावला यशातें ? ॥ ३ ॥

साधुसंत झाले, असती, तयांचीं न वाण
मात्र रामदासा लाभे समर्थाभिधान
जो मनीं स्वदेशहिताचें धरोनी निशाण
ध्वजा कौपिनाची मिरवी भारतांत थाटे ॥ ४ ॥

कढीभातखाऊ म्हणती ब्राह्मणा जगांत,
दिली कांस ज्यांची म्हणुनी हांसती, हंसोत,
तयांनींच करणी केली प्रसंगीं अचाट,
खोल गढे परसत्ता ती ढासळली लाथें ॥ ५ ॥

पूर्व दिव्य ज्यांचें, त्यांना रम्य भाविकाळ,
बोध हाच इतिहासाचा सदा सर्वकाळ,
कासया वहावी चिंता मनीं जग जहाल,
रात्र सरे तेंव्हा उगवे दिनहि पूर्व वाटे ॥ ६ ॥

# २१९. यापुढें

' विनायकाची कविता ' १९४७ —विनायक

कोठचा शिवाजी राजा
निजधर्माचा अभिमानी—यापुढें !
कोण देश कार्यासाठीं
सोडील स्वहितीं पाणी—यापुढें
कोठची रामदासाची
बोधाची मधुरावाणी—यापुढें !
मावळे जयांनी दिले, आपले गळे, देशनिर्वाणीं,
नांवही न त्यांचें कानीं—यापुढें ! १

निपजणार कोण धनाजी
तारण्या मराठेशाही—यापुढें !
रडवील कोण रणरंगीं,
यवनांना धायी धायी—यापुढें !
भासून रूप कोणाचें
दचकतील ठायीं ठायीं—यापुढें !
राखिलें राज्य आपलें, जसें व्यापिलें जया यवनाही—
कोण असा प्रसवे आई—यापुढें ! २

फांकडा शिपाई बाजी
दापील निजामा कोण—यापुढें !
वारील छत्रसालाचें
सांकडें वीरवर कोण—यापुढें !

घालील महाराष्ट्राला
निरभिलाष आळा कोण—यापुढें !
जें शिवें स्थापिलें नवें, राज्य त्या जवें वाढती बाजी
सर करील त्याची कोण—यापुढें ! ३

अटकेवर झेंडे न्याया
आणितां कुठून भरारी—यापुढें !
थिजलीच, न चालेल पुन्हां
भाऊंची शौर्य-भरारी—यापुढें !
फडनवीस नाना गेले
त्यांची न दिसेल हुषारी—यापुढें !
जी खनी, प्रसवली मणी, यापरी जनीं, बहुगुणी भारी
झाली ती हाय भिकारी—यापुढें ! ४

ऐश्वर्य लयाला गेलें
जडलें दारिद्र्य कपाळीं—यापुढें !
हास्याचे दिन मावळले
आंसवें लोचनीं आली—यापुढें !
मित्र सर्व वैरी झाले
संकटीं न उरला वाली—यापुढें !
यापरी नाडलो तरी, लोचनांतरी, नीज जी भरली—
ती निघेल कवण्या काळीं—यापुढें ५

## २२०. महाराष्ट्र माऊली

'महाराष्ट्र गौरव गीत संग्रह' १९८६ वंदना विटणकर

उदे उदे ग महन्मंगले महाराष्ट्र माऊली
मनामनातील गौरवगाथा उदे तुझ्या पाऊली

तुझ्याच चरणी नित्य नांदला गजर विठ्ठलाचा
ज्ञानेशाची अमृतवाणी, अभंग तुकयाचा
भक्तजनांना आनंदाची खाण इथे लाभली
उदे उदे ग महन्मंगले महाराष्ट्र माऊली

गोदा भीमा कृष्णेमधुनी तेज तुझे उसळे
सह्याद्रीचे कभिन्न कातळ शत्रूंना भिडले
हरहर गर्जत मावळसेना गर्जाया धावली
उदे उदे ग महन्मंगले महाराष्ट्र माऊली

मायमराठी भाषेची या आगळीच गोडी
धुंद शाहिरी काव्यरसांची पेठ इथे उघडी
भक्तिभावना नामशक्तिच्या प्रेमाने नाहली
उदे उदे ग महन्मंगले महाराष्ट्र माऊली

अन्यायाचे प्राणपणाने करण्या निर्दालन
रणमर्दांनी रणवेदीवर केले बलिदान
जरिपटक्याला पराक्रमाची दिव्य शान लाभली
उदे उदे ग महन्मंगले महाराष्ट्र माऊली

अभंग जुळले मराठमोळ्या मातीशी नाते
नसानसातुन या मातीचा प्रेमभाव दाटे
तुझ्याचठायी सर्वस्वाची ओंजळ ही वाहिली
उदे उदे ग महन्मंगले महाराष्ट्र माऊली

## २२१. जय जय गान !

'महाराष्ट्र गौरव गीत संग्रह' १९८६ वंदना विटणकर

प्रतापशाली महाराष्ट्र हा उज्ज्वल याची शान
महाराष्ट्राच्या महानतेचे गाऊ जयजयगान !

या मातीतुन घुमते वाणी संतमहंतांची
सह्यकड्यासम निधडी छाती मावळवीरांची
दिशादिशातुन पराक्रमाचे गाजतसे महिमान !
महाराष्ट्राच्या महानतेचे गाऊ जयजयगान !

मायमराठी अमृतवाणी अमुच्या देशाची
हिला भूषवी भक्तीगाथा नशा लावणीची
परममंगला त्यागभूमी ही नररत्नाची खाण !
महाराष्ट्राच्या महानतेचे गाऊ जयजयगान !

गोदा कृष्णा भीमा देती स्फूर्ती अपरंपार
दरीदरीतुन शिवकीर्तीचें दुमदुमती ललकार
रणमर्दाचा भगवा झेंडा चेतवितो अभिमान
महाराष्ट्राच्या महानतेचे गाऊ जयजयगान !

या भूमीच्या कर्तृत्वाची परंपरा बलवान
अन्यायाच्या सुलतानीची इथे उडे धुळधाण
कालपटावर अमर जाहले वीरांचे बलिदान !
महाराष्ट्राच्या महानतेचे गाऊ जयजयगान !

या देशाची गौरवगीता आगळीच जगतात
प्रियकर अमुच्या मायभूमीला लाख लाख प्रणिपात
हिच्या कुशीतुन जन्म लाभला हेच थोर वरदान !
महाराष्ट्राच्या महानतेचे गाऊ जयजयगान !

## २२२. मराठ्यांचे ब्रीद

'**पुष्पवाटिका**' जानेवारी १९२५ —**विपिन-विहारी** (भायखळा)

सारोनी सुखसोहळा स्वगृहिंचा तानाजी झेपावला—
कोंडाण्यावरि विक्रमा करुनि कां तो सिंह विश्रामला ?
नाहीं एक तसूभरीहि हटला रक्ताचिया शिंपणीं
बाजी पावन खिंडिमाजि निजला बोला कशाला तरी ?
शौर्या वीर मुरारिच्या निरुपमा कोणी दिली चालना ?
कोण्या शक्तिवशें कबंध लढले सांगा शिरावेगळें ?
दाभाडा निघतां धन्यास समयीं पाठीत्ररी घेउनी
रक्ताची गुळणी वमूनि पडला कां जिजिवासीं वदा ?
हातें हिरकणी दिली भगिनिला, गोळा बळी पोटचा—
खंडोजी निज दे प्रसंगिं, नव्हतें कां त्या वदा काळिज ?
चौफेरी तुटक्या नभास ठिगळें लावावया धांवला
बांका गोकलखां किमर्थ समरीं गेला कटोनी बरे ?
जाती सांगुनि धीर वीर कृतिनें ते या जगा लागुनी
"आम्हांला मरणेंहि तुच्छ गमतें राष्ट्राचिया कारणीं!"

## २२३. स्वातंत्र्य-संगीत

'**पुष्पवाटिका**' १९२५ —**विपिन विहारी**

"ब्रीद आपुलें रक्षि महाराष्ट्रा !"
स्वातंत्र्यप्रिय पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा !
ब्रीद आपुलें रक्षि समर्थि या मंगलमय देशा !

धर्मासाठीं मानासाठीं स्वातंत्र्यासाठीं
जिवापाड झुंजशी गाजते हीच तुझी ख्याति !
जधीं मांडिलें असुर वृत्तिचें—मोंगलशाहीनें
नंगें नर्तन भारत-भूवर अधर्म अनयानें
नवस्फूर्तिची मर्दपणाची मंगलमय वाणी
अमृताची जणुं सरित् स्रवविली समर्थ गुरुजींनी
त्याच सुधेचे घुटके सेवुनि श्रीशिवरायानें
वैभव-गिरि-शिरिं तुला चढविलें उमद्या मानानें !
त्या वीराचा सख्या ! तुझ्या रे पंचीप्याऱ्याचा
भगवा झेंडा फडफडला तव शिरिं स्वातंत्र्याचा !
नवखंडींही त्या झेंड्यानें मर्दुमकी केली
उज्ज्वलतम या तुझ्या कीर्तिला अखंडता दिधली !
प्रभुबाजीच्या तानाजीच्या मुरारिच्या देशा !
दगडाच्या निधड्या छातीच्या वीरांच्या देशा !
इतिहासाचीं पानें खुलती सुवर्णाक्षरांनीं
वाच वाच तीं सख्या ! आजि रे उघड्या नयनांनीं
किल्ले सत्तावीस गाति ज्या, आणि अजुनि पाहे
बारा मावळ दरीदरींतुनि घुमवित ज्या आहे
सख्या ! देऊनि कान ऐक त्या घुमत्या आदेशा
"ब्रीद आपुलें रक्षी अक्षय महाराष्ट्र देशा !"

स्वातंत्र्याच्या संगीताच्या स्वैर लकेऱ्यांनी
नवजीवन संचरिलें ज्यानें या हिंदिस्थानीं
शतकांतिल या स्वातंत्र्याचा पहिला चंडोल
महाभाग तो 'टिळक' शोभवी तुझेंच हें भाल !

सह्याद्रीच्या शिरावरुनि ध्वनि त्या चंडोलाचा
घुमला दशदिशिं "उठ भारता! सिंहाच्या बच्चा!
स्वराज्य नसतें मिळत कधींही कुणि देतिल म्हणुनी
घ्यायाचें तें स्वयेंचि असतें बा! कंबर कसुनी!"
आसेतुहिमाद्री ही घुमली वाणी गंभीर
अफाट लाटा उसळित वातावरणांत स्वैर!
नसा नसांतुनि राष्ट्राच्या अजि ओज उचंबळलें!
मातृभूमिची बूज कराया कितिक वीर सजले!
स्वातंत्र्याचें निशाण निरवुनि गांधींच्या हातीं
गेला पुण्यश्लोक तो जरी तुज सोडुनि वरतीं
तद्वाणीतुनि निघत ऐक हा ध्वनी स्पष्ट घुमता
"प्राणाधिक तें ब्रीद आपुलें रक्षि महाराष्ट्रा!"

## २२४. महाराष्ट्रास

'कोरीव लेणी' ७-५-१९६० श्री विरकुड, नेरळ

मूर्त रूप महाराष्ट्र राज्य घे पुनर्जन्म आज
देवि शारदे! तव प्रतिभेचा चढवी त्या साज.
तीन कोट महाराष्ट्र जनांच्या आनंदाश्रूंची
अथांग वाहे अमूर्त गंगा पावनमय साची
गतपितरांचे श्रीशिवबांचे असंख्य वीरांचे
श्रमसाफल्यचि आज जाहलें कां नवनवसाचें?
मूर्त रूप मांगल्य जाहलें दृग्गोचर काय
धर्मरूप चारित्र्य उभें हें संतांचें होय!

प्रेमरूप पावित्र्य सतींचें घे हा अवतार
कर्मरूप कर्तृत्व काय हें वीरांचें अमर.

आज रंगलें इतिहासाचें सोनेरी पान
आज भावना उफळुनि हृदयीं करिती थैमान.

प्रतिमा पाहुनि नयन मनोहर मम प्रिय राष्ट्राची
सृष्टी अवतरे स्मरणीं झाल्या गेल्या गोष्टींची !

चिरंजीव चिरकीर्तिरूप हा भारत-भाग्याचा—
मुकुटमणी महाराष्ट्र बनावा मंगल ध्येयाचा—

मंगल राष्ट्रा जय महाराष्ट्रा ! तीन कोट जनता
अनन्य भावें मुजरा करिते मानाचा आतां.

## २२५. मराठ्या वाजिव रे दुंदुभी

'कल्पफुलें' मे १९५९ विलास (विलास गोविंद कोकळेकर)

मराठ्या वाजिव रे दुंदुभी ॥ घृ० ॥

छत्रपतींचे सुपुत्र आपण
वीरवृत्तिची ठेवुं आठवण
शत्रूंना दाखवूं रणांगण
न शिव आम्हां भी ॥१॥

दासांनीं शिकविलें अम्हाला
शिवरायें जें आचरण्याला
अन्यायाला ठोकरण्याला
कचरूं नका रे कधीं ॥२॥

महाराष्ट्र इतिहास जयांनी
रचिला आदर्शा ठेवोनी
त्यागाची ही पावन भूमी
घोष उठूं द्या नभीं ॥३॥

महाराष्ट्र आमुचा, आमुचा
मराठमोळी-मावळियांचा
स्वतंत्र बाणा प्रसिद्ध साचा
दावूं या झडकरी ॥४॥

गोब्राह्मण प्रतिपालक राया स्वराज्य काजीं धन, मन, काया
वंदन तव पदिं 'जय शिवराया' तेजाचा हा निधी ॥५॥

# २२६. महाराष्ट्राची थोरवी

'महाराष्ट्र गौरव गीत संग्रह' १९८६ रा. य. वैद्य

चिरंतनाची साथ देतसे ही काळी धरणी
महाराष्ट्राचे पाही थोरपण ती डोळेभरुनी ॥ धृ० ॥

वसले जिल्हे आणि तालुके गावें किति त्यांत
घर हे मोठे खणासारखे विभागले प्रांत
कष्ट सोसूनी जिणे जगावे ही आमची सरणी

हिमाचलासम उंच विराजे सह्याद्रि जेथे
विंध्य, अरवली, सातपुड्यांचे भावांचे नाते
हात उंचवून नित्य भेटती मेघांना गगनी

सुजल भूमिच्या कन्या दोघी कृष्णा अन् कोयना
सुपीक करती पठार सारे जणू गंगा यमुना
सतत वाहती भद्रा, गोदा, भीमा, इंद्रायणी

शाळू, बाजरी, गहु पिके, कापूस अन् ऊस
आंबे, नारळ, काजू, पोफळी, भात कोकणात
उदार हस्ते सागर देतो धन सारे लुटुनी

मानऱ्याचे लेख कोरले आम्ही दगडावर
दगडामधुनी दिले आम्हाला देवत्व सुंदर
शिल्पदेवता मूर्तिमंत ही वेरुळची लेणी

वीर शिवाजी इथे जन्मला स्वामि रामदास
हिंदुत्वाची विजय पताका हा आमचा देश
मराठमोळ्या प्रांती मराठी साजे जनवाणी

रसाळ ओवी ज्ञानेशाची, गाथा तुकयाची
एकनाथ, नरहरी, सावता, जनी नामयाची
प्रपंचातही रंगून गेले पांडुरंग भजनी

टिळक, गोखले, बाबू गेनू, फडके, चाफेकर,
भीमराव, राजर्षि शाहू, तात्या सावरकर
क्रांतीवीर हे इथे जाहले स्वातंत्र्याचे धनी

देवल, खाडीलकर, गंधर्व, किर्लोस्कर अण्णा
माडगूळचे 'कवि वाल्मिकी' गीतकार अण्णा
नाटक आणि चित्रसृष्टीचे हे तर चिंतामणी

कला संस्कृती मुक्त दालने, कुणा न मज्जाव
सहिष्णूतेने आम्ही नांदतो नाही दुजाभाव
वैभवशाली हे महाराष्ट्र, प्रणाम घे चरणी

## २२७. मराठी मातीचा सत्कार

**'महाराष्ट्र गौरव गीत संग्रह'–१९८६ रा. य. वैद्य**

सुपुत्र आम्ही या मातीचे बलशाली आधार
अभिमानी या महाराष्ट्राचा करतो जयजयकार

असे स्वतःचे काही विशेष हरेक जिल्ह्यात
महाराष्ट्राच्या राजधानीचा जिल्हा सम्राट
कोट्यवधी तेथे जगती तेजीमधे व्यापार
या प्रगतिवर सागरलक्ष्मी सांगतसे अधिकार !

कडेपठारी खंडोबा, विठ्ठल पंढरपूरी
माय भवानी शिवबाची राहे तुळजापुरी
करवीर क्षेत्री महालक्ष्मी, जोतिबा उंचावर
माहुरगडी रेणुका, सूताचे कोकणात मंदीर !

गंगेहुनही पवित्र वाटे गोदावरीचे जळ
भक्तिरसाने स्नान घालते 'भागा' ही प्रेमळ
सह्याद्री अन् सातपुडा हे मेरु आणि मंदार
इंद्रायणी ती अजूनी उडवी 'अमृत ज्ञान' तुषार !

आवळे, चिंचा, जांभूळ, बोरे, करवंदे मेवा
हापूस आंबा दिसता वाटे कोकणचा हेवा
नारळ, काजू, फणस, सुपारी अमोल हा फलभार
अहल्य भूमी कोकणची पण करते हा उपकार !

यांत्रिक शेती, पिकती मोती शाळु बाजरीचे
गहु, भाताची शेते सजले रुप नोवरीचे
द्विदल धान्ये, ऊस, कपाशी उत्पन्ने भरदार
सुजल अन्नदा किती देतसे तिजला हात हजार !

थुईथुई नाचे अंगणी आर्या मोरोपंतांची
अमृतमधुरा मराठीच ही वाणी संतांची
शब्द मराठी शाहिरीचा त्या तलवारीची धार
शाळूच्या पदरात मुरकतो लावणीचा शृंगार !

शिवतेजाने विरुन गेला जुलुमाचा अंधार
हिंदुत्वाचे भाग्य लाभले वंदन त्यांस त्रिवार
'अशीच आमुची आई असती' हे त्याचे उद्गार
रक्षण करणे हिंदुत्वाचे मराठी मातीचा सत्कार !

भीमराव, राजर्षि शाहू आणि जोतिबा फुले
कर्वे, सानेगुरुजी, तुकडोजी, 'कर्मवीर' झिजले
अंधमनाला दिली लोचने केला दलितोद्धार
अजाण, दुबळ्या बहिष्कृतांचे उभारले संसार !

टिळक, गोखले, सावरकर स्वातंत्र्याचे धनी
आहुति देऊन गेले फडके, गेनू, गायधनी
परसत्तेचा बलिदानाने नोंदविला धिक्कार
करुनि गेले समाज जागृत 'निबंधमाला'कार !

महाराष्ट्राची स्फूर्तिदेवता आई शिवबाची
नंतर घडल्या रमा, लक्ष्मी, आनंदी जोशी
कमला, सावित्रीने सोसले जननिंदेचे वार
तारा मोडक, अनुताई या करती ज्ञानप्रसार !

दांडेकर, ओगले, गोगटे, आबा गरवारे
बेडेकर, किर्लोस्कर हे ही मराठीच सारे
श्रमदेवीचा ज्यांस जाहला मंगल साक्षात्कार
उद्योजक लाभला असे ना दैन्य कुठे उरणार !

अतिरेकाचा स्फोट घडे पेटे अमृतसर
उभे ठाकले वैद्य तिथे संगतीस लष्कर
राष्ट्रएकता जपली केली गोळ्यांचा भडीमार
प्राणपणाने आम्ही असे करतो नित प्रतिकार !

आम्ही रांगडे, निधडे, प्रांजळ मुखिं वैखरी
आम्ही भाबडे, कधिं न करु कोणाची तस्करी
कष्ट उपसता सौख्य मिळे कशास व्हा लाचार ?
अमोल तो आनंद घेतसे घरट्याचा आकार !

पीळ मनाचा गूढ मराठी बाणाही कणखर
सुंदरता त्यांतली कोरली लेणी दगडांवर
जिणे आमचे असे भले इथेच ते जगणार
इमान राखून या राष्ट्राशी मरुन अमर होणार !

## २२८. महाराष्ट्राची माती

' महाराष्ट्र गौरव गीत संग्रह ' १९८६ सुभाषचंद्र वैष्णव,

प्राणाहुनही प्रिय आम्हाला
महाराष्ट्राची माती
भिन्न भिन्न जरी भाषा अमुच्या
भिन्न भिन्न जरि जाती ॥

शिवरायांच्या कथा सांगती
इतिहासाची पाने
इथल्या डोंगर दऱ्यात घुमते
पराक्रमाचे गाणे
मर्द मावळे इथे झुंजले
या मातीच्या साठी ॥ १ ॥

खळखळणाऱ्या नद्या येथल्या
निर्मळ जीवन देती
या पाण्यावर पिकते आहे
ही मोत्यांची शेती
समृद्धीची असे पताका
शेतकऱ्यांच्या हाती ॥ २ ॥

पुण्यभूमीही ऋषीमुनींची
संत तुक्याची, ज्ञानेशाची
ओठावरती अभंग अमुच्या
ओढ मनी देवाची
घराघरांतुन अखंड जळती
माणुसकीच्या ज्योती ॥ ३ ॥

# २२९. जय जय महाराष्ट्र देशा

‘छिन्नध्वज’ मे १९५१ शरद्

भारतभूच्या भव्य सुपुत्रा ! महाराष्ट्र देशा !
जय जय महाराष्ट्र देशा ! ॥ धृ० ॥

पश्चिम सागर गर्जत घोषे स्वातंत्र्याचा तव बाणा !
सह्य उभा नभिं, प्रगटित जगिं, तव सैनिकि अभिमाना !
भारतभूच्या स्वातंत्र्याचा कोट चिरंतन बा साचा
तव पुत्रांच्या कणखर, निधड्या, अविचल छातींचा !
ती शूर, धीर वृत्तीची
घन घडण तुझ्या हृदयाची
घडविति गिरी-सागर साची !
बा स्वातंत्र्याच्या शूर सैनिका महाराष्ट्र देशा ! ॥ १ ॥

सह्यगिरीच्या स्कंधावरतीं पठार पसरे पूर्वेस,
गोदा, कृष्णा विनत कोयना, भीमा सेत्रेस
दणकट मनगट नांगर फिरवी, फिरवी यांत्रिक चक्रांतें,
हृदयगिरींतुनि कला वाहती स्फुरवित जनतेतें
हृदिं स्फुरे अग्नि ध्येयाचा,
करिं भगवा ध्वज त्यागाचा,
समतेचा, स्वातंत्र्याचा—
बा लढसी अनुदिन ध्येयास्तव, जगिं धन्य धन्य देशा ! ॥ २ ॥

ज्ञानदीप तव प्रथम पाजळी आद्यकवीतें त्या नमन;
प्रथम पाजळी स्वातंत्र्या त्या शिवराया नमन
हिंदक्रांतिवीरांतें पहिल्या तात्या-नाना-लक्ष्मीस,
हिंदक्रांति-झुंझारा पहिल्या वंदन बाळास

दा. क्र.

नत वंदन त्या सकलांस
नवलाख वीररत्नांस
उजळिली जयें तव कूस;
बा सुधन्य जनका नररत्नांच्या महाराष्ट्र देशा ! ॥ ३ ॥

## २३०. महाराष्ट्र माझा

'सौरभ' १९६० — व्यं. र. शाईवाले

महाराष्ट्र माझा नि माझी मराठी ॥ धृ० ॥

जया ज्ञानदेवांदिनी गौरविले ।
प्रतापी शिवादींनी ज्या भूषवीले ।
जिथें झुंजले वीर कोट्यानुकोटी ।
महाराष्ट्र माझा नि माझी मराठी ॥ १ ॥

गिरा श्रेष्ठ त्या संस्कृताचीच कन्या ।
मराठी म्हणोनी स्वनामेंहि धन्या ।
सुधेशी करूं जात स्पर्धाहि मोठी ।
महाराष्ट्र माझा नि माझी मराठी ॥ २ ॥

न सोडूं कधी वीर बाणा मराठी ।
न साहूं कधी हो तरी वक्रदृष्टी ।
सदा शब्द हे गोड राहोत ओठीं ।
महाराष्ट्र माझा नि माझी मराठी ॥ ३ ॥

मराठी असे आमुची थोर आई ।
मराठी तिथे पुत्र देतील ग्वाही
मरूं आणि राहूंहि तिच्याचसाठीं ।
महाराष्ट्र माझा नि माझी मराठी ॥ ४ ॥

# २३१. मी महाराष्ट्र म्हणतो तेंव्हा

'कुजिते आणि गर्जिते' १९६५ —शिरीष

मी महाराष्ट्र म्हणतो तेंव्हा
तो शिवबाचा महाराष्ट्र असतो
त्याच्या स्वातंत्र्याच्या जोमात
हिंदवी स्वराज्याचा प्रपंच वसतो
राजकीय महाराष्ट्र
भारताची चिंता वाहातो
भारत स्वतंत्र रहावा म्हणून
स्वातंत्र्याचें बीज जपतो. १

मी महाराष्ट्र म्हणतो तेंव्हा
मराठी संतांचा निर्वाळा असतो
आपलें कुटुंब विसरून मराठा
वसुधैव कुटुंब करू पाहातो
सिंधु-गंगेच्या उमाळ्यानें
माझा महाराष्ट्र गहिवरून येतो
भारताची दुःखे पाहून
स्वतःची शल्ये विसरून जातो. २

स्वातंत्र्याचें वारे प्यालेला
माणुसकीचें तीर्थ प्यालेला
माझा महाराष्ट्र भारताचा
खड्गहस्त होतो
सहाभूतीने उफाळून येताना
मराठी मनातून भारतीयत्व
जगतो ! ३

मी महाराष्ट्र म्हणतो तेंव्हा
जगण्याची जिद्द अभिप्रेत असते
आपल्या जीवनाच्या छायेंत
भारतीयत्व जपायचे असते
माझ्या अशा महाराष्ट्राला
इडापिडा लागायची नाही
नियतीला पुरुन उरेल
मराठी जिद्द सरायची नाही ! ४

# २३२. असा मराठा मेळवावा

'कुजिते आणि गर्जिते' शिरीष

मराठा तितुका मेळवावा
अन् असा मराठा मेळवावा
जो ब्राह्मण नाही आणि अब्राह्मणहि नाही,
जो मराठा आहे
कारण त्याचे मराठी मातीशी इमान आहे !
कृष्णा, भीमा, गोदा, तापी, नर्मदा
यांच्या जलोदकांत ज्याला पुण्यतीर्थ मिळते
सह्याद्री, अजिंठा, सातपुडा यांच्या गिरिशिखरांवून
ज्याच्या स्वातंत्र्याचे वारे भरारते
शिवरायांचा प्रताप आठवून
ज्याची काया रोमांचित होते
तानाजी अन् बाजी प्रभूंच्या मरणांतून
ज्याचे हौतात्म्य जागून उठते
थोरल्या बाजीरावांच्या पराक्रमाने
ज्याची छाती स्फुरण पावते
अटकेपल्याडच्या ध्वज फडफडीत
ज्याचे हृदय आजहि धडधडते
सातारा नि कोल्हापूर यांच्या वाटणीने
ज्याचे मन हळहळून तुटते
नारायणरावांचा खून अन् रावबाजीची कर्तबगारी
यांची ज्याला लाज वाटते

मराठी संतांच्या–कवना–भजनांतून
ज्याचें अंतर उचंबळून येतें
मराठीच्या उद्घोषातून
ज्याची अस्मिता सजीव होते
असा मराठा मेळवावा
महाराष्ट्र धर्म जागवावा !
या मराठ्याचे मन मराठी
त्याच्या तनूची माती मराठी
त्याच्या धमनीतील रक्त मराठी
त्याच्या रोमरंध्रातील घाम मराठी
त्याच्या डोळ्यांतील अश्रू मराठी
त्याच्या फुफ्फुसातील श्वास मराठी
त्याला मराठी दारिद्र्याची खंत
निर्मिल्याविना, पिकविल्याखेरीज
ज्याच्या मनाला मुळी ना उसंत
असा मराठा मेळवावा
समाजधर्म जागवावा.
मराठी समाजाचे दारिद्र्य न संपो
पण एक मराठी दरिद्रि असेल
तोंवर महाराष्ट्रात श्रीमंत सापडणार नाही
मराठी दारिद्र्याला समाजधर्मातून
शाश्वती मिळेल, हमी लाभेल
खाण्यापिण्याची, वस्त्रप्रावरणाची
घरदाराची आणि घामाच्या कामाचिहि !

कारण मराठी वैभव मराठी श्रमांतूनच फुलेल
मराठी देह मराठी अन्नावरच वाढेल
मराठी पाण्यावर पिकलेल्या शेतीतून
हिरव्या जीवनाने अंकुरणाऱ्या मातीतून
मराठी वाऱ्यावर डोलणाऱ्या कणसांतून
मोठा दाणा-कणखर हाड
माणसामाणसांतून राष्ट्राची वाढ
कसलेला काचा अन् घोड्यांच्या टांचा
असा जो मराठी जागून उठेल
असा मराठा मेळवावा
स्वातंत्र्यधर्म जागवावा !
असा मराठा मेळवावा
जो ब्राह्मण नाही अन् अब्राह्मणहि नाही
पण तो मराठी शब्दाने पुलकित होतो
मराठी इतिहासातून स्फूर्ति घेतो
मराठी वैभवाची भविष्यस्वप्ने पाहात
मराठी घाम आणि मराठी रक्ताने
वर्तमानकाळाचा क्षणन् क्षण जगतो !

# २३३. अश्रू *

'कुजिते आणि गर्जिते' शिरीष

मुक्ताबाईच्या शब्दामध्ये
"ताटी उघडा" ऐकताना
माझे डोळे विरघळतात
अन् दोन अश्रू उभे ठाकतात
वाळीत पडलेल्या ज्ञानदेवाचे
समाजाच्या कढईत व्यक्तित्व वितळते
प्रल्हादाच्या काहिलीतून
परमात्म्याचे दर्शन होते
तरारलेले माझे अश्रू
ज्ञानेश्वरीने निवून जातात
ओथंबलेल्या अंतरानें
मराठमोळी ओवी गातात.
समाजाने लुबाडलेला, छळलेला तुकाराम
भोळे भाबडे त्याचें अंतर, ईश्वरभक्ती एक काम
समाजाच्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकण्यात तोहि दंग
एकतारी वाजत राह्यते देहूचे स्फुरतात अभंग
तुकोबाच्या जीवनाने पुन्हा अश्रू तरळून येतात
अभंगांच्या गुंजनातून त्यांच्या वाफा निवून जातात.
सावता माळी, गोरा कुंभार, नामदेव वाणी, चोखा महार
समाजाची सरस्वती बहरून येते अपरंपार.
भक्तीरसात नाहलेले अश्रू डोळे भरून वाहतात
मराठीच्या वात्सल्याने कंठाला गंहिवर आणतात.

मावळातील पत्थर पत्थर जिथें रक्तात भिजून गेला
तिथे माझे अश्रू झरतात श्रद्धांजली अर्पिण्याला.
स्वातंत्र्याची आग जेंव्हा अंतःकरणांत उसळून येते
अश्रूंची त्या वाफ होते, निर्धाराचे गीत उठते
सातवाहनांचा ठेवा माझे अश्रू टिपून घेतात.
विजयनगरचे वैभव पाहून आदराने गंहिवर होतात
रायगडाच्या कड्यावरून नव्या उर्मी उसळून येतात
विशाळ महाराष्ट्राच्या आरोळीने समर्थ जैसे सावध होतात
वीर बाजी, तानाजी अन् धनाजी अन् संताजी
तिलांजली वाहताना माझे अश्रू वचन देतात
वासुदेव बळवंतांच्या ओंजळीतील मातीचे इमान स्मरतात.
विनायक दामोदर विश्वासाने संकटाचे सागर तरतात.
स्वतंत्र आम्ही जन्मा आलो स्वातंत्र्यातच आमचा मोक्ष
बरोबर येतील त्यांना साथ स्वातंत्र्याचा आमचा पक्ष.
रेंगाळणारे खुशाल रेंगाळोत पायांत पाय बांधणार नाही
जड धोंडे गळ्यात बांधून पारतंत्र्यात बुडणार नाही.
भारताचा वारसा आहे 'सत्' जे असेल त्याच्यासाठी
माझे अश्रू झरले होते सिंध, पंजाब, बंगालसाठी
हिमालयाच्या उंचीने मी अमर्याद मोहित होतो
सह्याद्रीच्या शृंगशृंगी तीच उंची मोजित राहातो.
गंगामाईच्या पावित्र्याने माझे डोळे ओले होतात
महाराष्ट्राच्या सरिता सरिता गंगोत्रीतून उगम पावतात
स्वातंत्र्य जर धोक्यांत आलें, मन्रो तत्व मी समजतो
महाराष्ट्राचा महाराष्ट्रासाठी महाराष्ट्राकडून उदय पाहातो.

स्वातंत्र्याची पिंड तिथे कल्पांतापर्यंत पुजायची आहे
माझ्या पवित्र अश्रूंमधून अभिषेक तिला न्हायचा आहे
संतांच्या पावित्र्याचे वीरांच्या निर्धाराचे
माझे अश्रू ओसरायचे नाहीत; माझे अश्रू निवायचे नाहीत.

## २३४. जय महाराष्ट्र

'कुजिते आणि गर्जिते' · शिरीष

जय हे, जय हे
जय जय महाराष्ट्र वंदन हे
तूच आज पितृभू
तूच एक मातृभू
वैभवी तुझ्या प्रभू
प्राण-आहुतीहि घे,
वंदन हे ! १

रात्र वाट दाविते तुझी प्रकाशतारका
बंधनीं न राहणे निश्चिती मती न कां ?
विश्व गर्जु दे
आग वर्षु दे
मृत्यु नाचु दे
मुक्त-जीवनांत गात नांदतील मालिका
क्रांती-गीत, राष्ट्रगीत, जीवगीत हे
कोटि कोटि नतमस्तक वंदन घे. २

## २३५. महाराष्ट्रास अभिवादन

'काव्यकौमुदी' भास्कर नानाजी शिंदे (अरविंद)

हिंदधराकर-धृतारविंदा !
स्वातंत्र्याच्या रस-निस्यंदा !
भरत-भारती-भव्य निबंधा !
प्रणति तुज महाराष्ट्रजनपदा ! १

रघुनायकपदकंजलाञ्छिता !
परशुरामसहवासभूषिता !
पांडुभूपसुतहस्त लालिता !
नमन तुज महाराष्ट्रजनपदा ! २

रणविभश्रीहृदयस्पंदा !
वैराग्याच्या विजयानंदा !
नयनीतीच्या स्निग्ध मरंदा !
नमन तुज महाराष्ट्रजनपदा ! ३

चंदन-चंपक-गंध-वीजिता !
सह्य-विंध्य-मलयाद्रिवंदिता !
कृष्णा-तुंगा-तरंग-स्नाता !
प्रणती तुज महाराष्ट्रजनपदा ! ४

संत-सुजन-सुम-हार-मंडिता !
कविवर-चारण-वृंदा-संस्तुता !
कृपाण-कार्मुक-किरीटवंता !
प्रणती तुज महाराष्ट्रजनपदा ! ५

नवनिर्झरिणी-नृत्य-सस्मिता !
विहंगसंगीतानुरंजिता !
सस्यसंपदायुत धनवंता !
नमन तुज महाराष्ट्रजनपदा ! ६

वेदजीवना ! धर्मसंपदा !
श्रीमंता ! शिवविजयाम्भोदा !
'अरविंदा'च्या हृदयानंदा !
नमन तुज महाराष्ट्रजनपदा ! ७

## २३६. महाराष्ट्राची देणगी

'स्वप्नील कविता' २५-१२-१९८१ नंदकिशोर शुक्ल

या भूमीने सह्यगिरीचा ढालीसारखा कडा दिला
शिवरायाने भारतभूला स्वातंत्र्याचा मंत्र दिला
एकनाथ, नामदेव, तुकया, ज्ञानेशासम संत दिले
देशासाठी तुरुंगवासी सावरकर हटयोगी दिले
महाराष्ट्राने टिळक मुखातून स्वराज्याची ऋचा दिली
वारकऱ्यांच्या टाळमृदुंगी उदंडतेने भक्ति दिली
गरिबांसाठी या भूमीने अन्न दिले अन् वस्त्र दिले
जे जे होते देण्यासम ते अनंत हस्ते दान दिले
या सर्वाहूनि उदात्त, सुंदर वाणीचा उद्‌घोष दिला
महाराष्ट्राने भारतीयांना देशाचा अभिमान दिला

## २३७. माय मराठी, नांव मराठी

'महाराष्ट्र गौरवगीते' शांता ज. शेळके

माय मराठी, नांव मराठी, मराठमोळा प्राण
महाराष्ट्रभूमींत जन्मलों हा माझा अभिमान !
लाल्हारस वाहतां जन्मला कातळकाळा देह
तिथें जन्मलों, तिथें वाढलों, तें माझें प्रिय गेह
भीमा गोदा कृष्णेमधुनी प्यालों मी इतिहास
स्वातंत्र्याच्या वाऱ्यानें मी भरून घेतले श्वास
प्राजक्तांच्या फुलाफुलांतुन हसली कोमल प्रीत
रुक्ष मनाला मृदुता शिकवी शाहीरांचें गीत
हिरवळलेलें म्हणून येथें दिसती हे पाषाण
महाराष्ट्रभूमींत जन्मलों हा माझा अभिमान ! १

प्रपंच तरुनी जाया ध्यावें परमेशाचें नांव
नामयास नामामृत लाभे भोळा त्याचा भाव
एक पताका भगवी देई समतेचा आदेश
महार चोख्यासवें नाचले एकनाथ ज्ञानेश
'मउ मेणाहुन परंतु आम्ही वज्राहून कठोर !'
अभंगवाणी तुकयाची दे शिकवण ऐशी थोर
ज्ञानोत्तर भक्तीचें आम्हां श्रेष्ठ मिळे वरदान
महाराष्ट्रभूमींत जन्मलों हा माझा अभिमान ! २

'अमृतासही जिंकिन पैजा' सहज लाविल होड
संस्कृत विद्वत्तेला दिधली भाविक भोळी जोड
माझ्या ज्ञानेशाची ओवी केवळ अमृतधार
माय माउलीवरी चढविलें 'लेणें देशीकार'!
'उद्धरीन स्त्रीवैश्यशूद्र मी' अशी तयाची भाक
जनामनांतुन ब्रह्मसुखाचे मळे पिकविले लाख
त्या ओवीचें हृदयीं माझ्या अजुन गुंजतें गान
महाराष्ट्रभूमींत जन्मलों हा माझा अभिमान! ३

श्रीशिवबांनी साद घालुनी जागविले पाषाण
शेतकरी मावळे भाबडे पणा लाविती प्राण
स्वातंत्र्याचा दऱ्यादऱ्यांतुन घुमतां दिव्य पुकार
विळ्याकोयत्यांवर लखलखली तलवारीची धार
त्या नांवाची त्या बाण्याची सतत राखणें लाज
लाचारीचें जीवन जगणें कसें रुचावें आज?
नसांत अजुनी मंत्र तोच तो, ऐका लावुन कान
महाराष्ट्रभूमींत जन्मलों हा माझा अभिमान! ४

असमानी सुलतानी होतां स्तिमित जाहला देश
चाल बदलली, रीत बदलली, आणि बदलला वेष
ये परक्यांची सत्ता त्यांचे कुणीं पूजिले पाय
तरी मराठी मन हें नाहीं झालें कधीं असहाय
फुले, रानडे, टिळक, गोखले, आगरकर नरवीर
कणखर बाणा दावुनि दिधला संकटांतही धीर
तोच वारसा पुढें चालवूं अम्हां तयाची आण
महाराष्ट्रभूमींत जन्मलों हा माझा अभिमान! ५

महाराष्ट्रभू माझी मी तर तिचा लाडका बाळ
तिच्या दुधावर झाला माझ्या प्राणांचा प्रतिपाळ
अथांग ममता तिच्या अंतरीं, संजीवन स्पर्शांत
कणखर श्यामल तिचें रूपडें नित्य वसे नयनांत
मीठभाकरीसवे भरविला तिनें अम्हां अभिमान्
तिच्या अमृतमय बोलांमधुनी स्रवतें काव्य महान्
ओवाळावे तिच्यावरुनी नित हे पंचप्राण
महाराष्ट्रभूमींत जन्मलों हा माझा अभिमान ! ६

## २३८. शूर अम्ही सरदार

**चित्रपट–'मराठा तितुका मेळवावा'**

शूर अम्ही सरदार अम्हाला काय कुणाची भीति ।
देव, देश अन् धर्मापायीं प्रान घेतलं हातीं ॥ धृ० ॥

आईच्या गर्भात उमगली झुंझाराची रीत
तलवारीशी लगीन लागलं जडली येडी प्रीत
लाख संकटं झेलून घेईल अशी पहाडी छाती
देव, देश अन् धर्मापायीं प्रान घेतलं हातीं—१

जिंकावं वा कटून मरावं हेंच अम्हाला ठावं
लढुन मरावं मरुन जगावं हेंच अम्हाला ठावं
देशापायी इसरूं सारी माया-ममता-नातीं
देव, देश अन् धर्मापायीं प्रान घेतलं हातीं—२

## २३९. ग्वाही

'सांज मराठा' २-११-१९६५ सौ. विजया शेवडे

भारतमाते ! तुला आमुची त्रिवार ही ग्वाही
महाराष्ट्राचि निधडी छाती भंगणार नाही
सह्याद्रीची कणखर कंबर वाकणार नाही
कधिही वाकणार नाही ॥ धृ० ॥

फोल करू अम्ही शत्रू वल्गना येण्यापूर्विच पूर्ण कल्पना
तोंड लपवूनि पळता त्याना होइल थोडि भूई
महाराष्ट्राचि निधडी छाती भंगणार नाही ॥ १ ॥

वंशज आम्ही शिवरायाचे समर्थ वचने ब्रीद आमुचे
माय भवानी स्वकरे शस्त्र, शक्ति देई
सह्याद्रीची कणखर कंबर वाकणार नाही ॥ २ ॥

'यशवंती' वा 'यशवंतांची' परंपरा ही असे आमुची
शीरच नसता शत्रूसंगे धडहि झुंज घेई
महाराष्ट्राचि निधडी छाती भंगणार नाही ॥ ३ ॥

कधिच लोपल्या अबला येथुन दुर्गा, चंडी (भद्रा, काली) घराघरांतुन
जिवंत तोफा आग ओकतिल दिशांतून दाही
सह्याद्रीची कणखर कंबर वाकणार नाही ॥ ४ ॥

अधिक सांगणे नलगे आता रक्षू आपुली भारतमाता
ध्येय एक हे अंतरी वसो दुजे नको काही
महाराष्ट्राची निधडी छाती भंगणार नाही
कधिही भंगणार नाही ॥ ५ ॥

# २४०. महाराष्ट्र जयगान

मयूरपंख' १९६४ श्रीरंग समळोळीकर

आज गर्जुया महाराष्ट्राचा त्रिवार जयजयकार
युगायुगाच्या स्वप्ना आमुच्या येई आकार
मंगलतेची महान आमुची मधु प्राकृत वाणी
अमृत जिंकी ज्ञानेशाची ती अमृत वाणी
सहिष्णुतेचा मार्ग दाविती आम्हाला संत
नामा, तुकया, चोखामेळा, धन्य एकनाथ
विक्रम आणि वैराग्याची शिकवण ती अमर
आज गर्जुया महाराष्ट्राचा त्रिवार जयजयकार—१

माय भवानी, देवी शिवाई अम्हां पूजनीय
धूळ अम्हाला सह्याद्रिची परम वंदनीय
गोदा-कृष्णा-भीमा आम्हा तीर्थ पाजतात
कितीक वीराग्रणी जन्मले मावळ-खोऱ्यांत
पावन केलें श्रीतुकयाने इंद्रायणि तीर
आज गर्जुया महाराष्ट्राचा त्रिवार जयजयकार— २

पावनखिंडित लढला बाजी पुतळा शौर्याचा
कोंडाण्यावर पडला ताना सूर्य मावळ्यांचा
सह्याद्रिच्या कडेकपारी गर्जतात अजुनी
अतुल तयांच्या पराक्रमाची रोमांचक गाणी
बिजली बनुनि चमकत होती शिवबाची तल्वार
आज गर्जुया महाराष्ट्राचा त्रिवार जयजयकार—३

मराठवाडा, विदर्भ सारा, कोंकणचा प्रांत
सह्य, विंध्य हे इथे आडवे पडले अन् पर्वत
प्रतापगड हा, तो कोंडाणा, शिवनेरी किल्ला
मावळ-खोऱ्यामधुनी झाला यवनावर हल्ला
इथेंच लढले, इथेंच पडले कोटि वीर झुंझार
आज गर्जुया महाराष्ट्राचा त्रिवार जयजयकार—४

टिळक, महात्मा फुले निपजले या महाराष्ट्रांत
शिंदे, आगरकर पाजळती ज्ञानदान-ज्योत
भीम उद्धरी दलितजनांना झिजवूनी देहाला
स्त्री-उद्धारक कर्वे अण्णा आले उदयाला
महाराष्ट्राच्या कंठीं झळकति किती अलंकार
आज गर्जुया महाराष्ट्राचा त्रिवार जयजयकार—५

उपेक्षितांना कुशीत घेती शाहू राजर्षि
शिक्षणकार्यासाठी झाले असंख्य 'दरवेशी'
पूज्य विनोबा, साने गुरुजी, कर्मवीर अण्णा
ध्येयासाठीं जाळिति आपुल्या देहाच्या चंदना
विनम्र होउन करूं तयांना लाख नमस्कार
आज गर्जुया महाराष्ट्राचा त्रिवार जयजयकार—६

महाराष्ट्रास्तव ज्या वीरांनी अर्पियले प्राण
अती आदरें गाऊं त्यांच्या शौर्याचें गान
महाप्रतापी शिवरायाच्या स्मृतिस करूं वंदना
प्रार्थू आणि मराठीतल्या थोर शाहीरांना
ध्वजा उभारूं महाराष्ट्राची असीम क्षितिजावर
आज गर्जुया महाराष्ट्राचा त्रिवार जयजयकार—७

# २४१. महाराष्ट्र हें माझें मंदिर

'महाराष्ट्र गौरव गीते' श्रीरंग समडोळीकर

माझें मंदिर, माझें मंदिर ।
महाराष्ट्र हें माझें मंदिर ॥ धृ० ॥
संतजनांनी पाया रचिला
श्रीशिवबांनी भार वाहिला
वीरवरांनी रक्त सांडुनी उभारिलें हें शांतीचें घर—१
गोदा कृष्णा सरिता इथल्या
तीर्थ कलश घेऊन ठाकल्या
मराठमोळे शिलेदार शत उभे राहिले दरवाजावर—२
स्वर्ग-सुधेहुन मधुरमधुरतर
मराठबोली अमुची मनहर
इथें जन्मले भूप शिवाजी टिळक वंद्य जे आज वीरवर—३
त्या तुकयाची अभंग गाथा
सहिष्णुता या शिकवी जगता
स्वयंप्रकाशी ध्रुवताऱ्यापरी चमके ज्ञानाचा तो ईश्वर—४
अजुनी इथल्या पाषाणांतुनी
गत शौर्याची घुमतीं गाणीं
अमुच्या आकांक्षांचा फडके ध्वज डौलाने सह्यगिरीवर—५
वैराग्याची अमुची शिकवण
नव्या जगाला देइल जीवन
इथल्या मातीमधुनी फुटती नवे नवे स्फूर्तीचे अंकुर—६

# २४२. मराठा

'गीतगुंजन' भाग १ ला १९३३ —सरोज सुहृद

स्वातंत्र्यदेविचा दास आठवा मराठा वीर
आठवा मराठी शौर्य निरखुनी मूर्ति गंभीर
आठवा मराठा मर्द फेकुनी दृष्टी चौफेर
आनंदवनींचा मोठा जातिवंत शूर मराठा
शौर्याचा केवळ साठा
आठवा तोच रणधीर—आठवा मराठा वीर

आठवा मराठा भाई जो शिदोरि बांधुनि घेई
अशनाला अवसर नाहे पर्वाहि तयाची नाही
गिरि दुर्गम पथ चढताना भरभरा भरारी घेई
त्या क्षुधा कशाची होती अंगार पेटला चित्तीं
स्वातंत्र्यप्राप्तिची खंती
आठवा तोच नरवीर—आठवा मराठा वीर

आठवा मराठा भीम जो होता योद्धा खंदा
जो अचाट सामर्थ्याचा देशाचा होता बंदा
प्रत्यक्ष काळविक्राळ अवतरे रणीं त्या वंदा
विक्रमें घुमवुनी देश प्रतिध्वनी कथीं आदेश
तो भजा पुजा परमेश
स्थापुनी हृदयिं शिववीर—आठवा मराठा वीर

आठवा मराठा सिंह जो करी गर्जना घोर
'हरहर' या विक्रम नादें गिरिदऱ्यांतुनी तो थोर
पडसाद उठवि चैतन्या चेतवी मराठा जोर
तो मत्त रिपु तुडवाया गजगंडस्थल फोडाया
आकंठ रुधिर प्राशाया
काननीं भ्रमे हरि फार—आठवा मराठा वीर

आठवा मराठी बाणा 'मेळवा मराठा तितुका'
'वाढवा मराठी धर्म' हा बोल वदा कां लटका
स्फूर्तीचा मंत्र सदा हा यवनाला देई फटका
वित्ताची पडली चिंता तख्ताची पडली चिंता
प्राणाची पडली चिंता
चिंतेस मूळ तो शूर—आठवा मराठा वीर

आठवा मराठा मर्द जो भी न रणीं मरणाला
प्रत्यक्ष यमाचा दूत टाकतां पाश कंठाला
हा वीर धीर समरांत कवटाळी धन्य तयाला
बांधुनी चंग हा रंगे झुंजण्या कृतांतासंगें
तें ध्येय कधीं ना भंगे
जो वंद्य जगीं नरवीर—आठवा मराठा वीर

## २४३. महाराष्ट्राची परंपरा

**'महाराष्ट्र गाथा'** **अण्णाभाऊ साठे**

महाराष्ट्र मायभू आमुची । मराठी भाषिकांची ।
संतमहंतांची । ज्ञानवंतांना जन्म देणार । नवरत्नांचें दिव्य भांडार ।
समरधिर घेति जिथें अवतार ।। जी जी ।।

शौर्याची अजरामर महती । आजही नांदती । सह्याचलावरती ।
मावळा दख्खनचा रहाणार । स्वाभिमानार्थ जिणें जगणार ।
मराठा मानी आणि दिलदार ।। जी जी ।।

सह्याद्रि पसरला जिथें शेषासम गिरी ।।
दौलत घेऊनि सत्तावीस गड शिरी ।।
मेसुर कड्यावर बुरुज पहारेकरी ।।
ताड, माड, सागाचीं झाडें त्यांच्या शेजारी ।।
कळकिचें बेट आकाशांत झुकांड्या मारी ।।
करवंदी, बाभळ आणि बोरी ।।
चिल्लार कठीण कांटेरी ।।
खालीं सुपीक शेती जमिन काळजापरी ।।
महाराष्ट्राची ती शेतसरी । सुवर्ण आणी भूवरी ।।
कापूस, ऊस, गुळभेंडि, तूर, तीळ, हर्बरी ।।
काराळा फुलें गोजिरी । उधळून महाराष्ट्रावरी ।।
राळ्याचें लोंब पुढें लवून मुजरा करी ।।
महाराष्ट्राच्या अंगणांत । सरिता या खेळ खेळत ।।
पंचगंगा शीतल शांत । महाराष्ट्रा शांतवीत ।।
कोयना, कृष्णा चालत । घालून हातांमधें हात ।।
जाऊनी पुढें धांवत । आंध्रलाहि कुरवाळीत ।।
वारणा वाहे वेगांत । वायुला लाजवीत ।।
पैठण परभणींत । गोदाचें रमलें चित्त ।।

ही अवनी आदिवाशांची । कोळी भिल्लांची । मांग रामोशांची ।
कैक जातींची । प्राणाहुनि प्यार । परंपरा ज्यांची असे अपार ।
पुढें शाहीर तीच गाणार ।। जी जी ।।

—चौक पहिला

# २४४. उठला मराठी देश

'महाराष्ट्राला मुजरा' अण्णाभाऊ साठे

उठला मराठी देश परतुनी झाला घनगंभिर
महाराष्ट्र राखण्या घालुनी घोड्यावर खोगिर ॥ धृ० ॥

कडेकपारी दऱ्यान् दरडी डोंगर नदिनाले
पदस्पर्शानें शिवरायाच्या जे पावन झाले
घोडदौड पाहून मावळी बळ ज्यांना आलें
सहनशक्ति संपली निघाले पुन्हा आघाडीवर ॥ १ ॥

गीत मराठी गाउं लागले वीर रसाच्या गाना
गिरिकंदरिच्या किर्र झाडिनें उंचावियल्या माना
त्वेषानें खाली संतप्त जाहल्या कृष्णा अन् कोयना
आकाश खालीं ओढूं लागला, सह्याद्रीचा कर ॥ २ ॥

पराजयाचें पिक ना येथें गुण हा ज्या मातीचा
देशासाठीं लढणें मरणें बाणा ज्या जातीचा
उठे मराठा तो घाटावर कोट करून छातीचा
रायगडासम कणखर होउन परतुनि कंकण भर ॥ ३ ॥

पाय रोवुनी उभा मुंबईच्या रस्त्यावरती
धगधगत्या कुंडात झोंकुनी निज प्राणाहुती
महाराष्ट्रास्तव मरून जाहले अजरामर कीर्ती
भव्य बांधुनी बलिदानाचें मंदिर या भूवर ॥ ४ ॥

## २४५. महाराष्ट्रभूमि बहुगुणी*

'महाराष्ट्रभूमि बहुगुणी' १९-२-१९५६ सौ. भानुमती सावळे

महाराष्ट्रमाऊली धन्य ही आजवरी जेथें
संतमंडळी मानवतेची गाती नवगीते

ज्ञानेशाचा शब्द ज्ञानमय अभंग तुकयाचा
परंपरा ही भार तियेवर असे समाजाचा

तुकते गेले संत आमुचे ते साने गुरुजी
आज दाविती नव्या युगाला मार्ग विनोबाजी

सुशोभीत करि पुणें, हिंगणें पुण्याई आमुची
पुण्यश्लोक कर्व्यांनी केली प्रगती महिलांची

नामावळिमधि या संतांच्या मानाचें स्थान
भाऊराव पाटील बहुजनां देती नव प्राण

जी संजीवनि बहुजनांप्रति संतांनी दिधली
लाख दलित जीवनें उभवुनी मार्गी आणविली

आणि पाहुनी असलें कांही आशा मनिं दाटे
दिव्य आमुचा भूतभविष्यहि रम्य असे वाटे.

# २४६. महाराष्ट्रभूमि बहुगुणी*

' महाराष्ट्रभूमि बहुगुणी '  सौ. भानुमती सावळे

महाराष्ट्र पुरुष दिलदार
आहे भोळा सांब अवतार
गोडींत असेल तोंवर
करिल दान तुम्हाला सारं
नाचूं म्हणाल छातिच्यावर
तर वावगं नाही खपणार
तीन् तीनदां बजाविल पुरं
जर नाही कुणी ऐकणार
तर काढील कपटाचा निर (न्)
मागमूस नाही ठेवणार
असा स्वभाव आहे त्याचा खरोखर
समजून घ्याल तर बरं
मग बघाल आपला विचार
शांतिचा मार्ग अनिवार
नीतिला नाही ढळणार
अर्ध्यातुन कधि न पळणार
असा निश्चय त्याचा थोर
आम्ही आहोंत त्याचे शाहीर
अनुभवलं तेंच बोलणार
तुमचं तुम्ही बघुन घ्या सारं जातो आम्ही दूर ॥ जी ॥

## २४७. महाराष्ट्रास

'पत्री' १९३५ **साने गुरुजी**

महाराष्ट्रा ! ऊठ दंष्ट्रा शत्रुमर्मी रोवुनी
सिंहसा तूं साज शौर्यें ठाक तेजें खवळुनी ॥ १ ॥

दिव्य गाणीं विक्रमाचीं दुर्ग तूझे गाउनी
अंबरस्थां निर्जरांना हर्षवीती निशिदिनीं ॥ २ ॥

दरीखोरीं खोल, गेली वीर-रक्तें रंगुनी
शेष तीं संतोषवीती त्वद्यशाला गाउनी ॥ ३ ॥

अंबुराशी करित सेवा त्वत्पदा प्रक्षाळुनी
त्वत्कथेला दशदिशांना ऐकवीतो गर्जुनी ॥ ४ ॥

म्लानता ही दीनता ही स्वत्त्व-दाही दवडुनी
स्वप्रतापें तळप तरणी अखिल धरणी दिपवुनी ॥ ५ ॥

## २४८. माझा महाराष्ट्र भाग्यें सजो !

'पत्री' **—साने गुरुजी**

माझ्या महाराष्ट्र भूमींत मोठे
प्रतापी पुन्हां वीर निर्मी विभो
शास्त्रज्ञ, यंत्रज्ञ, वागीश, शिल्पी,
कलाविद् खरे थोर निर्मी प्रभो ॥
धी, नीति, संपत्ति, सद्बुद्धि सहकार्य,
आरोग्य, ऐक्यादि येथें रुजो
धावो यशोगंध देवा ! दिगंतांत
माझा महाराष्ट्र भाग्यें सजो ॥

# २४९. महाराष्ट्र माझा

'अग्रणी' — माधव साखरदांडे

जिथे स्पर्शता ज्ञानियाची प्रतिज्ञा
चढे वेल मातीतुनी अमृताचा
जिच्या कोंवळीकेतहि प्रौढ घाले
जिथे नाहली अंतरंगांत वाचा
तो ज्ञानियांचा अहो ! ज्ञानराजा
महाराष्ट्र माझा ! महाराष्ट्र माझा !! १

जिथे वाहते संथ इंद्रायणी जी
हळू स्पंदते हो तुक्याचीच गाथा
जिथे रंगली आर्तता नामयाची
भुते सर्व हो सोयरी एकनाथा
जिथे पंढरी बांधतो भक्त पूजा
महाराष्ट्र माझा ! महाराष्ट्र माझा !! २

तुरे मस्तकी होऊनीया गडांचे
उभा आगळा सह्य हा ताठमानी
इथे नांदले मुक्त स्वातंत्र्य अवघें
शिलेदार त्याचे मराठे इमानी
शिवाजी जिथे जन्म स्वातंत्र्य काजा
महाराष्ट्र माझा ! महाराष्ट्र माझा !! ३

अन्याय कोठे इथे चीड आम्हा
इथे गर्जला 'केसरी' स्वाभिमानी
इथेहि विरागी प्रयोगी विनोबा
इथे ज्ञानकर्मे अनासक्त दोन्ही
घुमे मंत्र येथे 'जगा जागवा जा'
महाराष्ट्र माझा !! महाराष्ट्र माझा !! ४

## २५०. धरती महाराष्ट्राची

'ऐसा गा मी ब्रह्म' १९६२ नारायण सुर्वे

धरती महाराष्ट्राची आणिक अंबर महाराष्ट्राचें
निळाईच्या दर्पणांत झळके बिंब रविचंद्राचें.

राजलशाम ही उभी द्वारका
गगनींच्या लेऊन तारका
शिखरीं तळपे शिवपताका
पायी आरती करतो चोखा
छत्रचामरें ढाळून वारा गुंजन करुनी नाचे.

इथे वाजवी मेघ चौघडे
तालावर दौडतात घोडे
तलवारीच्या पात्यांमधुनी
पराक्रमाची वीज कडाडे
माती घुमते शौर्यामोंवतीं गात ऋचा अन् वेंचे.

तंतावर होनाची लावणी
मथुरेशी चालल्या गौळणी
हलगीवरची थाप ऐकता
रित्या होती वैखरीच्या खाणी
नवरसरंगी दंग होऊनी इथे विठोबा नाचे.

हरित तृण अन् निळे सलिल
इंद्रधनुसम सागरीं फेनील
हिरव्या पिवळ्या डोंगरी माथा
खेटून झुलतें आकाशफूल
किरणांचे नित भुंगे चुंबिती ओठ मृदुल कळ्यांचें.

वेद ओतितो ज्ञान घागरी
कर्मयोग वाजवी तुंबरी
सत्य शिव श्रम सौंदर्याचा
चंद्र झळकतो नील अंबरी
घामाचें संगीत छेडिते तारा हृदय वीणेचे.

नवी संहिता रचते गिरणी
फेर धरूनिया डोले धरणी
श्रमणाऱ्या भुजेंत गुंफते
हात आपुले बीजमोरणी
महारथ दौडतो दिगंती उडवित ध्वज यशाचे.

## २५१. अग्नी प्यावा

'प्रियंवदा' १९६३

संजीव (कृ. गं दिक्षित)

इथल्या मातिंत बलिदानाचें ब्रीद अमर पिकतें
युगायुगांच्या युगपुरुषांची मान इथें झुकते

सह्यगिरीच्या दरींगिरीतील पुण्यशीळ या शिळा
पोलादाच्या सामर्थ्याची ज्वलंत जीवकळा

फडकवितो रे इथला वारा झेंडा बंडाचा
स्फूर्तीचाही उगम हाच या भारत खंडाचा

फुलांस इथल्या वास सदोदित सद्गुण गंधाचा
भीमथडीवर मृदंग घुमतो ऋणानुबंधांचा

नद्या वाहती सहिष्णुतेनें जिव्हा जिव्हाळ्यानें
तरून जाती महापुरांतही लव्हा लव्हाळ्यानें

सागर इथला खारट पण तें इमान देशाचें
तिखटपणाच्या तल्वारीचें शिवार द:खनचें

इथली ज्वारी इथला हुर्डा खुराक मर्दांचा
बारा मावळ जगला त्यावर पाइक देशाचा

सद्धर्माचे सिंहासन अन् छत्र राजदंड
लंगोटी लावून घडविती इथें असा पिंड

कोटि सूर्यही दिपून जातिल बघुन अस्मितेला
गीता ज्ञानेश्वरी नमविते प्रज्ञावंताला

एका हातीं कुबडी झोळी समर्थ जगिं ठरले
कंगालाचे अभंग ते तर पाण्यावर तरले

त्याग आणि वितराग व्रतानें व्रतस्थ ही भूमी
भोगलालसा नसे कुणाला कर्मयोगि आम्ही

'शहा' न झाला कुणी रंगिला विलास नच ठावा
इथें घ्यायचा जन्म तयानें फक्त अग्नी प्यावा.

# २५२. महाराष्ट्र

'प्रियंवदा' २४-११-१९५९ —संजीव

वज्राचें हें मनगट माझें, छाती पोलादाची
सह्यगिरीच्या सुळयासुळयांवर कीर्ती मर्दुमकीची.
उशास धोंडा, खाया कोंडा, हृदयें सुम-कमळाची
मेण मनांतुन कधीं भडकतें, ज्वाला ती अग्नीची.

अभंगवाणी अमर तुक्याची, ओवी ज्ञानेशाची
अजुन डफावर रंगत आहे लज्जत शृंगाराची.
जरिपटक्यासह भगवा झेंडा युती भोग त्यागाची
प्राणप्रतिष्ठा इथें पुरातन मानवधर्माची.

देशाखातर तुरुंग फांशी लेणीं नवसाचीं
बाळपणातच दिलीं आइनें, आई शूरांची.
रमणी इथल्या वाघ सिंहिणी जात मराठ्यांची
रक्ताचा तो मळवट भाळीं, शोभा सौभाग्याची.

छातीचा नवकोट उभारून, राज्य आम्ही केलें
सम्राटाचें राजचिन्ह या मातींत मळलेलें.
राष्ट्रासाठीं इथें लाखदां, इर्षा बलिदानाची
अजुन वाळली नाहिंत पानें ताज्या इतिहासाची.

बोल मऱ्हाठी भाव मऱ्हाठी, धार अमृताची
भारत गौरव माय मऱ्हाठी, दुर्गा देशाची.
नकाच डिवचूं कुणी अस्मिता मराठमोळ्याची
या भूमीवर परवड नाहीं स्पुटनिक गोळ्यांची.

# २५३. पंचारती

'रंगबावरी' १९६४ इंदिरा संत

मराठीच्या महाराष्ट्रा
आज आगत स्वागत
सह्याद्रीच्या कड्यावरी
वाजे वाऱ्याची नौबत! १

काळ-कवाड फोडून
आल्या आल्या साऱ्याजणी
महाराष्ट्राच्या स्वागता
आज मानाच्या धनिणी! २

शकुनाचा हातीं दीप
महदंबा आधी येई;
रचे दीपांची आरास
धवळिल्या दिशा दाही! ३

नामयाच्या जनाईने
केलें सडासंमार्जन;
हात अबीर-मंजिरी
गंधें भारिलें गगन! ४

केली जळक्या काडीची
लक्ष्मीबाईने लेखण
चित्रें रेखिलीं स्वागता
रंग प्राणाचे भरून! ५

बाई सुंदराबाईची
कंठसनई सुस्वर
मंगलाला आळवितां
झाली वाळयाचें अत्तर! ६

अहिराणी बहिणाबाई
आणी तव्याची भाकर
ओवाळून टाकायाला
उभी राहिली तत्पर! ७

देवी अहिल्येच्या हातीं
पुण्यतीर्थाचा कलश
नेत्र कराया पवित्र
उभी राहिली सहर्ष! ८

तळपत्या पात्यावरी
थेंब रक्ताचा धरून
उभी तिलक लावाया
लक्ष्मी अधीर होऊन! ९

ओवाळाया महाराष्ट्रा
आज जिजाईच्या हातीं
कोटि सूर्याच्या तेजाने
उचंबळे पंचारती! १०

## २५४. शूर अम्ही पाइक

'कौमुदी' १४-१-१९४० 'सुधांशु' (ह. न. जोशी)

दख्खनचं अम्हि थोर मराठं न्हाइ कसं ठाऊक
शिवाचं शूर अम्ही पाइक.
कांदाभाकर हेंच आमुचं नित्याचं भोजन
ग्वाड त्ये लइ पकान्नाहुन
दऱ्याखोऱ्यांमंदि ऱ्हातुया दरक न अम्हा जरा
सावजं कापत्यात थरथरा
हुरड्यावर अमुची सकाळची न्याहरी
काळाशी जीवाभावाची मैतरी
सोटा अन् गोफण शस्त्रं अमुची बरी
गुपीत वाटा चोरभुयारं सम्दं अम्हां ठाउक
शिवाचं शूर अम्ही पाइक. १

देश आमुचा देव अम्हांला त्येच्यापदिं वाहिला
जीव जो सम्द्यापरिसा भला
घेउनि हातीं, शीर रणामदिं देशापायीं शिरुं
शत्रूला त्येच्या मारूं, मरूं
दुष्मानाच्या ध्वजा हिरावून मातिमदीं लोळवूं
पताका देशाची फडकवूं
देशाविन न्हाई ध्यान बी ठावं अम्हां
त्याबिगार अक्शी नांव न ठावं अम्हां
शिवबाचं सम्दं हुकूम प्यारं अम्हां
देशद्रोह, बेइमानपन ह्यें अम्हां मराठ्यां इख.
शिवाचं शूर अम्ही पाइक. २

## २५५. अहा ! तें लोपलें सारें

'दिव्यभाव' १९४०　　　हृदयनिवासी (केशव हरी सरडे)

महाराष्ट्रीं स्वराज्याचें । सदा संचारलें वारें ।
फिरे कृष्णेसवें वेगें । जयाला विश्व करि मुजरे ॥ १ ॥

उठे गर्जून सह्याद्री । क्षणीं लागून चाहूल ।
दुजा तो नाचतो मोत्या । जयानें भारता भूल ॥ २ ॥

दऱ्यांखोऱ्यांतले झाले । दगड ते देव बजरंग ।
अडाणी मावळे गाजी । जयाचें तळपतां खड्ग ॥ ३ ॥

स्वदेशीं फडकले झेंडे । महंताच्या विरागाचे ।
स्फुरें चैतन्य तें भगवें । जयाच्या अंतरंगीचें ॥ ४ ॥

समर्थांच्या सुमंत्राची । विराजे वैखरी वदनीं ।
उठे कल्लोळ दिक्प्रांतीं । जयाच्या जादुगारींनीं ॥ ५ ॥

'हर महादेव हर' घोषें । थरारे चित्त शत्रूंचें ।
जयानें बोलतां वाचे । उचलुनी हात आवेशें ॥ ६ ॥

*　　*　　*

कुठें कल्याण शिवराजे ! । स्वराज्याचें कुठें वारें ? ।
कुठें ती धन्य शिवशाही ? । अहा ! तें लोपलें सारें ॥ ७ ॥

## २५६. महाराष्ट्रास !

'पराग' १९४१ —नारायण नागोराव हूड

तूझें 'महाराष्ट्र' हें नाम गर्जे दिगंतीं गमे तू कुणी केसरी
सारी पदाक्रांत केलीस भूमी, तुझ्या वैभवाला दिसे ना सरी
सामंत, भूमीपती, चक्रवर्ती सभोंतालचे सर्व राजेश्वर
रे! लीनतेनें पुढें वांकुनीया, उभे ठाकती जोडुनियां कर. १

साम्राट गिरीकाननांचा असें नाम तूझ्या कृतीनें पुरा लाभलें
तें दृश्य डोळां दिसें द्यावयालाच ताजीम तूतें पशू चालले
हें आठवी; घोर तूझ्या रवानें गिरीगव्हरें सर्व नादावलीं
घेवोनियां जीव शत्रू पळाले तुला पाहतां मागल्या पाउलीं २

तूझ्याच आतां परी दुष्कृतीनें अशी पातलीना दशा संप्रती?
हा! हीन जंबूकही क्षुद्र तूतें महाभाग! निःशंक वेडावती!!
जीवन्मृतासारखा तूं जहालास, निष्क्रीयता मानसा येउनी
गालांत हासुनि चेष्टा करीती तुझ्या या स्थितीला कुणी पाहुनी ३

सह्याचलाचे न, धैर्याचलाचेच उत्तुंग आकाशभेदी कडे
देती न हे काय तेजस्वितेचे तुला नेहमी पूर्वजांच्या धडे?
कृष्णादिकां या नद्यांचें न तूं काय प्राशीयलें सांग स्फूर्तीजल?
जैसा तुझा भूत, तैसाच भावीहि व्हावा न कां काळ रम्योज्ज्वल? ४

आतां वनश्री दणाणून सोडी रवानें तुझीया क्षणाभीतरीं
ऐशी जया ऐकुनी श्वान जंबुक सारे दडावेत कोठेंतरी
काढोनियां टाक तूझ्याविशीं जो वसे त्यांचिया मानसीं संभ्रम
पंजे पुढारून आतां तयालागिं दावी जरासा तुझा विक्रम!!! ५

## २५७. ही महाराष्ट्राची रूढी !

' महाराष्ट्र गौरव गीत संग्रह '–१९८६ गंगाधर अंबेकर

भक्ती अथवा शक्तीसाठी ज्यांची सदैव आघाडी
ही महाराष्ट्राची रूढी, ही महाराष्ट्राची रूढी ॥

नेकजात इथला मराठा
सह्याद्रीसम त्याचा ताठा
दऱ्याखोरी अवघड वाटा
शत्रूला चारतो खडी ॥ १ ॥

स्वराज्य मिळवी वीर शिवाजी
कोंडाण्यावर हो शहीद तानाजी
पावन खिंडित पावन बाजी
धन्य धन्य 'धना-संता' जोडी ॥ २ ॥

चोखा, तुका आणि संत ज्ञानेश्वर
जना, मुक्ता, बहिणा किती थोर
पुंडलिकाच्या भक्तीला इतका जोर
करि उभा विठ्ठला भीमेच्या थडी ॥ ३ ॥

भीमा, गोदा आणि कृष्णा
महाराष्ट्राची पुरविति तृष्णा
देती वात्सल्य इथल्या पुत्रा
जलाचि त्या अमृताहून न्यारिच् गोडी ॥ ४ ॥

गाई आनंदे मोटेवर शेतकरी
घुमती गाणी घरोघरी जात्यावरी
शाहीरांची भक्कम थाप डफावरी
पडे, येता आनंदाची घडी ॥ ५ ॥

# २५८. जय जय देश महान्

'महाराष्ट्र गौरव गीत संग्रह'-१९८६ —वा. रा. कांत

जय गोदे, जय भीमरथी जय सह्य शैल-पाषाण
जय श्रमिकांनो, जय कृषिकांनो जय जय देश महान् ॥ धृ०॥

दंडकवन श्रीरामपदाने महाराष्ट्र झाले
अश्रुतुनि बाणातुनि त्याच्या तेज नवीन उदेले
द्वारावतिचे स्वप्न भीमकी दे गवळ्यास महान्
जय गोदे, जय भीमरथी जय सह्य शैल-पाषाण ॥ १ ॥

सूर्यरथा रोखिले ऐकिले कधी सह्य शिखरांनी
कालचक्र बदलले पाहतां आज इथे डोळयांनी
पात्यांमधुनी चात्यांमधुनी तळपे नव आव्हान
जय गोदे, जय भीमरथी जय सह्य शैल-पाषाण ॥ २ ॥

ब्रह्मानंद रसानें भिजली मराठमोळा वाणी
आज विजेच्या शब्दांनी ती लिही उद्याची गाणी
हिरवी गीता पार्था सांगे पानांतुनी भगवान
जय गोदे, जय भीमरथी जय सह्य शैल-पाषाण ॥ ३ ॥

कठीण काळ्या कातळांतुनि पारिजात फुलवावे
तुलाच ठावे कळ्यां-फुलांतुनि लाख दिवे उजळावे
प्राणामधुनी दिवा पेटतो, दिव्या दिव्यांतुनि प्राण
जय गोदे, जय भीमरथी, जय सह्य शैल-पाषाण ॥ ४ ॥

कला-हृदय तव साद ऐकते देवांची दगडात
भविष्य तुज मोत्यांचे पाही ज्वारीच्या कणसांत
झरती ओव्या शेतमळ्यांतुनि चढे लावणी-तान
जय गोदे, जय भीमरथी, जय सह्य शैल-पाषाण ॥ ५ ॥

मनी बोलतो श्लोक मनाचा उरी स्मृति शिवबाची
हक्काची जाणीव लोचनीं झुंज लोकमान्यांची
गांधीचा कळवळा सुधेचा करि क्षुद्रांस महान्
जय गोदे, जय भीमरथी, जय सह्य शैल-पाषाण ॥ ६ ॥

हृदय आम्हाला अखिल जगाची दुःखे सहज धराया
हात आम्हाला डोळ्यामधले अश्रु हळुच पुसाया
दौलत मोठी हीच आमची हाच आम्हा अभिमान
जय गोदे, जय भीमरथी, जय सह्य शैल-पाषाण ॥ ७ ॥

## २५९. महाराष्ट्राच्या पराक्रमाचे दुमदुमती चौघडे

'महाराष्ट्र गौरव गीत संग्रह' १९८६ —आल्हाद काळवाडी, मुंबई

मराठवाडा विदर्भ कोकण एकजूट ही घडे
महाराष्ट्राच्या पराक्रमाचे दुमदुमती चौघडे ॥ धृ० ॥

माय भवानी तुळजामाई
सह्यगिरीवर कळसुबाई
वरदायिनी या मनीं स्मरोनी वीर मराठी खडे
महाराष्ट्राच्या पराक्रमाचे दुमदुमती चौघडे ॥ १ ॥

भीमाशंकर जय मंगेश
अजिंक्य आम्ही हा आवेश
'महादेव हरहर' घोषानें रिपुचा फडशा पडे
महाराष्ट्राच्या पराक्रमाचे दुमदुमती चौघडे ॥ २ ॥

शिवरायाची कीर्त त्रिभुवनी
संभाजी तर जणुं क्रोधाग्नी
पहिला बाजी, माधवतेजें उभे दुर्ग अन् कडे
महाराष्ट्राच्या पराक्रमाचे दुमदुमती चौघडे ॥ ३ ॥

सिंहासनिं बैसली मराठी
भगिनींसम अहिराणी, घाटी
मरहट्टयाच्या हट्टाने हो रिपुरुधिराचे सडे
महाराष्ट्राच्या पराक्रमाचे दुमदुमती चौघडे ॥ ४ ॥

हिंद-देविच्या मुकुटामधला
कोहिनूर हा सदा चमकला
स्वातंत्र्याचें रक्षण करणे हेच गिरविले धडे
महाराष्ट्राच्या पराक्रमाचे दुमदुमती चौघडे ॥ ४ ॥

महाराष्ट्र हा एक जाहला
बेळगांव कारवार उरला
भगवा झेंडा गगनामार्जा मानाने फडफडे
महाराष्ट्राच्या पराक्रमाचे दुमदुमती चौघडे ॥ ६ ॥

## २६०. महाराष्ट्राला मुजरा

'नवयुग' १९ जाने. १९५८ —आल्हाद काबाडी

देश मराठी, लोक मराठी, मराठीच भाषा
त्रिवार मुजरा माझा तुजला महाराष्ट्र देशा ॥ ध्रु० ॥

व्यक्तिमत्व, कर्तृत्व तुझे हे दिपवी जगताला
गोब्राह्मण प्रतिपालक म्हणुनि स्तविति शिवबाला
धर्मरक्षणा खड्ग उगारी मर्द तुझा मावळा
याच भूमिवर अलमगिराला थडग्यामधि गाडला ! ॥ १ ॥

अपमानाचें जिणें रुचावे कसे तुला सर्वथा ?
खड्गाला परि खड्ग भिडविणें हीच तुझी तर प्रथा !
अन्यायावर प्रहार करण्या आघाडीवर सदा
स्वाभिमानि लढवय्या तुजवर विजयश्री नित फिदा ! ॥ २ ॥

ज्ञानोबापासून विनोबा....संतांची मालिका
ज्ञान-भक्तिला जोड देतसे कर्मयोग नेमका !
भावभक्तिनें नित्य वाचसी तुकयाची गाथा
समर्थ, नामा वंद्य तयांच्या पायीं तव माथा ॥ ३ ॥

थाप डफावरि, ताल टाळ धरि, साथ तुणतुणें करी
तुझा पवाडा शाहिर गाई घुमवित ललकारी;
लावणिचा तव रंग रंगवी छेलाटी छोकरी !
एकतारिवर नाचनाचतो तुझाच वारकरी ॥ ४ ॥

वारकरी तूं आणिक तैसा असशी धारकरी
निधडी छाती, करुणा हृदयीं, रोखठोक वैखरी !
खांद्यावरती कधीं पताका, भक्तिमार्ग पंढरी,
भाला बर्ची कट्यार नंगी घेउनि अन् संगरीं ॥ ५ ॥

सिंहगर्जना तुझी थांबवी सारी कोल्हेकुई
सह्याद्रीच्या कडेकपारीं दुमदुमते दुंदुभी !
मरहट्ट्याला स्फूर्ति देतसे भाषा तव रांगडी
तुझी अस्मिता कशी कळावी जगता या वेगडी ? ॥ ६ ॥

## २६१. मराठी भाषेचा मानकरी

'नवयुग' २९ जाने. १९५६ रॉक कार्व्हालो

रक्ताचा मराठी, बाण्याचा मराठी
भाषेचा मराठी मानकरी—जागाच आहे

मराठी मर्दुमकी सावध आहे
इतिहासी जागत गाजत राहे
सह्याद्रीचा वारा वादळी दरारा
जो पिऊन सारा, गर्जत न्यारा
महाराष्ट्र आज हृदयांतरी—जागाच आहे

मराठी शिवार पसरे चौफेर
चारी दिशांतुन एकच हुंकार
देहाने मनाने जोडिले अमुचे
एकच नाते हे जिव्हाभावाचे
स्वाभिमान हा सर्वाधिकारी—जागाच आहे

ग्रामीण मुलखात पाण्याचा झरा
शहरांत वाहे त्याचीच धारा
रानात धरण, बिजली हो निर्माण
शहरागावांना प्रकाशाचे दान
वीज-पाण्याचा दाता अखेरी—जागाच आहे

डोंगर-मैदानी, कडेकपारीत
राहुन राबतो सदा शिवारात
शेतकरी सगळा मराठमोळा
मराठी बोली, हातात विळा
दरीतला वाघ कडवा करारी—जागाच आहे

# २६२. अभिवादन

'महाराष्ट्र गौरव गीत संग्रह' १९८६ —कुसुमाग्रज

हे शिवसुंदर समरशालिनी महाराष्ट्र माउली
युगायुगाची जीवनगंगा उदे तुझ्या पाउली ॥

मराठमोळी जमीन काळी सह्यगिरीचे कडे
सदाशिवाची चरणचाल यातून एकदा घडे
पायखुणांवर स्मरणमंदिरे इथे उभी राहिली ॥

शिवहास्यासम मुक्त वाहते इकडे गोदावरी
ज्वारीसह समशेर पोसली कृष्णातीरावरी
विसावली वर्धेवर अवघ्या दुनियेची सावली ॥

प्रमेथ येता रुचीस बन्धन जातमतांचे तुटे
नागर ते पदबंध पाहुनी अमृत हो हिंपुटे
कौस्तुभ टाकुनि देव घालतो गळा अभंगावली ॥

शिंग वाजता शिळा दुभंगुनी फौज जाहली खडी
भीमथडीचे अश्व घालती अटकेवरती उडी
चार दिशांना रणांगणावर खणखणल्या मैफली ॥

एका पिढिचा तुझा फुलोरा पानिपतावर जळे
देशास्तव बरबाद जाहली किती मराठी कुळे
त्या रक्ताने एकदिलाची कमलफले पोसली ॥

महामंत्र मुक्तीचे घुमले निर्भय तव मंदिरी
हस्त लाख कंगाल घालती घण काळोखावरी
अन्यायातच धर्महीनता तुवा सदा पाहिली ॥

भाव भक्तिचे पुन्हा पुन्हा तुज अभिवादन भगवती
तुझ्या पदावर नव्या युगाची घडेल अमरावती
किरण क्रांतीचे दिसतिल देवी तुझ्याच उदयाचली ॥

# २६३. कुठे थांबणार दौड

'महाराष्ट्र गौरव गीत संग्रह' १९८६ — मधुकर केचे

उलट्याच खोपडीचा
असा मराठी माणूस
वेरुळला पाया आधी
त्याने रचिला कळस १

न्यारी परशूची शेती
फोडी कोकणी डोंगर
सागरास आवरोनी
उभे माडांचे आगर २

राघोबाच्या भरारीला
पुन्हा वेडेच उधाण
फत्तराच्या काळजात
हासे रंगीत उद्यान ३

आज पाऊस नसून
नाचे थुई थुई जल
भुई पान्हावली कशी
कामधेनूचे आचल ४

वर्धे गोदेचा उमाळा
साठवी हा ठाई ठाई
झाली जणू आज त्याशी
जग पोसण्याची घाई ५

फेके भिकेची नरोटी
जागे जुना स्वाभिमान
पानशेत कोयनेचे
त्याने झेलले आव्हान ६

नव्या भक्तीने, शक्तीने
बांधी एकेक धरण
युगे अठ्ठावीस पुन्हा
विठू ठेवाया धरून ७

जुने टाकून नव्याची
ह्याला उलटीच ओढ
पैजा निसर्गाशी जिंके
कुठे थांबणार दौड ? ८

## २६४. महाराष्ट्र वन्दन!

महाराष्ट्र गौरव गीतसंग्रह १९८६ —लक्ष्मण विष्णु केत्रकर

वन्दन महाराष्ट्र मंगले
युगा युगाचे स्वप्न मराठी
सत्यरूप जाहले। मराठी राज्य अतां जन्मले ॥ ध्रु० ॥

शब्दामध्ये शब्द ओतितो
अमृत ज्ञानेश्वर।
अभंग वाणी तरे तुक्याचीं
शब्दांचे सागर ॥
संत महंती स्नेह भावना
ओज तुला अर्पिले ॥ मराठी राज्य अतां जन्मले ॥ १ ॥

शिवरायाने स्वातंत्र्याचा
मंत्र अम्हा शिकविला।
प्राण वेचुनी वीरवरांनी
मान तुझा राखिला ॥
तव पुत्रांनी क्रांति–संगरी
हसत रक्त शिंपिले। मराठी राज्य अतां जन्मले ॥ २ ॥

तुझ्याचसाठी खपते येथील
जनता रात्रंदिन।
वैभव शिखरी तुला पाहणे
हे त्यांचे वेतन ॥
धन्य मराठी, धन्य भारती
धन्य राष्ट्र अपुले। मराठी राज्य अतां जन्मले ॥ ३ ॥

# २६५. माझा महाराष्ट्र देश

'महाराष्ट्र गौरव गीत संग्रह'—१९८६ उ. रा. गिरी

भारतभूचा प्यारा माझा महाराष्ट्र देश
छत्रपतीचा राजदुलारा महाराष्ट्र देश

तानाजीच्या तलवारीची मर्दमराठी झुंज
बाजीच्या शर्थीची गाथा जपते पावनखिंड
जिजाऊची अंगाई ठरली स्वातंत्र्याचे गाणे
मावळखोऱ्यातून उसळले तापत रक्त दिवाणे
सह्याद्रीला असह्य झाले परवशता पाश !

उपदेशित संमोहित मूढा ज्ञानेशाची वाणी
नाठाळांच्या माथा काठी अन् श्रीतुकया हाणी
रामदास येथले पाहती स्वातंत्र्याची स्वप्ने
विवेकवन्हीसवे चेतवित कितीक ही नररत्ने
भिडे नशा शाहिरी पवाडा जेथे सावेश !

रायगडादी किल्ले गाती इतिहासाची गाणी
इथे अजिंठा-वेरुळ आदी सुंदरतेच्या खाणी
उभे सावळे दैवत विठ्ठल कटेवरी कर ज्याचे
अभंगरंगी भागवतांचा मेळा उन्मन नाचे
टाळमृदंगी अद्वैताचा उमले उन्मेष !

कृष्णा-गोदा, पूर्णा-वर्धा वात्सल्याच्या धारा
मातेच्या ममतेने भिजवित जाती परिसर प्यारा
तुळजापुरची मायभवानी, अंबा अमरपुरीची
ज्योत तेवती लक्ष उरातुन उत्कट भाविकतेची
जेजुरीचा मार्तंड निवारी भक्तांचे क्लेश !

मयूरपंताच्या आर्येची आभा श्रीमंत
अमर भुपाळी होनाजी-बाळाची कुळवंत
संत-पंत अन् तंतकवीची लाडिक लडिवाळ
इथे जन्मली प्रतिभाशाली कविता वेल्हाळ
उभे ठाकले ललित कलांचे राजस आकाश !

छत्रपती राजर्षी शाहू-सुधारकांचा किल्ला
फुले ज्योतिबा-प्रतिगामी शक्तीवर भीषण हल्ला
लोकमान्य टिळकांच्या डोळा सूर्य स्वराज्याचा
हादरले साम्राज्य आंग्ल, ये प्रकाश मुक्तीचा
अंदमानाच्या तुरुंगातही क्रांतीचे श्लेष !

वासुदेव बळवंत क्रांतीची वीज मूर्तिमंत
कान्हेरे, चाफेकर बंधू-ज्वालांचे गीत
आगरकर, गोखले, रानडे-ऋचाच एकेक
कर्मवीर भाऊराव पाटील-लोकोत्तर श्लोक
देशमुख पंजाबराव-ज्ञानाचे हृषिकेश !

गीताईचा पुत्र लाडका वंद्य विनोबाजी
महाराष्ट्र-माउलीच केवळ श्री. सानेगुरुजी
भीमराव आंबेडकरांच्या तेजाचा स्रोत
दलितमुक्तीच्या संघर्षाची ये उजळित वाट
घटनाकाराचा दुमदुमतो घरोघरी घोष !

केशवसुत अन् गोविंदाग्रज काव्याक्षरलेणी
वेड लाविते बालकवीची रसिका 'फुलराणी'
अविट अजुनी 'एकच प्याला' राम-गणेशांचा
सुगंध ताजा अम्लानच या 'निबंधमालाचा'
'विनायकाचे' 'काळे पाणी' दे उडवून होश !

‘विष्णु दिगंबर’—रातांजनकर संगीताचे सिंधू
धन्य बालगंधर्व येथले धन्य तयांची ‘सिंधू’
धन्य थिरकवा, दीनानाथ नि दाते केशवराव
खाडिलकर, कोल्हटकर आदी नाट्याचे उमराव
दिगंत ज्यांची उरली कीर्ती येथे अविनाश !

साताऱ्याचा क्रांतिसिंह हा नाना पाटील
महारुद्र जणु धगधगणारा स्वराज्य-स्थंडील
‘बळवंताचा’ प्रतापशाली सुपुत्र ‘यशवंत’
चव्हाणांच्या कुळातला शौर्याचा हनुमंत
राष्ट्ररक्षणासाठी ज्याचा अजेय आवेश !

राष्ट्रसंत तुकडोजी गाती भजने नवसृजनांची
करी गाडगेबाबा पूजा जनता-जनार्दनाची
‘पत्रपती’ अत्र्यांचें जपते दिशा दिशा नाम
‘चित्रपती’ दुनियेत गाजती व्ही. शांताराम
नितनूतन गाण्यास ‘लताच्या’ आतुर अवकाश !

इथे नारळीकरांसारखे ‘जयंत’ जन्मा येतीं
राजकारणी ‘वसंत’ गंधित वातावरणा करिती
सुनील गावसकर जगताचा क्रिकेट-विक्रमवीर
महाराष्ट्र हा माझा प्रज्ञावंताचे मंदीर
पंचप्राणापरी लाडका प्रियतम अखिलेश।

महाराष्ट्र हा महान माझा महान इथली माती
हिमालयाचे दुःख झेलिते सह्याद्रीची छाती
माणुस माणुस सांगित इथला मानवतेशी नाती
डोळ्याडोळ्यातून तेवती आशेच्या फुलवाती
चांदण्यात उजळती ‘उद्याचे’ नवे नवेच प्रदेश !

भारतभूचा प्यारा माझा महाराष्ट्र देश
छत्रपतीचा राजदुलारा महाराष्ट्र देश !

# २६६. महाराष्ट्राचे गान

'महाराष्ट्र गौरव गीत संग्रह'—१९८६ घों. वे. जोगी

गातो महाराष्ट्राचे गान
मजला महाराष्ट्राभिमान ॥ धृ० ॥

माती येथली मंगल पावन
स्फूर्तिदायक निर्मळ पवन
उल्हासाचे ओठांवरती
नाचे गीत महान
मजला महाराष्ट्राभिमान ॥ १ ॥

ज्ञानेशांचा दिव्य देश हा
संस्कृति-ठेवा इथे भव्य हा
अध्यात्माचे अमृत वाहे
सागर घेई तान
मजला महाराष्ट्राभिमान ॥ २ ॥

शिवरायांचा विजयी देश हा
शौर्याचा ध्वज इथे नभी हा
रणशिंग निनादे दाही दिशांना
तेजोमय बलवान
मजला महाराष्ट्राभिमान ॥ ३ ॥


टिळकांचा रे मर्द देश हा
स्वराज्याचा मंत्र इथे हा
मनें मराठी एक जाहली
गाती मुक्ती-गान
मजला महाराष्ट्राभिमान ॥ ४ ॥

सह्यकडा अन् दुर्ग वैभवी
'अभंग' छाती परंपरा ही
महाराष्ट्रावर ओवाळू या
आपुले पंचप्राण
मजला महाराष्ट्राभिमान ।। ५ ।।

प्रियतम माझा महाराष्ट्र हा
भारतीयांचा मानबिंदु हा
समाजवादी भारतामध्ये
समाजवादी महाराष्ट्र हा
किर्ती-शिखरावरती नेवू
होऊनी एक समान
मजला महाराष्ट्राभिमान ।। ६ ।।

# विभाग दुसरा : सह्याद्री

## 'असह्य सह्य'



# १. जय सह्यगिरी

'मधुधारा' १९६२ महादेव गोविंद काटकर

जय सह्यगिरी, जय यशोगिरी, जय स्वातंत्र्यनिधान ॥ धृ० ॥

महाकाय विस्तीर्ण सुशोभित
विशाल कृष्णकड्यांनी वेष्टित
उन्नत तव माथा भेदाया बघतो नीलवितान. १

महाशक्तिसह नित परमेश
तव शिखरांवरि करि अधिवास
निर्झर, सरिता, पर्णासनिं द्विज, गाती तव स्तुतिगान २

सांवलींत तव, हिरवें कोंकण
फुललें जणुं सुंदर नंदनवन
तव पदिं पसरे देश प्रतापी, वाढवि तव सन्मान. ३

छत्रपतींच्या पराक्रमाचा
स्वातंत्र्याच्या संग्रामाचा
घडतो साक्षात्कार पाहुनी दुर्गम दुर्ग महान. ४

तव दर्शनिं लाभे संजीवन
स्वतंत्र बाणा, स्वतंत्र जीवन
कृपाप्रसादें तुझ्या फडकलें अटकेवरति निशाण. ५

पुण्यभूमि ही संतकुळांची
कर्मभूमि ही नरवीरांची
शौर्य, धैर्य, श्रम, त्याग, एकता यांचें दे वरदान. ६

## २. सह्याद्रि

'गंगेतील निर्माल्य' १९३७ —वासुदेव नरहर कुळकर्णी

जागृत करि सह्यगिरी !
राष्ट्रभूमिला । महाराष्ट्रभूमिला ।
संदेशा सांग तुझ्या
दिव्य जननीला । महाराष्ट्र जननिला ॥धृ०॥

अचल जरी तूं असशी
मूक जरी तूं दिससी
श्रेष्ठ मुनी परि गमसी
भू-धरा मला । खरा भू-धरा मला १

ज्ञानांच्या तव सरिता
प्रीतीच्या वृक्षलता
'सु-मनांच्या' रम्य कथा
शोभवो तुला । सख्या शोभवो तुला २

सर शूरें गड केले
अर्पुनियां शिर-कमलें
अजरामर जे झाले
आण अवनिला । तया आण अवनिला ३

ईश्वर तो शंकर तो
तव शिखरीं परि वसतो
नेत्र-द्वयें दावो तो
मार्ग तुज खुला । खरा मार्ग तुज खुला ४

---

१. महाबळेश्वर २. भीमाशंकर

ढाल महाराष्ट्राची
अति कणखर कवचाची
भीति न परचक्राची
राहिली तुला । मुळीं राहिली तुला ५

श्रीकृष्णा वैजयंती
तानाला यशवंती
प्रिय होवो रसवंती
सतत भू-तला । तुझी सतत भू-तला ६

## ३. सह्याद्रीचे कडे

'झंकार' नोव्हें. १९७९ **विमल बी. गोडबोले**

उंच उमे हे असती शाबुत सह्याद्रीचे कडे
साथ देत हे मराठमोळ्या शिवभक्तीची चहुंकडे
अजून भंवती दुमदुमती ते विजयाचे चौघडे
शिवभक्तीच्या ललकाऱ्यांची अजून नौबत झडे
अजूनही ते गाजती इथे शौर्याचे पवाडे
सुंभ जळाला पीळ परी तो भगवा झेंडा फडफडे
मराठमोळ्या शौर्याची अन् कमान वरती चढे
शूरांच्या रक्तांत नाहले—महशूर असे हे कडे
तो तानाजी, बाजी अन् तो इथेच कामी आले
लढतां लढतां प्राणपणानें त्यांचें सोनें झालें
महाराष्ट्र पण अजून गातो त्यांचे पोवाडे
त्या शूरांच्या—त्या वीरांच्या रक्ताने न्हालेले कडे

शिवबाच्या त्या सैन्याने जिथे बाजी केली ते कडे—
कथा सांगती शौर्याच्या त्या कणखर हे ते कडे
तोफांचे आवाज अजुनही दुमदुमती चहुंकडे
आव्हान देत हे उभे ठाकले सह्याद्रीचे कडे
उंच उंच ते मजबुत कणखर सह्याद्रीचे कडे
देत पहारा अखंड असती देत जगाला धडे.

## ४. सह्याद्रीचें सिंहावलोकन

'प्रेमदल' १९२७ चंद्रशेखर

मजभंवती जो अजगर ऐसा गाढ निजेला अचल दिसे,
ह्याला 'सह्य' असें जन म्हणती; पूर्वी हाच असह्य असे.
कारण, ह्याच्या शृंगांवरुनी होतां शृंगध्वनि सहसा,
वीरश्रीनें पुलकित होई हा पंचानन काय जसा
घनघोषासम 'हरहर' ऐसा जेंव्हा रणघोष करी,
तेंव्हा अंबर चरके वरतीं, धरा थरारुनि कंप धरी;
ज्या काळीं त्या गरनाळींतुनि बालरवीसम लाल असे
गोळे सुटती फुटती तेंव्हां ज्वालामुख हा 'सह्य' नसे.
येथें, तेथें, खालीं, वरतीं, खड्ग विजांसम चकचकले,
तेंव्हा ह्यावरि कटाक्ष ठेवुनि थकले, चौकसही चकले;
शौर्य-जयश्रीयुत ह्यावरिंचा दैव-दिवाकर न हि टळला,
केतुमुखीं तो आज म्हणावा गळला किंवा मावळला ? !
ज्यांवरि धडधड झडति नगारे, असे शतावधि गड पडले,
पडले नसतिल असतिल कांहीं, कालकरीं तरी सांपडले;

गोजिरवाणीं ठाणीं, वाडे, विशाल किल्ले गर्वभरें
टोंचिति गगना, सर्व विखुरलीं गंधर्वांची जणुं नगरें
गतवैभव हा हताश होउनि पसरुनि कर पद जणु निजला,
हे सह्या ! घे झोंपचि आतां, येते कींव तुझी मजला.
एकी रुसली, दुही धुमसली, अवयव पोटासह लढले,
सुविवेकाचे तुझें बिघडलें, सह्या !—म्हणुनि असें घडलें !
घटयंत्रासम सकलांनांही येते चढती वा पडती
कां चढतीनें भृकुटि चढावी ? पडती व्हावी अवघड ती ?
कर्म जसें; फल तसें; तयाचा भोक्ता ज्याचा तोच तरी
कर्मापासुनि फलभोग तसा पश्चात्तापहि मुक्त करी.

## ५. सह्याद्रीचे उंच कडे

'हुतात्मा चाफेकर व अन्य कविता' जाने.-१९७४

**—सदाशिव गोविंद चिंधडे**

सह्याद्रीचे उंच कडे
पश्चिम भागी सतत खडे
कभिन्न काळे कातळ हे
कीर्ती-रूपे धवल पुरे—१

वर्षा खुलवित जलवंती
रानफुले येथें फुलती
जलद जलें शिंपुनी जाती
दुर्वांकुर मग तरतरती—२

मोत्यांची जाळी पसरे
दंव-बिंदूतुनि नवल झरे
अंगावरि वाहति याच्या
अनंत धारा पाण्याच्या—३

फत्तर काळे हे सारे
फेन-धवल दिसतात खरे
मेघ यावरी विसावती
कांही शिंपुनिया जाती—४

मधून फिक्कट उन्ह पडे
क्वचित् दाट अंधारुन ये
उन्ह सावली झराझरा
शिवाशिवीचा खेळ खरा !--५

नारळ पोफळि वृक्षांची
दाटी ताल तमालांची
करवंदीची दीर्घ बनें
भातांची पिकती रानें–६

पश्चिमेस सागर हासे
कसे तया लागले पिसे
लाटावरि आरूढ होउनी
पद अद्रीचे धूत बसे !–७

कृष्णा कोयना कावेरी
जनक नद्यांचा सह्याद्री
गंगागोदावास तिरी
अवगाहन हें पुण्य-करी–८

व्याघ्रसिंह येथे फिरती
पशुपक्षां नाही गणती
अन्न जलावरि जन इथलें
पुष्ट होऊनी बागडती–९

दीप चमकती रजनीचे
झाडीतुनि जीवन नाचे
जणू चांदण्या रम्य इथे
गाणे गाती नवलांचे–१०

इथे मंदिरे सांबाची
शक्ति-देवता देवीची
भवानि माता पूजुनिया
आण घेतली खड्गाची–११

शोभति शिखरावरि याच्या
रांगा अवघड किल्लयांच्या
चित्तथरारक गाथा ह्या
पराक्रमी रण-धीरांच्या–१२

दिधले आम्हां शिव-बाजी
संभाजी अन् तानाजी
धर्मावरि संकट आले
वीरांनी त्या परतविले–१३

कभिन्न काळ्या दगडांनी
मार्ग दाविला शिवबाला
शक्ति, युक्ति, गुण, धैर्य तसे
किती, लाभले रायाला–१४

आजहि त्यांची स्मृति विमला
स्फूर्ति देतसे आम्हांला
मिळे आम्हाला शिवराणा
आणि मराठा दृढबाणा–१५

मोडूं तरि पण वाकेना
सह्याद्रीचा कठीण कणा !
भीति आम्हां ना कसची
भीति न आम्हां मरणाची–१६

शीर घेतले तळहाती
आस एक स्वातंत्र्याची
पुण्यभूमि ही कितिकांची
त्यागभूमि स्वातंत्र्याची—१७

वेदीवर या किती गेले
तेणे यश जवळी आले
रक्त आपुल्या आईचे
सह्याद्रीवर ओघळले—१८

संतांनी पथ दावियला
स्वातंत्र्याचा भला भला
मराठावेळ एक मिळे
स्वराज्य मग हाती आले!—१९

सह्याद्रीचे उंच कडे
पश्चिम भागी सतत खडे
काळीं कातळ ही शिखरें
कीर्तीचे हे धवल तुरे!—२०

## ६. सह्याद्रि स्तोत्र

'महाराष्ट्र गाथा' स. आ. जोगळेकर

सह्याद्रि नामा नग हा प्रचंड हा दक्षिणेचा अभिमान दंड ।
ज्वालामुखींनी जरी निर्मियेला पवित्र तो रामपदें जहाला ॥ १ ॥

शिरावरी शंभु विराजताहे कन्याकुमारी पद धूत आहे ।
स्कंधावरी दुर्गम दुर्ग ज्याच्या हातीं झळाले परशू तयाच्या ॥ २ ॥

उन्मत्त-निर्दालन दक्ष राही निर्वासितां आश्रय लाभ देई ।
ही पुण्यभूमी तशी त्यागभूमी स्वातंत्र्यभूमी तशी कर्मभूमी ॥ ३ ॥

आधार आदर्शहि भारताला प्रसाद त्याचाच अम्हां मिळाला ।
झेंडा तयाचा भगवा विराजे तयापुढें मस्तक नम्र माझें ॥ ४ ॥

# ७. सह्याद्री

'महाराष्ट्र गौरव गीतें' —पी. सावळाराम

कैलासावर शिंग वाजतें अखंड ज्याच्या श्रीकीर्तीचें
दिव्य-प्रतापी दर्शन घे तूं रसिका माझ्या सह्याद्रीचें ॥ धृ० ॥

पूर्ण स्वयंभू दिव्यत्वाला शरणागत जो शंकर भोळा,
ज्योतिर्लिंगहि अर्पुन आपुलें, प्रसाद ठेवी तिसरा डोळा,
तांडव नर्तन करतो पुढतीं रूप घेऊनी महारुद्राचें—
दिव्य-प्रतापी दर्शन घे तूं रसिका माझ्या सह्याद्रीचें ॥ १ ॥

शुभकल्याणी मायभवानी मुगुट चढविते शिवशाहीचा,
बावनगडची घेत सलामी झेंडा फडके पराक्रमांचा,
महाराष्ट्राच्या स्फूर्तिदैवता झडती मुजरे मानवतेचे
दिव्य-प्रतापी दर्शन घे तूं रसिका माझ्या सह्याद्रीचें ॥ २ ॥

परचक्राची चाहुल येतां हुंकारांतून मृत्यू उठतो
कांपत थरथर पश्चिम सागर कैक योजनें मागें हटतो
प्रळयंकर तें रूप पाहुनी दिपती डोळे रविचंद्रांचे
दिव्य-प्रतापी दर्शन घे तूं रसिका माझ्या सह्याद्रीचें ॥ ३ ॥

थांबव संगर, हांक शुभंकर मारी जेंव्हा भारतमाता
निजभूचरणीं केवळ नमवी उन्नत अपुला विजयी माथा
मातृभक्तीला फुटती पाझर भीमा कृष्णा गोदावरीचे
दिव्य-प्रतापी दर्शन घे तूं रसिका माझ्या सह्याद्रीचें ॥ ४ ॥

# ८. सह्याद्रि वर्णन

'काव्यदोहन' | केशव वामन पेठे

पृथ्वीला व्यापणार भयकर सकलां भासतो जो समुद्र
ग्रासाया विश्व सारें जणु पसरित 'ऑ' अन्य हा काय रुद्र !
त्या अत्युग्रा निधीचे प्रखरतर महा-चंड आघात साही
लाभे तैं सह्य ऐशी अभिमत अभिधा आर्द्र हा वज्रदेही ॥ १ ॥
वाटे सागर हार पावुनि बहू लाजोनि गेला दुरी
सह्याच्या शिखरांवरोनी दिसतो तो चंद्र-कोरेपरी
भासे घालिल हा उडी त्वरितची त्या सिंधु वैऱ्यावरी
चंद्राला गिळण्यास राहु टपतो पात्रे तयाची सरी ॥ २ ॥
तापी माथां बैसली विंध्यकन्या पायीं लागे ती कुमारी सुधन्या
कोठें तापी दूर कोठें कुमारी सह्याद्रीचा देह विस्तीर्ण भारी ॥ ३ ॥
महाराष्ट्राची जो गिरिवर करी दोन शकलें
वरी संज्ञा **देश** प्रथम दुसरें **कोंकण** भलें
शरीरा ये दार्ढ्य प्रबल असतां पृष्ठ-मणके
महाराष्ट्रू तैसे करिति गिरिचे घाट टणके ॥ ४ ॥
पांथांना **रडतोंडिचा**[3] रडवितो फोंडीच **फोंडा**[4] उर
आणी प्रेतकळा **मढ्यां**[5] दिसतसे काळापरी भासूर
सह्याचे सगळेच घाट असती लंघावया दुर्घट
होती वन्हिरथामुळें सुखद ते लोकां बहु चोखट ॥ ५ ॥
व्याघ्रीची काय धाडी धडकत सुटली गव्हरांतूनि गाडी
घाटांची उंच माडी भयकर वरती खालती कीर्र झाडी
दावोनी खोल खिंडी सकलहि मनिंचा त्यामधीं गर्व गाडी
आश्चर्यी फार पाडी भंवतिं निरखिता माणसें होति वेडीं ॥ ६ ॥

---

१. सर्वमान्य २. नांव ३. महाबळेश्वर जवळील घाट ४. कोल्हापूर जवळील घाट ५. महाडजवळील घाट.

सह्याची बहु रांठ धीट धरिती धाटे मराठे गडी
शौर्ये लाविती हारवूनि अपुल्या वैऱ्यांस देशोधडी
राज्यस्थापन या गिरीवरी महा-राजा शिवाजी करी
स्थापी धर्म तसाच सज्जन-गडीं तो रामदासा करीं ॥ ७ ॥

लावी जो जयतोरणें सुविजयीं त्या तोरण्या आपलें
ज्याचें सिंहगडींच सौंगडि महा सिंहापरी गाजले
देई ताप बहू प्रतापगड हा किल्ला अविंधा सले
हा हा ! हे गड भंगुनी दगड या अद्रीवरी झोंपले ! ॥ ८ ॥

शीर्षी धौम-महाबळेश्वर धरी कैलासलोकापरी
गंगाशी शिवमस्तकांतुनि निघे कृष्णानदी साजिरी
गानीं नर्तनिं गौरकाय नहरीं सौख्योपचारीं रत
सांबासन्निध यक्षकिन्नरचि ते आहेत हो नांदत ॥ ९ ॥

कृष्णा सह्यसुता गभीर दिसती तैशीच गोदावरी
नांदे, सन्मुख पश्चिमाब्धि म्हणती हा तो पित्याचा अरी
त्या धिक्कारुनि पूर्वसिंधु वरिती स्वीकारिती दूरता
बापाच्या रिपुला अधीर मिळती क्षुद्रा मनस्वी सुता ! ॥ १० ॥

वेगें धांवत जो कड्यावरुनिया टाकी उड्या खालतीं;
वातें हालविता जणो धरितसे जो नागमोडी गती;
फेसानें गरळास उग्र वमतो; जो फार फोंफावतो;
सह्याचा गिरसापचा धबधबा सापापरी भासतो ॥ ११ ॥

रोगांना हारवाया गिरिवर असती वृक्षवल्ली अपार
भांडारीं सांठवाया नव निधि भरले सह्यगर्भात फार
भंगाया दुःख वारे सुखकर नहरीं वाहती थंडगार
विश्वाची भव्य शोभा लवकर निरखा सह्य हा एकवार ॥ १२ ॥

# ९. सह्याद्रि उठ

'ज्योत' १९६४ माधव रा. पोतदार

बाहु उभार करि निर्धार रे सह्याद्रि ऊठ
नकट्या अपशकूनीवरती तूं एकच हाणी मूठ ॥ धृ० ॥

पराक्रमाचे शूरत्वाचे मानी शिवबांचे
नित्य पवाडे किती गाइले त्या रणभेरीचे
आज हांक दे धाक पडूं दे मैत्रि न सारे झूट १

ती तान्याची, वाजी प्रभूची, बाजीरावाची
जिद्द असूं दे अखिल जगाला मराठी बाण्याची
इतिहासाची, नवधर्माची ध्वजा उंचवी ऊठ २

माथ्यावरती स्वैर नाचती क्रूर श्वापदें ती
नाठाळाचें काठी माथां दाव अता नीती
एकत्वाच्या वज्राखाली टाक गाडुनी भूत. ३

परंपरेच्या इतिहासाच्या पुढें उभे अव्हान
स्विकारून ते तारस्वरानें गा रे जयजयगान
तुझी भवानी, असूरमर्दिनी आज सांगते ऊठ. ४

कड्याकड्यांतुन दऱ्यादऱ्यांतून उभार बाहु लाख
त्या लाखांच्या अंगारांतुन हो शत्रूची राख
गर्जुनि पुढती सांग जगाला अभंग अमुची मूठ ! ५

## १०. सह्यकडा

‘ज्योत’ — माधव रा. पोतदार

प्रियतम माझा सह्यकडा

इथें उधळले कितीक घोडे
इथें गाजले वीर फांकडे
इथेंच झडले विजय चौघडे
प्रियतम माझा सह्यकडा.

धर्म-संस्कृती ज्याने जपली
मराठशाही अभंग केली
शिवशाही ती अमर बनविली
प्रियतम माझा सह्यकडा.

ताना, येसा, मुरारबाजी,
संताजी अन् तसा धनाजी
वीर जन्मले गाजी बाजी
प्रियतम माझा सह्यकडा.

संतांनी जो पवित्र केला
वीरांनी जो समर्थ बनला
मातांनी जो मंगल झाला
प्रियतम माझा सह्यकडा.

कुशींत ज्याच्या मानवतेनें
जन्म घेतला मांगल्यानें
दिगंत गाजे शिवनीतीनें
प्रियतम माझा सह्यकडा

“साहुं नका अन्याय कुणी
जुल्मशाहि द्या झुगारुनी !”
संदेश देतसे उभा ठाकूनी
प्रियतम माझा सह्यकडा

अचल सदा हा उभा जरी
स्फूर्ति निरंतर देइ परी
नष्ट कराया दुष्ट अरी
प्रियतम माझा सह्यकडा.

फुलते छाती अभिमानांनी
ऊर दाटतो गतस्मृतींनी
जो भारताचा मुकुटमणी
प्रियतम माझा सह्यकडा.

# ११. सह्याद्रि

'काव्यदोहन' १९०७ **सदाशिव मोरेश्वर भिडे**

तापीपासुनि दक्षिणेस जलधीपर्यंत जो दक्षिण
व्यापी अंबर चुंबि रम्य शिखरीं लावण्य सल्लक्षण
यत्पृष्ठीं सुविशाल ताल शिसवा यांचीं वनें शोभती
तो श्री सह्यगिरींद्र वर्णित करूं लोभे मदीया मती ॥ १ ॥

गोदा भीमरथी तशा हरीतनू कावेरि पूर्वेकडे
गायत्र्यादिक, पश्चिमेस सरिता फोर्डात जाती कडे
यांहीं दक्षिणदेश सस्ययुत हा श्रीयुक्त केला तुवां
सह्या, उत्तरनाथ तो धनद ही लाजे तुझ्या वैभवा ॥ २ ॥

ठायीं ठायिं असंख्य निर्झर नद्या झोंकावुनी खालती
येतां इंद्रधनुष्यकांति झळके दे तोष नेत्रांस ती
स्नानप्राप्त-ससंभ्रमामरसतीविस्रस्त भूषावली
स्वर्गंगा शतधा विकीर्णतनु, हा आणी जणों भूतळीं ॥ ३ ॥

तुंगाद्या त्रिजितामृता बहु नद्यां पुण्यावहा वाहती
स्थानें रम्य महाबळेश्वरमुखें उत्तुंग संशोधिती
ऐसें देखुनिया अमूल्य गुण हे सह्याद्रिचे, लाजती
मैनाकादिक सागरांत दडती, निर्लज्ज ते राहती ॥ ४ ॥

राहे पश्चिम दक्षिणाब्धि निकटीं देशास रक्षी सदा
स्वप्रांतस्थित वीर धाडुनि करी निर्वैर भू कैकदां
नामें सह्य जरी असह्यच जया अन्याद्रिशोभा तरी
ऐसा पर्वत चक्रवर्ती विलसे हो शैल भूमीवरी ॥ ५ ॥

किति तरु किति वल्ली शोभती सह्यशैलीं
सुरतरुसम ज्यांची लोकविख्यात शैली
विहरति विबुधाली नाचती चंचला ते
बघुनि फसति देव स्वर्ग मानून यातें ॥ ६ ॥

प्रतिध्वनितकंदरा फिरती आगगाड्या किती
जयांतुनि असे इथें बहुत बोगदे शोभती
पुरें कितिक घाट ही धरितसे स्वपृष्ठावरी
शरीर झिजवून हा गिरि परोपकारा करी ॥ ७ ॥

प्रति शिखरिं धरी हा सह्य शैलेंद्र दुर्ग
बघुनि पळति पूर्वी ज्यांस हो वैरिवर्ग
परि बहुत विपत्ती भोगिती सर्व आतां
सकळ मिळति नाशा वांकडा काळ येतां ॥ ८ ॥

नैसर्गिकी तशिच कृत्रिम चित्रता जे
ह्या सह्यशैलवरि, निस्तुल ती विराजे
कीं पाहतां धबधबे हरपेच भान
लेणीं बघून, न कलापटु थक्क कोण ? ॥ ९ ॥

असति फणस कोठें काजुचे वृक्ष कोठें
पिकति बहु लवंगा वेलदोडेहि कोठें
कनकखनिहि मोठ्या शोभती ठाइं ठाईं
चकित बघुनि सह्यैश्वर्य हें, चित्त होई ॥ १० ॥

इथें या शैलाचे शिशुच जणुं हे दंति फिरती
तिथें जाळ्यांमध्यें मृगभयद ते व्याघ्र फिरती
वराह स्वच्छंदें समद, डबक्यामाजि रुळती
कुठें चंचन्नेत्रें चपल हरिणें स्वस्थ चरती ॥ ११ ॥

घेरी ये बघतां जयास गगनीं गेलीं कशी ती शिरें
कोठें खोलच खोल पाहुनि दऱ्या अंधार नेत्रीं भरे
कोठें आपटती तटा, जलधिच्या लाटा कठोर ध्वनी
ऐसे सह्यगिरींद्र-भाग दिसती नानापरी लोचनीं ॥ १२ ॥

ऐसा हा सह्यशैल क्षितिवर मिरवे सर्व शैलांत राणा
हिंदुस्थानेतिहासा प्रकट करि, धरी चित्रतेचाहि बाणा
उच्चत्वैश्वर्य ज्याचें अतुलच, विलसे शील, अन्वर्थ नाम
होई उद्योगि लोकां सतत शिवद हा सद्गुण श्रेष्ठ धाम ॥ १३ ॥

## १२. सह्याद्रि

'श्री महाराष्ट्र शारदा' १९२३ —गंगाधर रामचंद्र मोगरे

कोठें दुर्गम उंच उंच शिखरीं भेदोनि तारापथा
विंध्याद्रिव्रत आचरोनि अडवूं पाहे रवीच्या पथा;
कोठें भार्गवराम मार्गणभयें जो भीरू मागें पळे
त्याचा मारहि साहुनी पुरवितो प्रेमें मुलींचे लळे;—१

कोठें खोल महा भयानक दरी पाहोनिया ज्यांकडे
सूर्याचे करही भयें दचकुनी माघारती बापुडे;
कोठें घोष करीत पुण्यतटिनी जातां समुद्राकडे
खालीं आदळती धडाधड जणूं पापाचलाचे कडे !—२

कोठें शीतल वाहती झुळझुळां आच्छोदकाचे झरे
ज्यांच्या केवळ दर्शनेच सगळी तृष्णा जनांची हरे;
कोठें रम्य सरोवरें, स्फटिकभा शुद्धोदकें ज्यांचिया
केलें लज्जित शारदेंदुकिरणां देवोनियां आश्रया,—३

कोठें व्योमपथें महीरुह शिरें उंचावुनी आपुलीं
चाखाया बघती जणूं निजगळा निःसार मेघावली;
कोठें पालवता लता रुचिरता साऱ्या प्रदेशास ये
वाट पांघुरली सुरम्य हिरवा शेला वनश्री स्वयें;–४

कोठें त्र्यंबकराजपुण्यमहिमा वर्णीत गोदावरी
जातां पंचवटीवरून नमन श्रीरामचंद्रा करी;
भीमाशंकर सोडुनी निजसखी घेऊनि नीरा सवें
कोठें नेऊनि पंढरीस वसवी भीमा जनांचे थवे;–५

कोठें धौम महाबळेश्वरसदा सोडोनिं जातां पथीं
कृष्णेला बहु कोयनादिक सख्या येवोनिया भेटती;
कोठें जी म्हणती प्रयागमहिमा सार हिरावोनि घे
हाराया करवीरतापमलही ती पंचगंगा निघे;–६

ताराया भजकां सदाशिव कुठें ज्योतिः स्वरूपें वसे
कोठें येउनि ही हिमालयसुता ह्या सप्तशृंगीं बसे;
कोठें या विवरीं लपोनि वसती बौद्धादिकांच्या कृती
होते कुंठित ज्यांकडे निरखितां कारागिरांची मती;–७

कोठें हे उंच माना करुनि गड यशस्तंभ राया शिवाचे
देती आम्हां मराठ्यां स्मरण घडिघडि आमच्या वैभवाचें;
गेला ! तो काळ गेला निघुनि ! विभवही नष्ट तें सर्व झालें !
गेलें तें तेज गेलें ! पुरुषवरहि ते भाग्यशाली निमाले !–८

नाहीं घोरपडीशिवाय शिवली भिंतीस ज्याच्या शिडी
फेंकाया शकले न दृष्टि रिपुही ज्याच्याकडे वांकडी;
तान्हाजीसम वीरसिंह पडला ज्याकारणें संगरीं
त्या ह्या सिंहगडीं निरंतर शिवा स्वाराज्य आतां करी !–९

ज्याचा मावळुनी प्रतापतरणी केंव्हांच गेला तरी
गर्वे मान वरी करोनि बसला जो ह्या गिरीच्या शिरीं,
तो हा पाहुनिया प्रतापगड त्या राया शिवाची कृती
त्याच्या वाघनखांसह स्मरुनियां तल्लीन होते मती–१०

जेथें ऐकुनि चौघडे धडकतां राज्याभिषेकोत्सवीं
नाचे हर्षभरें विरक्तहि तरी तो जावळीचा कवी;
त्या ह्या रायगडावरोनि भगवा झेंडा पडे खालतीं
ऐसे पाहुनिया गळे सहजची त्या मावळ्यांची धृती–११

सह्याद्रे! तुज पाहुनी प्रथम जो आनंद झाला मला
त्याचा एकहि लेश यावरि नसे चित्तांत ह्या राहिला;
आतां राहुनियां इथें असुखची होणार आहे मना,
दुःखे यास्तव आज सोडुनि तुला ही चालली कल्पना.–१२

## १३. मज खुशाल हिणवा फत्तर सह्याद्रीचा

'विसावा' १९५५ सौ. उषा लिमये

ना उगवायाचे तृणांकूर मजवरती
ना पिकावयाची सुवर्णशाली शेती
परि मनामधें मी खंत न मानायाचा
मज खुशाल हिणवा फत्तर सह्याद्रीचा—१

ना अंजिर येथे मिळायाचे खाण्याला
ना सुमधुर द्राक्षें मिळती चाखायाला
परि घ्याच एकदां अनुभव करवंदांचा
मज खुशाल हिणवा फत्तर सह्याद्रीचा—२

वाहती सानुले निर्झर खळखळ करुनी
जणूं खेळ खेळती बालक अंगावरुनी
अनुपमेय वाटे मोदचि वात्सल्याचा
मज खुशाल हिणवा फत्तर सह्याद्रीचा—३

हें शरीर झालें पवित्र पूर्वस्मृतींनी
शिव-छत्रपतींच्या पावन पायधुळींनी
भाग्यवान झालो शोक नुरे जन्माचा
मज खुशाल हिणवा फत्तर सह्याद्रीचा—४

रामदास आणिक तुकाराम हे संत
कितिकदां बैसले माझ्यावरति निवांत
संदेश मिळाला येथ तयां स्फूर्तीचा
मज खुशाल हिणवा फत्तर सह्याद्रीचा—५

कितिकदां बोललो त्यांच्याशी गुजगोष्टी
टाकली कितिकदां त्यांवर आदर दृष्टी
अभिमान वाटतो त्यांच्या सहवासाचा
मज खुशाल हिणवा फत्तर सह्याद्रीचा—६

भरुनियां नेत्र हे स्वराज्य देखियलें मी
पाहिले पराक्रम मराठमोळ्यांचे मी
अभिषेक घेतला शत्रूंच्या रक्ताचा
मज खुशाल हिणवा फत्तर सह्याद्रीचा—७

उधळीत मराठेशाही वैभव कीर्ति
तोरणा-रायगड उभे जयांच्यावरती
ते सारे फत्तर मीही बंधु तयांचा
मज खुशाल हिणवा फत्तर सह्याद्रीचा—८

बाजिराव पहिले घोड्यावरुनी जाती
चुरडीत कोवळा हुरडा कणखर हातीं
सांडला मजवरी तूस तया दाण्यांचा
मज खुशाल हिणवा फत्तर सह्याद्रीचा—९

लपविला फाकडा वासुदेव बळवंत
अन् दुजे कितीतरि क्रांतिवीर विख्यात
आसरा दिला त्यां निर्भय मातृकुशीचा
मज खुशाल हिणवा फत्तर सह्याद्रीचा—१०

मी उभा अजूनहि सांगाया इतिहास
जरि कराल माझा तिरस्कार उपहास
गाईन पवाडा मावळच्या वीरांचा
मज खुशाल हिणवा फत्तर सह्याद्रीचा—११

हे युगायुगांचे संस्कृतिचे अवशेष
देशांस तयांचे स्फूर्तिशालि संदेश
द्यावया उभा मी सेवक महाराष्ट्राचा
मज खुशाल हिणवा फत्तर सह्याद्रीचा—१२

## १४. महाराष्ट्राच्या सह्यगिरी

**'कुजिते आणि गर्जिते' १९६५** **—शिरीष**

महाराष्ट्राच्या सह्यगिरी तव शिखरे उठती वरी वरी
आकाशाची झालर तू, तुज पाहुनि गद्गद होइ उरी.
कंठ दाटतो अभिमानाने पत्थर पाहुनि तुझे निळे
इतिहासाच्या धारातीर्थी रक्त-मावळे इथे गळे ! १

तानाजीचा कडा खडा हा सदूर दिसतो कोंडाणा
'सिंहगडा'ची पदवी घेई किल्लेकोटांचा राणा.
पत्थर असले पत्थर कसले? जिवंत स्फूर्ती त्यात झरे
खडकांमधले 'जीवन' बघुनी कल्याणाचा नेत्र झरे! २

'समर्थ' पदस्पर्शाने झाला पावन तव, रे, कडाकडा
बाजीप्रभुच्या मरणें लाभे 'पावन' खिंडी 'पन्हाळगडा'
स्वराज्य तोरण 'तोरण्या'वरी उभारण्या दे 'शिवनेरी'
शिवअवतारी महाराष्ट्राला 'रायगडा'वर छत्र धरी! ३

किल्ले मावळ तव वक्षावर उन्नत माथा भूषविते
सह्याद्रीच्या महाप्रस्तरा! कोटि वंदन तुला इथे
उंच 'हिमालय' अमुचा तू अन् 'भीमाशंकर' 'कैलास'
'महाबळेश्वर' 'गौरीशंकर' 'कळसू' ला व्योमीं ध्यास! ४

'गोदा' अमुची 'गंगामाई' 'त्र्यंबकेश्वरी' अन् 'काशी'
'भीमेच्या वाळूत सांडल्या पुण्याच्या कांचनराशी!
'विश्वेश्वर' हा उभा विटेवर अमुची पंढरी जागविते
आळंदी, देहू, तुळजापूर, पैठण तीर्थे मी स्मरतो. ५

तुळजापुरची मायभवानी असिधारा दे हातात
स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ अन् असंख्य मुंड्या न्हातात!
भगवा झेंडा स्वैर फडफडे थरारवूनी सह्यकडा
महाराष्ट्राच्या डफाडफावर सह्यगिरीचा पोवाडा! ६

# १५. सह्याद्रि

'दिव्यभाव'

श्री. श्रीनिवास

पदस्पर्शें प्रभू राम । करी पूता तुझी काया ॥
विहारी येथ त्यासंगें । जगाची आदि ती माया ॥ १ ॥

करी सख्यास येथेंचि । प्रभू त्या वानरांसंगें ॥
म्हणोनी जाहली शुद्धी । अरीच्या दुष्टताभंगें ॥ २ ॥

जिथें संचार रामाचा । तिथेंचि दास संचारी ॥
शिवाची 'मावळे गण' ही । चमूं हो सत्वरीं भारी ॥ ३ ॥

गनीमां होत निःपात । अहा ! आनंदलीं खोरीं ॥
स्वराज्यस्थापना होई । तुझ्या शीर्षीच सह्याद्रि ॥ ४ ॥

महत्पुण्यें तुझ्या ऐशा । तुला ये धीर ही पदवी ॥
तुझ्या धीरास देखोनी । अरीही दाविती अदबी ॥ ५ ॥

पदीं खेळे तुझ्या नित्य । महा संपन्न सागर हा ॥
परी दृष्टी तुझी ध्येयीं । चळेना पाहुनी मोहा ॥ ६ ॥

घडे आघात वातास्त्रें । तुझ्या देहावरी नित्य ॥
सहावीं संकटें धीरें । दिसे बा हेंच कीं सत्य ॥ ७ ॥

# विभाग तिसरा : शिवरायाची गौरवगाथा

## 'श्रीमंत योगी'



# १. शिवरायाची गौरवगाथा

'एक दिलाची सिंहगर्जना' — योगेश्वर अभ्यंकर

शिवरायाची गौरवगाथा गाते शिवनेरी
इतिहासीं रे शिवबासाठीं अक्षर सोनेरी ॥ धृ० ॥

नवी प्रेरणा अभिमानाची राज्य नवें आलें
स्वप्न नवें अन् ध्येय नवेंही, मनोमनीं फुललें
देशासाठीं रक्त सांडणें, घुमली रणभेरी ॥ १ ॥

संघटनेच्या चतुरपणानें, काम साधलेलें
तान्हाजीसम आज्ञाधारक, सेवक जमलेले
कोंडाण्यावर सिंह झुंजला पराक्रमी भारी ॥ २ ॥

पावनखिंडित लढला बाजी, तेंव्हां निकरानें
काळ थबकला शौर्य पाहुनी, वदला अभिमानें
कर्तव्याला बाजी प्रभूच्या, वंदन संसारीं ॥ ३ ॥

खजिन्यामधली लूट आणली, सून तिथें आली
छत्रपतींची अमृतवाणी, तेंव्हा मग वदली
"मातेसमही पवित्र सुंदर, गमे यवन नारी" ॥ ४ ॥

वाघनखांनी पोट फाडलें, अफझलखानाचें
संकट टळलें वदे भवानी, महान राष्ट्राचें
राजकारणी खरे धुरंधर, शिवबा संसारी ॥ ५ ॥

तोच आदर्श खरा आपुला मर्द मराठ्या रे
शिवरायाचें रूप आठवी, समर्थ वदती रे
खडा पहारा हवा नेहमी, सीमेवर वैरी ॥ ६ ॥

## २. जय शिवराया

'एक दिलाची सिंहगर्जना' १९७०  योगेश्वर अभ्यंकर

जय जय जय शिवराया, गुण तुमचे गातो
आम्ही चरण वंदन करतो ॥ धृ० ॥

पूजन करूनी स्वातंत्र्याचें
पालन केलें तुम्हि धर्माचें
ब्रीद राखलें परंपरेचें
युगपुरुषाचा मानहि देतो ॥ १ ॥

गनिगी कावा तुमचा घ्यावा
राजकारणीं रंग भरावा
संघटनेचा मंत्र जपावा
हेवादावा विसरूनि जातो ॥ २ ॥

प्रगतीसाठीं दौडत असतां
विश्रांतीस्तव कधीं थांबतां
नवी चेतना तुम्हीच देतां
घोडदौड मग आम्ही करतो ॥ ३ ॥

## ३. शिवरायाचें रूप आठवा

'एक दिलाची सिंहगर्जना'  —योगेश्वर अभ्यंकर

शिवरायाचें रूप आठवा, समर्थ वाणी वदते
घराघरांतुन आज इथें रे, नवी चेतना देते ॥ धृ० ॥

धन्य शिवाजी शूर मावळे
राज्य मराठी स्थापन केलें
पराक्रमाची अमर कहाणी, सिंहगडावर घुमते–१

त्यागाला रे सीमा नाही
पराक्रमाला तुलना नाही
सद्‌गुण त्यांचे नित्य आठवा, उज्ज्वल भविष्य घडते–२

स्वातंत्र्याचें जतन करावें
मंगल जीवन तुमचें व्हावें
शिवबाची रे जीवनगाथा, तारी जगतां येथें–३

## ४. धन्य शिवाजी रणी धुरंधर

'आकाशगाणी' डिसेंबर १९७९ —योगेश्वर अभ्यंकर

धन्य शिवाजी रणी धुरंधर
लढवय्या भारी
ज्योत फुलविली स्वातंत्र्याची
देशाला तारी ॥ धृ० ॥

शिवरायाचे शब्द झेलती
त्याच्यासाठी प्राणही देती
शूर वीर ते तानाजीसम
भूषण संसारी–१

अन्यायास्तव झगडा त्यांचा
तिटकाराही दरबाराचा
मर्द मराठे राज्य स्थापती
शक्ति युक्ती भारी–२

महान राष्ट्र तुम्ही घडविले
अवताराने पावन केले
जीवन तुमचे स्फूर्ति देते
अजूनि संसारी–३

# ५. धांव शिवाजी बाळ !

'काव्य-किशोरी' १९२८ —श्री किशोर (शंकर ब. चव्हाण)

धांव शिवाजी बाळ ! ॥ धृ० ॥
वीर तुझे ते होते गरजत !
अटकपार निज झेंडा मिरवत !
कोण दरारा त्रिखंड हदरत ! !
परि अजि सारा थोर पसारा जाय लया लडिवाळ !–१

करुन यत्न तूं जीवापाडें
ओसाडीचें उपवन केलें !
विहग-कूजितें विश्व डोललें !
तोंच आगिच्या डोंबाळामधिं होय तयाची राख !–२

ढाल अहा ! छातीची केली
असि-ऐक्याची स्वैर तळपली !
स्वातंत्र्याची दौलत झुलली
मनोहारिणी ! आज परि कुणीं कुठें पाहिली काय !–३

स्वीय पौरुषें मावळ प्रतिभट
दिपवित राजस तुझी राजवट;
आज परी ती होय मसणवट ! !
बळ न मनगटीं, धैर्य न पोटीं, क्लैण्यचि अपरंपार !–४

पुरी परांची पिकली पोळी !
बाळांहातीं आली झोळी !
दैन्य अति हें हृदया जाळी !
विमूढ झाली बाळें सारीं, बघवेना हे हाल !–५

गोजिरवाणी असाह्य बाळें !
प्रखर दास्य हें पुढें जळजळें !
दारुण दैना ! प्राण तळमळे ! !
ह्याय फाटक्या पदराखालीं कशी निवारूं त्यांस !–६

वाट बघूनी दमले डोळे !
शिवबा !–प्राणही कंठीं आले !
ही अंतीची घरघर चाले !
तोंच येउनी जाचांतूनी मुक्त कराया आज !

धांव शिवाजी बाळ !–७

## ६. शिव-गीत

**'गोदातटीचा गुंजारव' १९३० रामचंद्र वासुदेव कुळकर्णी**

शिवराया ! ये जनन पुन्हां घेवोनी ।
मागणी हीच तव चरणीं ॥
दिल दोस्त तुझी सारी मावळजात ।
भारीच काढिते खंत ॥
जिवप्यार तुझी माता तुजवांचोनी ।
बघ दिसते केविलवाणी ॥
(चाल) आधींच तनु कृश झाली ।
भर तशांत बंधनिं पडली ।
मग कोण तियेतें वाली ? ॥
चल धांव झणीं ऐश्वर्य तिला देई ।
डोळयांत प्राण कीं येई ॥ १ ॥

बघ रायगडी भगवा झेंडा झुरतो ।
दुःखाची गाणीं गातो ॥
त्या सिंहगडीं कडेकपारींमधुनी ।
उठतसे गर्जना अजुनी ॥
(चाल) ती अजब वारुची फेंक ।
शत्रूस पाडि जी धाक ।
मर्दानी वेश तो झोंक ॥
ही बघण्याला उत्सुक झाली भारी ॥
दख्खनची दुनिया सारी ॥ २ ॥

आनंद जिथें मूर्तिमंत कीं हसला ।
आम्हांस पारखा झाला ॥
स्मृतिचित्र तुझ्या काळाचें तें स्मरतां ।
फाटतें हृदय कीं आतां ॥
(चाल) नच मिळे सुखाचा वारा ।
डोळ्यांस लागती धारा ।
करुणा कर करुणागारा ॥
हे भगवंता ! करुणा ही येवोनी ।
शिवराया द्या धाडोनी ॥ ३ ॥

## ७. मावळ्यांचें गाणें

**'कांचनगंगा'** १९३० **गिरीश**

चला रायगडा शिवरायाचं दर्शन घेवूं ॥ धृ० ॥

ठेवुन् म्होरलं धोरण
ज्येनं बांदलं तोरन
संग घेवून मावळभावू ॥१॥

घेवुन् गडी दमदार
केलं दुस्मन ठार
त्येची युगत शिकाया जावूं ॥२॥

| | |
|---|---|
| बारामावळ रान | बांदून्श्येनी आरमार |
| धरमाचं निशान | घेर्‌ला समिंदर पार |
| ज्येनं रोवलं घेवून ठावू ॥३॥ | त्येच्या नौकेची किरत गावूं ॥४॥ |
| आईभनीसमान | मायबोलीचा जोर |
| परनारीस मान | करि दरारा थोर |
| ज्येनं देवून मिळवलं नावू ॥५॥ | त्येचा पवाडा ऐकत ऱ्हावूं ॥६॥ |
| भगवाझेंडा फिर्‌वून् | म्हराट्यांचा बाणा |
| जरिपटका मिर्‌वून | गेला गाजवून राणा |
| झाला समशेरीवर जो रावू ॥७॥ | त्येच्या समाधीवर फुलं वाहूं ॥८॥ |

## ८. शिवाजी

**'स्वातंत्र्यकवि गोविंदांची कविता'** **स्वातंत्र्यकवि गोविंद**

देशाचा पालनवाला । तो शिवाजी राजा झाला ।
धर्माचा रक्षणवाला । तो शिवाजी राजा झाला ॥ धृ० ॥

त्रिभुवनांत डमरू ज्याचें । नादतांच नंदी नाचे ।
जो परित्राण या भूचें । शंकर भोला ॥ १ ॥

गर्जते भवानी मेधा । चमकते भवानी खांडा ।
चाललाच भगवा झेंडा । रण-नाचाला ॥ २ ॥

तुकयाचा प्रेमळ वीणा । गहिंवरवी अंतःकरणा ।
करुणेच्या घेऊनि ताना । उठवी हरिला ॥ ३ ॥

प्रभु रामदास तो आला । राष्ट्राचा जादूवाला ।
मावळा मंत्रिला सगळा । भालेवाला ॥ ४ ॥

रणयज्ञ विजय-हेरंबा । पूजाया रणजगदंबा ।
तोरणा रणप्रारंभा । नारळ फुटला ॥ ५ ॥

त्या चंद्रराव मोऱ्याला । दास्याच्या सरदाराला ।
भूमिच्या मूर्त नरकाला । जाळा ! जाळा ! ॥ ६ ॥

तो विजापूरचा कोल्हा । वाघास दावि वागूरा ।
परि वाघनखीं तरवारा । दिसे न त्याला ॥ ७ ॥

खिंडींत शत्रुचे बाण । निज मरणावर तोलून ।
प्राणांत भूप झेलून । बाजी पडला ॥ ८ ॥

पूण्यांत राजवाड्यांत । खड्गाचि रात्र कुजबुजत ।
ऐकूनि मस्त शाहिस्त । पळूनि गेला ॥ ९ ॥

तो पुरंदराचा झगडा । तो मुरारबाजी लढला ।
हाताच्या करुनि ढाला । रिपु रोधीला ॥ १० ॥

तो औरंग्या दिल्लींत । शिवपवन धरीं डावांत ।
परि पवन डाव उडवीत । उडूनि गेला ॥ ११ ॥

मग सिंहगडाचें युद्ध । गड चढला वैभवसूर्य ।
रक्ताचे देउनि अर्घ्य । तान्हा गेला ॥ १२ ॥

किति असे वीर, वर्णावे । कितिजणां पवाडे गावें ।
कवितेनें ओवाळावें । कुणा कुणाला ॥ १३ ॥

श्रीस्वातंत्र्याची माला । वीरांनी गुंफुनि विमला ।
अर्पिली देशदेवाला । हरहर बोला ॥ १४ ॥

वैकुंठ रायगड केला । लोक तो देवगड बनला ।
शिवराजा विष्णू झाला । वंदन त्याला ॥ १५ ॥

# १. श्री शिववंदन

**' नाथ घाणेकर समग्र कविता '** खंड१ला १९४२ — **नाथ घाणेकर**

प्रताप वा शील रघुत्तमाचें
कृष्णानुगामीं नृपकाज ज्याचें
विदेह जो वैभविं वा विरागी
तो श्री शिवाजी नमिं अष्टअंगीं-१

सामर्थ्य जो निर्मुनि आर्यधर्मी
लावोनि तें थोर उदात्त कर्मीं
स्थापी स्वधर्मा जगदुत्तमांगीं
तो श्री शिवाजी नमिं अष्टअंगीं-२

ने मानवा जें पशुतेस पूर्ण
त्या पारतंत्र्या करुनी विदीर्ण
पाही महाराष्ट्र स्वराज्य भोगी
तो श्री शिवाजी नमिं अष्टअंगीं-३

भार्या रिपूची तरुणी शुभांगी
असाह्य हातीं जणूं ये कुरंगी
सत्कारि मातेसम तीजलागी
तो श्री शिवाजी नमिं अष्टअंगीं-४

दिल्लीपतीचे दृढ बंदिवासी
प्रवेश वा तेथुनि मोक्ष ज्यासी
लीला गमे जेंवि नटास रंगीं
तो श्री शिवाजी नमिं अष्टअंगीं-५

कौटिल्य नीतिज्ञ अगाध शक्ति
रिपुसि जो योजुनि योग्य युक्ति
दे अंतकाहातिं प्रतापदुर्गी
तो श्री शिवाजी नमिं अष्टअंगीं-६

पराक्रमें बुद्धिबळें नवीन
जें प्राप्त तें वैभव देइ दान
गुरुसि जो मोक्ष सुखानुरागी
तो श्री शिवाजी नमिं अष्टअंगीं-७

वाटे शठासी शठ, जो ऋजूसी
ऋजु; शिवें स्वार्थ न अल्प ज्यासी
परार्थ तो केवळ कष्ट भोगी
तो श्री शिवाजी नमिं अष्टअंगीं-८

## १०. शिवराय गीत

'मराठमोळा' १४-१-३९ —वि. द. घाटे

उगवला सुदिन अजि फार । करा साचार
महाराष्ट्राच्या कलिजाचा । शिवरायाचा जयजयकार ॥ धृ०॥

आठवा तयाचें रूप,
आठवा तसाच प्रताप,
आठवा तसा साक्षेप,
मग म्हणा महात्मा ऐसा कधिं कां पुनरपि अवतरणार ? ॥ १ ॥

स्फुर्तिमान पुढारी असले,
कां बनलां मग मागसले,
हें अशुभ विशेषण कसलें,
का मर्द मराठा हात कपाळावर ठेवुनि बसणार ? ॥ २ ॥

तो सिंहनाद ऐका रे !
द्वेषभाव विसरुनि जा रे !
ऐक्यानें पुढति सरा रे !
मग रायगडीच्या समाधिलाही समाधान होणार ! ॥ ३ ॥

## ११. श्रीशिवराजस्तोत्र

'मधुमाधव' २०-१०-१९२४ —वि. द. घाटे

दुही माजली, दैन्य आलें कपाळा,
मराठा मनीं लोभला मन्सबीला,
तदां जागवी जो महाराष्ट्र सारा
नमस्कार माझा तया बालवीरा—१

जिला पाहतां अप्सरेनें लवावें,
तिला पाहतां जो वदे शुद्ध भावें,
जरी लाभतें रूप हें माउलीला,
तरी प्राप्त होतें अहा! तें अम्हाला—२

जयें यावनी धर्म स्वीकारियेला,
तया हिंदु केलें दिलें आत्मजेला,
न केंव्हा दिला अंध रूढीस थारा,
नमस्कार माझा तया कर्मवीरा—३

असे विप्र, हा, शुद्र हा, हा अविंध,
असा ठेविला भेद ज्यानें न निंद्य,
समत्वें तयां योजिलें राष्ट्रकाजा,
नमस्कार त्या श्रीशिवाजीस माझा.—४

तपोभूमिका पाहुनी तेथ ठेला,
डुलूं लागला, अंतरीं तृप्त झाला;
उपाधी-शतांची स्मृतीहीन ज्याला
नमस्कार त्या राजयोगीश्वराला—५

जरी योजिलें कार्यभागीं जनांला,
पुढें सिंहसा धावला सर्व वेळां,
उभा ठाकला जो स्वयें झुंजण्याला,
नमस्कार त्या श्रेष्ठ लोकाग्रणीला—६

यशाची जिवाची न पर्वा कशाची,
सदा साधली एक सेवा जियेची
गुरुच्या पदीं वाहि त्या दौलतीला,
नमस्कार त्या राजसंन्यासियाला—७

नमावें तयाला, स्मरावें तयांला,
सदा आळवावें, भजावें तयांला,
म्हणावें, "महाराज! या एक वेळां,
पुन्हां आर्यभू बोलवी आपणाला!"—८

## १२. बाळ शिवाजीस

'प्रभा' ९-९-१९२७ —वि. द. घाटे

तुझ्या डोळ्यांत आज पाहिलें मीं
लाडक्या नवल एक नामी
तरल कल्पना आल्या गेल्या तशाच ज्या उडुनी
पाहिल्या त्याच तुझ्या नयनीं—१

तुझ्या ओठांत आयकिलें बा मीं
राजसा, गान एक नामी
ब्रह्मानंदीं अस्फुट गायन जें हृदयीं स्फुरलें
तें तुझ्या ओठांवर दिसलें—२

तुझ्या जोमांत आज पाहिलें मीं
शिवाजी, चित्र एक नामी
अभिनव भारतभूच्या भावी ओजाची ग्वाही
पाहिली तुझ्या बालदेहीं.—३

# १३. शिव-प्रताप

'स्वप्नलहरी' १९५३ माधव ज्युलियन्

भवानी आमुची आई, शिवाजी आमुचा राणा,
मराठी आमुची बोली, गनीमी आमुचा बाणा.
मराठ्यांच्या प्रदेशाचा कणा हा सह्यबंधारा,
कशाचा पारतंत्र्याला दऱ्याखोऱ्यांत या थारा ?
अडाणी मावळे काळे शिपाई शूर पाईचें,
उभे हे खांब पोलादी मराठी हिंदुशाहीचे.
अशांचा म्होरप्या सर्जा, म्हणूं द्या त्याजला चुव्वा,
परंतू शत्रूचा पाया खणूनी हा करी धुव्वा.
निघाला काळ अफझलखां धरूनी पोर आणाया,
पहातां तेज तें दैवी निमाली राक्षसी माया.
करी जो स्वत्व रक्षाया तयारी आत्मदानाची,
भवानी साह्य हो त्याला, गति स्वर्गीय मानाची.
शिवाजी दे भवानीला तमाचा पिंड दाणीला,
पहा हा चंद्र बीजेचा करूनी दाखवी लीला !
गडोंची वाजतां भांडीं उठूनी भांडली झाडी,
अनाथा म्लेंच्छ सेनेला न सोडी झोडुनी काढी.
हुडा हा पूर्व बाजूचा पुढारे देत ही ग्वाही—
प्रतापी हिंदुशाहीची इथूनी गाजली द्वाही.
स्वराज्यीं हिंदवी आतां मराठी काळ हा जाणा—
भवानी आमुची आई, शिवाजी आमुचा राणा.

# १४. भवानी आमुची आई । शिवाजी आमुचा राणा

'बालवीर गीतें' २ री आवृत्ती १९२९ —माधव ज्युलियन्

भवानी आमुची आई शिवाजी आमुचा राणा ।
मराठी आमुची बोली गनीमी आमुचा बाणा ॥

मराठ्यांच्या प्रदेशाचा कणा हा सह्य बंधारा ।
न कोठें पारतंत्र्याला दऱ्याखोऱ्यांत या थारा ॥

अडाणी मावळे काळे शिपाई हे शिवाजीचे ।
उभे हे खांब पोलादी मराठी सर्फराजीचे ॥

अशांचा म्होरक्या सर्जा म्हणे त्याला कुणी चुव्वा ।
करी आदीलशाहीचा प्रतापें आपुल्या धुव्वा ॥

निघाला काळ अफझलखां धराया कोंवळ्या पोरा ।
परी त्याचा कसा चाले भवानीच्यापुढें तोरा ॥

सदा स्वातंत्र्यलक्ष्मीची भवानीची कृपा तेथें ।
पडावी पेटल्या होमीं सदा स्वार्थाहुती जेथें ॥

भवानीलाच सर्जानें, दिला दाणीस तो म्हैसा ।
प्रतापाचा जणूं भानू, शिवाजी भोंसला ऐसा ॥

गडींची वाजतां भांडीं उठे झाडी पडे हल्ला ।
चमू आदीलशाहीची अखेरीला म्हणे अल्ला ॥

हुडा[1] हा पूर्वबाजूचा सदा देईल ही ग्वाही ।
प्रतापी हिंदुशाहीची इथूनी गाजली द्वाही ॥

---

१. बुरुज.

जहाली आमुची फत्ते खुशाली या करा गर्जा ।
भवानी आमुची आई शिवाजी आमुचा सर्जा ॥

---

(पृष्ठ क्र. ४३३ गीत क्र. १३ 'शिवप्रताप' व वरील गीत हे एकच आहे. परंतु काही ठिकाणी फरक असल्यामुळे ही दोन्ही दिली आहेत.

## १५. शिवाचें अमर स्फूर्तिमय गान

'दुंदुभि' —रंगनाथ ना. जोशी

शिवाचे अमर स्फूर्तिमय गान
तुझ्यामुळे त्या दऱ्या कपारी
महाराष्ट्राच्या भव्य पठारी
लढल्या ओतुनी प्राण.—१

मराठशाही तूंची स्थापुन
पालन केले तूं गो-ब्राह्मण
देश, धर्म अन् कर्म नितीस्तव
मृतास ये अवसान.—२

शक्ति, बुद्धि अन् युक्ति दानता
दुजा तुझ्याविण देव कोणता ?
रूपदर्शने जळे क्षीणता
रिपूस रूधिरस्नान.—३

परस्त्रीस तूं मानुनि माता
रक्षिल्यास नित पूज्य देवता
रामदास गुरू मार्ग दाविता
सत्याचा सन्मान.—४

ज्ञात ज्ञानी वरदान प्रभूचे
कृपाछत्र तुज तुळजाईचे
स्वप्न रेखिले लोकशाहिचे
आज मूर्तले जाण.—५

राजधुरंधर गाढ कल्पना
प्रेरित केले अष्टप्रधाना
बाहू तव द्वय बाजी-ताना
स्वराज्य स्फूर्तिस्थान.—६

अखिल भूवरीं चिरंजीवता
नव्या युगाचा भाग्यविधाता
त्रिवार गायिल त्रिभुवन गर्जुन
धवल कीर्ति गुणगान.—७

# १६. शिवजयंती

'भावकमल' १९७६        शंकर लक्ष्मण जोशी (गिरीशचंद्र)

वीरश्रेष्ठा शिवराया तुज वाहुनि सुमनांजली
स्मृती तव दिव्य मनी पूजिली

जातिवंत तूं खरा शोभतो, वीर मराठा गडी
दुष्मना लावि पार तूं तडी

गोब्राह्मणप्रतिपालक असुनी, अविंधास जिंकिले
नीतिचें तत्त्व जनां शिकविले

रक्त सळसळे नसानसांतुनि, तव राष्ट्र प्रीतीचे
झळकले तेज स्वयं स्फूर्तीचे

स्वराज्य गाठुनि भूषविला नव महाराष्ट्र देश हा
कापूनी शत्रू धैर्ये महा

गाजले शौर्य तव समरांगणीं
गनिमी कावा तूं लढवूनी
परस्त्री मातेसम मानूनी

वैभवगीतें तुझ्या यशाची, जन गाती आजला
थोर नृप तुजसम नच जाहला.

# १७. छत्रपती शिवराय

'हे बंध अंतरीचे' २०।३।१९७७ सौ. मनोरमा माधव जोशी

अलौकिक युगपुरुष झाले छत्रपतीशिवराय
सुपुत्र ऐसा जिने घडविला धन्य जिजाई माय

जिवावरीही उदार झाले एकनिष्ठ मावळे
बलिष्ठ शत्रू जिंकूनी त्यांनी स्वराज्य स्थापियले
प्रजाहितास्तव नित्य झटे तो सत्यवादी शिवराय

राजनीतिहि निपुण असोनी निःस्पृहता ती न्यायदानी
निर्भयतेला सदैव वरुनी मातृआज्ञा श्रेष्ठ मानुनी
शिवप्रभुला भाग्य लाभे रामदास गुरुराय

शूर-वीर अन् मुत्सद्दीही रसिकता परि मनी वसे ही
प्राणघातकी संकट येता धैर्यानेही न डगमगता
शहाजी-सुत हा साहस करुनी यशस्वितेचे योजी उपाय.

# १८. धन्य धन्य शिवाजी राजा

'हे बंध अंतरीचे' माधव बाळकृष्ण जोशी

धन्य धन्य शिवाजी राजा झटला प्रजाहित काजा
वाहिली शपथ मंदिरी जमविले मावळे शूर
स्थापिन स्वराज्या परि घेऊनि भवानी तलवार
दुमदुमली ती रणभेरी ठावे न कधी माघार
हरहर महादेव हो गर्जा–१ प्रेरणा देतसे जीजा–२

सत्यनिष्ठ धीर अन् वीर
युगपुरुष जाहला थोर
जणु शिवाचाच अवतार
तज्ञ-सूज्ञ-न्यायी हा राजा–३

जिंकिले गड अवघड
पराक्रमासी नाही तोड
शक्ति-युक्ती-बुद्धी अजोड
फोडिला तिमिर दरवाजा–४

राज्याभिषेक तो करविला
ध्वज-दिन साजरा केला
आनंदी-आनंद जाहला
शतवार नमन महाराजा–५

## १९. अंजलि शिवराया

'सावरसुधा' १७।१०।१९८२ सौ. शालिनी जोशी

देशभक्तिची सदैव वाहे हृदयांतुन सरिता;
छत्रपतींचा आदर्शचि हा मम देशाकरिता—१
करि तलवार असा हा स्वार नि स्वाभिमानि मूर्ती;
देशहिताची तळमळ लागुनि मिळो अम्हां स्फूर्ती—२
शूर, वीर अन् पराक्रमी जणुं सिंहाचा छावा;
ज्येष्ठ रिपू पण जाय धुळीला उलटताच कावा—३
तडफदार ती वृत्ती आणीक चीड असत्याची;
राष्ट्र विकासा अशीच दृष्टी हवीच नेत्याची—४
प्राण पणाला लावुन लढला मिळविण्यास राज्य;
नेमुनि देशी अष्टप्रधाना घडिलें हो राज्य—५
धन्य शिवाजी धन्य मावळे धन्य भारताची;
प्रणाम तुम्हां अर्पुन भावें अंजलि सुमनांची—६

## २०. शिवाजीस

'मोहर' १९४१ | गं. वि. ठेकेदार

कृष्णापरी धोरणी थोर, मंत्री योद्धा रणामाजि पार्थापरी
रामापरी न्याय निःपक्षपाती औदार्य कर्णापरी अंतरीं ॥
इंद्रापरी थोर सत्ता दिगंती वैराग्य चित्तीं विदेह्यापरी
हातीं कुबेरापरी लक्ष्मी वाचस्पतीतुल्य वागीश्वरी ॥ १ ॥

प्रल्हादबाळापरी गाढ भक्ती कार्यी ध्रुवासारखी निश्चिती
भीमापरी अंगीं शक्ति प्रचंड नम्र स्वभावें जणू मारूती ॥
कामावरी क्रोध सारा मनींचा लोभासवें सर्वथा मत्सर
गर्वासवें दाविसी दंभ लोकीं ऐसा खरा राजयोगीश्वर ॥ २ ॥

ओतून सद्गुण सारे जगींचे मूर्ती प्रभूने तुझी निर्मिली
पुण्याइ सारी जणूं हिंदभूची साकार रूपें तुझ्या जाहली ॥
ठेचून औरंग झोटिंगशाही हिंदुत्व तूं रक्षिलें संगरीं
माझ्या महाराष्ट्र-स्वातंत्र्य-सूर्या ! कीर्ती प्रकाशे तुझी अंबरीं ॥ ३ ॥

## २१. श्री शिवछत्रपती

'श्रीदत्तांची कविता' | कवि दत्त

हिरण्यकश्यपु दानवशेखर महीवरी मातला
छळाया हरिभक्तां लागला.
साधुजना अल्हाद पुत्र प्रल्हाद रत्न भूतला,
स्मरे हरि म्हणुनि छळी त्याजला
खरतरनखशिखरांनीं रोषें उदरभाग फाडिला,
नृसिंहें साधुवृंद रक्षिला.

तैसाच शिवाजीराय मला भासला,
अफजूलखान जो यवन जगीं मातला,
शिवजीवितहरणीं दुष्ट सिद्ध जाहला
वाघनखें उदर विदारुनि निजधामां धाडिला,
दुजा नरसिंह जनां लाभला.

## २२. जयजयकार करा

'साबरसुधा' १७-१०-१९८२ तु. म. दर्प

जयजयकार करा, जयजयकार करा
छत्रपती श्री शिवरायाचा जयजयकार करा ॥ धृ० ॥
कीर्ति-पताका फडकत आहे तेजानें अंबरीं
शिवशाहीच्या बादशहाला मानाचा मुजरा ॥ १ ॥
हिंदुराज्य स्थापिलें जयाने या धरतीवरती
गोब्राह्मणप्रतिपालक म्हणूनी झाला प्रिय जगती ॥ २ ॥
सह्याद्रीच्या कड्याकपारीं अजुनी घुमतो नाद
शाहीरांच्या शौर्य-गीतांनी दुमदुमते ही धरा ॥ ३ ॥
शूर वीर अन् संतांचा हा देश महाराष्ट्र
संकटकाळी धावुन घेती तळहातावरी शिरा ॥ ४ ॥
दगडांचा अन् खडकांचा हा देश असे आमुचा
मराठमोळ्या दणकट बळकट थोर दिलाचा खरा ॥ ५ ॥
भीमा, गोदा, कृष्णा जैशा पवित्र महान नद्या
सुजलाम् सुफलाम् सिद्ध कराया महाराष्ट्राची धरा ॥ ६ ॥
शक्ति, युक्ति अन् बुद्धिबलावर स्थायी राजा हा
धन्य जिजाई पुत्र शिवाजी पावन केली धरा ॥ ७ ॥

पुण्य-प्रतापी अन् बलशाली योगीराज शिव हा
शत शत वंदन करुनी तयाचे प्रातःस्मरण करा ॥ ८ ॥

झालेत बहु, परि शिवरायासम झाला ना कोणी
येईल का त्राताच भारतीं घेऊनि अवतारा ? ॥ ९ ॥

## २३. रायगडचें सिंहासन

'भावलेखा' १५-११-१९३४ श्री. ग. दाढे

सम्राट महाराष्ट्राचा, सिंहासनीं जेंव्हा बसला
दुर्दांत काळ यवनांचा; स्वातंत्र्यवीर शिव झाला
गोब्राह्मण प्रतिपाळाया, श्रीसमर्थगुरुचा चेला
हादरले शार्दुल बाके
दिल्लीश मनांतुन वचके
यावनी राज्यही तडके
अशरीरीणि वाणी वदली—"शककर्ता श्रीशिव झाला"–१

त्या स्वतंत्र तख्ताखालीं गडपले दुष्ट सैतान
पोलादी छातीचेही, तळखडे हुतात्मे प्राण
जागवी महाराष्ट्राला स्वातंत्र्यध्वज फडफडुन
अभिषेकसमयीं सदरेंत
गातात बंदी जयगीत
जन अभिष्ट-चिंतन करित
घोषणा भिडलि आकाशीं—"शककर्ता श्रीशिव पहिला"–२

त्या कडेकपारीतून दुमदुमे नाद 'स्वातंत्र्य'
लंगोट्या मरगठ्ठयांत खेळले बोल 'स्वातंत्र्य'
तख्तातुन रायगडाच्या पसरले किरण 'स्वातंत्र्य'

हा महाराष्ट्र राखाया
हिंदवी धर्म वाढाया
परदास्य-पाश तोडाया
"अवतरला" वाणी वदली—"शककर्ता श्रीशिव पहिला"–३

तें स्वातंत्र्याचें तख्त भंगून आज फुटलेलें
स्वर्गात राजराजेश हें महाराष्ट्र काजळलें
बघतां ते वीर गुलाम शाहीर हृदय मेलेलें
"शिवराज ! पुन्हां छत्रांत
जमवूनी मावळजात
व्हा रायगडीं अभिषिक्त"
ऐकला नाद नभिं भरला—"शककर्ता येइल पहिला"–४

## २४. कृपा ही श्री शिवरायाची

'श्रीशिवगीतांजली'(शिवकाव्य) ७।५।१९७० प्रा. स. ना. दिक्षित

ज्योत पाजळे आज आमुच्या मनी अस्मितेची
कृपा ही श्री शिवरायाची ! ॥ धृ० ॥

इथे विजिगिषू शिवरायाने यवनां जिंकियलें
शक्ति युक्तिने नवे 'हिंदवी स्वराज्य' स्थापियले
भारतवर्षा मिळे सावली या वटवृक्षाची ! ॥ १ ॥

परवशतेची निशा पसरता आमुच्या देशात
तुवा दाविले कसे लढावे त्यजुनि जात-गोत
भेट मिळाली आज आम्हाला समर्थ राष्ट्राची ! ॥ २ ॥

इथे यावनी परधर्माचे संकट कोसळलें
गायि-ब्राह्मणां, सती-सज्जनां अभय तुवा दिधले
प्रतिष्ठापना पुनरपि झाली इथे स्वधर्माची ॥ ३ ॥

आज घरोघर पवित्र ब्राह्मण वेदघोष करिती
भारतवर्षी कोटि हिंदुजन रामायण गाती
करिती पारायणे घरोघर महाभारताची ॥ ४ ॥

दिव्य मंदिरी प्रशांत हंसती आज देवमूर्ती
रत्नदीप ही पूजा करिता अनंत पाजळती
आज झळकती सुवर्ण-शिखरे उंच गोपुरांची ॥ ५ ॥

आर्यांच्या संस्कृतिला लाभे नवीन वरदान
हिंदुजनांचा अहो राहिला हा हिंदुस्थान !
ललाटरेषा दिव्य उजळली भारतवर्षाची ! ॥ ६ ॥

मातेपरी त्या सुभेदारच्या सुनेस गौरविले
धर्मग्रंथां, मशिदीनांही सादर भूषविले
सहिष्णुता ही विश्वोद्धारक तव आदर्शाची ॥ ७ ॥

स्वराज्यामधे हवी कुणाला यवनांची भाषा
राज्याच्या व्यवहारासाठी रचिले निजकोशा
समर्थ वाणी आज जाहली माय मराठीची ! ॥ ८ ॥

कशी करावी देशावर वा धर्मावर प्रीती
राज्यशासनीं तुवां शिकविली शिस्त, न्याय, नीती
उसळे आमुचे रक्त-पाहुनी कृती अन्यायाची ॥ ९ ॥

तुफान उठता राष्ट्रजीवनीं आरुढ वर व्हावे
तुवां शिकविलें कसें नियंत्रण त्यावर ठेवावे
उर्जस्वल जाहली प्रतिष्ठा भारतवर्षाची ! ॥ १० ॥

## २५. शिवबा झाले छत्रपती

'काचड' जून १९६४ पांडुरंग दिक्षित

साद घालिता साथ मिळाली पथापथावरती ।
शिवबा झाले छत्रपती ॥ धृ० ॥

जिजामाइचा नित सहवास
प्रेमळ छत्र तिचे शिवबास
घांस घांस भरवितां पढविला शूरांचा इतिहास
स्फूर्ती देऊनी, मूर्ती घडविली जगन्नायका प्रति ॥ १ ॥

दादोजी सम गुरू लाभला
पैलु पाडुनी हिरा घडविला
महाराष्ट्राच्या मुगुटामध्यें नेउनि जडविला
युक्ति, शक्ती, भक्तितुनि दिधली महाराष्ट्र संस्कृती ॥ २ ॥

योग असावा योगी दिसावा
"जय जय रघुवीर" मंत्र मिळावा
समर्थ आशिष देतां भगवा झेंडा फडकावा
विभूतिंच्या उक्तितुन स्फुरली दख्खनची क्रांति ॥ ३ ॥

धन्य मावळे शूर सावळे
भक्त शिवाचे भाविक भोळे
प्राण पणाला लावुनि लढले स्वामिप्रेम आगळे
कृतिकृतींतुन स्मृति राखिली गडागडावरती ॥ ४ ॥

आई भवानी महन्मंगला
प्रसाद देइ शिवप्रभुला
खड्ग भवानी विजयश्रीची मूर्तिमंत माला
दिव्य दृष्टीतून कृपावृष्टी करी रणांगणावरती ॥ ५ ॥

## २६. "असा तो होता शिवराणा"

'समाज पत्रिका' (अहमदाबाद) सौ. आशा नावलेकर

कीतीक आमुच्या शिवरायाच्या कथा सांगू हो तुम्हा
कसा तो होता शिवराणा........धृ०

एक काळ जो ऐसा होता, महाराष्ट्र तो स्वतंत्र नव्हता
त्याच वेळी हा जन्मा आला पुत्र गुणी देखणा.

जिजाईच्या अंगावरी खेळे, राजस गोंडस बाळ गोजिरे
होईल कर्दनकाळ शत्रूचा माहीत नव्हते कुणा.

शिवनेरीवर जन्मा आला, भोसले कुळा भूषण झाला
महाराष्ट्राचा राजा होण्या, सर केला तोरणा.

मुलुख मराठी यवनी ग्रासिला, हिंदुधर्म संकटात पडला
षोडश वर्षी मोंगलास तो, धाडी यम सदना.

सह्याद्रीच्या कड्या कपारी, बाळपणी मावळे मित्र करी
दांडपट्टा, तलवार खेळतो, मऱ्हाठी हा बाणा.

बाल, वृद्ध, स्त्रियांचे रक्षण, ध्यास लागला मनि रात्रंदिन
जिजाबाई दादांची शिकवण करी जनकल्याणा.

न्याय, नीती, पावित्र्य, प्रेमही, उच्च गूण ते त्यांचे हृदयी
अष्ट प्रधाना नेमूनी राज्यी, सुराज्य दावी जना.

रायगडावरी राजा झाला, जनतेचा कनवाळू बनला
गो, गरीबांचा रक्षक झाला, मानी थोर ब्राह्मणा.

# २७. श्री शिवराय गीत

'काव्यकौमुदी' ७-१०-१९२४ मधुसूदन आबाजी निजसुरे
(पुष्पविहारी)

धन्य शिवनृपा! धन्य नरवीरा! महाराष्ट्रनायका!
राजया स्वराज्यसुखदायका
यशोगीत तव गात आदरें जनता, जनपालका ।।
महाराष्ट्र-भू भोगी अतिशय पारतंत्र्य यातना ।
दुःख हें जाळी प्रत्यहिं मना
दास्यशृंखला जडली चरणीं जाची ती क्षणक्षणां
नाश कराया घोर, घातकी परवशतेची सुरी । लागली महाराष्ट्र कंधरीं
निराधार, निर्बला जनांतें ठार करी तो, अरी
सत्ताधारी कठोर हृदयी नाही त्यांना दया । ये कशी? पाषाणांतें दया
छळिती, पिळिती अधिकारमदें महाराष्ट्रवासियां
तयांची दाद झणीं लाविण्या । संकटां वेशीवर टांगण्यां
शत्रुला मागे परताविण्या । काढण्या दास्याच्या तोडण्या
धांवलासि तूं आनंदानें महाराष्ट्रनायका!—१

धर्मावरती पडतां घाला नेती परके लया । शत्रु ते बुडवूं बघती तया
दिसे न कोणी संकटांतुनी त्यातें तारावया
गो-ब्राह्मण गांजले अतिशय वाली त्यां नच कुणी ।
जाच अति होत सदा निशि-दिनीं
हानि चालली क्रूरपणानें मत्त अशा परजनीं
पारतंत्रता-परकी सत्ता-परदास्याची घडी । नागवी सर्वस्वां तांतडी
लावितसे घ्यावया जनांतें अग्नीमाजीं उडी
अशातें पायबंद घालण्या । सत्वरीं हद्दपार धाडण्या
समूळ हें देशदैन्य वारण्या । रिपूंतें पायदळीं तुडविण्या
सिंहगर्जना करित धांवसी! महाराष्ट्रनायका!—२

मर्द मराठे; शूर मावळे; एक ठाई जमविले। वाक्य त्या स्वतंत्रा बोधिलें
रणांगणिं तयें देशहितास्तव निजदेहा अर्पिलें
मर्दूनि शत्रू; तुडवुन दास्य; स्वराज्य त्वां स्थापिलें।
सत्वरीं स्वातंत्र्या मिळविलें
महाराष्ट्राचे विजयी भगवे निशाण तूं उभविलें
हिंदू-धर्म-धेनू-विप्रां संकटांत तारिलें। राजया प्रेमें उद्धारिलें
निर्दाळोनी अधमांतें; त्वां अभय तयां दीधलें
जयश्री माळ तुला घालते। दशदिशा ग्वाही तव गाजते
सत्य हें धर्मराज्य वाटतें। छत्रपती नांव सार्थ शोभतें
कीर्ति ऐशी दुमदुमे तुझी महाराष्ट्रनायका !—३

धन्य गुरु रामदास! धन्य माय जिजाऊ सती!
जयाचे हिता सदा जागती
शूर-वीर गडी जिवा जपाया असति सदा संगतीं
आनंदानें; निर्भयतेनें; प्रजा सर्व डोलते। सुखानें शांतपणें नांदते
शिवराज्य खचित रामराज्य प्रति असें जनां वाटतें
स्वराज्यविभवें स्वदेश सजला वर्णावा तो किती।
लिहाया दिसती नाना रिती
स्वातंत्र्याच्या झडति नौबती सांगाया ती धृती
उभविसी धर्माचें मंदिर। स्थापिसी न्यायाचें आगर
राखिसी सौख्याचा सागर। तुजविशीं अतर्क्य लोकादर
स्वदेशभालीं स्वातंत्र्यतिलक लाविलासि नायका !—४

अल्पमती मी असमर्थ असे यशोगीत वर्णना।
पुरवि जो स्वराज्य-सुख-कामना
अल्पगीरा परी अर्पण करितों स्नेहें बंधूजनां
वाक्सुमनांचा हार घालितों स्वदेश-उद्धारका।
छत्रपति महाराष्ट्र-पालका!
पुष्पविहारी, प्रणाम करि तुज स्वराज्य-संस्थापका!!—५

## २८. जय जय जय शिवराया

'स्फूर्तिगीते' १९७२ —राजा बढे

दख्खनच्या हे प्रतापसूर्या जय जय जय शिवराया

मायभूमिच्या महन्मंगला महाराष्ट्राच्या कलिजा
रायगडाच्या राजा देवा सह्याद्रीच्या सरजा
शिवनेरीच्या शिवाजिवाची कुरवंडी तव पाया ॥ १ ॥

दिशादिशांतुनि आज तुझ्यावर तेजाची झिरपणी
नभोदुंदुभी झडत आली ही मंगल पर्वणी
तरंग गाती पुरुषसुक्त हे लोळण घेई दर्या ॥ २ ॥

हृदयाचा बांधला पाळणा जोजविते अंगाई
धन्य जाहली धरती भोळी तुझी मराठी आई
स्वातंत्र्याचें बाळरूप हें कुशीत संगोपाया ॥ ३ ॥

उभा रायगड अभिमानाने उंच उभारूनि माथा
कडेकपारी ती दुमदुमते स्वातंत्र्याची गाथा
दगडा दगडा फुटल्या जिव्हा तुझा पराक्रम गाया ॥ ४ ॥

तूच प्राण अभिमान आमुचा युगपुरुष शिवराया
सहस्र कंठांतुनि प्रभु हे शिवमंगल तुज गाया
महाराष्ट्र जाहले आज हे तुझ्या कृपेची छाया
दख्खनच्या हे प्रताप सूर्या जय जय जय शिवराया ॥ ५ ॥

# २९. शिवराय छत्रपती झाले

'मंदिका' —राजा बढे

या स्वराज्य सिंहासनीं
वीर नरमणी-धन्य हो अवनी
की उदंड झाले पाणी, आनंदवनभुवनी
हे बारा मावळ आनंदाने न्हाले
चैतन्य अधिष्ठित झाले
मांगल्यच मिरवित चाले
पदि सुवर्ण पसरि मृणाले
जन उत्साहाने धाले
शिवराय छत्रपती झाले.

दशदिशा करिती आरती
नक्षत्रे तारा तती
मंगलाक्षता उधळती
रवि चंद्र निरांजन हाती घेऊनि आले
शिवराय छत्रपती झाले.

सुर सरिता सिंधू ब्रह्मपुत्र वरदायी
यमभगिनी यमुना पावन गंगामाई
श्री राघव पदरज धूता शरयू येई
नर्मदा पयोष्णी घेऊनि ये पुण्याई
भद्रावति चंद्रा वरदा पूर्णामाई
कावेरी गोदा तुजला मंगल गाई
त्या भिवरा भीमा शुभाशीश द्यायाही
ती वरदहस्तिनी तुझी भवानी आई
की मुळा मुठाही गहिवर भरुनी वाहे
आनंद सोहळा बघुनी जीवन धाले
शिवराय छत्रपती झाले.

तीर्थोदक शीर्षी भरली अमृतमाया
जल कलश करिति मधुपर्क तुला शिवराया
आसिंधुसिंधुपर्यंत कीर्त पसराया
अभिषेक कराया सातहि सागर आले
शिवराय छत्रपती झाले.

ये अरुण अष्टदिक्पाल चामरे धरिती
नभछत्रमेघडंबरी धरी तुजवरती
नेत्रांचे कुतुहल दीप भवति झगमगती
कविभूषण चारण तव बिरुदावलि गाती
शिवराज सिंह हा गजेंद्र झुंडीवरती
घेताच झेप तें दास्य भिऊन पळालें
शिवराय छत्रपती झाले.

नृप छत्र धरी शिवराय शिरी
नित ढाळित चामर चंद्र करी
गजराज डुले, चतुरंग दले
नर रत्नमणी लढती समरी
गिरिकंदर गर्जित मुक्तस्वरे
वनराज निनादित दूर्ग दरी
समता ममता सुख मानवता
जनता तव ही जयकार करी
धन-दौलत सुखत्री नरा, माय लेकरा
प्रजेला थारा—भेद नच काही
सारेच सारखे पाही
हे उदंड झाले पाणी-लोक वाखाणी, सत्य हो वाणी
गो-ब्राह्मण भूप्रतिपालक जगी अवतरले
स्वातंत्र्य रक्षणा जाण द्यावया प्राण,
सज्ज संतान मराठी भाले
शिवराय छत्रपती झाले.

## ३०. छत्रपती शिवराज

'शिंग फुंकिले रणीं' १७-१०-१९४२ —वसंत बापट

समरात उभा हा शेर, फिरे समशेर, काय हे तेज
दुंदुभी दुमदुमे नभीं, यमाला न भी धन्य शिवराज.

हा डोंगरातला चुव्वा
गनिमाचा उडवी धुव्वा
अवतरे नवा अवतार करी संहार खलांचा आज
हा धन्य धन्य शिवराज—१

वाजताच याचा डंका
जुलुमाची जळली लंका
शंका न शहाला उरे, कांपरे भरे, ढळे शिरताज
हा धन्य धन्य शिवराज—२

संगती सोबती आले
हातात झेलुनी भाले
ते शूर मावळे गडी, उरीं घोंगडी, फाटका साज
हा धन्य धन्य शिवराज—३

पावली भवानी आई
शिरीं छत्र धरी तुळजाई
जय छत्रपती शिवराज, गरीबनवाज, घुमे आवाज
हा धन्य धन्य शिवराज—४

## ३१. शिवाचा झाला जयजयकार

'शिंग फुंकिलें रणी' १७।१०।१९८२ —वसंत बापट

रायगडाच्या माथ्यावरुनी आज उठे ललकार
सिंहासनिं शिवराय बैसले, झाला जयजयकार
शिवाचा झाला जयकार.

संपला घोर अंधार घनदाट अमावास्येचा
स्वातंत्र्यसूर्य ये उदया अंबरीं रंग आशेचा

जय महाराष्ट्रमातेचा
जय अभिमानी जनतेचा
जय बोला छत्रपतींचा
आकाशातुन दहा दिशांतुन घुमला स्वरझंकार
शिवाचा झाला जयजयकार.

नितीच्या वेदीवरती शिवबाचें सिंहासन हे
शक्तीसह नांदे भक्ती न्यायाचे आश्वासन हे

विक्रमासवे विनयाचे
विभवासह वैराग्याचे
हे स्थान राजयोग्याचे
आदर्शांचा अक्षय ठेवा, सत्याचा सत्कार
शिवाचा झाला जयजयकार.

चांदवा निळ्या गगनाचा    नक्षत्रमण्यांनी सजला
अवकाश विश्वसदनाचा    आनंदघनाने भिजला

ये स्वर्गसुखाचे पर्व
तोम् तनन गाति गंधर्व
धरि ताल चराचर सर्व
कोटि कोटि कंठांतुन उसळे हृदयाचा हुंकार
शिवाचा झाला जयजयकार.

नभि वाजे मृदंग, जन हर्षात दंग, उठे तालतरंग
लाख हृदयांतुनी
याच्या कीर्तीचा रंग, सदा राही अभंग, गुण गाण्यांत गुंग
झाले सारे गुणी
शिवरायाचे नाम, हे आमुचे इनाम, इथे या रे तमाम
हिंद देशातुनी
शिवरायाचा जय, मिळे आम्हां अभय, स्वर्गपृथ्वी उभय
त्याच्यापुढे उणी.

# ३२. माय भवानीची आरती

'शिंग फुंकिलें रणीं' १७।१०।१९८२ वसंत बापट

जय अंबे जगदंबे जय तुळजामाई
शरणागत भक्तांवर करुणा कर आई.

दुमदुमवी गीत तुझे दख्खनचा वारा
हर्षी मरहट्टयांच्या हृदयीं गाभारा
गोदा कृष्णा गाती गंधांकित गाथा
मंगल मंदिर सुंदर सह्याद्रि-माथा
कळस तुझा सोन्याचा गिरि कळसूबाई.

सिंहासन सत्ताविस गडकोटांवरती
पायतळीं पायघडी मउ काळी धरती
पांगारे-पळसांच्या चवऱ्या तुजभवती
भरलेल्या कणसांच्या पालेत्यांच्या ज्योती
जळते संकटसमयीं समशेरच समई.

माथ्यावर रत्नांची करवंदी जाळी
असुरांच्या रक्ताचे कुंकुम तव भाळीं
निढळाच्या मोत्यांची तव कंठीं माळा
नामश्रवणें केवळ धडकी कळिकाळा
छळणारे खळ घालति लोटांगण पायीं.

तुझिया पूजेसाठी मेघांची भेरी
अभिषेका हस्ताच्या धारांची झारी
रविचंद्रांच्या झांजा वाजति अवकाशीं
मायभवानी दर्शन दे हृदयाकाशीं
मोक्षाचा वर वरदे विश्वाला देई.

## ३३. मुद्रा भद्राय राजते

'कांचनसंध्या' ३०-११-१९८१ बा. भ. बोरकर

आषाढी अमवास्येला देशाचे देखुनी तडे
सांकडें पडलें तुम्हां हिंडता गव्हरें-कडे;
पारणें फेडिलें तुम्ही झाडुनी आमुचें उणें,
'अहं'चा कापुनी रेडा भवानी न्हाणिली क्षणें;
लाभतां कौल खड्गाचा दर्शनीं देखिल्या विजा,
घेतले शक्तिचे ताळे, रेखिल्या बेरजा-वजा;
जोडिले कुणबी कष्टी होते जे पार मोडले,
आउतें आयुधें केलीं, तृणांनी दात तोडिले;
त्यांचेच वळुनी रज्जू तख्तांचे पिळिले कणे,
आसेतु वाजला डंका, साजलीं ध्वज-तोरणें;
गायींचा वाढला चारा, विप्रांच्या रुजल्या ऋचा,
विक्रमाप्रति एकाच्या अंबेच्या फुटल्या भुजा;
ओसाडीं थाटिलें नेटें आनंदवनभूवन,
बोलला "श्रेय सर्वांचें, श्रीचें राज्य सनातन."
भूषणें गायिला गाथा, गागा संतोष पावले,
समर्थें पाहिलें स्वप्न, लोकीं साक्षात जाहलें;
पुण्यश्लोक असा राजा न युगीं श्रुति गाजते,
लोक सिंहासनीं तेणें मुद्रा भद्राय राजते;
संतत्वें धरितां खड्ग भू सूये स्वर्ग देखणा,
दीक्षेने तुमच्या येथें असा योग कधी पुन्हा ?

# ३४. जय जय भारतवर्ष

'बोबडे यांची कविता' १९३७ श्रीनिवास रामचंद्र बोबडे

जय जय भारतवर्ष जय जय महाराष्ट्र देश
धन्य पुण्यभू नांदला जेथें शिवाजि नरेश.—१

धन्य शहाजी भोसला धन्य जिजाई माय
ज्यांचें पोटीं जन्मला छत्रपती शिवराय.—२

धन्य धन्य शिवनेरीगड धन्य मावळे वीर
जेथें बालक खेळला शिवराजा गुणधीर.—३

धन्य महात्मा दादोजी देशभक्त गुरुराज
शिष्य जयाचा जाहला राजराज शिवराज.—४

ते नेताजी तानाजी धन्य धन्य नरवीर
नायक ज्यांचा वीरमणी शिव संगरगंभीर.—५

धन्य सिंहगड, रायगड, प्रतापगडही धन्य
शिवपद माथां धरण्याचें अगाध ज्यांचें पुण्य.—६

धन्य तारका धन्य नभ धन्य धन्य शशिसूर्य
नेत्रांना ज्यांच्या दिसलें शिवभूपांचें शौर्य.—७

गंगा यमुना जलनिधि धन्य गिरी हिमवान
ज्यांचें शिवकीर्तिश्रवणें पवित्र झाले कान.—८

धन्य दऱ्या, धन्य खोरे, वन धन्य नद्या, नाले
शिव वीराच्या सहवासें पवित्र जे झाले.—९

धन्य मराठे लोक हे धन्य मराठा देश
ज्यांच्यासाठी धावुनी घे अवतार महेश.—१०

# ३५. शिवाबावनी*

(कविराज भूषणकृत 'शिवाबावनी 'चें मराठी रूपांतर)

'शिवप्रताप' एप्रिल १९२८ दु. आ. तिवारी

अफजलखानको जिन्होनें मयदान मारा,
बीजापूर गोलकुंडा मारा जिन आज है
भूषन भनत फरासीस त्यों फिरंगी मारि,
हबसी तुरक डारे उलटि जहाज है.
देखत मैं रुसतमखाँको जिन खाक किया,
सालकी सूरति आज सुनी जो आवाज है
चौंकि चौंकि चकत्ता कहत चहुँधा ते यारो,
लेत रहौ खबरी कहाँ लौ शिवराज है.

बाहुप्रतापें रणीं अफजुलाला उभा फाडिला, पाडिला तो बळी !
जाणो विजापूरच्या मंदिराचा उभा पाडिला स्तंभ भूमिस्थळीं !
हब्सी फिरंगी फरासीस यांची जहाजें जली पालथी घातली !
'आला शिवा कोठपर्यंत सांगा' शहाच्या मनी काळजी लागली ! १६

उतै पातशाह जूके गजनके ठट्ट छुटे,
उमडि घुमडि मतवारे घन भारे है
इतै शिवराज जूके छुटे सिंहराज कैंधो,
बिदारे कुंभ करिनके चिक्करत कारे है.
फौजे शेख सय्यद मुगल औ पठाननकी,
मिलि इक्कलास काहू मीर न सम्हारे है
हद्द हिंदुवानकी बिहद्द तरवारी राखि,
कैयो बार दिल्लीके गुमान झारि डारे है.

वेगें मराठ्यांवरीं बादशाही करी पातले कृष्ण मेघापरी !
सह्याद्रि-राजेश्वराचे पहाडी रणीं धांवले सिंह त्यांच्यावरी !
फौजा पठाणी अमीरी पळाल्या, सुभा रक्षण्याला न कोणी उभा !
रक्षून सीमा महाराष्ट्र-भूची, कितींदा करी म्लेंच्छ हीनप्रभा ! १८

डाढीके रखैयनकी डाढी सी रहति छाती,
बाढी जसहद मरजाद हिंदवाने की
कढि गई रैयतिके मनकी कसक सब,
मिटि गई ठसक तमाम तुरकाने की.
भूषण भनत दिल्लीपति दिल धकधका,
सुनि सुनि धाक शिवराज मरदानेकी.
मोटी भई चंडी बिन चोटीके चबायशीस,
खोटी भई संपति चकत्ताके घरानेकी.

दाढी जयांच्या मुखीं, दाह त्यांच्या हृदीं लाविला, कीर्ति संवर्धिली !
लोकांतरी भीति सारी उडाली, अमीरी मिटे ऐट तुर्कांतली !
कानीं पडे नांव हें जो ' शिवाजी ' भयानें उठे झोपलेला शहा !
चंडी बळी खाउनी पुष्ट झाली, जडे शाह-वंशीं विपत्ती महा ! ३०

इंद्र जिमि जंभपर बाडव सुअंभपर,
रावन सदंभपर रघुकुलराज है
पौन वारिवाहपर शंभु रतिनाहपर,
ज्यो सहस्रबांहपर राम द्विजराज है.
दावा द्रुमदंडपर चीता मृगझुंडपर,
भूषन वितुंडपर जैसे मृगराज है.
तेज तम अंसपर, कान्ह जिमि कंसपर,
त्यों म्लेंच्छ वंशपर शेर शिवराज है.

जंभावरी इंद्र, लंकापतीच्यावरी कीं जसा जानकीचा पती,
मेघावरी वायु, कामावरी कीं महादेव–ज्याची तपाची रती,
दुःशासनाच्यावरी भीम, किंवा कन्हैय्या जसा दुष्ट कंसावरी
हा भोसले भूप गाजी शिवाजी तसा भूतळीं म्लेंच्छ वंशावरी ! ४१

शुक्र जिमि शैलपर अर्क तम फैलपर,
बिधनकी रेलपर, लंबोदर लेखिये
राम दशकंधपर भीम जरासंधपर,
भूषन ज्यों सिंधुपर कुंभज बिसेखिये
हर ज्यों अनंगपर गरुड भुजंगपर,
कौरव के अंगपर पारथ ज्यों पेखिये
बाज ज्यों विहंगपर सिंह ज्यों मतंगपर,
म्लेंच्छ चतुरंगपर शिवराज देखिये

श्रीशंभु जैसा अनंगावरी कीं जसा बाज[1] पक्षी विहंगावरी,
शार्दुल किंवा कुरंगावरी कीं जसा केसरी तो मतंगावरी,
पक्षीस किंवा भुजंगावरी कीं दवाग्नी जसा वृक्षदंडावरी.
चिंतामणी विघ्न संघावरी हा शिवाजी तसा म्लेंच्छांवरी ! ४२

कुंभकर्ण असुर औतारी अवरंगजेब,
किन्हीं, कत्ल मथुरा दोहाई फेरी रबरी.
खोदि डारे देवि देव शहर मुहल्ला बाके
लाखन तुरक कीन्हे छूटि गई तबकी.
भूषन भनत भाग्यो काशीपति विश्वनाथ
और कौन गिनतीमैं भूली गति भबकी.
चारौं बर्न धर्म छोडि कलमा नेवाज पढि,
शिवाजी न होतो तौ सुनति होति सबकी.

---

१. बहिरी ससाणा.

औरंग हा कुंभकर्णावतारी, करी गोकुळीं निर्दयी कत्तल !
देवी महादेव तीर्थें खणोनी किती भ्रष्टतेची करी दंगल !
काशीपती शंभु तोही पळाला, दुजांची कथावी गती काय ती ?
होता शिवाजी न, सर्वत्र होत्या जनांच्या तरी भारतीं सुन्नती ! ४४

साँच को न माने देवी देवता न जानै,
अस ऐशी डर आने मैं कहत बात जबकी.
और पातशाहनके हुती चाह हिंदुनकी,
अकबर शहाजहां कहै साखि तबकी.
बब्बरके तिब्बर हूमायूँ हद्द बांधि गये,
दो मैं एक करी ना कुरान वेद ढबकी.
काशिहुकी कला जाती मथुरा मशीद होती,
शिवाजी न होतो तौ सुनति होती सबकी.

जे मानिती सत्य ना देव देवी, स्थिती सांगतो म्लेंच्छ कालांतली,
पूर्वी चहा होति हिंदू जनांची हूमायूंशहा-पुत्र-कालीं भली,
वेदांत-सीमा हूमायूं न मोडी, न मोडीहि तत्पुत्र तो सन्मती,
औरंगकालीं शिवाजी न होता, तरी सत्य होत्या अहा सुन्नती ! ४५

देवल गिरावते फिरावते निशान आली,
ऐसे डुबे राव राने सबी गयी लबकी.
गौरा गनपति आप.और न को देत ताप,
आपके मकान सब मारि गये दबकी.
पीरापयगंबरा दिगंबरा दिखाई देत,
सिद्धकी सिधाई गयी रही बात रबकी.
काशिहुते कला जाती मथुरा मशीद होती,
शिवाजी न होतो तौ सुनति होति सबकी.

देवालयें भग्न केलीं, मशिदी तिथें बांधिल्या, प्रार्थना चालल्या !
गौरीगणेशादि ना ताप देती इथें देवता स्तब्धता पावल्या !
सिद्धी जणों संपली साधुतेची असे पीरजादे जगीं दाविती !
काशी, अयोध्या कलाहीन होत्या, शिवानें न होऊं दिल्या सुन्नती ! ४६

बेद राखे बिदित पुराण राखे सारयुत रामनाम
राख्यो अति रसना सुघरमै.
हिंदुनकी चोटी रोटी राखी है सिपाहिनकी,
काँधें मैं जनेउ राख्यो माला राखी गरमैं.
मीडि राखे मुगल मरोडि राखे पातशाहा,
बैरी पीसि राखे बरदान राख्यो करमै.
राजनकी हद्द राखी तेगबल शिवराज,
देव राखे देवल स्वधर्म राख्यो घरमै.

त्वां रक्षिले वेद, तैशीं पुराणें, मुखीं रामनामासही रक्षिलें !
हिंदी-शिखा रक्षिली हिंद-भूपा ! गळ्याचें अहा ! जानवें रक्षिलें !
दिल्ली विजापूरशाही लुटोनी करीं राखिलें दान कर्णासम !
देवालयीं रक्षिले देव राया ! गृहीं रक्षिला धर्म सर्वोत्तम ! ४७

दक्षीण जीतलियो दल केवल, पश्चिम जीतके चाम राख्यो
रुप गुमान हर्‍यो गुजराथको, सूरतको रस चूसके राख्यो
पंजन पेलि मलिच्छ मले सब, सोई बच्यो जेहि दीन व्है भाख्यो
सो रंग है शिवराज बली, जिन नौरंगमें रंग एक न राख्यो

सेनाबळें जिंकिलें दक्षिणेला, करी पश्चिमा चामरासारखी !
सौंदर्य तें हारिलें उत्तरेचें, प्रभा ठेविना सूरतेच्या मुखीं !
म्लेंच्छास ठेवी बळानें मळोनी, पदीं जाहला नम्र तो वांचला !
नौरंगिं ना एकही रंग राखी, शिवाजी असा रंग हा खेळला ! ५१

सपतनागेश आठों ककुभ-गजेश,
कोल कच्छप दिनेश धरै धरनि अखंडको
पापी घालै धरम सुपथ चालै मारतंड,
करतार प्रतपालै प्राणिनके चंडको.
भूषन भनत सरजा शिवाजी गाजी,
म्लेंच्छनको मारै करि कीरति घमंडको.
जगकाज वारे निहचिंत करि डारे,
सब भोर देत अशिष तुम्हारे भुजदंडको.

श्रीशेष दिग्नाग दिक्पाल तैसा दिनस्वामि पृथ्वीस संरक्षितो !
पापी त्रिमार्गी सुमार्गी रवी तो जगज्जीवनालाच कीं तापतो !
भूपोत्तमा ! भोसले भूषणा ! तूं यश स्थापिले म्लेंच्छ संहारुनी !
केलें जगत्कार्य शोभे तयानें, तुझ्या बाहुला धन्यता कामिनी ! ५२

---

(कडव्यांचे क्रमांक मूळ कवितेतील.)

# ३६. शिवराजस्तव

'काव्यविलास' —माधव-(माधव केशव काटदरे)

अभिन्न नृपते! तुझें वचन आणखी वर्तन;
म्हणुनि रिपुही तुला करिती आदरें वंदन!
तुझें यश करीतसे पतित मानवां पावन,
तुझें चरित देतसे विगतचेतनां जीवन १

घडेल तव राजया! स्मरण नष्ट राष्ट्रीं जरी,
स्फुरेल तरि चित्कळा खचित रोमरोमांतरी!
समस्त जड वस्तुही करिल येथली तांडव,
चराचर परस्परां गणिल आपुलें बांधव २

तुझ्या रणधुरंधरा! नच जगीं तुला कीर्तिला,
उदार तुजसारिखा कधिं न पाहिला, ऐकिला!
गभीरतरमानसा! नयपटो! दयासागरा!
वदेल तुज सोडुनी कवण कोहिनूरा 'हिरा'! ३

स्वशत्रुरमणी गणी परमपूज्य मातेसम,
कधीं जित रिपूंसही अवगणी न जो सत्तम,
समस्त शरणागतां अभय दे उदाराग्रणी,
अजा तुजविणें दुजा नृप न् लाधली मेदिनी ४

खराच अवतार तूं शिवनृपा! शिवाचा जगीं,
कधींहि भगवद्गिरा नच ठरेल ती वाउगी.
प्रमत्त रिपु दंडुनी, करुनि आर्यधर्मावन,
सुदुष्ट नर मारिले, सकल तारिले सज्जन ५

तुझी स्मृति नरर्षभा! स्मृति न ती असे जागृती!
तिच्यासह सुखें सदा विजय नीति हीं नांदती!
सुनाम तव ऐकतां तनुंत होय संवेदना,
चढे रुधिर बिंदुंना स्फुरण लाधुनी चेतना! ६

धरुनि हृदयीं तुला तव असे महाराष्ट्र हा!
'मरेन मरणें तरी तुजसि गात' ही या स्पृहा!
असो तव शुभांशिची सतत यावरी पांखर,
प्रसन्न मग या सदा सहज 'कृष्ण योगेश्वर!' ७

## ३७. शिवप्रभूस

'श्रीमहाराष्ट्र शारदा' १९२३ —ग. त्र्यं. माडखोलकर

झाला देश गुलाम हा म्हणुनी जे आले पुढे राउत
स्वातंत्र्यार्थ सुखें समर्पुनि यशें नेलीं दिगंताप्रत
त्यांचा एक जगीं उदात्तचरिता! आहेस तूं अग्रणी,
'राहो देश स्वतंत्र' उत्कट तुझ्या ही एक आशा मनीं.
तख्तें रक्तप्रवाह वाहवुनि या भूमीवरी स्थापिलीं,
झाली दुर्बळ ही अशेष जनता, दुःखें धरा व्यापिलीं.
तेंव्हा फुंकित दिव्य शिंग अपुलें आलास धीरा! पुढें,
झाले जागृत हे अचेतन तरी सह्याचलाचे कडे!
आले धांवत हांक ऐकुनि तुझी अज्ञान हे मावळे,
निष्ठा आणिक त्याग हींच अवघीं शस्त्रें जयांची बळें!
'राहो देश स्वतंत्र नित्य अपुला' ही स्फूर्ति त्यांच्या मनीं
राया! संचरली तूझीच श्रवुनी वाणी सुधास्यंदिनी.

किल्ले सर्वहि भग्न आज तव हे केले निसर्गे जरी
यांचें दर्शन देत राहिल अम्हां स्फूर्ती नवीना तरी;
झाला पावन जो तुझ्या पद रजें तो हा तुझा मावळ,
पोवाडे रिझवील गाउनि तुझे आम्हां नवे प्रेमळ.
कालें येथ चरित्रचित्र लिहिलें आहे तुझें उज्ज्वळ,
गाणीं निर्झरिणी निरंतर तुझीं गातात या मंजुळ,
साक्षी देत तुझ्या निरंतर उभे सह्याचलाचे कडे,
आचंद्रार्क असेच गाजतिल हे सत्कीर्तिचे चौघडे!
वृत्ती हारपल्या, मदीय हृदयीं कल्लोल हे दाटले,
माझ्या हृत्फलकावरी कुणितरी अस्पष्ट रेखाटलें
तेंव्हां हें स्मृतिचित्र सुंदर अहा, अत्यंत चित्तंगम
झाला आज म्हणोनि येथ सहसा वाक्स्फूर्तिचा संगम.
श्रद्धा आणिक राष्ट्रभक्ति-जगतीं नाहींच ज्यांना तुला,
यांचा अद्भूतरम्य संगम असे येथे चिरं जाहला!
झाल्या त्या जगतीं चिरंतन तुझ्या स्वातंत्रवीरा कृती;
मी शाहीर तुझा, सदा मम मनीं गीतें तुझीं नाचतीं.
मी गाईन मुदें निरंतर तुझीं उद्गीतकीर्ते! यशें
माझा देश हताश, जीवविन त्या त्वत्कीर्तिच्या चिद्रसें;
माझें हें रणशिंग फुंकिन तुझ्या त्या सत्कृती चिंतुनी,
माझा देश उठेल ऐकुनि क्षणीं त्याचा प्रचंड ध्वनी!

# ३८. शिवकल्याण राजा

**समर्थ ग्रंथ भांडार** **—समर्थ रामदास**

निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसी आधारु ।
अखंडस्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ॥ १ ॥

परोपकाराचिया राशी । अखंड घडती जयासी ।
तयाचे गुणमहत्त्वासी । तुळणा कैंची ॥ २ ॥

नरपति हयपति गजपति । गडपति भूपति जळपति ।
पुरंदर आणि छत्रपति । शक्ति पृष्ठभागीं ॥ ३ ॥

यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥ ४ ॥

आचारशीळ विचारशीळ । दानशीळ धर्मशीळ ।
सर्वज्ञपणें सुशीळ । सकळां ठायीं ॥ ५ ॥

धीर उदार गंभीर । शूर क्रियेसी तत्पर ।
सावधपणें नृपवर । तुच्छ केले ॥ ६ ॥

तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट जालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ ७ ॥

देव धर्म गोब्राह्मण । करावया संरक्षण ।
हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ॥ ८ ॥

उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ।
धूर्त तार्किक सभानायक । तुमच्या ठायीं ॥ ९ ॥

या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुम्हांकरितां ॥ १० ॥

आणीकही धर्मकृत्यें चालती । आश्रित होऊनी कित्येक राहती ।
धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वीं विस्तारली ॥ ११ ॥

कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ।
कित्येकांसी आश्रय जाले । शिवकल्याण राजा ॥ १२ ॥
तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ।
ऋणानुबंधें विस्मरण जालें । काय नेणूं ? ॥ १३ ॥
सर्वत्र मंडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तुम्हांप्रति ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे ॥ १४ ॥
उदंड राजकारण तरलें । तेणें चित्त विगागिलें ।
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ॥ १५ ॥

## ३९. शिवराजासी आठवावें*

**समर्थ ग्रंथ भांडार** **—समर्थ रामदास**

शिवराजास आठवावें जीवित्व तृणवत् मानावें ।
इहलोकीं परलोकीं राहावें । कीर्तिरूपें ॥ १ ॥
शिवरायाचें आठवावें रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।
शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ॥ २ ॥
शिवरायाचें कैसें चालणें । शिवरायाचें कैसें बोलणें ।
शिवरायाची सलगी देणें । कैसें असे. ॥ ३ ॥
सकळ सुखांचा त्याग । करूनि साधिजे तो योग ।
राज्य साधनाची लगबग । कैसी असे ॥ ४ ॥
त्याहूनि करावें विशेष । तरीच म्हणावें पुरुष ।
याउपरी आतां विशेष । काय लिहावें ॥ ५ ॥

# ४०. आठवा त्या श्री शिवरायास

'चंद्रज्योति' १४-१०-१९६६ शरच्चंद्र वामन रानडे

हे उदयोन्मुख राष्ट्रा, आठवी त्या श्री शिवरायास ॥ ध्रु० ॥

चहु दिशांही परदास्याची पडता ही बेडी
नैराश्याचे पटल फोडुनी जो दे स्वातंत्र्यास
आठवी त्या श्री शिवरायास ॥ १ ॥

शतावधी वर्षांची उडवुनि झोप बांधवांची
नव जागृति त्यांमाजि उपजवी देइ आत्मविश्वास
आठवी त्या श्री शिवरायास ॥ २ ॥

गरिब मावळे कृषिवल दुबळे शेति वाहणारे
त्यांसी राष्ट्रिय स्फूर्ति देउनी लावी क्षात्रकर्मास
आठवी त्या श्री शिवरायास ॥ ३ ॥

अन्यायाची चीड उपजवी प्रेम स्वधर्माचे
अभिमानाची ज्योति पेटवी व्यापी जी राष्ट्रास
आठवी त्या श्री शिवरायास ॥ ४ ॥

समयिं लीनता, समयिं शौर्यही योजुनि कधि युक्ती
महाराष्ट्राच्या राजकारणी दावि बुद्धि-विभवास
आठवी त्या श्री शिवरायास ॥ ५ ॥

'गनिमी कावा' समरशास्त्र नव करुनि मराठ्यांचें
'पहाडका चुवा' भारी झाला दिल्लीच्या तख्तास
आठवी त्या श्री शिवरायास ॥ ६ ॥

अपमानाच्या, परवशतेच्या, कठिण विकट कालीं
'स्वराज्य हिंदवी' ध्वजा फडकवी भूषण इतिहासास
आठवी त्या श्री शिवरायास ॥ ७ ॥

क्षणाक्षणाचें जीवन ज्याचें चैतन्याची मूर्त
जगा लाजविल–मृतासि उठविल–देइल नव–स्फुरणास
आठवी त्या श्री शिवरायास ॥ ८ ॥

स्मरतां जीवन त्या पुरुषाचें–राष्ट्रिय वीराचे
लाधुनि स्फूर्ती करशील उज्ज्वल तूंहि आजि इतिहास
आठवी त्या श्री शिवरायास ॥ ९ ॥

# ४१. शिवराय गुणवर्णन

'काव्य सौंदर्य' १९०७ गणेशशास्त्री लेले

महाराष्ट्रीं झाला उदित गगनीं जेविं सविता,
सुहृत्पद्मालागीं अति विपुल जो भूतिस–विता;
निजें तेजें ज्याच्या रिपुतिमिर सारें हरपलें,
दुजे राजे लाजे उडुगण तसे सर्व लपले–१

जयाच्या धैर्याला गिरिच उपमा शोभत असे,
तसी गांभीर्याला जलधि, दुसरी साजत नसे;
जयाच्या बाहूंच्या युगुलिं विलसे शौर्य अगळें,
शकेना वर्णूं तें पटुहि कवि काव्यांत सगळें–२

यद्भट चतुर्यतुरी, आसेत्रेमा घेउनी सहाय बरें,
शुभ्रें यद्गुणवृंदें, यशःपटा विणुनि नेसवीत धरे।–३

होतां यावनकीर्तिसागर बहु विस्तीर्ण भूमंडलीं,
त्यानें भारतखंडभूमि अवघी व्यापूनियां टाकिली;
ईशेच्छें शिवजी अगस्तिमुनिसा झाला प्रतापी महा,
संग्रामाचमनें करूनिच जयें त्या प्राशिलें कीं अहा।–४

गुणी शत्रुही आवडे फार ज्यास, कटूही जसी औषधी आतुरास;
जसा सर्पसंदष्ट अंगुष्ठ होतो, तसा त्याज्य त्या दुर्गुणी मित्र होतो–५

प्रजेस शिकवी गुणां, सतत उद्यमें रक्षणा,
करी भरण देउनी वसनभूषणांही धना;
म्हणूनि गमला पिता जनगणास तो भूपती
शिवाजि, जगिं अन्य ते जनक-मात्रते पावती–६

श्रीमच्छत्रपती महीश्वर महाराज प्रतापी प्रभू,
राजन्वत्पदवाच्यते चढविली जेणें महाराष्ट्र भू;
तापातें हरूनी सुधाकर जनां देतो जसा स्वीं करी,
तैसा जो स्वगुणें करूनि सकलां दे सौख्य पृथ्वीवरी–७

त्याचें चित्त कधीं वळे न विषयीं, त्याला न दुःसंगती,
शास्त्राचे पर पार शोधित असे ऐशी तयाची मती;
धर्माचें निज तत्व गुप्त हृदयीं तो वागवी हो भला,
ज्ञानें पूर्ववयींच वृद्धहि जरेवांचून तो शोभला–८

## ४२. शिवस्मरण

'प्रेमपराग' १९२७ —मु. मो. लोंढे,

शिवरायाचें नांव अठवितां स्फूर्ति येत अंतरीं,
वदावी काय तयाची सरी !

स्वातंत्र्योत्सुक जनता सारी; तियेस तव पाउलें,
पाहुनी वंदावीं वाटलें !

गो-ब्राह्मण प्रतिपाळ कराया सांगे तव गुरु तुला,
तया तूं शिष्य भला लाभला.

इतिहासाच्या भव्य मंदिरीं कीर्ति तुझी गाजली,
खरोखर धन्य तुझी माउली
स्वातंत्र्याच्या चैतन्यानें महाराष्ट्र हलविलें,
खरोखर धन्य तुझी पाउलें !
स्वातंत्र्याचें निशाण भगवें राज्यामधिं फडकलें,
खरोखर रामदास ते भले !
वाचुनि रामायण, भारत रे अंतरिं तूं ठेविलें,
तयांतिल शूर वीर ते भले.
नांव तयांसम गाजवुनीयां अरिला संहारिले,
धन्य ते मित्र तुझे मावळे.
धन्य धन्य ती देवी भवानी प्रसन्न तुज जाहली,
जी आशिर्वच तुजला बोलली.
स्वातंत्र्याचे वारें ज्यांना मुळींच माहीत नसे,
तयांना लावियलें तूं पिसें !
सह्याद्रीच्या कडेकपारीं चैतन्या भरविलें,
धन्य तव कृष्णेची पाउलें.
महाराष्ट्राच्या अणुरेणूतुन वीज जणूं चमकली,
स्वातंत्र्योत्सुक जनता जाहली.
महाराष्ट्राचा रक्षणकर्ता; पुत्र तूंच रे भला,
खरोखर मातेचा जाहला.
रणांगणाविण रुचे न कांहीं असे तुला मात्रळे,
करुनियां गेले मुजरे भले.
स्वातंत्र्यास्तव रणांत, प्राणांतक युद्धामधि उडी,
घ्यावया राजि तुझे बा गडी

विस्मृति त्यांची होइल कैशी महाराष्ट्र जोंवरी,
तोंवरी राहिल कीर्ती बरी.
इतिहासाच्या पानांवरती चरित लिहुन ठेविलें,
रुधिर निज भूमाते अर्पिलें.
देहाची नच किंमत ज्यांना असे मावळे गडी,
स्वतंत्रता खिळली मांशीं हडीं.
रायगडादिक गड हे सारे साक्षिस देती अहा !
डोळे उघडुनि कांहीं पहा.
निज अंत:करणावरि सत्वर कोरूं ही स्मृति चला,
प्रणाम करूं चला त्याजला.

## ४३. छत्रपती शिवाजी महाराज

**वासंती १९३४** **वसंतविहार**

सामान्य जीवास जें साधतें कांहीं।
त्याहूनही दिव्य दावी जना ॥
अल्पांत संतुष्ट ही वृत्ति त्याची न।
मोठेपणाची स्पृहा त्या मना ॥
युक्ति प्रयुक्ती प्रभावें करुनी स्वराज्य–।
प्रभा पाहणें ध्यास हा ॥
जाणोनियां वेळ राष्ट्रामधे खेळ।
खेळे शिवाजी असा हा पहा ॥ १ ॥

ज्या ज्या कलांचे धनी लाधले योग्य ।
त्या त्या जनां संग्रहीं ठेवुनी ॥
स्थापावया आत्मसत्ता स्वदेशांत ।
व्हाया पुरे मुक्त दास्यांतुनी ॥
जें जें नवें शस्त्र जें जें नवें तत्त्व ।
रक्षावया राष्ट्र लाधे महा ।
तें तें बलें मेळवी दुर्ग घे शत्रु ।
जिंकीत राजा शिवाजी पहा ॥ २ ॥

ते म्लेंच्छ वा ते फिरंगी अती धूर्त ।
तैसे अविंधांमधें जे ठक ॥
त्याहूनही धूर्त झाला शिवाजी ।
महाराष्ट्रिं मोठ्या ठकांचा ठक ॥
भक्तांमधें भक्त धीरांमधें धीर ।
वीरांमधें वीर दाता महा, ॥
ज्याची 'अमीरी' जगा लाजवी होय ।
राजा शिवाजी असा हा पहा ॥ ३ ॥

धर्मार्थ देशार्थ आयुष्य खर्चूनि ।
शत्रूंसि दावी अमीरी प्रभा ॥
राजा शिवाजी विराजे महाराष्ट्रिं ।
दैदिप्य तो अंशुमाली नभां ॥
मूर्धाभिषिक्त प्रभूतें विलोकूनि ।
आनंद झाला 'समर्थां' महा ।
वंदी सदा सूनु दत्तात्रयाचा ।
शिवाजी महाराजया गात हा ॥ ४ ॥

# ४४. छत्रपतीस मुजरा

'युगे' जानेवारी १९७३ —शं. श्री. वाशीकर

छत्रपती घे कोटिकरांचा वारंवार प्रणाम !
नसानसांतुन प्राण फुंकिते तुझेच रे शिवनाम ! ॥ धृ०॥

गडागडांच्या बुरुजांची तूं उन्नत केली मान !
खिंडीखोऱ्यांतून घुमविले हरहरचे जयगान !
या मातीतुन या दगडातुन घडला हिंदुस्थान !
नव धर्माचा, नव राज्याचा दिघला मंत्र महान ! ॥ १ ॥

सह्याद्रीला तूच शिकविला स्वत्वाचा अभिमान !
पंचमहाभूतांतुन भरले पुनश्च पंचप्राण !
वैभवास तू वैराग्याचे दिधले कोंदण छान !
इंद्रा-गोदांच्या पाण्यातून वाहे आत्मज्ञान ! ॥ २ ॥

दिवसाला इथल्या मर्दपणा तू दिला !
रात्रीला इथल्या रम्यपणा तू दिला !
मरणाला येथे अमरपणा तू दिला !
काळाला येथे धडाच घालुन दिला !
शककर्ता तू राजा अमुचा काळाहून महान ! ॥ ३ ॥

मनगटांमध्यें तू भरली शक्ती नवी !
बुद्धीला आमुच्या दिधली युक्ती नवी !
हृदयाला अमुच्या दिधली भक्ती नवी !
जगण्याला आम्हा दिधली नीती नवी !
गडी मराठा उघडी येथे पुरुषार्थाची खाण ! ॥ ४ ॥

शिवराया आम्ही रूप तुझें आठवूं !
शिवराया आम्ही प्रताप तव आठवू !
माणूस मराठी अवघाची मेळवू !
तू दिधल्या धर्मा भारतात जागवू !
साक्षेपाला स्मरुनि तुझिया, उभवूं हिंदुस्थान ! ॥ ५ ॥

## ४५. शिवराजदर्शन

'महाराष्ट्र लक्ष्मी' १९६४ **विनायक**

गडावर जाऊं । शिवराजदर्शना लाहूं ॥ धृ० ॥

भूललों पूर्व विसरलों सारें,
अंगीं भरलें नूतन वारें,
मूर्खत्वाचे तुटती तार,
सत्य तें पाहूं–१

आली नयनांवर अंधारी,
न दिसे न कळे रवकर दुपारीं,
सहजच भिस्त परांवर सारी,
स्वरुपा पावूं–२

खान पराचें, पान पराचें,
भान, ज्ञान, स्थान पराचें,
उरलें अंतीं काय स्वतांचें
शोधना धांवूं–३

परतेचा दृढ घेरा पडला,
स्वभाव त्यायोगें अवघडला,
चिंताभृंग मनाला जडला,
घालवूं बाऊ–४

सद्गुरुविना सोय न दुसरी,
व्यसनसागरीं ती एक तरी,
निर्णय पैल तडीला उतरी,
चला त्या ध्याऊं–५

आमचा गुरु श्रीशिवराणा,
पुनरुज्जीवन हेतु पुराणा,
महाराष्ट्रवीर्याचा बाणा,
संकटीं वाहूं–६

देह तयाचा, जीव तयाचा,
नेत्र, श्रवण तयाची वाचा,
सर्व तयाचें, ज्याचें त्याच्या
कारणीं लावूं–७

घालूं लोटांगण तच्चरणीं,
पाहूं रूप तयाचें नयनीं,
लावूं जीव तद्गुणश्रवणीं,
तद्यशा गाऊं-शिवराजदर्शना लाहूं

## ४६. आज हवे होतां तुम्हि शिवबा!

'विझणवारा' १९६५ शांताराम रामचंद्र शिंदे

आज हवे तुम्हि होतां शिवबा, आज हवे तुम्हि होतां
आत्मविस्मृति झाली, मुजरे करतो उठतां बसतां! ॥ धृ० ॥

शरीर कसलें, धडगें! पुरलें प्रेत मनाचें आंत
पाषाणापरि निचेष्ट पडले पराक्रमाचे हात!
विझल्या ज्योती, त्या फुलवाया, उठवाया या प्रेतां
आज हवे तुम्हि होतां ॥ १ ॥

शेतकऱ्याच्या थाळींत भरलें मुक्या नयनिंचें पाणी
माता बसली शव पोराचें शुष्क स्तनीं लावोनी!
ज्याचा घास तयाला द्याया कुणीं न उरला त्राता
आज हवे तुम्हि होतां ॥ २ ॥

आज धुण्याच्या दगडावरतीं फुटे मराठी हाड!
वज्रासम एकेक मावळा पिचून होय चिपाड!
लोखंडाचा चिखल होत तरि चतकोर न ये हाता!
आज हवे तुम्हि होतां ॥ ३ ॥

महाराष्ट्रमाउली! तुझ्यावर नयन पशूंचे टपले
कोण हात तर कोण काळिजच भक्षिण्यास वसवसले
तीन कोटी संतान असून तूं नमशी या उन्मत्तां!
आज हवे तुम्हि होतां ॥ ४ ॥

दासांची तूं माता! केवळ क्षुद्र धुळींतिल दासी!
अन्न निपजवी पुत्र तुझा, तूं उपवासी वनवासी!
पुत्र तुझे धनसंचय करिती, दुजे भोगिती मत्ता!
आज हवे तुम्हि होतां ॥ ५ ॥

## ४७. शिवराज जन्म झाला !

‘ प्रेम पराग ’ —मोरया शिरगांवकर

आनंद धाम लोकां । शिवराज जन्म झाला.

देशास भूषविले । जननीस धन्य केले
हा आर्य लोक धाला । शिवराज-जन्म झाला.

होता मराठ-मोळा । परकीय त्रस्त झाला
त्या दुःखमुक्ततेला । शिवराज-जन्म झाला.

धर्मास धीर ज्याचा । रत दास-बोधिं साचा
शिवरूप जो उदेला । शिवराज-जन्म झाला.

दिल्लीस दार फोडी । सुरतेस शत्रु तोडी
स्थापी स्वराज्यशाला । शिवराज जन्म झाला.

शिवशक्ति सोडवीते । तुकयास आळवीते
निजधर्म वांचवीला । शिवराज-जन्म झाला.

चैतन्य चेतवीलें । चारित्र्य शोभविलें
विश्वांत वंद्य ठेला । शिवराज-जन्म झाला.

महाराष्ट्र-तत्त्व शिकवी । महाराष्ट्र-कार्य करवी
महाराष्ट्र-मंत्र वदला । शिवराज-जन्म झाला.

वंगादि राष्ट्रभाग । ख्रिस्तादि धर्म-भेद
असतां पदास चढला । शिवराज-जन्म झाला.

गो-ब्राह्मणांस पाळी । नयनीति राज्य काळीं
करि वीररत्नमाला । शिवराज-जन्म झाला.

करि कारणांत कावा । जरि वैरि वैरभावा
सजवी स्वलोक मेळा । शिवराज-जन्म झाला.

नेणोनि पंथ जाती। जाणोनि पक्ष-भीती
योजी गुणी हिताला। शिवराज-जन्म झाला.

मोंगल् फसे विचारा। आदिल् धरी दरारा
अफजुल् मुके जिवाला। शिवराज-जन्म झाला.

झेंडा तुझाचि भगवा। शिवबा शुभासि व्हावा
स्वातंत्र्य कारणाला। शिवराज-जन्म झाला.

महाराष्ट्र-भू कुठें ती ? । तव आर्यभू विजेती ?
नररत्न भारताला। शिवराज-जन्म झाला.

विश्वांत व्यापला जो। हृद्यांत बाणला जो
शिवशक्ति जो जहाला। शिवराज-जन्म झाला.

दादाजि बोध देई। तानाजी, बाजि भाई
बलसिद्ध ज्या रणाला। शिवराज-जन्म झाला.

स्वातंत्र्य-धर्म जीवा। स्वातंत्र्य शूर-भावां
स्वातंत्र्य दे मनाला। शिवराज-जन्म झाला.

स्थापी स्वधर्म-राज्या। स्थापी स्वलोक राज्या
बोल स्वराज्य बोला। शिवराज-जन्म झाला.

तव खड्ग ती भवानी। तव माय श्री भवानी
अर्पी सुपुष्पमाला। शिवराज-जन्म झाला.

राजाधिराज शिवबा। अवतार पूर्ण शिवबा
आनंद मोरयाला। शिवराज-जन्म झाला.

# ४८. बालशिवाजी

'नवयुग वाचनमाला' साधुदास

नाकेला अन् गुलजार । सावळा नि सुंदर भासे
कसल्याशा करुर्ना बेता । मधुनमधुन किंचित हासे
इवल्याशा त्याच्या देही । सरदारी ऐट विलासे
डोळ्यांत चमक पाण्याची,
न्यारीच नजर दाण्याची,
छाती न पुढे जाण्याची;
दुष्टांचा कर्दनकाळ । नाकेला अन् गुलजार १

मावळी जमवुनी बाळे । खेळतो खेळ मर्दानी
अंगरखा कंबरपट्टा । ती इजार तंग तुमानी
लंगोट्या पोरांमधुनी । लष्करी पेरितो वाणी.
इवलीशी करि तलवार
गरिबांचा हा सरदार
भक्तिला पुरा दिलदार
देईन जान वेल्हाळा २

# ४९. श्रीशिवाजी महाराजांची आरती

**'सावरकरांची कविता' १९७३ स्वातंत्र्यवीर सावरकर**

जयदेव जयदेव जय जय शिवराया
या या अनन्यशरणा आर्यां ताराया ॥ध्रु०॥

आर्यांच्या देशावरि म्लेंच्छांचा घाला
आला आला सावध हो शिवभूपाला!
सद्गदिता भूमाता दे तुज हांकेला
करुणारव भेदुनि तव हृदय न कां गेला? १

श्रीजगदंबा जीस्तव शुंभादिक भक्षी
दशमुख मर्दुनि जी श्रीरघुवर संरक्षी
ती पूता भूमाता म्लेंच्छांहीं छळतां
तुजविण तिज शिवराया कोण दुजा त्राता? २

त्रस्त अम्ही दीन अम्ही शरण तुला आलों
परवशतेच्या पाशीं मरणोन्मुख झालों
साधु परित्राणाया दुष्कृति नाशाया
भगवन् भगवद्गीता सार्थ कराया या ३

ऐकुनियां आर्यांचा धांवा महिवरला
करुणोक्तें स्वर्गी श्रीशिवनृप गहिंवरला
देशास्तव शिवनेरीं घेई देहाला
देशास्तव रायगडीं ठेवी देहाला
देशस्वातंत्र्याचा दाता जो झाला
बोला तच्छ्रीमच्छिवनृप की जय बोला ४

# ५०. शिववीर

‘ सावरकरांची कविता ’ स्वातंत्र्यवीर सावरकर

यवनांचा झाला अवनीला भार
सुंदर मंदिरें भंगीलीं पार
वेद-शास्त्रें नष्टांनीं भ्रष्टविलीं सारीं
गोमाता देखतां हरहर मारी
ब्राह्मण मत्तांनीं लत्तानीं हणिला
प्रभुवर भूवर शिववीर आला
अधमांसी नाशोनी देशोद्धाराला
प्रभुवर भूवर शिववीर झाला. १

हिंदूंच्या देशाचे बघुनीयां हाल
जगताची जननी ती जाहली लाल
यवनांना क्रोधानें वधण्यासी आई
शिवनेरीं शिवबासी जननासी देई
सुरवरां किन्नरां आनंद झाला
प्रभुवर भूवर शिववीर आला. २

रामा कौसल्या कीं कृष्णा यशोदा
शिवराजा जिजाई साजे जन्मदा
श्रीरामें राक्षस-हननासी केलें
यवनांना नाशीन तैसें मी बोले
सुकलांनी शशिसम तो वृद्धिंगत झाला
प्रभुवर भूवर शिववीर आला. ३

जयजयजी रघुवीरा, गर्जना झाली
श्रीरामदासांची मूर्ती उदेली
शिवभूपें पायीं दृढ भालाला केलें
स्वामींनीं मस्तकीं हस्त ठेवियलें
देशा, धर्मा तारी, उपदेश दीला
प्रभुवर भूवर शिववीर आला. ४

मातला अफजुल्ला यवनांत भारी
तुळजापुरीं भंगी भवानी सारी
करकर चावोनी अधरांला धावे
शिवरायाचेवरि, परि दुःखाला पावे
उदरा वीदारोनी नीचाला वधिला
प्रभुवर भूवर शिववीर आला. ५

स्वातंत्र्यदेवीचा गोंधळ केला
यजमानस्वामी श्रीशिवराय आला
सांवळ्या रंगाचे शूर मावळे
प्रेमानें अभिमानें गोंधळी झाले
पारतंत्र्याचा मग बोकड चिरिला
प्रभुवर भूवर शिववीर आला. ६

धर्माला तारियलें अखिर मारियलें
स्वातंत्र्या संपादुनि देशा शोभविलें
अवतार-कृत्याला पूर्णत्वा नेलें
छत्रपती शिव नृप मग निजधामीं गेले
सविनायक कविनायक गाती कवनाला
प्रभुवर भूवर शिववीर आला. ७

# ५१. हिंदु नृसिंह

'सावरकरांची कविता' स्वातंत्र्यवीर सावरकर

१

हे हिंदुशक्ति-संभूत-दीप्ततम-तेजा
हे हिंदुतपस्या-पूत ईश्वरी ओजा
हे हिंदुश्री-सौभाग्य-भूतिच्या साजा
हे हिंदु नृसिंहा प्रभो शिवाजीराजा
करि हिंदुराष्ट्र हें तूतें । वंदना
करि अंतःकरणज तुज । अभि-नंदना
तव चरणिं भक्तिच्या चर्ची । चंदना
गूढाशा पुरवीं त्या न कथूं शकतों ज्या
हे हिंदुनृसिंहा प्रभो शिवाजीराजा !

२

हा भग्न तट असे गडागडाचा आजी
हा मग्न आज जयदुर्ग आंसवांमाजी
ही भवानिची ह्या पुन्हा गंजली धारा
ती म्हणुनि भवानी दे न कुणा आधारा
गड कोट जंजिरे सारे । भंगले
जाहलीं राजधान्यांचीं । जंगलें
परदास्य-पराभविं सारीं । मंगलें
या जगतिं जगूं ही आज गमतसे लज्जा
हे हिंदु-नृसिंहा प्रभो शिवाजीराजा !

३

जी शुद्धि हृदाची रामदासशिर डुलवी
जी बुद्धि पांच शाहींस शत्रुच्या झुलवी
जी युक्ति कूटनीतींत खलांसी बुडवी
जी शक्ति बलोन्मत्तास पदतळीं तुडवी
ती शुद्धि हेतुची कर्मीं । राहुं दे
ती बुद्धि भाबड्या जीवां । लाहुं दे
ती शक्ति शोणितामाजी । वाहुं दे
दे पुन्हां मंत्र तो दिलें समर्थें तुज ज्या
हे हिंदु नृसिंहा प्रभो शिवाजीराजा !

## ५२. शिवाजि-उत्सव

'संचयिता'-१९०४ रवीन्द्रनाथ

कोन् दूर शताब्देर कोन्-एक अख्यात दिवसे
नाहि जानि आजि
माराठार कोन् शैले अरण्येर अन्धकारे ब'से
हे राजा शिवाजि,
तव भाल उद्भासिया ए भावना तडित् प्रभावत्
एसेछिल नामि
"एकधर्मराज्य—पाशे खण्ड छिन्न विक्षिप्त भारत
बेंधे दिब आमि ।"

सेदिन ए वंगदेश उच्चकित जागेनि स्वपने
पायनि संवाद—
बाहिरे आसेनि छुटे, उठे नाइ ताहार प्रांगणे
शुभ शंखनाद।
शान्तमुखे बिछाइया आपनार कोमल निर्मल
श्यामल उत्तरी
तंद्रातुर सन्ध्याकाले शत पल्लीसन्तानेर दल
छिल वक्षे करि॥

तार परे एकदिन माराठार प्रान्तर हइते
तव वज्रशिखा
आँकि दिल दिग्दि गन्ते युगान्तेर विद्युत्वह्निते
महामंत्रलिखा।
मोगल–उष्णीषशीर्ष प्रस्फुरिल प्रलयप्रदोषे
पक्कपत्र यथा—
सेदिनओ शोनेनि बंग माराठार से वज्रनिर्घोषे
की छिल बारता॥

तार परे शून्य हल झंझाक्षुब्ध निबिड निशीथे
दिल्लिराजशाला—
एके एके कक्षे कक्षे अन्धकारे लागिल मिशिते
दीपालोकमाला।
शवलुब्ध गृध्रदेर ऊर्ध्वस्वर बीभत्स चीत्कारे
मोगलमहिमा
रचिल श्मशानशय्या—मुष्टिमेय भस्मरेखाकारे
हल तार सीमा॥

सेदिन ए बंग प्रांते पण्यविपणीर एकधारे
निःशब्दचरण
आनिल वणिकूलक्ष्मी सुरंगपथेर अन्धकारे
राजसिंहासन ।
बंग तारे आपनार गंगोदके अभिषिक्त करि
निल चुपे चुपे;
वणिकेर मानदंड देखा दिल पोहाले शर्वरी
राजदंडरूपे ॥

सेदिन कोथाय तुमि हे भावुक, हे वीर माराठि,
कोथा तव नाम!
गैरिक पताका तव कोथाय धुलाय हल माटि—
तुच्छ परिणाम !
विदेशीर इतिवृत्त दस्यु बलि करे परिहास
अट्टहास्यरवे—
तव पुण्यचेष्टा जत तस्करेर निष्फल प्रयास,
एइ जाने सबे ॥

अयि इतिवृत्तकथा, क्षान्त करो मुखर भाषण ।
ओगो मिथ्यामयी,
तोमार लिखन—' परे विधातार अव्यर्थ लिखन
हबे आजि जयी ।
जाहा मरिबार नहे ताहारे केमने चापा दिबे,
तव व्यंगवाणी ?
जे तपस्या सत्य तारे केह बाधा दिबे ना त्रिदिबे,
निश्चय से जानि ॥

हे राजतपस्वी वीर, तोमार से उदार भावना
 विधिर भांडारे
संचित हइया गेछे काल कभु तार एक कणा
 पारे हरिबारे ?
तोमार से प्राणोत्सर्ग, स्वदेशलक्ष्मीर पूजाघरे
 से सत्यसाधन,
के जानित हये गेछे चिरयुगयुगान्तर-तरे
 भारतेर धन ? ।

अख्यात अज्ञात रहि दीर्घकाल हे राजबैरागी,
 गिरिदरीतले
वर्षार निर्झर यथा शैल विदारिया उठे जागि
 परिपूर्ण बले,
सेइमतो बाहिरिले; विश्वलोक भाबिल विस्मये,
 जाहार पताका
अंबर आच्छन्न करे एतकाल एत क्षुद्र हये
 कोथा छिल ढाका ।।

सेइमतो भावितेछि आमि कवि ए पूर्व-भारते,
 की अपूर्व हेरि,
बंगेर अंगनद्वारे केमने ध्वनिल कोथा हते
 तव जयभेरि ।
तिन शत वत्सरेर गाढतम तमिस्र विदारि
 प्रताप तोमार
ए प्राचीदिगन्ते आजि नवतर की रश्मि प्रसारि
 उदिल आबार ।।

मरे ना, मरे ना कभु सत्य जाहा शत शताब्दीर
विस्मृतिर तले—
नाहि मरे उपेक्षाय, अपमाने ना हय अस्थिर,
आघाते ना टले।
जारे भेबेछिल सबे कोन्‌काले हयेछे निःशेष
कर्मपरपारे,
एल सेइ सत्य तव पूज्य अतिथिर धरि वेश
भारतेर द्वारे॥

आजो तार सेइ मंत्र—सेइ तार उदार नयान
भविष्येर पाने
एकदृष्टे चेये आछे सेथाय से की दृश्य महान्
हेरिछे के जाने।
अशरीर हे तापस, शुधु तव तपोमूर्ति लये
आसियाछ आज—
तबु तव पुरातन सेइ शक्ति आनियाछ बये,
सेइ तव काज॥

आजि तव नाहि ध्वजा, नाइ सैन्य, रण-अश्वदल,
अस्त्र खरतर—
आजि आर नाहि बाजे आकाशेरे करिया पागल
'हर हर हर'।
शुधु तव नाम आजि पितृलोक हते एल नामि,
करिल आह्वान—
मुहूर्ते हृदयासने तोमारेइ वरिल हे स्वामी,
बाङालिर प्राण॥

ए कथा भावे नि केह ए तिन शताब्दकाल धरि—
जाने नि स्वपने—
तोमार महत् नाम बङ्ग-माराठारे एक करि
दिबे विना रणे,
तोमार तपस्यातेज दीर्घकाल करि अन्तर्धान
आजि अकस्मात्
मृत्युहीन वाणी-रूपे आनि दिबे नूतन परान—
नूतन प्रभात ॥

माराठार प्रान्त हते एकदिन तुमि धर्मराज,
डेकेछिले जबे
राजा ब'ले जानि नाइ, मानि नाइ, पाइ नाइ लाज
से भैरव रवे।
तोमार कृपाणदीप्ति एकदिन जबे चमकिला
बङ्गेर आकाशे
से घोर दुर्योगदिने ना बुझिनु रुद्र सेइ लीला—
लुकानु तरासे ॥

मृत्युसिंहासने आजि बसियाछ अमरमुरति—
समुन्नत भाले
जे राजकिरीट शोभे लुकाबे ना तार दिव्यज्योति
कभु कोनोकाले।
तोमारे चिनेछि आजि चिनेछि चिनेछि हे राजन्,
तुमि महाराज।
तव राजकर लये आट कोटि बङ्गेर नन्दन
दाँड़ाइबे आज ॥

सेदिन शुनि नि कथा—आज मोरा तोमार आदेश
शिर पाति लब।
कण्ठे कण्ठे वक्षे वक्षे भारते मिलिबे सर्वदेश
ध्यानमंत्रे तव।
ध्वजा करि उड़ाइब बैरागीर उत्तरीवसन—
दरिद्रेर बल।
'एकधर्मराज्य हबे ए भारते' ए महावचन
करिब सम्बल॥

माराठिर साथे आजि हे बाङालि, एक कण्ठे बलो
'जयतु शिवाजी'।
माराठिर साथे आजि हे बाङालि एक संगे चलो
महोत्सवे साजि।
आजि एक सभातले भारतेर पश्चिम-पुरब
दक्षिणे ओ बामे
एकत्रे करुक भोग एकसाथे एकटि गौरव
एक पुण्य नामे॥

## शिवाजी-उत्सव

हे राजा शिवाजी, कोण जाणे कोणत्या दूरच्या शतकाच्या, कोणत्या एका अप्रसिद्ध दिवशीं महाराष्ट्राच्या कोणत्या शैलावर, अरण्याच्या अंधकारात बसून 'छिन्नविच्छिन्न झालेल्या, विस्कटलेल्या भारताला मी एक-धर्म-राज्याच्या बंधनात बांधून टाकीन' ही भावना तुझे भाल प्रकाशित करून विद्युत् प्रभेप्रमाणे अवतरली होती.

त्या दिवशी हा वंगदेश चमकून निद्रेंतून जागा झाला नाही. त्याला तो संदेश मिळाला नाही. तो धांवून बाहेर आला नाही. त्याच्या प्रांगणामध्ये शुभ शंखनाद घुमला नाही. शेकडो ग्रामवासियांची दले शांत मुखाने आपले कोमल, निर्मल, श्यामल उत्तरीय पसरून पेंगुळलेल्या संध्येला छातीशी धरून राहिली.

त्यानंतर महाराष्ट्राच्या माळरानांतून तुझ्या वज्रशिखेने साऱ्या क्षितिजांवर युगांताच्या विद्युत्वह्नीनें महामंत्राचा लेख कोरून काढला. त्या प्रलयाच्या संध्यासमयीं मोगलांच्या पगडीचा तुरा पिकलेल्या पानाप्रमाणे थरारला. त्या दिवशीही वंगदेशाने महाराष्ट्राच्या त्या वज्रनिर्घोषामध्ये कोणता संदेश होता ते ऐकले नाही.

त्यानंतर वादळाने क्षुब्ध झालेल्या निबिड रात्री दिल्ली-राजशाला शून्य झाली. एकेका दालनातील दीप-प्रकाशमाला अंधारात विलीन होऊ लागली. लोभी नजरेने शवे धुंडणाऱ्या गिधाडांच्या कर्कश बीभत्स चीत्कारांनीं मोगलांच्या महिम्याची चिता रचली—त्याची मूठभर राख उरली.

त्या दिवशी या बंगाल प्रांतात बाजारपेठेच्या आडून वणिक्लक्ष्मीने भुयारी मार्गाच्या अंधारातून चोरपावलानी राजसिंहासन आणले. बंगालने आपल्या गंगोदकाने त्याला गुपचुप अभिषेक करून घेतला. रात्र संपून पहाट होताच वैश्याचा मानदंड राजदंडाच्या रूपाने प्रगट झाला.

हे विचारवंता, हे वीर मराठ्या, त्या दिवशी तूं कोठे होतास ? कोठे होते तुझे नाव ? तुझा तो भगवा झेंडा कोठे धुळीत मिसळला होता? काय हा तुच्छ परिणाम! विदेशी लोकांनी लिहिलेला

इतिहास तुला दरवडेखोर संबोधून खदखदा हंसत तुझा उपहास करतो. तुझे सारे पुण्य प्रयत्न म्हणजे निष्फळ धडपड होती, एवढेच सर्वांना माहीत आहे.

हे इतिहासकथे, बंद कर ती बडबड ! अगे मिथ्यामयी, तुझ्या लिखाणावर आज विधात्याचे अमोघ लिखाण विजयी होणार आहे. ज्याला मरण नाही, त्याला तुझी उपहासवाणी कशी दडपूं शकेल? जी तपस्या सत्य असते तिला स्वर्गांत प्रवेश करण्यास कोणी अडवू शकणार नाही, याची मला खात्री आहे.

हे राजतपस्वी वीरा, तुझी ती उदार भावना विधात्याच्या भांडारात जमा होऊन राहिली आहे. तिचा एक कण तरी काळाला कधी हरण करता येईल काय? तुझा तो प्राणयज्ञ, स्वदेशलक्ष्मीच्या पूजामंदिरांतील ती सत्यसाधना, युगानुयुगांसाठी भारताचे चिरंतन धन बनली आहे, हे कोणाला माहीत होते?

हे राजसंन्याशा, दीर्घकालपर्यंत गिरिगव्हरांत अज्ञात, अप्रसिद्ध राहून वर्षेचा निर्झर आपल्या संपूर्ण बलाने डोंगर फोडून जागा होतो, तसाच तूं बाहेर आलास. विश्वलोकाने विस्मयानें विचार केला, ज्याची पताका आकाशाला आच्छादून टाकते तो हा इतका वेळ इतका लहान होऊन कोठे बरे झाकून राहिला होता?

त्याचप्रमाणे मी या पूर्व भारतातील कवि मनात असा विचार करतो, मी हे काय अपूर्व पाहात आहे ! बंगालच्या अंगणाच्या दारात तुझी जयभेरी कोठून कशी दुमदुमली? तीन शतकांचे गाढतम तमिस्र विदारून तुझा प्रताप या पूर्वक्षितिजावर आज पुन्हां कोणता नवीनतर किरण पसरवून उदित झाला आहे?

शतकानुशतके विस्मृतीच्या तळाशी दडपले गेले तरी सत्य हे कधी मरत नसते, कधी मरत नसते. उपेक्षेने ते मरत

नाही. अपनामुळे अस्थिर होत नाही, आघाताने ते विचलित होत नाही. सर्वांना वाटले होते की, तुझ्या कर्मजीवनाच्या पैलतीरावर ते सत्य केव्हाच निःशेष झाले आहे. पण तेच तुझे सत्य पूज्य अतिथीचा वेश धारण करून भारताच्या दारीं आलें आहे.

आजही त्या सत्याचा तोच मंत्र विद्यमान आहे. त्याचे ते विशाल नेत्र भविष्याकडे टक लावून पाहात आहेत. त्या ठिकाणी ते (सत्य) कोणते महान् दृश्य पाहात आहे, कोण जाणे. हे अशरीरी तापसा, आज तूं केवळ आपली तपोमूर्ति घेऊन आला आहेस. तरीही तूं आपली ती पुरातन शक्ती वाहून आणली आहेस. तें आपले कार्य तूं घेऊन आला आहेस.

आज तुझी ध्वजा नाही, सैन्य नाही, रणअश्वदल नाही, प्रखर अस्त्रे नाहीत, आकाशाला मत्त करून सोडणारा 'हर हर हर' हा जयघोष आज पुनः दुमदुमत नाही. आज केवळ तुझे नाव पितृलोकातून खाली उतरून आले व त्याने आवाहन केले. हे स्वामी, बंगाली जनतेच्या प्राणांनी एका क्षणांत तुलाच आपल्या हृदय-सिंहासनावर अधिष्ठित केले.

गेल्या तीन शतकांपासून कोणाच्या मनात असा विचारही आला नाही, स्वप्नातही कोणाला हे कळले नाही की तुझे महान् नाव बंगाल-महाराष्ट्राला युद्धाशिवाय एकत्र करील आणि तुझ्या तपस्येचे तेज दीर्घकालपर्यंत अन्तर्हित राहून आज अचानक अमर वाणीच्या रूपाने नूतन प्राण, नूतन प्रभात निर्माण करील.

हे धर्मराजा, महाराष्ट्राच्या सरहद्दीवरून एके दिवशी जेव्हा तू हाक दिलीस त्या वेळी आम्ही तुला 'राजा' म्हणून ओळखले

नाही. मानले नाही तुझ्या भैरवगर्जनेने आम्ही लज्जित झालो नाही. तुझ्या तलवारीचा लखलखाट एके दिवशी बंगालच्या आकाशात तळपला तेव्हा त्या भयंकर वादळाच्या दिवशी ती रुद्रलीला आम्हाला कळली नाही. आम्ही भीतीने लपून राहिलों.


हे अमरमूर्ति, आज तूं मृत्यूच्या सिंहासनावर बसला आहेस. तुझ्या समुन्नत भालीं जो राजकिरीट शोभत आहे त्याची दिव्य ज्योती कधीही लपणार नाही. हे राजन्, आज आम्ही तुला ओळखले, ओळखले, ओळखले तू तर महाराज आहेस. तुझा राजकर घेऊन आठ कोटी वंगपुत्र आज उभे राहतील.

त्या दिवशी आम्ही तुझे सांगणे ऐकलें नाही. आता आम्ही तुझा आदेश शिरोधार्य मानू. तुझ्या ध्यानमंत्राने भारतातील सारे प्रदेश एकमेकांना स्नेहालिंगन देतील. वैराग्याच्या उत्तरीयाची ध्वजा बनवून आम्ही ती फडकवू. तेच आम्हा दरिद्यांचें सामर्थ्य? 'या भारतात एक धर्मराज्य होईल' या महावचनाला आम्ही आमचे धन बनवू.

हे बंगालवासियांनो, आज मराठ्यांच्या बरोबर: एक स्वराने म्हणा, 'शिवाजीचा जय असो.' हे बंगाल्यांनो, आज तुम्ही मराठ्यांसह सजून महोत्सवाला एकत्र चला. आज एकाच सभास्थानी, भारताचे पश्चिम आणि पूर्व भाग हे उजवीकडे व डावीकडे एका पवित्र नावामध्ये एकत्रपणे एका विशेष गौरवाचा अनुभव घेवोत.

# विभाग चौथा : भगवा झेंडा-जरिपटका

## दिल्ली ध्वंसुनि नाचला झयझया जो शत्रू–छातीवरी



## १. भगवा झेंडा एकच हा

'महाराष्ट्र शारदा' १९३०        कुमार (वि. स. खांडेकर)

रणीं फडकती लाखों झेंडे अरुणाचा अवतार महा ।
विजयश्रीला श्रीविष्णुपरी भगवा झेंडा एकच हा ॥ धृ० ॥

शिवरायाच्या दृढ वज्राची सह्याद्रीच्या हृदयाची ! ।
दर्या खवळे तिळभर न ढळे—कणखर काठी झेंड्याची ॥
तरवारीच्या धारेवरती पंचप्राणां नाचवितां ।
पाश पटापट तुटती त्यांचा खेळे पट झेंड्यावरता ॥
लीलेनें खंजीर खुपसतां मोहक मायेच्या हृदयीं ।
अखंड रुधिराच्या धारांनी ध्वज सगळा भगवा होई ॥
अधर्म लाथेने तुडवी
धर्माला गगनीं चढवी
राम रणांगणिं मग दावी ॥ १ ॥

कधीं न केलें निजमुख काळें पाठ दावुनी शत्रूला ।
कृष्ण कारणीं क्षणही न रणीं धर्माचा हा ध्वज दिसला ॥
टोंच मारण्या परत्रणावर काकापरि नच फडफडला ।
जणूं जटायू रावणमार्गी उलट रणांगणिं हा ठेला ॥
परलक्ष्मीला पळवायाला पळभर पदर न हा पसरे ।
श्वासाश्वासासह सत्याचें संचरतें जगतीं वारें ॥
गगनमंदिरीं धांव खरी
मलिन-मृत्तिका लव न धरी
नगराजांचा गर्व हरी ॥ २ ॥

मुरारबाजी करि कारंजीं पुरंदरावर हृदयाचीं ।
सुकलीं कुठली ? दौलत झाली धर्माच्या ध्वजराजाची ॥
संभाजीच्या हृदयीं खवळे राष्ट्रप्रेमाचें पाणी ।
अमर तयाच्या छटा झळकती निधड्या छातीची वाणी ॥
खंडोजी कुरवंडी कन्या प्रेमें प्रभु चरणांवरुनी ।
स्वामिभक्तिचें तेज अतुल तें चमकत राहे ध्वज-गगनीं ॥
हें सिंहासन निष्ठेचें
हें नंदनवन देवाचें
मूर्तिमंत हा हरि नाचे ॥ ३ ॥

स्मशानांतल्या दिव्य महालीं निजनाथासह पतिव्रता ।
सौभाग्याची सीमा निजली, उजळायाला या जगता ॥
रमा-माधवासवें पोंचल्या गगनांतरीं जळत्या ज्योती ।
चिन्मंगल ती चिता झळकते या भगव्या झेंड्यावरती ॥
नसुनी असणें, मरुनी जगणें, राख होउनी पालवणें ।
जीवाभावाच्या जादूचें ध्वजराजाला हें लेणें ॥
संसाराचा अंत इथें
मोहाची क्षणिं गांठ तुटे
धुकें फिटे, नवविश्व उठे ॥ ४ ॥

या झेंड्याचें हें आवाहन ‘महादेव हर हर बोला’।
उठा मराठे अंधारावर घाव निशाणींचा घाला ॥
वीज कडाडुनि पडतां तरुवर कंपित हृदयांतरिं होती।
टक्कर देतां फत्तर फुटती, डोंगर मातीला मिळती ॥
झंझावाता पोटीं येउनि पान हलेना हातानें।
कलंक असला धुउनि टाकणें, शिवरायाच्या राष्ट्रानें ॥
घनचक्कर या युद्धांत
व्हा राष्ट्राचे राऊत
कर्तृत्वाचा द्या हात
तळपत दावी पथ तेजाचा, अरुणाचा अवतार महा।
विजयश्रीला श्रीविष्णुपरी भगवा झेंडा एकच हा ॥ ५ ॥

## २. प्रतिनिधि

**‘कथा ओ काहिनी’**—१८९७. **टागोर रवींद्रनाथ**

अॅकवर्थ साहेब कयेकटि माराठि गाथार जे इंरेजि अनुवाद-ग्रंथ प्रकाश करियाछेन ताहारहि भूमिका हइते वर्णित घटना गृहीत। शिवाजीर गेरवा पताका ‘भागवा झंडा’ नामे ख्यात।

बसिया प्रभातकाले सेतारार दुर्गभाले
शिवाजि हेरिला एक दिन—
रामदास गुरु ताँर भिक्षा मागि द्वार द्वार
फिरिछेन जेन अन्नहीन।
भाविला ए की ए काण्ड! गुरुजिर भिक्षाभाण्ड!
घरे जाँर नाइ दैन्यलेश!
सब जाँर हस्तगत, राज्येश्वर पदानत,
ताँरो नाइ बासनार शेष!

ए केवल दिने रात्रे जल ढेले फुटा पात्रे
वृथा चेष्टा तृष्णा मिटाबारे।
कहिला, देखिते हबे कतखानि दिले तबे
भिक्षा-झुलि भरे एकेबारे।
तखनि लेखनी आनि की लिखि दिला की जानि,
बालाजिरे कहिला डाकाये
गुरु जबे भिक्षा-आशे आसिबेन दुर्ग-पाशे
एइ लिपि दियो ताँर पाये।"

गुरु चलेछेन गेये सम्मुखे चलेछे धेये
कत पान्थ, कत अश्वरथ—
"हे भवेश, हे शंकर, सबारे, दियेछ घर,
अमारे दियेछ शुधु पथ।
अन्नपूर्णा मा आमार लयेछे विश्वेर भार
सुखे आछे सर्व चराचर—
मोरे तुमि हे भिखारी, मार काछ हते काड़ि
करेछ आपन अनुचर।"

समापन करि गान सारिया मध्याह्नस्नान
दुर्गद्वारे आसिला जखन
बालाजि नमिया ताँरे दाँड़ाइल एक धारे
पदमूले राखिया लिखन।
गुरु कौतूहल भरे तुलिया लइला करे,
पड़िया देखिला पत्रखानि—
वन्दि ताँर पादपद्म शिवाजि सँपिछे अद्य
ताँरे निज राज्य-राजधानी"

परदिने रामदास गेलेन राजार पाश
कहिलेन, "पुत्र, कहो शुनि,
राज्य यदि मोरे देबे की काजे लागिबे एबे—
कोन् गुण आछे तव गुणी।"
"तोमारि दासत्वे प्राण आनन्दे करिब दान"
शिवाजि कहिला नमि ताँरे।
गुरु कहे, "एइ झुलि लहो तबे स्कन्धे तुलि,
चलो आजि भिक्षा करिबारे।"

शिवाजि गुरुर साथे भिक्षापात्र लये हाते
फिरिलेन पुरद्वारे-द्वारे।
नृपे हेरि छेले मेये भये घरे जाय धेये,
डेके आने पितारे मातारे।
अतुल ऐश्वर्ये रत ताँर भिखारीर व्रत;
ए जे देखि जले भासे शिला।
भिक्षा देय लज्जाभरे, हस्त काँपे थरोथरे;
भावे इहा महतेर लीला।

दुर्गे द्विप्रहर बाजे, क्षान्त दिया कर्म-काजे
बिश्राम करिछे पुर बासी।
एकतारे दिये तान रामदास गाहे गान
आनन्दे नयनजल भासि,
"ओहे त्रिभुवनपति, बुझि ना तोमार मति,
किछुइ अभाव तब नाहि—
हृदये हृदये तबु भिक्षा मागि फिर प्रभु,
सबार सर्वस्व-धन चाहि।"

अबशेषे दिबसान्ते नगरेर एक प्रान्ते
नदीकूले सन्ध्यास्नान सारि
भिक्षा-अन्न राँधि सुखे गुरु किछु दिला मुखे,
प्रसाद पाइल शिष्य ताँरि।
राजा तबे कहे हासि, "नृपतिर गर्ब नाशि
करियाछ पथेर भिक्षुक;
प्रस्तुत रयेछे दास—तारो किबा आभिलाष,
गुरु काछे लब गुरु दुख।"

गुरु कहे, "तबे शोन् करिलि कठिन पण,
अनुरूप निते हबे भार—
एइ आमि दिनु कये मोर नामे मोर हये
राज्य तुमि लहो पुनर्बार।
तोमारे करिल विधि भिक्षुकेर प्रतिनिधि,
राज्येश्वर दीन उदासीन;
पालिबे जे राजधर्म जेनो ताहा मोर कर्म,
राज्य लये रबे राज्यहीन।

वत्स, तबे एइ लहो मोर आशीर्वाद-सह
आमार गेरुवा गात्रबास;
बैरागीर उत्तरीय पताका करिया नियो"
कहिलेन गुरु रामदास।
नृपशिष्य नतशिरे बसि रहे नदीतीरे,
चिन्ताराशि घनाय ललाटे।
थामिल राखाल-वेणु गोठे फिरे गेल धेनु,
परपारे सूर्य गेल पाटे

पुरबीते धरि तान एकमने रचि गान
गाहिते लागिल रामदास,
आमारे राजार साजे बसाये संसार-माझे
के तुमि आडाले कर बास।
हे राजा रेखेछि आनि तोमारि पादुकाखानि
आमि थाकि पादपीठतले।
सन्ध्या हये एल ओई, आर कत बसे रई
तब राज्ये तुमि एस चले।"

२५६९ २५.५७ २८/१९२१

## प्रतिनिधि

[अॅकवर्थ साहेबांनी काही मराठी संग्राम-गीतांचा जो इंग्रजी अनुवादग्रंथ (Ballads of the Marathas) प्रकाशित केला आहे त्याच्या प्रस्तावनेत वर्णिलेली घटना येथे घेण्यात आली आहे. शिवाजीमहाराजांचा गेरू रंगाचा ध्वज 'भगवा झेंडा' या नावाने प्रसिद्ध आहे]

एके दिवशी प्रभातकाळी साताऱ्याच्या किल्ल्याच्या सज्जात बसून शिवाजी महाराजांनी असे पाहिले की, आपले गुरू रामदास जणू अन्नहीन असल्याप्रमाणे दारोदार भिक्षा मागत फिरत आहेत. त्यांच्या मनात विचार आला, ही किती विचित्र गोष्ट आहे! ज्यांच्या घरी लेशमात्रही दैन्य नाही त्या गुरुजींच्या हातीं भिक्षापात्र! ज्यांच्या मुठीत सर्व काही आहे, राज्येश्वरानें ज्यांच्या पायांवर लोटांगण घातले आहे त्यांच्याही वासनेला अंत नसावा ना!

हे केवळ फुटक्या पात्रात अहोरात्र पाणी ओतून तृष्णा शमविण्याचा निरर्थक प्रयत्न करण्यासारखे आहे. ते म्हणाले, किती दिल्याने भिक्षाझोळी पुरेपूर भरेल ते पाहिले पाहिजे. त्याच वेळी

लेखणी आणून त्यांनी काय लिहिले कोण जाणे. बाळाजीला बोलावून ते म्हणाले, "गुरुजी जेव्हा भिक्षेच्या आशेने गडाजवळ येतील तेव्हां हे पत्र त्यांच्या चरणी अर्पण करा."

गुरुजी गात चालले आहेत. समोर कितीतरी पांथ, कितीतरी अश्वरथ धांवत चालले आहेत.—"हे भवेशा, हे शंकरा, तू सर्वांना घर दिले आहेस. पण मला मात्र केवळ रस्ताच दिला आहेस. अन्नपूर्णा माझी माता. तिने विश्वाचा भार घेतला आहे. सारे चराचर सुखात आहे.—पण हे भिकाऱ्या, तू मला माते-जवळून दूर काढून आपला अनुचर बनविले आहेस."

गाणे संपवून मध्याह्न-स्नान उरकून रामदासस्वामी जेव्हा दुर्गद्वारी आले, तेव्हा बाळाजीने त्यांना नमस्कार करून त्यांच्या पायांवर ते लिखाण ठेवले व तो एका बाजूला उभा राहिला. गुरुजींनी कुतूहलाने ते पत्र उचलून हातात घेतले व वाचून पाहिले. त्या पत्रात लिहिले होते, 'मी शिवाजी आपल्या चरणकमलांना वंदन करून राजधानीसह माझे राज्य आपणाला आज अर्पण करीत आहे.'

दुसऱ्या दिवशी रामदास शिवाजी राजाकडे गेले आणि म्हणाले, "बेटा, तूं जर आपले राज्य मला दिलेस तर तू आता काय काम करणार सांग पाहू?" शिवाजीमहाराज त्यांना नमस्कार करून म्हणाले, "तुमच्याच सेवेमध्ये मी माझे जीवन आनंदाने समर्पित करतो." त्यावर गुरुजी म्हणाले, "तर मग ही झोळी खांद्यावर घे आणि आज भिक्षा मागण्यास चल!"

शिवाजी महाराज आपल्या गुरूबरोबर हाती भिक्षापात्र घेऊन शहराच्या दारोदारी फिरले. राजाला पाहून मुले बाळे भीतीने घरात धावत जात आणि आपल्या आईबापांना बोलावून आणीत. ज्यांनी अतुल ऐश्वर्यात लोळावयाचे त्यांनी भिकाऱ्याचे व्रत घेतलेले पाहून

जणू पाण्यावर दगड तरंगत असल्यासारखे लोकांना वाटले. ते लज्जित होऊन भिक्षा घालीत होते. त्यांचे हात थरथरत कांपत होते. त्यांच्या मनात विचार येत होता, ही मोठ्यांची लीला!

गडावर दुसऱ्या प्रहराचे टोल पडले. कामकाज आवरून पुरवासी विश्रांती घेत आहेत. रामदास डोळ्यातून आनंदाश्रू ढाळीत एकतारीवर गाणे गात आहेत : "हे त्रिभुवनपती, तुझे मन मला कळत नाही. तुला कसलीच उणीव नाही. तरीसुद्धा हे प्रभु, तू सर्वांच्या सर्वस्व-धनाची इच्छा बाळगून हृदया-हृदयांत भिक्षा मागत फिरतोस."

अखेर दिवस मावळल्यानंतर शहराच्या एका कडेला नदीतीरी संध्यास्नान आटोपून भिक्षान्न शिजवून गुरुजींनी सुखाने दोन घास खाल्ले. त्यांच्या शिष्यानेही प्रसाद घेतला. नंतर हसून शिवाजी महाराज म्हणाले, "राजाचा गर्व नाहीसा करून त्याला तुम्ही रस्त्यावरला भिकारी बनविले. हा दास तुमच्या सेवेस तयार आहे. त्याचीही हीच अभिलाषा आहे की, गुरुजवळून महान् दुःखसाधना घ्यावी."

गुरुजी म्हणाले, "तर मग ऐक. तू फार अवघड प्रतिज्ञा केली आहेस. ती योग्य प्रकारे तुला पार पाडावी लागेल.—माझे असे सांगणे आहे की, माझ्या नावाने, माझ्या वतीने हे राज्य तू पुन्हा परत घे. तुला विधात्याने भिक्षुकाचा प्रतिनिधि, वैभवशून्य अनासक्त राजेश्वर बनविले आहे. तू जो राजधर्म पाळशील ते माझेच कार्य आहे, असे समज. राज्य घेऊन तू राज्यहीनाप्रमाणे राहा.

"वत्सा, तर मग हे घे माझ्या आशीर्वादासह माझे भगवे वस्त्र. या वैराग्याच्या उपरण्याची तू आपली पताका बनव." गुरु रामदास म्हणाले. तो नृपशिष्य नतमस्तक होऊन नदीतीरी बसून राहिला.

त्याच्या ललाटी चिन्ताराशि दाटून आली. गुराख्याची बांसरी थांबली. गायी गोठ्यांत परत गेल्या. पैलतीरी सूर्य अस्ताचली गेला.

पूर्वी रागाच्या स्वरात गाणे रचून रामदास (शिवाजीच्या भूमिकेतून) एकाग्रमनाने गाऊ लागले. "मला राजाच्या वेषात, संसारामध्ये गुंतवून स्वतः पडद्यामागे राहाणारा तू कोण आहेस? हे देवराया, तुझ्याच पादुका आणून मी ठेविल्या आहेत. मी तुझ्या पादपीठाखाली राहीन. ही पाहा संध्या झाली. मी आणखी किती वेळ बसून राहू? तुझ्या राज्यात तू ये ना!"

## ३. भगवा झेंडा

**'दत्तांची कविता'** १९२२ **—दत्त (दत्तात्रय कोंडो घाटे)**

भिक्षा वाढ असें समर्थ म्हणती, न्यायासनीं ऐकूनी,
आला धावत दानशूर नृपती, बोले करा जोडुनी,
"लक्ष्मी ही अपुलीच, राज्य अपुलें, मीही असे आपुला,
घ्यावी ही तलवार, हा मुकुट, हा माथा पदीं वाहिला"
पाहोनी निरपेक्षबुद्धि गुरुजी शिष्याप्रती बोलती,
"आहा रे शिवबा! जगांत असला तूं एकला भूपती;
बा रे, उठ, पुरे पुरे विनय हा, संतुष्ट झालों मनीं
आम्ही नित्य निरिच्छ संपत अम्हां कांही नको याहुनी—

हेतु एकच, यत्न एकच असे राया! तुझा आमुचा,
देशा तारुनि धर्म रक्षुनि करीं संहार या शत्रूचा;
हें देई, दुसरी मला मग नको राया! तुझी दक्षणा
नीती न्याय बघोनि नित्य करिजे राजा! प्रजा रक्षणा."

बोले छत्रपती "धरोनि गुरुजी! आज्ञा शिरीं आपुली,
आहे वागत मी यथामति, जया द्याया भवानी बली!
धर्माचा प्रतिपाल योग्य करणें कर्तव्य माझें खरें;
घ्यावे मागुनि आज आपण गुरो! कांही तरी दूसरें."

"घ्यावें कांहींतरी असेंच म्हणशी? दे हेंच राजेश्वरा!
बोलो क्षत्रिय रामराम, पहिला जोहार नीचा बरा.
ठेवोनी निरपेक्षबुद्धि लढती सारे मराठे रणीं,
याची खूण असो तुम्हास **भगवा झेंडा** अतापासूनी.

देवो श्रीरघुवीर मंगल तुला–येतो–बसावें–पुरें."
ऐसें बोलुनि रामदास गुरुजी गेले निघोनी त्वरें.
आज्ञा मानुनि ती प्रमाण भगवा झेंडा रणीं लाविला—
कोठे तो नृप, ते गुरु, समय तो झेंडाही तो आपुला!

ज्याला पाहुनि धीर, वीर समरा सोडोनि भांबावले,
शस्त्रें टाकुनिया स्त्रियांत दडले, देशोधडी लागले,
भ्याले, रानधुळीत चीत पडले, अल्लाकडे धावले,
झेंडा तो अरिधैर्यभेदक कुठें गेला? कसें जाहलें!
ओष्टा चावुनि, दात खावुनि, मदें गर्जोनि रानींवनीं
गेले धाउनि, खड्ग घेउनि अहा माझे मराठे रणीं,
मांडी थोपटुनी रणीं झगडले, मेलेहि ज्याच्यास्तव,
झेंडा तो, रणसिंह ते, मज विभो! स्वप्नीं तरी दाखीव.

दिल्ली ध्वंसुनि नाचला झयझया जो शत्रु-छातीवरी,
पाहोनी अटका पुन्हा फडकला, जावोनि कोल्हापुरी,
झाला भीम पराक्रमी, जयजयी, धर्मप्रजा पालक,
झेंडा तो मज दाखवा कुणितरी या छातिचा मालक!

स्वामी श्रीशिवभूपती झगडले ज्याच्यापुढें आपुलें,
बाजीही पडला, रणी निजतनू तान्हाजिनें वाहिलें
बाजीरावहि विप्र, क्षत्रिय परी झाला जयाच्या बळें,
हा! हा! क्षत्रिय मी असूनि असु हें त्यावीण कां ठेविलें?

## ४. भगव्या झेंड्यास

'मोहर' १९४१ —गं. वि. ठेकेदार

किल्ल्यांच्या बुरुजांवरी ध्वजवरा! होतासि तूं डोलत
केलें राष्ट्र समस्त तूं निशिदिनीं आंदोलनें जागृत
वीरांच्या समशेरिंचें तुजपुढें चाले सदा नर्तन
उत्साहें स्फुरती मराठगडि ते त्वद्गर्जना ऐकुन.
वीरांचे मुजरे तुवां कितितरी स्वीकारिलें हांसत
हिंदुस्थानभरी तुझा जय सदा होता ध्वजा! गाजत.

आतां मात्र मलूल होउनि इथें देवालयाच्या शिरीं
पूर्वीच्या निजवैभवा स्मरुनियां तूं स्फुंदसी अंतरीं
गेलें तें अपुलें स्वराज्य सखया! स्वातंत्र्य तें संपलें!
गेला तो अभिमान, तेज नुरलें, ऐश्वर्य तें लोपलें
आतां तूं कितिही जरी फडकसी कोणी न तूंतें पुसे
दैवा देउनि दोष तूं युगभरीं राही इथें भारसें.

पूर्वी जो ध्वज वैभवें विलसला तो आज आक्रंदतो
'कालाची करणी अगम्य म्हणुनी कालास त्या वंदितो.'

# ५. भगवा झेंडा

'पंचगंगा' फेब्रु० १९६४ —राजकवी शं. बं. भोसले

मिरवूं चला चला या। भगवाच एक झेंडा हा ॥ धृ० ॥

भगवाच एक झेंडा। महशूर तीन खंडा ॥
रणरंगिं खास तोंडा। वीरास धीर द्याया ॥ १ ॥

समरांगणीं मराठा। करि खड्ग खणखणाटा।
घेवोनि तीर कमठा। हांकेस येई ज्याच्या ॥ २ ॥

स्वातंत्र्य-रक्षणाला। जमला मराठमोळा।
जो स्फूर्ति देई त्याला। शत्रू रणीं चिराया ॥ ३ ॥

शिवराज छत्रपतिचा। महाराष्ट्र भूपतीचा।
जो वंद्य बहुजनांचा। दीनास देई छाया ॥ ४ ॥

मिळवी सदा यशाला। सीमा न वैभवाला।
त्यागी जगांत ठरला। श्रीदास जागुनीया ॥ ५ ॥

हा मर्द मावळ्याचा। हा प्राण हिंदभूचा।
जो देश, धर्म आमुचा। वाहूं तयास काया ॥ ६ ॥

## ६. भगवा झेंडा वंदन

'पंचगंगा' फेब्रु. १९६४ —राजकवी शं. बं. भोसले

शिवरायाचा भगवा झेंडा
अटकपार जाउनि भिडला
चला वंदु त्याला, जन हो ॥ धृ० ॥

ज्याच्यासाठी समरीं लढले शूर ते मावळे
ज्याच्यासाठी मर्द मराठा मृत्यूला कवटाळे
ऐसा भगवा झेंडा हा,
दरारा जयाचा रिपुला
चला वंदु त्याला ॥ १ ॥

तानाजी, बाजी, रणगाजी, शूर ते नेताजी
कुरवंडी देहाची करिती ज्यासाठी संताजी
रिपुरुधिरानें रंगुनि गेला,
पराक्रमी लोकीं ठरला
चला वंदु त्याला ॥ २ ॥

## ७. भगवा झेंडा

'कवनगुच्छ' १९२१ —ग. त्र्यं. माडखोलकर

शिवप्रभूच्या स्वातंत्र्याचा हा भगवा झेंडा !
श्रीमंतांच्या शौर्यश्रीचा हा भगवा झेंडा !
संतकवींच्या सायुज्याचा हा भगवा झेंडा !
वागीशांच्या वाग्विभवाचा हा भगवा झेंडा !
पतिव्रतांच्या पुण्याईचा हा परमोद्रेक !
जुलुमावरतीं स्वातंत्र्याची ही भाला-फेंक !
सत्याचा निघृण काळाला हा शाश्वत धाक !
कर्तव्याची, भवितव्याची ही भेदक हाक !
'पौरुष करितें दुर्बल घातक दैवावरि मात'
या तत्वाची याद जागती ही झुलते येथ !
स्वातंत्र्यास्तव लढतां लढतां जे गारद झाले
रणसिंहाच्या हृदयांतुनि त्या उसळुनि वर आले—
चैतन्यासह जनसेवेचें मंगल जें ध्येय
मूर्तरूप तें गगनवितानीं हेलावे काय ?
राष्ट्रोद्बोधक उर्जस्वल संदेश समर्थांचें
जागवीत ते किंवा ध्वज हा वाऱ्यावर नाचे ?
सहज नभीं हा स्वातंत्र्यध्वज जेव्हां आंदोले
अभिमानानें राष्ट्रतेज हें वाटतसें डोले !
या राष्ट्राचें परमतेज हें जगतीं भडकूं दे—!
भगवा झेंडा वातावरणीं अविरत फडकूं दे—!

# ८. भगवा झेंडा

**'पद्मदल' १९२७ पुरुषोत्तम विश्वनाथ रहाळकर (वनवसंत)**

डोल डोल तूं भगव्या झेंड्या ! डोलत मोदें राहीं ॥ धृ० ॥

डोल डोलुनी स्फूर्ति देउनी रणशूर मराठ्यांला !
विजया खेंचुनि कितिदां अणिलें ज्ञान न का जगताला ? ॥ १ ॥

फड फड शब्दें तटतट तुटती वीरवरांचे बंद ।
तसेंच फुटती म्लेंच्छशकांचे भीतीनें हृत्पिंड ॥ २ ॥

जरिपटक्यासह थयथय नाचत अटकेपारहि जासी ।
अभ्युदयाच्या ती सीमेची अटक झुगारायासी ! ॥ ३ ॥

कितिक संकटें आली येतिल जातिल आलीं तैसी ।
अम्ही मराठे हिंमत अमुची टक्कर दे काळाशीं ॥ ४ ॥

जरि दास्यानें दीन जाहलो अम्ही मराठे आज ।
हृदयाकाशीं तुझ्या स्मृतीची संतत तळपे वीज ! ॥ ५ ॥

नांव मराठा जिवंत जोंवरि जिवंत हृदयें अमुचीं ।
देह बंधनीं असो हवा तर स्वतंत्र परि तीं साची ॥ ६ ॥

मराठि हृदया त्वदीय कंपन-लहरी ती हलवील ।
महाराष्ट्रिं या दिव्य स्फूर्तिची निर्झरिणी वाहील ॥ ७ ॥

तुझ्या विलासा स्वातंत्र्याचें योग्य जरी तें भुवन ।
काय उद्यांचें तुला सांगु बा ! मानुनि घे हृत्स्थान ॥ ८ ॥

उचंबळोनी हृदयीं येई वन-वसंत शाहीरा ।
प्रियकर भगव्या झेंड्या ! घेई हा कवनाचा मुजरा ॥ ९ ॥

# ९. जरिपटका

'महाराष्ट्र कवि परंपरा' १९३९ —साधुदास

हिंदुशाहिच्या साम्राज्याच्या गाजवीत घटका ।
राहिला गाजवीत घटका ।
दिसेल का तो पुन्हां एकदां प्यारा जरिपटका ॥ धृ० ॥

शिवनेरीच्या शिवा-भुत्याच्या हातांतिल पोत,भडकला,हातांतिल पोत ।
धर्माच्या त्राणास्तव ज्याची पाजळली ज्योत ॥
जगदंबेला करित आरती मावळखोऱ्यांत, नाचला, मावळखोऱ्यांत ।
चाफळच्या जोग्याचि घेउनि नाचाला साथ ॥
सह्याद्रिच्या लवणांमधुनी जागविली रात, कितींदा, जागविली रात ।
दुमदुमलीं गिरि-गुहाकंदरें तीं जयनादांत ॥
कर्तृत्वानें सर्व जगाला लावियला चटका, जयाने, लावियला चटका ।
दिसेल का तो पुन्हां एकदा प्यारा जरिपटका ॥ १ ॥

सर्व महाराष्ट्राची ज्यानें झाडुनियां झोंप, पुरातन, झाडुनियां झोंप ।
प्रतिपिंडीं लाविलें भडकत्या जागृतिचें रोप, ॥
नसानसांतुन पेरुनि ज्यानें थरथरता कोप, एकदां, थरथरता कोप ।
परदास्याच्या जाड श्रृंखला उखडियल्या खूप ॥
अटकेपासुनि बंगाल्यावरि झांपेवरि झांप, घेउनि, झांपेवरि झांप ।
जय-लक्ष्मीच्या पदीं वाहिलें रक्ताचें माप, ॥
मर्द आणि नामर्द भेद हा हिंदुमाजि लटका, ठरविला,
हिंदुमाजि लटका ।
दिसेल का तो पुन्हां एकदां प्यारा जरिपटका ॥ २ ॥

दरकदार सरदार शिपाई लावुनियां नजरा, आपुल्या, लावुनियां नजरा ।
दिव्यपदाला करुनि राहिले अदबीनें मुजरा ॥
तळकोंकणच्या घाटांवरुनी सुटलेला वारा, चालतां, सुटलेला वारा ।
निरोप घ्याया मुरडुनि आला जातां परभारा ॥
अस्मानांतिल गारा आणिक सळसळत्या धारा, ढगांच्या,
सळसळत्या धारा ।
या साऱ्यांनी द्यावी खंडणी ज्याच्या दरबारा ॥
त्यावांचुनि नाहींच जाहली कोणाला सुटका, खरोखर,
कोणाला सुटका ।
दिसेल का तो पुन्हां एकदां प्यारा जरिपटका ॥ ३ ॥


मुलुख-गिरीला निघतांना जो मोठ्या डौलांत, सर्वदा, मोठ्या डौलांत ।
वज्रहात फुरफुरत निघाले ज्याच्या छायेंत ॥
हिंदुशाहिच्या बेअदबीची बोलाया बात, चुकुनही, बोलाया बात ।
जीभ कोण उचलील जगामधिं मायेचा पूत ॥
रणजर्जर जाहल्या तनूची पुन्हा पुन्हा कांत, टाकुनी, पुन्हा पुन्हा कांत ।
नागापरि जो फडा उभारी एका निमिषांत ॥
सर्वकाल स्वातंत्र्य-सुधेचा पाजवीत घुटका, राहीला, पाजवीत घुटका ।
दिसेल कां तो पुन्हा एकदां प्यारा जरिपटका ॥ ४ ॥

भिन्न जातिची भिन्न मतांची जुडवुनियां जूट, जयानें, जुडवुनियां जूट ।
कृति कराया वळुनि दाविली वाऱ्याची मोट ॥
तोफांच्या गोळ्यास भिडविले छातीचे कोट, सारखे, छातीचे कोट ।
वाण सतीचें पार पाडिलें तें बिनबोभाट ॥
पानपतासम रणसौद्यामधिं एकादी तूट, लागतां, एकादी तूट ।
दिव्य यशाच्या शोभुनि गेली गालावरि तीट ॥
दैवाचा वाहविला ज्यानें डेराही फुटका, शिगेवरि, डेराही फुटका ।
दिसेल का तो पुन्हा एकदां प्यारा जरिपटका ॥ ५ ॥

शनिवाऱ्याच्या वाड्यावरुनी बिरुदाचें गान,जयाच्या, बिरुदाचें गान
घालित होतें दिशादिशांतुनि सगळ्या थैमान ॥
इतिहासांतिल मायभूमिच्या सोन्याचें पान, चमकलें, सोन्याचें पान।
कोण शके बोलांत वदाया त्याचें महिमान? ॥
जुनी आठवण हृदया सोडी करुनी बेभान, घडिघडि करुनी बेभान।
ओसरतांना मागे ठेवी आगीचें रान ॥
साधुदास बेचैन जिवाला गाउनियां फटका, रंजवी, गाउनियां फटका।
दिसेल का तो पुन्हां एकदां प्यारा जरिपटका ॥ ६ ॥

# विभाग पाचवा : मराठी भाषा

## ‘अमृतातेंही पैजा जिंके’, ‘कां जिंके ?’



# १. मराठी भाषेची थोरवी

'काव्यविलास' २८-११-१९४१ श्रीधर

प्राकृत भाषा म्हणोनि । अव्हेर न करावा पंडित जनीं
जैसी कृष्णा-त्रेणेची तीरें दोन्ही । परी उदक जाणा एकचि ॥ १ ॥

दोन्ही दाढा एकचि स्वर । एक पाहणें दोन्ही नेत्र
कीं दों पात्रांत पवित्र । एकचि दुग्ध घातिलें ॥ २ ॥

दोन्हीमाजीं गोडी एक । जैसें त्रि-वेणीस भरलें उदक
एक सुवर्णकूपिका अमोलिक । ताम्र-धातूची एक घडली ॥ ३ ॥

दोन्ही कुप्या नेऊनि देख । श्री रामेश्वरासी केला अभिषेक
दोन धातु एक उदक । देवास समचि आवडे ॥ ४ ॥

अ-बळांस न कळे संस्कृत वाणी । जैसें आडांतील गोड पाणी
परी तें दोर-पात्रावांचोनी । अशक्त-जनां केविं निघे ॥ ५ ॥

तोचि तडागासी येतां त्वरें । तात्काळचि तृषा हरे
अ-बळा जनां तारावया ईश्वरें । प्राकृत ग्रंथ निर्मिले ॥ ६ ॥

मुख्य संस्कृत बघावें । परी तें अ-बळांसी नुगवे
महा-गज कैसा बांधवे । कमळतंतू घेउनि ॥ ७ ॥

सर्वांस मान्य गीर्वाण । जरी असेल पूर्वपुण्य
तरीच तेथींचें होईल ज्ञान । तरी अ-बळा जन केंवि तरती ॥ ८ ॥

उत्तम वस्त्रें लेती नृ-पती । तीं दुर्बळांसी केवीं प्राप्त होती
मग ते घोंगडीच पांघरती । शीतोष्ण निवारणा ॥ ९ ॥

जैसें दधी मंथितां बहुत । त्यांतून निघे नवनीत
कीं स्वाती-जळापासोन अद्‌भुत । मुक्ता-फळ निपजे ॥ १० ॥

कीं इक्षु-रसापोटीं शर्करा । रसनेसि गोडी तेचि विचारा
कीं राजियापासून राज-पुत्रा । मान्यता होय बहुतचि ॥ ११ ॥

मऱ्हाठी वचनें निश्चित । परी अत्यंत रस-भरित
मधु-मक्षिकांचे मुखींहुनी स्रवत । अती सु-रस जैसा कां ।। १२ ।।

गीर्वाण हें शशी मंडळ अद्भुत । त्याची प्रभा हे प्राकृत
संस्कृत ग्रंथ वर्णिती पंडित । अर्थ प्राकृत करिती पै ।। १३ ।।

सिकतेमाजी दिव्य रत्न । जरि सांपडे न करितां प्रयत्न
तरीं चतुरीं करावें जतन । किंवा अव्हेर करावा ? ।। १४ ।।

कष्टेंवीण राज्य आलें हातां । तरी कां वोसंडावें तत्त्वतां
प्राकृत भाषा ऐकोनि कथा । लाभ श्रोतीं घेइजे तेवीं ।। १५ ।।

मुक्ता-फळाचिया माळा । वरी सु-वास सुटला आगळा
तरी चतुरीं का न घालाव्या गळां । अती आवडी करुनी ।। १६ ।।

आधींच इक्षु-दंड गोड । त्यावरी आले शर्करेचे घड
तैसी रघुनाथ-कथा सुवाड । त्यावरी साहित्य पुरविलें ।। १७ ।।

## २. माझी मायबोली

**'दुःख माझें रंगलें'** १९६९ **योगेश्वर अभ्यंकर**

माझी मायबोली अमृतकलश
ओंवींत उफाळे मराठी आवेश
बहुजनांसाठीं अवतार नवा
उजळी ज्ञानेश प्रतिभेचा दिवा
निरूपण केलें उपमा गुंफून
कलाकार थोर घडवी जीवन—१

माझी मायबोली चंद्रभागेतीरीं
नामदेवासंगें छेडी एकतारी
पहाटप्रहरीं जनाबाई गाते
भावना अमृत मनीं ओसंडते
गोऱ्या कुंभारानें मूल तुडविलें
एकरूपतेनें अभंग गायिले—२

माझी मायबोली तुकारामासंगें
चंद्रभागेतीरीं म्हणते अभंग
भक्तिरस नवा त्यास मान द्यावा
मेळाव्यांत जीव एकरूप व्हावा
मायबोली करी विठ्ठलाचा घोष
शोभतो साधाच अभंगाचा वेष-३

माझी मायबोली मराठी रांगडी
पाठीवरी टाकी भरडी घोंगडी
ऐका व्हं, जी, रे जी वाजे तुणतुणें
गातसे शाहीर पराक्रम गाणें
गडावरी वाजे विजयी चौघडा
उंच फडकला भगवाच झेंडा–४

माझी मायबोली नाचे ठुमकत
गौळण चालली कुठें हो थाटांत
मुलखावेगळी लावणी रंगली
खाण लावण्याची आम्हांस लाभली
झुलत खुलत नाचे नखऱ्यानें
आणि भवताली पाहती कुऱ्यानें-५

माझी मायबोली शिपाई बनली
नवें गाणें गाई तुतारी फुंकली
कडाडे चपला जुन्या रूढींवरी
कृष्णाच्या शब्दांत अवीट माधुरी
जयजयकार क्रांतीचा करून
आज मिरविते मान उंचावून–६

माझी मायबोली जणूं कमलिनी
रसिक भ्रमर जातात रंगूनी
मधुघट तिचा अक्षय भरला
गुलाबी कोडें हें ठाऊक तुम्हांला
भावगीतांतून मानवी भावना
शब्दरूप घेती अमूर्त कल्पना-७

माझी मायबोली बोलते त्वेषांत
जातिभेद नको तिच्या अंगणांत
मानव तितुका आज मेळवावा
अवघा समाज साक्षर बनावा
माझी मायबोली भावनांचें धन
गरीब असूनी मानानें सधन–८

मऱ्हाठी वचनें निश्चित । परी अत्यंत रस-भरित
मधु-मक्षिकांचे मुखींहुनी स्रवत । अती सु-रस जैसा कां ॥ १२ ॥

गीर्वाण हें शशी मंडळ अद्भुत । त्याची प्रभा हे प्राकृत
संस्कृत ग्रंथ वर्णिती पंडित । अर्थ प्राकृत करिती पै ॥ १३ ॥

सिकतेमाजी दिव्य रत्न । जरि सांपडे न करितां प्रयत्न
तरीं चतुरीं करावें जतन । किंवा अव्हेर करावा ? ॥ १४ ॥

कष्टेंवीण राज्य आलें हातां । तरी कां वोसंडावें तत्त्वतां
प्राकृत भाषा ऐकोनि कथा । लाभ श्रोतीं घेइजे तेवीं ॥ १५ ॥

मुक्ता-फळाचिया माळा । वरी सु-वास सुटला आगळा
तरी चतुरीं का न घालाव्या गळां । अती आवडी करुनी ॥ १६ ॥

आधींच इक्षु-दंड गोड । त्यावरी आले शर्करेचे घड
तैसी रघुनाथ-कथा सुवाड । त्यावरी साहित्य पुरविलें ॥ १७ ॥

## २. माझी मायबोली

'दुःख माझें रंगलें' १९६९ — योगेश्वर अभ्यंकर

माझी मायबोली अमृतकलश
ओंवींत उफाळे मराठी आवेश
बहुजनांसाठीं अवतार नवा
उजळी ज्ञानेश प्रतिभेचा दिवा
निरूपण केलें उपमा गुंफून
कलाकार थोर घडवी जीवन–१

माझी मायबोली चंद्रभागेतीरीं
नामदेवासंगें छेडी एकतारी
पहाटप्रहरीं जनाबाई गाते
भावना अमृत मनीं ओसंडते
गोऱ्या कुंभारानें मूल तुडविलें
एकरूपतेनें अभंग गायिले–२

माझी मायबोली तुकारामासंगें
चंद्रभागेतीरीं म्हणते अभंग
भक्तिरस नवा त्यास मान द्यावा
मेळाव्यांत जीव एकरूप व्हावा
मायबोली करी विठ्ठलाचा घोष
शोभतो साधाच अभंगाचा वेष-३

माझी मायबोली मराठी रांगडी
पाठीवरी टाकी भरडी घोंगडी
ऐका व्हं, जी, रे जी वाजे तुणतुणें
गातसे शाहीर पराक्रम गाणें
गडावरी वाजे विजयी चौघडा
उंच फडकला भगवाच झेंडा–४

माझी मायबोली नाचे ठुमकत
गौळण चालली कुठें हो थाटांत
मुलखावेगळी लावणी रंगली
खाण लावण्याची आम्हांस लाभली
झुलत खुलत नाचे नखऱ्यानें
आणि भवताली पाहती कुऱ्यानें-५

माझी मायबोली शिपाई बनली
नवें गाणें गाई तुतारी फुंकली
कडाडे चपला जुन्या रूढींवरी
कृष्णाच्या शब्दांत अवीट माधुरी
जयजयकार क्रांतीचा करून
आज मिरविते मान उंचावून–६

माझी मायबोली जणूं कमलिनी
रसिक भ्रमर जातात रंगूनी
मधुघट तिचा अक्षय भरला
गुलाबी कोडें हें ठाऊक तुम्हांला
भावगीतांतून मानवी भावना
शब्दरूप घेती अमूर्त कल्पना-७

माझी मायबोली बोलते त्वेषांत
जातिभेद नको तिच्या अंगणांत
मानव तितुका आज मेळवावा
अवघा समाज साक्षर बनावा
माझी मायबोली भावनांचें धन
गरीब असूनी मानानें सधन–८

# ३. माझी माय आहे मरहट्टी

'धरतीमाता' २०-१०-१९६३ अमरशेख

माझी माय आहे मरहट्टी
ती माझी मी तिच्याचसाठीं
तिनें मजवरी जीव लाविला
मी ओवाळुनि जीव टाकिला
तिचें नि माझें अभंग नातें
धजे कोण त्या तोडायातें
जरा तिचा अपमान जाहला
रोधिन मी त्या कळिकाळाला
श्वान मांजराला रे कोणी
नका 'बोलवूं' मराठींतुनी
श्वान मांजरासाठीं कांहीं
माझी माय मराठी नाही.
वीररसाची वहाती गंगा
थोपवि सह्याद्रीच्या रांगा
तेववि सह्यगिरी माथ्यावर
शृंगाराचि ज्योति नवथर
भक्तिरसाचा मळा फुलवुनी
गाते मानवतेची गाणीं

स्वातंत्र्यप्रिय माय मराठी
विलसे जिजा शिवाच्या ओठीं
स्वातंत्र्याची भाषा कांही
स्वार्थ परत्वें आपुली नाही.
राघु मैना घरीं आणुनी
देती पाठ मराठी कोणी
"म्हणा विठ्ठला, म्हणा विठ्ठला,
राघु मैने, बोला बोला."
अन् समजा राघू मैनेला
बोल तुम्ही आपुला शिकविला
म्हणूनि कधी वाटेल जिव्हाळा
त्या पक्ष्यांच्या आम जातिला ?
राघूमैनेसाठीही पण
वापरूं नये भाषा आपण
लखलाभ तयां त्यांची बोली.
त्यांत अस्मिता आहे आपुली.
हक्कावर कोणाच्या कोणी
जगूं नये रे बांध घालुनी
हेंच शिकवित माय मराठी
म्हणुनिच ती मम ओठीं पोटीं

## ४. माझा मराठाचि बोल

‘तृप्ति’ २२।११।१९६१ सौ. सुहासिनी इर्लेकर

माझा मराठाचि बोल
मानभावाच्या गर्भात
जगां देतसे हुंकार
चक्रधर मायपूत—१

माझा मराठाचि बोल
रांगतसे हळूहळू
चारितो मुकुंदराज
वेदवल्ली बाळकडु—२

माझा मराठाचि बोल
रडे कधी धाई धाई
गहिंवरे ज्ञानराया
पाजी अमृत गीताई—३

माझा मराठाचि बोल
कधी रुसतो फुगतो
गोंजारितो नामदेव
चोखामेळा नाचवितो—४

माझा मराठाचि बोल
हुंदडतो लडिवाळे
जनी, मुक्ति पुरवीती
योग सुखाचे सोहाळे—५

माझ्या मराठी बोलाचें
गोड बोबडें बोलणें
शब्दसृष्टीचे ईश्वर
लेववितो बाळलेणें—६

माझा मराठाचि बोल
एकनाथांचें अंगूल
धरुनिया करीतसे
अध्यात्माची वाटचाल—७

माझा मराठाचि बोल
बुडविला इंद्रायणी....
देवकीचें बाळ तान्हें
आलें कालिया मर्दूनी !—८

माझ्या मराठी बोलाचे
गुरु संत रामदास
उकलुनी दावीती त्यां
प्रपंच नी परमार्थ—९

माझा मराठाचि बोल
डफ, झांज, तुणतुणें
वाजवीत जागवितो
निद्रीत मराठी मनें—१०

माझा मराठाचि बोल दिव्य नभींचा भास्वत् !
नका धजूं स्पर्शण्याला क्षणीं व्हाल भस्मसात् !—११

## ५. मराठीची ओवी

'अबोलीची नक्षी' १६।३।१९७२ —कल्याण इनामदार

मराठीची ओवी
कंठी उमटती
फुलोरता ओठी
आकारुन सुर
अंकुरते दिठी
भक्तीचे काहूर
चैतन्याची—१
नाचे डोळी—२

संतवचनांचे
पुष्ट होती शब्द
होऊन स्मरण
फुटून पालवी
तेजाळती कण
गाता एक ओवी
पुण्याईचे—३
मराठीची.—४

## ६. सरस्वतीच्या वीणेची

'वाङ्मयशोभा' जानेवारी १९८६ —कल्याण इनामदार

माझ्या तुकयाचा अभंग
आणि ज्ञानेशाची ओवी
माय मराठी भाषेला
जणू अमृतपालवी—१

खेड्यापाड्यात घुमता
एकनाथाचे भारूड
वासुदेवाची पाऊले
होती अंगणाशी जड—२

नामदेवाची रचना
कुणी घोळता कीर्तनी
होते बोलकी हातात
टाळ-चिपळ्यांची वाणी—३

जात्यावर दळताना
श्रमपरिहारासाठी
जना, मुक्ताईची गाणी
येती आपोआप ओठी—४

असे मराठी मातीत सदा सजले अक्षर
सरस्वतीच्या वीणेची इथे लागलेली तार—५

# ७. संस्कृत आणि मराठी

'प्रवाहिनी' १९५६ —एकनाथ

संस्कृत वंद्य प्राकृत निंद्य हे बोल काय होती शुद्ध
हा ही अभिमानवाद अहंता अशुद्ध परमार्थी—१

मोलें भूमि खणितां वैरागरीं अवचटें अनर्घ्य रत्न लाभे करीं
तें रत्न सांपडल्या केरीं काय चतुरीं सांडावे?—२

तेंव्ही संस्कृत-आटाटी सहसा परमार्थी नव्हे भेटीं
तेचि जोडल्या मराठीसाठीं तेथ घालीती मिठी सज्ञान—३

जो जो भाषाभिमान तो तो वक्त्यासी बाधक पूर्ण
ज्या भाषां केलें ब्रह्म कथन तें होय पावन हरिचरणीं—४

महारायाच्या ताटापाशीं रिगमू नाही समर्थांसी
तेथें सुखेंसि बैसे माशी तेवीं हा आम्हांसी प्राकृत ग्रंथ—५

जेवीं सूर्याचेनि प्रकाशें सूर्यासीचि कीं सूर्यो दिसे
तेवीं माझेनि प्रकाशें मज मीचि असे देखत—६

ऐशियाही ठायीं जाण कैचें नवें जुनें ज्ञान
बहुकाळ ठेविलें सुवर्ण त्यासि म्हणें कोण कुहजकु—७

कालचाचि आजि उगवला तो सूर्य काय म्हणावा शिळा
कीं आजिचा अग्नि सोंवळा कालिचा काय वोंवळा म्हणों ये—८

तेवीं सनकादिकांचें जें ज्ञान तेंचि मराठीभाषेमाजी जाण
येथें ठेवूं जातां दूषण दोषी आपण होइजे—९

कां सुवर्णाचें केलें सुणें परी तें मोलें नव्हेचि उणें
तेवीं सनकादिकांची ज्ञानें देशभाषा हीनें नव्हतीच—१०

तेवीं कां गुळाचें कारलें केलें परी तें कडूपणा नाहीं आलें
जेवीं हंसगीत मराठें झालें नाहीं पालटलें चिन्मात्रा—११

जें मोल मुकुटींच्या हेमासी	तेंचि मोल सुवर्णश्वानासी
जो कां ग्राहिक सुवर्णासी	दोघे दोघांसि समत्वें–१२

डोळ्यांनी आरिसा प्रकाशिजे	तेथें डोळेनि डोळा पाहिजे
तेवीं हें ज्ञान जाणिजे	देखणें देखिजे देखणेनी–१३

## ८. एकनाथांचा मराठीचा अभिमान

'महाराष्ट्र गाथा' —एकनाथ

वंदू प्राकृत कवीश्वर । निवृत्ति प्रमुख ज्ञानेश्वर ॥
नामदेव चांगदेव वटेश्वर । ज्यांचें भाग्य थोर गुरुकृपा ॥ १ ॥

जयांचें ग्रंथ पहातां । ज्ञान होय प्राकृतां ॥
तयांचें चरणीं माथा । निजात्मकता निजभावें ॥ २ ॥

संस्कृत ग्रंथकर्ते ते महाकवी । मा प्राकृतीं काय उणीवी ॥
नवीं जुनीं म्हणावीं । कैसेनि केवीं सुवर्णसुमनें ॥ ३ ॥

कपिलेचें म्हणावें क्षीर । मा इतरांचें तें काय नीर ॥
वर्णस्वादें एकचि मधुर । दिसे साधार सारिखें ॥ ४ ॥

जें पाविजे संस्कृत अर्थें । तेंचि लाभे प्राकृतें ॥
तरि न मनावया येथें । विषमचि तें कायीं? ॥ ५ ॥

कां निरंजीं बैसला रावो । तरी तोचि सेवकां पावन ठावो ॥
तेथें सेवेसी न वचतां पाहो । दंडी रावो निजभृत्यां ॥ ६ ॥

कां दुबळी आणि समर्थ । दोहींस रायें घातले हात ॥
तरी दोघींसिहि तेथ । सहज होत समसाम्य ॥ ७ ॥

देशभाषावैभवें । प्रपंचपदार्थीं पालटली नांवें ॥
परी रामकृष्णादिनामां नव्हे । भाषावैभवें पालटू ॥ ८ ॥

संस्कृतवाणी देवें केली। तरी प्राकृत काय चोरापासोनि झाली ? ॥
असोतु या अभिमानभुली । वृथा बोलीं काय काज ॥ ९ ॥

आतां संस्कृता किंवा प्राकृता । भाषा जाली जे हरिकथा ॥
ते पावनचि तत्वतां । सत्य सर्वत्रा मानली ॥ १० ॥

सद्गुरुकृपा समर्थ । तेणें कृपें श्रीभागवत ॥
वाखाणिले जी प्राकृत । शुद्ध मतितार्थ सोलींव ॥ ११ ॥

जनार्दनकृपादृष्टि । माझ्या मराठ्या आरिखा गोष्टी ॥
रिघाल्या एकादशाच्या पोटीं । स्वानंदतुष्टीं निजबोधें ॥ १२ ॥

संस्कृत प्राकृत परवडी । सज्ञान सेविती स्वानंद गोडी ॥
गाय काळी आणि तांबडी । परी दुधीं वांकुडी चवी नाहीं ॥ १३ ॥

तेवीं संस्कृत प्राकृत भाखा । ब्रह्मासी पालट नाहीं देखा ॥
अभय अभेदें वदला एका । साह्य निजसखा जनार्दन ॥ १४ ॥

# ९. नमो हे महाराष्ट्रवागीश्वरी

'भावपूर्णा' १९४३ रा. अ. काळेले

नमो हे महाराष्ट्रवागीश्वरी !
नमस्ते प्रशस्ते कृपा तूं करी !
तुझ्या पुण्यवाणीत झाला खुला
अगे भक्तिसोपान सोपा भला
दुजा वेद तूं! धन्य तूं वैखरी !
नमो हे महाराष्ट्रवागीश्वरी ! १

प्रतापी तुझ्या मंत्रतेजोबळें
मराठी स्वराज्या असे स्थापिलें
अशी धन्य तूं वीरधात्री खरी !
नमो हे महाराष्ट्रवागीश्वरी ! २

तुझी माधुरी मोदमात्रावहा
फुलांनी, मुलांनी खुले गे अहा !
कसें प्रेम साठे तुझ्या अंतरीं !
नमो हे महाराष्ट्रवागीश्वरी ! ३

तुका–ज्ञानबा–दास–मोरेश्वरा
नमो कृष्ण–रामा नमो भास्करा
तुझे लाडके हे धरावे शिरीं
नमो हे महाराष्ट्रवागीश्वरी ! ४

## १०. मराठी

'चंद्रपुरी कवि' १९५४ — **तु. ना. काटकर**

जशी मायभूमी तशी मातृभाषा असे वंद्य आम्हांस त्रैलोकिंही
नव्या भारताचा नकाशा पहा तो असे आद्यभूमी महाराष्ट्र ही !
अहा ! ही मराठी किती रम्य मंजूळ वाणी असे प्राण गे जीवनीं
जिने घेतला वारसा ज्ञानदेवे मुखांतून गीर्वाण भाषेंतुनी !!
अये आज आम्ही तुला भूषवाया पुढें ठाकलो एक होऊनिया
अता ना कुणाची अम्हां रोधण्याला पहा छाति होईल येऊनिया।
अम्हाला हवी राजभाषा तशी राजभूमी अखंडीत या हिंदवी
जिची गर्जना ऐकुनी ज्ञानराजा-तुकोबादि येतील पुन्हां महीं !!

मयूरासनीं मान होता तुझा गे, परी विश्वविद्यालयीं ये अता
तुझें भाग्य तें लोकशाहीं उदेलें, किती उच्च स्वातंत्र्य लाभे मतां !
मराठीचिया मंदिराला झराळे नवद्वार दाही दिशेला पहा—
नवें ती अलंकार-वृत्तादि-जाती, कला-शास्त्र येईल घेऊनिया ! !

मराठी, मराठी ! मराठाच बाणा ! महाराष्ट्र पुत्रास शोभा जनीं !
महाराष्ट्र पुत्रां ! मराठी गिरा ही सदा वाढु द्या सह्यशैलाहुनी ! !

## ११. माऊली मराठी

'सहकार सेतू' १९८३ —माधव गोविंद काटकर

माऊली मराठी भाग्यवंत मोठी
आहे चिरंजीव गोजिरी गोमटी

मुक्ताईची दिव्य नेसली पैठणी एकनाथ ओवी नथ नासिकेत
कान्होपात्रेचीही घेतली ओढणी तुकोबाचे मोती अभंग कानात
ज्ञानदेवी लावी कस्तुरी ललाटी-१ सावतामाळ्याची पुष्पमाळ कंठी-२

जाहली तल्लीन चोख्याच्या भजनी प्रेमळ नामाने हरिपाठ गाता
वैष्णव मेळ्यात रंगली कीर्तनी जनाबाईनेही दळीता कांडता
कौतुकाने कर ठेवुनिया कटी-३ हिला भेटविला सखा जगजेठी-४

पंत नि पंडित संत मुक्तेश्वर कधी बांधियले पायात नुपूर
त्यांचे अलंकार हिच्या अंगावर कधी घेतली अन् करी समशेर
समर्थांची वाणी फुलतसे ओठी-५ नर्तनी मेनका कंदनात शक्ती-६

मायेच्या मायेचे वात्सल्य दिठीत
'विश्व माझे घर' अशी हिंची प्रीत
माऊलीच्या पायी घाला घट्ट मिठी-७

# १२. मातृभाषा

'यशोदायिनी' १९२८ —कुमार यशोद

जिच्यासाठीं बुभुःकारें समर्थांची स्फुरे वाणी,
जिला मुक्तेश्वरी साज नवी तेजस्विता आणी!
जिनें पंतांचिया अंकीं सदा लाडांत लोळावें,
जिनें कृष्णाचिया[1] संगें नव्या गानांत रंगावें!
जिच्यासाठीं प्रतिष्ठानीं[2] उदेली वैखरी दिव्या,
जिची कीर्ती दिगंतीं ने हरी[3] ती कां नसे भव्या!
जिच्या कासेंत व्याघ्रीचें भरोनी दुग्ध गोंजारी
सखा विष्णू जिचा तीची कशाला वानुं मी थोरी!
दऱ्याखोऱ्यांतील पुष्पें जिच्यासाठीं खुडी बाळ[5]
जिच्या कंठामध्यें शोभे स्वयें रामप्रभू[6] लाल!
सदा जागा तिचा सिंह[7] तियेची लाज राखाया
कुणाचीही नसे छाती तिला रोखून पहाया!
असेना मातृभाषा ती कशीही ती प्रिया मातें!
अशांनीं सेविलें जीतें कशी ना ती प्रिया मातें!

---

१. केशवसुत २. पैठण ३. ह. ना. आपटे ४. विष्णुशास्त्री
५. बालकवी ठोंबरे ६. रा. ग. गडकरी ७. न. चिं. केळकर.

# १३. आज मराठी रंगली

'मानसमेघ'–१९४५ सौ. इंदिरा कुळकर्णी

आज मराठी रंगली
नाचे आळंदीची धूळ।
ज्ञानयाच्या समाधीची
लागे हुंकाराया शीळ ॥ १ ॥

गात इंद्रायणी नाचे
हाती घेऊन अभंग।
तुकयाच्या स्पंदनात
झाली इंद्रायणी दंग ॥ २ ॥

रोज मोत्यांचें भरण
पडे जनीच्या जात्यात!
अठरा विश्वांची दरिद्री
घेई साथीसी अनंत ॥ ३ ॥

झाली माहेराची घाई
संत सखूच्या पाउला।
प्याली भक्तीचा श्रीरंग
सारा देह परिसला ॥ ४ ॥

# १४. माझी मराठी

'कमळवेल' ऑगस्ट १९५२ — वि. म. कुळकर्णी

माझ्या मराठीची गोडी
मला वाटते अवीट
माझ्या मराठीचा छंद
मना नित्य मोहवीत !–१

ज्ञानोबांची-तुकयांची
मुक्तेशाची-जनाईची
माझी मराठी चोखडी
रामदास-शिवाजीची–२

'या रे या रे अवघेजण'
हाक माय मराठीची
बंध खळाळा गळाले
साक्ष भीमेच्या पाण्याची !–३

डफ-तुण्तुणें घेऊन
उभी शाहीर मंडळी
मुजऱ्याची मानकरी
वीरांची ही मायबोली–४

नांगराचा चाले फाळ
अभंगाच्या तालावर
कोवळीक विसावली
पहाटेच्या जात्यावर !–५

नव्या प्राणाची 'तुतारी'
कुणी ऐकवी उठून
'मधुघट' अर्पी कुणी
कुणी 'माला'दे बांधुन !–६

लेक लाडका एखादा
गळां घाली 'वैजयंती'
मुक्त प्रीतीचा, क्रांतीचा
कुणी नजराणा देती–७

हिचें स्वरुप देखणें
हिची चाल तडफेची
हिच्या नेत्रीं प्रभा दाटे—
सात्त्विकाची-कांचनाची !–८

कृष्णा-गोदा-सिंधुजळ
हिची वाढविती कांती
आचार्यांचे आशीर्वाद
हिच्या मुखीं वेद होती–९

माझ्या मराठीची थोरी
नित्य नवें रूप दावी
अवनत होई माथा
मुखीं उमटते ओवी !–१०

# १५. आमुची माय मराठी हो !

'पानफूल' १९७३ —सूर्यकांत खांडेकर

आमुची माय मराठी हो !
कल्पतरुची फुलें अंगणीं त्यांचा गंध मराठी हो ! ॥धृ०॥

ज्ञानेशांनी केली किमया
इथेंच झाले समर्थ, तुकया
प्रेमाचा, समतेचा घुमतो येथें मंत्र मराठी हो—१

सह्याद्रीच्या कडेपठारी
मर्द मराठी मावळदारी
अजुन गर्जती शिवप्रभूंच्या स्मरणी सूर मराठी हो—२

भीम थडीला खाउन भाकर
गंगा थडीला देती ढेकर
अटकेवरती राघोजीचा विजयध्वजहि मराठी हो—३

वाऱ्यावरती घोडा फेकित
झांशीवाली उठली गर्जत
तिचियारूपें भारतवर्षी उसळे रक्त मराठी हो—४

'स्वराज्य माझा जन्महक्क' ही
दिव्य घोषणा लहरत राही
तिलक भाळिचा नित्य मिरविता झाली धन्य मराठी हो—५

घनांधकारी बघत चांदणें
भूषविती जे अनंत मरणें
त्या वीरांच्या पायीं अमुचे मुजरे नम्र मराठी हो—६

श्रद्धा अमुची आत्मबलावर
ध्येयसाधनीं रमूं निरंतर
अंतर्यामी नाचे अमुच्या विशाल स्वप्न मराठी हो–७

राहू मिरवत उदात्त बाणा
महाराष्ट्र हा राजसराणा
प्राण पणाला लावू, गर्जत जयजयकार मराठी हो–८

## १६. माझी माय मराठी

'संग्रहालय' (मासिक) मार्च १९८६ **प्रल्हाद चेंदवणकर**

माझी माय मराठी । तिची आगळीच धाटी ।
अशी रसाळ गोमटी । माझी माय मराठी ॥ धृ० ॥

ज्ञानयाने मोतियांची । तिला शब्दकळा दिली ।
तुकयाच्या अभंगात । ज्ञानरूपे प्रगटली ।
कीर्तनात दंग नामा । चंद्रभागे कांठी ॥ १ ॥

संत गोरा कुंभाराने । चिखलात घडविली ।
संत सावता माळयाने । मळ्यामध्ये फुलविली ।
चोखयाने खेळविली । घुंगराची काठी ॥ २ ॥

जनाबाई, मुक्ताईने । पाळण्यात जोजविली ।
जात्यावरी दळताना । ओठावर आली ओवी ।
बहिणाईने उकलल्या । संसाराच्या गाठी ॥ ३ ॥

अशी लावणी देखणी । जशी शुक्राची चांदणी ।
रामजोशी, होनाजीने । नखऱ्यानं नटविली ।
रंगे छक्कडीचा विडा । भाऊ फक्कडाच्या ओठी ॥ ४ ॥

तुळशीदास परशुराम । आगिनदास प्रभाकर ।
डफावरी पडता थाप । अंगी विरश्री संचार ।
अमर-अण्णाभाऊ संगे । मिरविली हाटी ॥ ५ ॥

माझी माय मराठी । दऱ्या-खोऱ्यात नांदती ।
अनवाणी पावलाने । रानावनात हिंडती ।
कुणी म्हणती कोंकणी । कुणी म्हणतात घाटी ॥ ६ ॥

## १७. मायबोलीचे माहेर

'सोपानदेवी' १९५०     **सोपानदेव चौधरी**

माझी मायबोली आज आली माहेराला
सभोवती संतयोगी सुपुत्रांचा मेळा ॥ धृ० ॥

नेसलीसे भागवत नाथाचे पैठणी
माथा शोभे मुगुट गाथा तुकयाचा नामी
ज्ञानेशाची ज्ञानेश्वरी मळवट भाळा ॥ १ ॥

अंगी शोभे नामयाची कीर्तन-कंचुकी
निळोबाची गाथा दंडी बाजुबंद-वाकी
मुक्तेश्वरी मौक्तिकांची नथ नासिकेला ॥ २ ॥

मुक्ता-जनीचे अभंग कर्णफुले कानी
अंगुठीत फाके प्रभा चोख्याची खुलूनी
समर्थांचा दासबोध चंद्रहार गळा ॥ ३ ॥

भाट बांधी कंकणे ती छातीने निधड्या
शाहीरी लावण्या तुझ्या बिल्लोर बांगड्या
पठ्याची ती धीट वृत्ती तीट शोभे गाला ॥ ४ ॥

आधुनिकांतही एक राष्ट्रसंत थोर
पंढरीच्या पाषाणांना फोडीतो पाझर
साने गुरुजींचा ळळा कटीसी मेखला ॥ ५ ॥

उच्चनीच आता येथे नाही भेदाभेद
नव्या मानवी धर्माचा मुखे गात वेद
उधळीत शक्ती आणी भक्तिभाव भोळा ॥ ६ ॥

जे जे मनी तेच जनी ऐसे हे सोज्वळ
मराठवाड्यात माझे नांदते आजोळ
आढळेल तुम्हा येथे जीवीचा जिव्हाळा ॥ ७ ॥

## १८. आमुची लिपी

**'सोपानदेवी'** **—सोपानदेव चौधरी**

लिपी आमुची नागरी
स्पष्ट उच्चारांचे वर्ण
महाराष्ट्रीयां लाभली
वाणी तैसी ही संपूर्ण ॥ १ ॥

नसे उच्चारांची व्याधी
नसे लेखनात अढी
जात धोपट मार्गाने
स्वर-व्यंजनांची जोडी ॥ २ ॥

अहो, हिची जोडाक्षरे
तोड नाही त्यांना कुठे
उच्चारातली प्रचीती
जशी ओठांवरी उठे! ॥ ३ ॥

जैसे लिहू तैसे वाचू
जैसे बोलू तैशा खुणा
जे जे लेखी तेच मुखी
ऐसा मराठीचा बाणा ॥ ४ ॥

सर्व उच्चारांचे शोधा
शास्त्रज्ञांनो, यंत्र एक
तेच दिसेल तुम्हाला
महाराष्ट्रीयांचे मुख ! ॥ ५ ॥

नाद-ध्वनी उच्चारांना
देत सदा आवाहन
लिपी ऐसी ही प्रभावी
माझ्या भाषेचे वाहन ॥ ६ ॥

## १९. पैजा कां जिंके

**'संगीता आणि अमृतगीते' १९८४ सोपानदेव चौधरी**

अमृताने जिंकीयेल्या
पैजा मराठी बोलाने
असे अमृतामाजीही
बोला, काय आहे उणे ?

जैसे मराठी देतसे
मुर्दालाही मर्दपण
तैसे अमृताने येते
मर्त्यालागींही जीवन !

अहो मराठीसारखी
अमृताला गोडी आहे
तिच्यासारखे अमर
जगी अमृतही आहे

अमृतास काय उणे ?
सांगतसे मी कौतिकें
माझी मराठी बोलकी
परी अमृत हे मुके !

## २०. आमुची मायबोली

' काव्य-ज्योती '  —माधव ज्युलियन

मराठी असे आमुची मायबोली जरी आज ही राजभाषा नसे,
नसे आज ऐश्वर्य या माऊलीला यशाची पुढे दिव्य आशा असे.
जरी पंचखंडांतही मान्यता घे स्वसत्ताबळें श्रीमती इंग्रजी
मराठी भिकारीण झाली तरीही कुशीचा तिच्या तीस केवी त्यजी?–१

जरी मान्यता आज हिंदीस देई उदेलें नवें राष्ट्र हें हिंदवी,
मनाचे मराठे मराठीस ध्याती हिची जाणुनी योग्यता, थोरवी;
असूं दूर पेशावरीं उत्तरीं वा असूं दक्षिणीं दूर तंजावरीं!
मराठी असे आमुची मायबोली, अहो ज्ञानदेवीच देखा खरी.–२

मराठी असे आमुची मायबोली जरी भिन्नधर्मानुयायी असूं,
पुरी बाणली बंधुता अंतरंगीं, हिच्या एक ताटांत आम्ही बसूं;
हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडूं वसे आमुच्या मात्र हृन्मंदिरी
जगन्मान्यता हीस अर्पूं प्रतापें हिला बैसवूं वैभवाच्या शिरीं–३

हिच्या लक्तरांची असे लाज आम्हां, नका फक्त पाहूं हिच्या लक्तरां–
प्रभावी हिचें रूपचापल्य देखा पडावी फिकी ज्यापुढें अप्सरा,
न घालूं जरी वाङ्मयातील उंची हिरेमोतियांचे हिला दागिने
मराठी असे आमुची मायबोली, वृथा ही बढाई सुकार्याविणें–४

मराठी असे आमुची मायबोली, अहो पारतंत्र्यांत ही खंगली,
हिची थोर संपत्ति गेली उपेक्षेमुळें खोल कालार्णवाच्या तळीं
तरी सिंधु मंथुनि काढूनि रत्नें नियोजूं तयांना हिच्या मंडनीं
नको रीण! देवोत देतील तेव्हां जगांतील भाषा हिला खंडणी.–५

# २१. माय मराठी

'सूरगंधा' ७ जुलै १९७१ **योगिनी जोगळेकर**

उभ्या खगांच्या पताका, झडे चौघडा नभाचा
आला जगन्नाथ रथ, माझ्या माय मराठीचा !

कौतुकात काजळकुंकू, अमृतांत नाहूमाखूं
आळंदिच्या माउलीची–आहे लाडकी ही लेक

रसूरशीत बांध्याची ठसठशीत तोडा साचा !
तुकोबांनी जडविला वज्रचुडा अभंगाचा ! !

मुक्ताईने-जनाईने-गुंफलीय वेणीफणी
नाथाचिया रेशमाची जरीबुट्टीची पैठणी

राज्यकारभारालागी गाठी दर्बार शिवाचा
सुभेदाराच्या सुनेला–हात देते माहेराचा ! !

वऱ्हाडच्या भोसल्याचा हिच्या ओटीलागी खण
कोंकणाच्या पेशव्याने दिला श्रीफळाचा मान !

आला सौभाग्य करंडा अंबेयाच्या जोगाईचा
हिला पहाया मुखडा, आयना भीमा नि गोदेचा !

सागराचे लाख कर फेनहार अर्पिताती
कृष्णा-कोयना धावती, करायला पंचारती

धन्य महाराष्ट्र पीठ, धन्य बाणा मराठीचा
शत जन्मीची पुण्याई–जन्म इथे यावयाचा !

# २२. इये मराठीचिये नगरी

'गीत शिवायन' १९७० —मधुकर जोशी

इये मराठीचिये नगरी !
शिवरायाचे पवाड गाती वाऱ्याच्या लहरी ॥ धृ० ॥

इथे जन्मले श्रीज्ञानेश्वर,
तेच मानवी होते ईश्वर
ओवी त्यांची अजून आहे अमुच्या ओठावरी !—१

पंढरीचा तो बुका घेऊनि
पहा तुका तो दिसतो अजुनि
चिपळ्या नादित अभंग गातो मंजुळ वीणेवरी !—२

जनाबाइची अमृत ओवी
वसंतातली देइ पालवी
भागवताच्या भक्तिरसाच्या ओघळती या सरी !—३

घांस घेइ रे हरी विठ्ठला !
नामा दारी पहा थांबला—
कापरापरि देह वाहिला त्याने चरणावरी !—४

मळ्यात भाजी खुडता खुडता—
अभंग रचती संत सांवता—
त्यांच्यासाठी ओवी गाती देवही मोटेवरी !—५

गोरोबांचे रांजण भरता
चोखोबांची भक्ती बघता
देव धावले दर्शन द्याया भीमेच्या या तीरी !—६

कृष्णा, गोदा नद्या येथल्या
मंजुळ गाती जणु भूपाळ्या
परमेशाचें चिंतन करती लहरी लहरीवरी !–७

जिकडे तिकडे उदंड पाणी
हिरवे डोंगर गाती गाणी
सहस्रशीर्षा सह्याद्रिच्या सौख्य असे दारी !–८

समर्थ भगवी लेवुन वसने
श्लोकातील ते सांगति वचने
दासबोध तो पारायण ते करति जन अंबरी !–९

उदो ! उदो ! हे श्रीजगदंबे
नमन आमुचे तुज प्रारंभे
कनक पावले तुझी पडूं दे वास्तूवास्तूवरी !–१०

## २३. मुजरा

'**रावसाहेबांची कविता**' जानेवारी १९६१

**रावसाहेब र. लु. जोशी**

अये मायबोली मम गे तुला घे प्रणाम
तूंचि मांगल्याचें माझें परम सौख्य धाम ।। धृ० ।।

आवेगती तव गे स्पर्शें मनाचे मराठे
स्निग्ध साद पडतां कानीं भ्रातृभाव दाटे
विसवतील अंतीं सारे भ्रमाचे फुपाटे
एकजीव पुनरपि होइल मराठा तमाम—१

रिपु दुर्जन सीमेवरती मांडिती धुमाळ
स्वार्पाया धावुनि जाती वीर तव सुभाल
ठणकाविति तडकाफडकी रोकडा सवाल
महाराष्ट्र गुणनैपुण्यें भारता ललाम—२

तूंचि प्रेमवल्ली माझी आप्तगोत्र सारा
चित्त खिन्न होता खुलवी मज तुझा इशारा
संजीवन सिंचती माये तुझ्या सुधाधारा
भावपूर्ण माथा लववी तुझा हा गुलाम—३

## २४. मायबोलीची भूपाळी

**' रावसाहेबांची कविता '** **रावसाहेब र. लु. जोशी**

प्रभातकाळी तुझी लागली ओढ मायबोली
भंवती गुंजे तव गुण गानीं मंगल भूपाळी
ज्ञानामृत गे तुला पाजिलें संत ज्ञानदेवें
नाथ समर्थें तुझी फोडिलीं शब्दांची पेवें
भक्त तुका तव तार छेडितां जनमत आंदोळे
साथ कराया भंवती जमले संतांचे मेळे
शिवशाहीचे भाट वाहती तुला कुर्निसात
शृंगारावरि वीररसाची झाली बरसात
चलन पटविती तुझे घोंगडें मर्द गांवढाळ
जिवट किती ही मूस रांगडी तुझी टांकसाळ
नव संज्ञा योजनी ना अडे
सत्वर फुटती ध्वनि रोकडे
सुघटित गुलज़ार नी फाकडे
रोखठोक हा नाद छणाणे नित रानोमाळीं—१

जडणघडण तव निसर्गनिर्मित राकट दळदार
थेट निग्रही तुझा पिंड गे कर्तृत्वा धार
कुणी डिवचितां प्रखर सूर तव लगेचि खडसावी
भीती लवही कधी कुणाची नसे तुझ्या गांवी
स्निग्ध साद परि तुझा परिसतां फुले दिव्य आशा
परंपरागत फूट घातुकी गुंडाळी गाशा
नसानसांतुनि प्रेम पाझरे खुलें दैव आतां
उजरे जीवन तुझ्या प्रभावें तूं आमुची संथा
जनता तव संथेची भारली
थेट एकरूपता पावली
उजवाया भारत धावली
महाराष्ट्रभू विजयोत्साहें तुजला कवटाळी—२

## २५. मऱ्हाटी ब्रह्मविद्येची कसवटी

**'महाराष्ट्र गाथा'** **—त्र्यंबकराय**

धन्य धन्य हे मऱ्हाटी । ब्रह्मविद्येची कसवटी ।
हा द्वारशिळेचा पोटीं । परिसु जोडिला ॥ १ ॥

हे घरिंची कामधेनु । अंगणींचा संतानु ।
अमृत उकळा पूर्णु । माथणीये आला ॥ २ ॥

हा पल्लवीचा चिंतामणी । मोक्ष गिंवसिला अंगणीं ।
बापु रे पवित्र वाणी । ऐसीचि आहे ॥ ३ ॥

शुद्धस्वरुपी निर्दोस । ते हे सुदेशी सुरस ।
यास्तव घेणें सर्वांस । सादरेंसी ॥ ४ ॥

हे ब्रह्मरसाची पव्हे । नव्हनाचु होय जिव्हे ।
यास्तव हळवें नव्हे । बोलणें माझें ॥ ५ ॥

जैसी सुगंधाची कळी । ते विकासलियां काळी ।
गंध घ्राणां मेळीं । आनंदु दावी ॥ ६ ॥

तेवीं या ग्रंथाची खोली । सगर्भ मनां नाही आली
तववरि हे महाराष्ट्र बोली । आहाच वाटे ॥ ७ ॥

## २६. मराठीचे मानकरी

'दिव्यभाव' श्री. दान-शेखर

वंदन तुज आद्यकवे, सद्‌भावें करुनियां तुला गाई ।
अल्पवयीं बहुकीर्ती, गीताभावार्थ जो जनां देई ॥ १ ॥

देवास नामदेवा ! बोलविसी, भक्तिभाव तूं शिंपी ।
दे वास 'जना' उघड्या, जातीचा तूंचि बा सदा शिंपी ॥ २ ॥

सदया, सखया, राया, पंढरीच्या भेट देशि बा तुकया ।
तुक या न मिळे जगतीं, अमृतांसि अभंग ठरविती वायां ॥ ३ ॥

राजगुरु, राष्ट्रगुरु तूं, आनंदभुवन करी महाराष्ट्रा ।
दास म्हणवुनी स्वामी, वीरवचें दवडिसी शिखानष्टां ॥ ४ ॥

सेवुनि मयुर-कवना, मयूरसिंहासना गणी तुच्छ ।
हरण न होई ऐसा, आर्यांचा जलनिधीच हा स्वच्छ ॥ ५ ॥

कांठोकांठ भरूनी, क्रांतीचा ठेविला जयें पेला ।
स्फूर्ति-तुतारी फुंकुनि, केशवसुत ! अमर कीं तुम्ही झालां ॥ ६ ॥

भीष्माचार्य खरा तूं, नाट्यविनोदीं किती समर केलें ।
चेले श्रीपादा ! तव, श्रीसह यशकीर्तिवंत ते झाले ॥ ७ ॥

घालिसी गुलाबी कोडें, प्रसन्न प्रतिभा प्रतिक्षणीं प्रगटे ।
नाट्यविनोदीं तत्र बा, नानाविध कोटि-कल्पना उमटे ॥ ८ ॥

चित्त डुले, मनहि खुले; फुलें-मुलें पाहुनी तुझीं तिलका ! ।
तिल काठिन्य न कवनीं, साहित्यवनीं अम्हां न तूं परका ॥ ९ ॥

'मालाकार' ! खरोखर, श्रीज्ञानेश्वर दुजे मला गमतां ।
अज्ञानदास्यतिमिरा अल्पवयीं जाहलां तुम्ही सविता ॥ १० ॥

उपरोध-कामुकानें शिवरामें विंधिली सदा पर-ता ।
श्रीशारदाकृपेचा, प्रिय बालक अन्य कोण त्यापरता? ॥ ११ ॥

## २७. मराठीची शब्दसंपत्ती

'महाराष्ट्र गाथा' १९६० —दासोपंत

संसार नागर पेठें । नाना भाषांचे नाणवटें ।
येकां खरें तें खोटें । आना ऐकां ॥ १ ॥

येथें संस्कृताची केवळ । न सरे नाणें सकळ ।
कोण्ही येक स्थळ । ऐसें आहे ॥ २ ॥

संस्कृतें घट म्हणती । आतां तयाचे भेद किती ।
कवणा घटाची प्राप्ति । पावावी तेणें? ॥ ३ ॥

हारा, डेरा, रांजणु । मुठा, पडगा, आनु ।
सुगडतौली, सुजाणु । कैसी बोलैल? ॥ ४ ॥

घडी, घागडी, घडौली । अलंदें वाचिकें वौळी
चिटकी, मोरवा, पातली । सांजवणें तें ॥ ५ ॥

ऐसें प्रतिभाषे वेगळाले । घट असती नामाथिले ।
एकें संस्कृतें सर्व कळे । ऐसें कैसेन? ॥ ६ ॥

सनवट, चोपण, गव्हाळी। चिकणी, पन्हवट, मळी।
चुनवट, माळवट, खळी। खळगा, खात ॥ ७॥
उतें, गोटल, खडाळ। पांढरी, सेडु, मुरुबाळ।
तांबट, काळी, करळ। भेद मृत्तिकेचे ॥ ८॥
नदु, नदी, ओहळ। झोती, झिरपे, खळाळ।
धार, घाळणी, पीळ। भंवरा धोंधे ॥ ९॥
टांकें, बावी, पोखरणी। बारव, विहिरी, अडु धरणी।
विहिरी तळें रानीं। हळता घुमे ॥ १०॥
ऐसे भेद जळस्थानाचे। एक एक बहुता नामाचे।
सारी प्रयोजन तयांचें। संस्कृत कैसें? ॥ ११॥

## २८. मराठी

'काव्यप्रभा' १९४३ **प्रभाकर दिवाण**

भाषा मराठीच आम्ही वदूं
चाखूं तिचें नित्यतें वाङ्मधु
आहे अहा आमुची माय ती
गाऊं यशोगान तिचे प्रति—१

पीयुषिंची ती तिची माधुरी
तें दिव्य गांभिर्य अब्धीपरी
आनंद होतो बघुनी मना
त्या सर्व संचारिणी कल्पना—२

तीच्या शिरीं ज्ञानदेवी हिरा
एका उरीं हार तो गोजिरा
पायीं तुका पैंजणी रुणझुणे
कांची ध्वने रामदासस्वनें—३

मेरूहुनी थोर तद्गौरव
मी चिंतितो ह्या गुणांतें जंव
माझी मराठीच मंदाकिनी
होतों तिला पूत मी गाउनी—४

कीर्ती तिची भूतली फाकवूं
तीचेपुढें स्वर्गही वाकवूं
देऊं समृद्धी तिच्या वाङ्मया
राबूं तिला भूति लाभावया—५

# २९. माझी माय मराठी

'पंढरीचा विठ्ठ आणि इतर प्रेमळ भक्तिगीते' २५-७-१९६९

—मा. दा. देवकाते

सोज्वळ सुंदर शब्दांची तर
इथे झालिया दाटी
अशी ही माझी माय मराठी ॥ धृ० ॥

सर्व भाषांची ही तर राणी
माझी मराठी अमृतवाणी
वंदन करती तिजला ज्ञानी
शूरवीरांनी रक्त सांडले
या भाषेसाठी—१

ही पवित्र भाषा साधूसंतांची
तुकारामाची, ज्ञानेशाची,
रामदासाची, एकनाथाची
अभंगगाथा, ज्ञानेश्वरीची
आहे महती मोठी—२

नवरसाचा नवा फुलोरा
शब्दोशब्दी गंध मोगरा
नवरंगाचा उडे फवारा
रसाळ, सोपे, गोड, भाबडे
शब्द खेळती ओठी—३

आर्या सुंदर मोरोपंतांची,
लावणी पठ्ठे बापूरावाची,
होनाजी बाळा, रामजोशीची,
सगनभाई, हैदरभाई
त्यांची भाषा मराठी—४

मायमराठी संतसखुची
मुक्ताबाईची, जनाबाईची,
कवनं सुंदर बहिणाबाईची
भक्तिरसाने अभंग फुलले
चंद्रभागेकांठी—५

मायबोली ही शिवरायाची,
चिपळुणकरांची, आगरकरांची,
टिळक, गोखले, गडकऱ्यांची,
अत्रे, ग. दि. मा. यांनी टिकवली
परंपरा मोठी—६

## ३०. माझी मराठी

'माझी मराठी' १९६५ —डॉ. ना. गो. नांदापूरकर

माझी मराठी असे मायभाषा हिच्या कीर्तिचे तेज लोकी चढे
गोडी न राहे सुधेमाजि आतां, पळाली सुधा स्वर्गलोकाकडे.
आजन्म युद्धे तरी संगरी जी कधी भागली नाही एक क्षण
द्या आश्रया वा न द्या या सतीला असे लाधले एक सद्विक्षण.
ही कामरुप प्रसंगानुरुप स्वरुप स्वयें पालटी भामिनी
घेती पुनर्जन्म सारी पुराणे त्यजूनी स्वगीर्वाण काया जुनी.
जाईजुईची कळी कोवळी ही परी साच झेलील हेमाद्रिला
फेडूनियां भ्रांति निर्मील माझी मराठीच शून्यातुनि क्रांतिला.
आम्ही मराठे हिचे पुत्र लोकी कधी भ्यावयाचे मुळी ना कुणा
आकंठ प्यालो हिचे दुध अंगी पहा रोमरोमांतुनी या खुणा.
तोडा, चिरा दुग्धधाराच येती न हे रक्त वाहे शरीरातुनी
'माझी मराठी मराठाच मीही' असे शब्द येतील हो त्यातुनी.
वेचीत वाणी हिच्या वर्णनीं मी अशी गाउनी गोड गाणी सदा
ऐकोनिया स्फूर्ति खेळेल लोकी पुन्हा लंघुनी जावया नर्मदा.

## ३१. ही कोण आली?

'माझी मराठी' डॉ. ना. गो. नांदापूरकर

ही कोण आली थरारे धराही अकस्मात तेजाळले अंबर
व्यापी महाराष्ट्रभूते बनोनी फरारा जिचे भव्य दिव्यांबर
ये याज्ञसेनीच यज्ञातुनी की शिखा अग्निची शारदा स्त्रग्विणी?
दैवी चमत्कार दावीत आली उषःस्यंदनी बैसुनी मोहिनी?

दिव्यत्व दृष्टीत सृष्टीतही ते न अन्यत्र देखाल कोठे कुणी
घेती पुनर्जन्म सारी पुराणे त्यजूनी स्वगीर्वाण काया जुनी
ही कल्पवल्ली सखी स्वर्गगंगा मुदे उद्धरायास येई जन
मज्जून आशुद्र सद्विप्र होती जिच्या जीवनी सर्वदा पावन.

ही घेतली तान या कोकिळेने महाराष्ट्रभू पाझरू लागली
घेई सरिद्रूप वाटे अजूनी जनी ख्यात गोदाभिधा जाहली
वाणी खनी दिव्य संजीवनीची बने वीर सह्याद्रिचा फत्तर
एकाहुनी एक जाई करोनी जगी कार्य अश्रान्त लोकोत्तर.

ज्ञानरविंदे जगत् भृंग केलें, तुकाच्या तुका एक येना कवि
मुक्तेशवाणी मयुरा गिरा ही रसज्ञांस लोकी सदा चाखवी!
पायीं झणत्कार त्या नूपुरांचा कवीच्या कृतींचा अती मंजुळ
नादावले व्योम दिग्भाग नादे निनादे डुले भारती सोज्वल.

ही कामरुप प्रसंगानुरुप स्वरुप स्वये पालटी भामिनी
चापेकळी होय लीलाविलासी रणीं प्राण घ्यायास सौदामिनी
खेळे फुलांच्या मुलांच्या सवेही सुमंदा मिळे गीतही गाऊनी
सद्‌भक्ति पाजी जना माय माझी कधी वर्तते होऊनी योगिनी.

माझी मराठी अशी मायभाषा न अन्यांसि लाधे हिची थोरवी
ही कौमुदी माय माझीच तेजे जगत्सुंदरीते सदा गौरवी
ही कामधेनु, नवांही रसांचा सदा सिंधु हीच्या असे अंचळी
प्याया सुराधीश ये क्षीर जीचे त्यजोनि निजस्वर्ग या भूतळी.

---

('माझी मराठी' या कवितेतील काही कडवी या कवितेत होती ती वगळून ही कविता घेतली आहे.)

# ३२. माझी मराठी कुठे ?

'माझी मराठी' डॉ. ना. गो. नांदापूरकर

शौर्याची सरिता तदा खळखळे ओसंडुनी दो तटी
भाषेची फुलली इथे उपवने मोदोत्कटे गोमटी
आता देश कुठे सरित्प्रवहही माझी मराठी कुठे
येता यापरीचे विचार हृदयीं दुःखेच कीं तें फुटे—१

जीते देवगिरा स्वभाव-मधुरा लाभे प्रपीतामही
भाषाभूषण जी सुकोमल महाराष्ट्रीहि मातामही
आता प्राकृत जी बघोनि हिजला पान्हा सतीला फुटे
ऐसी दिव्य परंपरा परि अता माझी मराठी कुठे—२

गाणी गाउनिया प्रभात समयीं जी आळवी पंढरी
मोती घालुनिया सदैव दळिता तै कांडिता मंदिरी
स्वर्गीची सुमने मने बहरती तद्गंध लोकी सुटे
होई शांत नितांत पावन तशी माझी मराठी कुठे—३

नेमे गाउनिया नमी प्रभुवरा भावे मनोमोहिनी
घाली आण कुणा कधी चिमणीला घासास की कामिनी
'भावाला' कधी तो हृदी हुरहुरी 'देसाईयाची' उठे
गीते गाय परोपरी सतत ती माझी मराठी कुठे—४

पल्ला लांब हिचा हिला न पुरली दिल्ली फिराया तदा
सिंधु पंचनदा क्रमूनि वितरी पूर्वे प्रजी संपदा
पूर्वेलाहि कलिंगी अंगी विमली वंगातरंगी उठे
मोठी लाट तिची परी न दिसते आता मराठी कुठे—५

भाल्यांच्या वरती बसोनि शिरली शत्रूंचिया अंतरी
वीरांच्या समरांगणी चमकली विद्युल्लतेच्या परी
मुद्रा जी करी जोडिता हिजपुढे शत्रू करांची पुटे
आज्ञा जी करी मानिनी नच दिसे माझी मराठी कुठे—६

पत्री ही लिही 'राजमान्य' कत्रणां कोणा 'महाराज'ही
आता तीच 'जनाब' आर्जव करी 'मिस्टर' 'प्रिय' ही लिही
गोदानीर पिओनि तीर वसवी लंघी दरे दर्कुटे
शौर्याचे भरघोस जीत तइ ती माझी मराठी कुठे—७

जी राणी रमणी तदा निशिदिनीं सिंहासनीं शोभली
यत्सौभाग्य विलोकुनी भरतभू चित्ती अती तोषली
काळाचा पट तो कुणी उधळिला तो तोल हिचा सुटे
राणी राख बने क्षणी अहह ती माझी मराठी कुठे—८

## २३. उलटी आमची मायबोली तरी

'चंद्रपुरी कवि' वा. ना. निगम

टोपीमाजीं डोकें असुनी
म्हणूंच "टोपी डोक्यांत"
कोण धरिल अमुचा हात ?
उलटी अमुची मायबोली तरि—
कळे अम्हांला ती सर्व
कां न तिचा वाहूं गर्व ?–१

जरी हात बांगड्यांत दोन्ही
सांगु "बांगड्या हातांत"
म्हणाल का झाला वात?
उलटी अमुची मायबोली तरि—
सरळ सरळ सोपी सारी
आवडते आम्हां भारी!–२

कपड्यांमध्यें अंग, तरी पण
बोलूं "कपडे अंगांत"
काय बरें खोटें यांत?
उलटी अमुची मायबोली तरि—
शिकती बाळें झपाझप
इवलालीं आपोआप–३

चपलांत या पाय असुनिही
म्हणूं "पायांतच या चपला"
मराठिची चमकत चपला
उलटी अमुची मायबोली तरि—
सोज्वळ शुद्ध असे साची
सर न कुणा येणार तिची!–४

## ३४. आज लाभे सिंहासन

'जय महाराष्ट्र' १९८६ 'निशिकांत' (डी. व्ही. कुळकर्णी)

आज लाभे सिंहासन
माझ्या माय मराठीला
शतकांचा वनवास
आज अखेरी संपला ॥ १ ॥

ज्ञानियांच्या राजियानें
ओवि गात जोगविले
नामदेव तुकयाने
भावभक्ती भरविले ॥ २ ॥

| | |
|---|---|
| समर्थांच्या मुखांतून | वनवास शतकांचा |
| हीच झाली जयकारी | आणि होय भुलावण |
| शाहीरांच्या शृंगारांनीं | दिन सोनियाचा येता |
| सजविली परोपरी ॥ ३ ॥ | आज लामे सिंहासन ॥ ४ ॥ |

## ३५. महाराष्ट्र शारदा वंदन

**'गीतवाहिनी'** १९३३ **गोविंद विष्णू पटवर्धन** (खाजगीवाले)

हें वंदन तुजला महाराष्ट्र वाग्देवी ।
तव यशोदुंदुभि गर्जत वैभव भावी ॥ धृ० ॥

वैराग्य भक्तिच्या मंगलकर वसनांनीं ।
सजविलें तुला श्रीज्ञानेश्वर नाथांनीं ॥ १ ॥

त्या मुक्तेश्वर वा श्रीधरादि कविवर्ये ।
तुज अलंकारिलें नानापरि चातुर्यें ॥ २ ॥

ती अभंगवाणी सत्वधीर तुकयाची
तव कटिला शोभे रत्नजडित जणुं कांची ॥ ३ ॥

सद्बोध नीतिचा दिव्य दंड तव हातीं ।
श्री समर्थ देती दंडाया खल कुमती ॥ ४ ॥

स्वातंत्र्य दिलें तुज रणरंगी रंगोनी ।
समशेर काव्य तें केलें शिव बाजींनी ॥ ५ ॥

ज्या कलाकुसरिच्या प्रभावळी नवरंगी ।
रचि मयूर ऐसें सिंहासन तुजलागीं ॥ ६ ॥

शृंगार साज अति कौशल्यें जडवोनी ।
तव कंठिं घातला त्या भाऊ[1] तात्यांनी[2] ॥ ७ ॥

---

१. सगनभाऊ. २. राम जोशी.

परि पुढें ग्रासिलें दुर्दैवें देशाला ।
तव नशिबीं आलें बघणें परवदनाला ॥ ८ ॥

तम विलया गेलें फिरुनी कांही कालें ।
चिपळूणकर न तें तेजचि कीं तव उसळे ॥ ९ ॥

संगीत नाट्यवर बंदिजन तव झाले ।
ते अण्णा, देवल ज्यांनी जन डोलविलें ॥ १० ॥

राष्ट्रीय तिलक शुभ कर्मयोगि टिळकांनी ।
तव भालिं लाविला कारागृहिं झुंजोनी ॥ ११ ॥

स्वातंत्र्य चौघडा शिवरामें वाजविला ।
उल्लासनिनादें गुंगविलें रसिकाला ॥ १२ ॥

तव रंजन कादंबरीविलासे करुनी ।
बहुमान मिळविला प्रसाद हरिभाऊनीं ॥ १३ ॥

श्रीपाद[१], मोगरे, भिडे, दत्त कवि लेले ।
तव करीं शोभले मधुसुमनांचे झेले ॥ १४ ॥

फुंकिती तुतारी कोणी मुरलीवाले ।
किति सांगू नांवें कविजन होउनि गेले ॥ १५ ॥

निःसीम भक्त तव अद्यापिहि किति झटति ।
पदसेवनिं त्याते देइ शारदे सुमती ॥ १६ ॥

राष्ट्रीय भावना प्रदीप्त जेणें होई ।
अशि स्फूर्ति कविवरा माते ! संप्रति देई ॥ १७ ॥

गोविंद विनवितो इच्छा ही पुरवावी ।
तव प्रसादकर शिरिं कवितनयांच्या ठेवी ॥ १८ ॥

---

१. मुजुमदार.

## ३६. उठा रे लुटा रे!

'संग्रहालय' (मासिक) एप्रिल १९८६ **किसन पवार**

उठा रे लुटा रे अमृताचे कुंभ ।
गाथा ज्ञानेश्वरी अमृताने चिंब ॥

सारा महाराष्ट्र दरीखोरी सारी ।
राव रंक सेवी सेवितो भिकारी ॥

एकुलते एक इंद्रधनू डोले ।
मायबोली अंगणीं ठायी ठायी बोले ॥

अमोल प्रतिभा नवरसी दंग ।
महाराष्ट्र देशीं उधळित रंग ॥

पौर्णिमेच्या रात्रीं बहरली ज्योत्स्ना ।
शांतवी मृगाची मृगजळ तृष्णा ॥

मायभू मराठी आम्ही तिचे दास ।
रचू या चला रे । रचू या चला रे ।
रचू या चला रे । वैभवाची रास ॥ उठा रे ॥

## ३७. सारस्वत मंदिरात

'गंगा-जमुना' **पी. सावळाराम**

सारस्वत मंदिरात, माझी मराठी आज येत
जयविजयाची सुमने उधळित
बोला सुस्वागत सुस्वागत ॥ धृ० ॥

मराठमोळी वागेश्वरी
ज्ञानेशाची बंडखोरी
पंचारती घेऊन करी
माऊलीला ओवाळीत—१

नाथांच्या त्या कडेवरले
मूल तान्हुले इथे उतरले
पंचपळीने देऊ लागले
कावडीतले ते पंचामृत—२

तुकया लावी अबिर गुलाला
समर्थ गुरूच्या श्रीरामाला
शिवरायाच्या रूपगुणाला
समशेरीने अभिवादित—३

## ३८. मराठी

'ज्योत' मा. रा. पोतदार

माझी बोली असे मराठी
जी शिवबाच्या फुलली ओठीं
ज्ञानेशाला त्या तुकयाला
नाचविले नित भक्तीसाठी—१

माझी बोली असे मराठी
झुंज झुंजली सत्यासाठी
परचक्राच्या घोर संकटीं
अन्यायाची फोडुन छाती—२

माझी बोली असे मराठी
जिने सोसले प्रहार पाठीं
पचवुन हलाहल; अमृत ओठीं
तीच असे मम माय मराठी—३

माझी बोली असे मराठी
जिने शिकविला स्वाभिमानही
ज्या बोलीस्तव रणांत मेले
शूर-वीर ते लाखो गणती—४

माझी बोली असे मराठी
उभी राहिली संतांपाठीं
शूरांची, नरवीरांची जी
फुलवित, उजळित छाती छाती—५

माझी बोली असे मराठी
जीस्तव झिजले कविवर शाहिर
भाष्यकार ते निबंधकार
नाटककर्ते किती मातब्बर—६

माझी बोली असे मराठी
प्राणाहुन ती प्रियतम मजला
महाराष्ट्राची पवित्र भूमी
करिते मंगल वेळोवेळी–७

असोत बोली कितीक सुंदर
परि श्रेष्ठचि मज माय मराठी
अभंग उज्वल ही मम बोली
देह जळो हा तिचियासाठी–८

## ३९. महाराष्ट्र वाङ्मय महती

'महाराष्ट्र शारदा' १९३० —वासुदेव नारायण फडणीस

वाङ्मय-मुक्ताहारीं ग्रंथ ज्ञानेश्वरी असामान्य
निर्मियला तो ज्यानें बुद्धी त्याची असे असामान्य–१

श्रीरामदास यांचा ओजस्वी दासबोध हीरकसा
वाङ्मय भूषवी जर हा कां न म्हणावे तयास हीरकसा?–२

श्रीतुकयाची गाथा सुबोधवचनें सुरत्न जडलेली
पाहुनि वाटे ऐसे की ही वाङ्मयवधूच नटलेली!–३

प्रत्यक्ष श्रीभगवान् खपला ज्याच्या गृहांत सेवकसा
त्या एकनाथ गुरुचा काव्यरसास्वाद हो न सेव्य कसा?–४

मुक्तेश्वरकृत भारत प्राकृत असलें तरी अहो, त्यांत—
स्निग्ध फुलांसम ज्यांच्या वृत्ती ते रसिक लुब्ध होतात–५

कवि मधु सुधेस मानिती परि तीहुनही असे जया गोडी
त्या श्रीमयूरकविच्या कवितेसम आजला अती थोडी–६

वामनपंडित कविचा मान्य असे श्लोक सान-थोरांना
मोरोपंतासम कवि डुलविति काव्या बघूनिया माना–७

दावियलें इतरांना या प्रतिभापूर्ण वाङ्मयाकरवीं
त्या नररत्नांनीं कीं भारतिं वसती अनेक दिव्य रवी–८

# ४०. माझी मायबोली

'झोळणा' १९६४ सरोजिनी बाबर

माझी मायबोली मराठी माऊली
तिचीये साऊली आम्ही असूं. १

तिचीया कुशीत आम्ही सुखावलों
पोसलों वाढलों आनंदानें. २

तिचाच हा बाळ ज्ञानोबा लाडका
दावीतो सडका वैभवाच्या. ३

मायबोली करी भाषा अमृताची
वीणा रसनेची वाजवीते. ४

तिचीयां कीर्तनीं नामदेव रंगे
भोळा भाव सांगे सर्वांमाजी. ५

मराठीचें गीत जनीनें रचीलें
गायनीं रंगलें तुकयाच्या. ६

मायबोली दावी आपुला रुबाब
एकनाथी जाब देऊनीया. ७

मायबोली छेडी तार ही सुरांची
वाणी शाहिरांची ऐकवीत. ८

तिची हो प्रतिभा डंवरे तेजानें
प्रीतीच्या बोलानें लोकगीतीं ९

तिचीया हृदयीं आमुचें जीवन
आमुचा सन्मान तिच्या हातीं. १०

तिचीया वाणींत आमुचा हुंकार
साजशीणगार तीच करी ११

तिचीयां अंतरीं सजविला भाग
आम्हां लखलाभ होत असे. १२

काय सांगू माझ्या बोलीचा दिमाख भाव लाख लाख आळवीतें. १३

## ४१. मराठी भाषा

'मोत्यांची माळ' १९३०　　　　ना. के. बेहेरे

भाषा अमुची छान ।
मराठी ! भाषा अमुची छान ॥ धृ० ॥

भाषा भिन्ना देशदेशच्या ।
सर्वांची परी खाण ॥ १ ॥

बोल बोबडे हींतुनी वदलों
तिचेंच केलें पान ॥ २ ॥

ज्ञानेशादिक तत्त्वज्ञानी ।
हींतुनि देती ज्ञान ॥ ३ ॥

संत तुका श्रीसमर्थ देई ।
अपणा सुबोध-दान ॥ ४ ॥

मृदुल मनोहर, सुंदर वाणी ।
कविवर करिती गान ॥ ५ ॥

ज्याच्या हृदयीं पूर्वज भाषा ।
तोच खरा विद्वान ॥ ६ ॥

माता बोले, भाऊ बोले ।
बोलें छबडें सान ॥ ७ ॥

अर्पुनि तनमन धन हो सेवा—
करा हिचीच महान ॥ ८ ॥

प्रभुकृपेनें होवो जगतीं ।
भाषेचा या मान ॥ ९ ॥

## ४२. मराठीची प्रार्थना

'मोत्यांची माळ'　　　　—ना. के. बेहेरे

मराठी ! आमुच्या माते ! महाराष्ट्रास तूं प्राण ।
मराठा होतसे वेडा, करी जीवास कुर्बाण ॥ १ ॥

मराठ्यांच्या धडाडीचें सदा राहे मनीं ध्यान
मराठ्यांना मराठीचें न हो केंव्हाच विस्मरण ! ॥ २ ॥

मराठा हा कुठें राहो असे त्या हिंद-आनंद
मराठ्यांना कुठें ठेवा मराठीचाच त्या छंद ! ॥ ३ ॥

मराठा हा कुठें राहो शिवाजी मानतो राणा
भवानी लेखतो देवी धडाडी दाखवी बाणा ! ॥ ४ ॥

मराठा हा कुठें राहो स्वदेशीं गुंतले डोळे
जसा देहीं तसा चित्तीं स्वधर्मी रंगुनी बोले ! ॥ ५ ॥

जगाची तूं नव्हे भाषा, न हिंदुस्थानची प्यारी
मराठा हा तुला मानी, तुझीं गाणींच जिव्हारीं ! ॥ ६ ॥

प्रतीचीला उदय झाला कधीं काळांत भानूचा
स्तवासाठीं तुझ्या देवी स्फुरे बोलहि मराठ्याचा ॥ ७ ॥

रवींद्राचें स्फुरो गाणें, असो आदेश गांधीचा
परी हिंदीस परभाषा मराठा हा म्हणायाचा ! ॥ ८ ॥

असो राजा सयाजी वा कुणी सामान्य जनतेचा
पताकेच्या तुझ्या बंदा मराठा हा असायचा ! ॥ ९ ॥

मराठीच्या नृसिंहाचा मराठ्यांच्या नृसिंहानें
असे सन्मान केला जो तुझ्या देवीच भक्तीनें ! ॥ १० ॥

प्रभातीं आज जे आले मराठी भक्त ते भाई
तयांच्या पूजनासाठीं मराठी हार हा वाही ॥ ११ ॥

मराठी गौरवासाठीं जयांची लेखणी गाई
तयां बंधूंस वंदाया मराठी हार हा वाही ॥ १२ ॥

स्वदेशीं तेंवि परदेशीं मराठी मान्य हो देवा !
कवीनें काय मागावें ? सदा होवो तिची सेवा ॥ १३ ॥

मराठा मर्द हा गाणें मराठीचें सदा गाई
मराठी अंतरीं बाणा नसे पर्वा कुणाचीही ॥ १४ ॥

---

(बडोदे साहित्य संमेलन–अध्यक्ष–न. चिं. केळकर यांचा सयाजीराव गायकवाड यांनी सत्कार केला तेंव्हा).

# ४३. मराठीच्या ओव्या

'गितार' १९६५ बा. भ. बोरकर

दूध आईचें आटतां तिच्या हाके धावलीस
माय होऊनियां मला वेळोवेळी पावलीस

उचलुनी ओटींपोटीं सुखें लाविलेंस उरा
पान्हा पोसणारा तुझा झाला अमृताचा झरा.

तुझ्या ज्ञानियानें मला कटींखांदीं खेळविलें
प्रकाशाच्या आकाशांत उंच फेकून झेलिलें.

आणि भोळ्या नामयानें तीथें आणिली अंगणीं
कडे घेउनी पंढरे गेली आषाढीला जनी.

तेथें पुंडलिकामुखें तिनें देवविला पाठ :
"होई पांगळ्या आईची दिव्य पुढाराची वाट."

तुका वाटेत भेटला धुंद इंद्रायणीथडीं
मला खांदीं घेउनिया त्याने टाकियली उडी.

दोन्ही हाती आली तेंव्हा त्याच्या अभंगांची पानें
पांग फेडावया तुझें, शब्द-शब्द झाला लेणें.

तृप्त होउनी बोलसी, "माझ्या लाडक्या सोनारा
माझ्या बहिणाबाईच्या आता सावर संसारा"

तुझ्या अनुज्ञेप्रमाणें नवे घडवितो घाट
तुमच्या ग भेटीसाठीं नवी रेखाटितो वाट,

तुक्या-ज्ञान्याला छळिलें तेच पण देती शिव्या
त्यांचा विसर पडाया गातो अशा तुझ्या ओव्या.

## ४४. तूझेच आहे तुझ्याचपाशी*

'गीतगौरव' २६-१-६८ रघु बोरगांवकर

गांवकऱ्यांनो तुम्हां सांगतो थाप डफावर कडकडूनी
माय मराठी भाषा अमुची ज्ञानेशाची ती वाणी ॥ धृ० ॥
ज्ञानेशाने रचिला पाया कळस चढविला तुकयाने
अभंग तरले पाण्यामधुनी भोळ्या भक्तीभावाने ॥ १ ॥
अमृताहूनि गोड लागते ज्ञानेशाची ही ओंवी
भूपाळीने देव जागतो भल्या पहांटे ती गावी ॥ २ ॥
नामदेव तो अभंग म्हणता विठू नाचतो तालात
शिवरायाला धर्म सांगतो रामदास तो श्लोकांत ॥ ३ ॥
खडा पवाडा शूर वीराचा माय मराठी भाषेंत
मर्द गड्या भुरळ पाडते खरी लावणी ठसक्यांत ॥ ४ ॥

## ४५. मायबोली

'रूपगंधा' १९६१ —सुरेश श्रीधर भट

लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलों खरेंच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगांत माय मानतो मराठी—१

आमुच्या मनांमनांत दंगते मराठी
आमुच्या उरांउरांत स्पंदते मराठी
आमुच्या नसांनसांत नाचते मराठी
आमुच्या रगांरगांत रंगते मराठी—२

आमुच्या पिलांपिलांत जन्मते मराठी
आमुच्या लहानग्यांत रांगते मराठी
आमुच्या मुलांमुलींत खेळते मराठी
आमुच्या घरांघरांत वाढते मराठी—३

आमुच्या कुलांकुलांत नांदते मराठी
येथल्या फुलांफुलांत हासते मराठी
येथल्या दिशांदिशांत दाटते मराठी
येथल्या नगांनगांत गर्जते मराठी—४

येथल्या दरीदरींत हिंडते मराठी
येथल्या वनांवनांत गुंजते मराठी
येथल्या तरुलतांत साजते मराठी
येथल्या कळीकळींत लाजते मराठी—५

येथल्या नभांमधून वर्षते मराठी
येथल्या पिकांमधून डोलते मराठी
येथल्या नद्यांमधून वाहते मराठी
येथल्या चरांचरांत राहते मराठी—६

...........धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगांत माय मानतो मराठी.

# ४६. गीत तुझें मी आई गाइन

'महाराष्ट्राला मुजरा' सुरेश भट

गीत तुझें मी आई गाइन
गीत तुझें मी आई गाइन
शब्दोशब्दीं अमृत ओतुन
गीत तुझें मी आई गाइन ॥ १ ॥

करून आपुला माथा उन्नत
प्रेमाश्रुंनी धरती भिजवित
तुझ्या यशाचा गुलाल उधळित
चरणरजांना भाळीं लावून
गीत तुझें मी आई गाइन ॥ २ ॥

भावफुलांना पायीं उधळुन
मम प्रतिभेचें झिजवुनि चंदन
आयुष्याचा कापूर जाळुन
तुझें सारखें करीन पूजन
गीत तुझें मी आई गाइन ॥ ३ ॥

माझ्या आशा माझें जीवन
तुझियां ठायीं गेलें गुंतुन
वात्सल्यानें गेलो नाहुन
घेउनि तुझिया पायीं लोळण
गीत तुझें मी आई गाइन ॥ ४ ॥

कधीं नाचऱ्या तरुपर्णांतुन
कधीं हांसऱ्या उष:प्रभेतुन
कधीं ठिबकत्या दंवबिंदुतुन
तुझेंच आई होतें दर्शन
गीत तुझें मी आई गाइन ॥ ५ ॥

नागपूरापासून मुंबई
बघती सारे तव पुण्याई
धन्य मराठी माझी आई
पोर कडेचें करिते गुंजन
गीत तुझें मी आई गाइन ॥ ६ ॥

# ४७. अस्मिता

'अस्मिता' ऑगस्ट १९६० कृष्णचंद्र भोईटे

मानऱ्याचे गात गीत
भीमाकांठी जमे मेळा
भक्तिभाव पखरण
जनार्दन, चोखामेळा—१

ज्ञानेश्वर, तुकाराम,
जनाबाई ओवीबद्ध
इंद्रायणी ओली गाथा
माझा नाम्या भक्तिबद्ध !—२

माझ्या भक्तीचे निधान
'विठ्ठल विठ्ठल' नित्य
अभिषेक करितांना
विटेवरीं माझें चित्त !—३

माझी मराठी संस्कृति
माझ्या गर्वाचें प्रतीक
माझ्या हर्षाचे पवाडे
इतिहासाचा उद्रेक !—४

भीमा, कृष्णा नि गोदेच्या
'मराठी'चा मी मराठा
कृष्णेच्या मातीमधुनी
माझी फुलेल अस्मिता—५

## ४८. संस्कृत व मराठी

**'पद्यसमुच्चय'** १९०८ **मुक्तेश्वर**

सुरस, सुंदरीं, पवित्र सृष्टीं । पक्वान्नें निपजवूनि पाठी,
संस्कृत-शब्द-सुवर्ण-ताटीं । श्रेष्ठांश्रेष्ठां वोगरिलीं—१

तेंचि रसायन दुर्बळपणीं । महाराष्ट्र-भाषा-रंभा-पर्णीं,
वाढिलें, तरी भुकाळू जनीं । न सेविजे किमर्थ ?—२

समर्थपणें कवि-पंडितीं । सर्वज्ञतेच्या रत्नदीप्तीं,
निर्गुण निर्विकार पशुपती ।—कनक-कमळीं अर्चिजे—३

तेथें भावार्थी मी दुर्बळ । धत्तूर-पुष्प माझे बोल,
अल्पमतीचेनि मोल । काढविती तें केंवी—४

तथापि दोहीं ठायीं सरिसा । मोह कराल हा भरंवसा,
कां सान-थोर महेशा । भजतां असे कडसणीं ?—५

आणि ईश्वरस्वरूपीं डोळस । त्यांसी वर्णावर्णीं द्वेष—
नुपजे जैसा सूर्य-प्रकाश । नेणें कदा तमातें—६

## ४६. गीत तुझें मी आई गाइन

'महाराष्ट्राला मुजरा' सुरेश भट

गीत तुझें मी आई गाइन
गीत तुझें मी आई गाइन
शब्दोशब्दीं अमृत ओतुन
गीत तुझें मी आई गाइन ॥ १ ॥

करून आपुला माथा उन्नत
प्रेमाश्रुंनी धरती भिजवित
तुझ्या यशाचा गुलाल उधळित
चरणरजांना भालीं लावून
गीत तुझें मी आई गाइन ॥ २ ॥

भावफुलांना पायीं उधळुन
मम प्रतिभेचें झिजवुनि चंदन
आयुष्याचा कापूर जाळुन
तुझें सारखें करीन पूजन
गीत तुझें मी आई गाइन ॥ ३ ॥

माझ्या आशा माझें जीवन
तुझियां ठायीं गेलें गुंतुन
वात्सल्यानें गेलो नाहुन
घेउनि तुझिया पायीं लोळण
गीत तुझें मी आई गाइन ॥ ४ ॥

कधीं नाचऱ्या तरुपर्णांतुन
कधीं हांसऱ्या उषःप्रभेतुन
कधीं ठिबकत्या दंवबिंदुतुन
तुझेंच आई होतें दर्शन
गीत तुझें मी आई गाइन ॥५॥

नागपूरापासून मुंबई
बघती सारे तव पुण्याई
धन्य मराठी माझी आई
पोर कडेचें करिते गुंजन
गीत तुझें मी आई गाइन ॥ ६ ॥

## ४७. अस्मिता

'अस्मिता' ऑगस्ट १९६० कृष्णचंद्र भोईटे

मानव्याचे गात गीत
भीमाकांठी जमे मेळा
भक्तिभाव पखरण
जनार्दन, चोखामेळा—१

ज्ञानेश्वर, तुकाराम,
जनाबाई ओवीबद्ध
इंद्रायणी ओली गाथा
माझा नाम्या भक्तिबद्ध !—२

माझ्या भक्तीचे निधान
'विठ्ठल विठ्ठल' नित्य
अभिषेक करितांना
विटेवरीं माझें चित्त!—३

माझी मराठी संस्कृति
माझ्या गर्वाचें प्रतीक
माझ्या हर्षाचे पवाडे
इतिहासाचा उद्रेक!—४

भीमा, कृष्णा नि गोदेच्या
'मराठी'चा मी मराठा
कृष्णेच्या मातीमधुनी
माझी फुलेल अस्मिता—५

## ४८. संस्कृत व मराठी

**'पद्यसमुच्चय' १९०८** **मुक्तेश्वर**

सुरस, सुंदरीं, पवित्र सृष्टीं । पक्वान्नें निपजवूनि पाठी,
संस्कृत-शब्द-सुवर्ण-ताटीं । श्रेष्ठांश्रेष्ठां वोगरिलीं—१
तेंचि रसायन दुर्बळपणीं । महाराष्ट्र-भाषा-रंभा-पर्णीं,
वाढिलें, तरी भुकाळू जनीं । न सेविजे किमर्थ?—२
समर्थपणें कवि-पंडितीं । सर्वज्ञतेच्या रत्नदीप्तीं,
निर्गुण निर्विकार पशुपती ।—कनक-कमळीं अर्चिजे—३
तेथें भावार्थी मी दुर्बळ । धत्तूर-पुष्प माझे बोल,
अल्पमतीचेनि मोल । काढविती तें केंवी—४
तथापि दोहीं ठायीं सरिसा । मोह कराल हा भरंवसा,
कां सान-थोर महेशा । भजतां असे कडसणी?—५
आणि ईश्वरस्वरूपीं डोळस । त्यांसी वर्णावर्णीं द्वेष—
नुपजे जैसा सूर्य-प्रकाश । नेणें कदा तमातें—६

तेंवी अर्थी घालितां दृष्टी । न म्हणें संस्कृत-मराठी,
रत्न-कुंभीं की मृत्तिका-घटीं । गंगोदक सारिखें–७

व्यास-वचन इक्षु-दंडू । गाळूनी सुरस सारांश गोडू,
देशभाषां वळिले लाडू । नामयेचे आवडी–८

ते जैसे सुज्ञीं न सेवणें । तैं आग्रहावांचून काय म्हणणें,
कळंकरेखेस्तव चांदणें । काय चकोरीं वाळिजे ?–९

व्यास-ग्रंथ-गिरीचें सोनें । संस्कृत-खोटिये गाळूनि मनें,
देशभाषां घडिलें लेणें । साहित्यरत्नीं सुजडित–१०

तें लेववितां कर्णभूषण । कां हो परते करावे कान,
श्रोते हो, तुम्ही विचक्षण । निर्मत्सर विचारी !–११

## ४९. मराठीचा महिमा

'गारवेल' २६-१-१९८२ मारुती रामचंद्र मोरे

माझी मराठी माऊली
मन तिला मानवाचे
लागलेले तिला वेड
सदोदीत समतेचे !–१

चोखा महार जातीचा
सेना आमुचा नाभिक
संत तुकाराम वाणी
गोरा फिरवतो चाक !–२

एकनाथ, रामदास
होते ब्राह्मण जातीने
माय मराठीने माझ्या
जेवू घातले हाताने !–३

माझ्या मराठीचा जोम
वीरावीरांत शिरला
शिवरायाच्या शौर्यांत
तिचा कळस भरला !–४

माझ्या मराठीची भक्ती
संतमुखांतुन चाले
टाळमृदुंगांच्या नादें
भक्तगण हाले डोले !—५

गाती शाहीर वीरांना
हातीं त्यांच्या डफ वाजे
ताजे होउन उठती
पोवाड्यांत शिवराजे !—६

सीता, सावित्री, द्रौपदी—
पातिव्रत्याच्या समई !
नीतिसंस्कृतीची त्यांनी
दिली आईला कमाई !—७

चिडे मराठी शारदा—
चाड ज्याला न कशाची
झंकारते वीणा हाती
स्तुती गाण्या चांगल्याची—८

भेदाभेद तिने कधी
कोणा कोठे केला नाही
एका रांजणाचे पाणी
सर्वांसाठी खुले राही !—९

माझ्या मराठी भाषेला
गंध केतकीचा येतो
गुलाबाच्या फुलांतून
रंग गुलाबी मिळतो—१०

माय मराठी माऊली
साऱ्या दुनियेची आई
तिच्या मायाममतेला
कोठे धरबंद नाही !—११

आई मराठीचे मन
आहे आकाशाएवढें
पुण्याईचें सारें कांही
मावे असेल तेवढे !—१२

माझी मराठी मानते—
थोर पुरुषांना देव !
पुण्यशील ललनांना
अर्पितसे जीवभाव !—१३

मीही मराठीचा कवी
गुण आईचे गाईन
असत्याच्या कारवाया
धुळीला मी मिळवीन !—१४

# ५०. मराठीच्या देहलीवरून !

'वाकळ' १९५६ —यशवंत

करितो जयजयकार प्रमोदें करितो जयजयकार
जगाच्या कानावर पडणार—
महाराष्ट्र-शारदा करींच्या विणेचा झंकार.

दिशादिशांतुनि संचरुनी जी घुमली वाङ्मोहिनी
आज ती वळली ह्या पत्तनीं
माय-मराठीच्चिया देहलीवरती अशरीरिणी

सात समुद्रांपार भूतलीं कुठें कोपऱ्यांतुनी
लेकरें जनीं वनीं विखरुनी
माय-मराठी करिल तयांशी गुजगोष्टी येथुनी.

तारांगण आकाशजान्हवी होति हिंपुटी मनीं
जियेचें वाळवंट देखुनी
तिच्या तटींचा घुमेल जगतीं टाळ-मृदंग-ध्वनी.

घेउनि खांद्यावरी पताका पायीं दिंड्यांतुनी
नाचुनी उना-पावसांतुनी
धर्मक्षेत्रीं गजर विठूचा करिती बेहोषुनी.

आणि त्याच हो बेहोषीने ठाकावें संगरीं
रणक्षेत्रास गणुनि पंढरी
खड्गधारही तया वाटते तीर्थवाहिनी खरी.

वारकऱ्यांनी, धारकऱ्यांनी करुनी प्राणार्पणा
जयाची केली संस्थापना
त्या धर्माची हवी व्हावया पुन्हा पुन्हा घोषणा.

बुडवियल्या वेदांस हजारों हातांनी-वीचिंनी
मिरविलें जिने वरी आणुनी
गंगेला आव्हान देहुची देइल इंद्रायणी.

चिंताया परमार्थ–विवेका प्रपंचही नेटका
पाहिजे प्रथम कराया निका
हा भगवा सामर्थ्यवान संदेश इथुनि आयका.

गौरीशंकरावर चढणारा तेनसिंग झुंजार
तया नच का मुजरा करणार—
घोरपडीने कोंडाणा सर करणारा सरदार?

जहाल मिरची आणिक हुरडा खुराक हा कसदार
जयांचा, ते वदति उद्गार—
"कुणा सोमरस हवा? सुरभिच्या नको दुधाची धार."

'जो जें वांछिल तो तें लाहो' उगवो धर्म उदार
व्हावया दुरित-तिमिर संहार
आळंदीच्या निघे समाधीतुन ऐका हुंकार.

'अजान तरुची मुळी माझिया दाटुनि भिडली गळा'
अर्थ जो ह्या दृष्टांतातला
जाणुनि, उजळा युगानुसारी धर्मा देऊं–दिला.

कुरुक्षेत्र जाहला समस्तचि जेंव्हा हा भारत
तेधवा इथुनि पुन्हा घोषित—
'योगः कर्मसु कौशलम्' असें गीतेचें हृद्गत.

क्षेम केवि नांदेल? शांततापूर्ण विश्वसंसार
कसा भरभराटीस येणार?
ऐशा चिंताकुलांस ज्याचा एकमेव आधार—

उभें कमानीवरतीं चौदा राष्ट्र तेंच भारतीं
द्यावया तया स्थैर्य बळकटी
घ्या ही ग्वाही–बद्धकटी ही महाराष्ट्र-संस्कृती.

अशा युगाची जन्मदात्री जी ही घटिका होणार
शुभंकर ही घटिका ठरणार
तिचें कराया अभिनंदन हें गातो जयजयकार.

## ५१. माझ्या मराठी बोलांत

‘आस्वाद’ १४-१-१९६१ राजा यावलीकर (ग. के. जोशी)

माझ्या मराठी बोलांत
आगळीच असे भक्ति
हें विश्वची माझें घर
ज्ञानेशाची खुले उक्ति !–१

माझ्या मराठी बोलांत
विवेकाचा नवा रंग
इंद्रायणीलाही जिंकी
तुकयाचा तो अभंग !–२

माझ्या मराठी बोलांत
जागे खरा स्वाभिमान
नरसिंह शिवबा तो
बांधी स्वराज्य तोरण !–३

माझ्या मराठी बोलांत
नाहीं जागा अन्यायाला
न्यायासाठीं प्राणाहुति
हर हर मंत्र बोला !–४

माझ्या मराठी बोलाचे
आज जरी होती हाल
परि उद्यां त्याच्या भाळीं
यशाचा टिळा पहाल !–५

# ५२. श्रीज्ञानेश्वर

'गोमंत शारदा' १९७२ पुरुषोत्तम मंगेश लाड

कीर्ती अनश्वरा । तुझी ज्ञानेश्वरा ।
वाचेच्या ईश्वरा । देई वरा ॥
दुजें कांहीं एक । मागें न आणिक ।
म्हणा हा पाईक । मराठीचा ॥
मराठी सारजा । तिची दिव्यपूजा ।
कवींच्या अग्रजा । बांधिली त्वां ॥
पवित्र रावळीं । देवीच्या जवळी ।
मूर्ती न बावळी । आन शोभे ॥
झाडीन आंगणें । द्वारीं लोटांगणें ।
ह्यांचींच मागणें । मिराशी म्यां ॥ १ ॥

इंद्रायणी कृष्णा गोदा भीमा भागा ।
ह्याच श्रुतिगंगा महाराष्ट्रा ।
धन्य धन्य त्यात श्रेष्ठ इंद्रायणी
अमृतवाहिनी मराठीची ॥
देहू आळंदी हीं पुण्य मायक्षेत्रें ।
पवित्र या यात्रे सभागी ये ॥
धन्य धन्य मासे देहूच्या कांठींचे ।
वेद मराठीचे तारियेले ॥
त्यांनाच ही शोभे आळंदीची वारी ।
आणि ती या द्वारीं परतवाण ॥ २ ॥

रोपिलें जें बीजमूळ । झाला सोन्याचा पिंपळ ॥
छाया नांदते शीतल । दारीं मराठीच्या ॥
नव्या नव्या युगवेळे । वारा पानी सळसळे ॥
पारा बैसतांच मिळे । सकल मनोवांछित ॥
करी मातीचे सैनिक । सातवाहन स्थापी शक ॥
युगपुरुष तूं लौकिक । रेडा वैदिक केलासे ॥
भिंत मराठीची राया । जावो स्वागत कराया ॥
नूर सिद्धीचा उतराया । आज वाघिणीचा ॥ ३ ॥

# ५३. महाराष्ट्र शारदेस

'**पुष्पवाटिका**' जानेवारी १९२५ **वनराज**

बोल बोल ! शारदे आतां तरि राष्ट्रिय कवनांचे
मर्दपणाचे, वीरश्रीचे, चढत्या मानाचे
नकोच नुसते मुग्धपणाचे मुके बोल फोल
महाराष्ट्र शारदे! समर्थे या हृदयातें खोल.
मुक्या मनाची गाणीं म्हणुनी मुकींच कां गावीं ?
दिन ते गेले, हृदयें आतां स्पष्टचि उकलावी.

कळ्या फुलोनि फुलें हांसती स्वातंत्र्या वरिती
स्वतंत्रतेच्या वातावरणीं आनंदें डुलती
स्वातंत्र्याची गाणीं गाती खग जिकडे तिकडे
बंधविमोचन होऊन भृंगहि गुंगत चोंहिकडे
निसर्गि स्वातंत्र्याचा ध्वनि जणुं मूर्तिमंत घुमत
उठव शारदे ! प्रतिध्वनी तो तुझिया गीतांत.

'निशाण'वाला 'तुतारि' फुंकित 'श्रेया' शोधीत
'उठ भारता' म्हणोनि गेला दौडत डौलात
'हिरकणि' दाउनि जाई 'स्वातंत्र्याचा शाहीर'
'कृष्णकुमारी' 'वीरमती' ती गाई 'जोहार'
निसर्ग—चंडोलाचिहि लागे शाहिरी तार
'राष्ट्रगायत्री' हा मंत्रचि कथी 'धर्मवीर'
'सिंहगडाचा सिंह' उसळवी 'सागर' खळबळवी
स्वातंत्र्याच्या कवन-सुमांचा सुगंध दरवळवी
स्वातंत्र्याचें 'रहस्य' सांगुनि जाति 'लोकमान्य'
यांसम होई प्रगट शारदे ! महाराष्ट्र धन्य !

महाराष्ट्र शारदे ! तुझा ना महाराष्ट्र देश ?
स्वातंत्र्याच्या कथण्या लागे कां मग संदेश ?
प्रेरक देवी ! मंगल देवी ! तुझ्या प्रतापांनी
स्वातंत्र्याच्या लाटा दिधल्या अंबरी उसळोनी
तशीच उडवी स्वातंत्र्याची पुन्हा एक लाट
परदास्याचा दुभंग पावो कीं हा क्षणिं कोट
महाराष्ट्र शारदे ! येइ तूं वेगें धांऊनी
तव दासांच्या स्वातंत्र्यास्तव दिव्य रूप धरुनी.

## ५४. मायबोली मराठीच

'युगे' जाने १९७३ —शं. श्री. वाशीकर

कोऱ्या मनावर ओवी
ज्ञानदेवाची लिहावी !
नामदेवाच्या बोलांची
वाटी ओठास लावावी !—१

जीवनाच्या जात्यावर
घडो जनाईचा संग !
भाववाहिनीत तरो
तुकारामाचे अभंग !—२

भारुडी नि भागवती
घाट माझ्या गंगेवर !
समर्थांचे आवाहन
आत्माराम ऐकणार !—३

काव्यउद्यानांत ऐकू
गोड केका मयूराची !
धुंद डोळ्यांत चढावी
शाहिरांच्या कवनांची !—५

शब्द सृष्टीत फुलू दे
बालकवी सुगंधीत !
भावनिर्झरी तांब्यांच्या
भरू देत शब्दघट !—७

घुमे आतां फडावर
गद्यपद्याचा मृदंग !
करी भावार्थाचे टाळ
भरो भजनांत रंग !—९

मुक्त-काव्य मुक्तेशाचें
वेड लावो रचनेचे !
पदपंडित घडवो
दर्शनच शतकाचें !—४

काव्यतुतारी क्रांतीची
फुंकू केशवसुताची !
ओळ एक गडकरी
जुळो प्रेम-करुणेची !—६

काव्यरवीची किरणे
सुखे अंगावर घ्यावी !
नवकाव्ये नित्यनवी
ओठांवर आकारावी !-८

हृदयाच्या देव्हाऱ्यात
मायबोली मराठीच !
बोबड्याशा बोलांनीहि
पूजा करावी तिचीच—१०

## ५५. स्वागत

'तेजस्विनी' १५-८-१९९४ —विहंग

मायबोली मराठीचा—
मान उंचावते आज
माझ्या मायबोलीमधे
ज्ञानियाची ज्ञानेश्वरी

मला आहे अभिमान
मिळे राजपदीं स्थान
मधु अमृताचे कुंभ
तुकारामाचे अभंग

नामदेवाने सुईत
बोंच इथे मराठीला
देववाणीतले तत्त्व
रोज चर्चा वेदांताची
दिंडी चाले वैष्णवांची
याच काळ्या मातीतून
आणि केले समर्थांनी
राष्ट्रधर्म शिकविला
'आनंदवनभूवनी'–
लोकभाषा, राज्यभाषा–
मायबोली मराठीला
वाजे डफावरी थाप
केली वीरतेची पूजा,
ढाल तलवार गेली
गेली भक्ती गेले ज्ञान
सजणीच्या विरहाने
जसा शृंगार साजतो
जेंव्हा 'बाळ गंगाधर'
थरकांप इंग्रजांचा
अशी होती बलवंत
काव्य निर्मी विनायक
पत्थराच्या भिंतीवर
अर्थ शब्दासंगे वाहे
शवांतही जीव यावा
त्याच स्फूर्तीतुनि आज
अर्घ्या अन्नावर जगू,

दोरा भक्तिचा ओवला–
टाका पंजाबाला दिला
मराठीत स्थिरावले–
घराघरांतुनि चाले
धर्म झाला भागवत–
संत पंढरीला जात
सावधान प्रपंचात–
साधुनिया परमार्थ
मराठीला मिळे मान
होता, उंचावते स्थान.
लोककत्री शृंगारिती–
बाहू बाहू उसळती
केली शृंगाराची मजा !
दिली पैंजणांनी रजा !!
पीक येई शृंगाराला —
झोप नाही सजणाला
तसा अंगार भाजतो–
मायबोलीत गाजतो.
सुस्ति उडे निद्रिस्ताची !
डरकाळी केसरीची ! !
झेप गरुडाची शोभे–
अक्षरांना मोक्ष लाभे ! !
वाणी केशवसुताची–
स्फुर्ति अशी तुतारीची ! !
आम्ही मराठीचे भाट–
करू स्वागताचा थाट ! !

## ५६. महाराष्ट्र साहित्यास

'कोरीव लेणी' ७-५-१९६० — विरकुड.

तुझी ती जादुची आतां फुलूं दे वाटिका पुरती
पताका, शब्द-सृष्टीची झुलूं दे कल्पनेवरतीं
खुमारी ती तुझी न्यारी पटूं दे आज जगताला
सभा ही तिष्ठली भारी, भरारी मार गगनाला
सुधेच्या काव्य मकरंदीं भरूं दे भारतीं प्याला
वरूं दे स्वर्ग सुंदरता तुझ्या या आर्य जननीला
मनाच्या भावना साऱ्या जनांच्या चेतवी हृदयीं
निराशा दुःख खेदाचा नुरावा वास या ठायीं
जनीं दे जन्म ईशाला अशांची काव्यचित्-शक्ती
खऱ्या स्वातंत्र्य सूर्याची प्रभा ती फांकवी जगतीं
करीं घे विश्वविजयी त्या कवींच्या कीर्ति-ध्वज पदरा
तुझ्या या गायकां करूं दे सदाचा शाहिरी मुजरा.

## ५७. शाहिरांनो !

'महाराष्ट्राला मुजरा' — अण्णाभाऊ साठे

शाहिरांनो जतन केली तुम्ही आपुली शाहिरी ।
होवो स्वागत आज तुमचें या जन-मन-मंदिरीं ॥ धृ० ॥

महाराष्ट्र देश तुमची मायभूमि गोजिरी ।
भूतलींची रेशमासम ही मराठी साजरी ।
नाथ, तुकया, रामदासांची इथे अमरापुरी ।
भव्य तो इतिहास तुमचा तेवतो जन-अंतरीं ॥ १ ॥

वाजली येथें निशीदिन भेरी संगें तंबुरी ।
सगन, होना यांचे कवना भाळला सह्यगिरी ।
तंतावरतीं स्वर उठतां खड्गें उठली कंदरी ।
तंतवर त्या तान तुमची दौडली दिगंतरी ॥ २ ॥

गडकरी, केशवसुतांच्या होती जी जिव्हेवरी ।
रास रसवंतीची नांदे आज तव ओठांवरी ।
चक्षुनां दिपवून सुखवी चंद्र जैसा अंबरी ।
तोषवी ती लोक-सिंधु नाचवी ती लहरी ॥ ३ ॥

घेऊनी ते राग पहिले या नव्यानें आळवा ।
सजवूनिया कवनास उठवा दीन दुर्बळ मानवा ।
सुखशांतीचा पोवाडा गांजल्यांना ऐकवा ।
जाऊं द्या ती खोल खाली दामिनीसम शाहिरी ॥ ४ ॥

## ५८. मराठी भाषा

'शाहीर साबळे यांनी गायिलेली लोकगीते' भानुमती साबळे
भाग १ ला—१९६८

सह्यगिरीवर कलश सांडला झरतो अमृतधारा ॥ धृ० ॥

दगड-फुलांचा देश अम्हाला प्रिय स्वर्गाहुन झाला
रणधीरांची संतजनांची कंठी जयाच्या माला
साधाभोळा देव विठोबा घेई नव अवतारा ॥ १ ॥

पैठणपुरची अनाथ बाळे वदली वेद सभेला
भागवताचा चढला इमला कळस तुका वर झाला
नाम मुखामधिं राम गुंफला जीवनांत या सारा ॥ २ ॥

पुण्याचे झरते अमृत अमर अमुची आशा
हिमालयाचें करील रक्षण हिच मराठी भाषा
या भाषेची गात थोरवी आभाळाशीं वारा ॥ ३ ॥

## ५९. ज्ञानोबानें उघडिलें द्वार

**'शाहीर साबळे यांनी गायिलेली लोकगीते'**
**भाग १ ला १९६८** **भानुमती साबळे**

जिंकुन अमृत नांदे प्राकृत कौतुक मजसी अपार रे
माझ्या ज्ञानोबानें उघडिलें द्वार रे ॥ धृ० ॥

तुकया गातो अभंग सुस्वर
इंद्रायणीचा भरला परीसर
सुबोधबोधे न्हाले तरुवर
जनी नाम्याची ओवी रचिता भरितो हरी हुंकार रे ॥ १ ॥

मुक्तेश्वर करी रस कल्लोळा
डोंगा नच रस चोखा भोळा
अभंगवाणी संत सोहळा
रामदास करीं जनमनीं जागृति शिवशक्ति अनिवार रे ॥ २ ॥

शिवशक्तीचें गातां गाणें
डफ कडकडला सवें तुणतुणें
गाणें नच हें सत्य शहाणें
माय मराठी सत्य सांगतां शब्दरूप तलवार रे ॥ ३ ॥

# ६०. मराठी भाषेची प्रशस्ति

'महाराष्ट्र गाथा' —'क्रिस्तदास' तोमास स्टिफन्स

जैसी हरळांमाजी रत्नकिळा । किं रत्नांमाजि हिरा निळा ।
तैसी भासांमाजी चोखाळ । भासा मराठी ॥

जैसी पुस्पांमाजि पुस्प मोगरी । किं परिमळांमाजि कस्तुरि ।
तैसी भासांमाजि साजिरी । मराठिया ॥

पाखियांमधें मयोरु । ब्रुखियांमधें कल्पतरु ।
भासांमधें मानु थोरु । मराठियेसी ॥

तारांमधें बारा रासी । सात वारांमाजि रवी–ससी ।
यां दिपिचेआं भासांमधें तैसी । मराठिया ॥

# ६१. मऱ्हाटी भाषासुंदरी

'योगवासिष्ठ'—(१–२९४ ते ३०७) —ज्ञानेश्वर

जैसी दीपांमाझि दिव्टी । कां तिर्थीमाझि पूर्णिमा गोमटी ।
तैसी भाषांमध्ये मऱ्हाटी । सर्वोत्तम ॥ १ ॥

जैसी सरितांमध्यें गोदावरी । कां पर्वतांमधें रत्नगिरी ।
तैसी भाषांमध्यें साजरी । मऱ्हाटी पैं ॥ २ ॥

हरळांमध्यें रत्नकिळा । कां पुष्पांमध्यें कमळ ।
तैसी भाषांमध्यें सोज्वळ । शोभिवंत दिसे ॥ ३ ॥

दुर्गावरि शोभे चरी । कां मुक्ताफळें शोभती हारी ।
तैसी शोभे भाषांमाझारी मऱ्हाटी पैं ॥ ४ ॥

तीर्थांमध्यें काशी । व्रतांमध्यें एकादशी ।
भाषांमध्यें तैशी । मऱ्हाटी शोभिवंत ॥ ५ ॥

परिमळांमध्यें कस्तुरी । कां अंबरामध्यें शंबरारी ।
तैसी मऱ्हाटी सुंदरी । भाषांमध्यें ॥ ६ ॥

ऐसी मऱ्हाटी सुंदरी । ते संस्कृता शोधु करी ।
शटिक बैसवी हृदयमंदिरी । अज्ञानाची ॥ ७ ॥

मूर्ख हृदयातें बोधी । विविध अर्थातें शोधी ।
अज्ञानाची बोधी । मऱ्हाटी पैं ॥ ८ ॥

मूर्खांशि चतुरा करी । साधु दावी सारासारी ।
ज्ञातव्य वाखाणी संसारी । मऱ्हाटी हे ॥ ९ ॥

बहुत संस्कृतीं अनुरागु । सर्वशास्त्री विचारु चांगु ।
परि मऱ्हाटी वांचूनि पांगु । कवण फेडी ॥ १० ॥

मऱ्हाटी बोलतां वरवी । सर्वत्र जाणीव मिरवी ।
दुर्जनांकरवीं सांडवी । पाषांड हे ॥ ११ ॥

ऐसिया मऱ्हाटिया पवित्रा । लेणें करीत अध्यात्मशास्त्रा ।
बहुतां लोकांसि पवित्रा । करविया ॥ १२ ॥

# ६२. माझा मराठाचि बोलु

'**ज्ञानेश्वरी**' अ. ६ श्लोक १४ ते २२ —**ज्ञानेश्वर**

माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजां जिंके
ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥ १ ॥

जिये कोंवळिकेचेनि पाडें । दिसती नादींचे रंग थोडे ।
वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ॥ २ ॥

ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होती जिभा ।
बोलें इंद्रियां लागे कळंभा । एकमेकां ॥ ३ ॥

सहजें शब्दु तरी विषो श्रवणाचा । परि रसना म्हणे रसु हा आमुचा ।
घ्राणासि भावो जाय परिमळाचा । हा तोचि होईल ॥ ४ ॥

नवल बोलतीये रेखेची वाहणी । देखतां डोळ्यांही पुरों लागे धणी ।
ते म्हणती उघडली खाणी । रूपाची हे ॥ ५ ॥

जेथ संपूर्ण पद उभारे । तेथ मनचि धांवे बाहिरें ।
बोलु भुजांहीं आविष्करे । आलिंगावया ॥ ६ ॥

ऐशीं इंद्रियें आपुलालिया भावीं । झोंबती परि तो सरिसेपणेंचि
बुझावी । जैसा एकला जग चेववी । सहस्रकरु ॥ ७ ॥

तैसें शब्दाचें व्यापकपण । देखिजे असाधारण ।
पाहातयां भावज्ञां फावती गुण । चिंतामणीचे ॥ ८ ॥

हें असो तया बोलांचीं ताटें भलीं । वरी कैवल्यरसें वोगरिलीं ।
ही प्रतिपत्ति मियां केली । निष्कामासी ॥ ९ ॥

# महाराष्ट्र देशा अमुच्या

—शाहीर अण्णाभाऊ साठे

महाराष्ट्र देशा अमुच्या, महाराष्ट्र देशा ॥
आनंदवनभूवन तू भूवरी भूषवी भारतवर्षा ॥ धृ० ॥

गीता गाथा तुझी मराठी । अखंड नाचे तुझिया ओठी ।
संत पंत तंतांचि शाहिरी । प्रतिभा झुकली तुझिया दारी ।
दिपवि अमृता, सुखवी सकलां, तुझी मराठी भाषा ॥ धृ० ॥

तुझ्यापुढे ते गगन बापुडे । भावभरे वाजवी चौघडे ।
उभा सह्याचल तुझ्यापुढे । नित्य निवारी महा साकडे ।
घाटमाथा छत्र धरी जो । सावरुनी आकाशा ॥ धृ० ॥

परवशाता तुज मुळी ना रुचे । अवमानित ते जिणे दिनांचे ।
अन्यायापुढती तूं कधिही । मान आपुली तुकविली नाही ।
माळावरती खड्ग पेरुनी । सज्ज होशी संघर्षा ॥ धृ० ॥

# परिशिष्ट –१

या गाथेत ज्या ज्या ग्रंथांतून, काव्यसंग्रहांतून, मासिकांतून वा दैनिकांतून गीतें घेतली त्या सर्वांची अकारविल्हे यादी येथे दिली आहे. जिज्ञासू वाचकांना जास्तीत जास्त माहिती मिळावी हा हेतू.

यांतील काही प्रकाशक-प्रकाशन संस्था फार जुन्या आहेत. त्यांचे पत्ते त्यावेळचे आहेत. अनेक वेळा पत्रव्यवहार करूनही मला त्यांच्याकडून काही प्रतिसाद मिळाला नाही. अशा ठिकाणी * 'तारकाचिन्हें' केली आहेत.

गीताचे / गीतांचे अधिकार, प्रकाशकांकडेच असतील तर तसा उल्लेख केलेला नाही. पण ते अधिकार कवींकडे किंवा इतर कोणाकडे असतील तर त्यांचे पत्ते दिले आहेत. व्यक्तिशः कविता पाठविणाऱ्या कवींचे पत्ते दिले आहेत. हा प्रयत्न परिपूर्ण आहे असा माझा दावा नाही.

—दि. मा. प्रभुदेसाई

* १. 'श्री महाराष्ट्र शारदा' १९२३.

संपा.-प्रका. : दिनकर गंगाधर केळकर-६८३, सदाशिव पेठ, पुणे.

२. 'श्री शिवगीतांजली (शिवकाव्य)' ७-५-७०

प्रका. गो. वा. कुळकर्णी-महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

अधिकार : सौ. शैलजा स. दिक्षित-१७३४, 'ए' वार्ड, साकोली कॉर्नर, कोल्हापूर.

३. 'अग्रणी'-एप्रिल १९६९.

प्रभाव प्रकाशन-प्रका. : प्रभाकर वरळीकर-१०५, इराणी बिल्डिंग, सी. के. बोले रोड, दादर २८.

अधिकार : (कै. प्रभाकर वरळीकर)-श्रीमती मालती माधवराव वरळीकर १०५, इराणी बिल्डिंग, बोले मार्ग, दादर २८
(कै. सोना पाठारे) श्रीमती वत्सला आत्माराम पाठारे, 'माणिक' ६३, हेंद्रे बिल्डिंग, दगडी वाडी, बोले मार्ग, दादर, मुंबई २८.
(श्री. माधव साखरदांडे)-९, सीतलादेवी बिल्डिंग, माहिम, मुंबई १६.

४. 'अनुरागिणी' १९८२

(कै. बा. भ. बोरकर), प्रका. : गु. मा. कारले-पुणे.

अधिकार : श्रीमती रुक्मिणीबाई बा. बोरकर, १, मणेरकर फ्लॅट, कवी बा. भ. बोरकर मार्ग, आल्तु, पर्वरी, गोवा.

५. 'अबोलीची नक्षी' १९७२

प्रकाशक : म. य. सातारकर, पुणे.

अधिकार : डॉ. कल्याण इनामदार, १२८९, शिवाजी नगर, पुणे-४११००५.

६. 'अभिलाषा' १९७३

वैष्णव प्रकाशन-प्रका. : जावरकर बंधू (प्र. वा. जावरकर) मोती नगर, अमरावती.

७. 'अस्मिता'-ऑगस्ट १९६०

प्रका. : विलास रघुनाथ भोईटे, आरडगांव, पो. हिंगणगांव, जि. उत्तर सातारा.

अधिकार : प्रा. त्रि. र. भोईटे, ८८, लक्ष्मीनगर, फलटण, जि. सातारा

८. 'आकाशगाणी'-डिसें. १९७९

श्रीवरद विनायक प्रकाशन, नाशिक.

अधिकार : श्री. योगेश्वर अभ्यंकर-दातार अपार्टमेंटस्, वकील वाडी, नाशिक-४२२००१.

९. 'आकाशवेडी' १९६८

मौज प्रकाशन, मुंबई ४०० ००४.

अधिकार : (पद्मा) पद्मावती विष्णू गोळे, १ ब, अभिमानश्री को. हौ. सो. गोळे बंगला, पाषाण रोड, पुणें-८.

* १०. 'आनंदगीत–भाग २ रा' १९२४ भाग ३ रा–१९२८.

प्रका. : आ. कृ. टेकाडे, गडकरीवाडा, महाल, नागपूर शहर.

११. 'आनंदाचे डोही' १९८६

प्रसाद प्रकाशन, पुणे.

अधिकार : श्री. गंगाधर महांबरे–शिवरंजनी', १२, कलानगर पुणे-४११ ०४३.

* १२. 'आनंदलहरी' १९२०

प्रका. : ल. रा. पांगारकर.

* १३. 'आस्वाद' १४-१-१९६१

प्रका. : स. आ. जगताप-जगताप-कारले प्रकाशन,

१९२, शुक्रवार, पुणे-२.

१४. 'आहुती'–१५-८-१९७२.

संपा. : ज. जा. देशपांडे, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन,

प्रका. : डॉ. उषा इथापे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४.

अधिकार : (कुंजविहारी-सलगरकर) कु. वसुंधरा हरीहर सलगर-कर,-द्वारा-एस्. व्ही. कुळकर्णी, 'श्रीकृपा', 'निर्मल-नगर' प्लॉट नं. ४, मुरारजी पेठ, सोलापूर-४१३००२.

१५. 'उगवते तारे' १४-१-१९४२
संपा. : ह. न. जोशी (सुधांशु)-म. भा. भोसले.
प्रका. : ग. न. जोशी—सदानंद साहित्य मंडळ,
मु. पो. औदुंबर, जि. सांगली-४१६३२०.

* १६. 'उबग' २२-८-१९६२
नवयुग प्रकाशन-प्रका. : शि. म. पवार, राजकमल चौक, अमरावती (भाऊ भालेराव-'तितिक्षा', 'रुक्मिणीनगर', अमरावती).

१७. 'उष:काल' १९७१
नीलकंठ प्रकाशन—प्रका. : प्रकाश दामोदर रानडे
१६४३, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे ३०.
अधिकार : (श्री. गंगाधर महांबरे-क्र. ११ पहा).

१८. 'एक दिलाची सिंहगर्जना'-१९७०
वोरा अँड कं. पब्लिशर्स प्रा. लि.
प्रका. : अ. ल. गाडगीळ, ३ राऊंड बिल्डिंग, मुंबई. २
अधिकार : (श्री. योगेश्वर अभ्यंकर-क्र. ८ पहा).

१९. 'ऐसा गा मी ब्रह्म' १९६२
अभिनव प्रकाशन-प्रका. : वा. वि. भट.
अधिकार : (नारायण सुर्वे) बी ३४, आदर्श, वसंत बहार, सहार रोड, जीवनविकास केंद्राजवळ, अंधेरी (पूर्व) मुंबई ६९.

* २०. 'कवनगुच्छ' भाग १ व २—१९२१
गोविंदाग्रज मंडळ, दादर, मुंबई १४.
चिटणीस—भास्कर रघुनाथ कद्रेकर

* २१. 'कविसंमेलन' भाग २ रा—१७-४-१९३१
संपा. : दे. ल. महाजन-नांदेड.
प्रका. : मुद्रक : ग. अ. सराफ, श्रीदत्त मुद्रणालय, नांदेड.

२२. 'कल्पफुले' मे १९५९

संपा. प्रका. : भा. ल. रानडे; ४११, सांभारे पथ, (गांवभाग) सांगली-४१६४१६.

२३. 'कलश' सप्टें. १९५८

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

अधिकार : सौ. प्रेरणा अनिल बर्वे–'एकवीरा अपार्टमेंट'
३६९, वीर सावरकर मार्ग, दादर-मुंबई ४०००२८.

* २४. 'कवि माधव यांची कविता'–नोव्हें. १९३५

प्रका. ह. वि. मोटे, प्रतिभा कचेरी, मुंबई ७.

२५. 'कमण्डलु'–कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे.

२६. 'कमळवेल'–ऑगस्ट १९५२

चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे २.

अधिकार : डॉ. वि. म. कुळकर्णी–'कमळवेल' ६१/४८, एरंडवणे
पुणे-४११ ००४.

२७. 'कांचनगंगा' (गिरीश) १९३०

रविकिरण मंडळ प्रकाशन : शंकर केशव कानेटकर. ४६१ शनिवार, पुणे-२.

अधिकार : श्री. मधुसूदन शंकर कानेटकर, 'कांचन', विश्राम-
बाग, सांगली-४१६४१५.

२८. 'कांचनसंध्या' ३०-११-१९८१

मौज प्रकाशन : श्री. पु. भागवत, मुंबई ४.

* २९. 'कावड'–जून १९६४

चिंतामणी प्रकाशन, खुर्शीद कॉटेज, १५वा रस्ता, खार, मुंबई ५२.

प्रका. : चिंतामणी र. देसाई, न्यू भारत प्रिं. प्रेस, भालेराव मार्ग, मुंबई ४.

* ३०. 'काव्य किशोरी' १९२८

संग्रा—जीवनराव उर्फ तात्यासाहेब चव्हाण.

कोल्हापूर विविध पुष्पमाला—पुष्प ५ वें.

डिग्रज-मामलेदार-पेटा-करवीर.

* ३१. 'काव्य कौमुदी' ७-१०-१९२४

संपा. : काव्यकौमुदी मंडळ.

प्रका. : गोपाळ गंगाधर पोतदार—चिटणीस काव्यकौमुदी मंडळ, धुळे.

* ३२. 'काव्य दोहन' १९०७

संपा. : कृष्णाजी पांडुरंग लिमये, कृष्णाजी गोविंद किनरे—चित्रशाळा प्रेस, पुणे.

* ३३. काव्यकिरणमाला—मि. का. भोरटके-जळगांव

* ३४. 'काव्यतुषार' १४-९-१९२३

प्रका. : दि. सी. वैद्य, काव्यप्रसारक मंडळ, ठाणे.

* ३५. 'काव्यानंदमंजुषा' भाग ३ रा-१९१८

प्रका. : एकनाथ यादव निफाडकर.

* ३६. 'काव्यप्रभा'-१९४३

प्रका. : प्रभाकर दिवाण, सेवाग्राम वर्धा.

* ३७. 'काव्यरत्नमाला'-१९२०

प्रका. : दु. आ. तिवारी-सावर्दे.

* ३८. 'काव्यविलास'-२८-११-१९४१

संपा. : व. रा. नेरुरकर, दत्तप्रसन्न कारखानीस.

* ३९. 'काव्यसरिता'

प्रका. : सु. ल. पटवर्धन, मु. पो. गोरेगांव, माणगांव, कुलाबा.

* ४०. काव्यसौंदर्य अथवा प्राचीन व अर्वाचीन मराठी काव्यातील वेंचे भाग १ ला १९०७—लक्ष्मण गणेशशास्त्री लेले-हरी कृष्ण दामले, रावजी श्रीधर गोंधळेकर यांचा जगद्धितेच्छु छापखाना.

* ४१. 'काव्यहार' भाग १ ला-१९२७

प्रका. : विश्वनाथ गणेश ताम्हणकर, मॅने. डायरेक्टर, महाराष्ट्र पब्लिशिंग हाऊस, पुणे.

४२. 'कुजिते आणि गर्जिते' १९६५ (कै. शिरीष)

प्रका. : जयश्री आगाशे—'स्वप्नरेखा' बाजीराव पेशवे मार्ग, मराठी नगर, अकोला.

अधिकार : श्रीमती जयश्री आगाशे—'सत्यवती' जठार पेठ मार्ग, साहित्यनगर, महाराष्ट्र कन्या शाळेजवळ, अकोला.

* ४३. 'कुमार पुष्पक १९६१

प्रका. : दामोदर पांडुरंग रानडे, व्यवस्थापक—चित्रशाळा प्रकाशन, पुणे २

* ४४. 'कुमुद बांधव'-कला १ ली

श्री महाराष्ट्र शारदा मंदिर, ग्रंथमाला, ग्रंथ ५ वा

प्रका. : गो. गो. अधिकारी, साहित्य प्रसारक मंडळी, ४७४ नारायण पेठ, पुणे.

४५. 'कैरविणी'-सप्टें. १९६२

अभिनव प्रकाशन-प्रका. : वा. वि. भट.

अधिकार : (कै. प्रफुल्लदत्त) श्रीमती वि. द. तेंडुलकर, १२२, रुक्मिणी स्मरण, माटुंगा, मुंबई ४०००१९.

* ४६. 'कोरीव लेणीं'-७-५-६०

संपा. : नी. गो. पंडितराव, स. वि. कुळकर्णी, पी. सावळाराम, स. पां. जोशी. प्रका. : स. पां. जोशी.

४७. 'कौमुदी'-१४-१-१९४०
प्रका. : सदानंद मंडळ, औदुंबर.
अधिकार : सुधांशु (ह. न. जोशी) 'सुधांशु सदन'
मु. पो. औदुंबर, जि. सांगली-४१६३२०.

* ४८. 'खंडेराव सदाशिव त्रिलोकेकर यांचा कविता संग्रह' १९५१
प्रका. : रामराव मोटाभाई राणे अध्यक्ष-वाङ्मयप्रभु खंडेराव सदाशिव त्रिलोकेकर, साहित्य प्रकाशन समिती, दादर-मुंबई १४.

४९. 'गारवेल'-२६-१-८२
'जयश्री प्रकाशन'-प्रका. : सूर्यकांत मारुती मोरे, कर्मवीर निवास, मु. पो. पलुस, ता. तासगांव जि. सांगली.

५०. 'गितार' १९६६
मौज प्रकाशन, मुंबई ४००००४.
अधिकार : श्रीमती बोरकर (क्र. ४ पहा.)

* ५१. 'गीत गंमत'-शके १८९२ सन १९७०.
प्रका.-मुद्रक : र. भ. निगुडकर, प्रकाश-मुद्रणालय ३९५/४ सदाशिव, पुणे ३०.

* ५२. 'गीतगुंजन'-भाग १ ला-१९३३
प्रका. : गोविंद भार्गव घाणेकर–व्यवस्थापक सहकारी ग्रंथकार, नवाकाळ वाडी, गिरगांव, मुंबई ४

५३. 'गीत-गौरव' २६-१-६८
प्रका. : सौ. सुलोचना लिमये, व्हीनस बुक स्टॉल, अप्पाबळवंत चौक, पुणे-२.

* ५४. 'गीत वाहिनी' १९३३
संपा.-प्रका. : माधव व्यंकटेश मंगसूळीकर, दातारवाडा, मिरज.

५५. 'गीत शिवायन' ७-५-७०

'जोशी-लोखंडे प्रकाशन' सु. दे. जोशी–दि. द. लोखंडे २०११, सदाशिव, पुणे–३०.

अधिकार : श्री. मधुकर जोशी, 'हेरंब बिल्डिंग' आयरे रोड, दत्तनगर, डोंबिवली (पू.)

* ५६. 'गोदातटीचा गुंजारव' १९३०

महाराष्ट्र वाङ्मय मंडळ, नाशिक.

प्रका. : एकनाथ यादव निफाडकर.

* ५७. 'गोमंत शारदा' १९७२

संपा. : रामदास प्रभु. प्रका. : गोमंतक साहित्य सेवक मंडळ, पणजी, गोवा.

५८. 'गंगाजमुना' भाग १ ला-ऑक्टो. १९८४

संपा. : रमेश वैद्य, प्रदीप गुजर–प्रका. : सौ. कल्पना पाठारे 'चांदुली प्रकाशन', जीवनदीप बिल्डिंग, ठाणे रेल्वे स्टेशनसमोर ठाणे (पूर्व) ४००६०३.

अधिकार : पी. सावळाराम, 'लोकेश्वरी'-A1, नौपाडा, ठाणे.

* ५९. 'गंगेतील निर्माल्य' १९३७

प्रका. : मुरलीधर ना. कुळकर्णी, जंगली महाराज रोड, पुणे. मुद्रक : ग. गो. दिवाकर, इंदिरा प्रेस, २७० सदाशिव, पुणे.

६०. 'गंधवेडी' १४-१-६६

'ज्योत्स्ना प्रकाशन'–प्रका. : लक्ष्मण गोपाळ परांजपे, ३० सी, खोताची वाडी, गिरगांव मुंबई ४

६१. 'गंधसमीर' ८-४-१९६३

विद्यामंदिर प्रकाशन–प्रका. : सौ. सुशीला कुळकर्णी ३२३, सदाशिव पेठ, पुणें २.

अधिकार : श्री. भालचंद्र खांडेकर, 'श्रीकर' 'सारंग सोसायटी', पुणे ४११००९

* ६२. 'चमकणारे क्षण' १९७६

मातृछाया प्रकाशन, बी. डी. डी. चाळ, ३९/५३ २ रा मजला, वरळी, मुंबई १८.

६३. 'चाहूल' २९-११-५२

'अरुणप्रभा प्रकाशन'–रंगनाथ नरहर होनप. १९८/२, सदाशिव पेठ, पुणे २.

अधिकार : (कै.अ.र.चिंचाळकर)श्रीमती रमाबाई अनंत चिंचाळकर ११३४, सदाशिव पेठ पुणे, ४११०३०.

६४. 'चैतन्यगाथा' १९२३

प्रका. : पां. म. बापट, ३४१, सदाशिव पेठ, पुणे

अधिकार : श्री. वा. पां. बापट-सेनापती बापट निवास, गोखले वाडी, भवानी शंकर रोड, दादर मुंबई ४०००२८.

* ६५. 'चंद्रज्योती' १४-१०-१९६६

प्रका. : त्रि. श. रानडे, आनंद चौक, सीताबर्डी, नागपूर–१.

* ६६. 'चंद्रपुरी कवी' १९५४

संपा.–प्रका. : गो. बा. पुल्लीवार,–'शारदा प्रकाशन'–मुख्याध्यापक कन्याशाळा, चांदा–मध्यप्रदेश.

* ६७. 'छिन्नध्वज'

अजित प्रकाशन, प्रका. : ए. पी. चौगुले, वीरभारत प्रेस, बेळगांव.

६८. 'जय तू भारती' २८।९।१९६३

प्रका. : डॉ. देवेंद्रकुमार लाड, मालेगांव, जि. नाशिक.

६९. 'जयनाद' एप्रिल १९६५

प्रका. : संचालक–प्रसिद्धि विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

७०. 'जय महाराष्ट्र' जानेवारी १९८६.

प्रका. : सौ. सिंधु द. कुळकर्णी.

अधिकार : श्री. डी. व्ही. कुळकर्णी, पोलीस मुख्यालय, ब्लॉक क्र. ३७, धुळें.

७१. 'जयवंती' १९७२

प्रका. : द. ग. जयवंत–२/१७ खांडके बिल्डिंग, न. चिं. केळकर रोड, दादर, मुंबई. ४०० ०२८.

अधिकार : श्री. त्रि. द. जयवंत ,,

*७२. 'ज्योत' १९६४

शैलजा प्रकाशन : संपा. प्रका. : विनोदकुमार, करजगांव, अमरावती.

७३. 'झोळणा'–मे १९६४

'व्हीनस प्रकाशन'–प्रका. : स. कृ. पाध्ये, 'तपश्चर्या' ३८१ क, शनिवार, पुणे २.

अधिकार : डॉ. सरोजिनी बाबर : २०९५, सदाशिव, पुणे ३०.

*७४. 'झंकार'–नोव्हें. १९७९

'वसु प्रकाशन'–प्रका. : सौ. सुनंदा रामचंद्र पारुंडेकर–द्वारा –सागर सप्लायर्स ८५२, रविवार, पुणे २.

७५. 'तरंग' १५।७।१९७७

प्रका. : रमेश नत्थुजी घाटुर्ले, सेंट्रल वॉर्ड.

अधिकार : म. न. घाटुर्ले–आठवडी बाजार, हिंगणघाट, जि. वर्धा.

७६. 'तृप्ति' २२।११।१९६१

प्रका. : पंडित अनंत कुळकर्णी, कुळकर्णी ग्रंथागार, १८६, शनवार, पुणे २.

अधिकार : (सौ. सुहासिनी इर्लेकर) अॅड. यशवंत ब. इर्लेकर–
'अक्षर' २९६२, नवगण कॉलेज कॉलनी, बार्शी रोड,
बीड-४३१ १२२.

७७. 'तेजस्विनी' १५।८।१९६४
संचालक : प्रसिद्धि संचालनालय–महाराष्ट्र शासन मुंबई

* ७८. 'दत्तांची कविता' १९२२
प्रका. : वि. द. घाटे, नोगझा, लष्कर, ग्वाल्हेर.

* ७९. 'द्राक्षवेल' ६।७।१९६२
'कोंकण वैभव प्रकाशन' २/४ टोपीवाला लेन, मुंबई ७.
प्रका. : रावजी लक्ष्मण सावंत.

* ८०. 'दिव्यभाव'–प्रका. : बाळकृष्ण भाऊ जोशी, ज्ञानविलास प्रेस, पुणे.

८१. 'दुःख माझें रंगलें'–१९६९
प्रका. : बा. ग. ढवळे, भारत गौरव ग्रंथमाला, चिराबाजार मुंबई २.

८२. 'दुंदुभी' १।८।१९७३
'मधुवंती प्रकाशन'–सौ. कुसुम जोशी, २०१, शुक्रवार पेठ, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

अधिकार : डॉ. रंगनाथ ना. जोशी, ३३५, 'कविराज' पापनाश तीर्थाजवळ, मु. पो. तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

८३. 'देवदर्शन' २६-१-१९६४
'उषा प्रकाशन'–सौ. उषा पाटील, नंदुरबार, जि. धुळे.

अधिकार : शाहीर हरीभाऊ पाटील, ,,

८४. 'धरतीमाता' २०।१०।१९६३

अभिनव प्रकाशन प्रका. : वा. वि. भट.

५३, गुरुनानक नगर, डॉ. आंबेडकर रोड, दादर (पूर्व) मुंबई १४.

* ८५. 'नवमी' २६।३।१९६३

संपा. : भा. ब. अघोर–प्रका. : सहकारी कवित्रय मंडळ नरसिंह दरबार, सोलापूर.

* ८६. 'नवकुसुममाला' १९०७

मनोरंजक ग्रंथ प्रसारक मंडळी–गिरगांव, मुंबई ४

* ८७. 'नवयुग वाचनमाला'–पुस्तक ३ रे १९५४

संपा. : आचार्य अत्रे.

८८. दैनिक 'नवशक्ति' २६।४।१९८७

श्री. शांताराम नांदगांवकर 'प्रशांत', १९ ब, २० वा रस्ता, खार, मुंबई ५२.

* ८९. 'नाथ घाणेकर यांची समग्र कविता'–खंड १ ला–१९४२

सह्य प्रकाशन मंडळी, सातारा शहर.

संपा. : शिवराम गोविंद भावे,–यादो गोपाळ पेठ, सातारा शहर.

* ९०. 'पत्री' १९३५

प्रका. : दोघू गंगाराम शिंपी, तरुण सेवक संघ, खादी भांडार, अमळनेर.

* ९१. 'निवडक पत्री' ११।२।८५

साधना प्रकाशन–प्रका. : नाना डेंगळे, साधना प्रेस, ४३०/३१, शनवार, पुणे ४११ ०३०.

* ९२. 'पराग'–१९४१

प्रका : यशवंत खुशाल देशपांडे–यवतमाळ.

* ९३. 'पद्मदल' १९२७

संग्रा. : दत्तात्रय अनंत आपटे–प्रका–मुद्रक-शंकर नरहर जोशी, चित्रशाळा, १०२६ सदाशिव, पुणें.

अधिकार : वाङ्‌मयविहार मंडळ, नाशिक.

* ९४. 'पद्यसमुच्चय' १९०८–६ वी आवृत्ती

संपा. : रामचंद्र भिकाजी जोशी चित्रशाळा पुणे.

* ९५. 'प्रतिभा' १९३०

प्रका. : काशिनाथ श्रीधर नायक, गोमांतक प्रेस, मुंबई.

* ९६. 'प्रभा' ९।९।१९२७

रविकिरण प्रकाशन–संपा. प्रका. : श्रीधर बाळकृष्ण रानडे, ४६१ शनवार, पुणे.

९७. 'प्रवाहिनी' १९५६.

संपा. : प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित. कॉंटिनेंटल प्रकाशन, प्रका. : अनंत अंबादास कुळकर्णी, सदाशिव पेठ पुणे २.

९८. 'पागोळ्या'–फेब्रु. १९८१

'अभिनव प्रकाशन' प्रका. वा. वि. भट,

५३, गुरु नानक मार्केट, डॉ. आंबेडकर रोड दादर, मुंबई. १४

अधिकार : सदाशिव करंदिकर, १३०, ब्राह्मण आळी
१७, भिवंडी, जि. ठाणे–४२१३०२.

९९. 'पानफूल' २८।११।१९७३

प्रका. : दि. कोल्हापूर रायटर्स को. ऑ. सो. लि.
१०४९, 'ई' वॉर्ड, शाहूपुरी ६ वी गल्ली, कोल्हापूर १.

अधिकार : (कै. सूर्यकांत खांडेकर),
श्रीमती अनुराधा सूर्यकांत खांडेकर, 'सावली'
९८३ ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६०१२

१००. 'पारिजातक'–जानेवारी १९७४

'गुरुनाथ प्रकाशन'–प्रका. : सौ. सोनाबाई य. खडके, बोरपाडळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

अधिकार : श्री यशवंत खडके. ,,

१०१. 'प्रिय कविते'–१९७४

प्रका. : गो. य. राणे सदाशिव, टिळक रोड, पुणे ३०.

१०२. 'प्रियंवदा'–१९६३

प्रका. : पंडित अनंत कुळकर्णी, १८६, शनवार, पुणे २.

अधिकार : श्री. कृ. गं. दिक्षित (कवी संजीव), ५०, नवी पेठ, दिक्षित स्टुडिओ, सोलापूर-४१३००७.

* १०३. 'पुष्पवाटिका'–जानेवारी १९२५

प्रका. : कवि मित्रमंडळ, साजवाडी, काव्योदय ग्रंथमाला, दादर, मुंबई.

* १०४. 'पुष्पगंधा' १३-१-१९६६

प्रका. : सौ. विजया पारखी, श्री गणेश साहित्यधारा, श्री. चाटेवाडा, स. नं. ४, चिटणवीसपुरा मार्ग, महाल, नागपूर–२.

* १०५. 'प्रेमदल' १९२७

द. अ. आपटे, वाङ्मयविहार मंडळ, नासिक

* १०६. 'प्रेमपराग' १९२७

संग्रा. : बाबुराव वासुदेव कारेकर प्रका : माधव गोपाळ कुळकर्णी–वाकरेकर, भारत कवि मंडळ, कोल्हापूर.

१०७. 'प्रेषित' ७।१२।१९८५

प्रका. : सुदेश हिंगलासपूरकर–'संकल्प प्रकाशन' ४६/१३९१, नेहरूनगर, कुर्ला (पूर्व), मुंबई ४०० ०२४.

अधिकार : सौ. अर्चना भोसले, ७, 'शांती', डहाणूकर वाडी, कॅ. चंदावरकर मार्ग, कांदिवली (प.) मुंबई ४०००६७.

१०८. 'पंचगंगा' फेब्रु. १९६४

प्रका. : सर्जेराव आ. पाटील–चिटणीस–षष्ट्यद्बिपूर्ती समारंभ समिती–कोल्हापूर. संपा. : सी. गो. सरदेसाई, श्रीरंग समडोळीकर अधिकार : श्री. म. शं. भोसले–इ, १०२३, शाहुपुरी, कोल्हापूर.

१०९. 'पंढरीचा विठू आणि इतर प्रेमळ गीते' २५।७।१९६९

प्रका. : र. य. क्षीरसागर, क्षीरसागर आणि कंपनी, ६५४, शुक्रवार, पुणे २.

*११०. 'फुलबाग' १४।१।१९३६

प्रका. : य. गो. जोशी, ८५४, सदाशिव, पुणे २.

१११. 'फुलोरा' जुलै १९८२

'शिवसंस्कार प्रकाशन'–रा. वा. शेवडे, २२०५ डी, शुक्रवार पेठ, कोल्हापूर-४१६००२.

*११२. 'बालवीर गीतें'–२ री आवृत्ती १९२९

संग्रा. : यशवंत विठ्ठल आपटे, प्रका. : नारायण विठ्ठल आपटे, आपटे आणि मंडळी, ४०१ सदाशिव, पुणे.

*११३. 'बोबडे यांची कविता' १९३७

प्रका. : त्र्यं. ना. वझलवार,–बोबडे काव्य प्रकाशन मंडळ, मुद्रक : पु. रा. खांडवेकर, गोपाल प्रिंटिंग प्रेस, नागपूर.

*११४. 'बीजेची कोर' १९२६

प्रका. : गोपाळ गोविंद अधिकारी, ५३३ सदाशिव, पुणे.

*११५. 'भावकमल' १९७६

प्रका. : सौ. शालिनी प्रभाकर जोशी, कॉटनग्रीन, मुंबई.

११६. 'भावनिर्झर' १९३८

प्रका. : वासुदेव गोविंद मायदेव, २८, डेक्कन जिमखाना, पुणे ४. अधिकार : सु. वा. मायदेव ,,

*११७ 'भावपूर्णा' १९४३

प्रका : त्रिंबक अनंत माईणकर, ११, इमली बाजार, इंदूर.

*११८. 'भाव-भेट' १९३२

प्रका. : गोपाळ गंगाधर पोतदार, ४०, सदाशिव, सातारा.

*११९. 'भावमंथन' फेब्रु. १९३०

रविकिरण मंडळ प्रकाशन–प्रका. : गणेश महादेव वीरकर–सदाशिव पेठ, पुणे.

*१२०. 'भावलेखा' १५।११।१९३४

संपा. राजकुमारी आक्कासाहेब पंत, औंध.

१२१. 'भाववीणा' ऑक्टो. १९६०

व्हीनस प्रकाशन, पुणे

१२२. 'भावनातरंग' १०।५।१९३९

प्रका. : द. र. कोपर्डेकर प्रकाशन मंडळ,
५२९, सदाशिव पेठ, पुणे २.

अधिकार : श्री. द. र. कोपर्डेकर, C/o स्थानिक राजभुवन, बर्फीवाला रोड, अंधेरी (प.) मुंबई ५८.

१२३. 'भारत काव्यसंग्रह' मे १९६१

संपा. : बा. ना. तळवाडकर, रावळगांव, जि. नाशिक.

१२४. 'भारत अमुचा जगीं महान' १९६५

'सत्यवती प्रकाशन' प्रका. : सौ. मंदाकिनी नलावडे,
४११, शुक्रवार, पुणे २.

अधिकार : सौ. सत्यवती वसंतराव नलावडे, १२, प्रवरा बिल्डिंग, धनकवाडी, खो. क्र. २०/१, पुणे-सातारा रोड, पुणे ४३.

१२५. 'मधुधारा' १९६२

प्रका. : पंडित अनंत कुळकर्णी, १८६, शनिवार, पुणे २.

अधिकार : श्री. माधव गोविंद काटकर, ५२१, शुक्रवार पेठ, लक्ष्मी निवास, सोलापूर-४१३००२.

*१२६. 'मधुमाधव' २०।१०।१९२४

रविकिरण मंडळ प्रकाशन, प्रका. : य. दि. पेंढारकर, ४६१, शनवार पेठ, पुणे.

१२७. 'मधुलहरी' २६।१।१९६९

संपा. : बाजीराव केशवराव थोरात. प्रका. : संताजीराव के. थोरात, 'वसंतबहार'—कार्वे, ता. कऱ्हाड, जि. सातारा.

१२८. 'मधुवंती' २६।१।१९६६

'आशा प्रकाशन'—सौ. आशा भालेराव, श्री. अप्पा बेंद्रे १०४, रविवार पेठ, पुणे २

अधिकार : (क्र. ५५ पहा—मधुकर जोशी.)

१२९. 'मधुवंती' जानेवारी १९६६

प्रका. : द. धों. वझे—'आनंदीभुवन' मु. पो. अंबरनाथ, जि. ठाणे.

अधिकार : सौ. चंद्रप्रभा नानासाहेब पगारे एच-१/१, ऑर्डनन्स इस्टेट, पो. अंबरनाथ, जि. ठाणे-४२१५०२

१३०. 'मनुका' १९६५

प्रका. : वि. र. बाम, रामकृष्ण बुक डेपो. प्रार्थना समाज नाका, गिरगांव, मुंबई ४.

अधिकार : सौ. विमल महाजन २५२/५८, क्रांतिनगर, खो. १८ गिरगांव ४.

१३१. 'मयूरपंख' १९६४

प्रका. : जयसिंग शिंदे—'अनुमाधव बंगला', १५५३, न्यू राजाराम पुरी, काटकर माळ, कोल्हापूर.

*१३२. 'मराठमोळा' १०।१।१९३९
संप्रा. प्रका. : जयवंत बाबूराव जगताप,
१२४८, शुक्रवार, पुणे.

*१३३. 'मराठ्यांचें संग्रामगीत' १९२२
प्रका. : दु. आ. तिवारी, आवृत्ती ८ वी १९५४
प्रका. : दामोदर नारायण मोघे, स्कूल व कॉलेज बुक स्टॉल, घर क्र. २९४ बी, कोल्हापूर.

१३४. 'मराठी माती'
रा. ज. देशमुख प्रकाशन, पुणे.
अधिकार : वि. वा. शिरवाडकर, पटेल कॉलनी, शिवाजी पथ, नासिक १

*१३५. 'महाराष्ट्र कवी परंपरा' १९३९
संपा. : यशवंत, प्रका. : श्री. वि. दामले, एन्. के. पब्लिकेशन हाऊस, पुणे-२.

१३६ 'महाराष्ट्र गाथा' १९६० शिवजयंती.
भारती प्रकाशन-संपा. : कृ. पां. कुळकर्णी-आचार्य अत्रे.
प्रका. : य. कृ. कुळकर्णी-बांबुळी निवास, ले. ज. रोड, मुंबई १६
अधिकार : डॉ. वि. म. कुळकर्णी, 'कमळवेल' ६१/४८, एरंडवणे, पुणे ४
यशवंत-श्री. दिलीप य. पेंढारकर, १४९६ सदाशिव, पुणे ४११०३०

१३७. 'महाराष्ट्र गौरव गीतें' २७।४।१९६०
शब्दरंजन स्पर्धा प्रकाशन, संपा. : गंगाधर महांबरे,
प्रका. : जयंत साळगांवकर, मोरबाग रोड, मुंबई १४.

१२५. 'मधुधारा' १९६२

प्रका. : पंडित अनंत कुळकर्णी, १८६, शनिवार, पुणे २.

अधिकार : श्री. माधव गोविंद काटकर, ५२१, शुक्रवार पेठ, लक्ष्मी निवास, सोलापूर-४१३००२.

* १२६. 'मधुमाधव' २०।१०।१९२४

रविकिरण मंडळ प्रकाशन, प्रका. : य. दि. पेंढारकर, ४६१, शनवार पेठ, पुणे.

१२७. 'मधुलहरी' २६।१।१९६९

संपा. : बाजीराव केशवराव थोरात. प्रका. : संताजीराव के. थोरात, 'वसंतबहार'—कार्वे, ता. कऱ्हाड, जि. सातारा.

१२८. 'मधुवंती' २६।१।१९६६

'आशा प्रकाशन'—सौ. आशा भालेराव, श्री. अप्पा बेंद्रे १०४, रविवार पेठ, पुणे २

अधिकार : (क्र. ५५ पहा—मधुकर जोशी.)

१२९. 'मधुवंती' जानेवारी १९६६

प्रका. : द. धों. वझे—'आनंदीभुवन' मु. पो. अंबरनाथ, जि. ठाणे.

अधिकार : सौ. चंद्रप्रभा नानासाहेब पगारे एच-१/१, ऑर्डनन्स इस्टेट, पो. अंबरनाथ, जि. ठाणे-४२१५०२

१३०. 'मनुका' १९६५

प्रका. : वि. र. बाम, रामकृष्ण बुक डेपो. प्रार्थना समाज नाका, गिरगांव, मुंबई ४.

अधिकार : सौ. विमल महाजन २५२/५८, क्रांतिनगर, खो. १८ गिरगांव ४.

१३१. 'मयूरपंख' १९६४

प्रका. : जयसिंग शिंदे—'अनुमाधव बंगला', १५५३, न्यू राजाराम पुरी, काटकर माळ, कोल्हापूर.

*१३२. 'मराठमोळा' १०।१।१९३९
संग्रा. प्रका. : जयवंत बाबूराव जगताप,
१२४८, शुक्रवार, पुणे.

*१३३. 'मराठ्यांचें संग्रामगीत' १९२२
प्रका. : दु. आ. तिवारी, आवृत्ती ८ वी १९५४
प्रका. : दामोदर नारायण मोघे, स्कूल व कॉलेज बुक स्टॉल, घर क्र. २९४ बी, कोल्हापूर.

१३४. 'मराठी माती'
रा. ज. देशमुख प्रकाशन, पुणे.
अधिकार : वि. वा. शिरवाडकर, पटेल कॉलनी, शिवाजी पथ, नासिक १

*१३५. 'महाराष्ट्र कवी परंपरा' १९३९
संपा. : यशवंत, प्रका. : श्री. वि. दामले, एन्. के. पब्लिकेशन हाऊस, पुणे–२.

१३६ 'महाराष्ट्र गाथा' १९६० शिवजयंती.
भारती प्रकाशन–संपा. : कृ. पां. कुळकर्णी–आचार्य अत्रे.
प्रका. : य. कृ. कुळकर्णी-बांबुळी निवास, ले. ज. रोड, मुंबई १६
अधिकार : डॉ. वि. म. कुळकर्णी, 'कमळवेल' ६१/४८, एरंडवणे, पुणे ४
यशवंत–श्री. दिलीप य. पेंढारकर, १४९६ सदाशिव, पुणे ४११०३०

१३७. 'महाराष्ट्र गौरव गीतें' २७।४।१९६०
शब्दरंजन स्पर्धा प्रकाशन, संपा. : गंगाधर महांबरे,
प्रका. : जयंत साळगांवकर, मोरबाग रोड, मुंबई १४.

१३८. 'महाराष्ट्र गौरव गीत संग्रह' २४।१२।१९८६
'हर्षद प्रकाशन' : संग्रा. : प्रा. वसंत रत्नपारखी,
सौ. इंदुमती रत्नपारखी. १, उदय कॉलनी, जळगांव,
(पूर्व खानदेश) ४२५००१.
अधिकार : श्री. वसंत रत्नपारखी. „

„ श्री. वा. रा. कान्त, ४५, संदेश, उशमानगर, मालाड (प.) मुंबई ४०००६४.

„ श्री. धों. वे. जोशी–जकात नाक्याजवळ, मेहरुण रस्ता, जळगाव–४२५००१.

„ वंदना विटणकर, १५९, चंपानिवास, ३ रा मजला, ले. ज. रोड, माहीम, मुंबई १६.

„ लक्ष्मणराव तायडे, अध्यक्ष–जिल्हा कॉंग्रेस कमिटी, मु. पो. पारस, (अकोला)

„ आल्हाद काबाडी, बँक ऑफ इंडिया ३, फाल्गुनी, सरोजिनी पथ, सांताक्रुझ (प.) मुंबई ५४.

„ श्री. ल. वि. केळकर, ८, 'लौकिक' दादर क्रॉस लेन दादर (पू.) मुंबई १४.

„ श्री. शिवराम देवलकर, १/२७, शाहू बिल्डिंग, डी. जी. अंबेकर मार्ग, परेल, मुंबई १२.

„ प्रा. श्री. बी. पी. धारराव, सिन्नर महाविद्यालय, मु. पो. सिन्नर, जि. नाशिक.

„ श्री. गंगाधर अंबेकर, मु. पो. पारध, (शाहूराजा) जि. जालना.

„ मधुकर केचे, अनुसया, राठीनगर, अमरावती.

अधिकार : श्री. जयभीम लळींगकर, कोषाध्यक्ष, युवा साहित्य समाज, शाखा मालेगांव, जि.–नाशिक.

„ श्री. सुभाषचंद्र वैष्णव, द्वारा–दैनिक जनशक्ती, जळगांव, ४२५००१.

„ श्री. वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज), पटेल कॉलनी, शिवाजी पथ, नाशिक–१.

„ राजेंद्र यशवंत वैद्य, उषादर्शन को. ऑ. हौ. सोसायटी 'सोपान' २० अ, २ रा मजला, गणपती चौक, आग्रा रोड, कल्याण–४२१३०१.

१३९. 'महाराष्ट्र दर्शनपत्रक' आंतरभारती कलाकेंद्र, मुंबई.

अधिकार : प्रा. वसंत बापट, कुकुल कुंज–११ वा. रस्ता खार, मुंबई ५२.

*१३९. 'महाराष्ट्राची परंपरा (संयुक्त-महाराष्ट्राचा पोवाडा)' १९५०

प्रका. : शकुंतला मोडक, लोकसाहित्य, ८७, शिवाजी पार्क, दादर मुंबई २८.

१४०. 'महाराष्ट्रभूमि बहुगुणी'

रसवंती प्रकाशन–मुद्रक–प्रका. : कृ. ग. साबळे, ५७/३, हरहरवाला बिल्डिंग क्र. १४, डिलाईल रोड, मुंबई ११.

अधिकार : शाहीर साबळे आणि पार्टी, २७ एच् आंबेकर नगर, परळ मुंबई १२.

१४१. 'महाराष्ट्राला मुजरा'–पहिली आवृत्ती.

प्रका. : सौ. विजया भागवत, C/o लोकवाङ्मयगृह, लक्ष्मी रोड, लकडी पूल, पुणे २.

अधिकार : (अण्णाभाऊ साठे) श्री. म. अ. साठे, मु. पो. वाटेगांव,
ता. वाळवे, जि. सांगली.
(शाहीर द. ना. गव्हाणकर) श्री. नलिनी द. गव्हाणकर
२५ बी, पुरुषोत्तम बिल्डिंग, त्रिभुवन रोड, गिरगांव,
मुंबई ४००००४.

* १४२. 'महाराष्ट्र लक्ष्मी' १९६४
संपा. : प्रा. म. ना. अदवंत, प्रका. : अं. ज. प्रभू,
विदर्भ मराठवाडा बुक कं., १३२० शुक्रवार, पुणे.

* १४३. 'महाराष्ट्र शारदा' १९३०
संपा. प्रका. : आचार्य अत्रे.

* १४४. 'माझी मराठी' १९६५
प्रका. : रंगनाथ माधव जोशी-जोशी ब्रदर्स, बुकसेलर्स,
रंगमहाल रोड, हैदराबाद.

१४५. 'मानसमेघ'
'प्रपंच प्रकाशन'-प्रका. : माधव रा. कानिटकर, १९४५,
सदाशिव पेठ, पुणे-३०.

अधिकार : सौ. इंदिरा कुळकर्णी, 'अनुग्रह' २९, एकोपा
सोसायटी, सॅलिस्बरी पार्क, पुणे-१

* १४६. 'मातृगीतांजली'
संपा. : नारायण गंगाधर लिमये.

* १४७. 'मेघा' १९५७
प्रका. : मधुकर राजाभाऊ डांगरे, कॅांग्रेस नगर, नागपूर.

* १४८. 'मोगऱ्याची फुलें'-गुच्छ २ रा-जुलै १९०८
प्रका. : नाडकर्णी आणि मंडळी.

* १४९. 'मोत्यांची माळ' १९३०

प्रकाशक : परचुरे-पुराणिक आणि मंडळी, पब्लिशर्स व बुकसेलर्स, माधवबाग, मुंबई ४.

* १५०. 'मोहर' १९४१

स्वस्तिक प्रकाशन, रा. श्री. दिवाण, सोलापूर.

* १५१. 'मोहर' २६।१।१९६३

प्रका. : मराठवाडा कविसंमेलन, नांदेड.

* १५२. मंगलज्योती'–डिसेंबर १९५५

सौ. शांताबाई तडवी (परदेशी) १९४६, रायखड, अहमदाबाद,

१५३. 'मंदिका'–२।१०।१९७६

'वैभव प्रकाशन'–प्रभाकर देशमुख, प्लॉट क्र. १५०, आयुर्वेदिक महाविद्यालय, ले आउट, मिरची बाजार, नागपूर–४४००२४.

* १५४. 'यशोदायिनी'–पुस्तक १ लें १९२८

प्रका. : व्ही. जी. कुळकर्णी, शारदा–१७, मुंबई ७.

१५५. 'युगे'–जानेवारी १९७३ 'व्हीनस प्रकाशन'

प्रका. : स. कृ. पाध्ये, 'तपश्चर्या'-३८१ क, शनिवार पेठ, पुणे ३०

अधिकार : (प्रि. शं. श्री. वाशीकर) सौ. सुशिला अवटी वाशीकर C/o श्री. शं. श्री. अवटी वाशीकर, प्राचार्य, बीएड् कॉलेज, बुलढाणा, जि. बुलढाणा.

१५६. योगवासिष्ठ.

१५७. 'रणदुंदुभि'–भाग १ ला १९६६

कृष्णा खोरे प्रकाशन, कासेगांव, ता. वाळवे, जि. सांगली.

अधिकार : (कै. बाळ कासेगांवकर) श्री. सुनंदा बाळकृष्ण वीर, ता. वाळवे, जि. सांगली.

१५८. 'रश्मिबंध'–२४।५।१९८०

प्रका. : म. श्री. पाटील, वाघोड, ता. रावेर, जि. जळगांव.

अधिकार : श्री. मधु वाघोडकर, मु. पो. खिरोदा, ता. रावेर, जि. जळगाव

१५९. 'रवीन्द्रनाथ आणि महाराष्ट्र' १५।८।१९६१

संपा. : श्री. ज. जोशी, जोशी–लोखंडे प्रकाशन–पुणे, महाराष्ट्र राज्य, रवीन्द्रनाथ जन्मशताब्दि प्रकाशन समिती.

* १६०. रामचंद्र वासुदेव दाते उ. रामशाहीर यांची कविता १९२९

संपा. : य. गो. जोशी, प्रका. : वि. ग. ताम्हणकर, मॅनेजिंग डायरेक्टर–महाराष्ट्र पब्लिशिंग हाऊस लि. पुणे.

* १६१. 'रावसाहेबांची कविता'–जानेवारी १९६१

प्रका. : मराठवाडा साहित्य परिषद, औरंगपुरा, औरंगाबाद

१६२. 'रिमझिम' १६।१।१९६०.

मनोहर ग्रंथमाला प्रकाशन, प्रका. : मनोहर महादेव केळकर, १६०९, सदाशिव पेठ, पुणे–२

अधिकार : श्रीमती योगिनी जोगळेकर, १२९२, सुभाषनगर, पुणे–४११००२

१६३. 'रूपगंधा'–१९६१

नागविदर्भ प्रकाशन, अमरावती.

१६४. 'रंगबावरी' १९६४

मौज प्रिंटिंग ब्यूरो, मुंबई ४

अधिकार : श्री. इंदिरा संत २७, आदर्श नगर, वडगांव, बेळगांव ५९०००५.

१६५. 'रंग माझा वेगळा' मार्च १९७४

प्रका. : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४

१६६. 'लुकलुक' १९५४

'सहकार प्रकाशन', संपा. : भा. ल. रानडे, सांभारे रस्ता, सांगली.

१६७. 'वसंत' ५।१०।१९८४

प्रका. : वसंत पालेकर, ५, जयअंबे, लिबर्टी गार्डन, क्रॉस रोड, नं. २, मालाड (प.) मुंबई ६४

* १६८. 'वाकळ' १९५६

चित्रशाळा प्रेस प्रकाशन–पुणे २.

* १६९. 'वानगी' ऑक्टो.–१९६०

शशी प्रकाशन–प्रका. : सौ. आशा नन्नोरे, संपा. : गोविंद नन्नोरे, जय इंगळे. वॉर्ड क्र. १, धामणगांव. विदर्भ

* १७०. 'वासंती' १९२९

संपा. : विनायक सदाशिव सुखठणकर, प्रका. : पुरुषोत्तम अनंत कोलवाळकर, पार्वती बिल्डिंग, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २

* १७१. 'वाङ्मयशोभा'–जानेवारी १९८६.

१७२. 'वाग्वैजयंती' १९७०–'रम्यकथा प्रकाशन', पुणे

* १७२. 'विनायकाची कविता'–३ री आवृत्ती १९४७

संपा. :दत्तात्रय अनंत आपटे, प्रका. : दामोदर त्र्यंबक जोशी, चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे २

* १७३ 'विसावा'–१९५५

प्रका. : श्री. ल. लिमये, हंपयार्ड रोड, धंतोली, नागपूर–१

* १७४. 'विंझणवारा'–१९६५

प्रका. : ग. ल. ठोकळ, ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता पुणे.

* १७५. 'वेचे'–भाग १ ला १९०७

हरी कृष्ण दामले, पुणे.

१७६. 'शाहीर साबळे यांनी गायिलेली लोकगीतें'–भाग १ ला
४ थी आवृत्ती १९६८

प्रका. : एफ्. बी. बुऱ्हाणपुरवाला, संग्रा. मुकुंदा विचारे, 'सेंट्रल प्रकाशन'–६ ए, विजय चेंबर्स, पाववाला स्ट्रीट, मुंबई ४

१७७. 'शांभवी'–सप्टें. १९६६

'जयहिंद प्रकाशन' प्रका. : ग. का. रायकर, झावबावाडी, ठाकुरद्वार, मुंबई ४००००२.

अधिकार : श्री. रॉक कार्व्हालो–'निवारा' माणिकपूर पीठा, पो. वसई रोड, ता. वसई, जि. ठाणे ४०१२०२.

१७८. 'शिंग फुंकिलें रणीं'–१७।१०।१९८२

प्रका. : लीलाधर हेगडे, सानेगुरुजी आरोग्य मंदिर, सांताक्रुज (प.) मुंबई ५४.

अधिकार : प्रा. वसंत बापट, 'कुलुल कुंज' ११ वा रस्ता, खार, मुंबई ५२.

* १७९. 'शिवप्रताप'–१९२८

काव्यकिरणमाला : प्रका. : भि. का. भोरटके, जळगांव.

* १८०. 'शिवस्वप्न'–१७।१२।१९६१

संध्या प्रकाशन : पी. एल्. तथा मामा सावंत, १५, गोपाळ भुवन, खेड गल्ली, दादर मुंबई २८.

* १८१. 'सचित्र फुलांची बाग' १९४१

प्रका. : डी. एन्. मोघे–मालक–स्कूल अँड कॉलेज बुक स्टॉल, कोल्हापूर.

१८२. 'समग्र बालकवी' १९६६

संपा. : श्री. पार्वतीबाई ठोमरे, व्हीनस प्रकाशन पुणे.

१८३. 'समरगीतें'

महाराष्ट्र सेवा दल प्रकाशन, प्रका. : बा. य. परीट, कार्यवाह राष्ट्र सेवादल, साने गुरुजी स्मारक, सिंहगड रस्ता, पर्वती, पुणे

१८४. 'समाज पत्रिका' १५।५।१९८७

अहमदाबाद

अधिकार : (क्र. १९१ पहा)

* १८५. 'सरिता' १०-१०-१९७२

'आनंदबन प्रकाशन' प्रका. : गो. म. किरणे, संपा. : प्रा. जवाहर मुथा, प्रा. यशवंत भिमाले, आनंद प्रकाशन, माहिम, मुंबई १६.

१८६. 'सहकार सेतू'

दिवाळी अंक महाराष्ट्र स्टेट को. ऑ. ट्रेडिंग कॉर्पोरेशन

१८७. 'स्वप्नील कविता'–२५।१२।१९८१

श्रीविशाखा प्रकाशन : राजा फडणीस, ५८, शनवार पुणे ३०

अधिकार : श्री. नंदकिशोर शुक्ल, श्रीकृष्ण टॉकीजजवळ,
चाळिसगांव, जळगांव.

१८८. 'स्वरमेळ'–१।३।१९६३

संपा. : शरच्चंद्र स. बारमुख–बाळकृष्ण हि. साटम.

प्रका. : बाबाजी हि. साटम, बाळासाहेब स. बारमुख,
१२, जवाहर नगर गोरेगांव ६२.

अधिकार : श्री. बाबाजी हिरोजी साटम.

४९/३०६, महा. हौ. बो. कॉलनी, दिंडोशी, मालाड, मुं. ९७.

१८९. 'स्वप्नरंजन'–१९३२

'व्हीनस प्रकाशन'–प्रका. : स. कृ. पाध्ये, अप्पा बळवंत चौक, पुणे २.

१९०. 'स्वप्नलहरी'–१९५३
कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
संपा. : गिरीश, १९६/१९ सदाशिव, पुणे

१९१. 'साबर सुधा'–१७।१०।१९८२
प्रका. : आशा नावलेकर–अध्यक्षा 'रचना कविमंडळ', 'समीर विहार' पटेल भुवन बस स्टॉप, मणीनगर, अहमदाबाद ८
अधिकार : सौ. आशा नावलेकर–लक्ष्मी विष्णू विहार, लाला लजपतराय मार्ग, मणीनगर, अहमदाबाद ३८०००८

१९२. 'स्वातंत्र्य कवी गोविंद यांची कविता' १९४७
गोविंद काव्य प्रकाशन मंडळ, नासिक, कृ. ब. महाबळ

* १९३. 'साहित्य कलश' जुलै १९६४
संपा. वा. रा. ढवळे, व. दि. कुळकर्णी, प्रका. प्रा. अरविंद मंगरूळकर, चिटणीस–महा. साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे २

१९४. 'सांज मराठा' २।११।१९६५
अधिकार : सौ. विजया शेवडे, २६/१५१, विजयनगर, नवावाडज, अहमदाबाद ३८००१३.

१९५. 'सूरगंधा' ७।७।१९७१
संजय प्रकाशन, प्रका. : सौ. ललिता शंकर भावे ९१७/२२ फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४
अधिकार : क्र. १६२ पहा.

१९६. 'स्फूर्तिगीते' १९७२
प्रका. : महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे

१९७. 'स्फूर्तिनिनाद' १९५०
के. भि. ढवळे प्रकाशन, मुंबई ४.

१९८. 'स्वेदगंगा' ९।१२।१९५८ २ री आवृत्ती
रा. ज. देशमुख प्रकाशन ७३९, बुधवार पेठ, पुणे २.
अधिकार : श्री. गोविंद विनायक करंदिकर, ७, 'आनंदवन'
साहित्य सहवास, वांद्रे (पू.) मुंबई ५१

१९९. 'सेनापती बापट समग्र वाङ्मय'–अधिकार-क्र. ६४ पहा

२००. 'सोनेरी चांदणें'–जानेवारी १९६१
व्हीनस प्रकाशन, ४१०, शनवार, पुणे २
अधिकार : क्र. २७ पहा

२०१. 'सोपानदेवी'–प्रका : ग. ल. ठोकळ, ठोकळ प्रकाशन
ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता पुणे २
अधिकार : सौ. सुचित्रा चौधरी, ३०२, मनीष महाल,
वीरा देसाई रोड, अंधेरी (प.) मुंबई ५८

*२०२. 'सौरभ'–डिसेंबर १९६०
वाङ्मय विकास प्रकाशन-१ : संपा. : रायभान जाधव, चंद्रकांत पाटील, पांडुरंग कि. साळुंके–अध्यक्ष,
C/o मुकुंद गायकवाड, न्यू कॉलनी, उस्मानपुरा, औरंगाबाद

*२०३. 'संगम'–८।५।१९६४
बहिःशाल प्रकाशन, प्रका. : पु. शं. पतके, संपा. : चंद्रकांत आर. बिवरे–बहिःशाल शिक्षण मंडळ, सातारा रोड

२०४. 'संग्रहालय मासिक' मार्च १९८६
अभिनव प्रकाशन, श्री. वा. वि. भट. पत्ता : क्र. ९८ पहा.
अधिकार : श्री. प्रल्हाद चेंदवणकर बच्चूवाला बिल्डिंग,
खो. क्र. ५, माझगांव, ४०० ०१०

२०४. 'संगीता आणि अमृतगीते' १९८४
सुचित्रा प्रकाशन, अंधेरी, मुंबई ५८

अधिकार : क्र. २०१ पहा.

२०५. 'हृदयकमल' २६।१।१९६३

प्रका. : बा. वा. कारेकर, पाटगांवकर बिल्डिंग, ३ रा मजला, १९५७ सी, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर

अधिकार : श्री. व. बा. कारेकर २७२५, 'बी' वॉर्ड, मंगळवार पेठ, मंडलिक गल्ली, पांडुरंग दत्तोबा चेचर यांचे घरी कोल्हापूर ४१६००२.

२०६. 'हिमरेषा' १९६४

रा. ज. देशमुख प्रकाशन, पुणे

२०७. 'हुतात्मा चाफेकर व अन्य कविता' जानेवारी १९७४

प्रका. : स. गो. चिंधडे, टिळक रोड, मालेगाव, जि. नाशिक

अधिकार : श्री. मधुकर स. चिंधडे ८ सहवास सोसायटी, शरणपूर रोड, नाशिक, श्री. वसंत स. चिंधडे, 'गंगाजल' साने गुरुजी लेन, त्र्यंबक रोड, नासिक ४२२००२

२०८. 'हे बंध अंतरीचे' २ री आवृत्ती २०।३।१९७७

प्रका. मा. बा. जोशी, प्रकाश प्रकाशन, ११०५, शुक्र सदन, मेन रोड, नासिक ४२२००१

२०९. 'क्षितिज फिरे गरगरा'–१२।४।१९७०

'अलकनंदा प्रकाशन' : होळसमुद्र, जि. बिदर, कर्नाटक.

२१०. 'ज्ञानेश्वरी'

२११. श्री. प्रभाकर अत्रे–१५५, गव्हर्नमेंट सर्व्हेंटस् कॉलनी, शहाआलम टोलनाका, अहमदाबाद ३८००२८.

२१२. श्री. पूर्णानंद मांगुळकर–तपोवन, अमरावती २.

समाप्त

REFBK C025778

REFBK-0025778

